क्रांतिकारक टिळक नि त्यांचा काळ

लेखक

अनंत जनार्दन करंदीकर

काळ प्रकाशन, पुणें

क्रांतिकारक टिळक

नि

त्यांचा काळ

क्रांतिकारक टिळक नि त्यांचा काळ

लेखक

अनंत जनार्दन करंदीकर

काळ प्रकाशन, पुणें

१९६९

मूल्य रु. १५

मुद्रक : मु. शं. दाते, यशवंत मुद्रणालय, १८३५ सदाशिव पेठ, पुणें २.
प्रकाशक : शं. रा. दाते, काळ प्रकाशन, १४०४ सदाशिव पेठ, पुणें २

अर्पणपत्रिका

ज्यांच्या टिळकभक्तीचा

आणि

टिळकशत्रूंच्या द्वेषाचा वारसाच

मला लाभला

त्या पितृचरणीं समर्पण

अ. ज. करंदीकर

लेखकाचा परिचय

महाराष्ट्रात आता नवसुशिक्षितांची नवी कोरी पिढी मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. या नव्यांना जुन्या पिढीतील व्यासंगी पण विज्ञापनाविन्मुख लेखकांचीं नुसतीं नांवेंही अविदित असतील. मग त्यांना त्यांच्या वाङमयतपस्येची काहीही कल्पना नसेल, हें उघड आहे. याकरिता या क्रांतिकारक टिळकचरित्राच्या वाचकांना या विषयावर लिहिण्याच्या माझ्या अधिकाराची कल्पना येण्याकरिता थोडें आत्मकथन करणें आवश्यक आहे. आपला परिचय आपणच लिहून तो दुसऱ्यांच्या नांवाने छापण्यापेक्षा स्वतःच संयम पाळून स्वतःची माहिती सांगणें चांगलें. नाही तरी आता लेखकसंमेलनांतून स्वतःचा परिचय स्वतःच करून देण्याची पद्धति रूढ झाली आहेच.

१९१५ मध्ये मी तेरा वर्षांचा असताना प्रथम पुण्याला आलो आणि तेव्हापासून टिळकपक्षाच्या शक्य तितक्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्यामुळे तत्कालीन राजकारणाचा मला थोडाफार परिचय झाला. वडील 'केसरी'त असल्याने घरी याच राजकारणाच्या गोष्टी चालत आणि 'केसरी'च्या संपादकांचा धाकटा मुलगा अण्णा (य. न. केळकर) हा वर्गबंधु असल्याने त्यांच्या येथील गोष्टीही कानावर येत. गायकवाड वाड्यात नाना निमित्तांनी जावें लागत असल्याने टिळकांशी चार शब्द बोलण्याचे प्रसंग केव्हा केव्हा येत. तेव्हा टिळकांची खरी माहिती जरी मला कळली नसली तरी इतर तरुण विद्यार्थ्यांप्रमाणे माझीही त्यांच्या नेतृत्वावर श्रद्धा बसली होती. पुण्यात आल्यानंतर शाळेतील अभ्यासापेक्षा खाडिलकरांचे परराष्ट्रीय राजकारणावरील आणि पहिल्या महायुद्धावरील लेख, शिवरामपंत परांजप्यांचें काव्यमय गद्य आणि राजवाड्यांचे ऐतिहासिक लेख यांचाच मी अभ्यास आरंभिला. १९१७ मध्ये तेव्हा पुण्यात सार्वत्रिक झालेल्या हिवतापाने मला पछाडलें. शाळेतील अनुपस्थिति सारखी वाढत चालली. १९१९ मध्ये तर सर्व वर्षभर मी अनुपस्थित होतो. याचा परिणाम असा झाला की १९२० मध्ये टिळकनिधनानंतर कलकत्त्याच्या राष्ट्रीयसभेने सरकारी आणि सरकारमान्य शाळांवर बहिष्कार घालण्याचा ठराव केला, तेव्हा ती संधि साधून मी शाळा सोडली. त्या वेळी मी तेव्हाच्या इंग्रजी सातवीत होतो. अशा रीतीने

मला अभ्यासस्वातंत्र्य मिळवून दिल्याबद्दल मी अजूनही गांधीजींचे उपकार स्मरतो.

शाळा सोडल्यानंतर १९२१ मध्ये मी बंगाली शिकलो आणि रामानंदांच्या सुप्रसिद्ध 'प्रवासी' मासिकाचा वर्गणीदार झालो. त्यानंतर क्रमाने १९२२ मध्ये फारशी, १९२३ मध्ये जर्मन, १९२५ मध्ये फ्रेंच आणि उर्दू, १९३० मध्ये रशियन आणि इटालियन आणि १९३२ मध्ये स्पॅनिश या भाषांचा परिचय करून घेतला. १९२६ मध्येही अतिशय आजारी असल्याने तें वर्ष जवळजवळ मी माझ्या खोलीत निजूनच काढलें. पण त्याच वर्षी जमखिंडीच्या भाऊराव आपट्यांच्यामुळे तत्कालीन न्यू पूना कॉलेजातील एक प्रसिद्ध विद्यार्थी मोदी याचा परिचय होऊन त्याला मी पिशेलच्या प्राकृत व्याकरणाच्या जर्मन प्रस्तावनेचें भाषांतर सांगितलें. हें काम चालू असताना मोदीकडील गांधींचें आत्मवृत्त आणि कलापीची कविता हीं पुस्तकें वाचून गुजरातीचा परिचय करून घेतला. हिंदी ही शिकावी लागत नसल्याने पंडित तोतारामांचें 'फिजीद्वीप में मेरे इक्कीस वर्ष' हा ग्रंथ वाचूनच ती आत्मसात् केली. त्याप्रमाणेच पोर्तुगीज भाषाही कधी शिकलो नाही. तरी सुद्धा अण्णा केळकरांच्या आग्रहावरून मी त्याला पिर्सुलेकरांच्या पोर्तुगीज आणि मराठे या ग्रंथाच्या एका खंडाचा सारांश सांगितला, हा बौद्धिक चमत्कार फ्रेंच, इटालियन आणि स्पॅनिश भाषांच्या परिचयामुळे मला करता आला. १९२५ पासून पारी नगरीचें प्रसिद्ध रेव्ह्यू दे द मोंद हें २४० पानांचें पाक्षिक माझ्याकडे येऊ लागलें आणि त्यामुळे फ्रेंच वाङमय आणि परराष्ट्रीय राजकारण यांच्या अभ्यासाला प्रेरणा मिळाली.

याप्रमाणे भाषांचा अभ्यास चालू असताना १९२२ पासूनच माझ्या लेखनाचा प्रारंभ झाला होता. 'एकच प्याल्यातील आंतररहस्य' आणि 'गडकऱ्यांची लतिका' हे लेख चित्रमयजगतात त्या वर्षी मार्च आणि नोव्हेंबर या अंकांतून प्रसिद्ध झाले. त्यानंतर १९२३ च्या मार्च मध्ये 'मराठेशाहीवर मध्यमवर्गाचा परिणाम' हा इतिहासचिकित्सापर लेख प्रसिद्ध झाला. पुढे दत्तोपंत आपट्यांनी तें मासिक सोडल्याने तिथे लिहावयाचें बंद केलें. मग त्या वर्षी लिहिलेलें 'अॅडामचें पाप' आणि 'आरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' हे लेख ज्ञानप्रकाशातील काव्यशास्त्रविनोदात छापले. नंतर 'टिळक महाविद्यालया'चें त्रैमासिक चालू झालें आणि तिथे 'शिशिर गेला, वसंत आला,' 'आत्महत्याप्रतिबंधनिवारक समिति', 'हृदयारण्य', 'विल्यम क्लिसोल्डचें

जग' इत्यादि लेख छापले. हे लेख प्रसिद्ध झाल्यानंतर चाळीस बेचाळीस वर्षांनी डी. एच. लॉरेन्स या कादंबरीकारांनी विल्यम क्लिसोल्डवर लिहिलेला लेख फिनिक्स या त्यांच्या लेखसंग्रहात पहावयाला मिळाला आणि त्यांच्या टीकालेखापेक्षा माझा लेख 'अनंत' पटींनी श्रेष्ठ आहे, हें पाहून मला माझ्या तत्कालीन लेखनाच्या योग्यतेची काहीशी कल्पना आली. असो. त्यानंतर 'रत्नाकर' या नवोदित मासिकाशी माझा संबंध आला. आणि त्या मासिकात काही विदेशी गोष्टींच्या अनुवादासह 'नाम आणि रूप', तसेंच 'अनुराग पथावर' हे अविस्मरणीय लेख प्रसिद्ध झाले.

फ्रेंच आणि उर्दू कवितांच्या परिशीलनानंतर मला पद्यरचनेची ऊर्मि आली. १९३५ मध्ये 'चंद्रप्रभा' (पहिलें शतक) आणि 'फिट्झ-जेराल्डच्या रुबाया' यांचा अनुवाद (सह्याद्रीतून) हीं काव्यें प्रकाशित झालीं. चंद्रप्रभेचें दुसरें शतक १९३९ मध्ये छापलें. या काव्याचा उल्लेख रा. श्री. जोग आणि भ. श्री. पंडित यांच्या आधुनिक मराठी कवितेवरील ग्रंथांतून आला आहे. त्या व्यतिरिक्त अमरुशतकाचा आणि मेघदूताचा मी समवृत्त, समश्लोकी अनुवाद केला असून तो अजून अप्रकाशित राहिला आहे.

१९३९ मध्येच 'केसरी'त परराष्ट्रीय राजकारण आणि क्रांतिकारकांचें राजकारण या विषयावर लिहिलेल्या प्रमुख लेखांचा ५५४ पृष्ठांचा संग्रह 'लढाऊ राजकारण' या नांवाने मीच प्रसिद्ध केला. हा लेखसंग्रह खाडिलकरांना समर्पण करून मी त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त केली आहे. हा ग्रंथ मी खाडिलकरांना नेऊन दिला, तेव्हाच त्यांचें आणि माझें पहिलें आणि शेवटचें पांच मिनिटें बोलणें झालें. त्या ग्रंथात हिंदुस्थानातील मुसलमानांच्या कारस्थानांसंबंधीही काही लेख होते. त्याच्या प्रकाशनानंतर लौकरच अशी परिस्थिति उद्भवली की मला काही काळ त्या विषयाच्या अभ्यासालाच वाहून घ्यावें लागलें. त्याचा परिपाक म्हणजे १९४१ मध्ये प्रसिद्ध केलेला 'गांधी मुस्लिम कॉन्स्पिरसी' हा ग्रंथ होय. या ग्रंथाने गांधीविरोधी हिंदुत्वनिष्ठ पक्षाला जी तात्त्विक भूमिका मिळवून दिली, त्या भूमिकेला तो पक्ष अजून चिकटून राहिला आहे. गांधींच्या आणि मौलानांच्या कारस्थानांचें अपरिहार्य पर्यवसान पाकिस्थानाच्या निर्मितीत कसें होणार आहे, याचें त्या ग्रंथात पाकिस्थाननिर्मितीच्या आधी सहासात वर्षें सविस्तर वर्णन केलें होतें आणि तें अक्षरशः खरें झालें आहे.

१९४४ मध्ये 'अग्रणी' दैनिकाचे अग्रलेख लिहिण्याचें काम मी

पत्करलें. त्या पत्रातून स्वतंत्र विचारसरणीचे, सविस्तर आणि साधार असे जे लेख येत असत, ते सारे मीच लिहिले होते. त्यातल्या काही लेखांवर लेखकाचें नांव असे, काहींवर नसे. ‘अग्रणी’च्या लेखांवर वृत्त-पत्रनियंत्रण समिति, गोरें सरकार आणि पांढरें सरकार या सर्वांचीच वक्रदृष्टि असल्याने त्यांची नेहमीच कसून तपासणी होत असे. या तपास-णीच्या दिव्याला ते लेख टिकल्याने १९४७ पर्यंत ‘अग्रणी’ सरकारी रोषाला तोंड देऊन चालू शकला. १९४६ मध्ये माझ्याच एका लेखा-निमित्त सरकारने त्या दैनिकाकडे सहा सहस्रांचें तारण मागितलें. काही काळ त्या दैनिकाला प्रचलित विषयावर लिहिण्याला बंदी झाली. १९४७ मध्ये पहिलें तारण सरकारजमा करून पुनश्च दहा सहस्रांचें नवें तारण मागितलें. हें नवें तारण भरणें अशक्य असल्याने ‘अग्रणी’ बंद करून ‘हिंदु राष्ट्र’ हें दैनिक खंड न पडता चालकांनी चालू केलें. ही गोष्टही माझ्यामुळेच शक्य झाली. १९४७ मध्ये नवीं वृत्तपत्रें काढण्यावरील बंदी उठली, तेव्हा मी नथूरामला आग्रह केला की इतःपर ‘हिंदुराष्ट्र’ दैनिक चालू करणार असल्याचें निवेदन जिल्हाधिकाऱ्यांपुढे करून ठेवा. ही सूचना संपादकांनी कृतीत आणल्यानंतर काही आठवड्यांनी तेव्हाच्या मुंबई सरकारचें संपादकांना पत्र आलें की तुमच्या हिंदुराष्ट्राच्या ठरा-विक प्रती सरकारकडे येत नसल्याने निर्बंधांना अनुसरून दंडयोजना करावी लागेल. हें पत्र पाहून आम्ही दोघेही हसलो आणि सरकारला कळविलें की अपरिहार्य अडचणींमुळे ‘हिंदुराष्ट्र’ प्रकाशनाला विलंब झाला आहे, पण तें आम्ही शक्य तितक्या लौकर चालू करू आणि निर्बंधाप्रमाणे नियमित प्रती सरकारकडे न चुकता पाठवू. पुढे सरकारने ‘अग्रणी’चें पहिलें सहा सहस्रांचें तारण सरकारजमा करून नवें दश सहस्रांचें तारण भरण्याची आज्ञा केली. तेव्हा ‘अग्रणी’ बंद पडून ‘हिंदु राष्ट्र’ प्रकाशनातील अपरिहार्य अडचण दूर झाली. त्या वेळी जिल्हाधि-कारी बर्वे यांनीही असें आश्वासन दिलें की, सरकारची नवी आज्ञा निघण्यापूर्वी पुष्कळ दिवस आधी तुम्ही ‘हिंदुराष्ट्र’ प्रकाशनाचें निवेदन करून ठेविलें असल्याने प्रकाशनाच्या आधीच मी तुमच्याकडे तारण मागणार नाही, म्हणजे ‘अग्रणी’चें नांव बदलून ‘हिंदुराष्ट्र’ नांवाने पत्र चालू करीत असलात तरी दोनही पत्रें एकच असल्याच्या निमित्ताने सरकारी आज्ञेप्रमाणे आधी दश सहस्रांचें तारण भरा, असा आग्रह मी धरणार नाही. याप्रमाणे माझ्या दूरदर्शीपणामुळे जगलेल्या दैनिकातून मला लौकरच निघावें लागलें. त्याचा मला प्रथम फार राग आला

तरी १९४८ मधील घटनांनंतर, आपल्या संसर्गापासून मला दूर ठेवल्याबद्दल मी मनातल्या मनात नथूराम आणि नाना यांचे आभार मानले.

'अग्रणी'चें लेखन चालू असतानाच १९४६ मध्ये माझा 'दाशराज्ञयुद्ध' हा वेदविषयक पहिला ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यानंतर डॉ. श्यामाप्रसाद मुखोपाध्याय 'अग्रणी' कार्यालयात आले असताना संपादकांनी 'गांधी मुस्लिम कान्स्पिरसी'चे लेखक म्हणून माझा त्यांच्याशी परिचय करून दिला. तेव्हा ते बिचकून तीन पावलें मागे सरले. मग मी 'दाशराज्ञयुद्ध'ही लिहिल्याचें त्यांना सांगितलें, तेव्हा ते कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु माझ्याशी बोलू लागले.

१९४८ आणि ४९ हीं वर्षें अंशतः नथूरामच्या बचावाच्या विवंचनेत गेलीं. त्यानंतर दैनिक 'भारता'त 'भारताच्या फाळणीच्या इतिहासाचीं पानें' ही लेखमाला लिहिली. ही लेखमाला चालू असताना एके दिवशी संपादकांनी माझ्या लेखातील मूळचे आधार गाळून टाकले. तेव्हा तत्क्षणी मी ती लेखमाला बंद केली. लेखनासाठी मी कधीच वेगळीं टिपणें करीत नसल्याने माझे लेख हींच माझीं अभ्यासाचीं टिपणें असतात. त्यामुळे त्यात कसलाही बदल केलेला मला चालत नाही. असो. या लेखमालेच्या निमित्ताने सरकारने १९५५ मध्ये 'भारत' पत्राकडे तारण मागितलें. पुढे मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाने तो आदेश निराधार ठरवून तारणाचें द्रव्य चालकांना परत दिलें. पण 'अग्रणी'तील लेखनाने बिचकलेले संपादक लोक या नव्या प्रकरणामुळे अधिकच बिचकून गेले आणि माझ्या राजकीय लेखनाला स्थान मिळणें अशक्य झालें. या दिवसांत मी अमरुशतक या शृंगारपर संस्कृत काव्यावर भाष्य लिहावयाला घेतलें तें काम अर्धेअधिक झालें असता काही विघ्नांमुळे अर्धवट राहून गेलें. त्यातील पहिल्या चाळीस श्लोकांवरील भाष्य रा. म. आठवल्यांनी 'कौस्तुभ'मध्ये प्रसिद्ध केलें असून मराठीत त्या नमुन्याचें लेखन अन्य कोणीच केलेलें नाही. १९५६ मध्ये वर्षभर मी 'तरुण भारत' दैनिकात साप्ताहिक आर्थिक समालोचन लिहीत होतो. त्या प्रकारचें समालोचन अजूनही कोणीच मराठीत लिहीत नाहीत. तें त्या पत्राच्या कृतघ्न चालकांनी मला तुमचे लेख बंद केले आहेत, एवढेंच कळवून बंद पाडलें.

याच्या आधीपासून मी डॉ. तारापूरवाल्यांनी चालविलेल्या जरथुश्त्राच्या गाथांच्या वर्गाला जात होतो. त्यांच्या दुःखद निधनानंतर डॉ. कांगांच्या वर्गालाही जात होतो. या संसर्गामुळे पुनश्च वेदांचे परिशीलन करताना मी १९६२ मध्ये 'वैदिक आर्यांचें ज्योतिर्विज्ञान आणि

वैदिक देवतांचें पुनर्दर्शन' हा १९६३ मध्ये सरकारी पारितोषिकाला, तसेंच १९६२ मध्ये केळकर पारितोषिकाला पात्र झालेला ग्रंथ प्रसिद्ध केला. त्याच वर्षी 'अशोक ते कालिदास' हा संशोधनपर ग्रंथही प्रसिद्ध झाला. १९६३ पासून 'पैंजण'मध्ये मी नियमितपणे राजकीय लेखन करीत असताना १९६५ मध्ये मला अटक झाली. या अटकेत टिळकांच्या येरवड्यातील निवासस्थानाचें दर्शन मला लाभलें. या प्रसंगी येरवडें, अंजनी आणि ठाणें अशी त्रिस्थळी यात्रा घडल्याने 'क्रांतिकारक टिळक आणि त्यांचा काळ' हा ग्रंथ लिहिण्याची मला प्रेरणा झाली. पण ती कृतीत उतरण्याचें श्रेय न. र. फाटकांनी चालविलेल्या वानरचेष्टांनाच दिलें पाहिजे. माझ्या लेखनाने मी धन मिळविलें नसलें तरी पुष्कळ शत्रु मिळविले आहेत. कुंडलीतील पंचमस्थानावरून विद्वत्तेचा विचार करतात. या पंचमस्थानाचें धनस्थान हें कुंडलीतील रिपुस्थान असल्याने विद्वत्ता ही रिपुसंपादनाचें नैसर्गिक कारण आणि सर्वोत्कृष्ट साधन कशी होऊ शकते, याची वाचकांना कल्पना येईल.

वरील त्रोटक उल्लेखात १९४६ मध्ये प्रसिद्ध झालेलें 'दुसरें महा-युद्ध' (व्हीनस प्रकाशन) आणि 'विचित्र कथा' (ठोकळ प्रकाशन) यांचा उल्लेख राहून गेला. त्या व्यतिरिक्त निरनिराळ्या मासिकांतून महत्त्वाचें लेखन मी करीत आलो आहे. उदाहरणार्थ, साहित्यपत्रिकेतून लिहिलेले 'प्रिया, प्रतिभा आणि कवि', 'आत्महत्या आणि कविता,' तसेंच 'अनुष्टुभ् आणि पृथ्वी' हे संवाद वैशिष्टयपूर्ण असून असले तात्त्विक संवाद मराठीत सहसा कोणी लिहीत नाहीत. टिळकभक्तीप्रमाणेच माझी टिळक तलावभक्तिही सुप्रसिद्ध असून त्या तलावावरील जलविहाराच्या स्मृति मी महाराष्ट्र मासिकाच्या एका दिवाळी अंकात प्रसिद्ध केल्या आहेत. १९६५ मध्ये सरकारने मला अटक करीपर्यंत सतत २५ वर्षें मी मुलांमुलींना पोहावयाला शिकवीत होतो. त्या अटकेतील कष्टांमुळे हृद्रोग फार वाढल्यामुळे या करमणुकीच्या कार्यक्रमाला मी मुकलो आहे. १९६४ मध्ये 'नभोवाणी'वरील स्त्रियांच्या कार्यक्रमात नक्षत्रांची माहिती सांगण्यासाठी मी सहा सात भाषणें केलीं होतीं. त्यांपैकी 'अश्विनी आणि कृत्तिका' या नक्षत्रांसंबंधीचें संशोधन रा. म. आठवल्यांच्या 'कौस्तुभ' मध्ये प्रसिद्ध झालें आहे. हें संशोधनही माझ्या अटकेमुळे खंडित झालें.

अटकेत असताना प्राचीन इजिप्त आणि इराक यांच्या संस्कृतींच्या महाभारतावरील प्रभावाची मला प्रथम कल्पना आली. या विषयाचीं

टिपणें करण्यात मी गुंतलेला असताना एक रक्षक मला म्हणाला 'एखाद्या वाण्याच्या दुकानात बसून असें लिहिणें केलें असतेंत तर दिवसाला पांच रुपये मिळाले असते आणि इथे यावें लागलें नसतें.' पण असला धनलाभ माझ्या दैवी नसल्याने मी तिथे 'महाभारताची पार्श्वभूमि' हा ग्रंथ लिहावयाला घेतला. त्यापैकी 'विश्वामित्र आणि मेनका', याज्ञसेनी द्रौपदी', 'नर आणि नेरगल' अर्जुन, 'चंद्रवंशाची परंपरा', 'कुंतीची संतति', 'नहुष आणि अमरपाल हमुराबी' इत्यादि प्रकरणें लिहून झालीं असून त्यांपैकी काही प्रसिद्धही झालीं आहेत. या संशोधनाचा विद्वानांना परिचय करून देण्याकरिता 'केळकर मंडळ', साहित्य परिषद, इतिहास-संशोधक मंडळ इत्यादि ठिकाणी काही निबंध वाचले. त्याचा परिणाम एवढाच झाला की, एक पीएच्. डी. चा विद्यार्थी आज तीन वर्षें माझ्याकडे अभ्यासाला येत आहे. ज्यांना सर्व प्रकारचे मानसन्मान सुलभ होते, अशा केळकरांनाही अशा विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक बनणें अभिमानास्पद आहे, असें वाटलें. मग माझ्यासारख्या अशिक्षित आणि अप्रसिद्ध लेखकाला या गोष्टीचा अभिमान वाटला तर त्यात काहीच नवल नाही.

✦ ✦ ✦

प्रास्ताविक

क्रांतिकारक टिळक आणि त्यांचा काळ

'क्रांतिकारक टिळक आणि त्यांचा काळ' हा ग्रंथ १८७७ च्या सुमारास टिळक क्रांतिकारक पक्षात प्रविष्ट होऊन वासुदेव बळवंतांच्या कार्यात न्यूनाधिक प्रमाणात भाग घेऊ लागले, तेव्हापासून त्यांच्या क्रांतिकार्यातील नेतृत्वानिमित्त सरकारने त्यांना १९०८ मध्ये ब्रह्मदेशात नेऊन ठेविलें, तेथपर्यंतचा त्यांचा इतिहास सांगण्याकरिता लिहिला आहे. या ग्रंथात लेखकाची भूमिका चरित्रलेखकाची नसून इतिहासलेखकाची आहे. मात्र यात टिळकांच्या चरित्राशी संबद्ध असलेला अज्ञात इतिहास हाच प्रामुख्याने सांगितला असल्याने तत्कालीन अनेक प्रसिद्ध घटनांचा उल्लेख आणि त्यांची चर्चा प्रस्तुत ग्रंथात आढळावयाची नाही. १८७७-मध्ये टिळकांनी मुंबई विद्यापीठाची पदवी संपादन करून तत्कालीन सुशिक्षित समाजात प्रवेश केला आणि त्याच वर्षी इंग्लंडच्या राणीने भारताची सम्राज्ञी ही पदवी धारण करून आणि भारतीय नागरिकांच्या कपाळावर दास्याचा छाप मारून साम्राज्यवाद्यांच्या रावणी संप्रदायात प्रकटपणे प्रवेश केला. त्यानंतर दोन वर्षातच आपल्या कपाळावरील दास्याचा छाप पुसून टाकण्याकरिता पुण्यातील देशभक्तांनी वासुदेव बळवंतांच्या नेतृत्वाखाली बंड करून भारतातील इंग्रजी राज्याचा नायनाट करण्याची प्रकट प्रतिज्ञा केली. एकीकडे साम्राज्यमदाच्या मदिरेने उन्मत्त झालेले इंग्रज राज्यकर्ते आणि दुसरीकडे स्वराज्याच्या, शिवराज्याच्या भक्तीची सुधा सेवन केल्यामुळे परदास्याचें हलाहल पचवून अमरत्वाचे पथिक बनलेले पुणेकर यांच्यातील निर्वाणीचा लढा, कधी गुप्त, तर कधी उघड रीतीने याच काळापासून लढला जाऊ लागला. हें निर्वाणीचें लोकयुद्ध चालू होण्यापूर्वी भारतातील राजमंडळाने इंग्रजांना त्यांच्या शब्दांत पकडून आपल्या सत्तेचा आणि अधिकारांचा विस्तार करण्याकरिता केलेल्या प्रयत्नांचा अयशस्वी इतिहास या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात सांगितला आहे. हा इतिहास आजपर्यंत कोणत्याही इतिहासग्रंथात समाविष्ट झालेला नाही, याचें कारण एवढेंच की आमच्या इतिहासकारांचे ग्रंथ अद्यापि पाश्चात्य गुरूंच्या मार्गदर्शनाने लिहिले जात असल्याने हिंदुस्थानाच्या दृष्टीने, शुद्ध स्वदेशी दृष्टीने आपल्या

इतिहासाचें परिशीलन करण्याची त्यांना सवय नाही. या प्रकरणातील अभिनव आणि अपूर्व माहिती किती तरी ग्रंथांतून कणाकणाने वेचून एकत्रित केली आहे. हे सारे ग्रंथ ग्रंथालयांतून स्वतःच शोधून काढावे लागत आणि मर्यादित काळात चाळून त्यांतील माहिती मनातल्या मनात साठवावी लागे. इतक्या माहितीचीं टिपणें करणें शक्य नसल्याने प्रत्येक विधानाचे आधार देण्याचा अप्रयोजकपणा आपोआपच टळला. विशेष महत्त्वाच्या अथवा वादग्रस्त स्थळीं सविस्तर अवतरणें दिलीं असून त्यांचे आधारही त्याच ठिकाणी दिले आहेत. पण एखाद्या पदवीप्रबंधाप्रमाणे विद्वत्तेचें प्रदर्शन करण्याकरिता वाचलेल्या ग्रंथांचीं नांवें आणि विवेचनाच्या खाली तळटीपा देण्याच्या निमित्ताने कोरीं पानें वाचकांच्या हाती देऊन त्यांची वंचना करावयाची नसल्याने विद्वत्तेचा मायाबाजार मी मांडलेला नाही. हा ग्रंथ वृद्धापकाळी एखाद्या विद्यापीठाची पदवी लाभावी यासाठी लिहिला नसून, केवळ टिळकांच्या नीच प्रतिपक्ष्यांनी त्यांच्या निधनाला अर्धशतक लोटलें असताना त्यांची जी असत्य निंदा चालविली आहे ती असह्य होऊन आणि त्या राष्ट्रगुरूंचें भावी पिढीला यथार्थ दर्शन व्हावें, याच भावनेने प्रेरित होऊन लिहिला आहे. आज सरासरी चार तपें मी लेखन करीत असून तें नेहमी साधार असतें, असें मत्सरी प्रतिपक्ष्यांव्यतिरिक्त इतर सर्व वाचकांना विदित झालें आहे. हा केवळ माझा निराधार अहंकार नसून मुंबईतील वरिष्ठ न्यायालयाचे न्यायमूर्ति नाईक आणि पाळेकर यांच्यापुढे पांच दिवस माझ्या गांधीवधावरील लेखांची चिकित्सा होऊन त्यांच्याकडून मला हें मान्यतापत्रक मिळालें आहे. अशी मान्यता मिळाल्यानंतर कोणी मत्सरी शत्रूंनी माझ्यावर निराधार लेखनाचे आरोप केल्यास त्या बिनबुडाच्या आरोपांना उत्तर देण्याची यातायात करण्याचें कारण नाही. हा ग्रंथ चिरंतन व्हावयाचा असल्यास त्यातील विचारांच्या मौलिकतेने आणि लेखनाच्या प्रभावीपणाने टिकेल. त्यातील किती अवतरणांचे संदर्भ संपूर्ण दिले आहेत, त्याच्या कोष्टकावर या ग्रंथाचें जीवन अवलंबून नाही. 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक गोविंद तळवलकर यांच्यासारखे सुबुद्ध लेखक, टिळकचरित्रात नवीन लिहिण्याजोगें काही उरलें नाही, असें त्यांच्या टिळकांवरील प्रबंधात लिहीत असताना टिळकांच्या जीवनातील अवघ्या तीस वर्षांच्या इतिहासावर लिहिलेला हा ग्रंथ पाहून त्यांना आपलें मत बदलण्याची सुबुद्धि होईल, अशी आशा आहे.

या ग्रंथाचें एक वैशिष्टय हें आहे की टिळकांचें राष्ट्रोद्धाराचें आंदोलन हें हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या पायावरच उभारलें होतें, ही

गोष्ट या ग्रंथात ठिकठिकाणी दाखवून दिली आहे. चिपळूणकरांची स्वातंत्र्यनिष्ठा ही अद्वैत वेदान्ताच्या प्रभावामुळेच त्यांच्या रोमरोमात भिनली होती आणि स्वराज्यसंपादनाविषयीचा टिळकांचा आत्मविश्वा-सही अद्वैत वेदांताच्या तत्त्वज्ञानावरील निष्ठेवरच आधारलेला होता. बंकिम, टिळक, अरविंदप्रभृति हिंदुत्वनिष्ठांनी हिंदुधर्माच्या पुनरु-त्थानाचे प्रयत्न करून देशाचा घात केला, अशा आशयाचे आरोप त्यांच्यावर, मक्का, मॉस्को अथवा लंडन या ज्यांच्या पुण्यभू आहेत, अशा पक्षांच्या लेखकांनी केलेले मी किती तरी वेळा वाचलेले आहेत. जगातील व्यवहारात नेहमी दोन वाइटांपैकी एकाची निवड करावी लागते. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे वाचकांना कळून येईल की, टिळकांच्या हिंदुधर्माभिमानाने नव्हे, तर त्यांच्या प्रतिपक्ष्यांच्या हिंदुत्व-द्वेषाने हिंदुस्थानाचें अधिक वाटोळें केलें आहे.

टिळकांनी गणपति उत्सवाचा उपक्रम करून जेव्हा हिंदु धर्माच्या पुनरुत्थानाचा उद्योग आरंभिला, तेव्हाच टिळकपक्षाचे महान् शत्रु मोहनदास करमचंद गांधी यांनी ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे हस्तक बनून स्वतःला जागतिक प्रसिद्धि मिळविण्याचा मार्ग सुकर करून घेतला. हा आरोप फार गंभीर असल्याने त्याचा आधार येथे देणें भागच आहे. उत्तरप्रदेशाचे एके काळी राज्यपाल असलेले आणि नुकतेच निवर्तलेले सर होमी मोदी यांनी सर फिरोजशहा मेथा यांचें जें चरित्र लिहिलें आहे, त्याच्या पहिल्या खंडात ३८० व्या पानावर पुढील माहिती उपलब्ध होते.

'In August 1895 we find Gandhi writing to Phirozshah from Durban on behalf of the Indian Community, appealing for the latter's help in connection with the Immigration Law Amendment Act passed by the Natal Parliament. The letterpress on the note-paper described Gandhi as 'Agent for the Esoteric Christian Union and the London Vegetarian Society.'

१८९५ च्या ऑगस्टमध्ये गांधींनी नाताळ प्रांतातील हिंदूंना साहाय्य करण्यासंबंधी फिरोजशहांना जें पत्र लिहिलें, त्या पत्रावरील छापील वर्णनात गांधी हे गूढवादी ख्रिस्ती जनांच्या संघाचे कार्यकर्ते असल्याचा उल्लेख होता. या गूढवादी ख्रिस्ती जनांचा विश्वास संपा-दून त्यांचे हस्तक बनण्यापूर्वी गांधींना आपल्या ख्रिस्तनिष्ठेचे आणि स्वधर्मशत्रुत्वाचे पुरेसे पुरावे सादर करावे लागले असतील, हें उघड आहे. गांधींच्यासारख्या मनस्वी व्यक्ति एकदा पकडलेल्या भूमिकेला

शेवटपर्यंत चिकटून राहतात. त्यामुळे त्यांची ही तरुणपणातील क्षणिक विकृति (temporary aberration) म्हणून तिच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. गोखलेनिधनानंतर गांधींची आणि टिळकांची भेट झाल्या-वर रहस्यकारांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, हा अगदी पक्का मिशनरी दिसतो. १९१६ च्या फेब्रुवारीत मिसेस बेझंट यांनी त्यांच्या न्यू इंडियातील एका अग्रलेखात मिशनऱ्यांचे हस्तक बनल्याबद्दल गांधींचा निषेध केला होता. गांधींना हिंदुसंस्कृतीचा गंध सुद्धा नाही, असेंही त्या म्हणत. आपल्या आयुष्याच्या अंतिम पर्वातही गांधी ख्रिस्ताला आणि त्याच्या क्रूसाला चिकटून राहिले होते. १९४४ च्या ऑगस्टमध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी हे गांधींना त्यांच्या पाकिस्तानप्रचा-राचा घातुकपणा पटवून देण्याचा प्रयत्न करीत असताना गांधींनी त्यांना उत्तर दिलें, "इंग्रजीतील एक्स (X) हें अक्षर ज्याचें प्रतीक आहे, असें मला एक सहावें ज्ञानेंद्रिय लाभलें आहे. या ज्ञानेंद्रियालाच ख्रिस्ती लोक क्रॉस म्हणतात आणि मी माझ्या अंतरीचा ध्वनि म्हणतो. प्रत्येक आणी-बाणीच्या प्रसंगी हा क्रॉस दाखवील, त्या मार्गाने मी जातो." दि. २४-९-४४ च्या 'अग्रणी'च्या अग्रलेखात मी गांधींच्या या हृदयाविष्कर-णाचा उल्लेख केला असून ही माहिती श्यामाप्रसादांनीच 'अग्रणी'ला पुर-विली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी वेस्ट मिनिस्टरच्या ख्रिस्ती मंदिरावर आता अग्निगोल पडतील, या कल्पनेने गांधींना रडें कोसळलें, ही गोष्ट कुप्रसिद्ध आहे. प्यारेलालनी आपल्या गुरुचरित्रात गुरु गांधींच्या ख्रिस्तप्रेमाचें आणि त्यांच्या ख्रिस्ती धर्मप्रचाराचें सविस्तर वर्णन केलें आहे. पण त्यांना आणि त्यांच्या गुरूंनाही गीता वाचून सुद्धा

"श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥"

या भगवद्वचनाचें मर्म कळलेलें दिसत नाही. परधर्म एखाद्या व्यक्तीला कितीही लाभदायक होऊ शकला तरी त्या व्यक्तीच्या समा-जाला, देशाला, राष्ट्राला तो अत्यंत भयावहच असतो. यासाठीच तो त्याज्य मानावा लागतो. गांधींनी आपल्या ख्रिस्तप्रेमाला आणि पैगंबर-प्रेमाला अनुसरून राष्ट्रीय सभेच्या राजकारणाला जें हिंदुद्रोहाचें वळण लाविलें, त्याचे घोर परिणाम आम्ही आजही भोगीत आहोत. त्यांचेच हिंदुत्वद्रोही अनुयायी टिळकांना हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या पाया-वर राष्ट्रवादाची उभारणी केल्यानिमित्त दोष देतात, म्हणून हा सारा इतिहास सांगावा लागला. वरील विवेचन लिहून झाल्यानंतर २९-१२-

६८ या दिवशी एक ज्येष्ठ मंत्री जगजीवनराम यांनी येत्या दहा पंधरा वर्षांत ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या कुटिल कारस्थानांना बळी पडून धर्मांतर करणाऱ्या अस्पृष्टांचें प्रमाण सध्याप्रमाणेच वाढत गेल्यास हिंदुस्थानात ख्रिस्तीस्थान निर्माण करण्याची मागणीही केंद्रसरकारावर लादली जाईल, असें म्हटलें. त्यांनी असेंही म्हटलें आहे :

In recent years, greater activity on the part of missionaries on Conversion of Harijans has been noticed. Soon the Conversions will create a great national problem in India.

अस्पृष्टांचें धर्मांतर घडवून आणण्यावर ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी सध्या फार भर दिलेला दिसून येतो. या धर्मांतरामुळे राष्ट्रापुढे लौकरच एक अवघड समस्या उभी राहणार आहे. या संदर्भात वरील विवेचन अनाठायी वाटणार नाही, अशी आशा आहे. गांधींच्या पाद्रीप्रेमाचा एक परिणाम असा झाला होता की, त्यांना भारतीय स्वातंत्र्याची कल्पना सुद्धा धर्मविरोधी वाटत होती. 'रवींद्रविकाश' या ग्रंथात श्री. सुकुमार सेन यांनी रवींद्रनाथांच्या एका पत्राचा उताराच छापला आहे. 'महात्माजी बोलेछेन ब्रिटिश साम्राज्येर मध्येइ आमरा थाकबो, एवं से रकम थाकबार इच्छा ना कोरा 'religiously wrong' अर्थात् धर्मविरुद्ध.' म्हणजे ब्रिटिश साम्राज्यात न राहण्याची इच्छा करणें हें धर्मविरोधी कृत्य आहे. बहुधा गुरु गांधींच्या या सिद्धान्ताच्या विरुद्ध वर्तन करून स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्यामुळेच आज त्यांचे अनुयायी आपल्या निधर्मीपणाचा डांगोरा पिटीत आहेत !

गांधींच्या हिंदुद्रोही अनुयायांनी १९४७ पासून निधर्मीपणाचा बुरखा घेतला असून त्याच्या आड आपलें सत्यस्वरूप लपवून निधर्मवादाच्या नांवाने ते हिंदुत्वनिष्ठेचा उच्छेद करावयाला उद्युक्त झाले आहेत. ज्यांना स्वातंत्र्य आणि राष्ट्रैक्य यांची मनापासून चाड असेल, त्यांनी भारतमातेवर दया करून ही गोष्ट ध्यानात घ्यावी की स्वदेशाचें स्वातंत्र्य आणि राष्ट्रीयत्व यांचा जीवनाधार हिंदुत्वनिष्ठाच असून स्वातंत्र्यसंरक्षणासाठी क्षात्रधर्माच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता असते आणि देशात क्षात्रधर्माची वाढ होण्याकरिता, त्याचीं पाळेंमुळें खोल रुजण्याकरिता त्याला धर्माकरिता हौतात्म्य स्वीकारणाऱ्या धर्मवीरांच्या दिव्य जीवनांचा जीवनरस पुरवावा लागतो. कारण 'धर्माकरिता मरावें' या भावनेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही भावनेने सैनिक निःशंकपणे प्राणार्पणाला सिद्ध होत नाही. धर्माची आवश्यकता मान्य केली म्हणजे राष्ट्रीय धर्मप्रचारकांची आवश्यकताही मान्य करावी लागते. अगदी नवमतवादी

रशियाच्या सैन्यातसुद्धा सैनिकांची आणि अधिकाऱ्यांची साम्यवादावरील निष्ठा अविचलित राखण्याकरिता कोमिस्सार नेमावे लागतात. अशा प्रकारचे धर्मप्रचारक नेमणें आणि धार्मिक भावनांची अवहेलना न करता त्यांना योग्य मान देणें हीं राज्यकर्त्यांचीं अपरिहार्य कर्तव्यें असतात. हीं कर्तव्यें न पाळणारे आणि स्वदेशी धर्मगुरूंच्या संस्थेचें पुनरुज्जीवन करण्याचें कर्तव्य विसरून विदेशी धर्मगुरूंचीं सर्व पापें पोटात घालून त्यांना आपल्या मस्तकावर स्थान देणारे, मग ते कोणीही असले आणि कितीही असले तरी ते स्वधर्माचे आणि स्वराष्ट्राचे मारेकरी बनतात, ही गोष्ट वाचकांनी विसरू नये.

या ग्रंथातील गणपति-शिवाजी उत्सवाचीं प्रकरणें आणि टिळकांनीं बीड येथे घडवून आणलेल्या बंडाची कथा यांतील अभिनव माहितीचा पुढच्या वर्षी व्हावयाच्या टिळकनिधनाच्या अर्धशताब्दीसमारंभात कवि, कीर्तनकार कादंबरीकार इत्यादिकांना अतिशय उपयोग होण्याजोगा आहे. दामोदरपंत चाफेकरांचें आत्मचरित्र, चाफेकरांच्या कटाविषयी १९२५ च्या 'संडे क्रॉनिकलच्या मार्चमधील अंकांतून श्री. नंदी या हेरविभागातील गृहस्थांनी लिहिलेली लेखमाला, साताऱ्च्या भिडे गुरुजींचें आत्मवृत्त इत्यादि साधनांच्या आधाराने टिळक, चाफेकर, रावसाहेब पेशवे, भिडे गुरुजी इत्यादींचें क्रांतिकारक जीवन साकार करणारी अद्‌भुतरम्य कादंबरी एखाद्या प्रतिभाशाली कादंबरीकाराला अल्पश्रमाने लिहिता येईल. खरें म्हणजे सर मोरोपंत जोशी यांच्या सौभाग्यवतींनीच ही कादंबरी लिहावयाला हवी होती. रावसाहेब पेशवे आणि टिळक यांच्यासंबंधी त्यांनी आत्मचरित्रात लिहिलें आहे. '१९०५ च्या सुमारास रावसाहेब (पेशवे) चमत्कारिक स्थितीत वारले, अशी वार्ता आली. शिवाजीने भवानी तलवार मिळविण्यासाठी ज्या प्रकारचें अनुष्ठान केलें, तसलें अनुष्ठान यांनीं सातपुड्याच्या अरण्यात एकांतस्थळी आरंभिलें. एकवीस दिवस त्या अनुष्ठानात केवळ थोड्या दुधावर रहावयाचें, कोणाशी भाषण करावयाचें नाही, त्यांच्याशीही कोणी बोलावयाचें नाही. पण त्याच वेळी सरकारच्या गुप्तहेरांना त्यांचा सुगावा लागून ते त्यांच्या पाठीशी असल्याचें वृत्त त्यांना सांगणें भाग पडलें. त्या वेळीं ते गाढ निद्रेत होते. त्यांतून अकस्मात् जागें केल्याने त्यांच्या मनास आणि शरीरास एवढा धक्का बसला की त्याने ते पांच सात तासांतच वारले. ही वार्ता ऐकून सर्व मंडळी फार हळहळली. कोल्हापूरचे महाराज, म्हैसूरचे महाराज, बाळ गंगाधर टिळक इत्यादि-

कांशीं यांचीं फार कारस्थानें चालत. टिळकांचे मार्गदर्शनावरून ते नेपाळ मध्येही कारस्थानें करण्यास जात असत. अशा अनेक गोष्टी त्यांच्यासंबंधी ऐकल्या. ही माझी कथा इंग्रजांच्या हाती 'अपराधाची मान्यता म्हणून आयतीच पडणार नाही, अशी आशा आहे.' या साऱ्या गोष्टी स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर अन्य कोणी तरी सविस्तर लिहितील, अशी आशाही कै. यशोदाबाईंनी तेथे व्यक्त केली आहे वस्तुतः या गोष्टी सर मोरोपंतां-नीच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लिहावयाला हव्या होत्या. पण सामान्यतः वर्त-मानकाळाचा उपभोग घेण्यात दंग झालेल्यांना भूतकालाची अथवा भविष्य काळाची क्षिति नसते. त्यामुळे या कथा त्यांनी लिहिल्या नसाव्यात. टिळकांच्या क्रांतिकार्यात म्हैसूरच्या महाराजांचा संबंध आल्याचा हा अनपेक्षित उल्लेख पाहिल्यावरून शोध केला असता असें कळलें की म्हैसू-रचे मुख्य मंत्री व्ही. पी. माधवराव यांच्या द्वारा टिळकांचीं म्हैसूरकडील कारस्थानें चालत. या दिवाणबहादुर व्ही. पी. माधवरावांचा १९१९ मध्ये राष्ट्रीय सभेचें जें शिष्टमंडळ इंग्लंडला गेलें होतें, त्यात टिळकांनीं समावेश केला होता. त्यांच्या साक्षीचीही तेव्हा 'केसरीने' विशेष स्तुति केली होती. हीं सारीं कारस्थानें कोल्हापूरचे सर रघुनाथराव सबनीस यांसही सुविदित होतीं. या सर्व कुटुंबातून या प्रकरणाचे धागेदोरे अजू-नही उपलब्ध होऊ शकतील. सयाजीमहाराज आणि टिळक यांच्यामधील कारस्थानांचे सर्व कागदपत्र बडोद्यात अजूनही सुरक्षित ठेवले असतील. तेही आता संशोधकांना उपलब्ध होणें शक्य आहे. गुप्तहेर विभागाने जमविलेलीं टिळकांच्या इतिहासाचीं साधनें अजून बहुतांशी अप्रकाशित असून तीं मुंबई, दिल्ली, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं विखुरलेलीं आहेत. हें काम नव्या पिढीतील संशोधकांनी करण्याजोगें आहे.

या ग्रंथात टिळकांचें क्रांतिकारक जीवन जसें प्रथमच प्रकाशात आणलें आहे, त्याप्रमाणेच टिळकशत्रूंचीं समकालीन मेळेवाल्यांनाही सुविदित असलेलीं देशद्रोही कारस्थानें सरकारी कागदपत्रांच्या सुदृढ आधारांनी प्रथमच सिद्ध करून पुराव्यांचें माप त्यांच्या पदरात टाकलें आहे. टिळकभक्तीचा आणि देशद्रोही टिळकशत्रूंच्या द्वेषाचा पितृपरं-परागत वारसाच माझ्याकडे आला असल्याने देशद्रोही टिळकशत्रूंनी गेल्या अर्ध शतकात अविरत चालविलेल्या टिळकनिंदेची मला पराकाष्ठेची चीड येत असे. शेवटी १९६६ मध्ये डॉ. माथूर आणि न. र. फाटक यांनी टिळकनिंदेचा कडेलोट केला. त्याच वर्षी टिळकपुण्यतिथीच्या रात्रीत मला अकस्मात् स्वप्नात टिळकदर्शन झालें. तेव्हा येरवडेकर-प्रभृति माझ्या मित्रांच्याजवळ मी बोललोही होतो की कोणता उद्देश

मनात धरून टिळक माझ्या स्वप्नात आले होते, तें मला कळत नाही. पण पुढे कालक्रमाने 'गुरोस्तु मौनं व्याख्यानं । शिष्यास्तु छिन्नसंशयाः' या न्यायाने टिळकांच्या इच्छेचा मला बोध झाला आणि हा ग्रंथ दोन वर्षें परिश्रम करून लिहून काढला. या ग्रंथामुळे न. र. फाटकांच्यासारखा वादसमंध मला छळील, याची मला कल्पना आहे. पण 'अशोक ते कालिदास' हा ग्रंथ प्रसिद्ध करताना म. म. मिराशी या नागपूरच्या वादसमंधाचें भय वाळगलें नाही, तर आता या मुंबईच्या वादसमंधाला कोण भीक घालतो ? खरें म्हणजे केळकरांनी स्वराज्यद्रोही छत्रपतींनी केलेलीं टिळकविरोधी कारस्थानें जशीं उजेडात आणलीं, तशींच सुधारकांचीं स्वराज्यद्रोही कारस्थानेंही एकदा प्रकट करावयाला हवीं होतीं. पण...

टिळकांचे केळकर आणि खाडिलकर हे 'केसरी'तील दोन समर्थ सहकारी. यांच्यापैकी केळकरांना विदित असलेले टिळक त्यांनी आपल्या टिळकचरित्रात वर्णिले आहेत. त्या वेळी खाडिलकरांनीही एक पांचशे पानांचें टिळकचरित्र लिहिण्याचा संकल्प बोलून दाखविला होता. पण आमच्या दुर्दैवाने त्यांचा ग्रंथ अलिखित राहून गेला. याकरिता खाडिलकरांना विदित असलेले टिळकचरित्र ग्रंथनिविष्ट करून त्यांच्या संकल्पाची माझ्या शक्तीप्रमाणे पूर्तता करण्याचा प्रयत्न मी या ग्रंथात केला आहे. कदाचित् त्यामुळेच खाडिलकरांचे एक आप्त स्थापत्यविशारद श्री. ग.म. आपटे यांनी या ग्रंथाच्या प्रकाशनाचा सक्रिय आग्रह शं.रा. दात्यांना केल्यामुळे हा ग्रंथ यंदा तरी प्रकाशात येत आहे.

हा अनियोजित ग्रंथ मध्येच लिहून काढणें हें माझ्या दृष्टीने विषयांतर होत होतें. कारण येरवड्यात टिळकांच्या कोठडीसन्निध निवास करीत असताना मला महाभारतसंशोधनाची खरी दिशा स्फुरली आणि महाभारताची पार्श्वभूमि' या भावी ग्रंथाचीं काही प्रकरणें १९६६ मध्ये मी मासिकांतून प्रसिद्धही केलीं. पण टिळकनिंदेचा निग्रहपूर्वक प्रतिकार करण्याकरिता मला काही काळ तें संशोधन स्थगित करावें लागलें. पण तो विषय सारखा मनात घोळत असल्याने मी या टिळकचरित्राकडे एकाग्र चित्ताने लक्ष देऊ शकलो नाही. त्यामुळे या ग्रंथाच्या रचनासौष्ठवाकडे मला पुरेसें लक्ष देता आलें नाही. पण अर्श, अंतर्गळ, हृद्रोग, प्रोस्टेट इत्यादि दुर्धर रोगांशी समेट करून कसें तरी आपलें कार्य करीत असताना या ग्रंथात एखादी उणीव राहून गेली असल्यास तन्निमित्त सहृदय वाचकांनी मला क्षमा करावी. वृद्ध, व्याधिग्रस्त, अकिंचन विद्यार्थ्याचें जें विडंबित जीवन मी

आज जगत आहे, तें थोडेसें सुसह्य होण्याला या ग्रंथाने साहाय्य होईल आणि बंदिवासात स्फुरलेल्या 'महाभारताची पार्श्वभूमि' या ग्रंथासाठी संशोधन आणि लेखन थोडें सुकर होईल, अशा अपेक्षेने मी हा ग्रंथ वाचकांच्या हाती देत आहे. मी करीत असलेलें कार्य हें समाजकार्य असल्याने तें करीत असताना काही मित्रांनी आपण होऊन मला आर्थिक किंवा अन्य रीतीने साहाय्य केलें. त्याचा मी निःसंकोचपणाने स्वीकार केला. त्यांचा मी ऋणी आहेच. पण ज्यांनी आपण होऊन साहाय्य करण्याचीं नुसतींच वचनें दिलीं, त्यांचाही मी आभारी आहे. कारण त्यांच्या वचनांवर विश्वास ठेवल्याने प्रकाशकांना आपला मेंदु विकण्याची बुद्धि मला झाली नाही. आणि त्यामुळे मला जे विषय महत्त्वाचे वाटतील, त्याच विषयांवर लिहिण्याचें माझें स्वातंत्र्य अबाधित राहिलें.


आता ही प्रस्तावना लिहीत असताना स्मरण झालें की दहापंधरा वर्षांपूर्वी दिल्ली येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनात स्वातंत्र्यसंपादनाचा इतिहास लिहिण्याकरिता हिंदुसभेने एक समिति नेमली होती आणि त्या समितीत माझेंही नांव घातलें होतें. त्या समितीची बैठक कधी झाली कीं नाही, तसेंच तिने काही कृति केली कीं नाही, याची मला कधीच काही वार्ता कळली नाही, पण या समितीचें सभासदत्व पतकरून जें काही नैतिक दायित्व माझ्या वाटचाला आलें होतें, त्याची अल्पांशाने तरी सांगता करण्याचा प्रयत्न मी या ग्रंथात केला आहे. ग्रंथलेखनाच्या साधनासाठी टिळक आणि गोखले यांच्याच ग्रंथशालांचा मुख्यतः उपयोग केला आहे. बंगाली ग्रंथ आणि नियतकालिकें हीं माझे मित्र आणि विख्यात बंगाली लेखक शरदिंदु बंद्योपाध्याय यांच्याकडून आणीत असे.

या ग्रंथाचें एक वैशिष्टय म्हणजे अन्य टिळकचरित्रांतून न भेटणाऱ्या काही प्रमुख क्रांतिकारकांचीं छायाचित्रें उपलब्ध झालीं, तशीं यात समाविष्ट केलीं आहेत. पुण्याचे एके काळचे न्यायाधीश आणि अरविंदांचे प्रमुख सहकारी चारुचंद्र दत्त, टिळकांनी स्विट्झर्लंडला धाडलेले मेजर माधवराव जाधव आणि त्यांचे बंधु खासेराव, तसेच साताऱ्याचे व्यायामाचार्य दामोदर बळवंत भिडे यांचें कार्य आणि छायाचित्रें यांना महाराष्ट्राच्या क्रांतीच्या इतिहासात अद्यापि स्थान मिळालेलें नाही. यांच्याप्रमाणेच कोल्हापूरच्या शिवाजी समितीच्या नेत्यांचीं चित्रें उपलब्ध झालीं असतीं तर त्यांचाही या ग्रंथात अंतर्भाव केला असता. गोखल्यांचें सत्यस्वरूप सन्मित्र समाजाच्या मेळ्यातील पदांत व्यक्त करून त्यांची खरीखुरी ओळख पुण्याला करून देणारे येथील प्रसिद्ध

विधिविशारद आणि अतिशय सज्जन गृहस्थ नी. वा. भिडे यांचें दुर्मिळ छायाचित्र माझे स्नेही द. गो. देव यांनी त्यांच्या चिरंजीवांकडून मिळवून दिलें, यासाठी भिडे आणि देव या उभयतांचेही आभार मानले पाहिजेत. हा ग्रंथ गतवर्षीच खुदिराम बसूंचें आत्मार्पण आणि त्यातून उद्भवलेला टिळकांवरील दुसरा राजद्रोहाचा अभियोग यांच्या षष्टयब्दीप्रीत्यर्थ प्रसिद्ध करण्याची इच्छा होती. पण परस्वाधीनपणामुळे ती इच्छा सफळ झाली नाही. आता निदान दामोदर हरि चाफेकर यांच्या जन्मशताब्दीपूर्वी तो प्रसिद्ध व्हावा, अशी इच्छा आहे. ही इच्छा सफळ होणें दैवाधीन आहे.

अ. ज. करंदीकर

अनुक्रमणिका



लो. बाळ गंगाधर टिळक

क्रांतिकारक टिळक नि त्यांचा काळ

प्रकरण पहिलें

भारताच्या भालप्रदेशावर दास्याचा छाप

दि. १-११-१८५८ पासून भारतात राणीचें राज्य चालू झालें तरी १८७७ मध्ये दिल्लीच्या सामंतसंमेलनात राणीने भारताची सम्राज्ञी ही पदवी धारण केल्याची घोषणा होईपर्यंत भारताच्या भालप्रदेशावर दास्याचा छाप अंकित केला नव्हता, अथवा ठसा उमटविला नव्हता, इकडे कै. केळकरांनी टिळकचरित्राच्या पहिल्या खंडात लक्ष वेधिलें आहे. त्यात म्हटलें आहे :

" तोपर्यंत इंग्लंड आणि हिंदुस्थान यांचा परस्परसंबंध काय आहे, याचें विधिविशारदांनाही थोडक्या शब्दांत समर्पक वर्णन करता आलें नसतें. खरोखर काही म्हणता आलें असतें तर असेंच म्हणावें लागलें असतें की, दिल्लीश्वराकडून मिळविलेल्या अधिकारपत्राच्या आधारावर, रावबाजींनी दिलेल्या दानपत्राच्या (शरणागतीच्या) आधारावर, सातारकर महाराजांना राज्यातून काढून लावून त्यांचें स्थान बळकावल्याच्या वहिवाटीच्या आधारावर, तात्पर्य अशा विविध प्रकारच्या अधिकारांच्या डळमळीत आधारांवर, राणी सरकारचें राज्य अधिष्ठित झालें होतें. कंपनीसरकारच्या स्थानावर राणी सरकार आल्या खऱ्या; परंतु जें आडात असेल, त्याहून अधिक पोहऱ्यात कोठून येईल ? जितका अधिकार कंपनीला, तितकाच राणीसरकारला—एलिझाबेथ राणीच्या वेळी ईस्ट इंडिया कंपनी (पूर्व हिंदुस्थान व्यापार मंडळी) आणि इंग्लंडचें सरकार यांच्यामध्ये निर्बंधानुसार जो संबंध निर्माण झाला, त्याचीं पुढे अनेक परिवर्तनें झालीं आणि १८५८ च्या निर्बंधाने त्याची परिसमाप्ति झाली. पण त्या क्षणी भारतातील प्रजा आणि ब्रिटिश सरकार यांचे परस्परसंबंध ठरले नाहीत, किंवा व्यक्तही झाले नाहीत. प्रजेची संमति हाच राजाच्या भोगवटयाचा मुख्य कागद. तो कागद भारताची सम्राज्ञी ही पदवी राणीने घेतल्याने आणि हिंदी प्रजेने ती घेऊ दिल्याने परक्या सरकारच्या पदरात पडला. पण त्यापूर्वी चार दोन वर्षें राणीला सम्राज्ञी बनण्याचे डोहाळे लागले होते आणि ते

हिंदुस्थानच्या प्रजेकडून कसे पुरविले जाणार आहेत, याची चाचणी घेण्याकरिता त्यांनी आपले ज्येष्ठ पुत्र, वेल्सचे राजपुत्र एडवर्ड यांना हिंदुस्थानात १८७५ मध्ये पाठविलें होतें. त्यांचा सत्कार मनाजोगता झाल्याने ब्रिटिश राजाराणींना भारताचे सम्राट्-सम्राज्ञी बनविण्याची कल्पना निश्चित होऊन ती पुढे सिद्धीस नेण्यात आली." (पृ. ७९)

सन १८७६ च्या मे मासात राणीने सम्राज्ञी बनण्याला आपल्या पार्लमेंटाची संमति घेतली आणि १-१-१८७७ च्या दिल्ली येथील सामंतसंमेलनात आपल्या नव्या पदवीला तिने भारतातील प्रजेची अनुमति मिळविली.

सालारजंगांचा प्रखर विरोध

यापूर्वी निदान १८७४ पासून निजामाचे तेव्हाचे मुख्य प्रधान सर सालारजंग यांनी इंग्रजांच्या सार्वभौम अधिकाराला विरोध आरंभिला होता. हैद्राबादेतील इंग्रजांचे राजदूत सर रिचर्ड मीड यांच्या थॉर्नटनकृत चरित्रात या विरोधाचा उल्लेख येतो, तो असा आहे :

Salarjung was now anxious not only for the abolition of the Contingent and the restoration of Berar, but to bring back the Nizam's status to that which he possessed at the time of the earliest treaties. In other words, he began to question the validity of those rights of suzarainty which had been exercised by the British Government more or less since the commencement of the present century.

या वेळी सालारजंग हैद्राबादेतील इंग्रजी सैन्य साभार परत पाठवून आपला वऱ्हाड प्रांत त्यांच्याकडून परत मिळविण्यासाठी आतुर झाले होते, इतकेंच नव्हे, तर एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून इंग्रजांनी निजामावर जो सार्वभौम अधिकार गाजविला होता, तोही यापुढे चालू न देण्याचा त्यांचा निर्धार दिसत होता. या दिवसांत सालारजंगांचा हैद्राबादेतील प्रमुख प्रधानपदावरील अधिकार हें इंग्रजांच्या सार्वभौम सत्तेला मोठेंच शल्य होऊन बसलें होतें. डॉ. राधाकृष्णन् यांचे चिरंजीव डॉ. गोपाळ यांनीं *British Policy in India* या ग्रंथात अशी माहिती उजेडात आणली आहे की सालारजंगांनी बडोद्याच्या मल्हाररावांशी पत्रव्यवहार म्हणजेच कारस्थानें आरंभिल्याची वार्ता इंग्रजांना कळताच त्यांना अकस्मात् त्यांच्या पापांचा घडा भरल्याचा साक्षात्कार झाला आणि बडोद्याच्या ब्रिटिश राजदूतावर विषप्रयोग करण्याच्या आरोपावरून त्यांची चौकशी करण्याच्या निमित्ताने भारतीय संस्थानिकांच्या

प्रमुख प्रतिनिधींकडून आपल्या सार्वभौम अधिकाराला मान्यता मिळविण्याचें कारस्थान त्यांनी आरंभिलें. सर रिचर्ड मीडचे चरित्रकार लिहितात :

Our jurisdiction has never received such formal and complete acknowledgement as in the Badoda trial when the rulers of two of the principal States of India consented to take part in the grand inquest held by the Suzereign power into the alleged misdeeds of one of its greatest feudatories.

याचा अर्थ असा होतो की मल्हारराव गायकवाडांच्या चौकशीच्या प्रसंगी जयपूर-ग्वाल्हेरच्या महाराजांना वेठीला धरून ब्रिटिश राजसत्तेने संस्थानिकांवरील आपल्या सार्वभौमपदाच्या अधिकारांचें प्रदर्शन केलें. त्यांनीही एवीतेवी ब्रिटिश राजसत्ता आपल्या मानगुटीवर बसलीच आहे, मग निदान तिला आपल्या अधिकारांचा मोकाटपणे दुरुपयोग करता येऊ नये, या बुद्धीने गायकवाडांच्या चौकशीत भाग घेतला आणि त्यांना निर्दोषी ठरविलें. या दोन महाराजांव्यतिरिक्त रावराजे दिनकरराव राजवाडे हे ग्वाल्हेरचे पूर्वीचे मुख्य प्रधान यांनाही या चौकशीमंडळावर नेमलें होतें आणि निदान त्यांचें मत तरी इतर इंग्रज सदस्यांप्रमाणे आपल्याला अनुकूल होईल, अशी तेव्हा सरकारला फार अपेक्षा आणि आशा होती. त्या आशेचा भंग झाल्यामुळे वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी तेव्हा उद्गार काढले आहेत की इतःपर कोणाही चित्पावनावर विश्वास ठेवू नये. असो. या बडोदे प्रकरणासंबंधी अधिक विवेचन करण्यापूर्वी सर सालारजंगांनी ब्रिटिश साम्राज्यावर जें गंडांतर आणलें होतें, त्याचा अल्प परिचय करून घेतला पाहिजे.

सालारजंगांनी आणलेलें गंडांतर

या वेळी सालारजंगांनी ब्रिटिश साम्राज्यावर जें गंडांतर आणलें होतें, त्याचा उल्लेख त्या कालचा इतिहास सांगणाऱ्या कोणत्याही ग्रंथातून आढळावयाचा नाही. पण तेव्हाचे राजप्रतिनिधि लॉर्ड लिटन यांनी हैद्राबादेचे राजदूत सर रिचर्ड मीड यांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट शब्दांत त्याचें वर्णन केलें आहे. ते म्हणतात :

The intrigues of Sir Salarjung were regarded by me as the greatest danger to which the British power in India was exposed during my own Viceroyalty, a danger far greater than any which was involved in war or famine. That danger was imminent and if the gravity of it remained unknown to the public, it is because it was averted by your skill and courage and its recurrence rendered impossible.

लॉर्ड लिटन राजप्रतिनिधि असताना सर सालारजंग यांच्या कारस्थानांनी ब्रिटिश साम्राज्यावर अत्यंत मोठें संकट आणलें होतें. हें संकट युद्ध आणि दुष्काळ यांच्या आपदांपेक्षा फार मोठें होतें. (कारण युद्धामुळे प्रजेवर नवीन कर बसले, किंवा दुष्काळामुळे प्रजा उपाशी मेली तरी त्याचें इंग्रजांना सोएरसुतक काय?) सालार-जंगांच्या कारस्थानांनी निर्माण झालेला धोका अज्ञात राहिला असला तर तीं कारस्थानें निष्फळ करण्यात तुम्ही दाखविलेलें राजनीति-कौशल्यच त्याला कारणीभूत झालें आहे.

सालारजंगांचें अहिंसक राजकारण

हें संकट कोणत्या प्रकारचें होतें, याचा उलगडा इंग्रज इतिहास-कारांनी केला नसला तरी अशी कल्पना करता येते की, १८५७ मध्ये नानासाहेब पेशव्यांच्या नेतृत्वाखाली पदच्युत राजांनी एकत्र येऊन इंग्रजांचें राज्य नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा पेशव्यांच्या परंपरा-गत वैराला आणि स्वत:च्या भीरुतेला स्मरून निजामाने त्या क्रांतिप्रय-त्नांत भाग घेतला नाही. इतकेंच नव्हे तर त्या संकटात इंग्रजांना सर्वतो-परीने साहाय्यच केलें. तरीसुद्धा त्या कृतघ्न इंग्रजांनी १८५३ मध्ये अन्यायाने व्यापलेला वऱ्हाड प्रांत निजामाला परत देण्याचें नाकारलें. इंग्रजांच्या स्वार्थी राजनीतीचा असा कटु अनुभव आल्यानंतर प्रमुख संस्थानिकांनी एकत्र येऊन इंग्रजांनी अन्यायाने व्यापलेले सारेच प्रांत सोडविण्याचा संगनमताने प्रयत्न करावा, असा सालारजंगांच्या मनातील व्यूह होता. याच हेतूने त्यांनी मल्हारराव गायकवाडांशी बोलणीं चालू करताच इंग्रजांनी त्यांचें तत्काळ उच्चाटन केलें. इंग्रजांनी वऱ्हाड व्यापल्याचा इतिहास म्हणजे त्यांच्या निलाजऱ्या लोभी राजनीतीचा एक निष्ठुर नमुना आहे. इंग्रजांनी संधीच्या अटींप्रमाणे निजामाचें सर्व शत्रूंपासून संरक्षण करण्याचें अभिवचन दिलें असलें तरी मित्रांपासून, विशेषत: इंग्रज नांवाच्या अत्यंत लोभी मित्रापासून संरक्षण करण्याचें मुळीच वचन दिलें नव्हतें. इंग्रजांनीच निजामावर चंदूलाल नांवाचा एक मुख्य प्रधान लादला. त्याने हवी तशी उधळपट्टी करून निजामाचें दिवाळें वाजविलें. इकडे इंग्रजांनी निजामाला नको असताना त्याच्या संस्थानात आपलें १५००० सैन्य ठेवून त्याचा व्यय निजामावरच लादला आणि सरतेशेवटी या सैन्याचें वेतन थकल्याच्या निमित्ताने 'वऱ्हाड प्रांत आमच्या स्वाधीन करा, नाहीतर हैद्राबाद राजधानीच आम्ही ताब्यात घेऊ' अशी निजामाला धमकी देऊन त्याला तात्पुरता तरी तो प्रांत इंग्रजांच्या स्वाधीन करणें भाग पाडलें. इंग्रजांनी अशा प्रकारे लुबाडलेला

प्रांत १८५७ मधील आणीबाणीच्या प्रसंगी केलेल्या साहाय्याच्या विनिमयात तरी आपल्याला परत मिळावा, अशी निजामाची अपेक्षा होती. पण ती विफल झाली. हा अनुभव आल्यानंतर निजामाचे मुख्य प्रधान सर सालारजंग यांनी प्रतिज्ञा केली की मी वऱ्हाड परत मिळवीन, नाही तर प्राण देईन. पण इंग्रजांनी एक वऱ्हाड परत दिला असता तर आणखी किती तरी अन्यायाने गिळलेले प्रांत त्यांना परत द्यावे लागत होते आणि याच अरिष्टामुळे लॉर्ड लिटनसारखे राजप्रतिनिधि इतके चिंतातुर झाले होते. (इंग्रजांनी निजामाला किती विविध प्रकारांनी लुबाडलें, याचा सविस्तर इतिहास हैद्राबादेतील एक इंग्रज राजदूत जनरल फ्रेझर यांच्या चरित्रात त्यांच्या चिरंजीवांनी प्रामाणिकपणाने लिहून ठेविला आहे.)

सालारजंगांना लाभलेलें एक सुयश

इंग्रजांच्या हातून वऱ्हाड प्रांत सोडविण्यात सालारजंगांना अपयश आलें असलें तरी त्यांच्याच प्रयत्नांमुळे १८८१ मध्ये इंग्रजांना म्हैसूरचें राज्य तेथील महाराजांना परत द्यावें लागलें. या गोष्टीचा इतिहासातून उल्लेख येत नसला तरी ती सत्य आहे. टिपूचे प्रधानमंत्री पूर्णय्या यांच्या मृत्यूनंतर म्हैसूरच्या राज्यात अराजक माजल्याच्या निमित्ताने इंग्रजांनी तें राज्य १८३१ मध्ये आपल्या ताब्यात घेतलें, तें काही केल्या त्यांना सोडवेना. ही परिस्थिति पाहून तेव्हाच्या मद्रास प्रांतातील एक प्रमुख पुढारी लक्ष्मीनरसू चेट्टी यांनी तेथील वृद्ध महाराज कृष्णराज यांना भेटून त्यांना पुत्र नसला तरी दत्तकपुत्र घेऊन गादीला वारस करून ठेवण्याचा अतिशय आग्रह केला. त्या काळी दत्तकाला मान्यता न देता राज्यें गिळंकृत करण्याचें धोरण इंग्रजांना १८५७ च्या उठावणीमुळे सोडून द्यावें लागलें होतें. तरीसुद्धा दत्तकाला अनुज्ञा देण्याचा अथवा न देण्याचा अधिकार सार्वभौम या नात्याने त्यांच्याकडे होताच. त्याचा दुरुपयोग करून ते कृष्णराज महाराजांना दत्तक घेण्याला अनुज्ञा देईनात. तेव्हा त्यांच्या इच्छेविरुद्ध कृष्णराज महाराजांनी चांगला राजयोग पाहून एक मुलगा दत्तक घेतला. या दत्तविधानाला मागाहूनही इंग्रज संमति देईनात. तेव्हा लक्ष्मीनरसूंनी सालारजंगांशी संधान बांधलें. कारण टिपूवरील शेवटच्या स्वारीच्या प्रसंगी इंग्रज आणि निजाम यांच्यांत असा संकेत ठरला होता की टिपूचें राज्य पूर्वीच्या महाराजांना परत करावयाचें नाही असें ठरल्यास इंग्रज आणि निजाम यांनी सारख्या प्रमाणात तें वाटून घ्यावें. या पूर्वसंकेताला अनुसरून म्हैसूरचें राज्य तेथील पूर्वीच्या

महाराजांना परत तरी करा, नाही तर त्या राज्याचा अर्धा वाटा आम्हांला द्या, असा आग्रह धरण्याला लक्ष्मीनरसू यांनीच सालारजंगांना पूर्वेतिहासाचें स्मरण देऊन प्रोत्साहन दिलें. दि. २५-१-१८६५ या दिवशी म्हैसूरच्या महाराजांनी इंग्रज सरकारला लिहिलेल्या पत्रात म्हटलें आहे :

"The refusal on the part of the British Government to restore His Highness would lead to inconvenient questions with the Nizam. The conquest of Tippoo's dominions was the joint conquest of the Company and the Nizam. The cession to myself of his territories was the joint cession of the same parties and if the territories should ever lapse, they would not lapse to the British Government alone, but to the allies who shared the conquests and arranged the partition of 1799."

इंग्रज सरकारने माझें राज्य परत दिलें नाही तर निजाम सरकारशी त्याचा वाद उपस्थित होईल. टिपूचें राज्य इंग्रज आणि निजाम या उभयतांनी मिळून जिंकलें. मला म्हैसूरच्या गादीवर बसविलें, तेंही या उभयतांनी मिळूनच. तेव्हा माझें राज्य (वारसाच्या अभावी) सरकार-जमा करावयाचें ठरल्यास तें या दोन सरकारांच्या वाटयाला जाईल, एकटया ब्रिटिश सरकारच्या वाटयाला येणार नाही. या पत्राला उत्तर देताना इंग्रज सरकारच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की १७९९ मध्ये निजाम मुळी स्वतंत्र राजाच नव्हता. 'मुखमस्तीति वक्तव्यम्' या पलीकडे या वावदूकपणाला काहीच मूल्य नव्हतें. तरीही म्हैसूरच्या महाराजांनी दाखवून दिलें की १८५३ मध्ये लॉर्ड डलहौसी-सारख्या उद्दाम राज्यपालप्रमुखांनी (गव्हर्नर जनरल) सुद्धा निजामांना स्वतंत्र राजे (Independent Prince) ही संज्ञा लाविली होती. अशा प्रकारे निजामांच्या स्वातंत्र्याचा प्रश्नही म्हैसूरच्या राज्याच्या भवितव्यतेशी निगडित झाला होता. यामुळे आपल्या अल्पवयीन दत्तकपुत्राच्या भवितव्यतेविषयी चिंता करीतच म्हैसूरचे महाराज स्वर्गवासी झाले, तेव्हा हैद्राबादेच्या सरकारने त्यांच्या वारसाच्या प्रश्नात आपुलकीने लक्ष घातलें. सालारजंगांनी याप्रमाणे नेट लाविल्यानंतर म्हैसूरचा अर्धा प्रांत निजामाला समर्पण करण्यापेक्षा सारेंच राज्य वंशपरंपरागत महाराजांना समर्पण करणें इष्ट होय, असें ठरवून कृष्णराजमहाराजांनी घेतलेल्या दत्तकाला इंग्रजांनी मान्यता दिली आणि पन्नास वर्षे आपल्या ताब्यात ठेवलेलें तें राज्य लार्ड रिपन यांच्या हस्ते १८८१ मध्ये निरुपायाने महाराजांच्या स्वाधीन केलें. म्हैसूरप्रमाणे बडोद्याचें सारें राज्य नसलें

तरी त्या संस्थानांतील बराचसा प्रदेश इंग्रजांनी अन्यायाने आत्मसात् केला होता. मल्हाररावांचें सालारजंगांशी संगनमत झाल्यास त्याही प्रदेशावर आपल्याला पाणी सोडावें लागेल, या भीतीने १८७५ मध्ये इंग्रजांनी मल्हाररावांना पदच्युत करून बाल सयाजी महाराजांना बडोद्याच्या गादीवर बसविलें. पुढे सयाजीमहाराजांचे गायकवाडांकडून अन्यायाने घेतलेल्या प्रदेशांसंबंधी वाद चालू झालेच.

वाद निकरावर आणण्याचें कारण

सन १८७४ पासून सालारजंगांनी, अन्यायाने व्यापलेला प्रदेश परत करण्याचा इंग्रज सरकारकडे हट्ट धरण्याचें कारण हें होतें की, त्या सुमाराला नवनिर्मित जर्मन साम्राज्याच्या मत्सराने ग्रासलेल्या व्हिक्टोरिया राणीने आपणही सम्राज्ञी ही पदवी धारण करावयाचा संकल्प केल्याची वार्ता त्यांना कळून चुकली होती. राणीच्या या नव्या पदवीला मान्यता देण्यापूर्वी हैद्राबाद आणि इतर स्नेही सरकारांनी इंग्रज सरकारशी असलेले आपले वाद तोडून घ्यावेत, असा त्यांचा विचार होता. या दिशेने हालचाल करण्याचा प्रयत्न करताच मल्हाररावांच्या पदच्युतीचा पहिला फटका त्यांना बसला. या पदच्युतीने इतर संस्थानिकही अतिशय चिंतातुर झाले. तेव्हा त्यांना शांत करण्याकरिता आणि राणीच्या नव्या पदवीला त्यांची व्यक्तिशः मान्यता मिळविण्याकरिता १८७५ मध्ये राणीने आपले ज्येष्ठ पुत्र वेलसचे राजपुत्र एडवर्ड यांना हिंदुस्थानात पाठविलें. या फेरीत त्यांना असें आढळून आलें की एकटचा सालारजंगांच्या व्यतिरिक्त इतर सर्व संस्थानांचे नेते राणीच्या नव्या पदवीला मान्यता देण्याला सिद्ध आहेत. तेव्हा त्यांना सिध्दे करण्याकरिता राजपुत्रांनी सालारजंगांना इंग्लंडच्या भेटीचें आमंत्रण दिलें. या भेटीकडे वळण्यापूर्वी इंग्रज आणि निजाम यांच्या परस्परसंबंधाच्या परंपरेचें थोडें सिंहावलोकन केलें पाहिजे.

तीन निजामांचे मुख्य प्रधान

सालारजंग हे ज्या तीन निजामांचे मुख्य प्रधान होते, त्यांच्यापैकी पहिले नासिरुद्दौला. यांच्या प्रधानपदाचीं वस्त्रें सालारजंगांना मिळण्यापूर्वी त्यांचे काका सुराजुलमुल्क हे तेथील मुख्य प्रधान होते. या वंशपरंपरागत आणि दीर्घकालीन प्रधानपदामुळे, त्याचप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या कर्तृत्वाने समकालीन राजकारणी पुरुषांत सालारजंगांना अनन्यसामान्य महत्त्व प्राप्त झालें होतें. त्यांचे पहिले निजाम जे नासिरुद्दौला, ते स्वदेशीचे कट्टे पुरस्कर्ते होते. एकदा त्यांच्या राजसभेत एक सरदार इंग्रजी मलमलीचे

कपडे घालून आलेला पाहताच त्याला त्यांनी भला मोठा दंड करून राजसभेतून घालवून दिलें. या निजामांना इंग्रजांनी 'हिज मॅजेस्टी' ही पदवी देऊ केली होती. पण 'मी दिल्लीच्या सम्राटांचा सेवक आहे', असें सांगून त्यांनी ती विदेशी पदवी नाकारली. ती पदवी त्यांनी नाकारली नसती तर आपल्या पिढीला हैद्राबाद संस्थानचें विलीनीकरण आणि विभाजन कदाचित् पाहावयाला मिळालें नसतें ! दिल्लीश्वराच्या या सेवकाने १८५७ च्या आणीबाणीच्या दिवसांत आपल्या सम्राटाचा पक्ष स्वीकारण्याचें नाकारलें, म्हणून तर इंग्रजी राज्य आणखी ९० वर्षें टिकलें ! यांच्या मागून अफजलुद्दौला हे निजाम झाले. या निजामांनी १८६६ मध्ये ओरिसा प्रांतात अति भयंकर दुष्काळ पडून वीस लक्ष लोक यमसदनी गेले, तेव्हा तत्कालीन राजप्रतिनिधींना पत्र लिहिलें की सैन्याच्या वेतनानिमित्त पूर्वी आमचा उत्तर सरकार प्रांत तुम्ही आपल्याकडे लावून घेतलात आणि तो ओरिसात समाविष्ट केलात; सध्या आपल्या अंदाधुंदी कारभारामुळे त्या प्रांतात भयंकर दुष्काळ पडून तेथील आमची प्रजा अन्नावाचून तडफडून मरत आहे, तरी आपण तो प्रांत आम्हांला परत देऊन आमच्या प्रजेचे प्राण वाचविण्याची आम्हांला संधि द्यावी. इंग्रजी राजवटीत अंदाधुंदी कारभाराबद्दल इंग्रजांवर प्रत्यारोप करणारे हे एकटेच संस्थानिक होऊन गेले. त्यांनी केलेला आरोपही अतिशय सार्थ होता. कारण निजामांच्या कारभारात इतर असंख्य दोष असले तरी त्यांच्या राज्यातील प्रजा दुष्काळ पडून तडफडून मेली, असा संकटप्रसंग केव्हाही उद्‌भवला नाही. इतकेंच नव्हे तर १८७६ आणि १८९६ च्या अतिभयानक दुष्काळातही ब्रिटिशांच्या प्रांतातील लक्षावधि प्रजा आपले प्राण वाचविण्याकरिता निजामांच्या प्रांतात स्थलांतर करीत असे. वर्तमानकाळी इंग्रजी राज्याचे गोडवे गाणाऱ्यांना या इतिहासाची गंधवार्तासुद्धा नसते, हें देशाचें दुर्दैव आहे.

अफजलुद्दौलांचें पत्र

वरील विवेचन लिहिल्यानंतर निजामांनी तेव्हाच्या राजप्रतिनिधींना लिहिलेल्या खरमरीत पत्रातील एक अवतरण माझ्या लेखांतून निदर्शनास आलें आहे. पण त्याचा संदर्भ तेथे दिलेला नाही. (हें बहुधा सरदार अलीखानांच्या पुस्तकातील अवतरण असावें.

The Government of Hyderabad are grieved to note that the Government of India have not been sufficiently mindful of the welfare of their subjects. During the recent Orissa famine lakhs of people have perished owing to the callous indifference of the

authorities. It must be remembered that the Government of Hyderabad are to a large extent responsible for the establishment and maintenance of British rule in India. Inferentially they are responsible for the weal and welfare of the British Indian people. If the authorities of Orissa are unable to cope with the situation, the Government of India would be well advised to hand over the province of Orissa to the management of the Government of Hyderabad who would administer the province in the interest of the people and remit to the British exchequer the balance of the revenue receipts. Hyderabad cannot sit silent while lakhs are perishing in Orissa despite the fact that the treasury of the said province is replete with cash.

त्या पत्रात निजामांनी इंग्रजसरकारला सांगितलें आहे की, भारतातील इंग्रजी राज्य हें बऱ्याच अंशी आमच्या कृपेने स्थापलें गेलें असल्याने आणि राखलें गेलें असल्याने तेथील प्रजेच्या कल्याणाचें दायित्व आम्हांला विसरता येत नाही. ओरिसा सरकारचा कोश भरलेला असून तेथील लक्षावधि लोक उपासमारीने मरत आहेत. अशा परिस्थितीत हैद्राबाद सरकारला स्वस्थ बसणें शक्य नाही.

असो; १८६९ मध्ये अफजलुद्दौला वारल्यानंतर सालारजंग प्रधानांनी हैद्राबादच्या साऱ्या वेशी बंद करून प्रथम बाल निजाम महबूब अली यांना गादीवर बसविलें आणि सर्व अमीर उमरावांनी त्यांना नजराणा समर्पण करून राजनिष्ठेची शपथ घेतल्यानंतर मगच नगराच्या वेशी उघडल्या. सालारजंगांचें हें वर्तन म्हणजे नासिरुद्दौला यांनी नाकारलेली 'हिज मॅजेस्टी' ही पदवी व्यवहारतः निजामाला असल्यासारखेंच वर्तन होतें. यामुळे तेव्हाच्या इंग्रज राजदूताच्या तळपायाची आग मस्तकाला गेली! तेव्हा पुनश्च एकवार त्याच्या हस्ते बाल निजामांना गादीवर बसवून सालारजंगांनी त्याच्या संतापाचें अंशतः शमन केलें. आजच्या वाचकांना हा सारा पोरखेळ वाटेल; पण निजाम हा ईश्वरकृपेने अधिकारारूढ होतो, तो इंग्रजकृपेने नव्हे, अशी श्रद्धा असलेले सालारजंग निजामाला गादीवर बसविण्याचा इंग्रजांचा अग्राधिकार मान्य कसा करतील ? महबूबअलींच्या पूर्वी त्यांच्या पिताजींना तीन मुलगे होऊन ते बालपणीच देवाकडे गेले. तेव्हा एका फकिराने अफजलुद्दौलांना सांगितलें की या चौथ्या मुलाचें मुखकमल आपण पाहू नका, तरच हा मुलगा वाचेल. या आदेशाप्रमाणे त्यांनी आपल्या अल्पवयी युवराजाचें प्राचीन आर्यांच्या रूढीप्रमाण दर्शनही घेतलें नव्हतें.

बाल निजामांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न

अंतकाळी अफजलुद्दौलांनी आपल्या अदृष्ट पुत्राला डोळ्यांत तेल घालून जपण्याचा सालारजंगांना आदेश दिला. हा आदेश पाळणें किती अवघड होतें, हें पुढील घटनेवरून कळून येईल. एकदा इंग्रजांच्या हस्तकांनी अशी कंडी पिकविली की नेहमी अंतःपुरातील स्त्रियांच्या सहवासात राहिल्याने बाल निजामाला गर्मीचा रोग झाला आहे. बाल निजाम गादीवर बसले, तेव्हा ते तीन वर्षांचे होते आणि ही कंडी पिकली तेव्हा ते आठ नऊ वर्षांचे होते, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे कंडी पिकविणाऱ्यांच्या निर्लज्जपणाची आणि त्या कंडीवर विश्वास ठेवून बाल-निजामाला इंग्रजांच्या स्वाधीन करण्याची मागणी करणाऱ्या इंग्रज राजदूताच्या कुटिलतेची वाचकांना कल्पना येईल. या मागणीला सालारजंगांनी उत्तर दिलें की निजामांची प्रकृति चांगली असून आमच्या युनानी हकिमासमक्ष राजदूतांच्या तज्ज्ञांनी त्यांना तपासल्यास सत्य काय तें कळून येईल. त्याप्रमाणे डॉ. लॉ या राजदूतांच्या भिषग्वराने निजामांना तपासून त्यांची प्रकृति निकोप असल्याचा अभिप्राय दिला. तरी सुद्धा निजामांना आमच्या स्वाधीन करा, हा इंग्रजांचा आग्रह पुढे चालू राहिलाच ! पण निजामांची आई आणि आजी यांनी त्यांना अन्यत्र हलविल्यास प्राणत्याग करण्याची धमकी दिली, तेव्हा इंग्रजांना त्यांचा आग्रह सोडावा लागला. या वेळी सर रिचर्ड मीड हे राजदूत होते. त्यांनी मुख्य प्रधानांच्या विशेष आज्ञेवाचून संस्थानी अधिकाऱ्यांनी राजदूतांना भेटावयाचें नाही, हा जुना नियम रद्द करून घेतला आणि हैद्राबादेतील देशद्रोह्यांना दूतावासात बोलावून त्यांच्याशी कारस्थानें आरंभिलीं. या वेळी सालारजंगांनी राजा गिरिधरलाल यांच्या साहाय्याने चालविलेल्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांचीं रहस्यें सर रिचर्ड मीड यांना कळून आलीं. 'हैद्राबादेतील स्वातंत्र्य प्रयत्नांचा इतिहास' हें पुस्तक छापणाऱ्या संस्थानी पुढाऱ्यांनाही सालारजंगांच्या या शस्त्रास्त्रांच्या कारखान्याची माहिती नसल्याने त्यांच्या ग्रंथात या प्रकरणाचा उल्लेखही नाही. पण सर रिचर्ड मीडचे चरित्रकार आपल्या ग्रंथाच्या ३२२ पानावर या प्रकरणासंबंधी लिहितात :

That the proceedings were discovered and quietly checked before harm had been done and efficient measures taken to prevent their repetition. But the details are of too confidential nature for publication.

त्या वेळी इंग्रजांनी दडपून टाकलेलीं कारस्थानें उजेडात आणणें हें तर आजच्या इतिहासकारांचें आद्य कर्तव्य आहे !

सालारजंगांना अटक करण्याचें कारस्थान

या सर रिचर्ड मीड महाशयांनी सालारजंगांना अटक करावयाचें ठरविलें होतें. अर्थात् या कारस्थानाची माहिती मीडच्या चरित्रकारांनी दिलेली नाही. पण त्या दिवसांत निजामांचे शिक्षक असलेले नवाब सरवरजंग यांनी आपल्या आठवणींत ही कथा सांगितली आहे. सरवरजंग हे आईकडून सम्राट् शहाअलम यांचे पणतू आणि पित्याकडून महाकवि गालिब (असदुल्लाखान)यांचे नातू होते. त्यांच्या आत्मचरित्राचें इंग्रजी भाषांतर त्यांच्या चिरंजीवांनी लंडन येथील आर्थर एच. स्टॉकवेल, २९ लडगेट हिल्ल या प्रकाशकांकडून प्रसिद्ध करविलें. त्यांच्या सांगण्याप्रमाणे सालारजंगांचे एक इंग्रज कार्यवाह ऑलिफँट यांना पकडून सर रिचर्ड यांनी त्यांची मुंबईला उचलबांगडी केली. त्यानंतर हैद्राबादेच्या लोकांना कळून चुकलें की लौकरच सालारजंगांनाही अटक होणार. या अपेक्षेप्रमाणे एके दिवशी सर रिचर्ड मीड यांच्याकडे राजप्रतिनिधि लॉर्ड लिटन यांचा सालारजंगांना अटक करण्याचा आदेशही आला. या महत्त्वाच्या आदेशाचें वाचन करण्याकरिता सालारजंगांना सर रिचर्ड मीड यांनी दूतावासात निमंत्रणही केलें. पण त्या सावध प्रधानमंत्र्यांनी उलट निरोप पाठविला की माझी प्रकृति फार बिघडली असल्याने आपणच कृपा करून आमच्याकडे यावें. या निरोपाप्रमाणे इंग्रजांचे राजदूत प्रधानमंत्र्यांकडे गेले असता त्यांना आढळलें की निजामांचें सारें सैन्य त्यांच्या वाड्यापुढे एकत्र झालें आहे. हा देखावा पाहताच त्यांना कळून चुकलें की, सैन्यातील अधिकाऱ्यांना फितविण्याचे आपले सारे प्रयत्न व्यर्थ गेले आहेत. आत गेल्यावर ते सालारजंगांना म्हणाले, 'आज आपली प्रकृति फारच बिघडलेली दिसते. तेव्हा राजप्रतिनिधींचें पत्र मी आणखी केव्हा तरी दाखवीन.' या कालहरणाच्या सूचनेला सालारजंगांनी उत्तर दिलें : 'त्या पत्रात कोणता आदेश आहे, तो मला माहीत आहे. मला स्वतःला माझ्या अधिकाराचा लोभ नाही. पण पूर्वीच्या निजामांनी अंतकाळी आपल्या चिरंजीवांची जिवांत जीव असेपर्यंत सेवा करण्याची मला आज्ञा केली आहे. इंग्रजांनी मला नेमलें नाही. मी त्यांचा दास नाही. आपण मला अटक करून नेऊ शकाल. पण त्या निमित्ताने येथे रक्तपात झाला तर त्याचा दोष तुमच्यावर राहील, हें विसरू नका.' हें उत्तर ऐकून सर रिचर्ड मीड यांना मुकाट्याने परत जावें लागलें.

सालारजंगांचा शिवाजी करण्याचा प्रयत्न

एकीकडे सालारजंगांना दहशत घालण्याचा आणि शक्य तर अटकही करण्याचा प्रयत्न लॉर्ड लिटन आणि सर रिचर्ड मीड यांनी चालविला असताना इंग्लंडच्या राजघराण्याने त्यांना प्रेमळ पाहुणचार आणि आदरसत्कार यांच्या द्वारा वश करण्याचा विचार केला होता. युवराज एडवर्ड यांनी त्यांना इंग्लंडला येण्याचें आग्रहाचें आमंत्रण केलें होतें. त्या आमंत्रणाला अनुसरून १८७६ च्या आरंभी इंग्लंडला जाणाचा संकल्प त्यांनी राजदूतांना कळविला. तेव्हा त्यांनी उत्तर दिलें की राजप्रतिनिधि आणि राजदूत दोघेही नवीन असल्यामुळे आपण आताच परदेशी जाऊ नये आणि जावयाचेंच झालें तर हिंदुस्थान सरकारची अनुज्ञा घेतल्यावाचून जाऊ नये. या आगाऊपणाला सालारजंगांनी कोणतें उत्तर दिलें तें इंग्रज लेखक सांगत नाहीत. पण एप्रिलमध्ये सालारजंग इंग्लंडच्या प्रवासाला निघाले. इंग्लंडात काही आठवडे काढून रशिया तुर्कस्थानाच्या वाटेने स्वदेशी परत येण्याचा त्यांचा विचार होता. पण पारीनगरीत त्यांना अपघात होऊन त्यांच्या मांडीचें हाड मोडलें. या अवस्थेत मे मासाच्या अंती ते इंग्लंडला पोचले. तेथे राणीने त्यांना एक दिवस आपल्या वाड्यात ठेवून घेतलें. युवराजांनी आणि इतर प्रमुख व्यक्तींनी त्यांचा मोठा आदरसत्कार केला. संदर्लंडचे ड्यूक आणि त्यांच्यासारखेच विविध क्षेत्रांतील काही प्रमुख लोक यांनी आजच्या भाषेत बोलावयाचें म्हणजे निजामाच्या पक्षपाती लोकांची एक 'लॉबीच' निर्माण केली. इंग्लंडात मुसलमानांच्या पक्षपात्यांची जी प्रभावी प्रचारसंघटना पुढे अस्तित्वात आली, तिचा उगम याच वेळी झाला. या इंग्रज मित्रांच्या अभिप्रायामुळे आपला पक्ष न्याय्य असल्याचा त्यांचा आत्मविश्वास दुणावला. तेथून निघताना त्यांनी लॉर्ड नॉर्थब्रुक यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलें आहे :

I must recover Berar, or I must be convinced of the justice of the reasons for withholding it, or I must die.

स्वातंत्र्य आणि वऱ्हाड अथवा मरण असा कृतनिश्चय करूनच ते भारतात परत आले. इंग्लंडात असताना त्यांच्यावर इंग्रज हेरांचा कसा पाहरा होता, याची कथा मी 'विचित्र कथा' या पुस्तकात दिली आहे. भारतात येताच राणीला सम्राज्ञी बनविण्यासाठी भरणाऱ्या सामंतसंमेलनाचें हैद्राबाद सरकारला आमंत्रण आलें. या संमेलनापूर्वी वऱ्हाडचा प्रश्न निकरावर आणण्याकरिता सालारजंगांनी राजप्रतिनिधींना त्यासंबंधी एक महत्त्वाचें पत्र लिहिलें. त्या पत्रात इंग्रजांनी वऱ्हाड प्रांत

कसा लुबाडला याचा खरा इतिहास सांगून तो प्रांत हैद्राबादसरकारला परत देण्याची मागणी केली होती. हें पत्र पाठविल्यानंतर बाल निजामांसह ते दिल्लीच्या सामंतसंमेलनाला गेले. सर्व संस्थानिकांची दास बनण्याला अनुमति मिळविण्याकरिता भरणाऱ्या संमेलनात भाग घेण्याची त्यांना मुळीच इच्छा नव्हती. पण बाल निजामांना या संमेलनाला उपस्थित राहून सर्व संस्थानिकांचा एकाच प्रसंगी परिचय करून घेण्याची उत्सुकता असल्याने त्यांना दिल्लीला जावें लागलें. तिथे पोचल्यावर त्यांना कळलें की राजप्रतिनिधींना त्यांचें पत्र उपमर्दकारक वाटत असल्याने त्याचा स्वीकार करण्याचें त्यांनी नाकारलें असून हैद्राबादेच्या मुख्य प्रधानांनी राणीच्या सार्वभौमत्वाला मान्यता दिल्यावाचून त्यांना संमेलनात उपस्थित राहू देऊ नये, असा आदेश दिला आहे. याचा अर्थ असा होतो की सालारजंग सपशेल शरण आले नाहीत तर त्यांना बंडवाल्या शिवाजीप्रमाणे अटक करावयाची. या प्रकरणी पुनश्च सर रिचर्ड मीड यांच्या मध्यस्थीने बोलणीं होऊन राजप्रतिनिधींनी, संमेलनानंतर वऱ्हाडसंबंधी अगदी मवाळ पत्र हैद्राबादेहून आल्यास त्या प्रश्नाचा पुनर्विचार करण्याचें मान्य केलें. इतकीं बोलणीं होऊन सालारजंग एकदाचे संमेलनात उपस्थित झाले. या प्रसंगी राजप्रतिनिधींच्या भाषणानंतर ग्वाल्हेर, उदेपूर, जयपूर, काश्मीर येथील महाराजांनी आणि भोपाळच्या बेगम साहिबांनी राजनिष्ठा व्यक्त करणारीं भाषणें केलीं. त्यानंतर सारी सभा तटस्थ झाली. पण सालारजंग काही राजनिष्ठा व्यक्त करावयाला उठेनात. शेवटी सर्व सभासदांनी गळ घातल्यानंतर आणि स्वत: बाल निजामांनी आज्ञा केल्यानंतर सालारजंगांनी एकदाची निजामांच्या वतीने राजनिष्ठा व्यक्त केली आणि स्वातंत्र्यप्रिय शिवाजीप्रमाणे आपल्याला होऊ घातलेली अटक टाळली. हा सारा इतिहास पाहिला म्हणजे सम्राट् पांचवे जॉर्ज यांचा दिल्लीतील सामंतसंमेलनात हेतुत: अथवा स्वभावत: अपमान करणाऱ्या सयाजीमहाराजांच्या साहसाची कल्पना येईल !

निजामांचे जिल्हे मक्त्याने घेण्याचें कारस्थान

सालारजंगांच्या या स्वातंत्र्यप्रियतेमुळेच तत्कालीन पुण्यातील क्रांतिकारकांचे प्रमुख डॉ. विनायक रामचंद्र अथवा अण्णासाहेब पटवर्धन यांचा त्यांच्याशी संबंध जुळून आला होता. निजामसरकारला दहाबारा कोटि रुपयांचें कर्ज इंग्लंडव्यतिरिक्त अन्य देशांतील पेढ्यांकडून मिळवून देऊन त्या द्रव्यबळाचा सदुपयोग करून इंग्रजांच्या हातून वऱ्हाड प्रांत सोडविणें आणि तो प्रांत आपण स्वत: निजामाकडून मक्त्याने घेणें

असें अण्णासाहेबांच्या कारस्थानाचें सर्वसाधारण स्वरूप होतें. हें कारस्थान स्वत: अण्णासाहेबांनी रचलें नसून नानासाहेब पेशव्यांच्या सहकाऱ्यांतच हें कारस्थान प्रथम शिजलें. १८५७ च्या क्रांतिसंग्रामात नानासाहेब पेशव्यांना हार खावी लागली तरी त्यानंतरही त्यांचे दूत हिंदुस्थानभर संचार करून पुढील कारस्थानांचे धागेदोरे विणीत असत. अशा दूतांपैकी एक प्रमुख दूत वेंकटेश्वरशास्त्री यांनी स्वत: नानासाहेबांना नेपाळात भेटून आल्यानंतर आणि अनेक ठिकाणी कारस्थानें केल्यानंतर रावसाहेब पेशव्यांना १८६१ मध्ये लिहिलेलें पत्र स्वातंत्र्येतिहासाच्या साधनांत (खंड १, पृष्ठ २४३) छापलें आहे. त्या पत्रात म्हटलें आहे की, आपल्या कारस्थानांची निर्वेधपणे उभारणी करण्याकरिता स्वत:च्या अधिकारात एखादा प्रांत असणें आवश्यक आहे; तेव्हा निजामांचे काही जिल्हे मक्त्याने घेऊन तेथे आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा आणि भावी संग्रामाची सिद्धता करण्याचा संकल्प आपल्यातील दूरदर्शी सरदारांनी केला आहे. हें पत्र इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हाती पडल्यानंतर त्याचा अनुवाद आपल्या वरिष्ठांना कळविताना मीर शहामतअली या अधिकाऱ्याने म्हटलें आहे :

The point that deserved a prominent and immediate notice is the plan of farming a district in the Nizam's territory with a view to make it the headquarters of their mischievious machinations as its position may enable them to devise and execute any scheme without detection to the latest hour. It is certainly an ingenious device and rebels seem to have set their heart on its success.

निजामांचे जिल्हे मक्त्याने घेऊन तेथे आपल्या योजना परिपक्व करण्याची कल्पना फार धूर्तपणाची असून बंडवाल्यांनी ती यशस्वी करण्याचा चंग बांधलेला दिसतो. हीच योजना पुढे अण्णासाहेब पटवर्धनांनी सर सालारजंग यांच्या साहाय्याने कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा इंग्रजांनी हैद्राबादकरांवर लादलेल्या सैन्याचें वेतन त्याला वेळच्या वेळी मिळावें, या निमित्ताने वऱ्हाड प्रांत आपल्याकडे लावून घेतला होता. यासाठी या वेतनाचा व्यय ज्याच्या व्याजातून भागेल, इतकें मोठें कर्ज निजमाला मिळवून देऊन आपणच वऱ्हाड प्रांत आपल्या ताब्यात घ्यावा, असा अण्णासाहेबांचा डाव होता. पण १८६१ मध्ये वेंकटेश्वरशास्त्र्यांचें पत्र पकडल्यापासून इंग्रजांना या योजनेचा धोका पूर्णपणे कळून चुकला असल्याने अण्णासाहेबांनी ती कृतीत उतरविण्याचा पुनश्च प्रयत्न आरंभिलेला पाहून इंग्रजांच्या हस्तकांनी सर सालार-

जंगांना विषप्रयोग करून कबरीत पाठवून दिल्यामुळे अण्णासाहेबांचें हें नेत्रदीपक कारस्थान स्वप्नमायेप्रमाणे तिथल्या तिथेच विलीन झालें. सालारजंगांना पटकीचा विकार झाला, असें इंग्रज इतिहासकार लिहितात; पण त्यांच्यावर विषप्रयोग झाला, असें नबाब सरवरजंगांनी स्पष्ट सांगितलें आहे. त्यांना सोमल घातलें असल्यास अजूनही त्यांच्या पोटात सोमलाचा अंश सापडू शकेल. सालारजंगांच्या मृत्यूनंतर शेख जमालुद्दीन अफगाणी यांच्यासारख्या तुर्की दूतांच्या प्रभावाने भारतीय मुसलमान पॅन इस्लामिझमकडे आकृष्ट झाले.

संस्थानिकांच्या स्वायत्ततेचा अंत

सालारजंगांच्या प्रभावामुळे आणि प्रयत्नामुळे इंग्रजांना म्हैसूरचें राज्य तेथील महाराजांना परत द्यावें लागलें, हा एका अर्थी त्यांचा पराजय असला तरी तें राज्य परत देताना त्यांनी तेथील महाराजांवर ज्या अटी लादल्या, त्या अटींतच सर्व संस्थानिकांच्या स्वायत्ततेचा अंत करणारें विष कालविलेलें होतें. या साऱ्या अटी येथे उतरून घेणें शक्य नाही. त्यांतील महत्त्वाची एक अट अशी :

Government of India's sanction was necessary for changes in the laws, the system of administration and the land settlements. The ruler was to conform at all times to the advice of the Governor-General in Council.

राज्यकारभारात, किंवा प्रचलित निर्बंधात, तसेंच शेतकऱ्यांवरील करांच्या बाबतीत काहीही बदल करावयाचे झाले तर इंग्रज सरकारची प्रथम संमति मिळवावी लागेल. त्याचप्रमाणे इंग्रज सरकार उपदेशाच्या नांवाने जो जो आदेश देईल, तो तो पाळलाच पाहिजे. असल्या अटी मान्य केल्यानंतर संस्थानातून इंग्रज राजदूतांचें राज्य प्रस्थापित झाल्यास नवल काय? या अटी १८८१ मध्ये प्रसिद्ध करताना इंग्रज सरकारने अशीही अपेक्षा व्यक्त केली होती की त्यांच्यापासून इतर संस्थानिकांनीही धडा घ्यावा. या सूचनेचा इंदूरच्या तुकोजीराव महाराजांनी तत्काळ निषेध केला. तेव्हा लॉर्ड रिपन यांनी तात्पुरती माघार घेऊन त्यांना कळविलें की म्हैसूरच्या महाराजांवर लादलेल्या अटी अपवादात्मक असून त्या सर्व संस्थानिकांना लागू करण्याचा आमचा विचार नाही. पण अशी माघार घ्यावी लागल्याचा राग त्यांनी होळकरांच्यावर लौकरच उगवला. १८८३ मध्ये तुकोजीमहाराजांनी ख्रिस्ती धर्मप्रचारकांवर बहिष्कार टाकण्याची आणि त्यांच्या शाळांतून प्रवेश न करण्याची आपल्या प्रजेला आज्ञा केली, तेव्हा त्यांच्या स्वायत्ततेला

नुकतीच दिलेली मान्यता विसरून क्रोधांध लॉर्ड रिपननी त्यांना पदच्युत करण्याची धमकी दिली. *Viceroyalty of Lord Ripon* लॉर्ड रिपनची राजवट या ग्रंथात डॉ. गोपाळ यांनी या महत्त्वाच्या प्रकरणासंबधी पुढील माहिती (पृ. २१०) दिली आहे :

Holkar was soon to feel the strong arm of the Crown. When he ordered his subjects to boycott Missioneries and their schools. Aitchison, the greatest living authority on the subject, the Crown's relations with the Indian Princes, thought there was nothing to be done and advised the missionaries to leave Indore. But Ripon intervened with effect. He made it clear to the ruler that the Government of India attached great importance to freedom of worship in their own houses and in their own premises and warned him of the dangers of misgovernment.

या धमकीने विचलित होऊन तुकोजी महाराजांनी विश्वनाथ नारायण मंडलिकांना आपलें प्रधानमंत्र्याचें पद स्वीकारण्याची गळ घातली. पण प्रकृतीच्या निमित्ताने त्यांनी नकार दिला. म्हैसूरच्या महाराजांप्रमाणेच, पण थोड्या सौम्य प्रमाणात बडोद्याच्या सयाजीमहाराजांना अधिकारारूढ करताना त्यांच्यावरही अटी लादल्या होत्या. पहिलीं दोन वर्षं महाराजांनी कसें वर्तन करावें, याचे त्यांना नियम घालून दिले होते आणि त्यानंतरही सर्व महत्त्वाच्या प्रकरणात हिंदुस्थान सरकारचे आदेश पाळावे लागतील, असें त्यांना बजावलें होतें. १८८३ मध्येच सर सालारजंग यांच्यावर विषप्रयोग होऊन ते मृत्युमुखी पडल्यानंतर त्यांच्या नवीनच यौवनात आलेल्या चिरंजीवांना त्यांनी हैद्राबादेचे मुख्य प्रधान करून हिंदुस्थान सरकारच्या आज्ञेप्रमाणे चालण्याचा आदेश दिला. या वेळी या अननुभवी युवकाला मुख्य प्रधानाचें पद देऊ नये, असें जाणत्या लोकांनी सुचविलें असता लॉर्ड रिपननी उत्तर दिलें होतें की अनुभवी मुख्य प्रधान स्वतःच्या बुद्धीप्रमाणे वागू लागला तर त्याला आपल्या धोरणाने वागवायाला लावणें अवघड जातें, तेव्हा अननुभवी मुख्य प्रधान असणेंच इंग्रज सरकाराच्या हिताचें आहे. यावरून देशातील मध्यम वर्गाच्या हाती खराट्याचें स्वराज्य देऊन त्याला आपल्या नादी लावणाऱ्या लॉर्ड रिपननी संस्थानिकांचा कसा पद्धतशीर रीतीने काटा काढला, हें वाचकांना कळून येईल.

मल्हाररावांचा अस्त, सयाजी महाराजांचा उदय

अण्णासाहेब पटवर्धनांच्या द्वारा वऱ्हाडविमोचनाच्या कार्याला हातभार लावण्यापूर्वी मल्हारराव गायकवाडांच्या पदच्युतीच्या प्रसंगीच

पुण्यातील मध्यम वर्गाने मोठें धारिष्ट करून ब्रिटिश साम्राज्यवादा-विरुद्ध लढा पुकारला होता. मल्हारराव गायकवाड स्वत: अप्रबुद्ध होते आणि अत्यंत नीच लोकांच्या तंत्राने वागत असत, ही गोष्ट सत्य असली तरी त्या राज्यातील शांतता, सुरक्षितता आणि सुराज्य यांना सुरुंग लावण्याचें कार्य तेथील इंग्रज राजदूत कर्नल फेयर हे अव्याहतपणे करीत होते, ही गोष्टही तितकीच सत्य आहे. या राजदूतांच्या नीचपणाचें वर्णन करण्यात वेळ घालविण्याला येथे सवड नाही. पण बडोद्याचा कारभार सुधारण्याकरिता महाराजांनी दादाभाई नौरोजींना प्रमुख प्रधानाचें पद दिल्यानंतर त्यांचा या राजदूतांनी कसा छळ केला, याचें सविस्तर वर्णन सर रुस्तुम मसानी यांनी दादाभाई नौरोजींच्या चरित्रात केलें आहे, तें वाटल्यास आधारप्रिय वाचकांनी पाहून घ्यावें. या राजदूतांना त्यांच्या वरिष्ठांनी प्रधानमंत्र्यांशी सहकार्य करीत जा, अशी सूचना केली असता हे राजेश्री उद्दामपणाने उद्गारले : ‘माझ्यासारखा खरा ख्रिस्ती आणि दादाभाईसारखा राजद्रोही यांना एकाच मालिकेत बसविता काय ? (ब्रिटिश पॉलिसी इन् इंडिया पान १०६; लेखक डॉ. गोपाळ, राष्ट्रपतींचे चिरंजीव) कर्नल फेयर यांच्या दुर्वर्तनाकरिता त्यांना सरकारने परत बोलवावें, अशी दादाभाईंनी खटपट केली आणि त्या खटपटीत त्यांना यशही आलें. पण हे राजदूत बडोद्याहून निघून जाण्यापूर्वी त्यांच्या सकाळच्या सरबतात सोमल आणि हीरकचूर्ण मिसळून त्यांचा वध करण्याचा प्रयत्न झाल्याचें प्रकरण उद्भवलें. या नाट्यपूर्ण घटनेवर बंगाल्यात उपेंद्रमित्रांनी ‘दुर्दैवी मल्हारराव’, नरेंद्र वंद्योपाध्यायांनी ‘बडोद्याचा आरसा’ आणि अमृतलाल बसु यांनी ‘हीरकचूर्ण’ अशीं तीन नाटकें लिहिलीं आणि तीं रंगभूमीवर लोकप्रियही झालीं. तेव्हा या प्रकरणात आमचे महाराष्ट्रीय नाटककारच मागे पडले असें म्हटलें पाहिजे. या नाटकांच्यापेक्षा अधिक महत्त्वाची घटना ही की तेव्हा ‘अमृतबाजारपत्रिके’चे संपादक शिशिरकुमार घोष यांनी या विषप्रयोगाचें ठणठणीतपणे समर्थन केलें आणि या मल्हारराव प्रकरणापासूनच तेव्हा विद्यार्थी असलेल्या टिळकांचें मन ‘पत्रिके’नें आकृष्ट करून घेतलें.

It would be evident to the future historian that the government itself in a manner compelled Malharrao to commit this atrocious crime. Proofs will be found in abundance that Col. Phayre was constantly hostile to the Gaikwad. Not only did this Colonel tyrranise over the Gaikwad and placed obstacles in the way of good administration; but his advice made the

subjects rebellious. And when the Gaikwad wanted to punish them, the Resident reported him as an oppressive Chief. What would the English have done, if, for instance, the Russian Emperor had deputed an officer like Col. Phayre to England to keep an eye on the doings of the English Government, to interfere with all their acts, to teach people insubordination to the law and spread calumnies relating to the Queen? It is evident that he had no other than this atrocious way left to him to be free from all oppressions of the Resident.

म्हणजे राज्य सुधारणातून विघ्नें आणणें, प्रजाजनांना बंड करावयाला चिथावणें, त्यांना शासन केलें की प्रजेचा छळ केल्याचा मल्हाररावांवर आरोप करणें, त्यांची दुष्कीर्ति करण्याकरिता खऱ्या खोट्या कंड्या पिकविणें, इत्यादि कृत्यांनी कर्नल फेयर यांनी मल्हाररावांना इतकें सळो की पळो करून सोडलें होतें की त्यांच्यावर विषप्रयोग करण्यावाचून त्यांच्या तावडीतून सुटण्याचें काहीच साधन उरलें नव्हतें. अमृतबाजारकारांची ही टीका थोडी अतिरेकी होती. कारण सरळ मार्गाने दादाभाईंनी फेयर महाशयांचें उच्चाटन घडवून आणलेंच होतें. असो. मल्हाररावांवरील खऱ्या खोट्या आरोपांचें अनुकरण करून अन्य संस्थानिकांनी आपल्या राजदूतावर विषप्रयोग करू नयेत, याकरिता इंग्रजांनी मल्हाररावांची चौकशी आरंभिली, तेव्हा त्या चौकशीचें आव्हान एकट्या स्वराज्यभक्त पुणेंकरांनीच स्वीकारिलें. याच प्रसंगापासून मध्यम वर्गाचें प्रतिनिधित्व करणारे पुण्यपत्तन हें भारतातील इंग्रजविरोधी बंडवाल्यांचें केंद्रस्थान असें ब्रिटिश राज्यकर्ते मानू लागले. मल्हाररावांना अटक झाल्यानंतर लौकरच पुण्यातील फडतरे चौकातल्या फडतऱ्यांच्या वाड्यात या संकटप्रसंगी त्यांना साहाय्य करण्याकरिता तीन सहस्र पुणेंकरांची त्या काळच्या मानाने मोठी प्रकट सभा भरली आणि गायकवाडांना त्यांच्या चौकशीत साहाय्य करण्याकरिता आपण एक लक्ष रुपये देण्यास सिद्ध आहोत, असें सार्वजनिक सभेच्या नेत्यांनी सरकारला कळविलें. इतकेंच नव्हे तर तितके रुपये एका पेढीवर जमाही केले. या प्रकरणी सार्वजनिक काकांप्रमाणेच येथील डावरे कुळातील हुतात्मा गोविंदराव डावरे, यांनीही प्रमुखपणाने भाग घेतला होता असें त्यांच्या चरित्रावरून समजतें. या प्रसंगी मल्हाररावांच्या बचावासाठी पुणेकरांनी घेतलेल्या पुढाकाराचा त्यांना स्वतःला काही उपयोग झाला नसला तरी त्यांच्या मागून गादीवर आलेले त्यांचे दत्तक पुतणे सयाजी-महाराज यांच्या मनावर त्या प्रसंगाचा चिरस्थायी परिणाम झाला होता.

मल्हाररावांनी १८५७ मध्ये बंड करण्याचा प्रयत्न केला होता, असें बळवंतराव देवांच्या त्यांच्या राजवटीच्या इतिहासावरून समजतें.

राणीचें राज्य जाऊन रावणराज्य

वर वर्णिल्याप्रमाणे मल्हारराव गायकवाडांना पदच्युत करून आणि निजामांना आपल्या स्वातंत्र्यावर उदक सोडावयाला लावून १८७७ मध्ये व्हिक्टोरिया राणीने आपण सम्राज्ञी बनल्याची जी घोषणा केली, ती मुख्यतः नवनिर्मित जर्मन साम्राज्याच्या अनुकरणाने आणि मत्सराने केली. १८७० मधील फ्रँको-जर्मन युद्धात विजय मिळवून प्रशियाचे राजे विल्हेल्म हे जर्मनीचे सम्राट् बनले. हें पाहूनच व्हिक्टोरिया राणीला आपणही सम्राज्ञी बनण्याचे डोहाळे लागले. पण प्रशियाच्या राजाने जर्मनीचा सम्राट् ही पदवी धारण केली, तेव्हा तो आपल्या सर्वच जर्मन प्रजेचा सम्राट् बनला. त्याच्या उलट व्हिक्टोरिया राणी ही इंग्लंडची राणीच राहून गेली आणि हिंदुस्थानाची मात्र सम्राज्ञी बनली. म्हणजे भारतीय प्रजेला ब्रिटिश प्रजाजनांच्या तोडीचे अधिकार नाहीत, या वस्तुस्थितीचीच राणीने सम्राज्ञी बनून घोषणा केली होती. एवंच नवनिर्मित जर्मन साम्राज्याच्या मत्सरामुळे ग्रेटब्रिटनमध्येही साम्राज्यवादाचा उदय झाला आणि कदाचित् त्यामुळेच जर्मन साम्राज्याच्या नाझी अवताराच्या विनाशानंतर अल्पावधीतच ब्रिटिश साम्राज्याचाही विनाश झाला. ग्रेटब्रिटनमधील साम्राज्यवादाच्या उदयानंतर त्यांच्या भारतातील मदांधतेला जणू ग्रहणाचीच भरती आली. या मदांधतेचें वाङ्मयस्मारक किप्लिंगच्या ग्रंथांच्या रूपाने अजून टिकून राहिलें आहे. असो. हा साम्राज्यवादाचा रावण जेव्हा ब्रिटिशांच्या अंगात संचारला, तेव्हापासून त्यांनी तत्कालीन नरराक्षसांचें साम्राज्य जें तुर्की साम्राज्य तेथील राज्यकर्त्यांना आपल्या सन्मान्य मित्रांचें स्थान देऊन त्यांच्या टाचेखाली चिरडल्या जाणाऱ्या ख्रिस्ती प्रजेला तिच्या स्वातंत्र्ययुद्धात साहाय्य करण्याची लॉर्ड बायरनसारख्या महाकवीपासून प्रेरणा घेऊन जॉर्ज कॅनिंगसारख्या परराष्ट्रमंत्र्यांनी चालू केलेली पवित्र परंपरा लुप्त केली. १८७६ मध्येच तुर्कांनी कुराणाच्या प्रेरणेला अनुसरून अघोर अत्याचार करून बल्गेरियातील ख्रिस्ती प्रजेचा सामुदायिक संहार केला. या संहाराचे आकडे भिन्न भिन्न इतिहासकारांनी द्वादश सहस्रांपासून दोन लक्षांपर्यंत दिलेले आहेत. या अमानुष संहाराने आणि त्या संहाराच्या विरुद्ध ग्लॅड्स्टनसारख्या मानवतावादी नेत्यांनी केलेल्या झंझावाती प्रचाराने मुळीच विचलित न होता इंग्लंडच्या साम्राज्यवादी राज्य-

कर्त्यांनी तेव्हा तुर्कांचा पक्ष घेऊन रशियाशी युद्ध करण्याची सुद्धा सिद्धता केली ! तेव्हा भारतपक्षपाती प्रो. फॉसेट यांनी चिडून उद्गार काढले होते :

We have been enjoined to forgive and forget but we can never forget that England's present rulers have done all they could to associate the name of England with the most abominable cruelties that ever disgraced Europe and with the most detestable Government that ever afflicted mankind.

आम्हांला विसरा आणि क्षमा करा असा उपदेश केला जातो. पण इंग्लंडचे आजचे राज्यकर्ते हे साऱ्या युरोपातील अत्यंत अत्याचारी आणि अत्यंत तिरस्करणीय अशा तुर्की सरकारचे मित्र म्हणून मिरवतात, ही गोष्ट विसरणें अशक्य आहे. त्या वेळी तुर्की सरकारने केलेलीं पापें लपविणें अथवा त्यांचें स्वरूप सौम्य करून दाखविणें या पापांवर टीका करताना ग्लॅड्स्टन यांनी म्हटलें आहे :

This is moral complicity with the basest and blackest outrages upon record within the present century.

हीं पापें छपविणें म्हणजे चालू शतकातील अत्यंत नीच आणि अत्यंत काळ्याकुट्ट अत्याचारांत आपण नैतिक भागीदारी पतकरण्यासारखेंच आहे. त्या वेळी ग्लॅडस्टन यांनी तुर्की राज्यकर्त्यांचे The great anti-human specimen of humanity. म्हणजे मानव समाजाचे महान् शत्रु असलेल्या मानवांचा नमुना असें वर्णन केलें होतें. या विषयावरील चर्चेचा समारोप करताना ग्लॅड्स्टन यांनी म्हटलें होतें :

Let the Turks carry away their abuses in the only possible manner namely by carrying off themselves. All their officers one and all, bag and baggage, shall I hope clear out of the province that they have desolated and profaned. This thorough riddance, this most blessed deliverance, is the only reparation we can make to the memory of those heaps on heaps of dead, to the violated purity alike of matron, of maiden and of child, to the civilization that has been affronted and ashamed, to the laws of God, or if you like to the moral sense of mankind at large. There is not a criminal in a European jail, there is not a cannibal in the South sea islands, whose indignation would not rise and overboil at the recital of that which has been done, which has too late been examined but which remains unavenged, which has left behind all the foul and all the fierce passions that produces it, and which may spring again in another

murderous harvest from the soil soaked and reeking with blood and in the air tainted with every imaginable deed of crime and shame. That such deeds should have been done once is a damning disgrace to that portion of our race which did them; that a door should be left open for their repetition would spread that shame over the whole. No Government has ever so sinned, no one has proved itself so incorrigible in sin or which is the same, so impotent for reformation.

हा उतारा म्हणजे ग्लॅड्स्टन यांच्या वक्तृत्वपूर्ण भाषेचा एक उत्कृष्ट नमुना असल्याने त्याचा अनुवाद करणें अवघड आहे. तथापि त्याचा भावार्थ केवळ मराठी जाणणाऱ्या वाचकांना सादर करणें भागच आहे. "युरोपात तुर्कांनी जी घाण करून ठेविली आहे, ती निस्तरण्याचा एकमेव उपाय म्हणजे त्यांनी स्वतःच युरोपाचा त्याग करून तत्काळ चालते होणें हाच होय. बल्गेरियातील ख्रिस्ती समाजावर सत्ता चालविणारे त्यांचे सारे अधिकारी आपल्या बाडबिछायतींसह, त्यांनी स्वतःच ओसाड आणि भ्रष्ट केलेल्या प्रांताबाहेर चालू लागतील, अशी मी आशा करतो. अशा प्रकारे त्यांची त्या प्रांतातून संपूर्ण हकालपट्टी करणें आणि त्या प्रांतातून शेवटचा मुसलमान बाहेर पडलेला भाग्याचा दिन त्या प्रांताला दाखविणें हा एकच त्या प्रांतातील सार्वत्रिक संहारात बळी पडलेल्या प्रेतराशींच्या संत्रस्त आत्म्यांना आणि तेथील सामुदायिक बलात्कारांना बळी पडलेल्या बालिका, तरुणी आणि प्रौढा यांच्या दग्ध अंतःकरणांना शांति देण्याचा मार्ग आमच्या हातात आहे. त्यानेच मानवी संस्कृतीचा जो उपमर्द आणि जी विटंबना आज चालू आहे, ती थांबून मानवसमाजातील नैतिक मूल्यांची पुनश्च प्राणप्रतिष्ठा होईल. तुर्कांनी केलेल्या दुष्कृत्यांचें वर्णन ऐकून ज्यांचें रक्त तापणार नाही आणि ज्यांच्या अंगाचा भडका होणार नाही असे बंदीसुद्धा युरोपातील बंदीशाळेत नसतील, अथवा असे नरभक्षक सुद्धा पृथ्वीच्या पाठीवर नसतील! या अत्याचारांची वार्ताही लोकांना उशिराने कळली, त्यांची चौकशीही विलंबानेच झाली, आणि त्यांचा सूड अजूनही घेतलेला नाही. त्या अत्याचारांमुळे जे पाशवी आणि सैतानी मनोविकार तेव्हा उचंबळून वर आले आहेत, ते सारे आपल्याला सामुदायिक संहाराची संधि पुनश्च केव्हा लाभते, याचीच वाट पहात आहेत. तेथील रक्तलांछित भूमीतून अजून प्रेतराशींचा दुर्गंध येत आहे आणि तेथील वातावरण सर्व प्रकारच्या नीच कृत्यांनी आणि कामनांनी दूषित झालें आहे. अशा घटना एखाद्या प्रसंगी घडाव्यात, ही गोष्ट त्या घटना घडविणाऱ्यांना

लांछनास्पद असते. पण असल्या घटना पुनश्च घडण्यासाठी सताड उघडीं दारें ठेवणें हें समग्र मानवजातीला लांछनास्पद असतें. आजपर्यंत कोणत्याही सरकाराने इतकीं भयंकर पापें केलीं नाहीत, इतकेंच नव्हे तर पापें करण्यात इतका दुराग्रह दाखविला नाही; अथवा अन्य शब्दांत बोलावयाचें म्हणजे स्वतःला सुधारण्याची इतकी अनिच्छा आणि अपात्रता व्यक्त केली नाही."

एखाद्या व्यक्तीचें शील त्याच्या मित्रावरून ओळखतात. तेव्हा साम्राज्यवादी इंग्रजांचें शील त्यांचे मित्र जे तुर्क, त्यांच्या ग्लॅड्स्टन यांनी वर्णिलेल्या शीलावरून ओळखणें न्याय्य आहे; इतकेंच नव्हे तर पुढील इतिहासाने त्याचा खरेपणा आपल्या प्रत्ययाला आला आहे. वरील उताऱ्यात वर्णिल्यासारखे अघोर अत्याचार करण्याला मुसलमानांना उत्तेजन देऊन साम्राज्यवादी इंग्रजांनी पश्चिम पंजाबातून पूर्णपणे आणि पूर्व बंगाल्यातून बहुतांशी हिंदूंचा वंशच्छेद घडवून आणला आहे. १८७७ पासून लंडन येथील भारतसचिवाच्या कार्यालयावर अत्याचारी तुर्की साम्राज्याची कृष्ण छाया कशी पसरली होती, याचें निदर्शन लॉर्ड मोर्ले यांच्या पुढील उद्गारांतून पाहावयाला मिळतें. तुर्की साम्राज्याच्या वतीने भारतात पॅनइस्लामिझम्‌चा (इस्लाम सार्वभौम) लॉर्ड रिपनच्या राजवटीपासून प्रचार करणाऱ्या जमालुद्दिन अफगाणी यांचे शिष्य सय्यद अमीर अली आणि आगाखान यांच्या जातवार मतदार संघ मागणाऱ्या शिष्टमंडळाला उत्तर देताना लॉर्ड मोर्ले यांनी म्हटलें होतें :

I know very well that any injustice, any suspicion that we were capable of being unjust to Mahomedans in India would certainly provoke a severe and injurious reaction in Constantinople.

हिंदुस्थानातील मुसलमानांना आम्ही अन्याय केला, अथवा अन्याय केल्याचा तुर्की सरकारला नुसता संशय आला, तरी कॉन्स्टँटिनोपल (इस्तंबूल, तेव्हाची तुर्की राजधानी) येथे त्याची तीव्र प्रतिक्रिया होईल, याची मला पूर्ण जाणीव आहे. आमच्या लहानपणी अतिशय प्रसिद्ध असलेल्या '*A Short History of the British People*' या ग्रीनच्या इतिहासात इंग्लंडच्या साम्राज्यवादावर टीका करताना स्पष्ट म्हटलें आहे :

The word imperialism carried the implications of reactionary oppression in Russia, of Government by massacre in Turky, and military rule in Germany.

साम्राज्यवादाचा अर्थ रशियात प्रतिगामी राज्यकर्त्यांनी चालविलेला प्रजेचा छळ, तुर्कस्थानात सामुदायिक संहाराने स्मशानशांतता स्थापून चालविलेला राज्यकारभार, आणि जर्मनीत सैनिकी राज्य असा होतो. भारतातील ब्रिटिश साम्राज्याचे आलटून पालटून हे तीनही अर्थ होत असत !

इंग्लंडची नीतिभ्रष्टता

१८७६ मध्ये इंग्रजांनी जेव्हा सामुदायिक संहाराने राज्य चालविणाऱ्या तुर्की सरकारची मैत्री जोडली, तेव्हा १८५७ मधील उठावणीच्या निमित्ताने उत्तर हिंदुस्थानात ठिकठिकाणी सामुदायिक संहार करून इंग्रजांनीही तुर्की नरराक्षसांचे पक्षपाती बनण्याची आपली पात्रता आधीपासूनच सिद्ध केली होती. १६-५-१८५८ या दिवशी लिहिलेल्या पत्रात लँकेशायरचे नेते रिचर्ड कॉब्डेन यांनी म्हटलें आहे :

I am afraid our national character is being deteriorated and our love of freedom in danger of being impaired by what is passing in India. Is it possible that we can play the part of despot and butcher there without finding our character deteriorated at home ?

हिंदुस्थानातील घडामोडींनी आमचें राष्ट्रीय शील भ्रष्ट होत असून आमच्या स्वातंत्र्यप्रेमाचीही प्रकृति बिघडत चालली आहे. त्या देशात अत्याचारी राज्यकर्त्यांची आणि खाटकाची भूमिका स्वीकारल्यानंतर आपली स्वदेशातील नीति अविकृत कशी राहील ?

राजा कालस्य कारणम्

रिचर्ड कॉब्डेन यांनी व्यक्त केलेली वरील भीति खरी असल्याचा अनुभव १८७७ पासून नित्यच यावयाला लागला. राणी सम्राज्ञी बनल्याने तोपर्यंत तत्त्वतः संधींच्या अटींप्रमाणे राणीचे समान योग्यतेचे स्नेही असलेले संस्थानिक, एका क्षणात सम्राज्ञीचे तुच्छ सरदार बनले. त्याच वेळी भारतातील न्यायालयेंही राजप्रतिनिधींचीं अंकित झालीं. सर जॉर्ज कॅंबेल यांच्यासारख्या एका निवृत्त दुय्यम राज्यपालाने पुढे एकदा पार्लमेंटात असें उद्दाम विधान केलें की इतःपर भारतातील राजप्रतिनिधींना मोगल सम्राटासारखाच मान मिळाला पाहिजे. याप्रमाणे इंग्रज राज्यकर्त्यांनी साम्राज्यवादाचा आसुरी आणि अत्याचारी पुरस्कार आरंभिल्यामुळेच की काय कोण जाणे, १८७६ आणि १८७७ या वर्षी भारतात आणि विशेषतः दक्षिण भारतात अति भयानक दुष्काळ पडून

पन्नास लक्षांहून अधिक लोक मृत्युमुखी पडले. या दुष्काळाच्या दिवसांत माझी आजी (आईची आई) अगदी लहान होती आणि कर्नाटकात ज्वारी न पिकल्याने तेव्हा तिला नित्य पोळी अथवा सांजा खावयाला मिळत असे. हें पाहून तिने आपली मनीषा व्यक्त केली : 'असाच नेहमी दुष्काळ असावा, म्हणजे नेहमी पोळीसांजा खावयाला मिळेल.' कालांतराने कां होईना, पण दुसऱ्या महायुद्धापासून देशात दुष्काळ नित्याचाच झाला असून आपल्याला नित्य अमेरिकन गव्हाची पोळी खावयाला मिळते !

असो. १८७६ च्या मे मासांत राणीला सम्राज्ञी बनविण्याची सूचना डिझराएलीने पार्लमेंटात मांडली, तेव्हा इंग्लंडला भारतात अत्यंत हितावह ठरलेली वाण्याची भूमिका टाकून अचानक रावणाची भूमिका स्वीकारण्याच्या सूचनेला ग्लॅड्स्टन यांच्या उदारमतवादी पक्षाने कसून विरोध केला. पण इंग्लंडच्या राज्याचें रावणी साम्राज्यात जें रूपांतर होऊ घातलें होतें, तें त्यांना थांबविता आलें नाही. राणी सम्राज्ञी बनल्यानंतर रिचर्ड कॉब्डेन यांनी व्यक्त केलेल्या भीतीप्रमाणे तोपर्यंत उदारमतवादाचें केंद्र असलेल्या लँकेशायरचें लंका शहरात रूपांतर होऊन तेव्हापासून भारताच्या आर्थिक शोषणात अग्रेसर बनलेल्या आधुनिक लंकाशहराशीच पराधीन भारताला आपल्या आर्थिक स्वातंत्र्याप्रीत्यर्थ निकराने झुंज द्यावी लागली. तत्पूर्वी लॉर्ड नॉर्थब्रुकसारख्या राजप्रतिनिधींनी भारतसचिवांना लिहिण्याचें धाडस केलें होतें :

The duty of the Government of India is to govern India for the best interests of the people of India and not for the interests of the Manchester Manufacturers.

पण त्या वेळी 'India must be bled' म्हणजे हिंदुस्थानाचें रक्तशोषण अखंड चालू राहिलें पाहिजे, असा आग्रह धरणारे लॉर्ड सॅलिस्बरी हेच भारतसचिव असल्याने त्यांनी लॉर्ड नॉर्थब्रुक यांनाच त्यागपत्र द्यावयाला लाविलें. यासाठीच पुढे एका पिढीनंतर या रावणी साम्राज्याचे सुयोग्य राजप्रतिनिधि बनलेल्या लॉर्ड कर्झननी आपल्या त्यागपत्रानंतर पार्लमेंटात बोलून दाखविलें होतें.

India's fiscal policy was not settled at Calcutta but at Manchester and it was English interest, not Indian interest, that decided Indian tariffs.

भारताचें आर्थिक धोरण कलकत्त्यात (तेव्हाच्या राजधानीत) ठरत नसून, तें मँचेस्टरमध्ये ठरतें आणि केवळ इंग्लंडच्या हिताला अनुसरून ठरतें.

रावणी साम्राज्याचे दुसरे दुष्परिणाम

भारतात रावणी साम्राज्याची प्रस्थापना झाल्यानंतर भारतीय प्रजेकडून त्याला विरोध होण्याची शक्यता नष्ट करण्याकरिता लॉर्ड लिटन यांनी १८७८ मध्ये सर्व भारतीयांना अनुज्ञेवाचून शस्त्रें बाळगण्याला बंदी केली. त्यापूर्वी १८५७ मध्येही बंडाच्या दिवसांत उद्‌भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीचें निमित्त करून ठिकठिकाणी प्रजेच्या हातून शस्त्रें काढून घेतलीं होतींच. तेव्हा प्रजेचीं शस्त्रें काढून घेण्याच्या नीच कृत्याला विरोध करण्याकरिता माझी जन्मभूमि जें मुधोळ, त्या संस्थानातील हलगली, मंटूर बुदनी, आलगुंडी इत्यादि खेड्यांतील बेरडांनी इंग्रजांच्या विरुद्ध उघड बंड पुकारलें होतें. त्या वेळी त्यांनी इंग्रजांना उत्तर दिलें होतें की, आज तुम्ही आमच्या तरवारी मागता, पण उद्या आमच्या बायका मागाल! खरें म्हणजे बेरड जातीतील स्त्रियांकडे कटाक्ष टाकण्याचा धीर अन्य जातींतील पुरुषांना सहसा होत नाहीच. तरी सुद्धा त्यांच्याकडे परजातींतील पुरुषांची पापदृष्टि जाईल, अशी प्रशंसनीय आशंका बेरड पुरुषांना वाटतेच! त्या वेळी या बेरडांनी इंग्रजांशी केलेल्या लढाईत सरासरी शंभरजण हत आणि आहत झाले. इंग्रजांनी हलगलीला लाविलेल्या आगीत २३ जण होरपळून मेले आणि अटकेत सापडलेल्या २९० लोकांपैकी तेरा जणांना मुधोळात आणि सहा जणांना हलगलीत फाशी दिलें. या फाशी गेलेल्या हुतात्म्यांपैकी जडगा आणि बाला यांचीं नांवें मी लहानपणी ऐकलीं आहेत. कारण त्यांना फाशी दिलेल्या मैदानात आम्ही केव्हा केव्हा खेळत असू. हलगलीचा हणमा पुजारी आणि रामा यांचीं नांवें मोठेपणी त्या बंडाच्या पोवाड्यावरून कळून आलीं. असो. अशा प्रकारें हिंदुस्थान निःशस्त्र आणि निर्वीर्य बनल्यानंतर इंग्लंडच्या गोऱ्या रावणांनी भारतीय नारींवर निःसंकोचपणे हात टाकण्याला प्रारंभ केला, हें सर्वांना सुविदित आहेच. त्या विषयाकडे वळण्यापूर्वी इंग्रज सरकारचें भारतातील साम्राज्य हें भारतातील इंग्रज समाजाचें राज्य बनल्यामुळे त्यांत अंतर्विरोध कसा उत्पन्न झाला आणि त्यामुळे भारतीय प्रजेला राजद्रोहाचे उघड धडे सोदाहरण कसे शिकविले जाऊ लागले, याचा थोडा परिचय करून घेतला पाहिजे.

इंग्रजांवर विजय मिळविण्याचा मार्ग, राजद्रोह

भारतात पूर्व भारत मंडळींचें (ईस्ट इंडिया कंपनीचें) राज्य प्रस्थापित झाल्यानंतर इंग्लंडचे प्रसिद्ध ऐतिहासिक लेखक थॉमस बॅबिंग्टन मेकॉले यांनी भारताची पहिली शिक्षासंहिता अथवा शासनसंहिता

(इंडियन पीनल कोड) रचली, तेव्हा त्या ग्रंथात राजद्रोहाला शिक्षा सांगितली नव्हती. या संहितेत पुढे समाविष्ट झालेला राजद्रोहाचा परिच्छेद त्यांनी लिहिला होता. पण त्याला त्या वेळी शासनसंहितेत स्थान मिळालें नव्हतें. कदाचित् तत्कालीन इंग्रज शासकांना काही सदसद्विवेकबुद्धि असल्याचा हा एक पुरावा होऊ शकेल. कारण अशी कल्पना मनात येते की, हा राजद्रोहाचा परिच्छेद कोणत्या अधिकाराने आपल्याला भारतीय प्रजेला लाविता येईल, तसेंच कोणत्या प्रदेशाला लाविता येईल अथवा लाविता येणार नाही, यांविषयी तेव्हा इंग्रज शासकांतच मतभेद उद्भवले असावेत. तेव्हा दिल्लीच्या सम्राटांचें नांवापुरतें कां होईना, भारतात साम्राज्य होतें आणि इंग्रजांची पूर्वभारत मंडळी ही त्यांचा कारभार पहात होती. या सम्राटांचें अधिराज्य नष्ट करण्याचा इंग्रजांचा निश्चय होऊन चुकला होता. अशा परिस्थितीत आपण स्वतः लौकरच भारतीय प्रजेला राजद्रोह करण्याचा धडा आपल्या उदाहरणाने घालून देणार असताना शासनसंहितेत राजद्रोहाला शासन करण्याचा परिच्छेद समाविष्ट करणें हें किती हास्यास्पद होईल, याची जाणीव त्या राजकर्त्यांनाही झाली असेल, अशी कल्पना केल्यास त्या राज्यकर्त्यांवर काही अन्याय होणार नाही, अशी आशा आहे. पण इतकाही चांगुलपणा स्वतःकडे न घेता बेटी बाल्फोर यांनी लॉर्ड लिटनच्या राजवटीवरील ग्रंथात लिहिलें आहे की तो परिच्छेद शासनसंहितेत घालावयाचें अनवधानाने राहून गेलें होतें. असो. पुढे पूर्वभारतमंडळीचा कारभार संपून भारतात राणीचें राज्य चालू झाल्यानंतर त्या भारतीय शासनसंहितेत १८७० मध्ये अनेक बदल आणि सुधारणा केल्या; तेव्हा त्यात राजद्रोहाला शासन सांगणारा १२४ सावा परिच्छेद प्रथम समाविष्ट केला. या निर्बंधात राणीसरकारविरुद्ध अप्रीति उत्पन्न करण्याच्या अपराधाला शासन सांगण्यात आलें असून कोणत्या टीकेने अप्रीति उत्पन्न करण्याचा अपराध होऊ शकत नाही, याचीं अनेक स्पष्टीकरणें दिलीं आहेत. त्यामुळे नामांकित विधिविशारदांचें मत असें झालें होतें की, अप्रीतीच्या प्रचारकावर आरोप सिद्ध होणें हें केवळ न्यायाधीशांची अनुकूलता आणि प्रतिकूलता यांच्यावरच अवलंबून राहील. १८७० मध्ये भारतातील वरिष्ठ न्यायालयातील न्यायाधीश हे तत्त्वतः राजप्रतिनिधींचे अंकित नसून स्वतंत्र होते. पुढे राणी सम्राज्ञी झाल्यानंतर हे न्यायाधीश राजप्रतिनिधींच्या अधिकाराखाली आले. राजद्रोहाच्या परिच्छेदाची कुऱ्हाड शासनसंहितेत समाविष्ट झाल्यानंतरही त्या कुऱ्हाडीचा आधात करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांना दिलेला नव्हता. तो स्वतः राजप्रतिनिधींनी स्वतःकडे राखून ठेविला होता. याकरिता १८७२ मध्ये बंगालचे दुय्यम राज्यपाल सर

जॉर्ज कँबेल यांनी काही बंगाली वृत्तपत्रांवर राजद्रोहाचे अभियोग भरण्याची अनुज्ञा मागितली, पण राजप्रतिनिधींनी ती दिली नाही. तेव्हा राजद्रोहाच्या परिच्छेदाचा दुरुपयोग केल्यास हें नवें शस्त्र राज्यकर्त्यांवरच कसें उलटेल, याची कल्पना नसलेल्या काही असंतुष्ट आत्म्यांनी लंडनच्या पालमाल गॅझेटमध्ये आणि अन्य एका पत्रात भारतातील राजद्रोहावर लेख लिहून तेथील वृत्तपत्रांवर कडक नियंत्रण घालण्याचा पुरस्कार केला. भारतीय पत्रें सरकारी अधिकाऱ्यांच्या वधाला उत्तेजन देत असल्याचा त्या लेखांतून आरोप केला होता. या लेखांचा संदर्भ दाखवून भारतसचिव लॉर्ड सॅलिस्बरी यांनी असल्या लेखांसंबंधी उपाययोजना करण्याची राजप्रतिनिधींना सूचना केली. पण त्यांच्या तज्ज्ञांनी शिक्षा होण्याची शाश्वती नसल्याने अभियोग भरू नयेत, असा अभिप्राय दिला. त्यानंतर १८७६ मध्ये आयर्लंडच्या अनुकरणाने वृत्तपत्रांची मुद्रणालयेंच सरकारजमा करण्याची कल्पना पुढे आली. आयर्लंडमध्ये एकवार पत्रकर्त्यांना सूचना देऊन त्यांनी धोरण न बदलल्यास त्यांचीं मुद्रणालयें सरकारजमा करता येत होतीं. मात्र या आज्ञेविरुद्ध त्यांना न्यायालयात आवेदन करता येत असे. पण इथल्या इंग्रज सरकारला न्यायालयांचें वावडें असल्याने लॉर्ड लिटन यांनी देशी भाषांतील वृत्तपत्रांच्या नियंत्रणाचा जो निर्बंध संमत करून घेतला, त्यात न्यायालयांकडे आवेदन करण्याची सवडही ठेविली नव्हती. ते म्हणतात :

This procedure seems to us the most suitable as it precludes the publicity and eclat which would attach to a trial in a court of justice.

या प्रसंगी वृत्तपत्रांवरील नवीन निर्बंधांचें समर्थन करताना लॉर्ड लिटन यांनी राजद्रोहाच्या निमित्ताने पत्रकर्त्यांवर अभियोग भरून ते यशस्वी झाले तरी त्यांच्या योगाने सरकारचा परिणामतः कसा पराजय होईल, याचें जें विवेचन आणि भविष्य केलें आहे, तें इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचें आहे.

We have endeavoured to base our rule in India on justice, uprightness, progressive enlightenment and good government, as these are understood in England, and it is at least a plausible postulate which at first sight appears to be a sound one, that so long as these are the characteristics of our rule, we need fear no disaffection on the part of the masses.

न्याय, प्रामाणिकपणा, प्रागतिक ज्ञानाचा प्रकाश आणि सुराज्य हीं जीं इंग्रजी राज्याचीं आधारभूत तत्त्वें म्हणून लॉर्ड लिटन यांनी

सांगितलीं होतीं, त्यांच्या नेमकें उलट राज्यकर्त्यांचें नेहमीच वर्तन चालत असल्यामुळेच त्यांना राजद्रोह पसरविणाऱ्या पत्रकर्त्यांचीच नव्हे, तर त्या पत्रकर्त्यांना न्यायालयांकडून शिक्षा करविण्याचीही पराकाष्ठेची भीति वाटत होती.

Had the law been certain and the temper of the jury such as would have rendered a conviction secure, still I should not have considered a prosecution desirable. What I desire is to prevent, not to punish seditious appeals. A successful prosecution, even should it in some cases have deterrent effect, would still invest the prosecuted journal with a mischievous notoriety and an artificial importance calculated to give to its seditious teaching the very publicity which in the interest of good government we should desire to prevent. Every such victory would be a virtual defeat.

निर्बंधांचा अर्थ निश्चित आणि पंचांचा निर्णय अनुकूल होण्याची निश्चिति असली तरीही असे अभियोग चालवू नयेत असें माझें मत आहे. वृत्तपत्रांतून राजद्रोहाचा प्रचार करणाऱ्यांना शिक्षा देण्यापेक्षा असल्या वृत्तपत्रांचें अस्तित्वच नष्ट करण्यावर माझा भर आहे. यशस्वी अभियोगानंतर इतर पत्रकारांना दहशत बसेल अशी आरोपीला शिक्षा झाली तरी अपराधी पत्राला कृत्रिम महत्त्व येतें आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने त्या पत्राला असें महत्त्व मिळू देणें धोक्याचें असतें. यासाठी राजद्रोही पत्रकर्त्यांवर अभियोग भरून त्यात विजय मिळविणें हा माझ्या मते सरकारचा सपशेल पराजयच आहे. लॉर्ड लिटन यांचा हा अभिप्राय अतिशय वास्तववादी आहे. कारण भारतीय पत्रकर्त्यांनी इंग्रज राज्यकर्त्यांची कितीही निंदा केली तरी ती निंदा बर्कनी पार्लमेंटकडून संमत करून घेतलेल्या ठरावाच्या मानाने सौम्यच असायची.

Burke carried out a resolution in the House of Commons in 1784 that the Company was found totally corrupted and totally perverted from the purpose of its institution, whether political or commercial and that the powers of war and peace, given by the Charters, had been abused by kindling hostilities in every quarter for the purpose of rapine, and all the treaties of peace they have made have only given cause to so many breaches of public faith; countries, once the most flourishing, are reduced to a stage of indigence, decay and depopulation, to the deminution of our strength and to the infinite dishonour of our national character.

सन १७८४ मध्ये एडमंड बर्क यांनी इंग्लंडच्या लोकसभेतून असा ठराव संमत करून घेतला की पूर्वभारत मंडळीला युद्ध आणि संधि करण्याचा जो अधिकार दिला त्याचा उपयोग तिने लुटालुटीसाठी युद्धें करणें आणि वचनभंगासाठी संधि करणें यांच्यासाठीच केला आहे. एके काळी अतिशय भरभराटलेले देश या मंडळींच्या कारभारामुळे भिकेला लागून ओसाड पडत आहेत. त्यामुळे आपलें सामर्थ्य क्षीण होत असून आपली दुष्कीर्ति मात्र मोठ्या प्रमाणावर वृद्धिंगत होत आहे.

ब्रिटिश राज्याची क्षणभंगुरता

भारतातील ब्रिटिश राज्याला नीतीचा आणि प्रीतीचा अगदीच आधार नसल्याने तें क्षणभंगुर असल्याची जाणीव टिळकांसारख्या वेदान्ती विद्वानांनाच नव्हे तर लॉर्ड मिंटोसारख्या व्यवहार जाणणाऱ्या राजप्रतिनिधींनाही समजून चुकली होती. मोर्लेमिंटोंच्या भारताचे इतिहासलेखक डॉ. दास लिहितात :

The Englishmen could not get into closer contact with the people they live among and therefore could not develop necessary sympathies. The impermanence of the British population was responsible for this. It was a transient population which looked ultimately to home and its permanent interests and affections were not in India. Improved communications daily lured more people to run away home on leave, consequently decreasing the permanency of English establishments in India.pa (ge 26)

इंग्रज लोक स्थानिक लोकांशी समरस होऊ शकत नव्हते, त्यामुळे त्यांना त्यांच्याविषयी सहानुभूति वाटत नव्हती. भारत हा ब्रिटिश कुटुंबांचा स्थायी निवास नव्हता. त्यामुळे कौटुंबिक दृष्ट्या त्यांचे स्थायी हितसंबंध भारतात नसून इंग्लंडातच होते. म्हणून वाहतुकीचीं साधनें सुकर झाल्यापासून सुट्टी घेऊन घरी जाण्याची प्रवृत्ति वाढत जाऊन इंग्रजांचें भारतातील वास्तव्य अधिकच अस्थिर झालें. राज्यकर्त्यांच्या वंशाचीं मुळें जिंकलेल्या देशात खोलवर गेलीं नसल्यास त्यांचें राज्य सहज उलथून पाडता येतें, असा संस्कृत राजनीतिविदांचा सिद्धान्त आहे. यासाठी भारतीय प्रजेने एकदा स्वातंत्र्यप्राप्तीचा संकल्प केला म्हणजे तिला स्वातंत्र्यप्राप्तीपासून परावृत्त करण्याला इंग्रज लोक अगदी असमर्थ होते. म्हणूनच स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे, हा मंत्र टिळकांनी भारतीय जनतेला दिला. ब्रिटिशांच्या भारतातील क्षणभंगुर जीवनाचें वर्णन करताना लॉर्ड मिंटोंनी लिहिलें आहे :

We all feel, we are mere sojourners in the land, that we are only camping and on the march. Every one was looking for-ward to a well earned rest at home at last. Minto had never seen such a shifting society as that in India. Englishmen were con-stantly coming and going. It was very different from life else-where. (page 51)

आम्ही या कर्मभूमीत केवळ प्रवासी म्हणून वावरतो आहोत, आणि अखंड प्रवासात ठिकठिकाणी तंबू ठोकून तात्पुरता निवास करीत आहोत, अशीच इथे मनाची भावना होते. हिंदुस्थानातल्याइतका अस्थिर राज्यकर्ता वर्ग लॉर्ड मिटोंनी अन्यत्र कोठेच पाहिला नव्हता. रंगभूमीवरील पात्रांप्रमाणे इंग्रज लोक या देशात सारखे येत होते आणि जात होते, आणि असलें अस्थिर, अरूढमूल राज्य चिरस्थायी मानून त्याच्याविषयी राजनिष्ठा बाळगण्याचा उपदेश गोखलेपक्ष जनतेला करीत होता! असो. आपल्या दौर्बल्याच्या जाणिवेमुळे इंग्रजांनी भार-तीय प्रजेला सर्वस्वी दुर्बल, पंगु, व परावलंबी बनविलें. त्यामुळे आपल्या समाजात संकटप्रसंगी आत्मसंरक्षण करण्याचीसुद्धा शक्ति उरली नव्हती. मग इंग्रजांच्या अत्याचारांचा प्रतिकार करण्याची अथवा आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची कल्पनाही बहुसंख्य भारतीयांना कावरेबावरे करीत होती, यात नवल काय ? तरीसुद्धा पुण्याच्या 'कष्टविलासिनी'ने लॉर्ड लिटन यांच्या अधिकारकाळातच पुढील अभिप्राय व्यक्त केला होता. 'इंग्लिश राज्यकर्ते हे लुच्च्या पांथस्थाप्रमाणे आहेत. प्रेमळपणाने कोणी यांचें आदरातिथ्य केलें आणि थोडा वेळ आश्रय घेण्याला अनुज्ञा दिली, तर अल्पावधीतच या पांथस्थांची घरधन्यालाच घरातून घालवून देण्याची सिद्धता होते. परंतु सर्वांनी एकजूट केल्यास या भुरट्याला हाकून देणें काही फारसें कठीण नाही. सर्व जनतेने कटिबद्ध होऊन आपल्या देशाचें वैभव वाढविण्याचे उपाय शोधून काढले पाहिजेत.'

✦ ✦ ✦

प्रकरण दुसरें

दास्यविमोचनाच्या प्रयत्नांना प्रारंभ

गोऱ्या लोकांनी दिलेले राजद्रोहाचे धडे

राणीला सम्राज्ञी बनविण्याची कल्पना १८७६ मध्ये पुढे आली, तेव्हा लॉर्ड सॅलिस्बरी यांच्यासारख्या दूरदर्शी पुराणमतवादी नेत्यांनीही तिला विरोध दर्शविला होता. त्या वेळचे भारतसचिवांचे कार्यवाह मि. मॅलेट यांनी 'अकारण करू घातलेली घोडचूक (One of the most gratuitous of blunders) असें तिचें वर्णन केलें होतें. पण पुढे लॉर्ड सॅलिस्बरी यांनी आपली अशी समजूत करून घेतली की, भारतातील ब्रिटिश राज्याला एक काळा आणि एक गोरा असे दोन पाय असणें इष्ट आहे; म्हणजे काळ्या पायाने बंड केलें तर तें गोऱ्या पायाच्या विरोधामुळे फसेल आणि गोऱ्या पायाने बंड केलें तर तें काळ्या पायाच्या अडथळ्यामुळे अयशस्वी होईल. यांपैकी गोऱ्या लोकांच्या बंडाचीच लॉर्ड सॅलिस्बरींना खरी भीति वाटत होती. पण ती भीति इलबर्ट विधेयकाच्या विरुद्ध गोऱ्या लोकांनी केलेल्या आंदोलनाच्या दिवसांत तात्पुरती खरी भासली तरी ती एकंदरीने निरर्थक ठरली. उलट स्फिंक्सच्या सुप्रसिद्ध कोड्यात वर्णिल्याप्रमाणे वृद्धावस्थेत तीन पायांवर चालणाऱ्या प्राण्यांप्रमाणे भारतातील ब्रिटिश साम्राज्य हिंदु, मुसलमान आणि इंग्रज अशा तीन पायांवर लडबडत चालू लागलें आणि त्यांतील अंत्य दोन पायांनी पहिला पाय तोडण्याचीं कारस्थानें चालविलीं. मात्र इथे हेंही मान्य केलें पाहिजे की, हिंदुसमाजातील प्रकट आंदोलनांच्या नेत्यांना राजद्रोहाचा प्रचार करण्याचे उघड आणि उत्कृष्ट धडे इलबर्ट विधेयकाविरुद्ध उच्छृंखल आंदोलन करणाऱ्या गोऱ्या लोकांनीच प्रथम दिले. या ठिकाणी टिळक आणि कार्सन यांच्या झटापटीतील एका प्रसंगाचें स्मरण होतें. सर एडवर्ड कार्सन हे न्यायालयात टिळकांना त्यांच्या लेखांचे उतारे वाचून दाखवून विचारीत 'Is this not sediton ?' तेव्हा टिळक संथपणे उत्तर देत 'हा राजद्रोह नव्हे. ही केवळ न्याय्य टीका आहे.' शेवटी सर एडवर्ड यांनी चिडून विचारलें, 'Then what is sedition in your opinion ?' तुमच्या मताप्रमाणे राजद्रोह कशाला म्हणतात ? याचें टिळकांनी उत्तर दिलें

'Your speeches on the Irish Home Rule Bill,' आयर्लंडला स्वराज्य देण्याच्या विधेयकावरील आपलींच भाषणें.

गोऱ्या लोकांना भारतीयांच्या वधाचा अधिकार

इलबर्ट विधेयकाविरुद्ध गोऱ्या लोकांनी इतकें तीव्र आंदोलन करण्याचें कारण हें होतें की, त्यांनी केलेल्या अपराधाची चौकशी करून न्याय देण्याचा अधिकार त्या विधेयकाने भारतीय न्यायाधीशांनाही मिळणार होता. त्यामुळे गोऱ्या लोकांना तेव्हा भारतीयांचा वध करून निर्दोषी सुटण्याचा जो अनधिकृत अधिकार लाभला होता, त्याच्यावर गंडांतर येत होतें. वस्तुस्थिति अशी होती की, तेव्हा भारतात राज्यकर्ते थापा मारीत त्याप्रमाणे न्याय आणि दया यांचें राज्य नसून गोऱ्या-लोकांच्या हातांतील बंदुकीचें राज्य निःशस्त्र काळ्या लोकांवर चालत होतें. आणि या बंदूकधारी गोऱ्या लोकांवर आपल्या न्यायाचें राज्य स्थापण्यात, तसेंच निःशस्त्र भारतीयांचा वध करणें हा महान् अपराध असल्याचें तत्त्व त्या वध करण्याला चटावलेल्या गोऱ्या समाजाच्या गळी उतरविण्यात इंग्रज सरकारला सपशेल अपयश आलें होतें. गोऱ्यांनी लाथा मारून एखाद्या भारतीयाचा प्राण घेतला तर त्याची प्लीहा भलतीच सुजलेली होती, असें ठरे; आणि त्यांनी गोळ्या झाडून एखाद्याचा प्राण घेतला तर त्यांना तो आस्वल, काळवीट, वानर यांपैकी कोणी तरी असल्याचा भास होऊन तो मारला गेला, असें सिद्ध होई. असल्या अपराधासंबंधी सैन्यातील अधिकाऱ्यांचें मत काय होतें, हें लॉर्ड कर्झन यांनीच एका पत्रात लिहून ठेविलें आहे.

They cannot see why the poor soldier should not be allowed to go out and shoot and harry at his sweet will, and if, in the course of the excursion, a native is killed, their attitude was why did the damned fool get his head in the way?

म्हणजे छावणीत कोंडलेल्या दुःखीकष्टी सैनिकांना इतस्ततः भ्रमण करून मनसोक्त गोळीबार करण्याला बंदी कां करावी, हेंच त्यांना कळत नव्हतें. त्यांच्या गोळीबाराने एखाद्या भारतीयाला यमसदन दाखविलें तर त्या गधड्याने गोळीच्या वाटेत कां यावें, असेंच त्यांचें म्हणणें असे. लॉर्ड अँप्टहिल हे तात्पुरते राजप्रतिनिधि असताना त्यांच्या निकटच्या अधिकाऱ्याने एका हमालाला लाथा मारून त्याचा प्राण घेतला. तेव्हा न्यायालयात असें ठरलें की, त्याने लाथा मारल्या नसून नुसतें पायाने ढकललें आणि त्या हमालाची पांथरी भलतीच सुजली असल्याने खाली पडताच ती फुटून तो मरून गेला. यासाठी त्याला दिल्लीच्या

न्यायालयात शंभर रुपये दंड झाला. याहून अधिक न्याय भारतीयांना मिळाला असता तर त्यांना त्याचें अजीर्णच झालें असतें! गोऱ्या लोकांच्या अंगी हा जो उन्मत्तपणा संचारला होता, तो केवळ तरवारीच्या बळावर आपण भारतीयांना जिंकल्याचा त्यांना जो भ्रम झाला होता, त्यामुळे संचारला होता. स्वत: लॉर्ड कर्झननीही एकवार उद्गार काढले होते :

Let no man admit the craven fear that those who have won India, cannot hold it.

ज्यांनी हिंदुस्थान जिंकला, त्यांना तो राखता येणार नाही, ही भेकड भावना मनातसुद्धा येऊ देऊ नका. पण इंग्रजांनी हिंदुस्थान जिंकला होता, तो केवळ कपटाच्या बळावर. त्यामुळे त्यांना आपल्या राज्याची शाश्वती वाटत नव्हती. इंग्रजांनी आपल्या सामर्थ्याने जर हा देश जिंकला असता, तर त्यांना येथील प्रजेविषयी करुणा वाटली असती, तिची दया आली असती. ज्या हातांनी आपण भारतीयांना जिंकलें, त्याच हातांनी इत:पर त्यांचें संरक्षण करणें हें आपलें परमकर्तव्य असल्याची उदात्त भावना त्यांच्या अंत:करणात जागी झाली असती. पण त्या कपटी वाण्यांच्या अंत:करणात असल्या उदात्त भावनांना वावच नसल्याने निर्माण झालेली पोकळी उन्मत्तपणानेच त्यांना भरून काढावी लागत होती. इंग्रजी राज्यातील या गोऱ्या लोकांच्या अराजकाचा प्रतिकार करण्याचें धैर्य स्वदेशबांधवांच्या अंत:करणात उत्पन्न करणें, हें प्रजेच्या पुढाऱ्यांचें पहिलें कर्तव्य होतें. असें धैर्य केवळ स्वाभिमानाने उत्पन्न होऊ शकतें. यासाठी टिळकांनी स्वदेशबांधवांना स्वाभिमानाचें शिक्षण देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्याच्या उलट त्यांचे प्रतिपक्षी गोखले हे त्यांना स्वाभिमानदमनाचें शिक्षण देण्यात दंग झाले होते, असें फाटकांच्या गोखले चरित्रावरून समजतें. (परक्यांच्या राजवटीत अटळ असलेले अपमानाचे प्रसंग देशाच्या हिताला आवश्यक आहेत, अशा जाणिवेने सहन करण्याला समर्थ होऊ. स्वाभिमानाचें दमन हा एक स्वार्थत्यागच आहे. – पान ३८९) टिळकांचें हें शिक्षण सरकारला किती खुपत होतें याचा पुरावा, १८९७ मधील राजद्रोहाच्या अभियोगात १४-६-१८९२ च्या 'केसरी'तील पाच वर्षांपूर्वीचीं स्फुटेंही सरकारने पुराव्याकरिता पुढे आणलीं होतीं, यावरून उपलब्ध होतो. त्या वेळी साताऱ्यातील मि. फागन नामक वनाधिकाऱ्यांनी एका धनगरणीला गोळी घालून तिचीच शिकार केल्याचें प्रकरण उद्भवलें होतें. तेव्हा टिळकांनी लिहिलें होतें की, असल्या अत्याचाराप्रीत्यर्थ गोऱ्या बाळांना काहीच शिक्षा भोगावी लागत नाही, असा अनुभव येऊ लागल्यास लौकरच साऱ्या काळ्या

अस्वलांना संसारातून उठून आकाशातील बृहद्‌ऋक्षाच्या भेटीला जावें लागेल. या प्रकरणी जो न्याय झाला आहे, तो लॉर्ड हॅरिस यांच्या लौकिकाला साजेसाच आहे. असलीं प्रकरणें तेव्हा प्रतिवर्षी शेकड्यांनी घडत आणि त्यांनी स्वाभिमानाचें दमन करणाऱ्या पक्षाव्यतिरिक्त इतर सर्व भारतीयांचीं अंतःकरणें पराकाष्ठेचीं प्रक्षुब्ध होत.

भारतीय स्त्रियांवरील बलात्कार

मि. फागन यांच्या गोळीला बळी गेलेली धनगरीण त्यांतल्या त्यात अधिक सुदैवी असेंच तत्कालीन परिस्थितीचा विचार करताना म्हणावें लागतें. कारण तिच्याहून अधिक दुर्दैवी स्त्रियांवर गोऱ्या लोकांच्या अग्न्यस्त्रांपेक्षा अधिक भयानक अशा त्यांच्या कामवन्हीला बळी जाण्याची पाळी येत असे. ही आपदा अर्थात् त्यांच्या छावण्यांच्या परिसरात राहणाऱ्या स्त्रियांवर वारंवार येत असे. साताऱ्याच्या डॉ. आठल्यांनी आपल्या आत्मवृत्तात लिहिलें आहे :

"आमच्या नगराजवळ गोऱ्या सैनिकांची छावणी असल्यामुळे त्यांच्या पशुतुल्य आचरणाच्या अनेक कहाण्या नित्य कानांवर येत असत. ओढ्यावर एकटी दुकटी बाई कपडे धुण्याला गेली की तिच्यावर या गोऱ्या सैनिकांची आपत्ति ओढवत असे. असाच प्रसंग एकदा काही बायकांवर ओढवला असताना पाऊस कोसळला, दिसेनासें झालें आणि बायकांना पळता भुई थोडी झाली; पण त्या नराधमांपासून त्यांनी आपल्या शीलाचें संरक्षण करून घेतलें. गोऱ्या सैनिकांच्या अत्याचारांमुळे नगरचें वातावरण नेहमीच प्रक्षुब्ध असे." (पान ११) असाच अनुभव इतर साऱ्या छावण्यांच्या परिसरात राहणाऱ्या लोकांना येत असे. कामाग्नीने तप्त झालेले हे गोरे सैनिक पुष्कळदा तदनुषंगिक फिरंग रोगानेही ग्रासलेले असत. त्यामुळे त्यांच्या अत्याचारांना बळी जाणाऱ्या स्त्रिया केवळ शीलभ्रष्टच नव्हेत तर आरोग्यभ्रष्टही होत असत. गेल्या शतकात गरमीपरम्यासारख्या सांसर्गिक रोगांवरील परिणामकारक उपचार पाश्चात्य वैद्यकाला अविदित असल्यामुळे या रोगांनी पछाडलेल्या रोग्यांचें जीवन दुर्धर होत असे. हा फिरंग रोग फिरंगी सैनिकांत इतका मोठ्या प्रमाणावर पसरला होता की भारतातील गोऱ्या सैनिकांपैकी दोन पंचमांश सैनिक या रोगावर उपचार करून घेण्याकरिता सांसर्गिक रोग्यांच्या रुग्णालयातून पडलेले असत. हें विधान कोणाला अतिशयोक्तीचें वाटत असल्यास त्यांनी अहलुवालियांच्या ग्रंथातील परिशिष्टांत दिलेले आकडे पहावेत. त्यांच्या मानाने भारतीय सैनिकांत हा रोग अगदीच अल्प प्रमाणात प्रादुर्भूत झाला होता. गोऱ्या सैनिकांतील शेकडा चाळीसजण

या रोगाने पीडलेले असले तर भारतीय सैनिकांपैकी शेकडा चारच कामरोगांनी ग्रस्त झालेले असत. हे भारतीय सैनिक अगदीच निर्बुद्ध वर्गांतून निवडून घेतलेले नसते तर त्यांच्या लगेच लक्षात आलें असतें की भारतीय गणिकांनी दोन पंचमांश गोरे सैनिक निकामी केल्यानंतर उरलेल्या तीन पंचमांश गोऱ्या सैनिकांचा काटा काढणें भारतीय पुरुषांना जमत नसल्यास त्यांच्यासारखे निर्बुद्ध आणि निकामी तेच! भारतीय स्त्रियांवर हात टाकण्याच्या अपराधानिमित्त गोऱ्या सैनिकांना स्मरणात राहील असें शासन झाल्याचें एकच उदाहरण मला आठवतें. तें म्हणजे पूर्वीच्या मध्यप्रांतातले गृहसचिव डॉ. राघवेंद्रराव यांनी जबलपूरसन्निध गोऱ्या सैनिकांनी स्त्रियांवर केलेल्या अत्याचारांचें त्यांना प्रायश्चित्त देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आणि त्यात ते यशस्वी झाले. इंग्रजी राज्यात भारतीयांवर अत्याचार करणाऱ्या गोऱ्यांना सहसा शिक्षा होत नसत, ही गोष्ट इतकी कुप्रसिद्ध होती की राजद्रोहाच्या निमित्ताने खटला भरून टिळकांना आणि इतर पत्रकर्त्यांना कठोर शिक्षा ठोठावल्यानंतर लॉर्ड मिंटोंना तेव्हाचे भारतसचिव लॉर्ड मोर्ले यांनी सरळ प्रश्न विचारला :

The Secretary of State inquired if similar sentences were given to Englishmen who committed violence against the Indians. Were the Englishmen always put on trial? If we are not strong enough to prevent murder, then our glorification of the stern justice of the British Raj is windy nonsense.

भारतीयांवर अत्याचार करणाऱ्या गोऱ्या लोकांना अशा शिक्षा होतात का? अशा सर्व गोऱ्यांना न्यायासनापुढे उभें तरी राहावें लागतें का? त्यांच्यापैकी कोणाला मनुष्यवधाबद्दल फाशी दिलें आहे का? गोऱ्यांकडून होणारे भारतीयांचे वध आपण थांबवू शकत नसलो तर ब्रिटिश राज्यातील निष्पक्षपाती न्यायाचें गुणगान बंद करा. या प्रसंगी राजद्रोही भारतीय पत्रकार आणि राजनिष्ठ गोरे लोक यांच्यातील महदंतराकडे बोट दाखवून लॉर्ड मिंटोंनी आत्मसमर्थन केलें होतें. पण गोऱ्या लोकांच्या अत्याचारी कृत्यांपासूनच भारतात राजद्रोही विचारांचा प्रसार होत होता, इकडे त्यांनी सोयीस्कर रीतीने दुर्लक्ष केलें. दुर्बल राष्ट्राने बलिष्ठ राष्ट्राचें संरक्षण स्वीकारलें, म्हणजे त्याच्याविषयी त्याला राजनिष्ठाही स्वीकारावी लागते. पण इंग्रजांच्या अत्याचारांपासून भारतीयांना संरक्षण मिळेनासें झाल्यानंतर त्यांच्याशी राजनिष्ठ राहण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. प्रजेच्या सहनशीलतेवरच

लवात्कार होऊ लागला म्हणजे त्या सहनशीलतेचें क्रोधाच्या वणव्यात रूपांतर होतें.

साम्राज्यसत्ता चालविण्याची अपात्रता

वरील सर्व विवेचनावरून भारतात साम्राज्यसत्ता चालविण्याला इंग्रज समाज किती अपात्र होता, याची वाचकांना कल्पना आलीच असेल. या अपात्रतेचें प्रमुख कारण म्हणजे एकोणिसाव्या शतकात स्वदेशातील राजसत्ता लोपवून तिच्या ठिकाणी लोकसत्तेची स्थापना करण्यात इंग्रज लोक बहुतांशी यशस्वी झाले होते, हेंच होय. एखादें साम्राज्य यशस्वी रीतीनें चालवावयाचें झाल्यास प्रथम परदेशातील प्रजेला आपल्या सैन्याच्या सामर्थ्यानें जिंकलें पाहिजे आणि नंतर त्या प्रजेला न्याय देण्याकरिता स्वदेशातील प्रजेला जिंकून त्या स्वजातीय प्रजेकडून परदेशातील प्रजेवर अन्याय, अत्याचार होऊ नयेत, अशी व्यवस्था केली पाहिजे. *Power* या ग्रंथात फ्रेंच ग्रंथकार बेत्रांद द जूव्हेनेल् यांनी म्हटलें आहे :

The monarchy owes its existence to a twofold triumph, a military one of conquerors over subjects and a political one of the king over the conquerors.

हिंदुस्थानात साम्राज्याची स्थापना झाल्यानंतर इंग्रज समाजा-कडून भारतीय प्रजेवर होणारे अन्याय आणि अत्याचार तत्काळ थांब-विले पाहिजेत, याची जाणीव लॉर्ड रिपन यांना होती. याकरिताच त्यांनी इलबर्टविधेयक संमत करून घेऊन भारतीय प्रजेवरील इंग्रजांच्या अत्याचारांना पायबंद लावण्याचा प्रयत्न केला. पण तो प्रयत्न सपशेल फसला. शेवटपर्यंत भारतातील सम्राटांच्या प्रतिनिधींना येथील इंग्रज आणि आंग्लहिंदुसमाजावर विजय मिळवून आपल्या साम्राज्याला न्यायाचें अधिष्ठान मिळवून देता आलें नाही. यामुळेच त्या काळी लाल, बाल, पाल यांना स्वातंत्र्यसंपादनासाठी देशातील इंग्रज समाजा-विरुद्ध शस्त्र उचलावें लागलें.

बिपिनचंद्र पालांच्या प्रतिज्ञा

प्रजापीडनसंतापापासून समुद्भूत होणाऱ्या हुताशनाच्या वणव्यात नवजात ब्रिटिश साम्राज्या चीआहुति पडू नये, याकरिता १८७८ मध्ये लॉर्ड लिटन यांनी भारतीय प्रजेला विशेष अनुज्ञेवाचून शस्त्रें वापर-ण्याला बंदी केली. या निर्बंधामुळे नव्यानेच संघटित होऊ घातलेल्या सशस्त्र राष्ट्रवाद्यांच्या समित्यांच्या नरडीला नखच लावलें गेलें. महा-

राष्ट्रात तत्पूर्वी वासुदेव बळवंतांची क्रांतिकारक समिति पुण्यातील तरुणांना सैनिकी शिक्षण देऊलागली होती. पण बंगाल्यात या वेळी लाल, बाल, पाल या त्रयीपैकी विपिनचंद्र पाल यांनी शिवनाथशास्त्री यांच्या नेतृत्वाखाली साधारण ब्राह्म समाजाचेंच एका शस्त्रधारी तरुणांच्या संघटनेत परिवर्तन करण्याचा प्रयत्न चालविला होता. यांच्या पंथाच्या मूलतत्त्वांतच प्रत्येक सभासदाने शस्त्रसज्ज असलेंच पाहिजे, असा निर्बंध समाविष्ट केला होता. विपिनचंद्र पाल यांचा हा प्रयत्न यशस्वी होऊन ब्राह्मसमाज शस्त्रधारी बनला असता तर शिवनाथशास्त्री हे त्या पंथाचे गुरु गोविंदसिंगच ठरले असते आणि बंगालच्या इतिहासाला वेगळेंच वळण लागलें असतें. पण इतर देशाप्रमाणे शिवनाथशास्त्री यांच्या अनुयायांनीही लॉर्ड लिटन यांच्या शस्त्रनिर्बंधापुढे निमूटपणे मान तुकविल्यामुळे ती शक्यता मुळातच नष्ट झाली. तरी सुद्धा या समाजाच्या तत्त्वप्रणालीचा आपल्याला अल्प परिचय करून घेणें आवश्यक आहे. या समाजाचें पहिलें तत्त्व मूर्तिपूजा आणि जातिभेद यांच्याविरुद्ध युद्ध करणें हें असून दुसरें तत्त्व हें होतें की, स्वराज्य ही एकच राज्यपद्धति देवमान्य असल्याने परराज्याचें दास्य आम्ही कधीही पतकरणार नाही. पोथीनिष्ठा आणि भटनिष्ठा यांमुळे आपण स्वराज्याला अपात्र बनलो असल्याने त्यांचा नायनाट करून समाजात समता स्थापणें हें आमचें ध्येय आहे. हें ध्येय साधण्याचें साधन शिक्षण असल्याने 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः' या सर्वांना शिक्षण देण्यासाठी आम्ही झटू, पडदापद्धति बंद करू आणि विधवांचे कष्ट दूर करू. या समाजाचें शेवटचें तत्त्व सर्वांत महत्त्वाचें होतें. जें राष्ट्र स्वधर्माचें आणि स्वराज्याचें स्वतःच्या शस्त्रसामर्थ्याने परक्यांच्या स्वारीपासून आणि स्वदेशातील समाजशत्रूंपासून संरक्षण करू शकत नाही, त्या राष्ट्राला स्वराज्याची मागणी करण्याचा काहीही अधिकार नाही. याकरिता समाजातील प्रत्येक तरुणतरुणीस घोड्यावर बसणें, बंदूक चालविणें इत्यादि आत्मसंरक्षणाच्या विद्या आल्याच पाहिजेत. या विद्या शिकणें आणि त्यांचा वेळोवेळी उपयोग करण्याकरिता घरी शस्त्रसंग्रह करणें हें सर्वांत महत्त्वाचें कर्तव्य आहे. वास्तविक पाहता कलकत्त्याच्या ब्राह्मसमाजाने आणि पुणेरी सुधारकांनी तेव्हा स्त्रीस्वातंत्र्याचा जो पुरस्कार आरंभिला होता, त्याला शस्त्रस्वातंत्र्याच्या पुरस्काराची जोड अत्यावश्यक होती. ज्या समाजातील स्त्रीपुरुष पिस्तुलें बाळगू शकतात, त्या समाजातच स्त्रीस्वातंत्र्य या शब्दाला काही तरी अर्थ असतो. नाही तर स्त्रीस्वातंत्र्य याचा अर्थ गृहदेवतांचें संरक्षण करण्याचें दायित्व पुरुषांनी टाळणें एवढाच होतो. हें ज्ञान नसलेल्या साधारण ब्राह्मसमाजाच्या एका प्रमुख सभासदाने म्हणजे मॉडर्न रिव्ह्यूचे

संपादक रामानंद चट्टोपाध्याय यांनी, स्वदेशी चळवळीच्या दिवसांत मुसलमानांनी इंग्रजांच्या चिथावणीवरून जेव्हा हिंदुनारीहरणाचा कार्यक्रम हाती घेतला, तेव्हा लिहिलें होतें की, हिंदु स्त्रियांना शिक्षण आणि स्वातंत्र्य यांचा लाभ झाला असता तर जमालपूरच्या दंग्यात जसें नारीहरण झालें, तसें तें झालें नसतें. पण या सुधारक संपादकांना ही साधी गोष्ट सुचली नाही की, हिंदुस्त्रियांच्या मानाने मुसलमान स्त्रियांमध्ये शिक्षण आणि स्वातंत्र्य अत्यल्प असूनही त्यांचें कधी सामुदायिक रीत्या हरण होत नाही. १९०७ पेक्षा किती तरी अधिक प्रमाणात शिक्षण आणि स्वातंत्र्य यांचा आस्वाद घेत असतानाही १९४६ मधील मुसलमानांच्या प्रत्यक्ष प्रहाराच्या दिवसांत बंगाल-पंजाबातून फार मोठ्या प्रमाणावर हिंदुनारीहरण झालें ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. यावरून कळून येईल की, आधी राजकीय कीं आधी सामाजिक असा बुद्धिभेदमूलक वाद चालवून सुधारकांनी स्त्रीस्वातंत्र्याची जी सुखकारक चळवळ हाती घेतली, ती मुख्यतः देशीविदेशी रावणांच्याच पथ्यावर पडली. असो. या आंग्लो-महंमदी रावणांच्या अत्याचारांना आळा घालण्याकरिताच तेव्हा सरलादेवी घोषाल असलेल्या देवी चौधराणींना हिंदु युवकांना आखाड्याकडे आकृष्ट करण्याचें आंदोलन हाती घ्यावें लागलें. असो. स्वराज्यासंबंधीच्या आपल्या भूमिकेचें विवरण करताना विपिनबावूंनी आत्मचरित्रात लिहिलें आहे :

Self-government was the ideal. But the country was not yet fit for self-government. The main cause of its unfitness was the mechanical pursuit of religion and degrading priestly domination.

म्हणजे स्वराज्य हें ध्येय असलें तरी धर्माचरणातील यांत्रिकता आणि उपाध्यायांचें अवनतीला नेणारें माहात्म्य यांच्यामुळे देश अद्यापि स्वराज्याला अपात्र आहे. जणू काही धर्माचरणातील यांत्रिकता आणि उपाध्यायांचें अवनतिकारक माहात्म्य तेव्हा आणि आताही स्वतंत्र असलेल्या विदेशांतील मुसलमानी राष्ट्रांपेक्षा भारतीय समाजात अधिक होतें ! असल्या विचारविभ्रमापासून चिपळूणकरांच्या कृपेने महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्ष कधीच विमुक्त झाला होता. आपण वैशिष्टयपूर्ण संस्कृतिसंपन्न राष्ट्राचे घटक असल्याने स्वातंत्र्य हा आपला जन्मसिद्ध, स्वयंसिद्ध अधिकार आहे, अशीच पुण्याच्या राष्ट्रीय पक्षाची भूमिका होती. परक्या सरकारची सेवा न करणें, तसेंच शिक्षणाचा आणि सैनिकी शिक्षणाचाही प्रसार करणें हे दोन नियम टिळकांची संस्था आणि बिपिनबाबूंची संस्था यांत समान होते. बिपिनबाबूंच्या संस्थेत सभासदांनी मिळविलेलें सर्व धन संस्थेच्या स्वाधीन करून संस्था देईल

तेवढ्यावर उदरनिर्वाह करणें हेंही सभासदाचें एक कर्तव्य होतें. पण विपिनबाबू सांगतात की या तत्त्वाप्रमाणे कृति करण्याचा आम्ही कधी प्रयत्नही केला नाही. त्यांच्या उलट टिळक-आगरकरप्रभृतींनी केवळ समाईक धनाचाच नव्हे तर सर्व शपथबद्ध सभासदांचें समाईक कुटुंब करण्याचा प्रयोगही काही दिवस केला होता. पण या देवदूतांच्या स्वर्गातून त्यांचें आणि त्यांच्या सहकाऱ्यांचें लवकरच पतन होऊन त्यांना सामान्य मानवांप्रमाणे स्वतंत्र कुटुंबें करावीं लागलीं. बिपिनचंद्रांच्या सहकाऱ्यांनी दारिद्र्याचें व्रत कां स्वीकारलें नाही, याचा उलगडा त्यांच्या आत्मचरित्रातील दुसऱ्या एका उल्लेखावरून सहज होतो. १८८४ मध्ये 'बंगाल पब्लिक ओपिनियन' 'नावाच्या साप्ताहिकात संपादकी करीत असताना त्यांना सत्तर रुपये वेतन मिळत असे. तें वेतन त्यांच्या तीन माणसांच्या संसाराला पुरत नसल्यामुळे इतर पत्रांतून लेखन करून ते आणखी पंचवीस रुपये मिळवीत. याच वेळी टिळक आणि त्यांचे सहकारी मासिक तीस रुपयांच्या वेतनावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असत. यावरून महाराष्ट्रातील मध्यम वर्गाची राहणी नि कलकत्त्यातील भद्रसमाजाची राहणी यांतील प्रभेद वाचकांना कळून येईल. बिपिनचंद्रांच्या आत्मचरित्रातील आणखी एका प्रसंगाची आठवण होते. १८८३ मध्ये सुरेंद्रनाथ बानर्जींना कलकत्त्याच्या वरिष्ठ न्यायालयाची मानहानि केल्याच्या निमित्ताने साठ दिवसांचा बंदिवास भोगावा लागला होता. त्यांच्या अटकेनंतर आणि सुटकेनंतर बंगाल्यातील पहिलीं राजकीय निदर्शनें घडून आलीं असें ते सांगतात. त्याच्या उलट पुण्यात १८७९ मध्ये वासुदेव बळवंतांच्या अभियोगाच्या प्रसंगी पहिलीं राजकीय निदर्शनें घडून आलीं होतीं.

बंगाल्यातील स्वातंत्र्यवादी समित्यांची स्थापना

सन १८७० च्या दशकातच बंगाल्यात स्वातंत्र्यसंपादनाप्रीत्यर्थ प्रतिज्ञा करण्याचा रोमांच अनुभवण्यासाठी गुप्त संस्था स्थापण्याचा उपक्रम झाला. या उपक्रमाचे उद्गाते अरविंद घोषांचे मातामह राजनारायण बसू हे होते. यांच्या संजीवनी या गुप्त संस्थेच्या प्रतिज्ञात सभासदांत ज्योतिरिंद्रनाथ ठाकूर, रवींद्रनाथ ठाकूर, शिवनाथशास्त्री, बिपिनचंद्र पाल, नवगोपाळ मित्र आणि सुरेंद्रनाथ बानर्जी इत्यादि विख्यात व्यक्तींचा समावेश झाला होता. या संस्थेत वेद आणि खड्ग यांच्यावर हात ठेवून स्वातंत्र्यसंपादनाप्रीत्यर्थ प्राण घेण्याची आणि देण्याची भीषण प्रतिज्ञा सभासद करीत असत. रवींद्रनाथांच्या यौवनारंभीच्या काही राजद्रोही कविता, विशेषतः राणीला सम्राज्ञी बनविण्याच्या निमित्ताने लॉर्ड

लिटन यांनी दिल्लीत जें भारतदास्याचें प्रदर्शन भरविलें, त्यावरील मर्मभेदक कविता या समितीत वाचल्या गेल्या. या समितीकडून झालेली महत्त्वाची कामगिरी म्हणजे सुरेंद्रनाथांनी मॅझिनी, गॅरिबाल्डी आणि शीख पंथाचे गुरु यांच्यावर व्याख्यानें देऊन त्यांच्या क्रांतिकारक कार्याचा स्वदेशबांधवांना परिचय करून दिला ही होय. सावरकरांनी पुढे मॅझिनी आणि शीख पंथाचा इतिहास यांवर जे ग्रंथ लिहिले, त्याची प्रेरणा त्यांना सुरेंद्रनाथांच्या या व्याख्यानांपासूनच लाभली होती. सुरेंद्रनाथांनीच १८७६ आणि १८७७ या वर्षी उत्तर दक्षिण हिंदुस्थानात सर्वत्र व्याख्यानें देऊन एक राष्ट्रीय संघटना स्थापण्याच्या कल्पनेचा प्रचार केला आणि नॅशनल कॉन्फरन्स नांवाची संस्था स्थापून तिचीं काही संमेलनेंही त्यांनी भरविलीं. सुरेंद्रनाथांच्या या संस्थेच्या नरडचाला नख लावण्याकरिता ह्यूम महाशयांनी काँग्रेसच्या पूतनामावशीला जन्म दिला, हें रहस्य बिपिनबाबूंनी पूर्वीच उघड केलें आहे. महाराष्ट्रातील राजकीय जागृतीचा प्रारंभ १८७५ च्या सुमारास झाला, असें स्वतः टिळकांनी विष्णुशास्त्र्यांवरील निबंधांत स्पष्ट सांगितलें आहे :

"हिंदु राष्ट्राचें इंग्रजांच्या राज्यापासून हित होत आहे कां अहित होत आहे, लोकांच्या उपजीविकेचीं साधनें उत्तरोत्तर कमी होत आहेत कीं वाढत आहेत, संघशक्तीने काम करण्याची सवय त्यास लागण्याचा कितपत संभव आहे, मनुष्याच्या अंगची कर्तबगारी, बुद्धि किंवा हुषारी दाखविण्यास प्रस्तुत राज्यव्यवस्थेत अवकाश आहे कीं नाही, इत्यादि ज्या गोष्टींचा १८७५ नंतर खल होऊं लागला, त्यांजकडे पूर्वीच्या दोन-तीन पिढ्यांनी फारसें लक्ष दिलेलें दिसत नाही."

या अवतरणातील हिंदुराष्ट्रवादी विचारसरणी हें चिपळूणकर-टिळकपक्षाचें वैशिष्टच होतें आणि "शिवशिव न हिंदुर्न यवनः" या रानडेपंथाला त्यांचा विरोध होता.

राणीच्या घोषणेविरुद्ध सम्राज्ञीची घोषणा

व्हिक्टोरिया राणी सम्राज्ञी बनल्याची घोषणा करताना लॉर्ड लिटन यांनी स्वच्छ शब्दात सांगून टाकलें की, इतःपर भारतातील सर्व महत्त्वाच्या पदांवर केवळ इंग्रजांचीच नेमणूक केली जाईल. अशा प्रकारे राणीच्या घोषणेने प्रत्यक्षात कधीही न दिलेले पण तत्त्वतः देऊ केलेले अधिकार लॉर्ड लिटन यांनी काढून घेतले, याचा कलकत्ता महापालिकेच्या एका सभेत सुरेंद्रनाथ बानर्जींनी निषेध केला. या निमित्ताने गोऱ्या लोकांनी काहूर केलेलें पाहून 'साधारणी' नांवाच्या बंगाली पत्राने पुढील उद्गार काढले होते :

It was declared in 1858 that if the natives of this country proved themselves equal, all appointments, so far as practicable, would be given to them. But now we are told that all high executive offices are to be given to Englishmen only. If these two declarations are not contradictory, then henceforth there will be no difference in colour between black and white. If it amounts to disloyalty to point out this contradiction, and if for this the Government chooses to punish us, then we with tens of millions of Her Majesty's subjects are prepared to be punished with Surendranath.

राजप्रतिनिधींच्या नव्या भाषणाने राणीच्या घोषणेचा भंग झाला असें कोणाला वाटत नसल्यास त्याला उद्या काळा आणि पांढरा या वर्णांतही विरोध दिसणार नाही. हा विरोध दाखवून दिल्याच्या निमित्ताने सुरेंद्रनाथांना अराजनिष्ठ ठरवून शासन केल्यास त्यांच्यासह राणीच्या कोटि कोटि प्रजाजनांनाही शासन करावें लागेल. त्या दिवसांत भारतीय प्रजा अराजनिष्ठ, इंग्रजद्वेषी असल्याचा बोभाटा जगात होऊ देणें इंग्रजांना अनिष्ट असल्याने सरकार राजद्रोहाचे अभियोग सहसा भरीत नसे. त्यामुळे साहसी पत्रकार अनेकदा देशाच्या दुःस्थितीचें यथातथ्य दर्शन वाचकांना घडवीत असत. तेव्हा बंगाली 'समाजदर्पण' नामक पत्राने आपल्या अंतिम अंकांत लिहिलें होतें.

What heart will not be pained to see the spectacle of educated natives crying for want of food, while every month batches of Englishmen, fresh from England are taking possession of all the appointments in the public service? Or what political economy is this that would sanction the retention in the service of highly paid Europeans while famine and destitution raged in the land and people groaned under the burden of taxation? Why should Moulabux be hanged for an offence for which Heaman receives promotion ? That you should despise me as a worthless thing not to be touched, while I should worship you with flowers and sandlewood, is a thing which nature never heard before.

सुशिक्षित भारतीय अन्नासाठी आक्रोश करीत असताना प्रतिमासी तरुण इंग्रजांच्या तुकड्या देशातील साऱ्या महत्त्वाच्या पदांचा ताबा घेत आहेत, हें पाहून कोणाचें हृदय विदीर्ण होणार नाही ? देशात दुष्काळ आणि दारिद्र्य यांनी साम्राज्य स्थापिलें असताना आणि करांच्या ओझ्याखाली जनता चिरडून गेली असताना भरमसाट वेतन घेणाऱ्या युरोपियनांना त्यांच्या पदांवर ठेवून घेण्याला संमति देणारें हें कसलें

अर्थशास्त्र आहे? ज्या अपराधाकरिता मौलाबक्ष फासावर चढतो, त्याच अपराधाचें पारितोषिक म्हणून हीमन महाशयांची बढती होते, याचा अर्थ काय? आपण आम्हांला कवडी किंमतीचे समजून आमचा तिरस्कार करावा, आम्हांला अस्पृश्य मानावें, आणि उलट पक्षी आम्ही तुमची फुलांचंदनांनी पूजा करावी, असला प्रकार निसर्गाला अविदित आहे. १८७८ च्या सुमाराला देशाचें वातावरण किती काळेंकुट्ट झालें होतें, याची असल्या अवतरणांनी यथार्थ कल्पना येते आणि आताच्या स्वराज्यापेक्षा इंग्रजी राज्य चांगलें असें वडबडणाऱ्या लोकांच्या डोळ्यांत अंजन पडतें. यासाठी हा सारा खटाटोप !

लॉर्ड लिटन यांचें गुप्त पत्र

याच दिवसांत राणीच्या नांवाने दिलेलीं सारीं आश्वासनें मोडण्याचा आपला संकल्प तिचे प्रतिनिधि लॉर्ड लिटन यांनी स्वतःच वरिष्ठांना लिहिलेल्या एका पत्रात उघडपणे व्यक्त केला होता.

We all knew that these claims and expectations (about racial and religious equality before the law and in the administration) can never be fulfilled. We have to choose between prohibiting them and creating them and we have chosen the least straightforward course......Both the Governments of India and of England appear to me up to the present moment, unable to answer satisfactorily the charge of having taken every means in their power of breaking to the heart the words of promise which they have uttered to the ear.

याचा सारांश असा की, वांशिक आणि धार्मिक दृष्टीने न्यायालयांत आणि राज्यव्यवस्थेत भारतीयांना इंग्रजांच्या समान योग्यतेने वागविण्याचीं वचनें कधीच पाळलीं जाणार नाहीत, हें आपणा सर्वांना माहीत आहेच. तेव्हा असल्या समान रीतीने वागविण्याच्या अपेक्षांना आणि मागण्यांनाच बंदी घालणें, किंवा पूर्वीचीं वचनें कागदावर राहू देऊन वचनपूर्तीच्या प्रसंगी त्यांची वंचना करणें हे दोनच मार्ग आपल्या पुढे आहेत. या दोन मार्गांतील सर्वांत अप्रामाणिक मार्ग आम्ही स्वीकारिला आहे. आपणच दिलेल्या वचनांचा हृदयभंग करण्याच्या आरोपांना हिंदुस्थान आणि इंग्लंड येथील सरकारांना समाधानकारक उत्तर देता येणार नाही. असो. अशा प्रकारे आपल्या वचनांचा हृदयभंग करणाऱ्या सरकारांवर विश्वास ठेवण्याचा प्रचार रानडे-गोखले पक्ष करीत होता आणि हें पाप करावयाचें टिळकांनी नाकारलें.

रानडयांची कॉंग्रेस जनतेच्या दारिद्रयासंबंधी उदासीन

'महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षाचे पहिले मार्गदर्शक मालाकार चिपळूणकर, वासुदेव बळवंत फडके अथवा त्या उभयतांचे अनुयायी टिळक यांना जनतेच्या दारिद्रयाची जशी जिवंत जाणीव होती, तशी ती रानडयांना आणि त्यांच्या काँग्रेसमधील साथीदारांना मुळीच नव्हती. 'काँग्रेसचा उदय आणि वाढ' या ग्रंथात चार्लस् फ्रीयर अँड्रूज यांच्यासारख्या गांधीभक्तांनी लिहिलें आहे:

At this time the Congress leaders were chiefly concerned with obtaining political favours for their educated classes and rebutting the insult and contempt which was levelled at them by Englishmen, who treated them as racially inferiors. There was extraordinarily little thought of the exploitation which was going on all the while and the ever-increasing misery and poverty of the common people. A special example of this short-sightedness may be seen in the Presidential address of Surendranath Banerjea at Poona in 1895. "I was not aware that any responsible Congressman had ever asked for representative institutions for women or for the masses of our people. We should be satisfied if we obtain representative institutions of modified character for the educated community who by reason of their culture and enlightenment and their assimilation of English ideas, their familiarity with English methods of government might be presumed to be qualified for such a boon."

या अवतरणाने तत्कालीन काँग्रेसवाल्यांच्या भूमिकेवर उत्कृष्ट प्रकाश पडतो. या स्वतःला सुशिक्षित समजणाऱ्या इंग्रजी शिक्षितांचा इंग्रज लोक जसजसा अधिकाधिक उपमर्द करीत, तसतसे ते स्वदेशबांधवांची संगत टाळून आपण काळ्या कातडीचे इंग्रजच असल्याचें सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत. त्यांची सारी चळवळ इंग्रजांचें अनुकरण करणाऱ्या काळ्या लोकांवर सरकारने कृपा करावी, येवढ्यासाठीच चालली होती. इंग्रजांनी भारताचें आर्थिक शोषण कसें चालविलें आहे आणि सामान्य जनतेचें (म्हणजे शेतकऱ्यांचें) दुःख आणि दारिद्रय कसें सारखें वाढत चाललें आहे, याचा ते आश्चर्य वाटण्याइतका अत्यल्प विचार करीत. सुरेंद्रनाथ बानर्जींनी पुण्याच्या काँग्रेसमधील अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात बोलून दाखविलें होतें की आम्ही काही बायकांच्यासाठी अथवा सामान्य जनतेसाठी प्रातिनिधिक संस्था मागत नाही. केवळ आपल्या नित्याच्या वर्तणकीत खऱ्या इंग्रजांवर ताण करणाऱ्या आम्हां

सुशिक्षितांच्या पुरत्या प्रातिनिधिक संस्था द्या. सुरेंद्रनाथांनी ज्या पुण्याच्या काँग्रेसमध्ये वरील आशयाचें भाषण केलें, त्याच काँग्रेसमध्ये तेल्यातांबोळ्यांचा, वाण्यांचा आणि सामान्य कामगारांचा प्रभाव पडावा म्हणून टिळक खटपट करीत होते. तेव्हा मुंबईच्या टाईम्सला लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटलें आहे :

A Congress in Poona cannot be regarded as success unless a majority of the people of Poona join it enthusiastically. We must approach the trader and the artisan and the working man as well as the educated classes.

पण हीच गोष्ट काँग्रेसच्या नेत्यांना नको होती. त्यांना आपली संस्था इंग्रजांचें अनुकरण करणाऱ्या सुधारकांच्या समाजापुरती मर्यादित ठेवावयाची होती. हाच तर रानडे-गोखले पक्ष आणि टिळक पक्ष यांच्यात महत्त्वाचा प्रभेद होता. भारताच्या द्रव्यशोषणाचा इतिहास उघडकीला आणून जनतेच्या दारिद्र्याकडे लक्ष वेधणाऱ्या दादाभाईंना टिळक नेहमीच मान देत. त्याच्या उलट, दादाभाईंच्या द्रव्यशोषणांच्या प्रचाराला रानड्यांनी तडफडून विरोध केला, ही गोष्ट त्यांचे चरित्रकार पर्वतेही मान्य करतात.

सुधारक भक्त विरुद्ध इंग्रज देव

ब्रिटिश राज्याचें साम्राज्यात परिवर्तन झालेलें पाहून भारताच्या तत्कालीन नेत्यांना आपल्या देशाच्या भवितव्याविषयी अधिकाधिक चिंता वाटू लागली. कारण तोपर्यंत इंग्लंडातील प्रमुख व्यक्तींची प्रकट भूमिका अशी होती की, हिंदुस्थानशी आपला संबंध अल्पकालीन असून भारतीय लोक शिकून शहाणे झाले म्हणजे त्यांच्या हाती कारभार सोपवून आपल्याला परत जावयाचें आहे. या भूमिकेच्या उलट इंग्रजांनी येथे उपनिवेश स्थापून स्थायिक व्हावें, असें आंदोलन भारतीय सुधारकांचे अग्रणी राजा राममोहन राय यांनी आरंभिलें होतें. ते स्वतः, द्वारकानाथ ठाकूरप्रभृति प्रमुख व्यक्तींनी मिळून पार्लमेंटकडे तसें आवेदनही केलें होतें. (रमेशचंद्र मुजुमदारकृत भारताचा इतिहास खंड शेवटचा, पान ४३८) तत्पूर्वीच भारताचे प्रमुख राज्यपाल (गव्हर्नर जनरल) होऊन आलेल्या मार्क्विस हेस्टिंग्ज यांनी बंगाली हिंदूंचें अवलोकन करून पुढील अभिप्राय व्यक्त केला होता.

The Hindoo appears a being nearly limited to mere animal functions, and even in them indifferent. Their skill in several lines of occupation is little more than the dexterity that any

animal might be supposed to be capable of attaining. It is enough to see this in order to have full conviction that such a people can at no period have been more advanced in civil polity. (pp. 338)

म्हणजे 'आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम्' या पशुजीवनाच्या पलीकडे हिंदूंची प्रगति आज झालेली नाही आणि पूर्वी कधी झालेली असणें मार्क्विस हेस्टिंग्ज यांच्या मते शक्य नाही. जेम्स स्टुअर्ट मिल्ल या तत्कालीन इतिहासकाराने तर हिंदु हे क्लीबांप्रमाणे केवळ दास्याला पात्र आहेत, असा अभिप्राय देऊन पुढे म्हटलें आहे:

It will not admit of any long dispute that human nature in India gained very considerably by passing from a Hindoo to a Mahomedan government.

म्हणजे हिंदूंचें राज्य मुसलमानांच्या हाती गेल्याने देशातील मानवांची अपार उन्नति झाली, याविषयी फारसा वाद करण्याचें कारण नाही. या उताऱ्यांवरून वाचकांना कळून येईल की, 'आमचे डोळे तुमच्याकडे, तुमचे डोळे भलतीकडे,' या न्यायाने, ज्या इंग्रज देवांना येथे पिढयान्‌पिढया वस्ती करून राहण्याची हिंदु सुधारक प्रार्थना करीत होते, तेच इंग्रज देव या अवांछित हिंदु सुधारक भक्तांचा नितांत तिरस्कार करीत होते. आपले हिंदु सुधारक याप्रमाणे इंग्रज देवांची सलोकता आणि समीपता तरी लाभण्यासाठी त्यांची आराधना करीत होते, त्याच वेळी स्वसंस्कृतीविषयी अभिमानशून्य अशा यांच्या वर्तनाने हे प्राणिकोटीतून मानवकोटीत कधीच प्रविष्ट झाले नसल्याचा पुरावा ते इंग्रजांना पुरवीत होते!

राष्ट्रीयत्व म्हणजेच जिवंत राहण्याचा अधिकार

काही इंग्रज, हिंदूंना मानव मानण्याइतपत प्रगत झाले असले तरी ते हिंदूंचें राष्ट्रीयत्व मान्य करण्याचें नाकारीत. त्यांच्या उलट लाल, बाल, पालप्रभृति राष्ट्रीय पक्षाचे पुढारी हिंदुस्थान एकराष्ट्र असल्याचा आग्रहाने प्रचार करीत असत. या निमित्ताने राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांचा उपहास करताना डॉ. आंबेडकरांनी पाकिस्तानवरील आपल्या ग्रंथात लिहिलें आहे:

The Hindu felt ashamed to admit that India was not a nation. In a world, where nationality and nationalism were deemed to be special virtues in a people, it was quite natural for the Hindus to feel, to use the language of H. G. Wells, that "it would be improper for India to be without nationality as it

would be for a man to be without his clothes in a crowded assembly.

हिंदुस्थान हें राष्ट्र नाही, ही वस्तुस्थिति मान्य करण्याची हिंदु पुढाऱ्यांना लाज वाटत होती. राष्ट्रीयत्व आणि राष्ट्राभिमान या गुणांना साऱ्या सुधारलेल्या जगात विशेष महत्त्व प्राप्त झालें असताना आपण राष्ट्र नसल्याचें प्रकटपणे मान्य करणें म्हणजे एच. जी. वेल्स यांनी म्हटल्याप्रमाणे विवस्त्र स्थितीत सभ्य समाजासमोर येण्याइतकेंच लज्जास्पद आहे, असें हिंदूंना वाटणें स्वाभाविक होतें. अशाच भावनेने प्रेरित होऊन मीही एका संचलनगीतात लिहिलें होतें :

वस्त्रहीन वन्यतुल्य जे निजध्वजाविना।
श्रीशिवादि वीरवृंदकेतु वंद्य हिंदुंना ॥'

पण केवळ सभ्य समाजात तोंड दाखविण्यापुरतीच काही हिंदूंना राष्ट्रीयत्वाची आवश्यकता नव्हती. गेल्या शतकात आणि चालू शतकातही राष्ट्रीयत्व हा त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न होऊन बसला आहे. कारण राष्ट्रीयत्वाचें वस्त्र न वापरणाऱ्या वन्य समाजांना मारून टाकण्याचा आपल्याला अधिकार आहे, अशी स्वतःला सुधारलेले म्हणविणाऱ्या रानटी राष्ट्रांची तेव्हा समजूत झालेली होती आणि अजूनही ती सर्वांशी नष्ट झालेली नाही. याच दुष्ट समजुतीमुळे आजही पाकिस्तानातील हिंदूंचा पद्धतशीरपणे उच्छेद चालू आहे. डॉ. टॉयनबी या इंग्लंडातील सर्वश्रेष्ठ इतिहासकारांनी 'इतिहासाचा अभ्यास' या प्रचंड ग्रंथाच्या पहिल्या खंडात १५२ व्या पानावर लिहिलें आहे :

When we westerners call people natives, we implicitly take the culture out of our perception of them. We see them as trees walking or as wild animals infesting the country we happen to come across them. In fact we see them as local flora and fauna, and not as men of like passions with ourselves; and seeing them thus as something infra-human, we feel entitled to treat them as though they did not possess ordinary human rights. They are merely natives of the lands which they occupy and no term of occupancy can be long enough to confer any prescriptive right. Their tenure is as provisional and as precarious as that of the forest trees which the western pioneer fells or that of the big game which he shoots down.

या उताऱ्याचा सारांश असा की, पाश्चात्य लोक जेव्हा इतरांना 'नेटिव्ह' (एतद्देशीय) ही संज्ञा देतात, तेव्हा ते त्या इतर जातींचा सुधारलेल्या जगात जगण्याचा अधिकारच काढून घेतात. पाश्चात्यांच्या

वाढत्या लोकसंख्येला वाव मिळावा म्हणून अरण्यातील झाडें तोडणें आणि वन्य श्वापदें मारणें हें जसें न्याय्य, तसेंच पाश्चात्यांना हव्या असलेल्या देशांतील नेटिव्हांचा (एतद्देशीयांचा) नायनाट करणें हेंही न्याय्य अशीच त्यांची समजूत असते. पाश्चात्यांच्या या मनोवृत्तीची टिळकप्रभृति राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांना पूर्ण जाणीव असल्यामुळेच आपल्या प्राचीन संस्कृतीवर आधारलेल्या राष्ट्रीयत्वाचा त्यांनी इतक्या निग्रहाने आणि निकराने प्रचार केला. यासाठीच स्वदेशी आंदोलनाच्या दिवसांत भारतीयांना उद्देशून 'नेटिव्ह' शब्द वापरण्याला तीव्र विरोध करून त्यांनी त्या शब्दाचा प्रयोग बंद पाडला.

आगरकरांचे प्रलाप

टिळकांच्या राष्ट्रीय धोरणाच्या नेमकें उलट वर्तन आणि प्रचार त्यांचे एके काळचे मित्र, पण परोत्कर्षासहिष्णुतेमुळे शत्रु बनलेले आगरकर करीत असत. खरें सांगावयाचें म्हणजे आगरकरांचें समग्र लेखन वाचण्याचा उपद्रव मी माझ्या नेत्रांना आणि मेंदूला दिलेला नाही. पण त्यांचे चाहते असलेल्या केळकरांनी टिळकचरित्राच्या पहिल्या खंडात आगरकरांचे जे प्रलाप उतरून घेतले आहेत, त्यांवरून या सुधारक नांवाच्या राष्ट्रीयत्वविरोधी पंथाची पुरेशी कल्पना येते. ते असे :

'बेहत्तर आहे, यापेक्षा धर्मत्याग करू, भाषात्याग करू, आचार आणि रूढि झुगारून देऊ, परंतु अंतःकरणाची आणि बाह्याचरणाची अत्युन्नति जोडू. या निकराचे प्रसंगी जर आज हिंदुस्थानावर आमची सत्ता असती तर या समयी हिंदुधर्मशास्त्रें आणि तत्प्रतिपादक ग्रंथ आम्ही अग्निशुद्धच करून घेतले असते... सर्व बुद्धिमान्, विचारी, समंजस लोकांस हात जोडून एवढेंच मागणें आहे की, आपलें मनःपूर्वक साहाय्य देऊन या सुधारणाशकटाची धुरा मानेवर घेऊन धुरंधरपणे ती तडक धवलगिरीचे मस्तकावर पोचवून आजपर्यंत राजर्षींनी, ब्रह्मर्षींनी, भट्टाचार्यांनी किंवा साधुसंतांनी कोणीही कधी संपादिलेलें नाही, असें महान् श्रेय तुम्ही संपादा." (पान १९६).

या अवतरणातील उन्मत्तपणा पाहून याचा लेखक सुधारक आहे कां सुधाकर आहे, असाच मनाला भ्रम पडतो. मानवाची मति आणि शक्ति अत्यल्प असल्याने आपल्या अयुत वर्षांच्या परंपरेविषयी चार शब्द लिहिताना त्याने विनम्रपणाला विसरून लेखन करू नये, असा सामान्य शिष्टाचार आहे. पण इंग्रजी विद्या नांवाच्या वारुणीचें सेवन केल्यानंतर आणि इंग्रज सरकारच्या आधाराने स्वसमाजाला धाब्यावर

बसविता येत असल्यानंतर या सुधारकबुवांनी आपल्या लेखण्या स्वैर सोडल्या तर त्यात नवल काय ?

अत्युन्नति साधण्याच्या प्रयत्नांचे परिणाम

वरील अवतरणात आगरकरांनी अंतःकरणाची आणि बाह्याचरणाची अत्युन्नति जोडण्याची जी कल्पना बोलून दाखविली आहे, तिचे समाजावर किती भयानक परिणाम होतात, याचें विवेचन आचार्य ओकशॉट यांनी *'The Tower of Babel'* या प्रबंधात केलें आहे :

The pursuit of perfection as the crow flies, is an activity both impious and unavoidable in human life. It involves the penalties of impiety (the anger of the Gods and social isolation) and its reward is not that of achievement but that of having made the attempt. It is an activity, therefore, suitable for individuals, but not for societies. For an individual, who is impelled to engage in it, the reward may exceed both the penalty and the inevitable defeat. The penitent may hope to fall back, a wounded hero, into the arms of an understanding and forgiving society, and even the impenitent can be reconciled with himself in the powerful necessity of his impulse though like Prometheus he must suffer for it. For a society, on the other hand, the penalty is a chaos of conflicting ideas, the disruption of a common life and the reward is the renown which attaches to monumental folly. *A mesure que L' humanite se perfectionne L' Homme se degrade.*

अत्युन्नतीच्या मार्गातील धोके

बायबलमध्ये अशी एक आख्यायिका आहे की बाबेल (बाबिलोन) नगरातील मानवांनी स्वर्गात जाण्याचा सोपान म्हणून एक अत्युच्च मनोरा बांधावयाला प्रारंभ केला. हा मनोरा पूर्ण झाल्यास मानव आपल्या स्वर्गराज्यावर अतिक्रमण करू शकेल, या भीतीने देवांनी बाबेलमधील मानवांत भाषाभेद उत्पन्न केले आणि कोणालाही कोणाचीही भाषा कळेनाशी झाल्याने त्या पूर्ण होत आलेल्या मनोऱ्याचें काम अपूर्ण राहिलें. याचा संदर्भ सांगून आचार्य ओकशॉट यांनी म्हटलें आहे की, पूर्णत्वाचा हव्यास ही अपुण्य आणि लोकविद्विष्ट आकांक्षा असली तरी काही जणांच्या हृदयांत ती उद्भवणें अपरिहार्य आहे. या हव्यासामुळे देव आणि मानव यांचा त्या व्यक्तीवर रोष होतो. या हव्यासाचें पारितोषिक पूर्णत्वाची अथवा आगरकरांच्या अत्युन्नतीची प्राप्ति हें नसून तिच्यासाठी आपण धडपड केल्याची आत्मतृप्ति अथवा अहंकार एवढेंच

असतें. असला हव्यास समाजाला परवडत नसल्याने त्याच्या नादी लागलेल्या व्यक्तींचा समाजाकडून छळ व्हावयाचाच. या छळाला आणि अशा प्रयत्नात येणाऱ्या अपरिहार्य अपयशाला विसरण्याइतका अहंकार त्या व्यक्तींच्या हृदयांत आपोआप उत्पन्न होतो. अशा प्रयत्नांचा ज्यांना पश्चात्ताप होतो, त्यांना समाजात परत सन्मान्य स्थान लाभतें. पण ज्यांना असा अनुताप होत नाही, त्यांना समाजाकडून होणाऱ्या छळानेच आपल्या अहंकाराचें समाधान करून घ्यावें लागतें. पण असल्या अहंकारी व्यक्तींच्या अत्युन्नतीच्या पंथाचें एखाद्या समाजाने अनुसरण केल्यास त्या समाजात परस्परविरोधी अत्युन्नतीच्या पंथांचें यादवी युद्ध चालू होऊन सामाजिक जीवन नष्ट होतें आणि याचें पारितोषिक काय, तर हिमालयाएवढ्या चुका केल्याची इतिहासातील नोंद! समाज जसजसा पूर्णत्वाला पोचतो, तसतसा त्या समाजातील मानव लहान होत जातो. म्हणजे सारा समाज श्रेष्ठ बनल्यानंतर त्या समाजातली एखादी व्यक्ति समाजाच्या मानाने भलतीच मोठी, समाजाच्या शीर्षावर नाचणारी, त्याला तुडविणारी बनत नाही. याच सिद्धान्ताचा उपसिद्धान्त हा की, एखाद्या समाजात महात्मे जन्माला येऊ लागले म्हणजे तो समाज निकृष्टावस्थेला पोचतो आणि त्याचें सामाजिक जीवन उद्ध्वस्त होतें. टिळककालीन सुधारकांच्या आणि त्यांच्या अंतकाळी उदयास आलेल्या महात्म्यांच्या चरित्रांचें हेंच पर्यवसान आहे.

इंग्रजी राजनीतीची मोहिनी

वास्तविक पाहता राष्ट्रीयत्व हा मध्यमवर्गाचा विशिष्ट धर्म. सरदारांच्या अथवा भांडवलवाल्यांच्या वरिष्ठ वर्गाला राष्ट्रीयत्वाची क्षिति नसते. श्रमिकांच्या कनिष्ठ वर्गाला त्याची तादृश जाणीवही नसते. पण मध्यमवर्गाची सुस्थितिच नव्हे, तर त्याचें जीवनही सर्वस्वी राष्ट्रधर्माच्या पालनावरच अवलंबून असतें. पण इंग्रजी संस्कृतीने मोहित झालेल्या भारतीय मध्यमवर्गाला आपल्या संस्कृतीचा नुसता विसर पडला नाही, तर विद्वेषही वाटू लागला. या परिस्थितीचें वर्णन करताना १८-४-१८७८ च्या 'ज्ञानप्रकाशा'त लिहिलें होतें :

'हिंदुस्थानातील इंग्रजी राजनीति ही सुंदर वारांगनेप्रमाणे आहे. हिचें सौंदर्य आकर्षक आणि मोहक असलें तरी ही अत्यंत धूर्त, वंचक आणि निष्ठुर आहे. सर्वजण सकृद्दर्शनीच हिच्या प्रेमपाशात सापडतात. पण ही एका क्षणी एकाकडे प्रेमकटाक्ष टाकते आणि दुसऱ्याच क्षणी दुसऱ्यावर! आणि शेवटी त्यांचें आपसांत भांडण जुंपतें. सर्व हिंदी संस्थानिक प्रथम तिच्या आकर्षणाला बळी पडले. नंतर तिने मध्यम

वर्गाला मोहिनी घातली आणि नेसत्या वस्त्रांव्यतिरिक्त त्यांचे सर्व काही हिरावून घेतलें.'

त्या काळी सुधारकांनी अजून इंग्रजी वेष स्वीकारला नव्हता. पण आता त्यांनी तोही स्वीकारला असल्याने भारतीयत्वाच्या दृष्टीनें ते संपूर्ण नग्न झाले आहेत.

सुधारकांची भूमिका

इंग्रजी राज्य अस्तित्वात आल्यानंतर इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकहितवादी, रानडेप्रभृति मध्यम वर्गातील सुधारकांची जी पिढी निर्माण झाली, तिची मनोभूमिका काय होती, याची आजकालच्या महाराष्ट्रीयांना कल्पनाही येऊ शकत नाही. फिट्झ जेराल्डच्या रुबायांमध्ये या मनोभूमिकेचें यथार्थ वर्णन मला अनपेक्षित रीत्या आढळून आलें :

Ah Love could thou and I with fate conspire,
To grasp this sorry scheme of things entire,
Would not we shatter it to bits and then,
Remould it nearer to the heart 's desire ?

नियतिसहित प्रेमे, तूं नि मी मंत्र केला, ।
निजकरिं जरि घ्याया नष्ट या योजनेला, ।
विखरुनि अणु तीतें नाहिं का ध्वंसणार, ।
प्रणयसुखद आणि मागुती निर्मिणार? ॥

त्या काळी हिंदुसमाजरचना नांवाची एक नष्ट, घातकी योजना विधियोगाने इंग्रजांच्या तावडीत सापडली होती आणि इंग्रजी शिकलेल्या पहिल्या सुधारकांना असें वाटत होतें की इंग्रजसरकार नांवाच्या प्रियेचें प्रेम आपण संपादन केल्यास हिंदुसमाजरचनेचा संपूर्ण विध्वंस करून तिची आपल्या हृदयाच्या इच्छेप्रमाणे नवरचना करण्याची युगयुगांतरांतून क्वचित् लाभणारी संधि आपल्याला लाभू शकेल. या स्वप्नाच्या पूर्ततेकरिता ते कायावाचामनेकरून इंग्रजसरकाररूपी प्रियेची आराधना करण्यात दंग झाले होते. इंग्रज सरकाराच्याकडून नवीन विधिनिबंध संमत करून घेऊन त्यांच्या प्रयोगाने हिंदुसमाजाची परंपरा नष्ट करण्याच्या आत्मघातकी उद्योगात ते निमग्न झाले होते. समाजातील जीं परिवर्तनें शिक्षणाच्या प्रसाराने आणि अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरामुळे सहज घडून यावयाचीं, तीं परक्या सरकारच्या हस्तक्षेपाने केवळ हिंदुसमाजात घडवून आणण्याचा हिंदुत्वद्रोही व्यवसाय त्यांनी आरंभिला होता. या साऱ्या इंग्रजप्रभूच्या पन्नास टक्के प्रेमाच्या पाशात

बद्ध झालेल्या हिंदुसमाजद्वेष्टया सुधारकांच्या सत्य स्वरूपाची संपूर्ण कल्पना टिळकांना संमतिनिर्बंधाच्या (हा निर्बंध आज अडगळीत पडला आहे हें सांगायला नकोच!) चर्चेच्या दिवसांत आली आणि तेव्हापासूनच इंग्रजनिष्ठ आणि हिंदुसमाजद्रोही म्हणजेच पर्यायाने देशद्रोही सुधारक आणि त्यांच्या विरुद्ध हिंदुत्वाचे अभिमानी, तसेच त्या अभिमानामुळे स्वदेशाभिमानी आणि सरकारद्रोही बनलेले टिळक यांचे संघर्ष चालू झाले. टिळककालीन एक मुंबईचे राज्यपाल सर रिचर्ड टेंपल यांनी त्यांच्या एका प्रबंधात लिहिलें आहे:

The British Indian educational system has produced two varieties of educated men, the type of the late Justice Ranade, and the type of a highly taught national youth, without those wholesome home influences that build up a sound moral character. To use very general terms, just as the social movement may be taken as a natural sign of loyal social evolution, so the national Congress may be taken as that of the disloyal.

म्हणजे इंग्रजी शिक्षणामुळे भारतात समाजसुधारकांचा एक राजनिष्ठ वर्ग निर्माण झाला आणि उच्चशिक्षित राष्ट्रवादी तरुणांचा दुसरा राजद्रोही वर्ग निर्माण झाला. राष्ट्रीय सभा ही राजद्रोही आहे, अशी सर रिचर्ड टेंपल यांच्यासारख्या भारतशत्रूंची कल्पना होती आणि ती आज ना उद्या राजद्रोही बनेल, अशी टिळकांची अपेक्षा होती. यामुळे सामाजिक परिषदेचा संबंध त्यांनी जसा आपल्या कर्तृत्वकाळाच्या आरंभीच तोडून टाकला, तसा त्यांनी राष्ट्रीय सभेचा संबंध तोडला नाही, इतकेंच नव्हे तर ती आपल्या ताब्यात घेण्याचा त्यांनी निकराचा प्रयत्न केला. सामाजिक परिषदेचे पुरस्कर्ते हे आपल्याला यश लाभावें, याकरिता मुख्यत: इंग्रजसरकारवर अवलंबून असल्यामुळे इंग्रजांचे उपग्रह बनले होते. याकरिता सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनीही म्हटलें आहे:

Such men in Tilak's eyes were merely satellites and slaves of British rule and had to be crushed before any successful assault could be made on British rule itself.

असले लोक ब्रिटिशांचे तोंडपुजे नि त्यांच्या सत्तचे दास असल्याने ब्रिटिश राज्य गाडण्यापूर्वी आधी या लोकांना चिरडून टाकलें पाहिजे अशा मताचे टिळक होते.

ह्यूम-रानड्यांची निर्लेप काँग्रेस

इंग्रजनिष्ठ समाजसुधारकांच्या मगरमिठीतच काँग्रेस राहावी, यासाठी सदैव सावध असणाऱ्यांचे प्रमुख न्यायमूर्ति रानडे हे होते. हे

सरकारचे सेवक असल्याने त्यांना उघडपणे काँग्रेसमध्ये भाग घेता येत नसे. म्हणून स्वतःला काँग्रेसचीं सूत्रें हलविण्याची संधि मिळावी, याकरिता भारतीय सामाजिक परिषद अस्तित्वात आणून तिचें अधिवेशन काँग्रेसच्या मंडपातच भरविण्याची वहिवाट रानड्यांनी पाडली होती. काँग्रेसला या समाजसुधारकांच्या मगरमिठीतून सोडवून ती अखिल जनतेची प्रातिनिधिक संस्था बनवावी, यासाठीच टिळकांच्या अनुयायांनी पुण्याच्या काँग्रेसमध्ये सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपात भरविण्याला इतका निकराने विरोध केला. ह्यूमसारखे निवृत्त, किंवा रानड्यांच्या सारखे प्रवृत्त सरकारी सेवक हें सरकारी सेवकांपैकीच सैनिकांचा आपल्या संस्थेला संसर्ग सुद्धा लागू नये, याकरिता डोळ्यात तेल घालून जपत. कारण काँग्रेसचा जीवनहेतुच मुळी सत्तावन्नच्या क्रांतिसंग्रामाची पुनरावृत्ति होऊ नये, हा होता हें दि. २४-११-१८८७ च्या पायोनियरच्या अंकावरून समजतें.

Hume said that in two years the great bulk of the Indian army could become strong supporters of the movement, but the Congress was opposed to any step which would lead the Government to suspect its loyalty. He added that the Congress did not encouarge Indian military officers when at their home on furlough to take part in its demonstrations.

ह्यूमच्या मताप्रमाणे अवघ्या दोन वर्षांत बहुतेक सारे भारतीय सैन्य राष्ट्रीय पक्षाचे कट्टे अभिमानी बनणें शक्य होतें. पण काँग्रेसला आपली राजनिष्ठा संशयातीत ठेवावयाची असल्याने तिचे पुढारी सुट्टी घेऊन घरी आलेल्या अधिकाऱ्यांना आपल्या उत्सवांतून भाग घेण्याला उत्तेजन देत नाहीत. तेव्हाचे राजप्रतिनिधि मार्क्विस डफरिन यांनी भारतसचिवांना लिहिलेल्या एका पत्रावरून समजतें :

Hume had said that the large body of more or less educated men (not English educated) who were supporting the movement do hold in their hands the keys of good many magazines of physical force, though they are not going to put the keys in the locks.

देशातील साक्षर समाज काँग्रेसपक्षाचा असून पुष्कळशा सामर्थ्याच्या (दारूगोळ्यांच्या,) कोठारांच्या किल्ल्या त्यांच्या हातातच आहेत. पण त्या किल्ल्या कुलुपात चालवून पहावयाचा त्यांचा विचार नाही. वरील अवतरणांतून उल्लेखिल्याप्रमाणे दोन चार वर्षांत बरेंचसें भारतीय सैन्य क्रांतिपक्षाला मिळण्याची शक्यता तेव्हा विचारवंतांना उघड दिसत होती. आणि ह्यूम-रानड्यांची निर्लेप काँग्रेस हें कार्य करणार

नाही, अशी तिच्या नेत्यांनी प्रकट घोषणा केली होती. अशा परिस्थितीत क्रांतिकारकांनी हें कार्य हाती घेणें अगदी अपरिहार्य होतें. यावरून असें वाटतें की, टिळक आणि अरविंद घोष हे ज्या ठाकूरसाहेबांच्या संस्थेचे प्रमुख कार्यकर्ते बनले, ती संस्था १८८७ नंतर लौकरच संघटित झाली असावी.

ह्यूम यांचें भारतशत्रुत्व

ह्यूममहाशय भारतप्रेमाचा कितीही देखावा करीत असले तरी 'तत्त्वमसि'चा प्रश्न आला म्हणजे काँग्रेसने एकमताने केलेल्या मागणीला सुद्धा ते किती निकराने विरोध करीत असत, याचें एक उदाहरण बिपिन बाबूंनी 'राजनिष्ठ देशभक्ति' (*Loyal Patriotism*) या प्रबंधात दिलें आहे.

Those who remember the incidents of the Madras Congress of 1887 and the Prayag congress of 1888 will easily recall the nervousness which even Mr. Hume evinced when a repeal of the Arms' Act was demanded by the unanimous voice of the Congress. Those who like myself, have passed through the dark days of mutiny can never support this resolution. (न्यू इंडिया दि.२५-२-१९०५)

बिपिनबाबू सांगतात की १८८७ आणि १८८८ मधील मद्रास आणि प्रयाग येथील अधिवेशनांतून राष्ट्रीय सभेने शस्त्रनिर्बंध दूर करण्याचा ठराव एकमताने संमत केलेला पाहून ह्यूममहाशयांचा जीव कसा घाबरा झाला, हें त्या अधिवेशनाला उपस्थित असलेल्यांना अजून आठवतें. तेव्हा त्यांनी बोलून दाखविलें होतें की ५७ च्या बंडाचा माझ्यासारखा ज्यांना अनुभव आला आहे, ते लोक कधीच या ठरावाला संम्मति देणार नाहीत.

दिल्लीतील नव्या मोगलांना महाराष्ट्राचें भय

लॉर्ड लिटनप्रभृति नव्या मोगलांनी दिल्लीत आपल्या साम्राज्यस्थापनेचा डांगोरा पिटला, तेव्हापासूनच त्यांना हीही जाणीव झाली होती की, आपल्या साम्राज्याचा खरा शत्रु महाराष्ट्रात वाढत आहे. १३-५-१८७९ या दिवशीं लॉर्ड लिटन यांनी भारत सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटलें आहे :

Conspiracy of some kind and in some form is always smouldering in the Bombay Presidency; and this makes it a very difficult presidency to manage. The decoities which have lately been increasing in magnitude and audacity are not, I fear, mainly agra-

rian. We have proof that the Brahminical literate of Poona and Bombay are directly connected with them.

मुंबई प्रांतात कटांचा विस्तव कोणत्या तरी स्वरूपात नेहमीच धुमसत असतो, त्यामुळे त्या प्रांताचा कारभार चालविणें फार अवघड जातें. सध्या त्या प्रांतात फार मोठ्या प्रमाणावर जे धाडसी दरवडे पडत आहेत, ते काही शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांतून उद्भवलेले नाहीत. पुण्यामुंबईच्या सुशिक्षित ब्राह्मणांचा त्यांतून हात असल्याचा आमच्याजवळ पुरावा आहे. लॉर्ड लिटन यांचें हें पत्र वासुदेव बळवंतांच्या बंडाला अनुलक्षून लिहिलें असल्याने येथे त्यांनी पुण्यामुंबईच्या ब्राह्मणांवर केलेला आरोप त्रिवार सत्य आहे.

मुंबईमधील दरवडे

वासुदेव बळवंतांचे दरवडे राजकीय हेतूने घातले गेल्यामुळे त्यांच्याकडे सरकारने तत्काळ लक्ष दिलें. नाही तर स्वत: मुंबईत इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाल्यापासून दोनशे वर्षें सतत मोठ्या प्रमाणावर दरवडे पडत असून तेथील राज्यकर्त्यांना त्यांचा कधीच प्रतिबंध करता आला नव्हता. १८४० नंतरच्या दशकात सर रॉबर्ट पील या मुख्य प्रधानांनी लंडन येथील नगररक्षकांची सुव्यवस्थित संघटना केली. त्यानंतर तेथील अनुभवी अधिकारी मुंबईला १८५० च्या पुढील दशकात आले आणि त्यांनी मुंबईतील समाजकंटकांच्या कृत्यांना त्यानंतर काही प्रमाणात आळा घातला. तत्पूर्वीची परिस्थिति काँग्रेसचे एक अध्यक्ष सर दिनशा वाच्छा यांनी त्यांच्या मुंबईवरील ग्रंथात वर्णिली आहे :

On enquiry it appeared that robber gangs systematically organized for the purpose of plunder infested the island and the harbour and the dread of their vengeance coupled with an utter want of confidence in the police force, completely paralysed that system of the native trading community who were the chief sufferers.

म्हणजे त्या वेळी सशस्त्र लुटारूंच्या टोळ्यांनी मुंबई बेट आणि बंदर व्यापलें होतें आणि त्यांच्या लुटालुटीमुळे, तसेंच त्या लुटारूंच्या टोळ्या आपल्यावर सूड उगवतील या भीतीमुळे स्थानिक व्यापाऱ्यांचे सर्व व्यवहार थंड पडले होते. ही परिस्थिति १८५३ मधील होय. पुढे ५७-च्या बंडानंतर सरकारने रुद्रावतार धारण केल्यामुळे मुंबईत सुरक्षितता वाटू लागली. नाही तर तत्पूर्वी नाना फडणिसांच्या कारभारातील सुरक्षितता मुंबईतील वर वर्णिलेल्या सुरक्षिततेपेक्षा शतपटीने अधिक होती.

इंग्रजी राज्यावर अमृतबाजार पत्रिकेचा अभिप्राय

नाना फडणिसांच्या निंदेत रमणारे लोकहितवादी जेव्हा इंग्रजी राज्याची स्तुति करण्यात दंग झाले होते, त्याच दिवसांत म्हणजे २०-२-१८६८ या दिवशी बंगाल्यात, टिळकांचे वृत्तपत्रव्यवसायातील गुरु शिशिरकुमार घोष यांनी 'अमृतबाजारपत्रिका' नांवाचें बंगाली साप्ताहिक आपल्या खेड्यात चालू केलें. त्या पत्राच्या १९-३-१८६८ च्या अंकात शिशिरबाबूंनी निर्भयतेची आणि निर्भीडतेची पराकाष्ठा करून इंग्रजी राज्याच्या सत्य स्वरूपाचें पुढील चिरस्मरणीय वर्णन केलें होतें :

"इंग्रजेरा शुद्ध बुद्धिबले, कि शुद्ध शारीरिकबले, कि उभययोगे आमादेर देश शासन करितेछेन ताहा लइया तर्क करा आमादेर उद्देश्य नाई. जे बलेइकोरून फल धर्मबले नय सेटा निश्चित. बुद्धि ओ शारीरिक-बल जे राज्येर कर्ता, अविश्वस्तता, भीरुता ओ निष्ठुरता से राज्येर मंत्री. सेखानकार राज्यरक्षक बंदूक ओ शांतिरक्षक फांसि एवं शृंखला."

इंग्रज लोक केवळ बुद्धिबळाने, की शारीरिक बळाने, का या दोन बळांच्या समन्वयाने राज्य करीत आहेत, यासंबंधी तर्क करणें हा आमचा उद्देश नाही. कोणत्याही बळाने करू देत, ते धर्मबळाने राज्य करीत नाहीत, हें निश्चित. बुद्धि आणि शारीरिक बल येथील राज्यकर्ता; अविश्वास, भीरुता आणि निष्ठुरता या राज्याचे मंत्री. या राज्यात राज्यरक्षक बंदूक आणि शांतिरक्षक फांशी नि शृंखला. असल्या आग ओकणाऱ्या लेखनानिमित शिशिरबाबूंना बाबा सावरकरांप्रमाणे यावज्जीवन द्वीपांतरवासाची शिक्षा झाली नाही, हें नवल.

जर्मनीने इंग्लंडचें अनुकरण केल्याचे परिणाम

मागील प्रकरणात इंग्लंडने जर्मनीचें अनुकरण करून साम्राज्य-वादाचा अंगीकार केल्याचा भारताच्या भवितव्यावर किती भयानक परिणाम झाला, याचें वर्णन आलें आहे. पण त्याच वेळी जर्मनीनेही इंग्लं-डच्या अनुकरणाने आपल्या देशातील चांदीचें चलन बंद करून सोन्याचें चलन चालू केल्याने अकस्मात् भारतवर्ष कसा भिकेला लागला, याचें वर्णन करावयाचें राहून गेलें. फ्रँको-जर्मनयुद्धानंतर जर्मनीने फ्रान्सकडून पांचशे कोटि फ्रँकांची खंडणी उकळल्यामुळे त्या देशांत सोन्याची विपु-लता झाली. तेव्हा या सुवर्णसंधीचा सदुपयोग करण्याकरिता जर्मन सरकारने चांदीच्या चलनाचा त्याग करून स्वदेशात सोन्याचें चलन चालू केलें. तत्पूर्वी इंग्रजांनीही भारतवर्षातील संपत्तीचा अपहार केल्या-

नंतर आपल्या देशात सुवर्णचलन चालू केलें होतें. जर्मनीने चांदीच्या चलनाचा त्याग करण्यापूर्वी जगातील बहुतेक देशांतून चांदीचें चलन चालू होतें. पण नवोदित जर्मन साम्राज्याने सुवर्णचलनाचा अंगीकार केल्यामुळे व्यापारी जगतात चांदीचा मूल्यऱ्हास होऊ लागला आणि चांदीचें चलन प्रचारात असलेल्या देशांना परदेशी व्यापारात प्रतिवर्षी अधिकाधिक तूट येऊ लागली. ही तूट टाळण्याकरिता इतर राष्ट्रें जशीं सुवर्णचलनाचा स्वीकार करू लागलीं, तसतसा भारतासारख्या चांदीला चिकटून राहिलेल्या देशाच्या चलनाचा अधिकाधिक मूल्यऱ्हास होऊ लागला. हा मूल्यऱ्हास कोठपर्यंत गेला, याचें गमक म्हणून असें सांगता येईल की, फ्रँको-जर्मन युद्धाच्या काळी चांदीच्या पंधरासोळा तोळ्यांना एक तोळा सोनें मिळत असे, तर त्या युद्धानंतर वीस वर्षांनी एक तोळा सोन्याला २३ तोळे चांदी देण्याची पाळी आली आणि सतत मूल्यऱ्हास होत असलेल्या चांदीच्या चलनाला चिकटून राहिलेला जगातील सर्वांत भिकारी देश भारत अशी आपली प्रसिद्धि झाली.

शिशिरकुमारांची पुण्याला भेट

१८७७ मध्येच 'अमृतबाजार' पत्रिकेचे पहिले संपादक शिशिरकुमार घोष यांनी पुण्याच्या सार्वजनिक सभेने चालविलेल्या विधायक कार्याचा अभ्यास करण्याकरिता पुण्याला भेट दिली. 'भारतातील राजकीय संस्था' (इंडियन पोलिटिकल इन्स्टिटच्यूशन्स) या ग्रंथाचे कर्ते डॉ. विमानविहारी बंद्योपाध्याय यांनी सार्वजनिक सभेच्या वर्णनात लिहिलें आहे :

In 1877 Sisir Kumar Ghosh visited Poona and was struck with wonder at seeing the work of 14 or 15 arbitration Salisi Boards carrying excellent work at various Places in the Poona district under the guidance of the Sabha.

शिशिरकुमारांनी तेव्हा सार्वजनिक सभेच्या द्वारा पुणें जिल्ह्यात चौदा पंधरा ठिकाणी चालविलेल्या लवाद न्यायमंडळांचें उत्कृष्ट काम पाहिलें आणि त्यांना परमाश्चर्य वाटलें. त्यांनी बंगाली लोकांना या प्रकारचीं न्यायमंडळें चालविण्याचा आग्रहाने उपदेश केला. याच लेखकांनी पुढे सांगितलें आहे की, १८७८ मध्येच मुंबई सरकारच्या वसुली विभागाच्या प्रमुखांनी देशी भाषांतील वृत्तपत्रांच्या नियंत्रणासंबंधी अभिप्राय लिहिताना सार्वजनिक सभा ही राजद्रोही संस्था असल्याने तीही बंद करावी, असा अभिप्राय दिला होता. असो. शिशिरकुमारांच्या आगमनाच्या वेळी टिळक हे पदवीपरीक्षेच्या वर्गात होते आणि इतपत

शिकलेले विद्यार्थी तेव्हा अत्यल्प असल्याने त्यांना मोठ्या लोकांच्या बैठकीतून प्रवेश मिळत असे. यामुळे 'अमृतबाजार' पत्रिकेचे भक्त असलेल्या टिळकांनी या वेळीच त्यांचा परिचय करून घेतला असावा आणि या प्रथम भेटीतच त्या उभयतांच्या मनात परस्परांविषयी प्रेम आणि आदर या भावनांचा प्रादुर्भाव झाला असावा. अमृतबाजार पत्रिकेचे चालक आणि टिळक यांच्या स्नेहसंबंधालाच पुढे महाराष्ट्र आणि बंगाल प्रांतांतील राष्ट्रीय पक्षांच्या सहकार्याचें स्वरूप प्राप्त झालें.

पुण्याचें अनुकरण करा

पुण्याहून परतल्यानंतर शिशिरकुमारांनी २६-९-१८७८ च्या 'अमृतबाजारपत्रिकेत' आपल्या भाषाबांधवांना असा उपदेश केला की राजकारणात आपणच हिंदुस्थानाचे पुढारी असल्याचा भ्रम वंगसमाजाने टाकून द्यावा आणि महाराष्ट्रापासून राजकारणाचे धडे घ्यावेत. त्यांनी असेंही स्पष्टीकरण केलें होतें की, महाराष्ट्रातसुद्धा मुंबई नगरीतील नेत्यांच्या तोंडाकडे न पाहता महाराष्ट्रीय समाजाचें नेतृत्व करणाऱ्या पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या नेत्यांचें अनुकरण करा. टिळकांच्या उदयानंतर पुणें आणि कलकत्ता येथील राष्ट्रीय पक्ष परस्परांशी जे समरस झाले होते, तसेंच 'पत्रिके'चें कार्यालय हें टिळकांचें कलकत्त्यातील घरच बनलें होतें, तें शिशिरकुमारांच्या या भेटीमुळे आणि भावनेमुळे होय. पुण्याचें अनुकरण करा, असा 'पत्रिका'कारांनी उपदेश केला, तेव्हा त्यांना अशी कल्पनाही नसेल की पुढच्याच वर्षी वासुदेव बळवंतांच्या बंडामुळे अखिल हिंदुस्थानाचें लक्ष पुण्यावर खिळून राहणार आहे !

✦ ✦ ✦

प्रकरण तिसरें

हिंदुत्वनिष्ठ टिळकचरित्र लिहिण्याचें प्रयोजन

टिळकनिधनाला आता पन्नास वर्षें होत आलीं. या अवधीत पांचपन्नास तरी लहानमोठीं टिळकचरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकी एकट्या रामगोपाळांचें टिळकचरित्र वगळल्यास इतर सर्व पुस्तकांवर केळकरांच्या टिळकचरित्राचा ठसा न्यूनाधिक प्रमाणात उमटला आहे. केळकर हे प्रवृत्तीने सुधारक असल्याने त्यांनी लिहिलेल्या टिळकचरित्रात क्रांतिकारक नि हिंदुत्वनिष्ठ टिळकांचें दर्शन होत नाही. हिंदुस्थानचा इतिहास जसा हिंदूंच्या दृष्टिकोनातून लिहिला जात नाही तसाच टिळकांचा इतिहासही हिंदुत्वनिष्ठ राष्ट्रीय पक्षाच्या दृष्टिकोनातून लिहिला गेलेला नाही ही गोष्ट प्रसिद्ध झालेल्या अनेक टिळक चरित्रां-वरून दिसून येणारी आहे. टिळक हे संस्कृतिसंकरातून जन्मास येणाऱ्या सुधारणाप्रवृत्तीचे विरोधक होते. कारण अशा संकरातून जन्माला येणाऱ्या सुधारणांची परिसीमा वंशसंकरात होत असते आणि ती राष्ट्रजीव-नाला अत्यंत घातक असते.

खिरस्ती संस्कृतीचें अफजलखानी आलिंगन

टिळकांच्या काळी खिरस्ती संस्कृतीने हिंदु संस्कृतीला अफजल-खानी प्रेमाने आलिंगन दिलें होतें आणि या अवांछित, अनिष्टसूचक आणि अरिष्टकारक आलिंगनापासून आपलें संरक्षण करून घेण्यासाठी हिंदु संस्कृतीचे प्राणपणाने प्रयत्न चालले होते. या दोन विभिन्न खंडांतील संस्कृति एकत्र आल्यानंतर वंशसंकर होऊन एक आंग्लहिंदूंची (अँग्लो-इंडियन) बलिष्ठ अशी हिंदुद्रोही जात निर्माण झाली होती आणि संस्कृतिसंकर होऊन स्वतःच्या मनोदौर्बल्यामुळेच देशाला अधिक अरिष्ट-कारक ठरणाऱ्या सरकारसेवक हिंदुत्वद्रोह्यांची दुसरी एक जात निर्माण झाली होती. संस्कृतिसंकराने निर्माण झालेल्या जातींचे नेते, आपापल्या जातीत पुढच्या पिढीला तरी वंशसंकर होईल, अशी आशा आणि अपेक्षा करीत असतात. त्यांच्या उलट वंशसंकराने निर्माण झालेल्या जातीत ती सुधारणा आधीच होऊन गेलेली असते, इतकाच काय तो या जातींत भेद असतो. या दोन जातींपैकी संस्कृतिसंकराने निर्माण

होणारी परक्यांच्या अनुकरणावर जगणारी, घरभेद्या सुधारकांची जात धर्माधिष्ठित राष्ट्राला अतिशय मोठा धोका उत्पन्न करणारी असते. डॉ. अर्नाल्ड टॉयनबी या इतिहासशास्त्रवेत्त्यानी दोन संस्कृतींच्या अवांछित आलिंगनापासून निर्माण होणाऱ्या जातींची फार मार्मिकपणे मीमांसा केली आहे.

Wherever we find an intelligentsia in existence we may infer not only that two civilizations have been in contact, but that one of the two is in the process of being absorbed into the other's internal proletariate. An intelligentsia is born to be unhappy. This liason class suffers from the congenital unhappiness of the bastard and the hybrid who is an outcaste from both the families that have guiltily combined to beget him. An intelligentsia is hated and despised by its own people because its very existence is a reproach to them. The essence of intelligentsia's profession is mimesis. The incipid mechanicalness of mimesis and the pathological distortion and abandoned vulgarity are apt to result from the division of labour.

स्वतःकडे बुद्धीचा मक्ता घेणारा सुधारकांचा वर्ग कुठेही अस्तित्वात आलेला दिसला की तेवढ्यावरून तिथे दोन संस्कृतींचा संगम झाला असून त्यांपैकी एक संस्कृति दुसरीला आत्मसात् करून दासी बनवीत असली पाहिजे, असें अनुमान निघतें. हा सुधारक वर्ग जन्मतः दुःखी आणि दुर्मुखलेला असतो. विभिन्न कुटुंबांतील व्यक्तींच्या पापी मीलनापासून जन्मलेला लेकवळा, किंवा विभिन्न वंशांतील व्यक्तींच्या मीलनापासून जन्मलेला संकर (युरो-भारतीय अथवा आंग्ल-हिंदु) हे जन्मतःच समाजबाह्य आणि वंशबाह्य असल्याने मनस्तापाने पीडलेले असतात. त्यांच्याप्रमाणेच सुधारकही वंशबाह्य नसले तरी समाजबाह्य बनल्याने नित्य मनस्ताप अनुभवीत असतात. ज्या संस्कृतीत सुधारक जन्माला येतात, त्या संस्कृतीचे सनातनी अनुयायी त्यांचा तिरस्कार आणि द्वेष करतात. कारण या सुधारकांचें अस्तित्वच पारतंत्र्याशी निगडित झालेलें असतें. सुधारकांचा धंदाच मुळी जेत्यांचें अनुकरण करण्याचा असतो. त्यामुळे पुष्कळदा हें अनुकरण कसें यांत्रिक अनुकरण बनतें आणि त्याने संभावितपणाच्या मर्यादा सुटून मानसिक विकृति कशा निर्माण होतात, हें जाणत्या लोकांना सहज कळेल. संभावितपणाच्या मर्यादा सुटून मानसिक विकृति प्रकट करणाऱ्या सुधारकांचें सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे महादेव मोरेश्वर कुंटे हे होत. असो. ज्यांना या भ्रष्ट सुधारकवर्गाचा सविस्तर अभ्यास करावयाचा

असेल, त्यांनी टॉयनबींनी त्या वर्गाची केलेली चिकित्सा मुळातूनच वाचावी. त्यांच्या पूर्वी स्वत: लेनिननेही पश्चिम युरोपातील समाजाचें अनुकरण करणाऱ्या रशियातील सुधारकांचा उद्धार केलेला आहे. याच भ्रष्ट वर्गाचें किंचित् वास्तववादी वर्णन 'मालाकारां'नी निबंधमालेत प्रसंगानुरोधाने केल्यामुळे सारे सुधारक त्यांच्यावर दातओठ खात असतात, त्यात काहीच नवल नाही. पण स्वत:ला साम्यवादी म्हणवून घेणारे लेखक जेव्हा या सुधारकांचा पक्ष उचलून चिपळूणकर-टिळकांवर शस्त्र चालवितात, तेव्हा मात्र त्यांची कीव आल्यावाचून राहात नाही.

न हिंदुर्न यवनः

खिरस्ती संस्कृतीने पछाडलेल्या सुधारकांचे पुढारी रावबहादूर रानडे हे हिंदूंना आपल्या जाळ्यात पकडण्याकरिता केव्हा केव्हा स्वत:ला प्रॉटेस्टंट हिंदु म्हणवून घेत असले तरी मार्टिन ल्यूटरच्या स्वातंत्र्यप्रीतीचा आणि विद्रोही वृत्तीचा लवलेश त्यांच्या अंगी नव्हता. ते वस्तुत: जगन्नाथ पंडितांनी निंदिलेल्या 'शिव शिव न हिंदुर्न यवनः' या पंथाचे प्रमुख होते, हें त्यांच्या 'I am neither Hindu nor Mahomedan' या उद्‌गारांवरून उघड आहे. 'अकबराने जसा आपल्या साम्राज्यातल्या सर्व धर्मांच्या एकीकरणाकरिता दीने इलाही नांवाचा धर्म काढला, तसाच धर्म आपणांस स्थापन करावयाचा आहे, असें माधवरावांनी या भाषणात आणखी म्हटलें आहे.' (फाटककृत रानडेचरित्र पहिली आवृत्ति पान ५४०) नवरोजच्या निमित्ताने हिंदु नारी निवडून त्यांचा भोग घेणें ही दीने इलाहीच्या प्रस्थापकांची आवडती करमणूक होती, ही गोष्ट लक्षात ठेविली म्हणजे रानड्यांच्या दीने इलाहीचें पर्यवसान खान-मालिनी प्रकरणात कां झालें, हें वाचकांना सहज कळेल. असल्या रानड्यांच्या उलट टिळक हे मुख्यत: हिंदुराष्ट्रवादी होते.

हिंदुराष्ट्रवादी टिळक

'हिंदुत्व आणि सुधारणा' या लेखात टिळकांनी स्पष्ट म्हटलें आहे: "कोणत्याही सुधारणेचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जाग्रत करणें हा होय. तो अभिमान आम्ही कोणता धरावयाचा ? अर्थात् हिंदुत्वाचा होय. आम्हांला धर्माची काही एक परंपरा आहे. त्या परंपरेत जें ज्ञान आहे, तें इतर धर्मांतील ज्ञानाच्या बरोबरीने, किंबहुना त्याहूनही श्रेष्ठ आहे. आणि ही परंपरा आम्ही सोडून दिल्यास आमचें असें म्हणण्यासारखें सामान्य बंधन काहीच नाही.' (केसरी १२-१-१९०४)

त्याच्याच पुढच्या अंकात 'इंग्रजी शिकलेल्यांचा एकांगीपणा' यावर लिहिताना टिळक म्हणतात :

'हिंदुस्थानात तीन चार धर्म प्रचलित आहेत. म्हणून हिंदुधर्मास राष्ट्रीयत्व नाही, हें म्हणणें चूक आहे. केवळ लोकसंख्येच्या मानाने पाहिलें तरीही हिंदूंचा समुदाय मोठा आहे आणि हा एवढा मोठा समूह ज्या बंधनाने एकत्र झाला आहे तें बंधन हिंदुत्व हेंच होय. हें बंधन मोडून टाकणें, किंवा त्याची उपेक्षा करून तें दृढ न राखणें म्हणजे हिंदुस्थानातील दोन तृतीयांश प्रजा वाळूच्या कणांप्रमाणे सैरावैरा मोकळी सोडणें होय. अशा रीतीने हिंदुत्व मोडल्याने राष्ट्रीय दृष्टचा पुढे चांगले परिणाम होतील, असें जर कोणास वाटत असेल, तर तो निवळ भ्रम होय. हिंदुस्थानातील तीस कोटि प्रजेस एकत्र आणण्याकरिता हिंदुत्वाव्यतिरिक्त दुसरीही काही साधनें पाहिलीं पाहिजेत हें खरें; पण त्याच्याबरोबर हेंही लक्षात ठेविलें पाहिजे की तीस कोटींपैकी वीस कोटि प्रजा हिंदुत्वाने एकत्र झालेली आहे, तिचें बंधन टिकविणें हें राष्ट्रीय दृष्टचा अधिक सोयीचें, शक्य आणि आवश्यक आहे. सारांश कोणतीही समाजसुधारणा करावयाची झाल्यास हें राष्ट्रीयत्वाचें धोरण लक्षात ठेवूनच झाली पाहिजे.'

जिनसीवाले यांचा आदर्श

आगरकरप्रभृति मित्रमंडळींच्या संगतीने टिळकही काही काळ नास्तिक बनले असावेत, अशी शंका येते. 'धर्माच्या नादाने माणसाचें सामर्थ्य वाया जातें, धर्म हें संस्कृतीचें अत्यावश्यक अंग नाही, त्याला फाटा देऊनही संस्कृतीची अभिवृद्धि होऊ शकते,' असले विचार आगरकरांनी १४-५-१८८५ या दिवशी डेक्कन कॉलेजच्या वार्षिक संमेलनाच्या प्रसंगी बोलून दाखविले आणि त्यांच्या म्हणण्याचें टिळकांनी समर्थन केलें, असें फाटकांनी रानड्यांच्या चरित्रात लिहिलें आहे. ही माहिती खरी असल्यास तिचा अर्थ एवढाच होतो की, टिळक तेव्हा अजून आगरकरी विचारांच्या तावडीतून सुटले नव्हते. त्यामुळेच पुढे आपले गुरु जिनसीवाले यांच्या जीवनाचें साफल्य सांगताना टिळकांनी पुढील चिरस्मरणीय उद्गार काढले आहेत :

'सामान्य प्रतीच्या निश्चयी पुरुषाच्या बुद्धीतही इंग्रजी विद्येने हिंदु धर्म, हिंदु आचार, हिंदु गृहस्थिति यासंबंधाने व्यामोह उत्पन्न होऊन त्याबद्दलच्या त्याच्या मतात आणि आचारात एक प्रकारचा दुहेरीपणा अथवा द्विधाभाव उत्पन्न होत असतो. पाश्चात्य आणि पौरस्त्य सुधा-

रणांची सध्या जी टक्कर चालू आहे, तिच्यात इंग्रजी शिक्षणाने सुशिक्षित झालेल्या वर्गाच्या मनाची स्थिति अशी होणें स्वाभाविकच आहे; अशा रीतीने ते आपल्या मनाचें समाधान करून घेत असतात. हे त्यांचे विचार बरोबर नाहीत, असें प्रतिपादण्यास प्रो. जिनसीवाले हें एक चांगलें उदाहरण होतें. मी हिंदु आहे, माझा धर्म वैदिक आहे, त्या धर्माच्या परंपरेने ईश्वरोपासनेचा जो मार्ग लावून दिला आहे, तो बदलण्याची काही आवश्यकता नाही. तो मला पाळला पाहिजे. त्यातच माझें आणि माझ्या देशाचें कल्याण आहे. सारांश मी हिंदु आहे, हिंदु राहीन, हिंदु मरेन, आणि हिंदुत्वानेच आपला अभ्युदय केव्हाना केव्हा तरी संपादन करीन, असा त्यांचा पूर्ण विश्वास होता. तो विश्वास बदलण्यास पाश्चात्य शिक्षणाचें निमित्त इतर सुशिक्षित हिंदु पुढे आणतात तें खरें नाही, असें त्यांनी आपल्या उदाहरणावरून सिद्ध केलें आहे.'

कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या राज्यारोहणाच्या प्रसंगी लिहिलेल्या लेखातही 'हिंदुत्वाचा योग्य अभिमान बाळगून त्याच्या अभ्युदयाकरिता निष्काम बुद्धीने देह झिजविणें हें कोल्हापूरकर महाराजांचें कुलव्रत' असल्याचें टिळकांनी त्यांना स्मरण करून दिलें होतें. वस्तुतः पाहता हिंदु संस्कृतीचा अभिमान म्हणजे शाश्वत मूल्यांचा अभिमान होय. वेदापासून उपनिषदांपर्यंतचें श्रौत वाङमय हें शाश्वत वाङमय आहे. तसेंच रामायण-महाभारतांसारखी अद्वितीय आणि अनन्यसामान्य महाकाव्येंही शाश्वत काव्यें आहेत. यांच्या प्रेरणेने निर्माण झालेलीं मंदिरें, मूर्ति आणि चित्रें हींही आदर्शाने शाश्वत आहेत. हें जें अमूल्य आणि शाश्वत सांस्कृतिक ऐश्वर्य आपल्याला केवळ हिंदुधर्मात जन्मल्यामुळे, हिंदुमंदिरात जाऊन तेथील कथाकीर्तनें ऐकण्याचे श्रम घेतल्यामुळे सहज प्राप्त झालें आहे, त्याचा अभिमान न बाळगणें हें केवळ कपाळकरंटेपणाचें लक्षण आहे.

धर्मनिष्ठ स्वतंत्रतावाद्यांचा बुद्धिवाद्यांशी विरोध

हिंदुधर्म आणि हिंदुराष्ट्र यांचा अभिमान बाळगणारे चिपळूणकर-टिळक हे स्वधर्माच्या अभिमानाने स्वातंत्र्यवादी बनले असल्याने त्यांच्या प्रयत्नाने आणि प्रभावाने स्वतंत्रतेची आकांक्षा बाळगणारा जो बुद्धिजीवी वर्ग महाराष्ट्रांत अस्तित्वात आला, तो आगरकरांनी मिल्लप्रभृतींपासून उसना घेतलेल्या बुद्धिवादाचा कट्टा शत्रु बनला. कारण या परोपजीवी बुद्धिवादाचा आघात नेहमी स्वधर्मावरच होत असतो. स्वधर्माशी शत्रुत्व करणाऱ्या अन्य धर्मांवर होत नाही, हें सत्य आपल्या निधर्मी राज्यकर्त्यांच्या उदाहरणावरूनही आपल्याला सुविदित झालें आहे.

टिळकांच्या काळी आगरकरप्रभृति बुद्धिवादी स्वधर्माला धाब्यावर बसविण्याचा उपदेश करीत होते. त्याच वेळी त्यांच्या पंथातील न्यायमूर्ति रानड्यांच्यासारखे नेते राज्यकर्त्यांच्या प्रेषितांचा आपल्या आदर्शात अंतर्भाव करून धर्मक्षेत्रातही त्यांचें नेतृत्व जित हिंदु समाजावर लादण्याचा प्रयत्न करीत होते. उलट पक्षी असल्या सरकारजमा न्यायमूर्तींकडून आणि त्यांच्या सरकाराकडून हिंदुराष्ट्राला न्याय मिळणें अशक्य आहे, हीच गोष्ट हिंदुत्वनिष्ठांच्या मनावर बिंबविण्याकरिता टिळकांनी १८९३ आणि १८९४ मध्ये मुसलमानी दंग्यांच्या निमित्ताने लिहिलेल्या लेखांचा आणि भरविलेल्या सभांचा उपयोग करून घेतला. स्वधर्म आणि स्वधर्मी राष्ट्रबंधु यांना न्याय मिळवून देण्याच्या निग्रहावरच स्वातंत्र्याच्या आंदोलनाची प्रगति अवलंबून असल्याने स्वतःची अस्मिता जागरित झालेला टिळकपंथी बुद्धिजीवी वर्ग सुधारकांच्या बुद्धिवादाच्या सुरेला अथवा सुरीला मुळीच बळी पडला नाही. निधर्मी अनियंत्रित सत्तेच्या स्वधर्मविरोधी धोरणाविरुद्ध आणि स्वधर्मबंधूंवरील अन्यायाविरुद्ध आंदोलनें उत्पन्न करून टिळकपक्षाने ख्रिस्त्यांच्या राज्याचें नैतिक अधिष्ठानच नष्ट केलें. कारण सेंट ऑगस्टाईननेसुद्धा म्हटलें आहे :

If you take away justice, kingdoms are nothing but robber possessions.

ज्या राज्यांतून न्याय मिळण्याची आशा नाही, तें वस्तुतः दरवडेखोरांचें राज्य.

धर्म आणि लोकसत्तावाद

निधर्मी विचारवंत आणि धर्मनिष्ठ विचारवंत यांच्यामध्ये विचारसरणीच्या प्रभेदामुळे एक मोठी दरीच निर्माण झाली आहे. निधर्मी विचारवंत हे समाजनियंत्रणाच्या बाबतीत सर्वस्वी शासनसंस्थेवर अवलंबून असतात. त्यांच्या उलट धर्मनिष्ठ विचारवंत हे समाजाचें नियंत्रण मुख्यतः धर्माकडून होत असल्याने समाजनियंत्रणाच्या कार्यात धर्माला साहाय्य करणें हेंच काय तें शासनसंस्थेचें कर्तव्य मानतात. पहिल्या वर्गाचा धर्मावर मुळीच विश्वास नसल्यामुळे त्याला अराजक अथवा मात्स्यन्याय ही समाजाची नैसर्गिक अवस्था वाटते आणि या अराजकाच्या हातून समाजाचें संरक्षण करण्याकरिता हा वर्ग शासनसंस्थेच्या हाती अनियंत्रित सत्ता समर्पण करण्याचा पुरस्कार करतो. या वर्गाच्या उलट धर्मनिष्ठ विचारवंत हे धर्माचें नियंत्रण मानीत असल्यामुळे शासनसंस्थेच्या हाती अनियंत्रित सत्ता समर्पण करण्याला निकराने विरोध करतात. मात्स्यन्यायाच्या मानीव भीतीने निधर्मी बुद्धिवाद्यांनी एखाद्या

विदेशी आणि विधर्मी सरकाराला आपली निष्ठा अर्पण केली असली तर वर उल्लेखिलेल्या दोन वर्गांतील कलह तीव्रतर होतो. रानडे-आगरकरांसारख्या निधर्मी नेत्यांना ही साधी गोष्ट कळत नव्हती की, धर्मछळाचा अथवा धर्मातील हस्तक्षेपाचा प्रतिकार करण्याच्या पायावरच स्वतंत्रतेचा आणि लोकसत्तावादाचा प्रासाद उभारला जातो, 'अर्वाचीन शासनसंस्था' (*Modern State*) या ग्रंथात टोरोंटो विद्यापीठाचे आचार्य मॅक्‌इव्हेर यांनी लिहिलें आहे :

When absolute Government sought to enforce a State religion (or when it interfered with the religion of the subjects), it attacked the profound convictions of the persecuted and stimulated them to forward not merely the doctrine of toleration, but the more revolutionary distinction between legitimate rule and tyranny. From the latter, it was an easy step to assert the right of the people to depose the tyrant and so the doctrine of the absolute sovereignty of the people was born.

अनियंत्रित सत्ताधाऱ्यांनी सरकारी रीत्या प्रजेवर राज्यकर्त्यांचा धर्म लादण्याचा प्रयत्न केला (अथवा अन्य प्रकारे बहुसंख्य प्रजेच्या धर्मांत हस्तक्षेप केला) तर त्या प्रजेच्या मूलगामी श्रद्धांवरच आघात होतो आणि मग ती दलित, विडंबित प्रजा राज्यकर्त्यांकडून केवळ धार्मिक सहिष्णुतेचीं आश्वासनें मिळवून स्वस्थ न बसता आपल्यावरील राज्य हें रामराज्य नसून रावणराज्य असल्याचें ओळखून तें उलथून पाडण्याच्या तत्त्वाचें समर्थन करू लागते. अशा प्रकारे स्वधर्मसंरक्षणाच्या आणि स्वधर्मशत्रूंचा काटा काढण्याच्या प्रेरणेपासूनच लोकसत्तावादाचा जन्म झाला आहे. मॅक्‌इव्हेरसारख्या परदेशी राज्यशास्त्रज्ञांच्या विवेचनावरूनही भारतातील इंग्रजविरोधी आंदोलनाचा आणि भारतीय लोकसत्तेचा पाया हिंदुधर्माच्या अभिमानात, पुनरुज्जीवनात आणि तत्प्रीत्यर्थ विधर्मी आणि विदेशी राज्य उलथून पाडण्याच्या सिद्धतेतच असल्याचें कळून येतें. टिळकांच्या विरोधकांना म्हणजे राष्ट्रीय सभेच्या सुधारक सूत्रधारांना लोकसत्तेचें सोयरसुतक काहीही नव्हतें. त्यांची मागणी एवढीच होती की परक्या सरकारने, स्वधर्मबंधूंचें शत्रुत्व पत्करून सुधारक म्हणविणाऱ्या काळ्या इंग्रजांचाही राज्यकर्त्यांच्या जातीत समावेश करावा. देशातील बहुजनसमाजाचें, ह्यूमप्रभृति इंग्रजांइतकेंच त्यांचे अनुयायी जे काळे इंग्रज, त्यांनाही भय वाटत होतें. याविषयीचे असंख्य आधार राष्ट्रीय सभेच्या प्रतिवृत्तांतून काढून देता येतील.

काळ्या इंग्रजांनी केलेला स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार

टिळकांच्या काळी या काळ्या इंग्रजांना ख्रिस्ती समाजाशी समरस होण्यात घरातील सनातनी स्त्रियांचें सहकार्य लाभत नसे, ही एक त्यांच्या प्रगतीच्या मार्गांत फार मोठी धोंड होती. त्या काळी पारशी लोक आपल्या स्त्रियांसह राज्यकर्त्यांच्या समाजात मिसळत असल्याने त्यांची झपाट्याने आर्थिक प्रगति होत असलेली पाहून महाराष्ट्रीय सुधारकांच्या अंतःकरणांनाही आपल्या स्त्रिया पारशी स्त्रियांचें अनुकरण कधी करतील, असा घोर लागून राहिला होता. रानडेपंथी सुधारकांच्या विकृत मनोवृत्तीची चर्चा करताना स्वतः टिळकांनीच एकदा असे उद्गार काढले आहेत की, "ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी लाखो लोकांना बाटविल्याचें यांना दुःख होत नाही, पण महाराष्ट्रीय अबलांचीं दुःखें पाहून मात्र यांचा ऊर भरून येतो !" वास्तविक पाहता महाराष्ट्रीय स्त्रियांना आपल्या समाजात जितकें सुख लाभत असे, तितकें सुख उत्तरेकडील प्रांतांतील स्त्रियांना कोठेच लाभत नसे. त्यामुळे त्या प्रांतातून पुरुषांच्या संख्येच्या मानाने स्त्रियांची संख्या ठिकठिकाणी उणी असल्याचें आढळून येतें. त्याच्या उलट महाराष्ट्रात आणि विशेषतः रानडे आगरकरांसारख्या सुधारकांच्या चित्पावन जातीत पुरुषसंख्येपेक्षा स्त्रियांची संख्या अधिक असते, ही परिस्थिति प्रसिद्ध आहे. या दृष्टीने विचार केला असता आपल्या प्रांतात अबलोन्नतीची आगरकरी आंदोलनें करण्याचें काहीच कारण नव्हतें. पण अशीच चळवळ करावयाची की जिच्या योगाने सरकारी अधिकाऱ्यांची तरी कृपादृष्टि आपल्याकडे वळेल, किंवा सुंदर नि संपन्न स्त्रियांची कृपादृष्टि आपल्याकडे वळेल, या सुधारकांच्या अलिखित नियमाला अनुसरून त्यांच्या साऱ्या चळवळी चालत असल्यामुळे त्यांनी स्वकर्तृत्वाच्या सीमा ओळखून अबलोन्नतीचीं आंदोलनें आरंभिणें स्वाभाविक होतें. असल्या अबलोन्नतिवाल्या आगरकरांच्या जाळ्यात टिळक काही काळ तरी कसे अडकले होते, याचेंच नवल वाटतें. पण टिळकांना आपल्या तपस्विनी मातेविषयी पराकाष्ठेचा आदर वाटत असल्याने ते काही अंशी त्याच भावनेने स्त्रीजातीकडे पहात असत. आपल्या पत्नीला त्यांनी कधी चरणस्पर्श करू दिला नव्हता, या एका वैशिष्ट्यपूर्ण गोष्टीवरूनही त्यांच्या हृदयाची सहृदयांना कल्पना येऊ शकेल.

अद्वैती चिपळूणकरांचा स्वातंत्र्यवाद आणि द्वैतवादी रानड्यांचा पापवाद

अर्वाचीन महाराष्ट्राचे पहिले महात्मे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी जेव्हा 'आमच्या देशाची स्थिति' हा अमूल्य प्रबंध लिहून, अंधतमात निमग्न झालेल्या आत्म्याला अकस्मात् स्वस्वरूपाची जाणीव द्यावी, त्याप्रमाणे अज्ञानांधकारात निमग्न झालेल्या आणि क्षुद्र प्राणिवृत्तीला पोषक अशा सुधारकी सुखवादाच्या मायापाशात गुरफटलेल्या महाराष्ट्राला जेव्हा स्वस्वरूपाचें यथार्थ ज्ञान करून देऊन आपलें नैसर्गिक आणि ऐतिहासिक स्वातंत्र्य पुनश्च प्राप्त करून घेण्याच्या आणि त्याचें सयत्न संरक्षण करण्याच्या चिरंतन कर्तव्याची जाणीव करून दिली, तो क्षण या महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासातील पवित्रतम क्षण म्हटला पाहिजे. या निबंधात शास्त्रीबोवांनी अद्वैत वेदान्ताला अनुसरून असें प्रमेय प्रतिपादिलें होतें की, काही काळ मस्तकावर अकस्मात् आघात झाल्यामुळे आमच्या राष्ट्राची शुद्ध हरपली होती, त्याचें स्वस्वरूपाचें ज्ञान नष्ट झालें होतें, यापलीकडे त्याच्या प्रकृतीला कसलाही अपाय, अथवा विघातक विकार झालेला नाही. 'दास्याला मात्र पात्र तो मंद' अशी आपल्या देशाची अवस्था नसून स्वातंत्र्याचा तो निसर्गतःच अधिकारी आहे. त्याची वर्तमानकालीन दुर्दशा केवळ परदास्यामुळे झाली असून त्याच्या सर्व रोगावरील औषध स्वातंत्र्य हेंच आहे. राजकीय अद्वैतवादाचे आचार्य चिपळूणकर हे जेव्हा निबंधमालारूपी हेमगर्भाच्या प्रभावाने महाराष्ट्राची अस्मिता जाग्रत् करीत होते, त्याच वेळी द्वैतमतवादी प्रार्थनासमाजाचे अध्वर्यु माधवाचार्य रानडे हे "असू आम्ही अतिपतित दुराचारी। तूचि होउनि बा, सदय अम्हां तारी ॥" अशी आकाशातील प्रभूसहच पृथ्वीवरील प्रभूंचीही प्रार्थना करीत होते. ही केवळ महाराष्ट्रातील रानडेसंप्रदायाची अवस्था होती, असें नव्हे; तर भारतीय नवसुशिक्षितांपैकी ज्यांच्या ज्यांच्या मनावर द्वैती खिरस्ती धर्मोपदेशकांच्या दुःखवादी प्रचाराचा न्यूनाधिक प्रमाणात प्रभाव झाला होता, ते सारेच रानड्यांच्याप्रमाणे पापवादी, म्हणजे आम्ही पापी आहोत, पतित आहोत, या मंत्राचा अखंड जप करणारे भ्रांत पथिक बनले होते. याचें तत्कालीन सर्वांत सुप्रसिद्ध उदाहरण म्हणजे ब्राह्मोसमाजाचे एक प्रमुख नेते केशवचंद्र सेन यांचें होय. या पंथाच्या वैयक्तिक पापांशीं प्रस्तुत लेखकाला काहीच कर्तव्य नाही. पण राष्ट्राचा तेजोवध करण्याचें पाप करून हे महान् पापी बनले होते, हें ऐतिहासिक सत्य इतिहासकार या नात्याने येथे सांगणें भाग आहे.

अस्मितारक्षणाचा उपदेश

शास्त्रीबोवांनी आपल्या निबंधमालेचा प्रारंभ 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' या निबंधापासून केला. कारण भाषा हाच राष्ट्राचा आत्मा. भाषा शुद्ध राखली तरच त्या राष्ट्रातील समाजाला आपली जीवनधारा शुद्ध, सतेज, स्वाभाविक आणि स्वत्वसंपन्न अशी राखण्याची चाड असल्याची सकृद्दर्शनीच जाणीव होते. यासाठीच शास्त्रीबोवांनी या लेखात महाराष्ट्राला आपली भाषा इंग्रजीच्या आक्रमणापासून अविकृत राखण्याच्या आवश्यकतेची जाणीव करून दिली होती.

"सध्याप्रमाणे इंग्रजी शब्दांची आणि रचनेची आपल्या भाषेत सतत भेसळ होत गेली तर तिचें स्वरूप पालटता पालटता असें होईल की ती इंग्रजीपासून निवडता येणार नाही, आणि तिच्या मूळच्या रूपाचा मागमूसही राहणार नाही. असें झाल्यावर मग 'आपल्या भाषेस असे असे लाभ झाले' असें म्हणताना त्या 'आपल्या' या शब्दात काही अर्थ राहिला काय ? मराठीस वर सांगितलेली सरूपता मुक्तिच मिळाल्यावर तिचा आधीचा देह कोठे राहिला ? यास्तव मोक्षमुल्लर महाशयांनी आपल्या देशातील लोकांस जो धर्माच्या बाबतीत उपदेश केला आहे, तोच आम्ही एतद्देशीय भाषासंबंधी त्यांस करतो. म्हणजे जर आपण सर्व इंग्रज आणि ख्रिस्ती बनलो तर आपलेपणा अर्थात् समूळ विनष्ट झाला; मग आमच्या देशाचें आम्ही पुनरुज्जीवन केलें, हे शब्द सहज विगतार्थ झाले. त्याप्रमाणेच जर मराठी भाषा होता होता इंग्रजीच बनली, तर आपल्या लोकांचा तीत ग्रंथ लिहिण्याचा अट्टहास सर्व केवळ व्यर्थ झालासें होईल."

या अवतरणात चिपळूणकरांनी निर्दिष्ट केलेलें, भाषा आणि धर्म अविकृत राखण्याचें कार्य वरिष्ठ वर्गाकडून होत नाही. कारण वरिष्ठ वर्ग आणि त्याचे दास, अथवा अर्वाचीन परिभाषेत बोलावयाचें म्हणजे भांडवलवाले आणि त्यांचे श्रमिक, कामगार हे सारे विश्वमानव (Cosmopolitan) असतात. यामुळे मध्यम वर्ग आणि विशेषत: खालचा मध्यम वर्ग यांच्याकडून राष्ट्रनेत्यांना, अथवा नियतीला स्वभाषा आणि स्वधर्म अविकृत राखण्याचें कार्य करवून घ्यावें लागतें. चिपळूणकरांप्रमाणेच टिळकही अद्वैतवादी असल्याने त्यांनीही गणेशोत्सव आणि शिवाजी उत्सव यांच्या द्वारा महाराष्ट्राला स्वस्वरूपाचें ज्ञान करून देण्याचें आणि स्वातंत्र्य हा मानवाचा नैसर्गिक अधिकार असल्याचा प्रचार करण्याचें त्यांचें व्रत अखंड चालविलें.

टिळकचिपळूणकरांच्या त्यागाचें खरें स्वरूप

कोणताही देश राज्यक्रांति घडवून आणण्याला परिपक्व करा--वयाचा असल्यास त्या देशातील बुद्धिजीवी वर्गाचे नेते हे पंडितांची राजाश्रयावर अवलंबून जीवन कंठण्याची प्रथा मोडून सरकारी अधिकाराचा त्याग करून स्वावलंबी बनतात. क्रांतिशास्त्राच्या ग्रंथातून याला 'Desertion of the Intellectuals' म्हणजे बुद्धिजीवी वर्गाने केलेला सरकारचा त्याग अशी संज्ञा देतात. अशा प्रकारे सरकारचा त्याग करण्याची परंपरा महाराष्ट्रात चिपळूणकर आणि टिळक यांनीच निर्माण केली. आपल्या लेखकवर्गात त्याग शब्दाचा जो रूढ अर्थ आहे, त्या अर्थाने टिळक-चिपळूणकरांनी केलेल्या त्यागाला किती महत्त्व द्यावें, यासंबंधीच्या चर्चा अनेकांनी केल्या आहेत. पण या त्यागाचें वास्तविक स्वरूप काय होतें याची त्यांना काहीच कल्पना नाही. मोठ्या घटनेची लहान घटनेला उपमा द्यावयाची झाल्यास असें म्हणता येईल की, चिपळूणकरांनी सरकारी सेवेचा त्याग करून रत्नागिरीहून केलेलें प्रयाण मुहम्मद पैगंबरांनी मक्केहून केलेल्या प्रयाणाच्याच जातीचें होतें. पैगंबरांच्या प्रयाणाने मूर्तिपूजक मक्केत एकेश्वरी धर्माची स्थापना झाली आणि चिपळूणकरांच्या प्रयाणाने महाराष्ट्रात राष्ट्रधर्माची स्थापना झाली. नंदराज्यात राज्यक्रांति घडवून आणणाऱ्या आर्य चाणक्यांनीही प्रथम आपण नंदांचा त्याग केला आणि इतर द्विजांना त्यांचा त्याग करावयाला लावून मग त्या कुलाचा निःपात केला.

> 'दग्ध्वा संभ्रान्तपौरद्विजगणरहितान् : नंदवंशप्ररोहान्
> दाह्याभावान्न खेदाज्ज्वलन इव वने शाम्यति क्रोधवह्निः ॥'

अशा प्रकारे ज्या बुद्धिजीवी वर्गाला प्रथम स्वावलंबनाची आणि नंतर क्रमाक्रमाने सरकारविरोधी पक्षाची, क्रांतिपक्षाची दीक्षा द्यावी लागते, त्या वर्गात मुख्यतः लेखक, शिक्षक आणि धर्मप्रचारक यांचा समावेश होतो. या वर्गाला राजाश्रयावर अवलंबून राहण्याची सवय असते आणि तो प्राप्त करून घेण्याची आकांक्षाही असते. पण या वर्गाला स्वतःच्या योग्यतेप्रमाणे लोकाश्रय मिळविणेंही शक्य असतें. टिळकचिपळूणकरांच्या पूर्वी महाराष्ट्रातील लेखकवर्ग हा सामान्यतः राजाश्रयावर म्हणजे शिक्षणविभागाच्या आश्रयावर अवलंबून असे. शिक्षकवर्गाचीही तीच स्थिति होती आणि धर्मप्रचारक हरदासांचा वर्ग सरकारचा आश्रित नसला तरी तो वैराग्याचा आणि संन्यासमार्गाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार

करीत असल्यामुळे अभ्युदयाचा मार्ग क्रमू इच्छिणाऱ्या राष्ट्रीयपक्षाला त्याचा उपयोग होत नव्हता. अशा परिस्थितीत सरकारवर अवलंबून नसलेला नवीन बुद्धिजीवी वर्ग निर्माण करण्याकरिता टिळकचिपळूणकरांनी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. टिळकचिपळूणकरांच्या या हेतूविरुद्ध वर्तन करणाऱ्या आगरकरगोखल्यांनी टिळकांशी असह्यकारिता करून त्यांना दक्षिणशिक्षासंस्थेचें त्यागपत्र द्यावयाला लावल्यानंतर टिळकांनी विधिविशारदांचा वर्ग चालविला, तोही याच हेतूने. टिळकांच्या प्रमाणेच त्यांचे सुप्रसिद्ध सहकारी बिपिनचंद्र पाल आणि लाला लाजपतराय यांनीही बंगाल पंजाब प्रांतांत सरकारची सेवा न करण्याच्या शपथा घेतल्या होत्या. अशा प्रकारे सरकारपक्षाचा त्याग करण्याच्या शपथा घेतलेल्या विद्वानांनाही भाडयाने घेण्याचा प्रयत्न सरकार करीत असे. वर्तमानपत्रांच्या प्राथमिक अवस्थेत तींही सरकारच्या आश्रयावरच अवलंबून होती, कारण त्या दिवसांत वाचकांच्या वर्गणीवर अवलंबून पत्र चालविणें अवघडच असे. टिळकांचे वृत्तपत्रव्यवसायातील गुरु शिशिरकुमार घोष, यांना बंगालचे दुय्यम राज्यपाल सर ॲश्ले ईडन यांनी अशीच राजाश्रयाची लालूच दाखविली होती, पण 'आपल्या प्रांतात एक तरी प्रामाणिक वर्तमानपत्र असावें असें नाही कां आपल्याला वाटत ?' असा निर्भीड प्रश्न करून शिशिरबाबूंनी त्यांची सूचना झिडकारली. टिळकांच्या 'ओरायन' या ग्रंथाची पाश्चात्य विद्वानांनी प्रशंसा केल्यानंतर मुंबई प्रांताच्या शिक्षणविभागाने तो ग्रंथ छापण्याला किती द्रव्य लागलें याची चौकशी करून तितक्या मूल्याच्या प्रती विकत घेऊन त्या ग्रंथाला आश्रय दिला होता. यामुळे पुढे 'आर्क्टिक होम इन दि वेदाज' अथवा आर्यांचें मूलस्थान हा ग्रंथ प्रसिद्ध केल्यानंतर त्याच्याही काही प्रती सरकारने घ्याव्यात, अशी टिळकांनी विनंती केली होती. त्या विनंतीचा विचार करून सरकारने पन्नास प्रतींची मागणी करीपर्यंत त्याची आवृत्तिच संपून गेली होती. या घटनेवरून टिळक हे त्या काळी राजाश्रयाच्या कक्षेपलीकडे गेले असल्याचें कळून येतें.

गोखल्याकडून दीक्षित आणि गोऱ्यांचे आश्रित संन्यासी

चिपळूणकर आणि टिळक हे महाराष्ट्रातील बुद्धिजीवी वर्गाला याप्रमाणे परक्या राज्यकर्त्यांचा त्याग करून क्रमाने सरकारविरोधी आणि क्रांतिवादी बनण्याला साहाय्य आणि मार्गदर्शन करीत असताना रानडे, आगरकर, गोखले हे सारे सरकारी निर्बंधांच्या सामर्थ्याने समाजसुधारणा घडवून आणण्याच्या निमित्ताने त्याच वर्गाला पुनश्च

शासनाभिमुख बनविण्याचा प्रयत्न करीत होते. संमतिवयाच्या निर्बंधाला टिळकांनी निकराने विरोध करण्याचें हें एक महत्त्वाचें कारण होतें. सामान्य दंडविधानाच्या मर्यादेपलीकडील उच्च नैतिक सुधारणा सरकारी निर्बंधांच्या द्वारा समाजावर लादू नयेत, हें सर्वमान्य तत्त्व आहे. व्याकरणाच्या परिभाषेत बोलावयाचें म्हणजे असल्या सुधारणांचा प्रसार विध्यर्थी असावा, तो आज्ञार्थी नसावा. रानडेपक्षाप्रमाणे सुधारणांचा आज्ञार्थी प्रचार करणें म्हणजे आपल्या प्रचाराचा पंगूपणा आणि विचार-सरणीचा विदेशीपणा सरकारी दंडविधानाने झाकण्याचा प्रयत्न करणेंच होय. असा विवेक करूनच टिळकांनी ' मुलीचें लग्न सोळा वर्षांचे आत करू नये, वीस वर्षांचे आत मुलाचें लग्न करू नये, पुरुषाचें लग्न चाळीस वर्षांपुढे होऊ नये, त्यानंतर विवाह करावयाचा असल्यास तो विधवेशी करावा, दारू पिऊ नये, हुंडा घेऊ नये, विधवेचें वपन करू नये, प्राप्तीचा विसावा भाग सार्वजनिक कामाकडे द्यावा' असे समाजसुधारणेचे नियम पाळण्याचे निर्बंध सुधारकांनी स्वतःवर लादून घ्यावेत आणि ते मोडल्यास सरकारकडून स्वतःला शासन करून घेण्याला मान्यता द्यावी, असा विधायक प्रचार केला होता. पण ही त्यांची स्वावलंबी सुधारकाची भूमिका सरकारी निर्बंधाने सुधारणा करू इच्छिणाऱ्या पक्षाला रुचली नाही. कारण सुधारणाप्रचाराचा त्यांचा मुख्य हेतु १८५७ पासून आपल्या समाजकारणात सरकारी हस्तक्षेप सहन न करणाऱ्या भारतीय समाजाला पुनश्च परक्या राज्यकर्त्यांना अभिमुख बनविणें हाच होता. त्याच्या उलट महाराष्ट्रीय समाजाला इंग्रजविन्मुख बनविणें हें तर टिळकांचें उद्दिष्ट होतें. परक्यांची राजवट संपवून स्वराज्यस्थापना घडवून आणावयाची असल्यास बुद्धिजीवी वर्गाला प्रथम परक्या राज्यकर्त्यांचा त्याग करावा लागतो, हें न कळणाऱ्या आणि न रुचणाऱ्या गोखल्यांनी आर्थिक त्याग पत्करून (?) परक्या राज्यकर्त्यांना आलिंगन देण्याला सिद्ध झालेल्या भारतसेवकांसाठी टेकडीच्या पायथ्याशी एक आश्रम बांधून ठेविला आहे. या आश्रमातील राजकीय संन्यासी कसे बकसंन्यासी बनले, हें ' जय स्वार्थत्याग ' असें वदून परस्परांना वंदन करणाऱ्या पुणेकरांना माहीत आहे.

बुद्धिजीवी वर्गाचें ऐतिहासिक कार्य

राज्यकर्त्या वर्गाने संपादिलेलें राज्य स्वतःच्या सामर्थ्याने अथवा बुद्धिप्रभावाने संपादिलेलें नसून खोटे कागद करून, वेळोवेळी संधिभंग करून, आपल्यावर उपकार करणाऱ्यांच्यावर अघोर अत्याचार करून

प्राप्त करून घेतलेलें अधर्मराज्य असल्याने अपरिहार्यपणे नष्ट होणार असल्याचा प्रचार करून प्रजापक्षाचें नीतिधैर्य वाढविणें हें राज्यकर्त्यांना विन्मुख झालेल्या बुद्धिजीवी वर्गाचें प्रमुख कार्य असतें. शिवाजीच्या काळी 'बुडाला औरंग्या पापी, नष्ट, चांडाळ घातकी। अभक्तांचा क्षयो झाला आनंदवनभूवनी।' असा प्रचार करून मराठ्यांच्या तरवारीला अपरिहार्य विजयाची धार देण्याचें कार्य समर्थांच्या सांप्रदायिकांनीच केलें. फ्रेंच राज्यक्रांतीच्या प्रसंगी मानवांच्या नैसर्गिक अधिकारांची घोषणा करून बुद्धिजीवी वर्गाने फ्रान्समधील सामंतवर्गाचा मोठ्या प्रमाणावर निःपात घडवून आणला. रशियातील राज्यक्रांतीच्या प्रसंगी तेथील बुद्धिजीवी वर्गाने विरोधविकासवादाप्रमाणे राज्यक्रांति घडणे कसें अपरिहार्य आहे, हें जनतेला पटवून दिलें. अशा प्रकारचे कार्य महाराष्ट्रातील बुद्धिजीवी वर्गाकडून करवून घेण्याकरिता प्रथम सरकारच्या मर्यादित आश्रयावर जगू शकणार नाहीत इतके सुशिक्षित शिक्षणाच्या गिरण्यांतून निर्माण करणें आणि नंतर या बुभुक्षित सुशिक्षितांना देशकार्याला जुंपणें असा दुहेरी कार्यक्रम प्रथमपासून टिळकांच्या डोळ्यांपुढे होता. या कार्यक्रमाला अनुसरून क्रांतिकार्याची मुहूर्तमेढ उभी करीत असताना टिळकांना एका अपरिहार्य संकटाला तोंड द्यावें लागलें. तें हें की त्या काळी महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार नवीनच होत असल्याने तेव्हा पहिल्या प्रतीचे बुद्धिमान् लोक बहुतकरून सरकारसेवेत समाविष्ट होत, त्यामुळे उरल्या सुरल्या बुभुक्षित अर्धशिक्षितांतून पहिल्या प्रतीचे बुद्धिमान् अनुयायी टिळकांना लाभणें अशक्य झालें. त्यातून टिळकांचे 'परममित्र' आगरकरांसारखे काही सुशिक्षित लोक पाश्चात्य संस्कृतीच्या मोहिनीला वश झाल्याने समाजविन्मुख बनले होते. म्हणजे राजमान्य रानड्यांच्या सरकारसेवेच्या पंथाचे पथिक आणि आपल्याच विचित्र विचारसरणीने समाजविन्मुख बनलेल्या आगरकरांच्या सुधारणापंथाचे पथिक, तसेच पंढरीच्या पुरातन पंथाला वाहून घेतल्यामुळे नवीन जगाकडे डोळेझाक करणारे पथिक अशा त्रिदोषाने पंगु झालेल्या समाजातून जीं काही मानसिक दृष्ट्या सुदृढ असलेलीं माणसें टिळकांच्या पक्षाला लाभलीं, त्यांचाच सदुपयोग करून वर उल्लेखिलेल्या त्रिदोषाने समाजाला आलेलें पंगुत्व टिळकांनी नष्ट केलें. इतकेंच नव्हे तर समाजविन्मुख सुधारकांचें माहात्म्य नष्ट करून आणि सरकारपक्षाच्या दमननीतीवर मात करून त्यांनी विसाव्या शतकातील बुद्धिजीवी तरुणपिढी ही उघडपणे सरकारविरोधी बनविली. ही वस्तुस्थिति प्रस्तुत लेखकाने स्वतःच डोळ्यांनी पाहिली आहे. वंदे मातरम् या घोषणेला बंदी करणारे

परिपत्रक, विद्यार्थ्यांना राजकीय सभेला जाण्याची बंदी करण्याचें परिपत्रक, इत्यादि परिपत्रकें हीं वस्तुतः बुद्धिजीवी वर्गाला सरकारविरोधाची दीक्षा देण्यासाठी टिळकांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय पक्षाने चालविलेल्या युद्धातील युद्धक्षेत्रेंच होत. असल्या साऱ्या युद्धक्षेत्रांतून सरकारचा सपशेल पराजयच झाला, पण हा किंवा असले अन्य विजय टिळकांनी कोणत्या तुटपुंज्या साधनसामग्रीच्या साहाय्याने संपादिले, याचें वर्णन करताना टिळकशत्रु बापूराव आंबेकर लिहितात : "टिळकांच्या स्वभावामुळे शहाणी आणि हिंमतवान् (?) माणसें त्यांच्या सावलीसही उभी रहात नसत. यामुळे अगदी सामान्य आणि गांवात गांवगुंडीबद्दल प्रसिद्ध असलेलीं माणसेंच त्यांना संग्रही ठेवावीं लागत. नाना प्रकारचीं कारस्थानें करून आणि क्लृप्त्या लढवून प्रतिपक्ष्यांवर जय मिळविणें हेंच त्यांच्या चळवळीचें ध्येय असल्यामुळे असलीं माणसें त्यांच्या चांगलीं उपयोगीही पडत. सरकारप्रमाणे त्यांचाही गुप्त हेरविभाग असून तो विभाग चालविण्याला या लोकांची सहकारिता त्यांना उत्कृष्ट उपयोगी पडत असे." टिळकांच्या शत्रूंनी दिलेली ही मान्यता अतिशय महत्त्वाची आहे. मात्र धैर्यधर व्यक्ति टिळकांच्या सावलीसही उभ्या रहात नसत, असें जें आंबेकरांनी लिहिलें आहे, तें विधान निव्वळ द्वेषमूलक आहे. वस्तुतः गोखल्यांच्यासारख्या भेकड व्यक्ति टिळकांच्या सावलीलाही उभ्या रहात नसत, त्यांच्या उलट पुण्यातील पुष्कळसे साहसी लोक टिळकांच्या संग्रही असत.

लॉर्ड विलिंग्डनच्या सभेतून टिळकांचा सभात्याग

आपल्या आयुष्याच्या उंबरठ्यावर टिळकांनी केलेला इंग्रज राज्यकर्त्यांचा त्याग, हा चिपळूणकरांच्या त्यागपत्राप्रमाणे एखाद्या नाट्यमय प्रसंगाने जनतेच्या नेत्रांत भरला नसला तरी त्यांच्या आयुष्याच्या अंतिम पर्वात लॉर्ड विलिंग्डन यांच्या युद्धपरिषदेतून टिळकांनी केलेला सभात्याग स्वराज्यप्राप्तीप्रीत्यर्थ केलेल्या प्रयत्नांच्या इतिहासात चिरस्मरणीय होऊन राहिला आहे. युरोपातील युद्ध निकरावर आलें असताना भारतीय जनतेचें इंग्रजांना साहाय्य लाभावें, या इच्छेने मुंबईच्या राज्यपालांनी लोकनेत्यांची एक परिषद बोलाविली होती. त्या परिषदेत टिळकांनी स्वराज्य दिल्यास आम्ही इंग्रजांना साहाय्य करण्यास सिद्ध आहोत असें प्रतिपादण्याचा प्रयत्न केला असता स्वराज्य शब्दाला बुजून लॉर्ड विलिंग्डन यांनी त्यांना बोलण्याला बंदी केली असताना त्यांनी सरळ सभात्याग केला आणि लगेच पुढच्या 'केसरीत' भर्तृहरीच्या मय्यप्यास्था न चेत्ते त्वयि मम सुतरां एष राजन् गतोऽस्मि।" (न गणसि

मज जातो तुच्छ मानूनि तूतें) या अवतरणाने मंडित झालेल्या लेखात त्यांचा खरपूस समाचार घेतला. टिळकांनी इंग्रजसेवेच्या मोहाचा त्याग केला, तेव्हा त्यांच्या इष्टमित्रांनी त्यांचा उपहासच केला होता. पण १९१८ मध्ये लॉर्ड विलिंग्डन यांनी केलेला अपमान सहन न करता टिळकांनी जेव्हा सभात्याग केला, तेव्हा भारतातील बहुसंख्य जनतेने त्यांचा जयजयकारच केला. १८८० पासून १९१८ पर्यंतच्या काळात जनमानसमंदिरात ही जी क्रांति घडून आली होती, ती बऱ्याच अंशीं टिळकांच्या उदाहरणाने घडून आली होती.

ईश्वरी योगायोग कां सैतानी योगायोग

वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड क्लाईव्ह इत्यादि मानवी सैतानांच्यामुळे हिंदुस्थान इंग्रजांचा अंकित झाला होता. हें वस्तुतः देशावर अरिष्ट ओढवलें होतें. संत तुकारामांनी एका सर्वतोमुखी झालेल्या अभंगात म्हटलें आहे : 'आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालोनीया।' पण गेल्या शतकातील महाराष्ट्राचे विचाराग्रणी मानलेले न्यायमूर्ति रानडे आपल्यावर ओढवलेल्या आपदेलाच ईश्वरी योगायोग मानू लागले आणि या आपदेतून आपली सुटका होण्याकरिता देवावर भार घालण्याचेंही विसरून गेले ! गेल्या शतकाच्या उत्तरार्धात भारताचें दास्य हा ईश्वरी योगायोग असा प्रचार रानड्यांनी आणि त्यांच्या अनुचरांनी निकराने चालविला असतानाच या ईश्वरी योगायोगाला बळी पडण्याच्या बेताला आलेल्या जपान देशाचे एक नेते बॅरन केंतारो कानेको यांनी १८९२ मध्ये पाश्चात्य देशांशी जपानने कसें वर्तन ठेवावें, या प्रश्नावर तेव्हाचे विख्यात तत्त्वज्ञानी हर्बर्ट स्पेन्सर यांचा अभिप्राय मागविला होता. तेव्हा त्यांनी पुढील सुस्पष्ट शब्दांत त्या उदीयमान राष्ट्राला उपदेश केला :

"अमेरिकन आणि युरोपियन लोकांचा जपान देशाशी होता होईल तों ईश्वरी योगायोग येऊ देऊ नका. नेहमी त्यांना शक्य तितकें दूर राखा. त्यांच्याशी संबंध ठेवणें आवश्यकच असल्यास तो केवळ व्यापार, पुस्तकें, यंत्रें इत्यादींच्या क्रयविक्रयापुरताच मर्यादित ठेवा. विशेषतः जीं प्रबळ राष्ट्रें आहेत त्यांच्याशी वागताना तर अत्यंत जपून रहा. जपान देशात त्यांचा पाय नित्याचा कोठेही रोवला जाणार नाही, याची डोळ्यांत तेल घालून काळजी घ्या. अनेक उपाय करून देशाचे राज्यकारभारात त्यांनी एकदा आपला हात शिरकविला की पुढे त्यांचें स्वरूप पालटतें आणि त्यांच्या संबंधांना धनी-दासांच्या संबंधाचें

स्वरूप कसें प्राप्त होतें, हें पहावयाचें असल्यास हिंदुस्थान देशाकडे एकवार दृष्टिक्षेप केलात तरी पुरे. युरोपियन लोकांस जपानच्या ओसरीत विऱ्हाड करण्याची एकदा अनुज्ञा दिलीत की ते साऱ्या देशात हातपाय पसरण्याचा उपक्रम करतील. मग अर्थात् त्यांचे स्थानिक जपानी जनतेशी भांडणतंटे उपस्थित होऊ लागतील. या तंट्यांचे खापर जपानी लोकांच्या डोक्यावर फोडून त्यांचा सूड उगविण्याचा ते आपल्या सरकारला आग्रह करतील, नंतर स्वदेशबांधवांच्या हानीची भरपाई करून घेण्याच्या निमित्ताने जपानचे काही प्रांत बळकावून तिथे ते आपला उपनिवेश स्थापन करतील आणि तो एकदा टिकला म्हणजे क्रमाने हिंदुस्थानाप्रमाणे ईश्वरी योगायोगानेच सारा जपान देश ते व्यापून बसतील. मग जपानी लोकांनाही त्या ईश्वरी योगायोगाला अनुसरून स्वतःला पाश्चात्यांचे दास म्हणवून घ्यावें लागेल. याकरिता युरोपियनांना स्वदेशात कोणीही जपान्याने आपली भूमि अथवा घरवाडी विकत अथवा दीर्घकालीन भाडेपट्ट्याने देऊ नये. देशात खाणी खणण्याची अनुज्ञाही त्यांना देऊ नये. जपानच्या सागरतीराने होणाऱ्या अंतर्गत वाहतुकीच्या व्यापारात त्यांचा प्रवेश होऊ देऊ नये. शेवटची महत्त्वाची गोष्ट ही की, जपानी जनांनी पाश्चात्य जनांशी शरीरसंबंध करू नयेत. कारण समान वर्णांच्या आणि समान संस्कृतींच्या पोटविभागात शरीरसंबंध झालेली प्रजा वरीच श्रेष्ठ निपजून तिच्यात उभय पक्षांचे गुण उतरतात. पण अत्यंत भिन्न अशा दोन वर्णांमध्ये जर बेटीव्यवहार झाला तर त्या संकरापासून झालेली प्रजा निकृष्ट प्रतीची निपजेल. तिच्यात उभयतांचीं व्यंगे आणि दोष मात्र उतरतील. याचें उदाहरण पहावयाचें असल्यास भारतातील युरेशियन मिश्र संततीकडे पहा. ”

हर्बर्ट स्पेन्सर यांनी हा उपदेश जपानला १८९२ मध्ये केला असला तरी आपण जिवंत असेपर्यंत तो प्रसिद्ध करण्याला त्यांनी अनुज्ञा दिली नव्हती. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर १९०४ मध्ये तो प्रसिद्ध झाला. अर्थात् या उपदेशाची टिळकपक्षाला तादृश आवश्यकता नव्हतीच. कारण त्यांचीं सारीं आंदोलनें या श्रेष्ठ समाजशास्त्रज्ञांच्या उपदेशाला अनुसरूनच चाललीं होतीं, पण ईश्वरी योगायोगवाल्या विरोधी पक्षाच्या नाकात काड्या घालण्यापुरता तरी त्यांना हर्बर्ट स्पेन्सरच्या गुप्त संदेशाचा उपयोग झाला. या संदेशाच्या प्रकाशनानंतरच श्यामजी कृष्णवर्मा यांच्यासारखे स्पेन्सरभक्त पूर्ण स्वातंत्र्यवादी बनले.

पुण्याचे सुधारक समाजशत्रु

हर्बर्ट स्पेन्सर यांच्या उलट, पुण्यातले रानडेगोखलेपंथी सुधारक हे कसे हिंदुसमाजाचें शत्रुत्व करीत होते, हें स्वत: गांधीनीच १-४-१९३२ या दिवशी येरवड्यातील आपल्या सहकाऱ्यांना समजावून सांगितलें.

I asked Deodhar for a brief note on their activities, so that I would see what I could do. This note advised that we should deliver speeches before Harijan meetings and create in them a consciousness of the injustice done to them by Hindu society. I said to Deodhar, "Here you give me a stone when I asked you for bread; we cannot serve Harijans in this fashion. It is not service but patronage pure and simple. Who are we to uplift Harijans ? We can only atone for our sin against them, or discharge the debt we owe to them. And this we can do only by adopting them as equal members of society and not by haranguing to them. " and Hari Narayn Apte was very angry. I said to him, "I am afiaid, you will make Harijans rise in rebellion against society." Apte replied, "Yes, let there be a rebellion. That is just what I want. "

वरील संभाषण १९१५ मध्ये गांधी भारतसेवकसमाजात रहात असताना घडून आलें. तेव्हा ते समाजाचे सभासद बनण्याचा विचार करीत होते, म्हणून त्यांनी गोपाळराव देवधरांजवळ सभासदांनी करावयाच्या कामासंबंधी एक टिपण मागितलें. त्या टिपणात देवधरांनी, अस्पृश्य समाजापुढें भाषणें करून हिंदु समाजाने त्यांच्यावर केलेल्या अन्यायाची त्यांना जाणीव करून देणें, याही कामाचा उल्लेख केला होता. हें पाहून गांधी उद्गारले, 'भाकरी मागितली तर धोंडा देण्यापैकी हा प्रकार आहे ! अशा प्रकारे आपण अस्पृश्यांची सेवा करू शकत नाही. ही त्यांची सेवा नसून आपण त्यांच्यावर उपकार करण्याची ऐट मिरविण्याचा हा प्रकार आहे. अस्पृश्यांचा उद्धार करणारे आपण कोण ? त्यांच्या बाबतीत आपण जे अन्याय केले आहेत, त्यांचें प्रायश्चित्त घेणें हें आपलें काम आहे; किंवा त्यांचें ऋण फेडणें हें आपलें काम आहे. आपण त्यांना समाजात समान स्थान देऊनच त्यांचें ऋण फेडू शकू. हें बोलणें ऐकून शास्त्री चमकले आणि हरिभाऊ आपटे संतापले. तेव्हा गांधी पुढे म्हणाले, "तुमच्या प्रचाराने तुम्ही अस्पृश्यांना समाजाविरुद्ध बंड करावयाला चिथावीत आहा." आपट्यांनी उत्तर दिलें, "होय, अस्पृश्यांनी बंड करावें, हीच माझी मनीषा आहे." या संवादावरून टिळकांशी वैर

करणाऱ्या या समाजबहिष्कृत अथवा समाजबाह्य सुधारकांची भूमिकाच कशी समाजविघातक होती, याची वर्तमानकालीन वाचकांना अंशतः कल्पना येईल. आगरकरपंथी सुधारकांची भूमिका समाजविधातक होती, असें म्हटल्याने कोणत्याही सुबुद्ध व्यक्तीला नवल वाटण्याचें कारण नाही. आगरकर हे स्वतःला बुद्धिवादी म्हणवून घेत होते. पण केवळ बुद्धिवाद हा देवाच्या सृष्टीला आग लावून देऊ शकतो, तो प्रतिसृष्टि निर्माण करू शकत नाही. स्वतः टिळकांनी बाबासाहेब खापर्ड्यांशी बोलताना म्हटलें होतें :

"नुसत्या बुद्धीने काही मनुष्य, 'मनुष्य' बनत नाही. स्फूर्ति ही नेहमी अंतःकरणालाच होते. आत्म्याचें खरें स्वरूप अंतःकरणातच आहे, बुद्धीत नाही. यामुळेच पाश्चात्य तत्त्ववेत्ते चुकतात. विश्वातली खरीं कोडीं केवळ बुद्धीने सुटत नाहीत. त्याला अंतःकरणच लागतें." समाजाच्या एका भागाला दुसऱ्या भागाविरुद्ध बंड करावयाला चिथावणाऱ्या सुधारकांना हेंही कळत नव्हतें की समाजातील सर्वजण एकमेकांच्या मुक्ततेसंबंधी दायी आहेत. आपण आपल्या इतर समाजबंधूंस समाजाविरुद्ध बंड करावयाला चिथावून परवशतेत आणि अज्ञानात तसेच खितपत राहू देऊ तर परमेश्वराचा द्रोह केल्याचें महत्पाप आपल्या माथी बसेल. स्वतःची उन्नति आणि मुक्ति प्राप्त करून घेण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे सर्वांची उन्नति आणि मुक्तता होण्याकरिता झटणें हा होय.

धर्मनिष्ठ हिंदूंचें भय

टिळकांनी राजकारणात प्रवेश केला, तेव्हा इंग्रज सरकार जर कोणाला भीत असलें, तर तें धर्मनिष्ठ हिंदूंना भीत होतें. विपिनबाबूंनी *Nationality and Empire* या ग्रंथात लिहिलें आहे :

The Government was exceedingly nervous about the fearful possibilities of any sudden outburst of the ancient superstitions and fanaticism of the people. The new spirit of freedom called into being by English education was, therefore, not only welcomed but openly encouraged by the authorities especially as it took the form of a revolt against the current faiths and established social institutions of the people wherein really lay the source of possible danger to the new political order in the country. The spirit of freedom always and everywhere grows out of some sense of painful bondage. And the only real sense of bondage in the generation which was first possessed by the spirit of new illumi-

nation had reference to their social and religious life. There was as yet really little or no sense of bondage in the community in the political field. The spirit of political freedom was so far not indigenous but imported, imitative not natural, imaginative if not even fanciful and not real. (pp. 291)

या अवतरणात बिपिनबाबूंनी सांगितलें आहे की, इंग्रजी शिकून ज्यांना नवीन ज्ञानाचा प्रकाश लाभला होता, अशा विद्वानांनी प्रचलित धर्मविरुद्ध आणि सामाजिक बंधनांच्या विरुद्ध बंड उभारलें, यामुळे सरकारने त्यांच्या या समाजविरोधी बंडाला उत्तेजनच दिलें. कारण इंग्रजी राज्याला धोका होता, तो धर्मनिष्ठेपासून आणि सामाजिक ऐक्यापासूनच होता. दास्याच्या शृंखला ज्यांना खुपतात, त्यांच्याच अंतःकरणातून स्वातंत्र्याच्या वाऱ्याचा संचार होतो. त्यामुळे ज्यांना हिंदु समाजातील धार्मिक आणि सामाजिक जीवन (मुख्यतः पाद्री लोकांच्या शिकवणीमुळे) खुपू लागलें होतें, त्यांनी स्वधर्माविरुद्ध आणि स्वसमाजाविरुद्धच बंड केलें. त्या दिवसांत आपल्या समाजात राजकीय दास्याची जाणीवही अस्तित्वात नव्हती. इंग्रजी शिक्षितांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनासुद्धा स्वदेशी नसून त्या विदेशी आणि विजातीय होत्या. त्या अनुकरणावर आधारलेल्या होत्या. नैसर्गिक नव्हत्या. त्या काल्पनिक होत्या आणि वास्तव नव्हत्या.

बिपिनचंद्र पाल हे स्वतः सुधारक आणि ब्राह्मणेतर होते. यामुळे ते जेव्हा सांगतात की त्यांचे आणि टिळकांचे समकालीन सुधारक हे केवळ इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाने, किंवा पाद्री लोकांच्या प्रेरणेने हिंदु धर्माचे मारेकरी बनले असल्याने सरकार त्यांना उत्तेजन देत होतें आणि यांची स्वातंत्र्यप्रीतिही काल्पनिक आणि नकली होती, तेव्हा त्यांच्या अभिप्रायाला योग्य तें महत्त्व दिलेंच पाहिजे. या सुधारकांनी केलेला व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार, (independence) हा वस्तुतः अनधीनतेचा अर्थात् सामाजिक अराजकाचा पुरस्कार होता. या अराजकातूनच पुढे गांधींचा राजकीय अराजकवाद निर्माण झाला, असें म्हणता येईल.

खोटया इतिहासाचे कारखानदार

आगरकरपंथी बुद्धिवादी हे परंपरेचे शत्रु असल्याने राष्ट्रीय इतिहासाचे दुहेरी शत्रु बनले होते. कारण स्वदेशाचा इतिहास लुप्त केला म्हणजे समाजात आपल्या नव्या विचारांचा अथवा अविचारांचा प्रचार करणें सोपें जाईल, अशी त्यांची भावना झाली होती. पण राष्ट्रीय इति-

ह्रास हें अस्मितासंरक्षणाचें आणि तिच्या संवर्धनाचें एक प्रमुख साधन असल्यामुळे चिपळूणकरांनी 'इतिहास' हा सुप्रसिद्ध निबंध लिहून आपल्या इतिहासविन्मुख देशात त्या विषयासंबंधी आस्था आणि उत्सुकता नव्यानेच निर्माण केली आणि नंतर तिचा पायाशुद्ध पद्धतीने परिपोष करण्याकरिता 'काव्येतिहाससंग्रह' हें मासिक चालू करून इतिहासाचा साधार अभ्यास करणाऱ्यांची महाराष्ट्रात अद्यापि अखंडित असलेली परंपरा निर्माण केली. त्यामुळे इतिहास सर्वस्वी लुप्त करण्याची अपेक्षा आणि आकांक्षा सोडून देऊन राष्ट्रीय परंपरेच्या शत्रूंनी आता खोटा इतिहास लिहिण्याचे कारखाने चालू केले आहेत, इतकेंच नव्हें, तर खोट्या 'इतिहासा'च्या आवश्यकतेचें आणि उपयुक्ततेचें समर्थन आरंभिलें आहे! असल्या खोट्या इतिहासांचे दिखाऊ पांडित्याने सजविलेले आदर्श म्हणूनच न. र. फाटकांचें 'आदर्श भारतसेवक गोखले' आणि डॉ. माथुर यांचें 'गोखल्यांचें राजकीय जीवन' (गोखले, ए पोलिटिकल बायॉग्रफी) यांसारखे टिळकनिंदाप्रचुर ग्रंथ लेखनकामाठ्यांकडून बनविले जात आहेत. या चरित्रकारांच्या दुर्दैवाने याच वेळी त्यांचे आदर्श भारतसेवक गोखले हे तत्कालीन एका भारतसेवकाचे कसे दासानुदास होते, हें सिद्ध करणारें 'Servant of India' या नावानेच राजप्रतिनिधि लॉर्ड मिंटोंचे कार्यवाह डनलॉप स्मिथ यांचें चरित्र इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झालें आहे. असो.

दम्यामुळे देशभक्त बनलेले आगरकर

वर विवेचन केल्याप्रमाणे चिपळूणकरांनी जशी पूर्ण विचारपूर्वक सरकारपक्षाकडे पाठ फिरविली होती, तशी काही गोखल्यांनी ज्यांच्यापासून टिळकद्वेषाचे धडे घेतलें, त्या आगरकरांची स्थिति नव्हती. आगरकरांना स्वतंत्र शिक्षणसंस्था काढण्याची जी प्रेरणा झाली, ती मुख्यतः त्यांच्या दम्याच्या विकारामुळे. या दुर्धर दम्याच्या विकारामुळे त्यांचा विमा उतरविण्याला कोणतीही विमामंडळी सिद्ध झाली नाही. यावरूनच त्यांच्या प्रकृतीची पुरेशी कल्पना येते. या प्रकृतिदौर्बल्यामुळे वैद्यकीय तपासणीतून उत्तीर्ण होऊन सरकारी शिक्षणविभागात त्यांना काम मिळणें अशक्य होतें. यामुळे ते मारून मुटकून देशभक्त बनले होते. पुढे शाळा आणि महाविद्यालय काढल्यानंतर त्यांना संस्थेच्या संघटनात्मक आणि प्रचारकी कार्याचा भार स्वतःच्या शिरावर घेऊन चार लोकांसमोर पुढारी म्हणून मिरविण्याची संधि साधण्याच्या मार्गातहि हेंच विघ्न उपस्थित झालें आणि त्यामुळे टिळकांच्याकडे पुढारीपद

जाऊ लागलेलें पाहून आगरकर हे स्वतःच्या प्रकृतिसहच टिळकांचा द्वेष करू लागले. असें क्रमाक्रमाने आगरकरांचें तनुमन दूषित आणि दुष्ट झाल्यामुळेच त्यांना अकाली मरण आलें. आगरकरांनी जेव्हा टिळकांसह विष्णुशास्त्र्यांची भेट घेऊन नवी शाळा काढण्याचा संकल्प केला, तेव्हा त्यांना अशी कल्पनाही आली नव्हती की, केवळ पुण्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या आणि अखंड भारताच्या भावी नेतृत्वाची माळही भवितव्यतेने टिळकांच्या गळ्यात घातली होती.

विष्णुशास्त्र्यांच्या उंबरठ्यावर

बाळगोपाळांची जोडी जेव्हा विष्णुशास्त्र्यांच्या अराजनिष्ठ उंबरठ्यावर पोचली, तेव्हाच भवितव्यतेने तिच्या लाडक्या बाळाला प्रश्न विचारले असतील, "बाळा, राजमान्यतेची आणि राजनिष्ठेची लक्ष्मणरेषा ओलांडून लोकमान्यतेच्या, पण अराजनिष्ठेच्या मठीत पाऊल टाकावयास सज्ज झाला आहेस, तर ही रेषा ओलांडणाऱ्या सीतेप्रमाणेच बंदीजीवन, निर्वासित जीवन, भूमिगत जीवन यांचा तुला अनुभव घ्यावा लागेल, याची तुला कल्पना आहे ना ? या मठीत दारिद्र्य, स्वजनांचा बहिष्कार, तिरस्कार आणि उपहास, त्याप्रमाणेच निंदा, बंदिशाला, व्याधि आणि अपमृत्यु यांची जी अदृश्य पूतनापूतना तुझीच प्रतीक्षा करीत बसली आहे, तिला आपलें विकराल रूप व्यक्त करण्याकरिता तुझ्याच निर्दोष रुधिरपानाची तहान लागली आहे, याची तुला जाणीव आहे ना? ही पूतनापूतनाच नव्हे तर तुला इथे घेऊन येणारे तुझे जिवाभावाचे मित्र, तू जवळ केलेले 'गोपाळ' तुझा द्वेष करतील, परशत्रूशी संगनमत करून तुला बंदिशालेत कोंडण्याला उतावीळ होतील हें पाहून तुझा हृदयभंग होणार नाही ना? आज ज्या जेसुइट पंथाच्या स्वार्थत्यागाच्या आदर्शाच्या आकर्षणाने तू प्रतिसृष्टीच्या निर्मितीला सिद्ध होत आहेस, त्या नवनिर्मितीच्या ध्येयाचा, तुझ्याशी असह्यकारिता करणाऱ्या नामधारी सहकाऱ्यांच्या निंदाव्यंजक ठरावामुळे तुला त्याग करावा लागेल, हें योग्य वेळी तुला कळणार आहे ना ? भलत्या लोकांवर विश्वास ठेवून श्रेष्ठ आदर्शांचा पाठलाग करण्यात आपलें यौवन आणि जीवन, धन आणि मान व्यर्थ नष्ट झाल्याचा तुला पश्चात्ताप होणार नाही ना ? तसें असल्यास तू या **अल्पायु** सत्यवानाच्या मठीत मृत्युंजयी सावित्रीच्या निर्धारासह पाऊल टाक. नाही तर सरकारकडे आवेदन करून तू न्यायालयात त्या न्यायमूर्तीप्रमाणे एखादा न्यायाधीश होऊन बैस." भवितव्यतेने सुचविलेला हा दुसरा मार्ग वासुदेव बळ-

वंतांच्या नामजोश्यांसारख्या सहकाऱ्यांशी टिळकांचा घनिष्ठ संपर्क असल्यामुळे त्यांना पूर्वीच बंद झाला होता. पण त्या संपर्कामुळे होणारा उपसर्ग कमी व्हावा, एवढ्यापुरता टिळकांनी सरकारकडे अधिकारपद मागण्याच्या आवेदनाचा उपयोग केला, सरकारच्या समाधानाकरिता आणि आपल्या सार्वजनिक जीवनाच्या निर्वेधपणाकरिता असली शाब्दिक राजनिष्ठा व्यक्त करण्याच्या उपायाचा टिळकांना आपल्या जीवनात दोन चार वेळा तरी उपयोग करावा लागला आहे.

पतीचें ध्येय तें पत्नीचें ध्येय

टिळक वासुदेव बळवंताकडे अथवा विष्णुशास्त्र्यांकडे जाऊ लागले तेव्हा ते विवाहित होते. पण तत्कालीन परंपरेप्रमाणे पतीचें ध्येय तेंच पत्नीचें ध्येय (कळत नव्हेच, पण नकळत तरी) असल्याने त्यांना कधी पत्नीच्या विरोधाचा विचार करावा लागत नसे. वाल्झाक्प्रमाणे त्यांना कधी असें म्हणावें लागत नसे :

I must boldly follow my destiny and lift my eyes to a higher level than a woman's apron strings. I shall rule unchallenged in the intellectual life of Europe.

पत्नीच्या पदरापेक्षा अधिक उच्च पातळीपर्यंत दृष्टि उंच करून मला माझें दैव जिथे नेईल, तिथे धैर्य धरून गेलें पाहिजे. तरच मी युरोपच्या सारस्वत साम्राज्यात एकछत्री राज्य करू शकेन. याप्रमाणे बौद्धिक क्षेत्रात एकछत्री राज्य करण्याच्या स्वप्नात टिळक दंग झाले असताना त्यांचे दुर्दैवी सहकारी आगरकर हे स्वतःच्या शारीरिक यातनाना विसरण्याचा उपाय म्हणून टिळकद्वेषात दंग होत होते. 'नीतितत्त्वांची वंशावळ' या ग्रंथात नीत्शेने म्हटलें आहे :

Every sufferer, in fact, searches instinctively for a cause of his suffering, to put it more exactly a doer, to put it still more precisely, a sentient responsible doer, in brief, something living, on which, either actually or in effigy, he can on any pretext vent his emotions. For, the venting of his emotions is the sufferer's greatest attempt at alleviation, that is to say, stupefaction, his mechanicaly desired narcotic against pain of any kind.

याचा सारांश असा : प्रत्येक रोग्याला असें वाटत असतें की कोणी तरी एक विशिष्ट व्यक्ति आपला रोग, यातना वाढण्याला कारणीभूत असून तिच्यावरील आपला राग काढला आणि तिच्या द्वेषाची मदिरा सेवन केली म्हणजे आपल्या यातना कमी होतील. याच

भावनेने टिळकांचे मित्रवर्य आगरकर टिळकांचा द्वेष करीत होते. याचा परिणाम असा झाला की स्वार्थत्यागाच्या पथावर टिळकांना पत्नीकडून जो विरोध होऊ शकला नाही, तो त्यांच्या मित्रांकडून झाला. नीत्शेच्या या स्पष्टीकरणामुळे टिळक आणि आगरकर यांच्या कलहांचा मानसशास्त्राच्या दृष्टीने चांगला उलगडा होतो.

टिळक आणि रूस्सो

टिळक आणि महाराष्ट्रीय सुधारक यांचे परस्परसंबंध काही अंशी रूस्सो आणि त्याचे समकालीन फ्रेंच तत्त्वज्ञ यांच्या परस्परसंबंधांसारखेच होते. आरंभी रूस्सोची गणना जशी फ्रेंच तत्त्वज्ञांच्या गटातच होत होती, तशीच टिळकांचीही प्रारंभी आगरकरांच्या मित्रमंडळातच गणना होत होती. स्वातंत्र्य आणि लोकसत्ता यांच्या पुरस्कारामुळेच रूस्सो, समकालीन तत्त्वज्ञांपासून आणि टिळक समकालीन सुधारकांपासून विभक्त झाले. 'Man is born free, but is everywhere found in chains' म्हणजे मानव हा जन्मतः स्वतंत्र असला तरी सर्वत्र तो बंधनात पडलेलाच आढळतो, हें जें रूस्सोच्या विचारसरणीचें प्रमुख सूत्र होतें, तें वेदांती टिळकांना पूर्णपणे मान्य होतें. या सूत्राच्या अनुरोधाने टिळक लोकस्वातंत्र्याकरिता झटत असले तर त्यांचे प्रतिपक्षी सुधारक हे फ्रेंच तत्त्वज्ञांचें आपल्या अल्पमतीप्रमाणे आणि अल्प शक्तीप्रमाणे अनुकरण करून नवविद्याविभूषित एकतंत्री राज्यकर्त्यांच्या (Enlightened despots) कृपेने लोकस्थिति सुधारण्याचे, अथवा पाद्रीप्रेरित सुधारणा राजसत्तेच्या द्वारा लोकांवर लादण्याचा प्रयत्न करीत होते. फ्रेंच तत्त्वज्ञांच्या प्रमाणेच भारतीय सुधारक हे वाचेने धर्मशत्रुत्वाचा आणि कृतीने स्वैराचाराचा प्रचार करीत होते. त्यांच्या उलट परिणतप्रज्ञ झालेल्या रूस्सोप्रमाणेच टिळकही धर्माचे उद्धारक आणि सामाजिक नीतीचे पुरस्कर्ते होते. या विशिष्ट विषयात रहस्यकार टिळक हे धर्मप्रकरणातील त्यांच्या अधिकारामुळे आणि निरपवाद नीतिनिष्ठ वर्तनामुळे चंचल मतीच्या आणि चंचल वर्तनाच्या रूस्सोहून फार श्रेष्ठ होते, हें सांगावयाला नकोच. आपल्या वैयक्तिक उत्कर्षाच्या आणि सार्वजनिक जीवनाच्या मार्गात व्यत्यय नको म्हणून रूस्सोने आपलीं मुलें जन्मतःच अनाथालयात पाठविलीं होतीं. असलें कर्तव्यभ्रष्ट वर्तन टिळकांनी केलें नसलें तरी आपलीं अपत्यविषयक कर्तव्यें त्यांनी आपल्या सार्वजनिक कार्याच्या आड कधीही येऊ दिलीं नाहीत. सौंदर्यवादी रूस्सोने निसर्गसौंदर्यात रमण्याच्या आणि उच्च वातावरणात

तल्लीन होण्याच्या निमित्ताने आपल्या अनुयायांना गिरिकंदरातून भ्रमण करावयाला लाविलें, तर टिळकांनी भारताच्या भूतकालातील भव्योदात्त प्रसंगांचा प्रत्यक्ष परिचय करून घेण्याकरिता महाराष्ट्रीय तरुणांना गिरिकंदरांतून भ्रमण करण्याला प्रवृत्त केलें. रूसोप्रमाणेच टिळकही लोकमताला शिरोधार्य मानीत, इतकेंच नव्हे तर प्रत्येक राष्ट्राच्या ऐतिहासिक परंपरेशी सुसंगत असें जें लोकमत, तेंच खरें राष्ट्रमत, असा त्या उभयतांचा सिद्धान्त होता. रूसो हा मूळचा आपल्याच पक्षाचा असून पक्षद्रोह करून तो आपल्यातून फुटून गेला, अशा समजुतीने फ्रेंच तत्त्वज्ञांचा कळप त्याचा द्वेष आणि छळ करीत असे. याच कारणाकरिता महाराष्ट्रातील सुधारकांनी टिळकांचा, ते विद्यमान असतानाच नव्हे तर दिवंगत झाल्यानंतरही त्यांचा द्वेष करण्याचें व्रत निष्ठापूर्वक चालविलें आहे. रूसो आणि टिळक यांच्यात अनेक दृष्टींनी सादृश्य असलें तरी एक मोठा प्रभेद आहे. रूसो हा सौंदर्यवादी असून त्या वादाच्या अनुषंगाने येणाऱ्या साऱ्या दोषांना आणि मोहांना तो बळी पडला होता. त्याच्या उलट टिळक Beautiful and sublime या द्वंद्वापैकी भव्य, भीषण उदात्ततेचे उपासक असल्याने त्यांचें जीवन मांगल्याचें धाम बनलें आहे.

भारतीय श्रेष्ठत्वाचा पुरस्कार

टिळककाळात हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनासह भारतीय श्रेष्ठत्वाचा पुरस्कारही राष्ट्रभक्तांनी निग्रहाने चालविला होता. सारडानिर्बंधाने चिरस्मरणीय झालेल्या हरविलास सारडांनी तेव्हा Hindu Superiority म्हणजे भारतीय श्रेष्ठत्व या नावाचा ग्रंथही प्रसिद्ध केला होता. या ग्रंथाचें मराठी भाषांतर केसरीतील दत्तोपंत लिमये आणि शंकरराव बेडेकर विधिविशारद या उभयतांनी केलें असून तें तेव्हा चित्रशाळेने प्रसिद्धही केलें होतें. या प्रचाराचा उपहास त्या कालाचा इतिहास लिहिणाऱ्या, हिंदुराष्ट्रापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या अनेक इतिहासकारांनी केलेला मी पाहिला आहे. पण असल्या अप्रबुद्ध विद्वानांना ही साधी गोष्ट समजत नाही की स्वराष्ट्राच्या श्रेष्ठतेच्या साक्षात्कारामुळेच कोणत्याही राष्ट्राचे नागरिक निर्वाणीचीं युद्धें यशस्वी रीतीने लढविण्यास समर्थ होतात आणि सिद्ध होतात. भारतीय श्रेष्ठत्वाचा उपहास करणाऱ्या पक्षांचे एक लाडके लेखक जॉर्ज ऑर्वेल यांनी एच. जी. वेल्सवरील निबंधात लिहिलें आहे :

What has kept England on its feet during the past year (1940–41) ? In part, no doubt some vague idea about a better future, but chiefly, the atavistic emotion of patriotism, the ingrained feeling of the English-speaking peoples that they are superior to foreigners. For the last twenty years the main object of English left-wing intellectuals has been to break this feeling down and if they had succeeded, we might be watching the S. S. men patrolling the London streets at this moment.

म्हणजे १९४०–४१ च्या निर्वाणीच्या दिवसांत एकटचा इंग्लंडने जर्मनीला तोंड दिलें, तें कशाच्या जोरावर? काही अंशी कालांतराने आपल्याला चांगले दिवस येतील, या अंधुक आशेने; पण मुख्यत: देश-भक्तीच्या भावनेचें पुनरुत्थान झाल्यामुळे आणि परक्या लोकांपेक्षा इंग्रजी भाषा बोलणारे लोक श्रेष्ठ असल्याच्या आत्मविश्वासाने; आणि हीच देशभक्तीची भावना, त्याप्रमाणे हाच आत्मविश्वास नष्ट करण्या-करिता गेलीं वीस वर्षे डाव्या पक्षांचे बुद्धिजीवी आपली लेखणी झिज-वीत होते! त्यांना जर यश आलें असतें तर लंडनच्या राजमार्गावर जर्मनीचे सैनिक पहारा करीत असल्याचें दृश्य आज आपल्याला पाहावें लागलें असतें ! भारतातही सुधारक, नवनीतिवादी, मार्क्सवादी इत्यादि राष्ट्रीय परंपरेचें पावित्र्यविडंबन करणाऱ्या पंथाचे लेखक हीच शल्य-नीति वापरून भारतीय राष्ट्रवाद्यांचा तेजोभंग करीत आहेत आणि राष्ट्ररथाचें सारथ्य करण्याचा आव आणीत आहेत. पण रवींद्रनाथांनी म्हटल्याप्रमाणे (तोर चेये आमि श्रेष्ठ ए विश्वासे प्राण दिबो देख) तुझ्यापेक्षा मी श्रेष्ठ आहे या भावनेनेच मानव आपल्या शत्रूंशी प्राण-पणाने झुंजण्याला सिद्ध होतो. हीच भावना दयानंद, विवेकानंद, टिळक, अरविंदप्रभृतींनी भारतीय तरुणांच्या अंत:करणात भिनविली, म्हणूनच ज्या साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नव्हता, अशा साम्राज्याचे सामर्थ्य आणि वैभव कस्पटाप्रमाणे मानून ते त्याच्याशी प्राणांतिक युद्ध करण्याला प्रवृत्त झाले.

✦ ✦ ✦

प्रकरण चौथें

पुण्यातील स्त्रीराज्य

कामजीवनातील टिळककालीन क्रांति

इतिहास लिहिताना तो जीवनाच्या अनेक अंगांचा विचार करून लिहावा लागतो. त्यांपैकी एक महत्त्वाचें अंग म्हणजे समाजाचें कामजीवन. पुण्यातील विलासी लोकांच्या कामजीवनात टिळककाळात एक महत्त्वाची क्रांति झाली. या क्रांतीचें महत्त्व समजून घेण्याकरिता दुसऱ्या बाजीरावांच्या कामजीवनाचा अल्प परिचय करून घेणें आवश्यक आहे. दुसरे बाजीराव गादीवर येण्यापूर्वी सरासरी ऐंशी नव्वद वर्षें म्हणजे भट पेशव्यांच्या उदयापासून चित्पावन समाज हा एक प्रमुख राजकर्ता वर्ग बनला असल्याने तत्कालीन युद्धांतून त्या अल्पसंख्य समाजातील पुरुषांचा मोठ्या प्रमाणावर संहार झाला होता. दुसऱ्या बाजीरावांना पटवर्धनांनी एकदा भोजनसमारंभाप्रीत्यर्थ बोलाविलें असता ज्यांचे पति धारातीर्थी पडले होते, अशा अठरा विधवांनी त्यांना भिन्नभिन्न पदार्थ वाढले आणि अशा रीतीने राज्यरक्षणाच्या कार्यात आपल्या कुटुंबातील किती पुरुष बळी गेले आहेत, याची श्रीमंतांना जाणीव करून दिली, अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे.

आधीच चित्पावन समाजात मुलींचा जन्म अधिक होतो. त्यातच युद्धांतील पुरुषसंहाराची भर पडल्याने दुसऱ्या बाजीरावांच्या काळी चित्पावनांची जात नारीप्रधान बनली होती, यात काही नवल नाही. यामुळे पुण्यात त्या काळी अक्षरशः स्त्रीराज्य प्रस्थापित झालें होते. बाजीरावांच्या निरनिराळ्या वाड्यांतून नित्य दोनतीनशे रमणी न्हावयाला येत असत. त्यांचा न्हाण्याचा समारंभ प्रहरभर चाले. नंतर भोजनाची सिद्धता झाल्यावर बाजीरावांची स्वारी इच्छेस येईल त्या वाड्यात जात असे. पंक्तिभोजनाचे समयी सर्वकाळ बायका सन्निध बसलेल्या असत. आश्रितांनी चारचार पाचपाच लग्नें करून घरी एक बायको ठेवून सरकार वाड्यात इतर बायका पाठवाव्या. याकरिता अन्याबा राहतेकरांच्या सारख्या आश्रितांनी जमलीं तितकीं लग्नें केलीं होतीं ! जो गृहस्थ वाड्यात बायको पाठविणार नाही, त्याजवर श्रीमंतांचा रोष

होत असे. यामुळे संभावित गृहस्थांनी वाड्यात जाण्याचें सोडलें, इतकेंच नव्हे तर पुणें नगरही सोडलें, या बायकाच सर्व कारभार करीत आणि आपल्या नामधारी पतींवरही अधिकार चालवीत. त्याच आपल्या पतीं-करिता श्रीमंतांना सांगून त्यांना मामलती, कमाविशी मिळवून देत. याच मार्गानें अधिकांत अधिक लग्नें करून त्या नायिका बाजीरावांच्या स्वाधीन करणाऱ्या अन्याबा राहतेकराला रास्ते सरदारांची जहागीर मिळाली होती. यासाठी वाड्यात राहणाऱ्या पत्नींपाशी त्यांच्या पतींची प्रार्थना एवढीच असे की काहीही करून श्रीमंतांना संतुष्ट करा. बया-ताई दातार, सीता शेंडे, काशी दीक्षित, उमा फडके, ताई पेठे या बाजी-रावांच्या पंचनायिकांचीं नामें त्या काळी सर्वांना पाठ होतीं. यांच्या सारख्या दोनचारशे बायकांचा थवा वाड्यातून नेहमी अनिर्बंध संचार करीत असे. तितक्यांचे शृंगार, दागिने, सोंगट्या इत्यादि कार्यक्रमात श्रीमंत कालक्रमणा करीत. या स्त्रियांना शिष्ये, पाणके इत्यादिकांशी संभोग करावयाला लावून तें दृश्य श्रीमंत संतुष्ट होऊन पहात ! या प्रश्नावर दिल्लीच्या मोगलांपेक्षा पुण्याच्या श्रीमंतांचीं मतें अधिक पुढार-लेलीं होतीं. या साऱ्या स्त्रिया अतिसुंदर, चतुर, विनोदी असत, हें सांगा-वयाला नकोच. या अनाचारात गोखले रास्ते घराण्यानेच काही अंशी भाग घेण्याचें नाकारलें. याकरिता माधवराव आणि खंडेराव रास्ते यांनी बाजीरावांचा छळ सोसला आणि आपली जहागीरही घालविली. बापू गोखल्यांनीही आपली पत्नी वाड्यात पाठविण्याचें नाकारल्यामुळे त्यांच्यावरही श्रीमंत काही काळ रुष्ट झाले होते. पुढे बापू शरण आले, असें लोक बोलत. तें कसेंही असो. 'असिलता हीच माझी सहधर्मचरिणी' असें उत्तर एकवार तरी श्रीमंतांना देणाऱ्या बापूंनीच काय तो इंग्रजांना विरोध केला. पण अष्ट्याच्या लढाईत बापू पडल्यानंतर सारा विरोध संपून गेला. असो. इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावांच्या हातून जें राज्य काढून घेतलें, तें वस्तुतः या साऱ्या प्रमिला राण्यांच्या हातून काढून घेतलें. हा इतिहास भावी पिढ्यांना सुविदित व्हावा, म्हणून माहुलीचे वाड्यात विधवा गंगाबाई राजमाचीकर हिचे अंगावर पेशवाईचीं वस्त्रें आणि रत्नें घालून बाजीराव स्वतः सेवकाप्रमाणें तिच्यावर चौरी वारीत असे ! बाजीराव ब्रह्मावर्ताला गेल्यानंतर पुण्यातील प्रधानपुरुषांवर त्यांच्या अवैध राण्यांनी आणि त्यांच्या परिवारात वाढलेल्या उच्छृंखल मोहिनींनी चाल करून त्यांना आपले दासानुदास बनवून टाकलें. त्या दिवसांत पुणेकरांच्या चित्तावर असल्या स्त्रियांची सत्ता कशी चालत असे, याचें एक उदाहरण केशवराव भवाळकरांच्या आतमवृत्तात आढळून येतें.

"वासुदेवराव चिपळोणकर सावकारांनी नाच, गाणें इत्यादि करमणुकीकरिता सखी वाटोळी म्हणून पुण्यात एक प्रसिद्ध वेश्या होती, ती ठेविली होती. पुण्याचे सारे रसिक आणि प्रियाप्रेमिकांचे (आषक माषुकांचे) परीक्षक यांच्या तोंडातून त्या वेश्येच्या रूपाची वारंवार वाखाणणी आणि चर्चा होत असे. एकवार तिला पाहण्याचा प्रसंग आला. तिच्या एका पुत्रास देवी आल्या. तेव्हा (मुलाच्या आरोग्यप्राप्तीसाठी) मातुश्रीने राजमार्गावरून दंडवत घालीत शीतळा देवीला वाजतगाजत जाण्याची शूद्रलोकांत चाल असे. तशी ती मोठ्या थाटामाटाने दंडवत घालीत गेली होती. त्या वेळी पुण्याच्या विलासी आणि इतर लोकांच्या समुदायाची दाटी होऊन त्यांनी तिला पाहिलें होतें. ग्रंथांतरी मिसर देशाच्या क्लिओपात्रा राणीच्या रूपाविषयी वर्णन वाचावें, तशाच प्रकारची वाखाणणी त्या वेळी पुण्यात सखू वाटोळीची होती."

या वर्णनावरून कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या तरुणपणी पुणेंकरांच्या केवळ नयनालाच नव्हे तर चित्तालाही एकला विषय तो जाहला असल्याची जाणीव होते. वर्तमानकाळी पारी नगरीतील अति सुंदर पऱ्या पुण्याच्या राजमार्गावरून संचार करू लागल्या तरी त्यांच्या दर्शनाकरिता कोणी दाटी करीत नाहीत, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे थोरल्या शास्त्रीबोवांच्या तरुणपणचें पुणें आणि वर्तमानकाळचें पुणें यांच्या मनःस्थितीतील महदंतराची कल्पना येईल. आजकालच्या पुण्यातील लोक मोठे नीतिनिष्ठ आहेत, अशातला भाग नाही. पण आताचें पुणें तेव्हाप्रमाणे नारीप्रधान नाही. त्या दिवसांत 'स नास्ति अत्र नगरे य एनां महमहायमानलावण्याम्। तरुणानां हृदयलुंठाकीं परिष्वक्कमाणां निवारयति॥' म्हणजे लावण्यप्रभेने उजळलेल्या आणि तरुण हृदयांचें लुंठन करावयाला सोकावलेल्या या उनाड मैनांना पंजरबद्ध करील, असा पुरुषगणच या नगरात उरलेला नाही, अशी तेव्हा पुण्याची स्थिति झाली होती. तरुण टिळकांच्या समोर मुंबईतील एका पुढाऱ्यांनी बोलून दाखविलें होतें की, They have made vice fashionable in Poona.

"स्त्रीव्यसन हें पुण्यात संभावितपणाचें लक्षण मानलें जात आहे." ही गोष्ट इतकी सत्य होती की ज्यांना असल्या उनाड मैनांचा कामजीवनाच्या दृष्टीने काहीही उपयोग नव्हता, असल्या न्यायमूर्ति रानड्यांनीही आपल्या करमणुकीकरिता एका मोहिनीचा आश्रय पतकरलेला होता. त्या मोहिनीच्या नामाचा आणि निवासाचा आजही जाणते लोक उल्लेख करितात. ही गोष्ट त्यांच्या चरित्रकारांनी लिहिली नसली तरी जाणत्या पुणेंकरांप्रमाणे त्यांनाही ती सुविदित असली पाहिजे.

फार काय रानड्यांच्या शिष्यवरांनाही हा नाद असल्याने ते दिवसातून तीनदा दाढी करीत असत, (हा प्रोफेसर छबि खुलवाया करितो तिनदा दाढी.) आणि गालाला चेरी ब्लॉसम लावीत असत. एवंच बाजीरावांच्या राजवटीत अबला प्रबल झाल्याने जें स्वराज्य नष्ट झालें, ते त्या अबलांच्या तावडीतून पुरुषांची सुटका होईपर्यंत परत मिळणें अशक्यच होतें. ही गोष्ट अबलोन्नतिवाल्या सुधारकांना नसली तरी इतर समाजपतींना स्पष्ट दिसत होती.

शाक्तपंथाचा उदय

बाजीरावकालीन स्त्रीराज्य बुडाल्यानंतर या स्त्रीराज्याने शाक्त पंथाचें स्वरूप धारण केलें. या पंथाच्या पुण्यातील आचारांची माहिती लोकहितवादींनी लिहून ठेवली आहे.

"बहुधा अमावास्या अथवा तत्सम एखाद्या रात्री नवख्या लोकांना आपल्या पंथात घेण्याचा संस्कार करतात. त्या रात्री आठ वाममार्गीपुरुष आणि आठ भिन्न, भिन्न जातींच्या स्त्रिया, विधवा ब्राह्मणी, परटीण, न्हावीण, कळावंतीण, गौळीण, कोष्टीण. सोनारीण आणि सुवासिनी ब्राह्मणी आपल्या गुरूंच्या गृही येतात. तेथे स्थंडिल स्थापून आठ मद्यकलश आणि मांस ठेवतात. मग अग्नि पेटवून कालीची स्थापना करतात आणि एकेक पुरुष एकेका स्त्रीसन्निध बसून देवीपूजा करतात. पुढे प्रतिज्ञेचा विधि होतो. इतःपर मी जातिनिषेध मानणार नाही, मद्यमांस भक्षीन, स्वीया आणि परकीया नायिकांत भेद मानणार नाही. या प्रतिज्ञेच्या पालनाने मला भगवती या जन्मी सुखसंपदा देवो आणि मृत्यूनंतर स्वर्गास नेवो. स्त्रियांस ते भैरवी म्हणतात. आपणांस भैरव म्हणतात. कोणी नग्न होऊन नग्न स्त्रियांची पूजा करतात. कितीएक महार मांग यांचे हातचें जेवतात. असे भ्रष्टाकार ब्राह्मणात चालू झाले आहेत. त्यांनी वैदिक मार्ग, अग्निहोत्र, वेदपारायण, पुराणमार्ग, शालिग्रामपूजा इत्यादि व्रतें धरून स्वस्थपणे भगवंताचें भजन करावयाचें तें सोडून दिलें आहे."

या अवतरणावरून वाचकांना कळून येईल की आगरकरकालीन सुधारकांना आणि किर्लोस्कर मासिकातील नवनीतीच्या पुरस्कर्त्यांना हव्या असलेल्या साऱ्या सुधारणा या शाक्त पंथाच्या अनुयायांनी कधीच करून टाकल्या होत्या. पण त्यांच्या दुर्दैवाने त्यांना बर्ट्रँड रसेलसारख्या एखाद्या इंग्रज नवनीतिप्रतिपादकाच्या ग्रंथाचा आधार शोधण्याची आवश्यकता भासली नाही आणि त्यामुळे ते सारे लोकहितवादींच्या विदूष-

णांना पात्र झाले. असो. लोकहितवादींचे चरित्रकार आठल्ये सांगतात की या पंथाचें प्रस्थ कृष्णंभट गोखले यांनी मोठ्या प्रयत्नाने मोडून टाकलें. बाजीरावांच्या अनाचारांना आणि शाक्तांच्या अनाचारांना विरोध करावयाला गोखले कुटुंबातील नेतेच पुढे आले, ही संस्मरणीय घटना आहे. या साऱ्या अनाचाराविरुद्ध गोखले कुलातील काही चिरस्मरणीय व्यक्तींच्या नेतृत्वामुळे घडून आलेल्या प्रतिक्रियेने आणि टिळकांसारख्या नेत्यांच्या निर्मळ वर्तनाने पुण्यातील प्रबल अबलांच्या तावडीतून पुरुषांची मुक्तता होण्याला जसें साहाय्य झालें, तसेंच साहाय्य टिळककाळातच भरभराटीला आलेल्या नाटकमंडळ्यांच्या उदयामुळेही झालें. टिळकांचा नाटकमंडळींशी संबंध अत्यल्पच आला असला तरी त्यांचे सहकारी आचार्य वासुदेवराव केळकर आणि नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या उभयतांचे त्या संस्थांशी निकटचें नातें होतें. टिळकांना मंडालेला नेल्यानंतर खाडिलकरांचें जीवनच त्या संस्थांवर अवलंबून होतें. तरीसुद्धा टिळकांच्या संगतीचा परिणाम म्हणून ते त्या संस्थातील व्यसनांपासून अलिप्त राहिले. पण त्यांच्याइतका संयम नसलेल्या, अथवा दत्तपरंपरेतील गुरुभक्ति नसलेल्या इतरेजनांवर नाटकमंडळ्यांतील वातावरणाचा काय परिणाम झाला, याचा इथे अल्प विचार केला पाहिजे.

नाटकमंडळ्यांमुळे झालेली मानसिक क्रांति

तत्कालीन नाटकमंडळ्यांतून स्त्रियांच्या भूमिका पुरुषच करीत असत. त्यामुळे त्या नाटकमंडळ्यांतून त्यांच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणे, ऐश्वर्याप्रमाणे देखण्या बायकी तरुणांचा आणि मुलांचा थवा जमलेला असे. यांच्या हावभावांनी लंपट झालेल्या पुरुषांत बाजीरावकालीन स्त्रीव्यसनाचें स्थान स्त्रीनटव्यसनाने घेतलें. अर्थात् इथे स्त्रीनट हा समास स्त्रीची भूमिका करणारा नट असा सोडविला पाहिजे. महाराष्ट्र नाटकमंडळीतील स्त्रीनट बाळाभाऊ जोशी यांच्या रंगालयातील स्पर्शाने शिवरामपंत परांजपे किती विचलित झाले, याचा उल्लेख पुस्तकांतून आढळतो. मी स्वतः पुण्यात पन्नासाहून अधिक वर्षे राहात असूनही १९२५ मध्ये एकदाच मित्राग्रहास्तव गंधर्वाचें नाटक पाहिलें. तेव्हा या नाटक्यांच्या जीवनाविषयी मला कोणतेंही आकर्षण नव्हतें, आणि त्यांच्याविषयी मी जें लिहीत आहे, तें सारें पुस्तकी ज्ञानावरून लिहीत आहे, हें सांगावयाला नकोच. अल्पवयी तरुणांचा अवैधपत्नीप्रमाणे उपभोग घेण्याची प्रथा मुसलमानी समाजात मोठ्या प्रमाणावर असल्याचें उर्दू कवितेवरून सुव्यक्त होतें. किर्लोस्कर नाटकमंडळीच्या उदयानंतरच्या

काळात हें व्यसन महाराष्ट्रीय समाजात न्यूनाधिक प्रमाणात बोकाळलें होतें. विशेषतः त्या काळात स्त्रिया पुरुषांत मिसळत नसल्यामुळे सुशिक्षित समाजात नव्याने प्रतिष्ठित होऊ पाहणाऱ्या या व्यसनाला निर्बंध अवसर लाभत असे. तत्कालीन कोणी नाटककारांनीही ऑस्कर वाइल्ड या इंग्रजीतील नाटककाराचें अनुकरण करून आपली विपरीत कीर्ति आणि परंपरा महाराष्ट्रात दृढमूल करून ठेवली आहे. हें पुरुषप्रेमाचें वातावरण गुप्तकटांच्या निर्मितीला विशेष अनुकूल असतें, ही गोष्ट क्रांतिकारकांच्या इतिहासाच्या दृष्टीने फार महत्त्वाची असल्याने वरील विवेचनाचा प्रपंच मला करावा लागला. गुप्तकटातील घटकांतून पुरुषप्रेमाच्या भावनेचें उदात्तीकरण झालें असलें, तरच त्या कटाची संघटना प्रभावी होते. नाही तर पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे ते कट कोसळून पडतात. उच्च आणि उदात्त वातावरणात दीर्घकाळ संचार करण्याची शक्ति आणि विहार करण्याची मनोवृत्ति अत्यल्प मानवांनाच देवाने दिली असल्याने कटवाल्यांच्या हातून अनेकदा पापें घडत आणि त्यांचा दुर्लौकिकही होई. ही गोष्ट खरी असली तरी पुरुषप्रेमाची भावना हा पुरुषांच्या राजकारणप्रवणतेचा एक महत्त्वाचा घटक आहे, हें मानसशास्त्रातील सत्य इतिहासकारांनीही समजून घेणें आवश्यक आहे, Man is a political animal (मानव हा राजकारणप्रवण प्राणी आहे) अशी व्याख्या ज्या ॲरिस्टॉटलने केली, तो ग्रीक होता आणि ग्रीक समाज पुरुषप्रेमाला वाहिलेला होता. मुसलमानांच्या राजकारणचातुर्याचें कारणही कदाचित् हेंच असेल !

विवेकानंदांचा 'सैतानी' उपदेश

महाराष्ट्रात प्रथम स्त्रीराज्याविरुद्ध आणि त्यानंतर स्त्रीप्रेमा विरुद्ध जशी प्रतिक्रिया घडून आली, तशीच प्रतिक्रिया बंगाल्यातही स्वामी विवेकानंदांनी घडवून आणली. आधीच बंगाली लोक स्त्रैण आणि त्यात भरीस भर म्हणून आपण प्रिया आणि परमेश्वर परपुरुष मानून त्याची भक्ति करण्याचा मधुराभक्तीचा पंथ त्या प्रांतात विशेष प्रबळ. या पंथावर पौरुषसंपन्न स्वामी विवेकानंदांचा पराकाष्ठेचा राग होता. रवींद्रनाथ त्या काळी वैष्णव कवितेचें अनुकरण आणि परिशीलन करण्यात दंग झाले होते, यासाठी विवेकानंद ठाकूर कुटुंबातील स्त्रैण वातावरणावर कठोर टीका करीत. या स्वभावभिन्नतेमुळे त्या दोन महापुरुषांचा सख्यसंबंध जुळवून आणण्याचा भगिनी निवेदिता यांचा प्रयत्न निष्फळ झाला. आपल्या अंतिम पर्वात स्वामींनी पुढील अविस्मरणीय उपदेश केला आहे :

The older I grow, the more everything seems to me to lie in manliness. That is my new gospel. Do even evil like a man. Be wicked if you must on a great scale. I love terror for its own sake, dispair for its own sake, misery for its own sake. Fight always, fight and fight on, though always in defeat.

वाढत्या वयाबरोबर मला वाटू लागलें आहे की पौरुषातच जीवनाच्या सर्वस्वाचा अंतर्भाव होतो. दुष्कृत्यें करावयाचीं झालीं तरी तीं पुरुषाप्रमाणे करा. दुष्टपणा करावा लागलाच तर तो मोठ्या प्रमाणावर करा. दहशत, निराशा, दारिद्र्य या सर्व देवतांवर माझें निर्हेतुक प्रेम आहे. लढा, लढत राहा, सतत पराभव सोसूनही लढत राहा. मिल्टनच्या सैतानाने तरी हेंच म्हटलें आहे :

> What though the field be lost, all is not lost.
> The resolve never to submit nor yield,
> What is else not to be overcome.

असो. १९०२ मध्येच बाँब करण्याचा उपदेश विवेकानंदांनी केला होता, हें भूपेन्द्रदत्तांनी प्रकट केलें आहे.

प्रिन्स क्रोपाट्किनचा प्रभाव

स्वामी विवेकानंदांच्या या सैतानी उपदेशावर प्रसिद्ध रूसी क्रांतिकारक प्रिन्स क्रोपाट्किन यांच्या प्रभावाची छाप पडली आहे कीं काय अशी शंका येते. स्वामीजींची शिष्योत्तमा भगिनी निवेदिता हिची प्रिन्स क्रोपाट्किन यांच्याशी पुष्कळ दिवसांपासून ओळख होती. १९०० मध्ये स्वामी पारीनगरीत गेले असताना त्यांचाही प्रिन्स क्रोपाट्किन यांच्याशी परिचय झाला. याच दिवसांत स्वामी जगदीशचंद्रबोस यांना प्रथम भेटले. त्यांचाही बहुधा भगिनी निवेदिता यांच्या द्वाराच प्रिन्स क्रोपाट्किन यांच्याशी परिचय झाला होता आणि त्यांना त्यांनी रवींद्रनाथांच्या काबुलीवाला या कथेचा आस्वाद चाखविला होता. प्रिन्स क्रोपाट्किनच्या प्रभावामुळेच पुढे जगदीशचंद्रांनी कर्झनहत्येच्या कारस्थानात भाग घेतला. सेनापति बापटांचाही क्रोपाट्किनशी संबंध होता आणि त्यांना रशियन क्रांतिकारकांकडून जी बाँबची पोथी मिळाली, ती बहुधा याच ओळखीमुळे मिळाली असावी.

सैतानाचें अनुयायित्व

स्वामीजींच्या वरील विचारांचा प्रिन्स क्रोपाट्किन यांच्या मैत्रीशी संबंध असणें शक्य आहे, हें सुचविल्यानंतर त्या विचाराचें थोडें स्पष्टी-

करण करणें उचित होईल. जगात काही लोक ऋजुपणाने युद्ध करणारे असतात, तर इतर काही लोक मायेचा उपयोग करून लढणारे असतात. मायायुद्ध करणारे समाज हेच वेदांतील असुर आणि ख्रिस्ती धर्मातील सैतान यांचे अनुयायी. यांच्याशी युद्ध करताना त्यांच्या प्रतिपक्षांना आसुरी अथवा सैतानी मायेचा न्यूनाधिक प्रमाणात अवलंब करावा लागतो. अन्य परिस्थितीत जें दुराचरण ठरलें असतें, त्याचा आणि तें कृतीत आणू शकतील अशा लोकांचा उपयोग करावा लागतो. भारवीने सांगितलेंच आहे : 'व्रजन्ति ते मूढधियः पराभवम् । भवन्ति मायाविषु ये न मायिनः ॥' याच व्यावहारिक नीतीला अनुसरून गीतेतही 'अपि चेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक्' असा स्वपक्षाच्या सुदुराचारी लोकांचा भगवंतांनी उल्लेख केला आहे. ईश्वराच्या अनन्य भक्तांनाही सैतानाच्या अस्तित्वावर विश्वास ठेवावा लागतो आणि प्रसंगविशेषी सैतानी उपायांचा अथवा मार्गांचा उपयोगही करावा लागतो. हा सर्व विचार करूनच माझिनी, गुएराझ्झी, निक्कोलिनी प्रभृति इटालीतील क्रांतिकारकांनी इटालियन वाङ्मयात सैतानी पंथ स्थापिला होता. या घटनेची, मला वाटतें, हिंदुस्थानात एकालाही जाणीव नसेल! यांच्या सैतानी पंथाचा एकोणिसाव्या शतकातील इटालियन वाङ्मयावर अतिशय प्रभाव झाला आहे. माझिनीचें बायरनवर पराकाष्ठेचें प्रेम होतें. कारण बायरन हा या सैतानी सांप्रदायाचा एकोणिसाव्या शतकातील पहिला आचार्य. पण सैतानाचे अनुयायी बनण्याची पहिली प्रेरणा या मित्रमंडळीला मिल्टनच्या पॅरॅडाइज लॉस्ट अथवा नष्टनंदन या महाकाव्यातील सैतानाच्या वर्णनापासून प्राप्त झाली. ज्यांना ज्यांना प्रचलित सत्तेविरुद्ध बंड करावें लागतें, त्यांना त्यांना मिल्टनने निर्मिलेल्या त्या अमर नायकाचें आपापल्या शक्तीप्रमाणे अनुकरण करण्यावाचून गत्यंतर नसतें. मानवाला अत्यंत स्पृहणीय अशी स्वाभिमानी आणि विद्रोही वृत्तीची देणगी सैतानापासूनच लाभली आहे.

शत्रु करण्याचें महत्त्व

कोणत्याही व्यक्तीची योग्यता मी सामान्यतः त्या व्यक्तीच्या शत्रूंच्या योग्यतेवरून ठरवितो. या दृष्टीने विचार केला असता सैतानाच्या इतका श्रेष्ठ अन्य कोणीच नाही. कारण त्याचा शत्रु स्वतः ईश्वर. त्याच्या अनुकरणाने सारे क्रांतिकारक पृथ्वीवरील ईश्वराचे शत्रू बनून स्वतःला अतिश्रेष्ठ पदवी प्राप्त करून घेतात. ज्याला एकही शत्रु नाही, तो पुरुष कसला, तो किंपुरुष! भारवीने म्हटलेंच आहे.

'समुन्नयन् भूतिमनार्यसंगमात् । वरं विरोधोऽपि समं महात्मभिः ॥

यासाठीच स्वतः टिळकही सरकारपक्षाचे नेते जे न्यायमूर्ति रानडे, त्यांचे प्रतिपक्षी या नात्यानेच समाजापुढे आले आणि एकाच काळी त्यांनी स्वपक्षाचा विश्वास आणि परपक्षाचें शत्रुत्व संपादिलें. टिळकांचें रानड्यांशी झालेलें वर्तन पाहिलें म्हणजे नीत्छेने महाजनांचे शत्रूंशी होणाऱ्या वर्तनाचें जें वर्णन केलें आहे, त्याचेंच स्मरण होतें.

What respect for his enemies is found foresooth in an aristocratic man. Such reverence is already a bridge to love. He insists on having his enemy to himself as his distinction. He tolerates no other enemy but a man in whose character there is nothing to despise and much to honour.

महाजनांना आपल्या शत्रूविषयी किती आदर वाटतो पाहा. आपला शत्रु म्हणजे आपलें एक अद्वितीय भूषण असेंच ते मानतात. ज्याला अनेक दृष्टींनी मान देता येईल आणि तुच्छतेचा स्पर्श होणार नाही, अशाशीच ते शत्रुत्व करतात. ही रानड्यांची गोष्ट झाली. पण रानड्यांचे शिष्य आणि प्रशिष्य, जे तेव्हा टिळकांचा द्वेष करीत असत आणि ज्यांच्या अनुयायांनी अजूनही तें व्रत चालविलें आहे, त्यांची गोष्ट अगदीच भिन्न आहे.

While the aristocratic man lived in confidence and openness with himself, the resentful man on the other hand is neither sincere nor naif, nor honest and candid with himself. His soul squints, his mind loves hidden crannies, tortuous paths and back doors, everything secret appeals to him. He is past-master in silence, in not forgetting, in waiting, in provisional self-depreciation and self-abasement.

महाजनांच्या उघड्या कारभाराच्या आणि विश्वासपूर्ण व्यवहाराच्या उलट मत्सरी लोकांचें वर्तन असतें. ते कधीच ऋजु आणि प्रामाणिक नसतात. स्वतःशी सुद्धा ते प्रामाणिक नसतात. त्यांचा आत्मा तिरळ्या डोळ्याने जगाकडे पाहात असतो. वळणावळणाच्या वाटा आणि मागील दाराचीं कारस्थानें यात तो रमतो. जें जें काही गुप्त तें त्याला रुचतें. मौनाचा तर तो आचार्यच असतो. क्षणभरही शत्रूचा विसर न पडता त्याचा काटा काढण्याची वाट पाहाणें आणि तोंपर्यंत आत्मनिंदा करून त्याच्या पायाशी लोळण घेणें या कलांत तो प्रवीण असतो. रानड्यांच्या शिष्यप्रशिष्यांचें या थोर तत्त्वज्ञान्यांनी केलेलें वर्णन किती यथार्थ आहे, हें टिळकांच्या समकालीन जनांस सुविदित आहे. याच्या

उलट केळकर टिळकपक्षाला येऊन मिळाल्यानंतरच्या दिवसांत स्वपक्षात मित्र नाहीत आणि परपक्षात शत्रु नाहीत, अशी त्यांची स्थिति होती. ज्यांच्या महत्त्वाकांक्षा सुखवस्तु जीवनापुरत्या नेमस्त असतात, अशा अल्पसंतोषी लोकांना शत्रु करण्याचें कारण नसतें. असले लोक त्यांच्या अजातशत्रुत्वामुळे आशावादी आणि आनंदवादी बनतात. देवाची सृष्टि वैषम्यनैर्घृण्याने भरलेली आहे, या सिद्धान्तावर त्यांचा विश्वास बसत नाही. म्हणजेच पर्यायाने सैतानाच्या अस्तित्वावरचा त्यांचा विश्वास नष्ट होतो. पण जे खरे क्रांतिकारक असतात, त्यांच्या जगात अहुरमज्द आणि अहरिमन, ईश्वर आणि सैतान, अथवा सुर आणि असुर यांचें युद्ध अखंड चालू असतें.

‘ पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर। तुंबळ संग्रामाला करिती।
संप्रति दानव फार माजती। देवांवर झेंडा मिरविति।
देवांच्या मदतीस चला तर।’

ही तुतारीची हाक त्यांच्या कानांत सतत घुमत असते. देवांना साहाय्य करण्याचा एकच मार्ग मानवांना उपलब्ध आहे. तो म्हणजे आपल्या कार्यक्षेत्रात जेथे जेथे अन्याय दिसून येईल, तेथे तेथे परिणामाकडे लक्ष न देता त्या अन्यायाचा प्रतिकार करणें हाच होय. चिरोलवर खटला भरण्याचीं कारणें सांगताना टिळकांनी एका स्नेह्याला सांगितलें, “अन्यायाचा आणि त्यांतही शत्रूंनी बुद्धिपुरस्सर केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचा माझा जन्माचाच स्वभाव आहे. माझी अशी समजूत आहे की, भीतीने, अथवा दुसऱ्या कोणत्याही निमित्ताने अन्यायाचा प्रतिकार न करणें, म्हणजे साक्षात् देवद्रोह करणें होय. राजद्रोह मात्र तुम्हांला भयानक वाटतो; पण राजाच्याही राजाचा म्हणजे सत्याचा आणि न्यायाचा द्रोह करणें याचें तुम्हांला काहीच वाटत नाही. पण माझें तसें नाही. याला माझा निरुपाय आहे.”

या उद्गाराप्रमाणे आपल्या स्वभावधर्मामुळे टिळक निरुपायाने देवपक्षाला मिळाले असले तरी ते सैतानालाही पुरते ओळखून होते आणि त्याचे गुण घेण्याला ते कमी करीत नसत, असें त्यांच्या ‘सैतानाचें साम्राज्य’ या व्याख्यानावरून समजतें. महाविद्यालयात तर ते देवशत्रूच्या नांवानेच (डेव्हिल) प्रसिद्ध होते.

ध्येयध्रुवाचें उच्चाटन

सैतानावर विश्वास नसल्याने ज्यांच्या मनोराज्यात सु आणि कु यांचें निकराचें युद्ध जुंपू शकत नाही, ज्यांच्या मनोराज्यात केवळ

सुनीति आणि सुरुचि या राण्यांची चुरस चाललेली आढळून येते, असा एक साहित्यिकांचा वर्ग टिळककाळीच त्यांचे सहकारी न. चिं. केळकर यांच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात येत होता. हा सैतानावर विश्वास नसलेला साहित्यिकांचा वर्ग नीतीविषयी उदासीन असल्याने इंग्रजीत या वर्गाला Amoral अशी संज्ञा देतात. यामुळे सुरुचि आणि सुनीति या राण्यांमध्ये या वर्गाचें प्रेम सुरुचि राणीवरच वसलेलें असतें, हें सांगावयाला नकोच. हें साहित्यिक नेहमी सुरुचीच्या दृष्टीने, म्हणजे मुख्यतः दोषैकदृष्टीने समाजाकडे पहात असल्याने समाजाची अशी समजूत होते की ते कुत्सित दृष्टीने (cynical) आपल्याकडे पाहतात. म्हणून सर्वसाधारण समाज आणि हे साहित्यिक यांच्यामध्ये एक दरी निर्माण होते. हे सुरुचिभक्त साहित्यिक आपल्या साहित्यसृष्टीतून ध्येयध्रुवाला लाथ मारून घालवून देतात, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. यासाठीच हे कलेसाठी कला या पंथाचे पुरस्कर्ते बनतात.

स्वातंत्र्याच्या आंदोलनाला नाट्यकलेचा पाठिंबा

इतर साहित्यिकांच्या उलट नटनाटककारांना समाजाला अधिक अभिमुख आणि त्यामुळे ध्येयवादी बनावें लागतें. या समाजाभिमुख जीवनामुळे नटनाटककारांनी प्रथमपासून स्वातंत्र्याच्या ध्येयाचा यथाशक्ति पुरस्कार केला. टिळकांची शिवाजी उत्सवाची चळवळ चालू होण्यापूर्वीच अण्णा मार्तंड जोशी यांनी १८९३ मध्ये लिहिलेलें शिवछत्रपति विजय हें नाटक १८९८ मध्ये सरकारजमा झालें. समाजाच्या नाडीवर नाटककार कसा नेमका बोट ठेवू शकतो याचें हें एक उदाहरण आहे. स्वातंत्र्याच्या ध्येयाचा पुरस्कार आणि त्याच्याच अनुषंगाने महाराष्ट्रीय जनतेला सूडाचा संदेश देण्याचें कार्यही मराठी रंगभूमीने १८९२ पासून १९११ पर्यंतच्या काळात मोठ्या प्रमाणावर केलें. हा सूडाचा संदेश कृतीत आणण्याकरिता ज्या क्रांतिकारक संस्था अस्तित्वात आल्या त्यांतून नाटकांचे नादी लोक पुष्कळच असत. अभिनव भारताचे एक अध्वर्यु बाबा सावरकर यांचा काळ प्रथम नाटकी लोकांच्या संगतीतच जात असे. क्रांतिकारकांना नटाप्रमाणेच कोणत्याही क्षणी कोणतीही भूमिका करण्याची सिद्धता ठेवावी लागे आणि ती भूमिका चांगली वठविण्यासाठी, अन्य व्यक्तींवर छाप पाडण्यासाठी अभिनयाची सवयही असावी लागे. यासाठी बंगाल्यातील क्रांतिकारक तर पदकंदुकक्रीडासंघ आणि उत्सवप्रसंगानिमित्त नाटकें बसविणारे उत्साही नटांचे संघ चालू करून मग त्यांतून क्रांतिकार्याला उपयुक्त अशा नवयुवकांची निवड

करीत. या काळी रंगभूमीवर रमणींच्या भूमिका करणाऱ्या नटांनी स्त्री हा विकृतीची विकृति करणारा प्राणी बनविला होता, अथवा अनुकरणाचें अनुकरण करण्यामुळे निसर्गापासून दूर गेलेला प्राणी बनविला होता. आधुनिक प्रेमकविताही तेव्हा जन्माला आलेली नव्हती. या दृष्टीने विचार केला म्हणजे भाऊराव कोल्हटकर, बालगंधर्वप्रभृतींच्या उत्कर्षाच्या काळात क्रांतिकारकांच्या कटांचा महाराष्ट्रात सार्वत्रिक प्रसार झाला, याचें नवल वाटत नाही.

कटवाल्यांचा शाक्तपंथ आणि धर्ममार्गातील शाक्तपंथ

महाराष्ट्रीय क्रांतिकारकांपैकी सर्वांत प्रसिद्ध क्रांतिकारक विनायकराव सावरकर हे जोपर्यंत धर्मनिष्ठ होते, तोपर्यंत दुर्गादास म्हणजे शाक्त होते. हा शाक्त पंथ शिवाजीमहाराजांच्या काळी वंग देशाच्या प्रवासाला गेलेल्या काही ब्राह्मणांनी त्या देशातून आणला, असें संभाजी महाराजांच्या संस्कृत चरित्रात सांगितलें आहे. या शाक्त पंथाचें केंद्र संगमेश्वर होतें आणि तेथेच महाराजांना अटक झाली, संभाजी महाराज या पंथाच्या नादी लागल्यामुळे त्यांच्या जीवनाची शोकांतिका झाली अशी समजूत आहे. तेव्हापासून दबून राहिलेल्या या पंथाने दुसऱ्या बाजीरावांच्या काळी पुन्हा आपलें डोकें वर काढलें आणि पेशवाईचा अंत घडवून आणण्याचें श्रेय मिळविलें. दुसऱ्या बाजीरावांच्या राजवटीनंतरही काही काळ समाजात शाक्त पंथाचें प्राबल्य झालें होतें आणि तें कृष्णंभट गोखल्यांनी मोडलें, हें वर सांगितलेंच आहे. पुढे विसाव्या शतकातील राजकीय शाक्त पंथाचे कट्टे शत्रु गोपाळ कृष्ण गोखले हे होते, हा योगायोग ध्यानात ठेवण्याजोगा आहे. धार्मिक शाक्त पंथ महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी वंग देशाहून आयात केला असला तर पुढे राजकीय शाक्त पंथ बंगाल्यात निर्यात करून त्यांनी तें उसनें फेडून टाकलें. इथे अशी एक शंका येते की पेशव्यांच्या काळी जीं गणेशोपासकांचीं घराणीं उदयाला आलीं, तीं सारीं न्यूनाधिक प्रमाणात प्रच्छन्न शाक्त होतीं की काय ? ही गोष्ट निश्चित आहे की गणेशोत्सवाच्या पुनरुज्जीवनानंतरच महाराष्ट्रात राजकीय शाक्त पंथाचा उदय झाला.

✦ ✦ ✦

प्रकरण पांचवें

वासुदेव बळवंत आणि टिळक

वासुदेव बळवंतांच्या बंडाचा इतिहास श्री. वि. श्री. जोशी यांनी समग्र लिहिला असल्याने त्यांच्या ग्रंथात न आढळणाऱ्या माहितीचाच मी येथे प्राधान्याने विचार करणार आहे. वादेसुव बळवंतांना शिक्षा झाल्यानंतर ४-२-१८८० या दिवशी एक रूसी संस्कृतज्ञ मिनाएफ यांनी पुण्यातील 'न्यू इंग्लिश स्कूल' या शाळेत इंग्रजी दनिक 'डेक्कन स्टार' याचे संपादक यांची भेट घेतली. दुसरे दिवशी त्या पत्राचे संपादक नामजोशी हे त्या रूसी पंडितांना भेटावयास गेले. त्या प्रसंगाचा त्यांनी आपल्या दैनंदिनीत पुढील उल्लेख केला आहे.

The editor who has called on me today turned out to be a friend of Phadke. He was even tried with him. Our conversation was quite interesting. He expressed strong, though not active disaffection towards the British Government.

मिनाएफ म्हणतात की मला भेटावयाला आलेले संपादक नामजोशी हे फडक्यांचे मित्र होते, इतकेंच नव्हे तर फडक्यांच्यासहच त्यांच्यावरही सरकारने खटला भरला होता. त्यांच्या मनात इंग्रज सरकारविषयी ओतप्रोत अप्रीति भरलेली आहे. मात्र ती अप्रीति क्रियाशील नाही. वासुदेव बळवंतांच्या प्रकरणात नामजोशी अडकल्याचा उल्लेख मराठी लेखकांनी कोठें केलेला आठवत नाही. तथापि मिनाएफ यांच्या समकालीन उल्लेखाला उचित तें महत्त्व दिलें पाहिजे. नामजोशी हे तेव्हा रामेश्वरापाशी रानड्यांच्या वाड्यातच रहात असत. वासुदेव बळवंत वारंवार माधवराव रानड्यांना अपरात्री भेटून त्यांच्याशी चर्चा करतात, अशी त्या वेळी पुण्यात कंडी पिकल्यामुळे सरकारने त्यांची धुळ्याला बदली केली, असें त्यांचे चरित्रकार सांगतात. ही कंडी पिकण्याला माधवराव नामजोशी यांची वासुदेव बळवंतांशी असलेली मैत्रीच कारणीभूत झाली असावी, हें उघड आहे. माधवराव नामजोश्यांच्या सान्निध्याने रावबहादूर रानड्यांच्या चरित्राला राजद्रोहाचा गंध जडला असून तो त्यांच्या चरित्रातून दरवळत आहे. पण मोलिएरच्या 'मारून मुटकून वैद्यबुवा' या प्रहसनातल्यासारखाच हा प्रकार होता, याविषयी शंका नाही.

गॅझेटकारांची पुण्यातील क्रांतिकारक समिति

फडक्यांच्या चरित्रकारांनी २२-५-१८७९ च्या बॉम्बे गॅझेट पत्रातील पुढील उल्लेख उजेडात आणला आहे :

The Brahmin Wasudeo Balvant was known to his men as Maharaj and the whole progress and career of that individual leads us to believe that he was only acting as the agent of some central committee sitting probably in Poona.

वासुदेव बळवंतांचा पूर्वेतिहास आणि परिणति यांचा विचार करून आमची अशी समजूत झाली आहे की, पुण्यातील एखाद्या मध्यवर्ती समितीचा तो हस्तक असावा. ही गोष्ट बहुधा खरी असावी. कारण वासुदेव बळवंतांच्या लुटालुटीच्या कार्यक्रमात काही सावकारांचें सहकार्य लाभल्यावाचून लुटीतील अलंकार आणि रत्नें यांचें नाण्यात परिवर्तन करणें अशक्य होतें. ४२ च्या बंडवाल्यांनी जेजुरी देवस्थान लुटल्यानंतर त्यांना चलन मिळविण्याकरिता असेंच सावकारांचें साहाय्य मिळवावें लागलें. तेव्हा वासुदेव बळवंतांचा लुटालुटीचा कार्यक्रम आपल्याला लाभदायक होईल, या अपेक्षेने काही सावकारांनी त्यांना उत्तेजन दिलें असावें आणि प्रारंभी थोडेफार पैसेही पुरविले असावेत. त्यानंतर लुटीतील द्रव्यापैकी काही संपत्ति रामोश्यांनी लांबविली, अथवा पाठलाग करणाऱ्या रक्षकांच्या हाती लागली, किंवा बंडाचे नेते वासुदेव बळवंत यांच्या स्वाधीन केली गेली, तरी ती न्यूनतम भावात विकत घेऊन तिची पुढील व्यवस्था लावण्याचें काम सावकारांनीच केलें असावें. खेड्यांतील सावकारांचे कागद जाळण्याचा कार्यक्रमही लुटीचा मार्ग सुलभ होण्याकरिता करावा लागे. तो विशिष्ट तत्त्वांना अनुसरून अवलंबिला असावा, ही रूसी निबंधकारांची कल्पना अंशतःच ग्राह्य मानता येईल. पुण्यात अशी एक किंवदन्ती प्रचलित होती की, जुन्नरकरांच्या दत्ताजवळील आप्पाराव वैद्य या विधिविशारदांच्या वाड्यात वासुदेव बळवंतांना पुष्कळदा आश्रय मिळत असे आणि त्यांनी मिळविलेल्या लुटीचा काही भाग तिथेच ठेविला होता. आप्पाराव वैद्य हे टिळकपक्षाचे एक आधारस्तंभ होते. १८९७ मध्ये रक्षकविभागाने केलेल्या प्रतिवृत्तात बाळकृष्णपंत वैद्य आणि गणपतराव घोटवडेकर यांचा टिळकपक्षातील कार्यकर्ते म्हणून उल्लेख आला आहे. गणपतराव घोटवडेकरांनी ऐक्यवर्धिनी सभा नांवाची एक युवकसंघटना स्थापिली होती. वासुदेव बळवंत हे तिचे एक प्रमुख सभासद होते, वैद्यबागेतील आखाड्यात या संघटनेतील

युवक व्यायामाकरिता आणि शस्त्रविद्येच्या शिक्षणाकरिता जमत. तिथेच आता इतिहाससंशोधकमंडळाचें कार्य चालतें. स्वतः टिळकही या आखाड्याचे घटक असल्याचें फडक्यांच्या चरित्रकारांनी दाखवून दिलें आहे. टिळकांनी राजकारणात प्रवेश केल्यानंतर वासुदेव बळवंतांच्या प्रभावळीतील व्यक्तिच त्यांच्या अनुयायांचें दैनंदिन नेतृत्व करीत असत. टिळकपक्षाचे पहिले घटक वासुदेव बळवंतांच्या प्रभावळीतील होते. त्या प्रतिशिवाजीच्या समक्ष त्यांनी ज्या प्रतिज्ञा केल्या होत्या, त्यांची पूर्तता करण्याकरिताच ते सर्व टिळकांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकत्र आले होते. १९१६ मध्ये टिळकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करू नये, असें म्हणणाऱ्यांचे पुण्यातील प्रमुख आप्पाराव वैद्य हेंच होते, असें लक्ष्मण बळवंत भोपटकरांनी आठवणींच्या पहिल्या खंडात (पान ३८१) लिहिलें आहे. या एकमार्गी अनुयायांच्या राजकारणचातुर्यासंबंधी अथवा स्वतंत्र कार्य करण्याच्या शक्तीसंबंधी कोणाला शंका घेता येईल. पण त्यांनी ज्या स्वतंत्रता देवीला आपली निष्ठा वाहिली होती, तिच्याशी ते आपल्या शक्तीप्रमाणे एकनिष्ठ राहिले होते असें म्हणावें लागतें. माधवराव नामजोशी, भिकाजीपंत हर्डीकर, गणपतराव घोटवडेकर, आप्पाराव वैद्य, कृष्णाजी आबाजी गुरुजी (टिळकांचे पहिले चरित्रकार), डावरे कुटुंब हें सारे वासुदेव बळवंतांचे सहकारी, टिळकांचेही सहकारी होते. याचा अर्थ स्पष्ट आहे.

डेक्कन स्टारचे सहकारी संपादक टिळक

विष्णुशास्त्र्यांच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या योजनेत पुढाकार घेऊन टिळकांनी सार्वजनिक चळवळीत प्रथम प्रवेश केला आणि 'मराठा' पत्राचे संपादक बनून त्यांनी संपादनाचे पहिले धडे घेतले, अशी सार्वत्रिक समजूत असली तरी ती यथार्थ नाही. वासुदेव बळवंतांचे मित्र माधवराव नामजोशी हे १८७९ पासून 'डेक्कन स्टार' हें जें इंग्रजी दैनिक चालवीत असत, त्याच्या संपादक वर्गात टिळक होते, असें टिळकांचे एके काळचे वर्गबंधु आणि पुढे कट्टे शत्रु बनलेल्या न्यायमूर्ति चंदावरकरांनी लिहिलें आहे. आठवणींच्या पहिल्या खंडात २७० पानावर ते लिहितात :

'(१८७९ च्या वसंत ऋतूत)' सकाळी मी आणि पंडित (शंकर पांडुरंग) न्या. रानडे यांच्या घरी गेलो. त्या वेळी 'डेक्कन स्टार' नांवाच्या पत्राचीही गोष्ट निघाली. या पत्राचे संपादक नामजोशी होते आणि टिळक हेही संपादकीय शाखेपैकी एक होते. हें पत्र त्या वेळी सरकार आणि समाजसुधारक यांच्यावर कडक टीका करीत असे.'

यावरून ही गोष्ट कळून येते की, १८७९ च्या वसंतऋतूपासूनच नामजोशी आणि टिळक यांची जोडी सरकार आणि समाजसुधारक यांच्या डोळ्यांत सलू लागली होती. असो. 'डेक्कन स्टार' हें पत्र 'मराठा' पत्रात समाविष्ट केल्यानंतर त्या पत्रातील एक संपादक या नात्याने टिळक 'मराठा' पत्राचे संपादक बनले असावेत. १८७९ आणि १८८० या दोन वर्षांत मिळून 'डेक्कन स्टार' नक्की किती दिवस चाललें, हें नामजोश्यांच्या चरित्रकारांनी (गणपतराव नामजोशी यांनी) सांगितलें नाही. या वर्षांपैकी पहिलें वर्ष वासुदेव बळवंतांच्या धामधुमीचें होतें. त्या वर्षी या बंडाच्या प्रकरणावर नामजोशी आणि टिळक या वासुदेव बळवंतांच्या मित्रांनी कितीतरी लेख लिहिले असतील. ते एखाद्या संशोधकाने निवडून एकत्रित केले तर निरुपद्रवी शिक्षक बनण्यापूर्वीच्या टिळकांच्या राजकारणावर काहीतरी नवीन प्रकाश पडेल. वासुदेव बळवंतांना शिक्षा झाल्यानंतर 'डेक्कन स्टार' मध्ये जो लेख आला होता, त्यातील वासुदेव बळवंतांचें कृत्य खऱ्या ख्रिस्त्यासारखें असल्याचें जें विवेचन आहे, तें टिळकांच्या हातचें असावें असें वाटतें. त्या दिवसांत टिळकांच्या मनावर ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या निस्वार्थी लोकसेवेच्या आदर्शाची छाप विशेषेकरून पडली असल्याने विश्वनाथ नारायण मंडलीक आणि त्यांचे मित्र यशवंत वासुदेव आठल्ये (बडोद्याचे न्यायाधीश) हे त्यांना पुण्याचे जेसुईट असें चेष्टेने म्हणत असत. हा लेख २३-११-१८७९ या दिवशी अग्रलेख म्हणून प्रसिद्ध झाला होता.

In the eyes of his countrymen Wasudeo Balavant Phadke did not commit any wrong. We agree with Mr. Newnham that Wasudeo did not do any good to the people on whose behalf he laboured; but all true Englishmen must sympathise with him. This is evident from the fact that an English lady thought proper to present Wasudeo with a nosegay at the Railway station when he was carried away from Poona. Besides, our rulers are Christians who are commanded by their religion to love their neighbours as themselves. Wasudeo, though a Brahmin, showed a truely Christian spirit when he tried to relieve the misery of his countrymen. Those who censure Wasudeo for pursuing the course which he did, are simply dissemblers. When war was raging between Great Britain and her American Colonies, one Dean Tucker wrote a pamphlet to show that separation of the American Colonies from their mother country would be no loss to the latter but a clear gain to her. This opinion did not find favour at that time. But

we know from history that Dean Tucker was the only man who thoroughly understood the question and that his opinion was right. Wasudeo deserves the highest praise, not only from natives but even from Englishmen who wish for the prosperity of her Majesty's Eastern Empire. By sacrificing himself he has averted danger which sooner or later must follow intolerable oppression. We consider him as the harbinger of a bright future for India.

स्वदेशबांधवांच्या मताप्रमाणे वासुदेव बळवंतांनी कोणताच अपराध केलेला नाही. न्यायाधीश न्यूनहॅम म्हणतात, त्याप्रमाणे त्यांच्या हातून देशबांधवांचें कल्याण झालें नसलें तरी खऱ्या इंग्रजांनी त्यांच्याविषयी सहानुभूतिच व्यक्त करावयाला हवी. पुण्याच्या स्थानकावरून त्यांना नेत असताना एका इंग्रज महिलेने पुष्पगुच्छ देऊन त्यांच्याविषयीचा आदरभाव व्यक्त केला, यावरून ही गोष्ट उघड आहे. आमचे राज्यकर्ते ख्रिस्ती असून त्या धर्मात स्वतःप्रमाणे शेजाऱ्यावर प्रेम करण्याचा उपदेश केलेला आहे. वासुदेव बळवंत हे ब्राह्मण असूनही त्यांनी आपल्या देशबांधवांचीं दुःखें दूर करण्याचा खऱ्या ख्रिस्त्याप्रमाणे प्रयत्न केला. वासुदेव बळवंतांना त्यांच्या कृत्यांबद्दल दोष देणारे लोक ढोंगी आहेत. अमेरिकेतील उपनिवेशांशी इंग्लंडचें जेव्हा युद्ध जुंपलें तेव्हा डीन टकर नांवाच्या व्यक्तीने एक पुस्तक लिहून त्यात असें प्रतिपादन केलें की, अमेरिकेतील उपनिवेश इंग्लंडपासून विभक्त झाले तर त्यामुळे केवळ त्यांचेंच नव्हे तर स्वतः इंग्लंडचेंही कल्याण होईल. त्याचें विवेचन तेव्हा कोणाला रुचलें नसलें तरी इतिहासाने त्याची सत्यता पटवून दिली आहे. या उदाहरणाला अनुसरून केवळ भारतीयांनीच नव्हे तर राणीच्या राज्याचें हितचिंतन करणाऱ्या इंग्रजांनीही वासुदेव बळवंतांवर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला पाहिजे. कारण असह्य अत्याचारामुळे लगेच अथवा कालांतराने राणीच्या राज्याविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया घडण्याचा धोका त्यांनी आपल्या आत्मार्पणाने टाळला आहे. आम्ही त्यांना भारताच्या भावी उज्ज्वल भविष्यकाळाचे अग्रदूतच मानतो.

इतक्या कुशलतेने आणि निर्भीडपणाने केलेलें वासुदेव बळवंतांचें समर्थन टिळकांच्या हातून उतरलें असणें अगदी शक्य आहे. मिनाएफ यांनी म्हटल्याप्रमाणे वासुदेव बळवंतांच्या प्रकरणात नामजोशीही अडकले असल्यास त्यांच्या दैनिकाच्या संपादनाचा भार टिळकांच्यावर पडणें स्वाभाविक होतें. वासुदेव बळवंतांना ७-११-१८७९ या दिवशी जन्मठेपेची शिक्षा झाली. त्यानंतर २३ नोव्हेंबरच्या अंकात प्रसिद्ध झालेला हा लेख बहुधा एलूएल्. बी. ची परीक्षा संपल्यानंतर टिळकांनी लिहिला

असावा. एरवी या मतप्रदर्शनाला इतका उशीर होण्याचें कारण नव्हतें. कारण त्यांच्या आवडत्या अमृतबाजार पत्रिकेने १३ नोव्हेंबरच्या अंकातच फडक्यांच्या ध्येयवादित्वाची वक्तृत्वपूर्ण भाषेत स्तुति केली होती. 'डेक्कन स्टार' मधील लेखानंतर मुंबईच्या इंदुप्रकाशने फडक्यांना वेड लागलें होतें, असें लिहून मुंबईतील मवाळांचें त्याच्याविषयीचें मत व्यक्त केलें. वस्तुस्थिति अशी होती की, वासुदेव बळवंतांच्या बंडाने या मवाळांच्या राजकारणाची त्याच्या जन्मकालीच चिता पेटविली होती. जिथे प्रतिकार नसेल, तिथे बलात्कार होऊ शकत नाही, असा व्यवहारातील सामान्य संकेत आहे. याकरिता मवाळ पक्षातील स्वराज्यद्रोही पुढारी इंग्रजी राज्य हा ईश्वराचा वर असें प्रतिपादन करून भारतीय प्रजेची प्रतिकारबुद्धिच नष्ट करू पाहात होते. एका इंग्रज कवीने अतिकामुक स्त्रीची भूमिका रंगविताना म्हटलें आहे,

From one supreme danger I am most free
I am so willing that I cannot be ravished.

कामोपभोगासाठी मी इतकी उत्सुक असते की, माझ्यावर बलात्कार होऊच शकत नाही. त्यामुळे त्या महान् संकटापासून मी सर्वस्वी मुक्त आहे. भारतीय प्रजेची मनःस्थिति या कामवश स्त्रीसदृश होऊ नये, याकरिता वासुदेव बळवंतांनी निर्भयपणे घोषणा केली की, इंग्रजी राज्य हा भारताला देवाने दिलेला वर नसून दुर्दैवाने दिलेला अभिशाप आहे आणि या अभिशापापासून दुर्दैवी दरिद्री प्रजेची मुक्तता घडवून आणण्याकरिता प्राणपणाने लढणें हें प्रत्येक राष्ट्रभक्ताचें कर्तव्य आहे. बायबलातील जॉन दि बॅप्टिस्ट उच्च स्वराने घोषणा करीत असे. 'पश्चात्ताप करा (पापापासून परावृत्त व्हा.) स्वर्गराज्य सन्निध आलें आहे.' त्याप्रमाणेच वासुदेव बळवंतांनी घोषणा केली. 'पश्चात्ताप करा, (इंग्रजसेवेच्या पापापासून परावृत्त व्हा.) शिवाजीराज्य सन्निध आलें आहे.' भारताला राष्ट्रधर्माची दीक्षा देणाऱ्या प्रेषितांमध्ये वासुदेव बळवंतांचें स्थान हें जॉन दि बॅप्टिस्ट यांचेंच असून काही काळ त्यांचें शिष्यत्व पत्करलेल्या बाळ गंगाधरांनीच पुढे भारताला राष्ट्रधर्माची दीक्षा दिली.

वासुदेव बळवंतांचे रामोशी सहकारी आणि टिळकांचे सुशिक्षित रामोशी सहकारी

वासुदेव बळवंतांच्या आंदोलनाच्या एक शिक्षित आणि एक अशिक्षित अशा दोन शाखा होत्या. यांपैकी बहुतेक शिक्षितांनी घरादारांवर तुळशीपत्र ठेवून बंडात भाग घेण्याचें नाकारलें. पण त्यांनी निदान-

पक्षी भूमिगत स्वातंत्र्यवादी पक्षाचें अस्तित्व टिकवून ठेविलें आणि त्यांच्याच गटातील टिळकांनी स्वतःला राजकारणाला वाहून घेतल्या-नंतर त्यांच्या सर्व कार्यक्रमात भाग घेण्याला ते तत्परतेने सिद्ध झाले. उलट पक्षी वासुदेव बळवंतांच्या रामोशी सहकाऱ्यांपैकी जे प्रामाणिक होते, ते त्यांच्या दौलतरावांप्रमाणे इंग्रजांच्या गोळ्यांना बळी गेले आणि जे अप्रामाणिक होते, ते लुटीत स्वतःच्या हाती लागलेली संपत्ति लपवून ठेवून वरती एकंदर लुटीचा वाटा मिळण्यासाठी दमदाटी करू लागले. त्यांच्या या अप्रामाणिकपणामुळे वैतागून जाऊन वासुदेव बळवंत श्रीशैल मल्लिकार्जुन येथे आत्मार्पण करण्याकरिता निघून गेले. वासुदेव बळ-वंतांना आपल्या अशिक्षित सहकाऱ्यांचा हा जो कटु अनुभव आला, तसलाच कटु अनुभव टिळकांना आपल्या दक्षिणविद्याप्रसारक संस्थेतील सुशिक्षित सहकाऱ्यांचा आला. वासुदेव बळवंतांच्या रामोश्यांप्रमाणेच व्यक्तिशः धन मिळेल तें आपलेंच असें मानून पुन्हा संस्थेच्या समाईक उत्पन्नातून अधिकांत अधिक द्रव्यलाभ करून घेण्याच्या धोरणाचा त्यांनी अंगीकार केल्यामुळे टिळकांना आपल्या तत्त्वनिष्ठेला अनुसरण्याकरिता सरतेशेवटी या सुशिक्षित रामोश्यांचा त्याग करून स्वतंत्रपणे देशसेवेचा मार्ग चोखाळावा लागला. या तुलनेने आगरकर-गोखल्यांच्या भक्तांना राग येईल, हें मलाही समजतें, पण तें जर खरे समतावादी असतील तर त्यांनी या तुलनेने चिडण्याचें कारण नाही. दुसरी गोष्ट ही की या भक्तांनी टिळकांना जें अनर्गल गालिप्रदान केलें आहे, त्या मानाने ही तुलना फारच सौम्य आहे. महाराष्ट्रांतील शिक्षण संस्थांना आणि त्यांच्या संसर्गाने इतर संस्थांनाही जी कीड लागली, ती दक्षिण विद्याप्रसारक संस्थेच्या उदाहरणामुळेच लागली. इतकेंच नव्हे, तर यांच्या वर्तनामुळे विटून गेलेल्या टिळकांना सामान्यतः संस्था शब्दाची दहशतच बसली होती, म्हणून रानडेपक्षाप्रमाणे त्यांनी आपल्या संस्थांचें जाळें पसर-विण्याचा प्रयत्न केला नाही. वासुदेव बळवंतांच्या बंडात राजकीय दरव-ड्यांचा जो कटु अनुभव आला, त्यापासून शहाणपण शिकून महाराष्ट्रीय क्रांतिकारकांनी टिळकयुगात राजकीय दरवडे सामान्यतः घातले नाहीत. टिळकांच्या मागून महाराष्ट्रात रॉय पक्षाची संघटना झाल्यानंतरच इथे पुन्हा राजकीय दरवडे पडू लागले आणि पर्वती, जेजुरीसारखीं देवस्थानें लुटलीं जाऊ लागलीं. पण असली कल्पना वासुदेव बळवंतांच्या ध्यानी मनी सुद्धा येणें शक्य नव्हतें. वासुदेव बळवंतांचे एक सहकारी बाळकृष्ण-पंत अथवा आप्पाराव वैद्य, विधिज्ञ, यांचे एक चिरंजीव स. बा. वैद्य हे 'नूतन मराठी'त माझे वर्गबंधु होते. त्यांच्या सांगण्यावरून असें समजतें,

'वासुदेव बळवंत हे भूमिगत असताना एके दिवशी वेषांतर करून आणि एक भली मोठी झोळी घेऊन अकस्मात् आमच्या घरी आले. वडील तेव्हा न्यायालयात गेले होते आणि तत्कालीन रूढीप्रमाणे आईने काही त्यांना ओळखलें नाही. पण ब्राह्मण पाहून 'माधुकरी हवी आहे का' असें विचारलें. त्यांनी सांगितलें. 'माधुकरी नको, एक पाट घेऊन या.' हें ऐकून आईला नवल वाटलें, तरी ती लगेच पाट घेऊन आली. त्या पाटावर वासुदेव बळवंतांनी आपल्या झोळीतून आणलेली अवजड शंकराची पिंडी आणि तशीच एक गणपतीची मूर्ति ठेवली. मग ते म्हणाले, 'तुमचा दीर माझ्या मागे लागला आहे. त्याच्या हातून तुम्ही मला वाचवू शकत नाही. पण या देवांना वाचवा.' असें सांगून ते नाहीसे झाले. आप्पाराव वैद्यांचे बंधु रक्षकविभागात असून वासुदेव बळवंतांना पकडण्याच्या कामावर नेमलेल्या अधिकाऱ्यांत तेही होते. असो. अशा प्रकारे अचानक घरी चालून आलेल्या देवांची स्थापना आप्पारावांनी पिरंगूट येथे केली असून आपल्या मृत्युपत्रात त्या देवस्थानाकरिता शंभर एकरांचें शेतही देऊन ठेविलें आहे. आप्पाराव वैद्यांचे फौजदार बंधु हेही मनातून बंडाला अनुकूल होते, असें फडक्यांच्या चरित्रकारांनी लिहिलें आहे. माझे वर्गबंधु सांगतात की, पाठलाग होत असताना एकदा वासुदेव बळवंतांनी ओंकारेश्वरासमोरील वृद्धेश्वराच्या मंदिराचा आश्रय घेतला होता. या मंदिरावर रक्षकांचा छापा आला, तेव्हा वैद्यच प्रथम मंदिरात शिरले आणि तेथील निर्माल्याच्या कुंडात वासुदेवरावांना लपवून निर्माल्याच्या बेलफुलांनी त्यांना आच्छादून टाकलें. त्यानंतर रक्षकांनी सारे मंदिर धुंडलें तरी त्यांना बंडवाल्यांचा मागमूस लागला नाही. असल्या काही घटनांमुळे वैद्यांचा त्यांच्या वरिष्ठांना संशय येऊ लागला होता. पण नंतर विश्रामबागेच्या आणि बुधवार वाड्याच्या आगीत एका इंग्रज अधिकाऱ्याचे त्यांनी प्राण वाचविले, त्यामुळे त्यांच्यावरील रोष कमी झाला.

वासुदेव बळवंत आणि क्रांतीचे प्रयत्न

वासुदेव बळवंतांना स्वराज्याचा, स्वातंत्र्याचा ध्यास लागला होता. देशातील अवनत समाजाची अन्नान्न दशा पाहून ते पराकाष्ठेचे कष्टी आणि इंग्रजांच्या द्वेषामुळे वेडेपिसे बनले होते, ही गोष्ट खरी असली तरी त्यांच्या मनश्चक्षूंपुढे एखादें भव्य, दिव्य आणि नेत्र दिपविणारें असें महान् स्वप्न नव्हतें. असलें स्वप्न आपल्या प्रतिभेने साकार करण्याचें सामर्थ्यही त्यांना लाभलें नव्हतें. ते क्रांतीचे कवि नसून केवळ

कृति करणारे सैनिक होते. खऱ्या क्रांतिकारकांचा कृतीपेक्षा स्वप्नांवर अधिक भर असतो. उदाहरणार्थ, तरुण आयर्लंड या संस्थेच्या चालकांचें वर्णन करताना एका लेखकाने म्हटलें आहे,

As a party Young Ireland had genius, enthusiasm, birth, position, and the courage of its conviction, but its efforts to remould the State were expended in writing and oratory, poetry-instead of pikes, declamations instead of drilling, and consequently its final despairing effort to raise rebellion in the year 1848 was as crudely conceived as easily suppressed.

तरुण आयर्लंड पक्षात प्रतिभा, उत्साह, अभिजात कौलीन्य आणि आपल्या आदर्शाशी प्रामाणिक राहण्याचें धैर्य, हे सारे गुण होते. पण राज्ययंत्राची नवी रचना करण्याचे त्यांचे उपाय लेख आणि वक्तृत्वपूर्ण भाषणें, एवढ्यापुरतेच मर्यादित होते. हे प्रतिपक्षावर बाणाऐवजी विडंबन काव्यांचा वर्षाव करीत आणि संचलन करणाऱ्या सैनिकांसह शत्रूवर आक्रमण करण्याऐवजी घोषणापत्रकांसह आक्रमण करीत. इतके दिवस बोललो, तशी एकदा कृति करावी, म्हणून तरुण आयर्लंडच्या नेत्यांनी एके दिवशी पूर्वसिद्धतेवाचून बंड केलें आणि इंग्रज सरकारनेही तें पूर्वसिद्धतेवाचून चिरडून टाकलें. तरुण आयर्लंडच्या बंडाचें इंग्रज इतिहासकाराने केलेलें हें औपरोधिक वर्णन त्याला क्रांतीचा खरा अर्थ न समजल्याचा पुरावाच आहे. प्रत्यक्ष कृतीपेक्षा शब्दांवर आणि स्वप्नांवर अधिक विश्वास ठेवणारे द्रष्टेच परतंत्र समाजाच्या मनोभूमिकेत आमूल परिवर्तन घडवून आणतात. क्रांतीचे नेते स्वतःच असल्या एखाद्या महान् स्वप्नात अथवा काव्यात दंग झाल्यावाचून त्यांच्या समाजातील दैनंदिन जीवनात त्या स्वप्नाचा आवेश आणि प्रवेश होत नाही. अशा महान् स्वप्नाचा आवेश क्रांतिपक्षाच्या अनुयायांच्या अंतःकरणात संचारला म्हणजे ते निद्रेत चालणाऱ्या व्यक्तींप्रमाणे सभोवतालच्या सर्व विक्षेपांकडे लक्ष न देता, परिस्थितीचें भान न राहता सरळ आपल्या उद्दिष्टाची वाट चालू लागतात. यांच्या स्वप्नाविष्ट अवस्थेची कसोटी पाहण्याकरिता कोणी नास्तिकांनी त्यांच्या हातांत जळत्या काचा दिल्यानंतर त्यांनी हात भाजल्यानेही ते कधी भानावर आले नाहीत. 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।' अशीच क्रांतीच्या तंद्रीत संचार करणाऱ्यांची अवस्था असते. शस्त्रांनी त्यांना तोडलें, तरी त्याची त्यांना क्षिति नसते. अग्नीने त्यांना भाजलें तरी त्याची कोणतीही प्रतिक्रिया त्यांच्या चर्येवर दिसत नाही. असे महान् स्वप्नाने भारलेले अनुयायी वाग्देवीची आराधना करणाऱ्या समाजात मिळविण्यात वासुदेव बळवं-

तांना अपयश आल्यामुळे ते कृतिवीर, नेहमी कृति करण्याला तत्पर असलेल्या रामोशी समाजात समाविष्ट झाले आणि त्यांच्यासह लुटालूट करताना त्यांना स्वतःलाच संभ्रम पडू लागला की, रामोशी आपले हस्तक आहेत की आपणच रामोश्यांचे हस्तक बनलो आहोत. अशा संभ्रमात ते असतानाच त्यांचे कल्याण दौलतराव मारले गेले आणि वासुदेव बळवंतांनी रामोश्यांचा पाश तोडून श्रीशैलमल्लिकार्जुनाचा आश्रय केला. वर ही गोष्ट सांगावयाची राहून गेली की १८४८ मध्ये आयर्लंडात भयानक दुष्काळ पडला असताना जनतेचे हाल उघड्या डोळ्यांनी पाहवेनात म्हणून आयर्लंडच्या नेत्यांनी बंड केलें. १८७६-७७ च्या दुष्काळानंतर पुनश्च १८८० मध्ये मोठा दुष्काळ पडणार असें भविष्य तेव्हा केरूनाना छत्र्यांनी केल्यामुळे लोकांच्या हालअपेष्टांकडे सरकारचें लक्ष वेधण्याकरिता वासुदेव बळवंतांनी बंड केलें. केरूनानांच्या भविष्याचा उल्लेख डेक्कन स्टारच्या २९-८-१८८० च्या अंकांत आला आहे.

वासुदेव बळवंतांचें बंड हीच 'आनंदमठा'ची प्रेरणा

साऱ्या सुशिक्षित भारतीयांना बंकिमचंद्रांचे वंदे मातरम् हें पद सुविदित आहे. पण हें पद ज्या 'आनंदमठ' कादंबरीतील मातृमोचनार्थ प्राणार्पण करण्याची शपथ घेण्याच्या प्रकरणात ग्रथित केलें आहे, ती कादंबरी वासुदेव बळवंतांच्या चरित्रापासून प्रेरणा घेऊन लिहिली गेली, हा इतिहास सामान्यतः अविदितच आहे.

"मातृमोचन होईपर्यंत मी कौटुंबिक जीवनाचा त्याग करतो; मातापिता, भ्राताभगिनी, दारासुत, आत्मीयस्वजन या सर्वांचा धनसंपत्तीसह त्याग करतो, विषयवासनेला बळी पडणार नाही, स्त्रीसह एका आसनावर बसणार नाही, जें काही धनार्जन करीन, तें सर्व संतानसेनेला समर्पण करीन. सनातन धर्माच्या संरक्षणार्थ सशस्त्र युद्ध करीन, रणांतून पलायन करणार नाही, प्रतिज्ञाभंगाचें पाप हातून घडल्यास अग्निकाष्ठें भक्षण करून अथवा विषपान करून प्राणत्याग करीन. मी ब्राह्मण असलो तरी इतःपर जात मानणार नाही. माझ्याप्रमाणेच जे कोणी या महाव्रताची दीक्षा घेतील, ते सर्व माझे बंधु." ही वासुदेव बळवंतांच्या कृतीवरून कळून येणारी त्यांची प्रतिज्ञाच 'आनंदमठ' कादंबरीतील संतानसेनेची दीक्षा घेताना महेंद्राला करावी लागली आणि नंतर त्याला वंदेमातरम् मंत्र सांगण्यात आला. 'आनंदमठ' कादंबरीची कल्पना सुचण्यापूर्वी कित्येक वर्षे अगोदर बंकिमचंद्रांनी वंदेमातरम् हें पद लिहिलें होतें. या पदासंबंधी आपल्या कन्येला त्यांनी भविष्यही सांगितलें होतें की, इतःपर पंचवीस तीस वर्षांनी साऱ्या बंगालला या

पदाचें वेड लागेल. या पदाला उचित अशी पार्श्वभूमि, वासुदेव बळवंतांच्या अभियोगात उपलब्ध झालेल्या त्यांच्या चरित्राने बंकिमचंद्रांना सुचली. बंकिमचंद्र हे दुय्यम जिल्हाधिकारी असल्याने आणि तत्कालीन परिस्थितीमुळेही त्यांना उघडपणे वासुदेव बळवंतांच्यावर कादंबरी लिहिता येत नव्हती. यासाठी १७७० मधील बंगाल्यातल्या अतिभीषण दुष्काळानंतर तेथील संन्याशांनी आंग्लोमहंमदी राज्याविरुद्ध केलेल्या बंडाची पार्श्वभूमि घेऊन त्यांनीं आपल्या कादंबरीची रचना केली. ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांच्या शत्रूंनी त्या कादंबरीसहच कादंबरीकाराचाही सरकारने काटा काढावा, याकरिता शक्य ते प्रयत्न केले. या अनुभवानंतर बंकिमचंद्रांनी आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रात असे उद्गार काढले होते की, अधोगतीला चाललेल्या या राष्ट्राला मी वंदे मातरम् हा मंत्र न देता वंदे उदरम् हाच मंत्र द्यावयाला हवा होता. या प्रसंगावरून बंकिमचंद्रांना आपल्या कादंबरीच्या स्फूर्तिस्थानाला दृष्ट लागू नये, म्हणून किती जपावें लागलें असेल, याची कल्पना येते. १८७६ मधील दुष्काळानंतर वासुदेव बळवंतांनी सर्वस्वाचा होम करून केलेलें समकालीन बंड आणि १७७० मधील दुष्काळानंतर बंगाल्यात संन्याश्यांनी केलेलें ऐतिहासिक बंड यांतील सादृश्य सभोवतालच्या शत्रुमित्रांना सहज समजण्याजोगें होतें. वासुदेव बळवंतांना प्रथम लाभलेलें यश आणि संन्याश्यांना 'आनंदमठ' कादंबरीत लाभलेलें यश, तसेंच वासुदेव बळवंतांचें श्रीशैल मल्लिकार्जुनाकडील प्रयाण आणि संन्याश्यांचे नेते सत्यानंद यांनी कादंबरीच्या अंतीं केलेलें हिमालयगमन यांसारखीं इतर सादृश्येंही बंकिमचंद्रांच्या राहूकेतूंना त्यांच्या नीच कारस्थानात उपयोगी पडलीं असतील. पण त्या कादंबरीच्या अंती महादेव गोविंदांच्या सारख्या एका ईश्वरी योगायोगवाल्या महापुरुषाच्या मुखाने इंग्रजी राज्याच्या आवश्यकतेचें आणि इंग्रजांचें शास्त्रीय विषयातील गुरुत्व स्वीकारण्याच्या उपयुक्ततेचें वक्तृत्वपूर्ण विवरण आलें असल्याने ती कादंबरी आणि तिचे जनक या उभयतांना ग्रस्तास्त ग्रहण लावण्याचा त्यांच्या शत्रूंचा प्रयत्न विफल झाला. या अनुभवाने शहाणपण शिकून बंकिमचंद्रांनी झांशीची विद्युल्लता महाराणी लक्ष्मीबाई हिच्या चरित्रावर कादंबरी लिहिण्याचा प्रकट केलेला संकल्पही सोडून दिला आणि संकल्पित लक्ष्मीराणीचें 'देवीचौधराणी'त रूपांतर केलें.

स्वातंत्र्याची कल्पनाच बंगाल्यांना नव्हती

येथे ही महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, त्या काळी

स्वातंत्र्याची कल्पना बंगाली समाजाला अभिनव होती. स्वतः बंकिमचंद्र म्हणतात,

"राजार राज्यसंपत्ति रक्षाय यत्न, वीरेर वीरदर्प, क्षत्रियेर युद्धप्रयास ए सकलेर भूरि भूरि उल्लेख पाओया जाय. किंतु स्वातंत्र्यलाभाकांक्षा से सकलेर मध्यगत नोहे. स्वातंत्र्य, स्वाधीनता, ए सकल नूतन कथा."

येथे सांगितल्याप्रमाणे बंगाल्यांना स्वातंत्र्याची कल्पनाच नवीन असल्याने या कल्पनेचा प्रत्यक्ष परिचय करून घेण्याकरिता त्यांना महाराष्ट्राकडेच दृष्टि वळवावी लागे. वर्तमानकालीन एक सुप्रसिद्ध टीकाकार आणि 'बंकिमसरणी' या प्रसिद्ध टीकाग्रंथाचे लेखक प्रमथनाथ विशी यांनी आनंदमठाविषयी अकल्पित आणि अनपेक्षित प्रश्न विचारला आहे.

'आनंदमठ जिनिसटा कि बांगाली लइया'? 'आनंदमठ' कादंबरीतील कथानक हें बंगाली समाजाचे कथानक आहे का? त्याचें उत्तर त्यांनी स्वतःच दिलें आहे की, "आनंदमठ उपन्यासेर प्रतिष्ठानभूमि प्रत्यक्षत बांग्लादेशे होले ओ ओर यथार्थभूमिका भारतवर्षव्यापी." आनंदमठ कादंबरीची आख्यानभूमि सकृद्दर्शनी बंगालची भूमि असली तरी त्या कथेची यथार्थ भूमिका भारतवर्षव्यापी. पण इथे असा प्रश्न उदभवतो की मातृमोचनार्थ प्राणार्पण करणाऱ्यांच्या संस्था निर्माण करण्याइतकें स्वातंत्र्यप्रेम भरतखंडांतील कोणत्या प्रांतात दृग्गोचर होत होतें? अर्थात् महाराष्ट्रात. स्वतः बंकिमचंद्रांनीच अनेकदा असा उल्लेख केला आहे की, अखिल भारतात राष्ट्रीयता आणि स्वातंत्र्यप्रियता हे गुण एकट्या महाराष्ट्रात मात्र आढळून येतात. अर्वाचीन बंगाली टीकाकारांच्या नेत्रांपुढे वासुदेव बळवंतांचें चरित्र नसल्याने त्यांना ही कादंबरी वाचताना चुकल्यासारखें होतें. कादंबरीचें कथानक विस्कळीत, पात्रांचें स्वभावरेखन अस्पष्ट वाटतें. पण इतकें असूनही या कादंबरीचा बंगाली वाचकांवर आणि त्यांच्या द्वारा भारतीय राजकारणावर असामान्य प्रभाव झाला आहे. प्रमथनाथ विशी म्हणतात:

"भारतीय राजनीतिर उपरे आनंदमठेर प्रभाव अपरिसीम. नव्य भारते लिखित आर कोनो ग्रंथ सर्वभारतीय राजनीति ओ जीवनवादेर उपरे एमन प्रभाव विस्तार कोरते सक्षम होयेछे बोले मने होय ना. काजेई बइखानिर पटभूमिर मूल्य ओ गुरुत्व निज बइखानार चेये कम नय, हयतो वा बेशि, काजेइ ग्रंथेर आलोचनार आगे पटभूमिर आलोचना आवश्यक."

भारतीय राजकारणावर आनंदमठाचा प्रभाव अपरिसीम. अर्वाचीन भारतात लिहिलेल्या अन्य कोणत्याही ग्रंथाचा अखिलभारतीय राजकारणावर आणि जीवनदृष्टीवर असा प्रभाव होऊ शकला नाही. यामुळे या ग्रंथाच्या पार्श्वभूमीचें मूल्य आणि महत्त्व मूळ ग्रंथापेक्षा कमी तर नाहीच, असल्यास अधिकच असेल. यासाठी या ग्रंथाची चर्चा करण्यापूर्वी त्याच्या पार्श्वभूमीची चर्चा करणें आवश्यक आहे.

स्वातंत्र्याची शक्यता आणि आवश्यकता

या ग्रंथाची पार्श्वभूमि अशी आहे की, एकोणिसाव्या शतकातील कोणत्याही प्रमुख बंगाली लेखकाने तत्काळ स्वातंत्र्याची शक्यता आणि आवश्यकता प्रतिपादिलेली नाही, असे प्रमथनाथ विशींनी निक्षून सांगितलें आहे. त्याच्या उलट महाराष्ट्रात निदान विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून ही स्वातंत्र्यप्रचाराची विचारलहरी वेळोवेळी उचंबळलेली आहे. 'खुल्क खुदाका, मुल्क बादशाहका, अंमल कुंपनीसरकारका' या सुप्रसिद्ध सूत्राप्रमाणे १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामापर्यंत दिल्लीश्वर हाच देशाचा स्वामी असून त्याचा अधिकार मात्र ईस्ट इंडिया कंपनी चालवीत होती. त्यामुळे दिल्लीत दिल्लीश्वराचें अस्तित्व असेपर्यंत भारतीय जनतेला आपण परक्यांचे दास नसल्याचें तात्त्विक समाधान लाभू शकत होतें. उदाहरणार्थ, म्हैसूरच्या मूळच्या महाराजांचा अधिकार हैदर आणि टिपू हें उभयता चालवीत असत, त्यासारखीच ही स्थिति होती. त्या दिवसांत कंपनीच्या सेवेतील भारतीय अधिकारी तत्त्वतः देशशत्रूंचे सेवक बनत नव्हते. पण १-११-१८५८ या दिवशी दिल्लीची बादशाही नष्ट करून व्हिक्टोरिया राणीने आपण हिंदुस्थानाच्या राणीचें पद स्वीकारल्याची घोषणा केली, (आणि ब्रिटिशांच्या हातून सत्ता गेली तरी दिल्लीत परत चगताई घराण्याची पातशाही स्थापिली जाण्याची शक्यता नष्ट करून हिंदुराष्ट्रप्रस्थापनेचा मार्ग निष्कंटक केला.) आणि तेव्हापासून आपल्याला पारतंत्र्याच्या नरकात लोटणाऱ्या देशशत्रूंची सेवा आपण करावयाची कीं नाही, असा प्रश्न देशभक्तांच्या सदसद्विवेकबुद्धीपुढे उपस्थित झाला. या प्रश्नाचें उत्तर इंग्रजी राज्य हा ईश्वराचा वर मानणाऱ्या रावबहाद्दुर रानड्यांनी (आणि इतर सर्व प्रांतांच्या नेत्यांनीही) असें दिलें कीं, "स्वातंत्र्याच्या स्थितीला आम्ही योग्य नाही आणि अशी वस्तुस्थिति असल्याने आमचें प्रस्तुतचें पारतंत्र्य आम्हांला अत्यंत हितावह होय." या भ्रांत आणि देशद्रोही विचारसरणीच्या अगदी उलट प्रतिपादन राष्ट्रीय विचारसरणीचे आद्यप्रणेते विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी

'आमच्या देशाची स्थिति' या निबंधात निर्भयपणाने आणि निस्पृहपणानें केलें आहे. 'वस्तुतः पाहता इंग्रजांनी आमचा पतकर घ्यावयाला पाहिजे होता, असें काही नाही. ते जर इकडे आले नसते तर त्यामुळे आमचें काही अहित न होता उलटें हितच होण्याचा संभव अतिशय होता. स्पेनच्या लोकांनी क्रमाक्रमाने जसें मुसलमानांना आपल्या देशातून पार आफ्रिकेत घालवून दिलें आणि अर्धचंद्राच्या स्थानी पुनश्च आपला क्रूस आणून त्यांनी स्थापित केला. त्याप्रमाणेच चालू शतकात पुनः आर्यराष्ट्राचें सार्वभौमत्व होण्याचा योग आला होता. पण आमच्या पाश्चात्य आर्यबांधवांनी छिद्रान्वेषण आरंभून भाऊबंदकी साधल्यामुळे त्याजवर विरजण पडलें. असो, तर आम्ही स्वातंत्र्याच्या स्थितीला योग्य नाही आणि तसें असल्यामुळे आमचें प्रस्तुतचें पारतंत्र्य अत्यंत हितावह होय; हीं दोनही मतें निव्वळ खोटीं आहेत, असें आम्हांस वाटतें. हीं अलीकडे आमच्या हृदयाशीं खिळून गेलीं आहेत, हेंच प्रस्तुत काळी आमची स्थिति सुधारण्यास मोठें प्रतिबंधक आहे, यांत संशय नाही. (निबंधमाला अंक ७८).

पारतंत्र्य आम्हांस अत्यंत हितावह, असें मानणाऱ्यांना इंग्रजी राज्यात सामान्य प्रजेची जी दुरवस्था झाली होती, तिची जिवंत जाणीव नव्हती. ही जाणीव विष्णुशास्त्री चिपळूणकरांना होती, तशीच वासुदेव बळवंत फडक्यांनाही होती. आमच्या देशाच्या स्थितीचें वर्णन करताना चिपळूणकर लिहितात.

"सध्या आमच्या लोकांस त्राण म्हटलें म्हणजे सात रुपयांवारी हडेलहप्पी करावी आणि अफगाणिस्थानात थंडीने कुडकुडून मरावें, पांच रुपयांवारी कुग्रामात गुराख्याचा धंदा करावा, (आणि खबरदार, पाचाचे सहा केलेत तर, पांच रुपये पंच प्राणांस हें त्रैराशिक का गैर आहे?) किंवा खांद्यावर आसूड टाकून बैलांच्या पाठीवर रहावें आणि आर्यभूमीचें विलेखन करून मेघराजाने जर कृपा केली तर प्रथमतः सरकारची पोतडी भरावी, राहिल्यासाहिल्यात सावकाराला फूल नाही फुलाची पाकळी वाहावी आणि मग आपण खुशाल शानदार रागदारीत 'देवी श्री विक्टुरिया सार्वभौमिणी' हीस कुडीत प्राण आहे तोपर्यंत अत्यंत निष्ठापूर्वक आळवीत बसावें! तेव्हा एकंदरीत पाहता सुगीत आणि दुष्काळात जें अंतर, अथवा जेवणात आणि भुकेत जो प्रभेद, तोच सध्या राज्यकर्त्यांत आणि आमच्या राष्ट्रात आहे."

आपल्या स्वातंत्र्यवादी विचारसरणीचा प्रसार करण्याचें साधन म्हणून चिपळूणकरांनी न्यू इंग्लिश स्कूल आणि वासुदेव बळवंतांनी भावे-

स्कूल काढलें. पण हीं दोनही विद्यालयें लौकरच गौरजनपूजकांच्या हाती गेलीं. इंग्रजांनी सारा भारतीय समाज शस्त्रनिर्बंधाने खच्ची केला असल्याने वासुदेव बळवंतांनी समाजबाह्य वनवासी लोकांची संघटना करून इंग्रजांविरुद्ध क्रांतियुद्ध लढविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या उलट स्वतःला दुसरा शिवाजी म्हणविणारे वासुदेव बळवंत आणि मराठी भाषेचे शिवाजी म्हणविणारे चिपळूणकर या दोन शिवाजींचे अनुयायी बनलेल्या टिळकांनी क्रांतिकार्याचे नेहमीचे घटक जे विद्यार्थी, शेतकरी, कामकरी आणि सैनिक यांना स्वपक्षाला वळवून क्रांतिकारकांचा पक्ष संघटित करण्याचा प्रयत्न केला. क्रांतिकार्याला मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा पुरवठा व्हावा, याकरिता स्वस्त शिक्षण देणाऱ्या शाळांची आणि महाविद्यालयांची मालिकाच टिळकांना चालवावयाची होती. याकरिता खिस्ती धर्मोपदेशकांप्रमाणे स्वार्थत्याग करून स्वस्तात स्वस्त शिक्षण देण्याच्या तत्त्वाचा टिळकांनी पुरस्कार केला. त्याचप्रमाणे स्वदेश स्वावलंबी बनावा आणि असंख्य कामगारांना कामें मिळून त्यांचा देशोद्धारासाठी उपयोग करता यावा, यासाठी त्यांनी स्वदेशीचा प्रथमपासून प्रचार केला. शेतकऱ्यांच्या हितासाठी तर ते अहर्निश झटतच असत. महाराष्ट्रात सैनिकांची संख्या फार थोडी असल्याने सैन्यात मात्र त्यांना फारसा चंचुप्रवेश करता आला नाही.

विमानविहारींचा प्रबंध, आनंदमठ आणि फडके

वरील विवेचन लिहून झाल्यानंतर 'जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी' या तज्ज्ञांच्या नियतकालिकात, १९६६ मधील एप्रिलच्या अंकात आनंदमठ आणि फडके या विषयावर डॉ. विमानविहारी मुजुमदार यांनी लिहिलेला स्वतंत्र प्रबंधच पहावयाला मिळाला. ते म्हणतात की, फडक्यांवरील अभियोग १८७९ च्या नोव्हेंबरमध्ये चालून त्यांच्याविषयीची उपलब्ध माहिती, विशेषतः त्यांची आत्मकथा आणि दैनंदिनी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली. वासुदेव बळवंतांच्या आर्त हृदयाची ती हाक ऐकल्यानंतर बंकिमचंद्रांच्या हृदयसिंधूत जें विचारमंथन झालें, त्याचें नवनीतच आनंदमठ ही लगेच १८८० मध्ये लिहिलेली कादंबरी होय. फडक्यांचें बंड हें जसें १८७६-७७ मधील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर घडून आलें, त्याप्रमाणेच आनंदमठातील संतानांचें बंड १७७० मधील बंगाल्यातील अतिभयानक दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर घडून येतें. जटाधारी वैरागी बनून आणि हातात झोळी घेऊनच फडक्यांनी नाशिक, नगर, खानदेश, वऱ्हाड, नागपूर, इंदूर, उज्जयिनी, बडोदे, तासगांव, मिरज, सांगली,

कोल्हापूर इत्यादि प्रांतांतून प्रचार केला. फडके हे धर्मनिष्ठ असून उपासनेत आणि प्रार्थनेत कितीतरी काळ घालवीत. आपल्या देशबांधवांना सुख लाभावें, यासाठी देवाची प्रार्थना करून त्यांनी श्रीशैल येथे आत्मार्पण करण्याचा प्रयत्न केला. आनंदमठातील संतानांचें या सर्व बाबतीत फडक्यांशी सादृश्य असून १७७२ च्या दिवसांत बंगाल-बिहार प्रांतातून ज्या संन्याशांनी बंड केलें, ते नंगे असून सामान्य जनतेचे कर्दनकाळ होते. ते जिथे गेले, तिथे त्यांनी विध्वंस करण्यापलीकडे दुसरें काहीच केलें नाही. या संन्याशांनी सरकारी कोश लुटण्याचा प्रयत्न केल्याचा इतिहासात उल्लेख नाही. पण फडक्यांना सरकारचे कोश लुटावयाचे होते, हें त्यांनी आपल्या निवेदनात सांगितलें असून त्यांची अतृप्त इच्छा पूर्ण करण्याकरिताच बंकिमचंद्रांनी आपल्या संतानांच्याकडून सरकारी कोश लुटविले आहेत आणि बंदिशाला फोडविल्या आहेत. हीं सारीं सादृश्यें दाखवून पुढे डॉ. विमानविहारींनी, आपली कादंबरी राजरोषाच्या अग्नीत दग्ध होऊ नये, यासाठी बंकिमचंद्रांनी आनंदमठात वेळोवेळी कसे बदल केले आहेत, याची सविस्तर चर्चा केली आहे. पण त्या चर्चेचा मराठी वाचकांना काहीच बोध व्हावयाचा नाहीं.

बंकिमचंद्रांकडून करविलेलें पाप

डॉ. विमानविहारींचा प्रबंध वाचल्यानंतर मला आठवण झाली की, या दिवसांत सरकारने बंकिमचंद्रांना एक अश्लाघ्य पाप करावयाला लाविल्याने त्यांचें अंतःकरणही प्रक्षुब्ध झालें असावें. १८७८ मध्ये हिंदुस्थानसरकारने देशी भाषेतील मुद्रणालयांचें नियंत्रण करण्याचा नवा निर्बंध नामधारी विधिमंडळाकडून संमत करून घेतला, त्यावेळी बंगाल सरकारने बंकिमचंद्रांना त्या निर्बंधाचें समर्थन करणें भाग पाडलें होतें. कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ, यासारखेंच हें कृत्य होतें. असलें पाप करावयाला लाविल्यामुळे बंकिमचंद्रांना पराकाष्ठेची चीड आली असली पाहिजे, हें उघड आहे. या प्रसंगामुळेच पारतंत्र्याच्या हलाहलाचें प्राशन करून नीलकंठ बनलेल्या बंकिमचंद्रांनी या विषसेवनापासून भारताची मुक्तता करण्याचा मार्ग प्रकाशमान करण्याकरिता आनंदमठ ही कादंबरी लिहिली असली पाहिजे. सरकारी कालकूटाचा प्रतिकार करण्याकरिता कूटनीतीचाच प्रयोग करून वरकरणी इंग्रजी राज्याचें समर्थन करणारी, पण परिणामतः इंग्रजी राज्याचा पायाच उखडून टाकण्याकरिता कालांतराने स्फोट होणारा सुरुंग पेरणारी ही कादंबरी, आपल्या जनकाचें मनोगत पूर्ण करण्याला समर्थ झाली, अशीच साक्ष इतिहास

आज देत आहे. मुद्रणस्वातंत्र्याला विरोध करण्याचें पाप करण्यापेक्षा बंकिमचंद्रांनी सरकारी सेवेचें त्यागपत्रच कां दिलें नाही, असा प्रश्न आधुनिक वाचकांच्या मनात उपस्थित होईल. त्याचें एक कारण म्हणजे त्यांना कन्यासंतति असून पुत्र नसल्याने त्यांच्या पिताजींनी त्यांना पितृधनाचा वाटा देण्याचें नाकारलें होतें. यांतच भरीसभर म्हणून पतीने कितीही मिळविलें तरी असंतुष्ट राहणारी पत्नी त्यांना लाभली होती. त्याचप्रमाणे १९०८ मध्ये सरकारचे सेवक नसलेल्या गोखल्यांनी अधिक वाईट मुद्रणनिर्बंधांना मान्यता दिली, तर त्यापूर्वी तीस वर्षें म्हणजे १८७८ मध्ये सरकारचे अत्यंत आज्ञाधारक सेवक असलेल्या बंकिमचंद्रांनी सरकारच्या इच्छेविरुद्ध वर्तन करण्याचें धाडस केलें नाही, यासाठी त्यांना विशेष दोष देता येत नाही. आनंदमठाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत बंकिमचंद्रांनी म्हटले आहे की, क्रांतीची प्रक्रिया ही काही अंशी आत्मपीडनाची प्रक्रिया असते आणि क्रांतिकारक पक्ष हा आत्मघातकी पक्ष असतो. हीच भावना अन्य शब्दांत उचित रीतीने व्यक्त करतां येते. आत्मक्लेशावाचून क्रांतीची उपासना होऊच शकत नाही आणि तिच्या स्थंडिलावर स्वत:चें बलिदान केल्यावाचून ती देवी प्रसन्न होत नाही. न्यायप्रीतीत आणि सत्यप्रीतीत आत्मपीडनाची प्रवृत्ति ही अंतर्निहित असते. त्यामुळे आत्मक्लेशांची पराकाष्ठा झाल्यावाचून सत्य आणि न्याय यांच्यासाठी आपण आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केल्याचें समाधान क्रांतिकारकांना लाभू शकत नाही.

प्रजापक्षाचें पवित्र शस्त्र

१८७७ मध्ये राणीला सम्राज्ञी बनवून भारतीयांना ब्रिटिश साम्राज्यांतील दुसऱ्या प्रतीच्या नागरिकांचें पद दिल्यानंतर साऱ्या हिंदुस्थानात एकटया पुण्यनगरातील बुद्धिमान् पण बुद्धिवादाला आपल्या अस्मितेचें दास्य करावयाला लावणाऱ्या नागरिकांनीच इंग्रजी राज्याविरुद्ध कारस्थाने करून प्रत्यक्ष बंडहि पुकारण्यापर्यंत पाळी आणली आणि भारतीय प्रजेला इंग्रजसरकारशी राजनिष्ठेने राहणें क्रमशः अशक्य करून सोडलें. प्रजेने एकदा शस्त्र उचललें म्हणजे राज्यकर्त्यांशी राजनिष्ठ राहून तडजोड करण्याची, समेट करण्याची भाषाच निरर्थक होते. उभय पक्षी सूड आणि प्रतिसूड यांचें दुष्टचक्र चालू होऊन त्यातूनच अंतिम क्रांतीच्या आगमनाचा मुहूर्त सन्निध येतो. अत्याचारी राज्यकर्त्यांच्या विरुद्ध प्रजेने उचललेलें शस्त्र नेहमीच पवित्र असतें, तसेंच तें प्रभावीही असतें. त्यामुळे या नीचातिनीचांशी आपण एकवार

टक्कर घेतली आहे, (We have faced these rascals once) असा क्रांतिकारकांना विश्वास वाटू लागतो. देशात परकी सरकाराव्यतिरिक्त एक प्रतिसरकार अस्तित्वात असून आपल्यावर होणाऱ्या अत्याचारांचा प्रतिसूड घेण्याला तें सिद्ध असल्याच्या जाणिवेने पारतंत्र्याच्या निबिड-तमातही प्रजेला आशेचे किरण दिसू लागतात. त्याच्या उलट राज्य-कर्त्यांनी आपल्या प्रजेविरुद्ध उचललेलें शस्त्र, न्यायनीतीच्या निर्बंधांना गुंडाळून ठेवूनच कोशातून बाहेर काढलें असल्याने तें नेहमीच अपवित्र असतें. त्याच्या योगाने राज्यकर्त्यांच्या चारित्र्याला कधीही न पुसला जाणारा कलंक जडतो. याचें आपल्याला अतिपरिचित उदाहरण म्हणजे डायर, ओडवायर आणि मंडळी यांनी पंजाबात केलेले भीषण अत्याचार होत. या अत्याचारांनी ब्रिटिश साम्राज्याविषयीच्या राजनिष्ठेचा पायाच समूळ उखडून टाकला, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. क्रांति-कारकांनी न्यायनिर्बंधांचा निर्णय आपल्या हाती घेऊन राज्यकर्त्यांना केलेल्या भीषण शासनात वैयक्तिक दृष्टया थोडा फार अन्यायाचा अंश असला तरी त्या अन्यायाचे परिणाम केवळ व्यक्तींना भोगावे लागतात. त्याच्या उलट त्याचे सुपरिणाम मात्र सर्व समाजाच्या वाट्याला येतात. यासाठीच टॅसिटस् हा रोमचा सर्वांत नामांकित इतिहासकार म्हणतो,

Every great example of punishment has in it some injustice, but though it affects the individual, it is balanced by the promotion of the public good.

वासुदेव बळवंतांच्या बंडाचे परिणाम

वासुदेव बळवंतांच्या बंडाचे परिणाम सांगताना फडक्यांच्या चरित्र-कारांनी (जोश्यांनी) सर व्हॅलेंटाइन चिरोल यांच्या 'भारतीय असंतोष' या ग्रंथातील पुढील अवतरणावर भर देऊन त्यांच्या बंडामुळे देशी भाषेतील वृत्तपत्रनियंत्रणाचा निर्बंध १८७९ मध्ये करावा लागल्याचा उल्लेख केला आहे.

It was in Poona that the native press first assumed the tone of virulent hostility towards British rule and British rulers which led to the Press Act of 1879.

या वाक्यात पुण्यातील वृत्तपत्रांची केलेली स्तुति पुणेकरांना कितीही प्रिय असली तरी वृत्तपत्रनियंत्रणाचा निर्बंध १८७८ मध्येच अस्तित्वात आला असल्याने त्याचें श्रेय वासुदेव बळवंतांच्या बंडाला देता येत नाही. या ठिकाणी चिरोलवर भरवसा ठेवल्यामुळे जोश्यांच्या सारख्या साक्षेपी चरित्रकारांकडून ही चूक घडली आहे. सर विल्यम वेडरबर्न यांनी विल्फ्रिड स्कावेन ब्लंट यांच्याशी संवाद करताना उद्‌गार काढले होते.

The state of things at the end of Lytton's reign was bordering on revolution. Armed bands were beginning to go about having the sympathy of the people. They were put down with great difficulty. In the Bombay presidency Sir Richard Temple contributed much to this state of things.

लिटन यांच्या राजवटीच्या अंती क्रांतिकाळासारखीच परिस्थिति उत्पन्न झाली होती. सशस्त्र (दरवडेखोरांच्या) टोळ्या देशात संचार करीत होत्या आणि त्यांना लोकांची सहानुभूति लाभत होती. त्या टोळ्या मोडून काढण्याला बरेच परिश्रम करावे लागले. अशी परिस्थिति उत्पन्न करण्याला सर रिचर्ड टेंपल यांनी आपल्याकडून चांगलाच हातभार लाविला होता. वेडरबर्न यांनी ही जी वासुदेव बळवंतांच्या बंडाच्या वेळची परिस्थिति वर्णिली आहे, तिला अनुलक्षूनच विष्णुशास्त्र्यांनी निबंधमालेत पुढील उद्‌गार काढले आहेत.

"दोन वर्षांपूर्वीच एका यःकश्चित् दरवडेखोराने साऱ्या दक्षिणेत केवढी धामधूम करून दिली, या एका गोष्टीवरूनच आमच्यात दिवसेंदिवस किती मर्दुमकी येत चालली आहे, हें कोणाच्याही सहज लक्षात येणारें आहे." या वाक्यातील यःकश्चित् या शब्दावरून फडक्यांच्या चरित्रकारांनी बरेच अकांडतांडव करून 'विष्णुशास्त्री यांनी केलेलें वरील वर्णन' देशभक्तीला पारख्या झालेल्या क्षुद्र मनाचेंच लक्षण समजलें पाहिजे' असा अभिप्राय व्यक्त केला आहे. विरोधाभासाचा अलंकार साधण्याकरिता शास्त्रीबोवांना हा शब्द वापरण्याची सवय होती. "ब्रह्मावर्ताचा यःकश्चित् शागीर्द काय आणि तो लंडन टाइम्सचे वार्ताहर रसेल यांच्या हातचें प्रशस्तिपत्र काय मिळवितो, त्या प्रमाणेच झांशी संस्थान तें काय आणि त्याची माजी मालकीण एक रांडावलेली बाई काय आणि तिने सर ह्यू रोज यांच्याबरोबर सामना काय दिला? तेव्हा हा सगळाच चमत्कार नव्हे काय? तो ध्यानात आणून ज्यास आमच्या वास्तविक स्वरूपाची प्रतीति घडणार नाही, त्या महापुरुषाचें डोकें काही विचित्रच असलें पाहिजे." तेव्हा तात्या टोपे आणि झांशीची राणी यांच्या संबंधी सकृद्दर्शनी अनुदार वाटणारे उद्‌गार जसे शास्त्रीबोवांनी काढले आहेत, त्याच कोटीतला वासुदेव बळवंतांच्या सबंधीचा उद्‌गार असून त्यावरून शास्त्रीबोवा या सर्व व्यक्तींना तुच्छ मानीत होते, असे अनुमान काढणें चुकीचें आहे.

परस्परविरोधी अनुमानें

वासुदेव बळवंतांच्या बंडानंतर असलीं बंडें पुन्हा उद्‌भवू नयेत,

म्हणून ह्यूम वेडरबर्नप्रभृति मंडळींनी भारतीय मवाळांना हाताशी धरून राष्ट्रीय सभेची म्हणजे कॉंग्रेसची स्थापना केली, असें फडक्यांच्या चरित्र-कारांनी सुचविलें असून तें अनुमान चिंत्य आहे. पण या बंडावरून अगदी उलट अनुमान पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाला आपलें नांव देणाऱ्या राज्यपालांनी काढलें होतें. विल्फ्रिड स्कावेन ब्लंट हे त्यांच्याशी झालेल्या संवादाचा सारांश सांगताना म्हणतात.

He would not hear of any danger of a revolution, because some years ago, a Maratha Brahmin had been discovered trying to excite rebellion and in his diary had been found complaints of the people being as dull as stone to his preaching.

वासुदेव बळवंत प्रत्यक्ष बंडाचा उपदेश करीत असताना सर-कारने त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें, तसेंच लोकांनीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें. त्याच्या उलट टिळकांनी पुण्यात नुसते खुट्ट केलें तरी गोऱ्या अधिकारी-वर्गाचा निद्राभंग होत असे, त्या वर्गाला हरिणकाळजी लागत असे. हा केवळ टिळकांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव असें मला वाटत नाही. हा मुख्यतः टिळकांच्या विरुद्ध गोऱ्या अधिकारीवर्गाचें मत कलुषित करण्याकरिता अहोरात्र झटणाऱ्या रानडे-गोखले-कीर्तने-नगरकरप्रभृति मवाळ पक्षाच्या नेत्यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव होय. या लोकांनी टिळकांच्या चाहड्या करण्याचें व्रत अखंडित चालविलें नसतें, तर टिळकांच्या कृतीकडे सर-कारने इतके संशयी दृष्टीने पाहिलें नसतें.

वासुदेव बळवत आणि रानडे

वासुदेव बळवंताच्या बंडाशी रानड्यांचा संबंध असल्याचा सरकारला संशय आल्यावरून त्यांची पुण्याहून बदली केली, इत्यादि कल्पना अनेकांनी केल्या आहेत. पण त्यांत फारसें तथ्य नाही. १८७९ मध्ये रानडे नाशिक येथे न्यायाधीशाचें काम करीत असताना उन्हाळ्याच्या सुट्टीत मेमध्ये पुण्याला आले होते. तेथून त्यांची अकस्मात् धुळें येथे बदली झाली. तेव्हा रानड्यांच्यावर कोणते आरोप होते, याची कल्पना त्यांनी मुंबईच्या मामा परमानंदांना लिहिलेल्या पत्रातील पुढील उताऱ्या-वरून येईल.

If he had come to explanation, of course, I was prepared to say that though I took no active part in the agitation, yet I was aware of what was going on excepting the events which occurred while I was absent from Poona, and that the memorials though not drafted by us were glanced over to see that they

read well and facts are put together well. However I need say no more on the subject now. As to corresponding with native princes and giving expression to Seditious words at the club, it is a calumny which Bombay ducks alone can invent-

(परमानंद पान ४९१) यावरून असें कळतें की, सार्वजनिक चळवळीतील काही आवेदनें रानड्यांनी लिहिलीं, तसेंच संस्थानिकांशी पत्रव्यवहार केला आणि हिराबागेतील मित्रमंडळीत काही राजद्रोही उद्गार काढले असे अपवाद रानड्यांवर आले असून शेवटचे दोन तर त्यांनी सपशेल नाकारले आहेत. काही आवेदनांवरून आपण दृष्टिक्षेप केल्याचें तेवढे ते मान्य करतात. या अपवादांचा संबंध वासुदेव बळवंत प्रकरणाशी येत नाही. परमानंदांच्या चरित्रकारांनी वरील पत्राचा दिनांक ५ मे १८७८ असा दिला आहे. पण तो १८७९ असावा. तसें गृहीत धरूनच वरील विवेचन लिहिलें आहे. यांतील मास आणि दिनांक सत्य असल्यास सरकारीं वाड्यांना लाविलेल्या आगींच्या पूर्वींचें हें पत्र दिसतें. त्यानंतर रानड्यांसंबंधी नव्या कंड्या पिकल्या असतील.

फडके यांच्या बंडाचें महत्त्व

फडके यांच्या बंडाचें महत्त्व आणि त्यांची योग्यता यांचें वर्णन करताना हिंदुस्थानाच्या इतिहासाचें आदिपासून अंतापर्यंत संपादन करणारे डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनी एक महत्त्वाचा मुद्दा सुचविला आहे. ते म्हणतात की मुसलमानांत धर्मयुद्धाचा प्रसार करणाऱ्या वहाबी पंथाच्या विशाल संघटनेने जें कार्य १८७० च्या दिवसांत केलें, तें कार्य एकट्या वासुदेव बळवंतांनी आपल्या साहसाच्या आणि त्यागाच्या बळावर, (तसेंच पुण्यातील मुष्टिमेय सहकाऱ्यांच्या भरंवशावर) घडवून आणलें. ही तुलना अनेकवार वहाबी मुसलमानांच्या कटांवर लिहूनही मला सुचली नव्हती.

The history of Phadke has been dealt with at some length because though it was a curious phenomenon ...one man standing out against the mighty British Empire ...it left its legacy and the seeds he sowed grew into a mighty banyan tree with its shoots spread all over India in about a quarter of a century's time. His patriotism and daring spirit were taken up by the Chapekar brothers and from them it was taken over the by the revolutionary wing of the Indian nationalists early in the twentyeth century. Even his method of secretly collecting arms, imparting military training to youths and securing necessary funds by means of

political decoities were followed by the latter. He may therefore be justly called the father of militant nationalism in India.

फडक्यांचा इतिहास हा भारताच्या इतिहासातील एक अद्‌भुत प्रसंग आहे. कारण या वेळी एका व्यक्तीने (आपल्या असीम आशावादाच्या बळावर) बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याला आव्हान दिलें होतें. पण तें आव्हान वाया गेलें नाही. कारण फडक्यांनी आपल्या रक्ताने पेरलेलें बीज पुढे पंचवीस वर्षांत वटवृक्षाप्रमाणे विस्तार पावून सारा हिंदुस्थान त्याने आच्छादून टाकला. वासुदेव बळवंतांच्या देशाभिमानाचा आणि साहसाचा वारसा प्रथम चाफेकर बंधूंच्या वाट्याला आला आणि त्यांच्याकडून राष्ट्रीय पक्षाच्या क्रांतिकारक शाखेकडे तो वारसा आला. गुप्तपणे शस्त्रें जमविणें, तरुणांना सैनिकी शिक्षण देणें, समाजाकडून द्रव्यसाहाय्य न मिळाल्यास दरवडे घालून आवश्यक तें द्रव्य संपादन करणें या सर्व गोष्टींत विसाव्या शतकातील क्रांतिकारकांनी फडक्यांचेंच अनुकरण केलें असल्याने त्यांना क्रांतिकारक पंथाचे पिताजीच मानलें पाहिजे.

स्वातंत्र्यवाद्यांच्या जीवनाची नीच्छेकृत मीमांसा

वासुदेव बळवंतांच्या सारख्या साहसी स्वातंत्र्यवाद्यांच्या जीवनाची मीमांसा करताना नीच्छेनीं 'Beyond good and Evil' (बुद्धियुक्तोजहातीह उभे सुकृतदुष्कृते) या ग्रंथात लिहिलें आहे.

It is the business of very few to be independent. It is the privilege of the strong; and whoever attempts it even with the best right, but without being obliged to do so, proves that he is probably not only strong but also daring without measure. He enters into a labyrinth, he multiplies a thousandfold the dangers which life itself already brings with it not the least of which is that no one can see how and where he looses his way, becomes isolated and is torn piecemeal by some Minotaur of conscience. Supposing such a one comes to grief, it is so far from the comprehension of men that they neither feel it nor sympathise with it. And he cannot any longer go back. He connot even go back again to the sympathy of men.

'स्वातंत्र्यप्राप्ति करून घेणें हें फारच थोड्या लोकांचें कर्तव्यकर्म असतें. केवळ समर्थांचाच हा अधिकार असतो. स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न करणें अपरिहार्य नसताना जे कोणी स्वेच्छेने या कर्तव्याचा भार स्वशिरावर घेतात, ते केवळ समर्थ नसून साहसीही असतात. स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न करणें म्हणजे स्वतःला चक्रव्यूहात अडकवून घेणें होय. आधीच संकटमय

असलेलें जीवन या चक्रव्यूहात सहस्रपटीने संकटसंकुल होतें. विशेषतः या चक्रव्यूहात आपला मार्ग कुठे आणि कसा चुकेल, याची कोणालाच कल्पना येत नाही. अशाप्रकारे एकाकी पडलेल्या स्वातंत्र्यवीराचा शत्रुपक्षातील नरपशु आणि स्वतःची सदसद्विवेकबुद्धि चीरफाड आरंभितात. अशा स्वातंत्र्यवीराचा शोचनीय अंत झाला तरी तो सामान्यजनांच्या आकलनशक्तीच्या टप्प्याच्या पलीकडे होत असल्याने त्याची त्यांना जाणीवही होत नाही आणि त्याविषयी त्यांना सहानुभूतिही वाटत नाही. सामान्य जनांच्या सहानुभूतीच्या जगात त्याचा पुनः प्रवेश होऊ शकत नाही.

ब्रिटिश सिंहाच्या आखाड्यात नरकेसरी

राजद्रोहाचे आणि सम्राटांविरुद्ध बंड करण्याचे पहिले अभियोग महाराष्ट्रातच झाले. या अभियोगांतील आरोपींनी न्यायालयात म्हणजे ब्रिटिश सिंहाच्या आखाड्यात आपला बचाव करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या उलट असहकारितेच्या आंदोलनातील आरोपींनी आपल्या अपराधांची मान्यता देऊन झालेली शिक्षा निमूटपणे भोगली. असा या उभयतांमधील विरोध दाखवून गांधीवादी लेखकांनी फडके, चाफेकर, टिळक इत्यादींचा अधिक्षेप आणि उपहास केला आहे. इथे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की फडके, चाफेकर, टिळकप्रभृतींवरील अभियोग देशात राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचा हिरण्यगर्भ जन्माला येण्यापूर्वीचे आहेत. अशा दिवसात या आरोपींशी संबंधित असलेले सर्व लोक आपोआप त्यांच्या अपराधांतील भागीदार ठरू नयेत, यासाठी असले बचाव करावे लागत. या निमित्ताने त्यांचा उपहास करणाऱ्यांना देवाने ऐतिहासिक दृष्टि दिली नसल्याने त्यांच्या हातून असल्या चुका घडणें स्वाभाविक आहे. या चुकांचें वास्तविक स्वरूप कळण्याकरिता प्राचीन रोममधील उत्सवांतून जे खेळ होत असत, त्यांतील एका खेळाचा इथे उल्लेख केला पाहिजे. रोममध्ये मृत्युदंडाची शिक्षा सांगितलेल्या अपराध्यांना उघड्या नागड्या अवस्थेत, हातात एक तरवार देऊन क्रूर सिंहांनी भरलेल्या आखाड्यात सोडून देत. तिथे आपल्या बचावाचा प्रयत्न करीत असताना ते मारले जाऊन आखाड्यातील सिंहाच्या उदरांत चिरविश्रांति घेत. अशा प्रकारे अंतिम विश्रांति घेणाऱ्या नरांनी सिंहांचीं उदरें भरलीं म्हणजे तेही कंटाळून झोपी जात. याप्रमाणे आकंठ नरमांसभक्षणाने संतृप्त झालेले सिंह निद्रामग्न झाल्यानंतर एका दुर्बल दंडिताला हाती तरवार न देता एक अंडें देऊन त्यांच्या आखाड्यात सोडीत. त्या साऱ्या सिंहांच्या पिछाडीला

असलेल्या वेदीवर त्याने तें अंडें सुरक्षितपणे नेऊन ठेविलें तर त्याला जीवदान मिळत असे. म्हणजे सिंहांनीं जीवदान दिलें तरी तें अंडें न फुटता वेदीवर पोचलें तरच त्याचा प्राण वाचत असे. अशा आणीबाणीच्या प्रसंगी आखाड्यात तो उतरल्यानंतर अर्धवट निद्रेत असलेल्या एखाद्या सिंहाला त्याची चाहूल लागून त्याने क्षणभर डोळे किलकिले करून त्याच्याकडे भीषण दृष्टीने पाहिलें, किंवा अन्य एका सिंहाने अकस्मात् आपली वदनदरी उघडून भयंकर जांभई दिली, अथवा तिसरा एखादा वनराज सहज या कुशीवरून त्या कुशीवर वळला तर त्या दुर्बल दंडिताची जी त्रेधातिरपीट होत असे आणि आपल्या सहप्रवाश्यांच्या सजीव समाधींच्या, म्हणजे त्या सिंहांच्या शेजारून अंग चोरून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याचे जे आविर्भाव होत असत, ते पाहून रोममधील प्रेक्षकांना हास्याच्या उकळ्या फुटत. स्वतःचा बचाव करणाऱ्या आद्य राजकीय हुतात्म्यांचा गांधीवादी जेव्हा उपहास करितात, तेव्हा मला रोममधील या क्रूर क्रीडेचें स्मरण होतें. भारत आणि रोम या दोन देशातून अभिनीत झालेल्या क्रीडेत मुख्य भेद हा आहे की फडके, चाफेकर टिळकप्रभृति आरोपी जेव्हा इंग्रजीसिंहांच्या आखाड्यात बलिदानासाठी आणून उभे केले, तेव्हा १८५७ मधील नरमांसाच्या प्रचुर आस्वादनानंतर आलेल्या निद्रेतून ते नुकतेच जागे झाले होते आणि नवनिर्मित साम्राज्याच्या अहंकाराची सुरा नुकतीच सेवन केल्यामुळे त्यांची क्षुधा प्रज्वलित झाली होती. उलटपक्षी या प्रसंगी इंग्रजी आखाड्यात सोडलेल्या आरोपींच्या हाती एखादें तुच्छ अंडें नसून भारतीय राष्ट्रवादाचा हिरण्यगर्भच त्यांच्या हाती होता. इंग्रजांनी निषिद्ध ठरविलेला हा हिरण्यगर्भ त्याच्या संरक्षणासाठी भावी पिढीच्या हाती कसा द्यावा, आपल्या हृदयातील देशप्रीतीच्या ज्वालामयी ज्योतीला न्यायालयात जमणाऱ्या समाजाच्या हृदयांतून अशाच अभिन्न ज्योती प्रज्वलित करण्याची संधि लाभावी, यासाठी ते आरोपी तडफडत होते. याकरिताच आपल्या प्राणावर उठलेल्या हिंस्र पशूंची प्रवंचना करण्याचा आणि त्यांना झुकांड्या देण्याचा ते आपापल्या परीने प्रयत्न करीत होते.

त्यांच्या या कृतींना गांधीवादी हसतात, हसोत. पणसत्याकरिता, ध्येयाकरिता बळी जाणें हें जितकें उदात्त कृत्य आहे, तितकेंच त्यांच्याकरिता जगण्याचा प्रयत्न करणें हेंही ध्येयवादी, उदात्त मनोवृत्तीचेंच लक्षण आहे. यासाठीच सूर्य पृथ्वीभोवती फिरतो असें लिहून देऊन प्राणरक्षण करणाऱ्या गॅलिलिओने त्यानंतर लगेच बोलून दाखविलें की नाही, पृथ्वीच फिरते. क्रांतिकारकांचें मरण अथवा त्यांना शिक्षा होणें

हा वस्तुत: शत्रूंचा विजय असल्याने तो विजय त्यांना लाभू न देण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा 'सुस्थे को वा न पंडित:' अशा अवस्थेतील पंडितांनी उपहास करणें उचित नाही.

क्रांतिकारकांचा छळ

टिळककाळी क्रांतिकारकांचा जो छळ होत असे, त्याची कल्पना भुक्तभोग्यांव्यतिरिक्त इतरांना येणार नाही. मारपीट आणि नेहमीचा इतर छळ सर्वांना विदित आहेच. पण काही बीभत्स आणि अमानुष कृत्यांची सामान्य वाचकांना काहीच कल्पना नसते. भारतीय लोकसभेचे एक सभासद आणि अनुशीलनसमितीचे एक प्रसिद्ध पुढारी जोगेशचंद्र चट्टोपाध्याय यांनी आपल्या आत्मचरित्रात स्वत:च्या बीभत्स छळाचें संक्षिप्त वर्णन केलें आहे.

Owing to torture, starvation and sleeplessness I was extremely weak. They caught hold of me and forced my mouth inside the commode. When I was on the point of being suffocated, they released me. Then they poured urine mixed with excreta all over my body and locked me in the cell. For three days they did not allow me to have a wash. After three days I had the first chance of a wash in the presidency jail. They stripped me naked while my hands and feet were chained. Then one man masturbated with me for hours. This they did to make me a nervous wreck. Such and many other inhuman tortures were perpetrated on me and other revolutionaries who were arrested in that period.

थोडक्यात सांगावयाचें म्हणजे राजबंद्याच्या अंगावर नरक ओतून त्याला तीनतीन दिवस त्या अवस्थेत ठेवणें, किंवा त्याचें लिंग धरून त्याचें अनेक तास मर्दन करणें हेंही अत्याचार जोगेशबाबूंच्या देहावर छळकांनी केले. पुढे त्यांना बंदिशाळेत स्थानबद्ध करून ठेवल्यानंतर त्यांनी आपल्या छळाची कहाणी एका आवेदनाने राजप्रतिनिधींच्या कानांवर घालण्याचा प्रयत्न केला असता त्याची एक प्रत मॉडर्न रिव्ह्यूच्या रामानंद चतर्जींच्या हाती पडून त्या कहाणीचा काही भाग त्यांनी १९१८ मध्ये ऑगस्टच्या अंकात प्रसिद्ध केला. त्यानंतर कोमिल्लाचे पुढारी अखिलचंद्र दत्त यांनी हुगळी येथे भरलेल्या बंगाल प्रांतिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना या अत्याचारांचा पुनरुच्चार केला, तेव्हा साऱ्या आंग्लहिंदु पत्रकारांनी त्यांच्यावर काहूर करून त्यांनी आपले शब्द परत घेण्याची मागणी केली. तेव्हा टिळकांनी त्यांना पत्र लिहून शब्द

परत न घेण्याची सूचना दिली. त्याप्रमाणे त्यांनी आपले शब्द परत घेतले नाहीत आणि आपला गोखले होऊ दिला नाही.

तीन महान् संस्थांचा परिचय

वासुदेव बळवंतांनी परतंत्र भारतीय जनतेला स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गावरील तीन महान् संस्थांचा परिचय करून दिला. या तीन महान् संस्था अर्थात बंदीजीवन, निर्वासित जीवन आणि भूमिगत जीवन या होत. या तीन संस्था आपल्याला सीतादेवीच्या चरित्रात प्रथम भेटतात. कारण सीता ही रावणाच्या बंदिवासात होती, रामाने तिला निर्वासित केली आणि त्या निर्वासित जीवनाला कंटाळून शेवटी ती भूमिगत झाली. वासुदेव बळवंतांना लढाईत आपल्या शत्रूंचा पराभव करता आला नाही म्हणून प्रथम ते भूमिगत झाले. नंतर शत्रूच्या हाती लागल्यावर प्रथम त्यांना यमयातनांचा अनुभव घ्यावा लागला. मग विधिपूर्वक शिक्षा सांगून झाल्यावर बंदीजीवन आणि निर्वासित जीवन त्यांना भोगावें लागलें. टिळकांनाही बंदीजीवन आणि निर्वासित जीवन यांचा एकत्रच अनुभव घ्यावा लागला. पण त्यांना भूमिगत जीवनाचा अनुभव मिळाला नाही. मातृभूमीवर प्राणापलीकडे प्रेम करणाऱ्या सावरकरांनी निर्वासित पण स्वतंत्र जीवनातील मनस्तापापेक्षा अंदमानातील बारीबाबाचा पाहुणचारही सुसह्य मानला. पण त्यांना भूमिगत जीवनाचा अनुभव मिळाला नाही. या तीनही महान् संस्थांशी सुपरिचित असलेले महाराष्ट्रातील प्रसिद्ध देशभक्त सेनापति बापटच होत. परप्रांतांतील देशभक्तांत या तीन संस्थांतून उच्च सन्मानासह उत्तीर्ण होऊन इंग्रजांशी संमुख समरांत तोंड देणारे नेताजी सुभाषचंद्र हे कालानुक्रमाने शेवटचे आणि त्यांच्या भाग्याच्या क्रमाने पहिलेच होत. वासुदेव बळवंतांना इंग्रजांनी पश्चिमेकडील एडनमध्ये कोंडलें. त्यामुळे भारताचा भाग्यरवि त्या दिशेने उगवू शकला नाही. पण लाल, बाल आणि सुभाष यांना पूर्वेकडील मांडलेत (मंडालेत) कोंडल्यामुळे त्याच दिशेने आमचा स्वातंत्र्यसूर्य उदयाला आला. इथे एक वैयक्तिक आठवण सांगावीशी वाटते. सुभाषसैन्याची स्वारी चालू झाल्यानंतर 'अग्रणीत' एके दिवशीं दुपारी काही काम नव्हतें म्हणून मी सुभाषच्या स्वागतासाठी कविता लिहीत बसलो होतो. त्या वेळीं नथुरामने जवळ येऊन विचारलें, 'काय लिहिता?' 'सुभाषच्या स्वागताची कविता लिहीत आहे. ज्या दिवशी 'अग्रणी' बंद करावासें वाटेल, त्या दिवशी ही कविता छापून आपण पत्र बंद करू.' तेव्हा लिहिलेली कविता १९६६ च्या संक्रांतीच्या दिवसांत अक-

स्मात् सापडली. टिळकांच्या बंदिशाळेशी तिचा संबंध असल्याने ती अद्यापि अप्रसिद्ध असलेली कविता येथे उद्धृत करीत आहे.

मांडलेंत मुक्तिमार्ग लालवाल शोधती.
देशबंधुभक्तसाध्य तो सुमार्ग संप्रती.
लालवाल तें सुभाष मांडलेंत कोंडले.
हें पहा तिथे तदीय बंदिपाल बांधले.
देवकीसुतोक्तिचें रहस्यहि स्फुरे, तिथें
स्वतंत्रहिंदनिर्मिती स्वतंत्र सैन्य मांडितें.
मातृभूमिमोचनार्थ बंगवीर संगरीं
झुंजती, रहस्यभक्त भ्रांतचित्त कां परी?
शत्रुसंमुखी अदृश्य जाहला तदा पहा,
जिंकुनी सुभाष येत स्वागतासि सिद्ध व्हा.
भोगुनी विवासनास मातृमोचनास्तव
श्रीसुभाष ये गृहास गर्जुनी करा स्तव.

या प्रकरणाची हीच पूर्तता उचित होईल असें मला वाटतें.

* * *

प्रकरण सहावें

नानासाहेब पेशव्यांचें अज्ञातवासातील क्रांतिकार्य

सत्तावन्नच्या स्वातंत्र्ययुद्धाचे नेते नानासाहेब पेशवे यांचा अवतार १८५९ मध्येच भौतिक आणि आत्मिक दृष्टींनी संपला, अशी सामान्य इतिहासकारांची समजूत असली तरी ती यथार्थ नाही. राजकारणाकरिता त्यांना नेपाळात कैलासवासी व्हावें लागलें तरी या काल्पनिक अथवा कृत्रिम परलोकगमनानंतरही त्यांचा भारतात अविरत संचार चालू असे. निरनिराळ्या ठिकाणांहून येणाऱ्या त्यांच्या कारस्थानाच्या कटु वार्तांनी, अथवा नानांना अटक केल्याच्या कुतूहलजनक वार्तांनीही इंग्रज राज्यकर्त्यांचा वेळोवेळी निद्राभंग होत असे. ड्यूक ऑफ अर्गाईल यांनी तर एका पत्रात असें लिहिलें होतें की नानांचें नांव ऐकण्याचा पराकाष्ठेचा वीट आल्यामुळे समग्र भारत नानाला समर्पण करून आपण तेथून परत यावें, असें मला वाटू लागलें आहे. स्वातंत्र्ययुद्धाच्या दिवसांत ज्या नानांना लक्ष लक्ष इंग्रजांच्या अभिशापांनी आणि सहस्रावधि काळ्या गोऱ्या सैनिकांच्या तोफा बंदुकांतून सुटलेल्या अग्निगोलांनी आणि गुटिकांनी मरण आलें नाही, तें पेशवाईचें शेंडेफळ तराईच्या रानांतील डासांच्या दंशाने पंचत्वाप्रत गेलें, ही कल्पनाच हास्यास्पद आहे. भट पेशव्यांची पुण्याई संपत आली असताना त्या कुळाच्या शेष पुण्याईचें शेंडेफळ या नात्यानेच नानांचा पृथ्वीवर अवतार झाला होता आणि ज्यांना सदसद्विवेकबुद्धीच्या जाग्रतीमुळे कधी पश्चात्ताप होण्याचा संभव नव्हता, त्यांना एकवार तरी त्यांच्या पापांचे कानपुरात प्रायश्चित करावयाला लावणाऱ्या, मूर्तिमंत प्रतिशोधाचा अवतार असलेल्या नानांच्या धूमकेतुसदृश दर्शनानेंच भारतीय जनतेवर केलेल्या अत्याचारांचा तात्पुरता तरी पश्चात्ताप होत होता आणि त्या अनाथ बनलेल्या प्रजेवर अधिकाधिक अत्याचार करण्याचे त्यांचे संकल्प अकस्मात् लुळे पडत होते. या दृष्टीने नानासाहेबांच्या अज्ञातवासातील जीवनाचा मला व्यक्तिशः परिचित असलेल्या प्रतुल गुप्तांसारख्या इतिहासकारांनी विचारच केलेला नाही. गीतेत सांगितल्याप्रमाणे कर्मफलावर मानवांचा अधिकार नसल्याने नानासाहेबांना त्यांच्या प्रयत्नांचें वांछित फल जें स्वराज्य तें प्राप्त होऊ शकलें नाही, तरीसुद्धा त्यांच्या कारस्थानाचा तत्कालीन

घटनांवर प्रभावी परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. फल हें वांछित असलें तर परिणाम हे पुष्कळदा अवांछित, आणि अनाकलनीय असतात. असें असूनही इतिहासांत फलापेक्षा परिणाम हें अधिक महत्त्वाचे असतात, कारण त्यांनीच भविष्यकाळाच्या इतिहासाला अनपेक्षित वळण लागतें.

नानासाहेबांच्या संचाराचे सरकारी पुरावे

१८५९ मध्ये नानासाहेब नेपाळात हिवतापाने कैलासवासी झाले, असें राणाजंगबहाद्दुर यांनी इंग्रज सरकारला निक्षून कळविलें असलें तरी त्या वार्तेवर इंग्रजांचा विश्वास नव्हताच, मुंबई सरकारने–स्वातंत्र्याच्या इतिहासाचीं साधनें या ग्रंथात (खं. १) वेंकटेश्वरशास्त्री नांवाच्या नानासाहेबांच्या हस्तकाचें पत्र असून त्यात त्याने १८६१ (?) मध्ये धन्यांची भेट घेतल्याचा उल्लेख आहे–त्या पत्राचा अधिक उपयोग अन्यत्र केलाच आहे. जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी या नियतकालिकाच्या १९६४ च्या एका अंकात १८७० मधील नानासाहेबांच्या हालचालींची माहिती सांगणारी वरिष्ठ अधिकाऱ्यांचीं पत्रंच छापलीं आहेत. या पत्रांवरून कळतें की नानांच्या नांवाने प्रतिवर्षी खाटमांडूकडे मोठमोठीं पार्सलें जात असून नरसिंह नांवाच्या नेपाळी सेनापतींनीही आपल्या माहितीप्रमाणे नानासाहेब जिवंत आहेत, असें बोलून दाखविलें. चंपारण्य जिल्ह्याचे रक्षक-प्रमुख मि. डेव्हिस् यांनी २७–९–१८७० या दिवसाच्या पत्रात सरकारला कळविलें की नाना आता नेपाळहून ग्वाल्हेरीला (बहुधा त्यांची बहीण बयाबाई आपटे यांच्याकडे) जात असून ते कार्तिकात परत येणार आहेत. त्यानंतर त्यांच्या कुटुंबात कोणाचें तरी लग्न व्हावयाचें होतें. तेव्हा कदाचित् त्या लग्नाचें शिष्टाचाराप्रमाणे आमंत्रण देण्यासाठीही ते तिकडे गेले असतील. त्यांना अटक करावी कीं नाहीं, या संबंधी सरकारचें नक्की मत काय तें कळत नाही, असें जिल्हाधिकारी मि. मेटकॉफ यांनी आपल्या पत्रात लिहिलें आहे.

The only doubt in my mind is as to whether Government of India would wish the men to be apprehended. Supposing even a clue to Nana's whereabouts were obtained after all Jung's protestations of his death ... our relations with Nepal would be disturbed.

म्हणजे नानासाहेब दिवंगत झाले आहेत, असें जंगबहाद्दुर सांगत असतानाही आपण त्यांना अटक केली, तर नेपाळसरकारचें आणि आपलें वितुष्ट येईल. इंग्रजांच्या सैन्यांत गुरखे सैनिकांची संख्या मोठी असल्याने

नेपाळसरकारला न दुखविण्याची त्यांना काळजी घ्यावी लागत असे. नानासाहेब जिवंत आहेत, असें बोलून दाखविणाऱ्या ज्या सेनापतींचा वरील पत्रांतून उल्लेख आला आहे, ते सेनापति नरसिंहच नेपाळातील कारस्थानात खाडिलकरांना साहाय्य करीत होते. टिळकांना नेपाळशी संबंध जोडण्याची कल्पना सुचवून ती सफळ करण्याकरिता सर्व साहाय्य करणाऱ्या कलकत्त्याच्या माताजी झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या नातेवाइकांपैकीच होत्या. अशा प्रकारे नानासाहेबांच्या सान्निध्यातील व्यक्तींशी टिळकखाडिलकरांचा प्रत्यक्ष अथवा पर्यायाने संबंध आला होता. असो.

नानासाहेबांच्या तोतयाला ग्वाल्हेरीत अटक

वर उल्लेखिलेल्या मेटकाफ यांच्या पत्राला त्यांच्या वरिष्ठांनी कोणतें उत्तर दिलें, तें आपणाला अविदित असलें तरी २३–१०–१८७४ च्या पायोनियर पत्राच्या अंकावरून समजतें की त्या पूर्वीच्या आठवड्यात स्वत: शिंदे सरकारानी आपल्या राजधानीत नानासाहेब पेशवे यांना अटक केली असून सत्तावन्नमधील सर्व घटनांचें दायित्व आपल्या शिरावर असल्याचें त्यांनी मान्य केलें आहे. २१ ऑक्टोबरला नानासाहेबांच्या एका अनुचराने शिंदे सरकारांना धन्यांचें पत्र आणून दिलें. त्या पत्रात त्यांनी कळविलें होतें की, अज्ञातवासातील जीवन कंठण्याचा मला कंटाळा आल्याने मी आपल्याकडे आश्रयाची याचना करीत आहे, तरी आपल्या घराण्याशी माझ्या घराण्याचे जे पराकाष्ठेच्या विश्वासाचे संबंध होते, त्या संबंधांना स्मरून आता आपण माझें रक्षण करावें. हें पत्र हाती पडताच शिंद्यांनी पत्र आणण्याऱ्या व्यक्तीसह नानासाहेबांच्याकडे जाऊन त्यांची भेट घेतली. त्या वेळी त्यांनी सत्तावन्नच्या उठावणीपूर्वी नानासाहेबांशी त्यांचें जें संभाषण झालें होतें, त्या संभाषणाची आणि त्या प्रसंगी दिलेल्या भेटीची त्यांना आठवण असल्याची आपल्या मनाची निश्चिति करून घेऊन त्या नानासाहेबांना अगत्यपूर्वक आणि आदरपूर्वक आपल्या वाड्यात नेलें. मग ग्वाल्हेरीतील नानांच्या आप्तांनी त्यांना ओळखल्यानंतर मध्यरात्री इंग्रज राजदूताला बोलावून त्या नानासाहेबांना त्यांच्या स्वाधीन केलें. या विश्वासघातकी इंग्रजनिष्ठेच्या प्रदर्शनामुळे राजधानीतील सर्व प्रमुख लोक प्रक्षुब्ध झालेले पाहून दसऱ्याच्या समारंभात भाषण करून शिंदेसरकारांनी आपल्या कृतीचें समर्थन केलें. पण शिंदे सरकारांच्या दुर्दैवाने त्यांनी केलेली शिकार फसून इंग्रजांनी कसून केलेल्या चौकशीत तो व्यक्ति भलतीच निघाली ! याचा एक अर्थ असा होऊ

शकतो की ग्वाल्हेरीकडे जाताना नानासाहेब अटकेत जाण्यासाठी एक तोतयाही आपल्यासह घेऊन जात असत आणि या तोतयाच्या खरेखोटेपणाचा निर्णय होईपर्यंत ते स्वत: सुरक्षित स्थळी जाऊन पोचत. (पेशव्यांना अटक झाल्याने विष्णुशास्त्र्यांनीं कोजागिरीचा समारंभ रहित केल्याचा प्रसंग या वेळेचाच असावा.) ४–१–१८७५ च्या लंडन टाइम्सने या प्रकरणाविषयी लिहिताना असेंच अनुमान केलेलें मागाहून आढळून आलें.

The genuine Nana was at Gwalior at the time of the arrest and he pnt forward this man, one of his followers, as a kind of feeler to test Scindia.

या तोतयाला अटक झाली, तेव्हा खरे नानासाहेब ग्वाल्हेर येथेच असावेत. पण शिंद्यांची कसोटी पाहण्याकरिता त्यांनी या तोतयाला पुढे केला असावा. त्याचप्रमाणे खरे नानासाहेब अनेकदा ग्वाल्हेर येथे येऊन आपल्या आप्तांना भेटून जात असल्याचा बोभाटा झाल्यामुळे नानांचे मेहुणे बाबासाहेब आपटे, यांच्या वडील बंधूंचे चिरंजीव (बाबाभटांचे चिरंजीव) अण्णाभट, तसेच नानांचे भाचे या सर्व आप्तांनी एकवार खोट्या नानालाच 'ओळखून' आपली राजनिष्ठा व्यक्त केली. नानांचे पुतणे रावसाहेब हे अज्ञातवासांत असताना काही दिवस बाबासाहेब आपट्यांच्याकडे राहिल्याचा उल्लेख वेंकटेश्वरशास्त्री यांच्या पत्रात आहे.

नानासाहेबांच्या ग्वाल्हेरगमनाचे परिणाम

यावेळी ग्वाल्हेरीला येण्यात आणि शिंद्यांना पत्र लिहिण्यात नानांचा उद्देश काय होता, याची कल्पना करावयाला काहीच साधन नाही. तो उद्देश सफळ झाला नसला तरी त्यांच्या आगमनाने तत्कालीन राजकारणावर महत्त्वाचा परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. शिंदेसरकारांच्या राजनिष्ठेच्या तापाचा पारा या प्रसंगाने नि:संशय खाली उतरला. कारण त्यांनी विश्वासघात करून पूर्वीच्या धन्याच्या पुत्राला शत्रूच्या स्वाधीन केल्याचें पारितोषिक काय, तर लंडन 'टाइम्स' मधील पुढील आरोप.

Scindia did actually arrest the real man, but finding Colonel Willoughby Osborne declined to pledge the British Government to spare the prisoner's life, substituted an imposter before any European had seen him.

म्हणजे शिंद्यांनी खऱ्या नानांनाच अटक केली होती, पण मग

इंग्रज राजदूत आपल्या सरकाराच्या वतीने त्यांचे प्राण वाचविण्याचे वचन देत नाही, असें पाहिल्यावर त्यांनी खऱ्या नानांना सोडून त्यांच्या तोतयालाच इंग्रजांच्या स्वाधीन केला. हा आरोप खरा नसावा, असें लंडन टाइम्सने मानभावीपणाने म्हटलें असलें तरी काही प्रमुख लोकांनी त्यावर विश्वास ठेविला असेलच. तेव्हा 'हें फल काय मम तपाला,' अशा मनोवृत्तीत शिंदेसरकार असतानाच १८७५ च्या प्रारंभी मल्हारराव गायकवाडांचा न्याय करण्याच्या समितीवर त्यांची नेमणूक झाली. या प्रसंगी त्यांनी आणि त्यांचे राजनिष्ठेच्या पंथांतील मार्गदर्शक गुरु दिनकरराव राजवाडे यांनीही इंग्रजनिष्ठेचें अतिरिक्त प्रदर्शन न करता मल्हाररावांना निर्दोषी ठरविलें आणि ब्रिटिश सरकारला 'भरंवशाच्या म्हशीला टोणगा' या म्हणीचा अनुभव घ्यावयाला लाविलें. हा वस्तुतः नानांचाच एक महत्त्वाचा राजकीय विजय मानता येईल.

नानांच्या पुढे राजप्रतिनिधींची शरणागति

१८७४ मध्ये ग्वाल्हेर येथील इंग्रज राजदूतांनी नानांना अभय देण्याचें नाकारलें असलें तरी १८९४ मध्ये राजप्रतिनिधि लॉर्ड एल्गिन यांनी मुंबईचे राज्यपाल लॉर्ड हॅरिस यांना नानासाहेबांना अटक करण्याला बंदी करून नैतिक दृष्ट्या स्वातंत्र्ययुद्धाच्या नेत्यांपुढे सपशेल लोटांगण घातलें. १८९४ च्या मध्याला मुंबई सरकारने नानासाहेबांना अथवा त्यांच्या तोतयाला अटक केल्याची वार्ता लॉर्ड एल्गिन यांच्या कानी येताच त्यांनी लॉर्ड हॅरिस यांना पुढील पत्र लिहिलें.

There must be immense difficulties in identifying a man after an interval of 37 years and supposing that a strong prima facie case of identification is made out, what is to follow ? On what charge can we try him ? What would certainly be damanded and naturally so by a strong body of opinion from those who suffered directly or indirectly from his atrocities and the still numerous persons who sympathised with the sufferers that he should be tried for murder. I am told that it is practically certain that no sufficient evidence could now be adduced for any court to convict him of murder. He could be tried for treason but if convicted on this, do you suppose public would permit the execution of a man after 37 years ? If he was executed, the natives would say, and I think, with some justice, that he was put to death for a crime we could not prove. If we could not execute him, we should view the indignation of those whose feelings would not be bound by the intricacies of legal evidence.

We shall be accused of weakness if not worse, and we should suffer in the estimation of Anglo-Indians and the natives alike. There is the further consideration what we could do with the man if convicted and not executed. I presume, we should send him to the Andamans; but wherever he is, he would be a centre to whom the disaffected could look and his existence would be the origin of intrigues.

या पत्रात राणीचे प्रतिनिधि म्हणतात की, सदतीस वर्षांनंतर हाच खरा नाना म्हणून विश्वसनीय पुरावा करणें अतिशय अवघड आहे. समजा, असा पुरावा मिळाला तरी पुढे काय ? कोणच्या आरोपावरून त्यांच्यावर खटला भरावयाचा ? इंग्रजांच्या हत्येचा आरोप त्याच्यावर ठेवून त्यासाठी त्याला फाशी द्यावें असें आंग्लभारती (अँग्लोइंडियन) लोकांचें म्हणणें असलें तरी हत्येचा आरोप सिद्ध करण्याइतका पुरावा आता मिळणें अशक्य आहे, असें विधिविशारदांचें मत आहे. त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून तो सिद्ध झाला तरी त्यासाठी त्याला सदतीस वर्षांनंतर लोकमताचा विरोध न जुमानता फाशी देणें शक्य नाही. अंदमानात ठेविलें तरी साऱ्या कारस्थानांचें केंद्रच तो बनेल. या सर्व कारणांकरिता नानांना आता अटक करणेंच चूक आहे. १४-८-१८९४ चें हें पत्र पहिलें म्हणजे त्यावर्षीचा गणेशोत्सव गणपतीचें अपरनाम आणि स्वतः नानांचें खरें नांव जें धुंडिराज, त्या धुंडिराजाच्या विजयाचा उत्सव म्हणूनच करावयाला पाहिजे होता, असें वाटल्यावाचून रहात नाही. पुण्यात गणपतिउत्सव चालू करण्याची प्रेरणा नानांचे मेहुणे आपटे यांच्याकडूनच पुण्याच्या पुढाऱ्यांना मिळाली होती. १८९२ मध्ये सरदार कृष्णाजीपंत खासगीवाले ग्वाल्हेरीला गेले होते आणि तेथील गणपतिउत्सव पाहून ते पुण्याला परत आले, तेव्हाच १८९३ पासून येथेही उत्सव चालू करण्याचा त्यांचा संकल्प सुटला होता. त्याच वर्षी मुंबईत झालेल्या मुसलमानांच्या दंग्याने त्या उत्सवाचा उत्साहाने उपक्रम करण्याला उत्कृष्ट निमित्त सापडलें.

मॉंटेग्यूंच्या दैनंदिनीतील उल्लेख

१९१३ मध्ये सेनापति बापटांना पकडून देण्यानिमित्त ज्या हेराला क्लीव्हलंड महाशयांनी एक सहस्र रुपये दिले, त्याने हेरविभागाच्या त्या प्रमुखांना असें सुचविलें होतें कीं, नानासाहेबांना पकडून देण्यासाठी घोषित केलेल्या पारितोषिकाचे लाख रुपये देत असाल तर मी नानांना

सुद्धा धरून देतो. ही माहिती पुढे १९१८ च्या जानेवारीत या हेरप्रमुखांनी मांटेग्यूंना सांगितली. त्यासंबंधी ते आपल्या दैनंदिनीत लिहितात :

Cleveland came to the conclusion that to find Nanasahib in 1913 might be embarrassing and was not worth a lakh and the informer is now dead; but I am bound to confess that this story that Nanasahib was alive ...I presume he must be over 90, four or five years ago, is very thrilling to me. I wonder if we shall hear his whole story of the last 50 years. If I had a lakh of rupees, I should pay it gladly to have a talk with him about the Mutiny and I should have liked to see him hanged. (page 234)

क्लीव्हलंड याला असें वाटलें की १९१३ त नानांना पकडणें त्रासदायक होईल आणि लाख रुपयाला तें महाग पडेल. तो हेरही आता जिवंत नाही. पण चार पांच वर्षांपूर्वी नाना जिवंत असल्याची कथा ऐकून माझ्या अंगावर रोमांच उठले. त्या वेळी ते ९० वर्षांचे तरी असतील. मजजवळ लाख रुपये असते तर नानांची भेट घेऊन बंडाच्या इतिहासाची चर्चा करण्यासाठी ते मी आनंदाने खर्चले असते आणि मग आनंदाने नानांना फाशी दिलें असतें.

पण नानांच्या शरीराला फाशीच्या मांगांचा अपवित्र स्पर्श व्हावयाचा नव्हता. १९२६ च्या महापुरात त्यांना जलसमाधि मिळाली, असें उत्तरप्रदेशातील त्यांच्या चरित्रलेखकांनी लिहिलें आहे. १८५७ च्या घटनांचा खरा इतिहास भारतीय जनतेला कळू नये, यासाठीच नानासाहेबांच्या विरुद्ध अभियोग चालवावयाला इंग्रज सरकार सिद्ध नव्हतें. तसा अभियोग चालविल्यास स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासाचें कार्यच या अभियोगाने परिणामकारकपणे केलें असतें.

नानासाहेबांचा रशियाशी संबंध

नानासाहेब पेशव्यांनी रशियाच्या सरकारशी काही संबंध जोडला होता कीं काय आणि जोडला असल्यास त्याचें स्वरूप काय होतें, हा क्रांतीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा गूढ प्रश्न आहे. स्वातंत्र्ययुद्धाची उठावणी करण्यापूर्वी काश्मीरचे महाराज गुलाबसिंग यांच्या द्वारा नानासाहेबांनी रशियाशी पत्रव्यवहार केल्याचा इतिहासातून उल्लेख आढळतो. १८७८ मध्ये नाना रशियाला गेले असून झारच्या सैन्यासह ते हिंदुस्थानात येणार, अशी कंडी पिकल्यामुळे मुंबईच्या व्यापारी वर्गात मोठी खळबळ उडून गेली होती. सरकारी गुप्त हेरांच्या पत्रावरून असें सम-

जतें की, १३-८-१८७९ या दिवशी 'नानाराव मराठ्यां'चा वंशज म्हणविणारी एक व्यक्ति एका रूसी प्रिन्सबरोबर समर्कंद येथे आली. पुढे ते उभयता ऑक्सस अथवा वंक्षू नदीतीरावरील प्रदेशाकडे सप्टेंबर-मध्ये गेले. समर्कंद येथे पंजाबी कुका बंडवाल्यांचा प्रमुख प्रतिनिधि गुरुचरणसिंग हा त्याला भेटला आणि नानांच्या कुलातील त्या व्यक्तीने रूसी अधिकाऱ्यांना कुका पंथाची सारी माहिती सांगितली. या व्यक्तीला रूसी भाषा चांगली येत होती. त्याची राहणीही रूसी पद्धतीचीच होती. बंडानंतर आपण रशियात आश्रयाला आलो, असें त्याने सांगितलें. कुका बंडवाल्यांच्या इतिहासात १२६ पानावर अहलुवालिया यांनी वरील माहिती दिली आहे. या माहितीवरून नानांच्या नात्यातील व्यक्तींना रशियात आश्रय मिळाला असून तेथे त्यांना सन्मानाने वागविलें जात असल्याचें समजून येतें. अशा परिस्थितीतच नानासाहेबांनीही काही दिवस रशियात काढले असावेत; पण रशियाकडून सैनिकी साहाय्य मिळण्याची निराशा झाल्यानंतर ते परत आले. काश्मीरचे प्रतापसिंग आणि इंदूरचे शिवाजीमहाराज यांचीं रशियाशी कारस्थानें चालू असल्याच्या संशयामुळेच त्या उभयतांना इंग्रजांनी पदच्युत केलें. रशिया-विरोधी गटांत संस्थानिकांना उघडपणे समाविष्ट करून घेण्यासाठीच इंग्रजांनी इंपीरियल सर्व्हिस ट्रुप्सची योजना अस्तित्वात आणली. १९०५ च्या कारस्थानातून टिळकांना रशियाच्या मुंबईतील व्यापारी प्रतिनिधींनी जें सहानुभूतिपूर्वक साहाय्य केलें, त्यावरून तत्पूर्वीही भारतीय क्रांतिकारकांना रशियाने थोडें फार साहाय्य केलें असावें, असें अनुमान निघतें.

नानासाहेबांच्या चपात्या

१८९४ मध्ये मुंबई इलाख्यात चपात्या वाटल्या गेल्याचा उल्लेख डॉ. गोपाळ यांच्या ग्रंथात आढळल्यामुळे तत्कालीन राजकारणात नानांचें अंग असल्याची मला शंका आली आणि त्या शंकेच्या अनुरोधाने शोध करताना नानांच्या हालचालींचे जे धागेदोरे हाती लागले, ते वाचकांच्या हाती दिलेच आहेत. तेव्हा या चपात्यांच्या मागील भावनेचा या ठिकाणी थोडा उलगडा करणें आवश्यक आहे. नानांच्या कारस्थानांची काही माहिती सीतारामबोवांनी इंग्रजांना सांगितली, असें स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासकारांनी लिहिलें आहे. त्यात चपात्यांचें कोडें उलगडताना सीतारामबोवांनी सांगितलें की नानांचे गुरु दासबुवा यांनी काही जादूच्या चपात्या केल्या होत्या आणि त्यांचा संचार ज्या ज्या प्रदेशांत होईल त्या

त्या प्रदेशात नानांचें राज्य होईल, असा त्यांनी आशीर्वाद दिला होता. ही कथा डॉ. रमेशचंद्र मुजमदारांनी असिद्ध ठरविली असली तरी मला ती विश्वसनीय वाटते. कारण सामान्यतः राज्यक्रांतीच्या प्रयत्नांतून असल्या घटनांचा उल्लेख सहसा कोठे येत नाही आणि डॉ. रमेशचंद्रानीच या चपात्यांच्या प्रसाराची कथा सांगताना त्यांचा संचार कानपुरापासून चालू झाला, असें स्वतःच लिहिलें आहे. तेव्हा केलेला प्रयोग नानासाहेबांनी पुन्हा एकवार १८९४ मध्ये करून पाहिला आणि त्याच वेळी हिंदी सैनिकांना उठावणी करण्याला उत्तेजन दिल्याच्या घटनाही उघडकीस आल्या. सत्तावन्नमधील घटनांची ही संक्षिप्त आवृत्ति नानासाहेबांचें वय आणि त्यांचें तत्कालीन द्रव्यबळ नि मनुष्यबळ यांना अनुरूपच आहे. १८९४–९५ च्या सुमाराला नानासाहेबांना राजकोटच्या आसपास अटक केल्याचे जे सरकारी उल्लेख आहेत, ते कदाचित् खरेही असावेत. गुजराथेत अशी आख्यायिका प्रचलित आहे की प्रतिवर्षी बाजीरावांच्या श्राद्धाला ते राजकोट येथे जात. अशा प्रसंगी एका विश्वासघातकी भिक्षुकाने त्यांना धरून देण्यासाठी पांच गोऱ्या सैनिकांना ब्राह्मणाच्या वेषाने आणलें असता त्यांचे मुडदे पाडून नानासाहेब निघून गेले.

✦ ✦ ✦

प्रकरण सातवें

भटकुळातील गणेशोपासनेची परंपरा

टिळकांच्या काळी पुण्यात ज्या गणेशोत्सवाचें पुनरुज्जीवन झालें, त्याची परंपरा भट कुळाला पेशवेपद लाभण्यापूर्वी किती तरी वर्षें आधी एका भट तरुणाने म्लेच्छांचा उच्छेद करण्याकरिता केलेल्या खडतर गणेशोपासनेपासून सांगता येते. भट आणि घोटवडेकर हीं दोनही कुळें जंजिऱ्याच्या नवाबाच्या राज्यात रहात असताना ग्रहलाघवकर्ते गणेश दैवज्ञ घोटवडेकर यांना, आपण बांधावयाला काढलेला जंजिऱ्याचा जल-दुर्ग अभेद्य आणि अजिंक्य होईल, असा मुहूर्त काढून देण्याची नवाबांनी विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी मुहूर्त काढून दिला. पण त्या म्लेच्छांची चूकभूल होऊन त्या मुहूर्ताची वेळ काही पळाविपळांनी टळली. या चुकीच्या परिणामाविषयी प्रश्न विचारला असता गणेश दैवज्ञांनी सांगितलें की हा दुर्ग जवळ जवळ अजिंक्यच होईल, पण कालांतराने भट-कुळातील कोणी पुरुष एका रविवारी हा किल्ला जिंकून घेईल. ही आपदा टाळण्याकरिता नवाबांनी भटकुळाचें शिरकाण केलें. पण त्यातून वाचलेल्या एका बालकाने तरुणपणी म्लेच्छांच्या उच्छेदाप्रीत्यर्थ खडतर गणेशोपासना आरंभिली. तेव्हा देवांनी त्याच्या कुळाला राज्यप्राप्तीचा वर देऊन त्याला गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली. त्याचप्रमाणे राज्यप्राप्तीनंतर अथर्वशीर्षाच्या आवर्तनांसह एक कोटि दूर्वा वाहण्याचा नेम त्या कुळाला सांगून ठेवला. राज्यप्राप्तीनंतर हा नेम करण्याचें काम बाळाजी विश्वनाथांनी कायगांवचे पाटणकर दीक्षित यांचेकडे दिलें. त्या प्रमाणे नानासाहेबांचे राजवटीपर्यंत सत्तावीस लक्ष दूर्वा वाहिल्याचा उल्लेख दीक्षितांचे पत्रांतून आढळतो. पुढें या नेमाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे पेशव्यांचें राज्य विलयाला गेलें. तरीसुद्धा पुण्यात पेशव्यांचा गणेशोत्सव मोठ्या थाटाने होत असे. सत्तावन्नच्या क्रांतियुद्धातील पराभवामुळे पेशवे कुळातील गणेशोत्सव बंद पडल्यानंतर त्यांच्या परिवारातील मंडळींनी म्लेच्छांचा उच्छेद करून स्वराज्यस्थापनेत नानासाहेबांना यश यावें, याकरिता धुंडिराजाचा उत्सव या नांवाने गणेशोत्सव चालू केला. ही पेशवेकुळातील परंपरा लक्षात ठेवून टिळकांच्या गणेशोत्सवाचा विचार करणें युक्त होईल.

देवांतकनरांतकांचा नायनाट करणारा गुणेश

टिळकांनी गणपति आणि शिवाजी उत्सव कोणत्या निमित्तांनी चालू केले, याचीं उथळ उत्तरें टिळकचरित्रातून वाचावयाला मिळतात. मुसलमानांनी १८९३ मध्ये मुंबईत भयंकर दंगा केला आणि एकंदरीनेच इंग्रजांच्या चिथावणीमुळे ते अतिशय उद्दामपणाने वागतात, याची चीड येऊन टिळकांनी मुसलमानी मोहरमच्या उत्सवांतून भाग घेण्यापासून हिंदूंना परावृत्त करण्याकरिता गणपतिउत्सव चालू केला. ही टिळक चरित्रातील कथा कालक्रमाच्या दृष्टीने सत्य असली तरी गणपति-उत्सवाच्या तात्त्विक भूमिकेची कल्पना तिच्यामुळे येऊ शकत नाही. टिळकांच्या काळी गणपतिउत्सवात भाग घेणाऱ्या प्रमुख व्यक्तींना गणेश-पुराण चांगलें अवगत असल्यामुळे त्यांना या उत्सवाची भूमिका उलगडून सांगण्याचें प्रयोजनच नव्हतें. वस्तुस्थिति अशी आहे की, गणेशचतुर्थी-पासून दहा दिवस ज्याच्या जन्मदिनाचा उत्सव आपण साजरा करतो, त्या देवाचें नांव गणेश नसून गुणेश आहें, तो गुणांचा ईश आहे. गणेश-पुराणातील परंपरेप्रमाणे देवांतक आणि नरांतक या महान् असुरांचा संहार करण्याकरिता त्याने पृथ्वीवर अवतार घेतला. गणेशपुराण निर्माण झालें, तेव्हा हिंदुधर्मातील देवांचा निःपात करावयाला निघालेले बुद्धि-वादी बौद्ध हे देवांतक होते आणि त्यांनी ज्या शककुषाणादि विदेशी टोळ्यांशी संगनमत करून भारतावर आपलें अधिराज्य स्थापलें होतें तेच टोळीवाले नरांतक होते. टिळकांच्या काळी देवांतक म्हणजे देव-विरोधी नास्तिक, देवांच्या मूर्ति फोडणारे मुसलमान, मूर्तिपूजेची निरर्गल निंदा करणारे पाद्री आणि त्यांचे हिंदुनामधारी प्रार्थनासमाजी अनु-यायी इत्यादिकांचें पराकाष्ठेचें प्राबल्य झालें असल्याने या सर्व देवां-तकांचीं आक्रमणें मोडून काढून गणदेवतारूपी हिंदुजनतेला हिंदुधर्माचा जयजयकार करावयाला लावण्याकरिता टिळकांनी इतर प्रमुख देवांकडे दुर्लक्ष करून नव्या बौद्धांचा काटा काढण्याकरिता बुद्धिपुरस्सर महोत्कट गुणेशाच्या उत्सवाचा पुरस्कार आरंभिला. पुण्यातील हिंदुत्वनिष्ठांचे त्या वेळी दोन प्रमुख पुढारी होते. त्यांच्यापैकी विनायक रामचंद्र पटवर्धन हे नांवाने स्वतः विनायक आणि कुलपरंपरेने गणपतीचे भक्त. दुसरे टिळक हे तर आपलें केशव हें नांव टाकून गंगाधरतनय बाल म्हणजे एका अर्थी गणपतिच बनले होते. गणेशपुराणात गणेशाचें केसरिपत्र म्हणजे सिंह हें वाहन असलेला असें वर्णन येतें आणि टिळकही केसरि-पत्र होतेच. तेव्हा भिगारकरबोवांच्यासारख्या उपासकांनी त्यांना गणे-

शाची उपासना करण्याची सूचना केली असता त्यांनी ती तत्काळ मान्य केली, यात नवल नाही. असो. गुणेशाने मारलेल्या नरांतक असुराचा तर तेव्हा अखंड भारतातील प्रत्येक मदांध इंग्रजाच्या शरीरातून संचार झाला होता. या साऱ्या गोऱ्या नरांतकांच्या गोळीच्या अथवा लाथेच्या टप्प्यांत आलेले भारतीय कधी अस्वल, काळवीट, रानडुक्कर ठरून, अथवा भयानक पांथरी सुजल्याने इहलोकी निवास करण्याला अपात्र ठरून केव्हा परलोकी जातील, याचा नेमच उरला नव्हता. अशा परिस्थितीत इतर थोर देवांचा निद्राभंग न करता टिळकांनी महोत्कट गुणेशाला मात्र आपल्या साहाय्याला बोलाविलें, आणि त्यांच्या प्रमाणेच साऱ्या पुण्याच्या पुण्याईमुळेही या गुणेशाच्या आगमनाचा उत्सव येथे अत्यंत यशस्वी झाला. गणेशपुराणातील अन्य एका कथेत सिंधु दैत्य नामक सम्राटाने 'ममैव प्रतिमां कृत्वा पूजयन्तु गृहे गृहे' याप्रमाणे आपल्याच प्रतिमांची घरोघरी पूजा करण्याचा आदेश दिला होता. टिळकांच्या काळीही १८७७ पासून भारतावर सम्राज्ञी म्हणून लादलेल्या आधुनिक सिंधुस्वामिनीची (व्हिक्टोरिया) प्रतिमा घरोघरी आणि सर्व सार्वजनिक ठिकाणी ठेवून तिचीच उपासना करण्याला उत्तेजन दिलें जात असे. या सिंधुस्वामिनीचा प्रभाव नष्ट करण्याला एकटचा महोत्कट गुणेशाची उपासना पुरती पडेना म्हणून गिरिकंदरातील गणेशवाहनाच्या नांवाने प्रसिद्ध असलेला महाराष्ट्राचा चिरंतनचा राजा जो शिवाजी, त्याचा उत्सव चालू केला. गणेशोत्सव चालू झाल्यापासून हिंदुसमाजांतील देवांतक हें पूर्णपणे नरांतक इंग्रजसरकारच्या आहारी गेले आणि या वेळेपासूनच नित्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे टिळकांच्या चहाड्यांचीं पार्सलें पोचविण्याचा नवा लाभदायक व्यवसाय त्यांना लाभला. यांचा टिळकांविरुद्ध आक्षेप काय होता, तर ते अतिरेकी आणि हिंसक (extremist and violent) आहेत. जणू काही अत्याचारी राज्यकर्त्यांच्या श्रवणेंद्रियांपेक्षा अधिक अतिरेकी आणि हिंसक जगात अन्य काहीं असू शकेल! रोमच्या जुव्हेनाल कवीने म्हटलेंच आहे :

Quid violentius aure tyranni ?
What is more violent than the ears of a tyrant ?

या देवांतक सुधारकांचा देशद्रोह इंग्रजांना आवडत होता आणि सुधारक समजत होते की देशद्रोह करणारे आपण इंग्रजांचे आवडते आहोत. हा केवळ समजुतीचा घोटाळा.

साम्राज्य सरकार आणि त्याचे देशद्रोही हस्तक

साम्राज्य सरकार भारतातील देशद्रोह्यांचा उपयोग करावयाला जितकें आतुर होतें, त्याहूनही रानडेपक्षातील देशद्रोही साम्राज्य सरकारच्या उपयोगी पडण्यासाठी अधिक आतुर होते. पहिले विश्वकोशकर्ते प्रो. दिदेरो यांनी म्हटलें आहे :

Divide et impera is the maxim that all bad governments follow instinctively. Tyrants would be badly off if they had to rule over virtuous men only.

दुही उत्पन्न करून साम्राज्याचा कारभार यशस्वी करा, या नियमाचें पालन सर्व दुराचारी शासनकर्ते नैसर्गिक प्रेरणेनेच करीत असतात. या दुःशासनांची सारी प्रजा सद्गुणी असती तर यांना आपलें साम्राज्य टिकविणें फार अवघड गेलें असतें. या दिदेरोंच्या अवतरणावरून सदाचारी लोक दुराचारी साम्राज्यवाद्यांशी सहकार्य करीत नाहीत, हें सिद्ध होतें. तेव्हा त्यांच्याशी सहकार्य करणारे पक्ष राष्ट्रीय दृष्टचा दुराचारी असले पाहिजेत, हें ओघानेच येतें. या पक्षांच्या संबंधी ब्रजेंद्र गुप्त नांवाच्या इतिहासकारांनी जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी या नियतकालिकात १९६३ मध्ये लिहिलें आहे :

The members of infant professional bourgeoisie had a fierce love of British connection, not a passive acquiscence, but a firm belief in it. (पान ४९४)

म्हणजे रानडेपक्षाच्या लोकांचें ब्रिटिश साम्राज्याशी जें दास्याचें नातें जुळलें होतें, त्यावर त्यांचें हिंस्र प्रेम होतें. यांच्या या देशद्रोही प्रेमातील हिंस्रतेचा अत्यंत कटु अनुभव टिळकांना जन्मभर घ्यावा लागला. जन्मभर टिळकांचा याप्रमाणे हिंस्र द्वेष करून मेलेल्यांना आता राष्ट्रपुरुष बनविण्याचा उद्योग न. र. फाटक आणि तत्सम लोकांनी आरंभिला आहे. चालू पिढीत राष्ट्रपुरुष या पदवीवर अधिकार सांगणाऱ्या टिळकांच्या हिंस्र द्वेष्टयांना राष्ट्रीयत्वाचा गंधही नव्हता, असें वर उल्लेखिलेल्या ब्रजेंद्र गुप्तांनी त्याच प्रबंधात लिहिलें आहे :

The leaders of the professional bourgeoisie hardly had any concept of Indian nationhood. To them it did not exist. Most of them had no hesitation in acknowledging the superiority of Western civilization to their own.

म्हणजे रानडेपक्षाच्या पुढाऱ्यांना भारतीय राष्ट्रीयत्वाची कल्पनाही नव्हती. त्यांच्या गणिताप्रमाणे हें राष्ट्र अस्तित्वातच नव्हतें.

त्यांच्या मते पाश्चात्य संस्कृति हीच खरी संस्कृति, तिच्यापुढे पौरस्त्य संस्कृतीचें नावही घ्यावयाला नको. (पान ४९८) हेच लेखक पुढे ५०० पानावर लिहितात :

It was argued that an educated Indian knew more about his people, that he was cheaper to hire, and over and above, he was more loyal to the crown and British institutions than the white sahib.

या पक्षाचें म्हणणें असें होतें की सुशिक्षित भारतीयाला स्थानिक माहिती अधिक असते, त्याला वेतन कमी द्यावें लागतें आणि गोऱ्या इंग्रजांपेक्षा तो इंग्रजी राज्याचा आणि संस्थांचा अधिक अभिमानी असतो. टिळकांसारख्या देशभक्तांशी वैर करून देशाचा घात करावयाला यांच्याहून अधिक सुपात्र कोठून सापडणार! लाला हरदयाळ यांच्यासारख्या सरकारी हेरांनी सुद्धा या लोकांवर देशघातकीपणाचा आरोप केला आहे :

Hardayal, a generation later, accused them for using their energies for the sole purpose of enabling more Indians to ruin their country by joining an aristccratic service which holds itself aloof from the masses.

हे रानडेपक्षाचे पुढारी अधिक भारतीयांना वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचीं पदें मिळून देशाचा घात करता यावा, यासाठी आपल्या साऱ्या उत्साहाचा अपव्यय करीत होते. अशाच आशयाची टीका शिवरामपंत परांजपे यांनी 'काळा'तून रावबहादुर रानड्यांवर केली होती. रानड्यांनी आपल्या उदाहरणाने महाराष्ट्रातील सुशिक्षितांची एक सबंध पिढीच्या पिढी इंग्रजांच्या सेवेला जुंपून देशोद्धाराचा काळ पंचवीस वर्षें पुढे ढकलला. यांच्या चहाडखोरीचा उल्लेख टिळकांनी 'म्हातारचळ का पोरखेळ' या लेखात केला आहेच. 'टिळक किंवा नातू हे इंग्रजसरकारचें राज्य बुडविणार, आणि न्यायमूर्ति अथवा गोखले तें तारणार, असे प्रत्यक्ष अथवा परंपरेने उद्गार काढणें, म्हणजेच आधी आपला नीचपणा किंवा मूर्खपणा व्यक्त करण्यासारखें आहे. रानडेपक्षाचें हें स्वरूप वर्तमानकाळी लपवून ठेविलें जातें.

विदेशी इतिहासकारांची मवाळमीमांसा

रानड्यांनी आपण होऊनच आपल्या पक्षाला Moderate म्हणजे मवाळ अथवा नेमस्त म्हणवून घेऊन टिळकांच्या पक्षाला Extremist अर्थात् अतिरेकी असें नांव दिलें होतें.' या रानडेपक्षाचें वास्तविक स्वरूप

काय होतें, याचें विशद वर्णन हार्वर्ड विद्यापीठातील एक आचार्य क्रेन ब्रिंटन यांनी आपल्या *Anatomy of Revolution* या ग्रंथात केलें आहे. क्रांतीची शरीररचना असें या नांवाचें भाषांतर करता येईल. पण ही शरीररचना शवचिकित्सेवरून शिकावी लागत असल्याने या ग्रंथाला क्रांतीची शवचिकित्सा असें म्हटलें तरी चालेल. या ग्रंथात अधिकारारूढ मवाळांना होणाऱ्या विरोधाचें वर्णन करताना त्यांनी म्हटलें आहे :

They found themselves against an increasingly strong and intransigent group of radicals and extremists who insisted that the moderates were trying to stop the revolution, that they had betrayed it, that they were as bad as the rulers of the old regime, indeed much worse since they were traitors as well as fools and scoundrels.

त्यांना असें आढळून आलें की दिवसानुदिवस अधिकाधिक बलिष्ठ होत असलेला मूलगामी आणि अतिरेकी दुराराध्यांचा पक्ष आपल्याला विरोध करावयाला सिद्ध झाला असून मवाळ पक्ष क्रांतीची प्रगति थांबविण्याचा प्रयत्न करीत आहे, क्रांतीचा विश्वासघात करीत आहे, अत्याचारी राज्यकर्त्यांहून हे अधिक वाईट आहेत; कारण हे राजकारण न कळणारे मूर्ख आणि स्वजनांची वंचना करणारे प्रवंचक असून वरती आणखी देशद्रोहीही आहेत, असें ते आग्रहाने प्रतिपादीत आहेत. साऱ्या देशांतून क्रांतिकाळात मवाळांचें स्वरूप समान असतें, याचें अधिक वर्णन करताना आचार्य ब्रिंटन म्हणतात :

They used grand words and phrases grandly as a consolation and a joy to their listeners and to themselves. But they did not believe in them as the radicals believed in them; they did not intend to try to pursue them to their logical conclusions in action.

हे मवाळ उदात्त शब्द आणि उदात्त सूत्रें यांचा उदात्त स्वरात उच्चार करीत असले तरी तो केवळ स्वत:ला आणि श्रोत्यांनाही आत्मप्रौढीचा आनंद लाभावा म्हणून करीत असत. मूलगामी पक्षाप्रमाणे त्यांचा त्या शब्दांसूत्रांवर विश्वास नव्हता आणि त्यांची तर्कशुद्ध परिणति कृतीत व्यक्त व्हावी, यासाठी ते प्रयत्नही करीत नसत. अशा परिस्थितीत अन्य कोणीही तत्त्वनिष्ठ पुढारी उदयाला येणें स्वाभाविक होतें.

As the crisis of revolution approaches, only the man with a touch or more of fanatic idealism in him can attain to leadership.

क्रांतीचा आणीबाणीचा काळ जवळ आला म्हणजे आग्रही ध्येय-

वाचाळालाच लोक पुढारीपण देतात. तोच लोकमान्य बनतो. हेच आचार्य ब्रिटन पुढे म्हणतात :

The moderates, then, do not believe in the big words they have to use. They are all for compromise, common sense, toleration, comfort. But in revolutions large numbers of men were for the moment lifted by desire and emotion to a point where they seemed to despise even comfort. The moderates could not deal politically with such men.

म्हणजे हे मवाळ ध्येयवादाच्या ज्या उदात्त शब्दांनी जनतेला झुलवीत असतात, त्यांच्यावर त्यांचा विश्वास नसतो. समेट, सहिष्णुता, सर्वसामान्य व्यवहारचातुर्य आणि आराम हेंच त्यांचें खरें जीवन असतें. पण क्रांतिकाळात बहुसंख्य लोकांच्या कामना आणि भावना इतक्या उच्च पातळीला जाऊन पोचलेल्या असतात, की आराम हराम है, हेंच त्यांचें घोषवाक्य बनतें. असल्या लोकांचें नेतृत्व करणें सुखवादी, आरामखुर्चीवरील मवाळांना अशक्यच असतें.

गणेशोत्सवाचें राजकीय स्वरूप

ज्या सिंधुदैत्याच्या वधाप्रीत्यर्थ, अथवा सिंधुस्वामिनीच्या राज्यहरणाप्रीत्यर्थ टिळकांनी गणेशोत्सवाचा महान् यज्ञ आरंभिला, तिच्या दासानुदासांचा पक्ष नष्ट करणें हा या यज्ञाचा एक प्रधान हेतु असल्यामुळे त्यांचें वर्णन या प्रकरणाच्या प्रारंभीच करावें लागलें. असो. टिळकांनी गणेशोत्सवानंतर चालू केलेला शिवाजी उत्सव हा प्रकटपणे शिवसाम्राज्याच्या स्मारकाच्या निमित्ताने आणि स्मारकाच्या स्वरूपातही चालू केला असला तर तत्पूर्वीच चालू केलेला गणेशोत्सव हा पेशवाईच्या स्मरणाप्रीत्यर्थ चालू केला होता. कारण गणेशोत्सव हाच पेशव्यांचा मोठा वार्षिक समारंभ होता आणि टिळकांचे पितामह रामचंद्रपंत हे ५७ च्या उठावणीपर्यंत चित्रकूटच्या पेशव्यांच्या आश्रयाला जाऊन राहिले होते. भट पेशवे आणि टिळक या दोन घराण्यांचे हे निकटचे संबंध ध्यानात घेतल्यावाचून टिळक चरित्रातील गणेश-शिवाजी उत्सवादि घटनांचा पुरता उलगडा होत नाही. गणेशोत्सवाचे पुण्यातील एक प्रमुख प्रवर्तक सरदार खासगीवाले यांनी ग्वाल्हेर येथे पेशवाई परंपरेप्रमाणे चालविलेला गणेशोत्सव पाहिल्यानंतर त्या उत्सवासारखाच उत्सव पुण्याच्या परिसरात झाला पाहिजे, अशा आग्रहाने गणपतिउत्सव येथेही मोठा थाटाने करण्याची वहिवाट पाडली. पण एका गोष्टीत मात्र त्यांना उत्तरेचें अनुकरण करता आलें नाही. उत्तरेचा गणपति उत्सव हा धुंडि-

राजाचा उत्सव म्हणून करीत असत आणि त्यांचें हें कृत्य ग्वाल्हेर येथे पुण्याइतके धूर्त चहाडखोर नसल्याने खपून जात असे. पण पुण्यातील परिसरात सिंधुस्वामिनीच्या अखिल भारतीय दासानुदासांच्या अध्वर्यूंचा निवास असल्यामुळे येथे प्रकटपणे धुंडिराजाच्या नावाने उत्सव करणें अशक्य होतें. कारण धुंडिराज हें शेवटचे पेशवे जे बंडवाले नानासाहेब त्यांचें नांव होतें. या दिवसांत टिळकांचें चित्त त्या क्रांतियुद्धाच्या इतिहासाने वेधलेलें होतें. टिळकांच्या आग्रहामुळेच दत्तात्रेय बळवंत पारसनीस यांनी १८९३ मध्ये झांशीच्या राणीचें पहिलें सविस्तर चरित्र प्रसिद्ध केलें. याच वर्षी मुंबई सरकारने नेहमीप्रमाणे राजकोट येथे वर्षश्राद्धाला आलेल्या नानांना अटक केली असता हिंदुस्थान सरकारच्या आज्ञेवरून त्यांना त्यांची अटकेतून मुक्तता करावी लागली. ही वार्ता वृत्तपत्रकार टिळकांना कळली असेलच. गणपतिउत्सवाचे प्रवर्तन करण्याला स्वतः नानांनीं नसलें तरी त्यांच्या ग्वाल्हेर येथील मित्रांनी आणि आप्तांनी सरदार खासगीवाले यांना प्रोत्साहन दिलें होतेंच. गणपतिउत्सवाच्या पुण्यातील प्रवर्तनापासूनच भारतातील क्रांतिकारक चळवळीचा सक्रिय प्रारंभ होतो, असें रामगोपाळांनीं त्यांच्या स्वातंत्र्यप्रयत्नांच्या इतिहासात लिहिलें आहे.

Almost simultaneously with the public celebrations of the Ganapati festival began the terrorist activity confined to a few individuals.

खरेंच आहे. गणपतिपूजनानंतरच खऱ्या कारस्थानांचा प्रारंभ होतो, गणपतिपूजन हें स्वतःच कार्य बनू शकत नाही.

गणपति उत्सवाची प्रेरणा

टिळकांना गणपति उत्सवाची प्रेरणा श्रीपतिबुवा भिंगारकरांनी केली, असें आठवणींच्या ग्रंथावरून समजतें. श्रीपतिबुवांच्या निधनाचा सखेद उल्लेख गीतारहस्याच्या प्रस्तावनेत टिळकांनी केला आहे. हें मूळचे रानड्यांच्या परिवारापैकी. पण पुढे त्यांची बैठक नेहमी टिळकांच्याकडे असे. या बुवांचे गुरु कवीश्वरबुवा नृसिंहवाडीकर हें गणपतीची पार्थिव पूजा श्रावण शुक्ल चतुर्थीपासून भाद्रपद शुक्ल चतुर्थीपर्यंत लक्ष गणपति करून करीत असत. अशीच उपासना टिळकांनी स्वराज्यप्राप्तीप्रीत्यर्थ करावी, असें बुवांनी सुचविलें होतें. तेव्हा टिळकांनी त्यांना उत्तर दिलें, ' मी एकटयाने पार्थिव गणपतीची पूजा करून भागणार नाही. तुमच्या म्हणण्याप्रमाणे राष्ट्रभर गणपतीची सेवा घडली तर चांगलें होईल. खरो-

खरी गणपति ही देवता तुम्ही चांगली सुचविलीत.' टिळकांना ही कल्पना एकदम पटण्याचें मुख्य कारण हें की, तोपर्यंत सोवळ्या पांढरपेशा वर्गात मर्यादित प्रमाणावर चालू असलेली गणपतीची उपासना नव्याने शिक्षणसन्मुख झालेल्या बहुजनसमाजात लोकप्रिय झाली तर अशिक्षित-सुशिक्षितांमधील दुजाभाव नष्ट होईल आणि गणेशोत्सवाच्या द्वारा जसा बहुजनसमाजात लोकसत्तेचा प्रसार करता येईल, तसा अन्य कोणत्याही दैवताच्या उपासनेने करता येणार नाही. गणेशोत्सवाचें हेंच स्पष्टीकरण बिपिनचंद्र पाल यांना टिळकांच्या सहवासात आठवडाभर काढल्यानंतर सुचलें होतें. 'मला समजून आलें की, गणपतीच्या उपासनेमध्ये प्रतीकोपासनेच्या पुनरुज्जीवनाची कल्पना टिळकांच्या मनात नाही. प्रचलित हिंदुधर्माचें हें एक अनुष्ठान नसून भारताच्या जाग्रत् जनशक्तीच्या साहाय्याने हा एक स्वदेशसेवेचा यज्ञच टिळकांनी प्रस्थापित केला आहे. शास्त्रज्ञ, सुपंडित टिळकांनी गणपतीचा वास्तविक अर्थ ओळखला होता. इंग्रजींत ज्याला डेमॉस म्हणतात, त्यालाच प्राचीन भारतात गण अशी संज्ञा होती. जनसमुदायाच्या समष्टीचेंच नांव गण. या गणाची, डेमॉस्‌ची अधिष्ठात्री देवता गणपति. भारतीय गणशक्तीला जाग्रत् करणें हाच गणेशोत्सवाचा उद्देश. महाराष्ट्रात ब्राह्मणशूद्रादि सारेच गणेशोपासनेचे अधिकारी. या उत्सवात जातिधर्मविचार नाहीं.'

क्षणिकवादी देवांतक

लोकहितवादी, रानडे, आगरकरप्रभृति बुद्धिवादाचे पुरस्कर्ते सुधारक हें त्यांच्या विचारसरणीवरून नवबौद्ध आणि क्षणिकवादी असल्याचें दिसून येतें. त्यांचा बुद्धिवाद हा वस्तुतः बौद्ध पंथाचा नवावतार. परक्या राजसत्तेशी संगनमत करण्याची प्राचीन काळातील बौद्धांची परंपराच हे लोक इंग्रजी राजवटींत चालवीत होते. बौद्धपंथाच्या क्षणिकवादाने प्रभावित झाल्यामुळे हे सनातन धर्माचा द्वेष करू लागले होते. न्यायमूर्तींची तुकारामभक्तिही त्यांच्या बौद्धपणाची निदर्शक होती. कारण तुकारामाचा पांडुरंग हाच खरा बौद्धावतार, अशी वारकरीपंथाची समजूत आहे. या नवबौद्ध सुधारकांच्या संगतीत वाढलेल्या डॉ. आंबेडकरांनी आमच्या डोळ्यादेखतच बौद्धपंथाची नवी संघटना उभी केली आहे. ही संघटनाही 'सर्वं क्षणिकम्' या बुद्धाच्याच सुप्रसिद्ध सिद्धान्ताप्रमाणे विस्मृतीला वश होईल, असा रंग दिसत आहे. असो. या बौद्ध सुधारकांना समाजाच्या सनातनत्वाची आणि सातत्याची जी कल्पना नसते, ती एडमंड बर्कसारख्या आयर्लंडातील विचारवंतांना असलेली पाहून नवल वाटतें.

Society indeed is a contract. It is to be looked on with reverence, because it is not a partnership in things subservient only to the gross animal existence of a temporary and perishable nature. It is a partnership in all science, a partnership in all art, a partnership in every virtue and in all perfection. As the ends of such a partnership cannot be obtained in many generations, it becomes a partnership not only between those who are living but between those who are living and those who are dead, and those who are to be born. A nation is an idea of continuity which extends in time and space as well as in numbers.

समाज हा एका अर्थी भागीदारीचा कागदच आहे. पण ही भागीदारी तत्कालिक आणि नश्वर प्राणिजीवनापुरती नसल्याने तिच्याकडे पूज्यभावानेच पाहिलें पाहिजे. सर्व शास्त्रें, सर्व कला, सर्व सद्गुण आणि सर्व प्रकारच्या पूर्णता, पारमिता समाजातील घटकांना प्राप्त व्हाव्यात, याकरिता ही भागीदारी आहे. या भागीदारीचे हेतु अनेक पिढ्यांतही पूर्ण होणारे नसल्याने ही वस्तुतः दिवंगत आणि भावी पिढ्या यांच्यातील भागीदारी असून ती वर्तमानकाळी शक्य तितकी अविकृत स्वरूपात टिकविणें आणि तिचा तात्पुरता भोगवटा घेणें हें काम तेवढें चालू पिढीचें असतें.

नवबौद्ध सुधारकांचें सत्य स्वरूप

महाराष्ट्रात सरकारशी बुद्धिवादाने लढण्याचा देखावा करणारा माधवराव रानडयांचा पंथ आणि सरकारला त्याच्या अशाश्वतीचा परिचय करून देणाऱ्या वासुदेव बळवंतांचा पंथ हे एकाच वेळी उदयास आले. यांपैकी नवबौद्धपंथाचे नेते जे सुधारक ते स्वाभाविकपणे धूर्तता, सावधपणा आणि कारस्थानीपणा यांचे प्रतीकच बनले होते. त्यांच्या पंथाचा भावनेपेक्षा बुद्धिवादावर अधिक भर होता. त्यातच भावनांना मान देणें म्हणजे धर्मभोळ्या समजुतींचा समादर करणें असें यांचें समीकरण असल्यामुळे आणि बुद्धिवादाच्या अतिरिक्त अभिमानामुळे, कौटुंबिक, धार्मिक आणि राष्ट्रीय परंपरा म्हणजे केवळ लोकभ्रम अशी त्यांची समजूत झाली होती. या लोकभ्रमापासून आपण मुक्त असल्याची विज्ञापना म्हणून ते स्वतःला बुद्धिवादी म्हणवून घेत असत. तरीसुद्धा प्रत्येक नवीन गोष्टीची चिकित्सा न करता स्वागत करण्यात त्यांचा पुढाकार होता. विशेषतः तेव्हा इंग्रज हें नावीन्याचें प्रतीक आणि नवविद्याविभूषित राज्यकर्ते असल्याने त्यांच्या आराधनेत यांचा पुढाकार होता, हें सांगावयाला नकोच. स्वतःच्या वर्तमानकालीन प्रतिष्ठेपुढे यांना देशाच्य

भवितव्याची क्षिति नव्हती. पूर्वकालीन परंपरांचें यांना ज्ञानही नव्हतें आणि त्यांचें बंधनही यांना मानवत नव्हतें, म्हणून ते त्या काळाचा द्वेष करीत आणि लोकहितवादीप्रमाणे ' नाना आता असता तर लोक त्याला वेडा म्हणू लागले असते आणि तो पळून गेला असता ' अशा प्रकारचे प्रलाप काढीत. अशा प्रकारे स्वराज्याची निंदा करून परराज्याचें पर्यायाने समर्थन करणें हा या नवबौद्ध नेत्यांचा आवडता व्यवसाय होता. स्वतः न्यायमूर्तींनी के. सुब्बाराव यांना लिहिलेल्या एका पत्रात म्हटलें आहे :

Half the mischief is due to our people taking it into their head to do the work of the enemy by self-condemnation.

आमचेच लोक आत्मनिंदा करून शत्रूंचा कार्यभाग साधीत असतात, असें या पत्रात न्यायमूर्तींनी गाऱ्हाणें गायिलें आहे. परक्या सरकारचें प्रकट अथवा प्रच्छन्न पद्धतीने समर्थन करून सामान्य जनांना थंड विचारांचें स्नान घालणें आणि त्यांच्या स्वातंत्र्योत्सुकतेला पायबंद लावणें हाच यांचा जीवनहेतु असल्यामुळे सरकारशीं संगनमत करून लोकमताची वंचना करण्यात हें बुद्धिवादी नेते फार प्रवीण बनले होते. सर्वसाधारण समाज परक्यांचा द्वेष्टा आणि परंपराप्रिय असल्याने नवबौद्ध नेत्यांचें अनुयायित्व स्वीकारण्याला तो अनुत्सुक असल्याचा राग हें प्रतिपक्षाच्या नेत्यांवर काढीत. याकरिता हे नवबौद्ध नेते एका नेत्राने शक्तिपक्षाच्या नेत्यांवर म्हणजे टिळकांवर जागता पाहारा करीत आणि दुसऱ्या नेत्राने ते अधिकारीवर्गाकडून होणाऱ्या स्वतःच्या कौतुकाचें अवलोकन करीत. महाराष्ट्रात तरी या नवबौद्ध सुधारकांची जात ही अक्षरशः नसली तरी भावशः नवीन अस्पृश्यांची जात बनली असल्याने ती समाजापासून अलिप्तच असे. या जातीचे लोक बुद्धिचापल्यामुळे तोंडाने देशभक्तीच्या गोष्टी बोलत आणि कृतीच्या वेळी परक्या राज्यकर्त्यांच्या पावलांवर पावलें टाकून चालत. राष्ट्रातील चैतन्याचा द्वेष आणि प्रकाशाचा विद्वेष यांच्यामुळे व्यथित झालेल्या हृदयाने या पक्षाचे पुढारी आणि त्यांचा पक्ष मरणोन्मुख झाले होते. एका इंग्रज तत्त्वज्ञान्याने म्हटलें आहे :

In normal times disguised apologies for status quo and Utopian dreams for the future pass for political thought and science.

म्हणजे राजकारणाचें विवरण करण्याच्या मिषाने प्रचलित राज्यपद्धतीचें समर्थन करणें आणि राज्यकर्त्यांशी सत्तास्पर्धा न करता भावी

राज्यपद्धतीविषयी मनोराज्यें करणें, हें यांचें राजकारण, हाच यांचा विचारवंतपणा. चिपळूणकरांनी लोकहितवादींचें सत्यस्वरूप दाखविलें आणि टिळकांनी 'म्हातारचळ कां पोरखेळ' हा प्रसिद्ध लेख लिहून रानड्यांच्या राजकारणाचें अंतरंग उघडें केलें. या निमित्ताने त्यांना दोष देणारा, टिळकचिपळूणकरांची रानडेलोकहितवादींशी तुलना करून त्यांना न्यूनत्व देणारा, आजकालचे देवांतक न. र. फाटक यांचा फाटका संप्रदाय पांढऱ्या सरकारच्या पाठिंब्याने महाराष्ट्रात अस्तित्वात आला आहे. पण या समकालीन देवांतक संप्रदायाला राष्ट्रीयत्वाची तळमळ आणि राष्ट्रधर्माच्या उदयकालाचा इतिहास समजण्याची अक्कल असल्याचा पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाही.

इतिहासाचा पुरावा

देवांतक आणि नरांतक असुरांचा प्रतिकार करण्याकरिताच गणेशोत्सवाचा प्रारंभ झाला, हें त्या उत्सवेतिहासाच्या प्रारंभीही सांगितलें आहे. "इंग्रजी शिक्षणामुळे हिंदूंचे आचार नष्ट होऊ लागले, विचार भ्रष्ट होऊ लागले, धर्माविषयी लोक उदासीन होऊ लागले, ही स्थिति बरी नाहीं, तरी त्यास तोड काय करावी, याचें चिंतन पुष्कळ विचारवंतांच्या मनात चालू असताना गणपतिउत्सवास सार्वजनिक स्वरूप दिलें तर त्याचा परिणाम चांगलाच होईल, असें लोकमान्यांना वाटलें. हा उत्सव दहा दिवस करावा, म्हणजे त्यांत कीर्तनें, प्रवचनें, व्याख्यानें, मेळे इत्यादि विविध मार्गांनी हिंदुसमाज चांगला जाग्रत् करता येईल, ही कल्पना त्यांना पटली आणि गणेशोत्सवाला अभिनव सार्वजनिक स्वरूप देऊन टिळकांनी स्वतः सार्वजनिक गणपति विंचूरकरांच्या वाड्यात बसविला. या योगाने हिंदुसमाज जो विस्कळीत होऊ लागला आहे, तो संघटित होईल आणि त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीत प्रगति होईल, अशी त्यांची अपेक्षा होती." गणेशोत्सवाच्या इतिहासातील वरील अवतरणावरून देवांतक आणि नरांतक असुरांच्या प्रतिकाराकरिता टिळकांनी गणेशोत्सवाचा पुरस्कार केला, हें उघड होतें. या उत्सवापासूनच देवांतकांनी नरांतक असुराच्याकडे टिळकांच्या चहाड्यांचीं पार्सलें पोचविण्याचा व्यवसाय आरंभिल्याचा पुरावा आता वाचकांना सादर केला पाहिजे.

देवांतकांच्या चाहड्यांचा पुरावा

स्वातंत्र्येतिहासाच्या साधनांच्या दुसऱ्या खंडात २०४ पानावर रक्षकविभागाने गणेशोत्सवासंबंधी केलेल्या प्रतिवृत्ताचे उतारे छापले आहेत.

As another method of widening the breach between the Hindus and the Mahomedans, Tilak encouraged if he did not instigate, the holding of Ganapati celebrations on a much larger scale than in previous years. The original idea was to make them as distasteful as possible to Mahomedans by having them as much like the Muharram as possible and by withdrawing Hindu interest from it. Tilak and his party worked hard to secure this object and their conduct caused no small anxiety to the moderate section of their community, whose leader called on the District Magistrate and suggested the advisability of convening a meeting and settling programme for Ganapati procession, and in the course of conversation this gentleman dropped some remarks to the effect that the possibility of overthrowing the British Government was not an uncommon object of discussion among the Tilak faction in Poona.

रक्षकविभागाचें म्हणणें असें की, हिंदु आणि मुसलमान यांच्यातील विरोध वाढविण्याकरिता टिळकांनी गणपतिउत्सवाला उत्तेजन दिलें आणि मुसलमानांना चिडविण्याकरिता त्याला अगदी मोहरमच्या सारखें स्वरूप दिलें. या विधानाच्या सत्यासत्यतेची चर्चा मी करू शकत नाही. कारण १९१५ पासून मी मोहरमचा उत्सव पाहिलेला नाही. पण मुधोळात असताना मोहरमचें प्रस्थ हिंदु समाजात किती होतें, हें मी पाहिलेलें आहे. त्या संस्थानातील कित्येक खेड्यातून एकही मुसलमान नसला तरी परगावचा एखादा मुसलमान उसना आणवून तेथील हिंदु मोहरम साजरा करीत. ही परिस्थिति आता किती प्रमाणात पालटली आहे, हें स्थानिक लोकच सांगू शकतील. असो. टिळकांनी आणि त्यांच्या पक्षाच्या लोकांनी गणपतिउत्सव यशस्वी करण्याकरिता फार कष्ट केले. हें पाहून मवाळांना मोठीच चिंता वाटू लागली. टिळकांची प्रकृति अतिश्रमाने बिघडेल, अशी चिंता या देवांतकांना वाटत नव्हती, हें सांगायला नकोच. तरी त्यांच्या राजकारणाला चिरविश्रांति देण्याकरिता मवाळांच्या तत्कालीन नेत्यांनी अर्थात् रानड्यांचे शिष्यवर गोखले यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्याकडे जाऊन चाहडी केली की, टिळकांच्या वाड्यात ब्रिटिश राज्य उलथून पाडण्याच्या शक्यतेसंबंधी नेहमी वाटाघाटी चालतात. गोखले स्वत: एका कर्दनकाळ फौजदारांचे चिरंजीव होते आणि त्यांचा जन्म वृश्चिक लग्नावर झाला होता, हें सांगितलें म्हणजे ज्योतिषाचा गंध असलेल्यांना यांच्या चरित्राची पुरेशी कल्पना येईल. या प्रकरणी ब्रुइन यांनी केलेल्या प्रतिवृत्तात म्हटलें आहे :

Tilak openly advocated the use of force and knowing that without unity nothing could be accomplished, he set to work to inaugurate the Sarvajanik Ganapatis. His ideas in this respect soon caught fire among the people and the Hindus gathered in such numbers as must have pleased even Tilak. He advocated each Ganapati having a mela and each mela being composed of as many gymnasts as possible. All melawalass were to aquire familiarity in the use weapons.

टिळकांनी शक्तीचा उपयोग करून प्रचलित प्रश्न सोडविण्याचा पुरस्कार आरंभिला. एकीवाचून कोणतेंही महत्कार्य सिद्धीस जाणार नाही, हें ओळखून त्यांनी सार्वजनिक गणपतींची स्थापना करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. टिळकांचे हें विचार समाजामध्ये वणव्यासारखे पसरले आणि गणेशोत्सवात भाग घेण्याकरिता हिंदु लोक इतक्या मोठ्या प्रमाणात पुढे आले की टिळकांनासुद्धा आनंद झाला असेल. प्रत्येक गणपतीपुढे मेळा असला पाहिजे आणि प्रत्येक मेळ्यातील अधिकांत अधिक लोकांनी शस्त्रास्त्रें वापरण्याचें शिक्षण घेतलें असलें पाहिजे, असा टिळकांचा आदेश होता. आमच्या कर्नाटकात गणेशचतुर्थीच्या दिवशी स्थापलेला गणपति दुसऱ्यांच्या घरांतून पळवून आणणें हें फार पुण्यकारक कृत्य मानलें जात असे आणि त्यामुळे त्या दिवशी गणपतीच्या संरक्षणाकरिता घरोघरच्या पुरुषांना सोटे घेऊन बसावें लागत असे. पण पुण्यात ही कल्पना रूढ नाही, असें दिसतें.

गणेशोत्सवाची क्रांतिकारकांना संधि

गणेशोत्सवाच्या संधीचा ठिकठिकाणच्या क्रांतिकारकांनी आपल्या प्रचारासाठी कसा उपयोग करून घेतला, याचा उल्लेख डॉ. खानखोजे यांनी आपल्या आठवणींत केला आहे. 'पुण्याच्या अनुकरणाने अमरावती, वर्धा, नागपूर इत्यादि नगरांतून सार्वजनिक गणपति-उत्सव चालू झाले. गणानां त्वा गणपतिं हवामहे, या मंत्राप्रमाणे गणराज्य देणारा गणपति म्हणजे स्वातंत्र्यदेवता होय, असा प्रचार चालू झाला. उत्तम वक्त्यांच्या आणि देशभक्त हरदासांच्या द्वारे गणपतीच्या आश्रयाने क्रांतिकारक एकत्र करण्याचें काम गणपतिउत्सवाने सुलभ झालें. हा धार्मिक उत्सव असल्याने आमच्याकडचे रक्षक त्यांत हात घालू शकत नव्हते.'

तीन पक्षांचें दुर्वर्तन

सुधारक, इंग्रज आणि मुसलमान या तीन पक्षांच्या दुर्वर्तनाला आळा

घालण्याकरिता टिळकांनी गणेशोत्सवाचा पुरस्कार केला. यांपैकी मुसलमान हे आपले बंधु असल्याने आपण त्यांच्यावर प्रेम करावें, असें रानडेपक्षाचें म्हणणें होतें आणि तें टिळकांना त्यांच्याहूनही अधिक टक्के मान्य होतें. कारण आपण मुसलमानांवर ५० टक्के प्रेम करावें, असें रानड्यांचें आणि त्यांच्या शिष्यपरंपरेतील गांधींचें मत असलें तर आपण त्यांच्यावर शंभर टक्के प्रेम करावें असें टिळकांचें म्हणणें होतें. मुसलमानांवर ५० टक्के प्रेम करण्यात, त्यांनी आपला द्वेष केला तरी आपण त्यांच्यावर प्रेम करावें असें प्रतिपादण्यात काव्य असेल, पण व्यवहार नाही आणि टिळकांनी काव्य नामक चैनीचा विद्यार्थिजीवन संपताच त्याग केला होता. 'मुसलमानांना सहिष्णुता, इंग्रजांना मानवता आणि त्यांचे दासानुदास अशा सुधारकांना मनस्विता अर्थात् स्वाभिमान हे गुण प्राप्त व्हावेत, याकरिता टिळकांनी ही गुणाधीश गणेशाची उपासना आरंभिली होती. या उत्सवामागील प्रेरणा ही प्रतिकाराची, प्रत्याघाताची आणि प्रतिशोधाची प्रेरणा होती. या उत्सवातील प्रचार राष्ट्रशत्रूंचा द्वेष आणि त्यांच्या अत्याचारांचा प्रतिशोध यांच्यावरच आधारलेला होता. त्या दिवसांत मराठी रंगभूमीवरही 'सूड, सूड' अशी गर्जना करणाऱ्या राणा भीमदेवाचेंच राज्य चालत होतें. गणेशोत्सवाचें हें वातावरण पंढरपूरच्या बौद्ध होऊन बसलेल्या पांडुरंगाच्या वारकरी पंथाच्या वातावरणाशी किती विसंगत आणि विपरीत होतें, हें सांगायला नकोच. या इतिहासाचा गंध नसलेल्या राजारामशास्त्री भागवतांच्या दौहित्री दुर्गाबाई आपल्या आजोबांच्या अनुकरणाने टिळकांनी ज्ञानोबाची पालखी टाकून गणेशाची पालखी आपल्या खांद्यावर घेतल्याबद्दल त्यांना नुकत्याच दोष लावीत होत्या. त्यांच्या सुधारक पंथात बुद्धि शब्दाचा वापर जितका अधिक, तितकाच प्रत्यक्ष बुद्धीचा वापर आणि व्यापार कमी असतो, हेंच सत्य मला त्यांच्या अल्पकाळ ऐकलेल्या भाषणावरून कळून आलें. गणेशोत्सवाच्या भावनेशी समरस झालेल्या ल. ब. भोपटकरांनी एकदा गांधींना उत्तर दिलें होतें की, प्रेम ही मानवी भावना असली तर द्वेष ही स्वर्गीय भावना आहे (If love is human, hatred is divine). गणेशोत्सवाने हिंदुमुसलमानांचे संबंध बिघडले, हा दुर्गाबाईंनी त्याच भाषणात केलेला आरोप सपशेल खोटा आहे. गणेशोत्सवात मुसलमानांना दुखविण्याजोगा कोणताही भाग नसल्याने निजामसरकारचा या उत्सवाला प्रथमपासून पाठिंबा होता, (गणेशोत्सवाची साठ वर्षें पान २७२)

सरकारी अधिकाऱ्यांचा अभिप्राय

१८९४ मध्ये मध्यविभागाचे कमिशनर पोर्टिउस् यांनीही एका सरकारी प्रतिवृत्तात असाच अभिप्राय व्यक्त केला आहे.

I regard the alleged motives to unite Hindus in defence of their religion against Mahomedanism and to embitter for the time the relations between the two races as not the real ones. My convictions lead me to support the view widely entertained in Poona by the more respectable natives that the agitation fomented by the Deccanee Brahmans is directed in reality, not against the Mahomedans but against the Government. Their pretended earnestness on behalf of Hindu religion is only a blind. (Page 168)

ह्यूम महाशयांनी काँग्रेस अस्तित्वात आणल्यानंतर लगेच अधिकाऱ्यांच्या चिथावणीवरून मुसलमानांनी १८८६ मध्ये दिल्ली, मिरत आणि इटावा येथे भयंकर दंगे केले. पुढे १८९२ मध्ये ह्यूम यांनी काढलेल्या शेतकऱ्यांच्या बंडाच्या शक्यतेसंबंधीच्या गुप्त परिपत्रकाची चर्चा भारतात चालू झाल्यानंतर प्रयाग आणि मुंबई या दोन राजधान्यांतील वरिष्ठ गोऱ्या अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय सभेच्या हिंदु पुढाऱ्यांना बंडाचें नेतृत्व करणें अशक्य व्हावें म्हणून मुसलमानांना दंगे करण्याची प्रेरणा देऊन त्याहून मोठ्या प्रमाणावर दंगे घडवून आणले. लॉर्ड लॅन्सडाऊन हें राजप्रतिनिधि असताना त्यांनी एकंदर ९१ दंगे आपल्या प्रेरणेने घडवून आणले आणि त्यासाठी २५–८–१८९३ या दिवशी लिहिलेल्या पत्रात भारतसचिव लॉर्ड किंबर्ले यांनी आनंद व्यक्त केला आहे. असले दंगे कोठे घडवून आणावयाचे हें सैन्यातील गोऱ्या अधिकाऱ्यांच्या गोष्ठीतून ठरत असे. ही माहिती १९२४ मधील पहिले श्रमिक पक्षाचे भारतसचिव लॉर्ड ऑलिव्हियर यांनी प्रकटपणे एका भाषणात सांगितली होती. या भाषणाची त्या वेळी भारतातील वृत्तपत्रांतून भरपूर चर्चाही झाली आहे. भारतीय सैन्यातील एका विभागाला इतिहासविभाग अशी संज्ञा असून त्या विभागातील अधिकारी निरनिराळ्या जातींच्या इतिहासज्ञानाचा उपयोग करून दंग्यांचें स्थळ, काळ इत्यादि ठरवीत. ही माहिती मला १९३१ मधील कानपूर येथील अति भीषण दंग्यानंतर सैन्यातील अधिकाऱ्यांकडूनच कळली होती. आपण स्वतःच दंग्याचे सूत्रधार बनल्यानंतर राज्यपालांसारखे वरिष्ठ अधिकारी ते शमविण्याकरिता दंग्यांच्या स्थळी जाण्याचा उपद्रवही घेत नसत. या नियमाला अनु-

सरून १८९३ च्या ऑगस्टमधील मुंबईतल्या मुसलमानांच्या दंग्याच्या प्रसंगी लॉर्ड हॅरिस हे स्वस्थ चित्ताने पुण्यात बसून राहिले होते. मुंबई सरकारने हिंदुस्थान सरकारकडे पाठविलेल्या गुप्त प्रतिवृत्ताप्रमाणे या दंग्याचा उपक्रम मुसलमानांनीच केला असल्यामुळे हिंदूंना इतर साऱ्या दंग्यांप्रमाणे पहिल्या दिवशी मारच खावा लागला; पण दुसरे दिवशी लाठ्याकाठ्यांना सरकारने बंदी केल्यामुळे टिळकांच्या सूचनेप्रमाणे हातात ऊस घेऊन मराठी लोकांनी मुसलमानांना झोडपून काढलें, अशी आख्यायिका आजही जुन्या पिढीतील लोक सांगतात. या दंग्यानंतर पुण्यातील काही दूरदर्शी पुढाऱ्यांनी मुसलमानी अत्याचारांपासून आत्म-संरक्षण करून घेण्याकरिता आणि हिंदुधर्माला संघजीवनाची सवय करण्याकरिता हिंदु संघटनांची मूळाक्षरें गिरविण्याचा उपक्रम केला.

धर्मो रक्षति रक्षितः

पण हें हिंदुसंघटन केवळ स्वधर्माच्या संरक्षणाकरिता चाललें आहे ही कल्पना इंग्रज अधिकाऱ्यांना आणि त्यांच्यापाशी टिळकांच्या चाहड्या करणाऱ्या रानडे पक्षाच्या पुढाऱ्यांना पटेना. कारण या हिंदुसंघटनाचे टिळकांसारखे पुढारी धार्मिक आचार कडकडीत-पणे पाळण्याविषयी कधीच प्रसिद्ध नव्हते. 'धर्मो रक्षति रक्षितः' म्हणजे आपण धर्माचार पाळीत असल्यावाचून केवळ स्वधर्मरक्षणा-करिता एखादें आंदोलन आरंभिलें तरी लोकांना आपल्या उद्दिष्टा-विषयी शंका येतेच. यासाठीच श्रीधरपंत जिनसीवाले हे टिळकांना वारंवार संध्यावंदनादि आचार पाळण्याचा उपदेश करीत. असो. वरील इंग्रजी अवतरणावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते की, मुसलमानी दंग्यांच्या निमित्ताने अण्णासाहेब पटवर्धन आणि टिळक यांनी आरंभिलेलें हिंदु-संघटनांचें आंदोलन वस्तुतः मुसलमानांच्या विरुद्ध नसून त्यांचा अंतिम उद्देश परकी सरकाराविरुद्ध बंड घडवून आणणें हाच असल्याची मध्य-विभागाच्या प्रमुखाची (कमिशनरची) सुदृढ समजूत करून देण्यात टिळकांच्या प्रतिपक्ष्यांना चांगलीच यशःप्राप्ति झाली असावी. पुण्यातील अधिक सन्मान्य सद्‌गृहस्थाच्या सांगण्यावरून आपली अशी समजूत झाल्याचा उल्लेख पोर्टिउस महाशयांनी केला असला तरी परक्या राज्य-कर्त्यांपाशी स्वदेशबांधवांच्या चाहड्या सांगणाऱ्यांना नामांकित इतिहासकार पृथ्वीचा कलंक (Scum of the earth) अशीच संज्ञा देतात. साध्या मराठीत त्यांना दास्याच्या नरकातील किडे म्हटलें

तरी चालेल. वर उतरून घेतलेल्या प्रतिवृत्तात त्या परकीय अधिकाऱ्यांनीच तिरस्काराने लिहिलें आहे :

The well-disposed stand looking on weak-kneed and helpless and wondering when Government will interfere.

म्हणजे हे सारे 'जानुदौर्बल्याने' अथवा 'गुढगी' रोगाने ग्रासलेले सरकारपक्षाचे लोक आपण दाखवून दिलेल्या आणि बंडाचा हेतु मनात धरून हालचाली करीत असलेल्यांच्या विरुद्ध सरकार केव्हा उपाय करणार आहे, याची साश्चर्य प्रतीक्षा करीत आहेत. त्यांच्यानंतरचे (कमिशनर) विभागाधिकारी स्पेन्स यांनी "केसरी, मराठा, पुणेंवैभव, नेटिव्ह ओपिनियन हीं सारीं पत्रें राजद्रोहाचा प्रसार करीत असतात, असें सरकारला कळविलें होतें.

१८९६ च्या प्रतिवृत्तात ते म्हणतात :

In more than one article resort to rebellion and force has been advocated with sympathetic references to the mutiny of 1857.

म्हणजे सत्तावन्नच्या बंडाचे सादर, साभिमान आणि सहानुभूतिपूर्ण उल्लेख करून एकाहून अधिक लेखांतून बंड करण्याला प्रोत्साहन दिलें होतें. अर्थात् 'काळ' पत्राच्या उदयापूर्वीच टिळक आणि त्यांचे सहकारी यांनी बंडाचा पुरस्कार आरंभिला होता, ही गोष्ट या प्रतिवृत्तावरून सिद्ध होते.

टिळक सुधारणांचे नसून सुधारकांचे शत्रु

येथे अर्वाचीन वाचकांना ही महत्त्वाची गोष्ट सांगितली पाहिजे की, टिळक हे सुधारणांचे विरोधक नसून सुधारकांचे विरोधक होते. समाजात कालोचित परिवर्तनें होत असतात आणि तीं होत राहतील, हें टिळकांनाही कळत होतें. पण समाजाच्या कर्तृत्वशक्तीचा ओघ तीं परिवर्तनें घडवून आणण्याकडे लावावयाचा कीं नाही, हाच काय तो वादाचा विषय होता, किंवा दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे सुधारणांचा पुरस्कार करण्याच्या मिषाने इंग्रजी राज्याचा पुरस्कार करावयाचा कीं नाही, हा वादाचा विषय होता. इंग्रजांच्या कर्तृत्वासंबंधाने, बुद्धीसंबंधाने, वैभवासंबंधाने अद्‌भुत कल्पना सुधारकांच्या अंतःकरणात सदैव घोळत असल्यामुळे त्यांची स्वातंत्र्यकाळातील इतिहासाची स्मृति कधीच नष्ट झाली होती. आपल्या राष्ट्रीय परंपरांचा विध्वंस करून त्यांच्या स्थानी इंग्रजांनी पाश्चात्य कल्पनांचा घटोत्कची मायाबाजार मांडला होता, तो पाहून देशभक्तांचें हृदय दुभंग होत होतें. स्वराज्य आणि

स्वातंत्र्य नश्वर असल्याने गेलें. त्याप्रमाणे पारतंत्र्यही नश्वर असल्याने जाईल. पण तोपर्यंत इंग्रजांच्या इंद्रजालाने मोहित झाल्यामुळे पूर्वजांचा यथार्थ अभिमान, स्वातंत्र्याची स्वाभाविक लालसा, सर्व महत्त्वाकांक्षा पूर्ण करून घेण्याचें साधन जें स्वराज्य तें प्राप्त करून घेण्यासाठी कर्तृत्व-शक्तीची झेप, आपल्या राष्ट्राचे सनातन आदर्श पुन्हा प्रतिष्ठित करण्याचा आग्रह, या सर्वांचा जर नवसुशिक्षित समाजाने त्याग केला, तर आपल्या भावी पिढ्याही या परंपरागत धनापासून वंचित होतील आणि मग राष्ट्रीयत्वाला मुकून आपण केवळ एतद्देशीय बनू; हा त्या काळी खरा आणीबाणीचा प्रश्न होता. इंग्रजांनी आपल्या परंपरेचीं पाळेंमुळें खणण्याचा उद्योग आरंभिला होता आणि आपले नवशिक्षित सुधारक त्यांना साहाय्य करीत होते. इंग्रजांनी जसें हें विध्वंसनाचें कार्य केलें, तसेंच विध्वंसनाचें कार्य करून त्यांनी उभारलेला डोलारा मोडून टाकून त्याच्या स्थानी महाराष्ट्राच्या पराक्रमी परंपरेशी आणि संतमहंतांच्या खऱ्या चरित्रांशी सुसंगत अशा सनातन कल्पना, आचार, विचार आणि आकांक्षा यांचें प्रतीक असलेला प्रासाद कोणी उभा करू शकेल काय, इकडे साऱ्या इंग्रजविरोधी समाजाचे चातकाप्रमाणे डोळे लागले होते. समाजातील उरलीसुरली संपत्ति, पहिल्या प्रतीची बुद्धि आणि कर्तृत्व-शक्ति ही सारी इंग्रजांच्या उपयोगी पडत होती. ही संतापजनक परिस्थिति बदलून नवशिक्षितांच्या कर्तृत्वाचा ओघ स्वदेशोन्नतीच्या कार्याकडे कसा वळवावयाचा हा अत्यंत अवघड प्रश्न चिपळूणकर आणि टिळक यांच्या डोळ्यांपुढे उभा राहिला होता. या कार्याचें यथार्थ स्वरूप डोळ्यांपुढे आणून सरकारी मान्यतेची नि अधिकाराची लालसा सोडलेल्या, स्वतःच्या संस्थेतील स्वार्थी सहकाऱ्यांनी निंदाव्यंजक ठराव करून त्यागपत्र द्यावयाला लावलेल्या आणि वर्तमानपत्राच्या ऋणाचा भार एवढेंच द्रव्यबळ पदरी असलेल्या टिळकांना 'कर्मण्येवाधिकारस्ते' या भगवंताच्या वचनावर विश्वास ठेवून देवांतक आणि नरांतक असुरांच्या बलप्रयोगांना, कपटी कारस्थानांना आणि ऐहिक उन्नतीच्या प्रलोभनांना बळी न पडता हें दुष्कर कार्य यशस्वी करून दाखवावयाचें होतें. तत्कालीन परिस्थितीने हें जें अभूतपूर्व आव्हान टिळकांच्या कर्मयोगाला दिलें होतें, त्याची अर्वाचीन वाचकांना कल्पना तरी कशी येणार? त्यांना एवढेंच माहीत असतें की टिळक सुधारकांना विरोध करीत होते. पण त्यांना ही गोष्ट माहीत नसते की, टिळक सनातन्यांचे पुढारी बनले असले तरी ते सुधारकच आहेत, असा आक्रोश स्वतः आगरकरच करीत होते.

दासमनोवृत्तींचा द्वेष

नवबौद्ध सुधारकांचा प्रभाव नष्ट करण्याकरिता काढलेल्या गणेशोत्सवाचे प्रवर्तक त्यांच्या दासमनोवृत्तीचे कट्टे शत्रु होते. आपल्या वारकरीपंथात प्रचलित असलेल्या संतचरित्रांनी दासमनोवृत्तीचें पोषण होत असल्याने काळकर्त्यांनी 'जसे भक्त तसे त्यांचे देव' हा लेख लिहून त्या पंथात पोसलेल्या दासमनोवृत्तीचें ओंगळ स्वरूप उजेडात आणलें होतें. दामाजीसाठी देव म्हणे महार झाला आणि सेना न्हाव्यासाठी तो म्हणे न्हावी झाला असलीं आख्यानें प्रचलित करणाऱ्या पंथाने म्हणे शिवाजी महाराजांना स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यात साहाय्य केलें. न्यायमूर्ति रानड्यांनी 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथात केलेलें हें मतप्रतिपादन स्वतःच्या दाससंप्रदायाच्या समर्थनाकरिता केलें होतें, हें उघड आहे. यावरून त्या काळी वारकरी विरुद्ध धारकरी असे वादही उपस्थित झाले होते. इतिहासाचार्य राजवाड्यांनीही या वादात प्रामुख्याने भाग घेतला होता. दासमनोवृत्ति नष्ट करण्याकरिता सरळ आणि सुस्पष्ट आंदोलन गणेशोत्सवाच्या चालकांनीच केलें. उलट पक्षी गांधींनी दासमनोवृत्तीचा तोंडाने निषेध करीत असतानाच अप्रतिकाराच्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करून तिचें पोषण केलें. रामदासस्वामींच्या चरित्राला बखर हें नांव दिलें असल्याने रामदास हे इतर संतांपेक्षा भिन्न असे राजकारणी संत होते, असें स्वतः न्यायमूर्तींनीच प्रथम दाखवून दिलें होतें. पण त्यांचें हें भिन्नत्व पुढे न्यायमूर्तींच्या नवबौद्ध पंथाच्या मुळावर येऊ लागल्यामुळे दासबोधाचा पूर्वभाग इतर संतांच्या ग्रंथांहून भिन्न नसल्याच्या निमित्ताने रामदासांचें वैशिष्टय नाकारण्याची वल्प्तिही त्यांनीच काढली. 'जें जें कांही आपणासि ठावें। तें तें हळूहळू शिकवावें। शाहाणे करून सोडावे। सकळजना'। असा उपदेश करणाऱ्या रामदासांना सकृद्दर्शनी वाचकांना बिचकवू नये, ग्रंथारंभीं त्यांच्याच कलाने जाऊन ते पुरते भारले गेल्यानंतर त्यांना आपल्या विशिष्ट पंथाची दीक्षा द्यावी, इतकें नक्की कळत होतें. रानडेपंथाच्या दासमनोवृत्तीचा एक नमुना म्हणून येथे हरिभाऊ लिमयांच्या इतिहाससंशोधनाचाही उल्लेख केला पाहिजे. त्यांच्या मताने दक्षिणेतील मुसलमान मुळी हिंदूंनी बंड करण्याइतका त्यांचा धर्मच्छळ करीतच नव्हते, तेव्हा शिवाजीला स्वतंत्र हिंदुराज्य स्थापून गोब्राह्मणप्रतिपालक बनण्याचें कारणच नव्हतें. रामदासांनी मुसलमानी अस्मानी सुलतानीचें जें वर्णन केलें आहे, तें त्यांना हरिभाऊंच्या इतकें तत्कालीन परिस्थितीचें ज्ञान नव्हतें म्हणून केलें, अथवा ते शब्दसृष्टीचे ईश्वर असल्याने त्यांच्या हातून आपोआपच घडून आलें, असलीं दिव्य मतें प्रति-

पादणाऱ्या संशोधकांसंबंधी, अथवा त्यांच्या पंथासंबंधी अधिक काही लिहिण्याची आवश्यकता नाही.

हरिभाऊ लिमयांच्या ऐतिहासिक अज्ञानाची परंपरा

हरिभाऊ लिमयांच्या ऐतिहासिक अज्ञानाची परंपरा चालू पिढीतही त्यांच्या विद्वान् चिरंजीवांनी मागील अंकावरून पुढे चालू ठेविली आहे. वडिलांचें चरित्र लिहिताना त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाविषयी पुढील माहिती पुरविली आहे. '१९०८ मध्ये जेव्हा पुण्यात प्लेग प्रकरण झालें आणि रँड नि आयर्स्ट यांचे बळी गेले, त्या वेळी इतर अनेक संस्थांप्रमाणे दक्षिण शिक्षा संस्थेवरही (डेक्कन एज्युकेशन सोसायटी) सरकारची वक्र-दृष्टि होऊ पहात होती. पण संस्थेने या वेळी सरकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करून आपलें स्वत्व राखलें. अर्थात् हरिभाऊंचा या कार्यात पुष्कळसा वाटा होता, हें सांगणें नकोच.' या अद्भुत माहितीविषयी अधिक काय लिहावें !

गणपति उत्सवातील क्रांतिकार्य

गणपति उत्सवाचा क्रांतिकार्यासाठी कसा उपयोग करीत असत, याचें वर्णन राजद्रोह समिति अथवा रौलॅट समितीच्या प्रतिवृत्तात आढळतें.

During the ten days' celebration of the festival, bands of young men paraded the streets of Poona singing verses calculated to intensify the feelings against the Mahomedans and Government. At the same time leaflets were circulated by school-boys and others, broadcast through the city, calling the Hindus to arms, urging the Marathas to rebel as Shivaji did, declaring that the dagger of subjection to foreign rule penetrated the bosom of all, and urging that a religious outbreak should be the first step towards the overthrow of the alien power.

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत तरुणांच्या टोळ्या म्लेच्छविरोधी पदें म्हणत नगरातून मिरवत असत. याच वेळी हिंदूंना सशस्त्र होण्याला प्रोत्साहन देणारीं आणि शिवाजीप्रमाणे बंड करण्याला चिथावणारीं पत्रकें विद्यार्थी आणि इतरही तरुण सर्वत्र वाटीत. या पत्रकांतून पारतंत्र्याची सुरी सर्वांच्याच हृदयांत घुसली असून सर्वांनाच स्वतंत्र व्हावयाचें असल्याने धार्मिक दंगा ही स्वातंत्र्यसोपानाची पहिली पायरी होऊ शकेल, असें प्रतिपादन केलेलें असे. ही विचारसरणी किती अचूक

होती, हें आपल्या प्रत्ययास आलेंच आहे. मात्र धार्मिक दंगा हा स्वातंत्र्यसोपानाचा मार्ग ठरल्याने देशात एकाच्या स्थानी दोन राष्ट्रें अस्तित्वात आलीं आहेत. हा टिळकपक्षाचे शत्रु समजतात, त्याप्रमाणे गणेशोत्सवाचा परिणाम नसून गणेशोत्सव हाच सरकारप्रेरित दंग्यांचा परिणाम होता.

गणपतिउत्सवाला दंग्यांचा सुरुंग

पुण्यात चालू झालेला गणपति उत्सव म्हणजे भावी बंडाचें गणेशपूजन अशी समजूत तेव्हा सरसकट साऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची झाली असल्याने त्यांनी या उत्सवाच्या दुर्गाला मुसलमानी दंग्यांचा सुरुंग लावून तो उडवून देण्याचा प्रयत्न केला. या कारस्थानावर टीका करताना टिळकांनी १३–११–१८९४ च्या अंकात लिहिलें आहे. "स्पष्टवक्तेपणा हा जसा लॉर्ड हॅरिस यांचा गुण आहे, तसाच तो आमच्या ठिकाणीही कां नसावा, हें आम्हांस समजत नाही. महाराष्ट्रातील संभावित लोकांचा छळ चालला असता आमचीं अंतःकरणें संतप्त होऊन आमच्या मुखावाटे जर तो संताप बाहेर पडला नाही तर तो पडणार तरी केव्हा? महाराष्ट्रातील ब्राह्मण बंड करावयाला निघाले असून त्यांस अधिकाराच्या जोरावर काही तरी करून योग्य शिक्षा केल्यावाचून हें बंड मिटणार नाही, अशी धड ना हिंदु ना मुसलमान अथवा इंग्रज अशा कित्येक हलक्या कामगारांनी जी ओरड चालविली आहे, तिचाच प्रतिध्वनि जर लॉर्ड हॅरिस यांच्या मुखातून बाहेर पडतो तर अजूनही आम्ही स्वस्थ बसावें काय? पुण्यात बंड होणार असें येथील रक्षक अधिकारी उघड बोलू लागले होते, पण आता खरा प्रकार काय बाहेर आला आहे पहा. ज्या पुण्यास दीड दोन वर्षांपूर्वी शांतता होती, येथे आता हत्या होण्यापर्यंत पाळी येण्यास आमचे रक्षकच कारण झाले आहेत, असें येथील जिल्हा न्यायालयातून सुटलेल्या खटल्यावरून उघड दिसून येत नाही काय? दारूवाल्याच्या पुलावरील दंगा मुसलमान लोकांनीं पहिल्याने उपस्थित केला. त्या दंग्यात ज्या लोकांस पकडून खटले भरले होते, ते सर्व मशिदीत पकडले नसून मशिदीत पकडल्याचा खोटा पुरावा रक्षकांनी शिजविला. मुसलमानांच्या नमाजाचें ढोंग होतें आणि खरा प्रकार म्हटला म्हणजे ते हिंदु लोकांवर चालून जाण्याकरिता काठ्या घेऊन मशिदीत दबा धरून बसले होते. या आणि दुसऱ्या पुष्कळ गोष्टी न्यायालयात सिद्ध झाल्या आहेत." एवढ्या अवतरणावरूनही तत्कालीन कारस्थानांची आणि तरुण टिळकांच्या संतप्त लेखनाची थोडीशी कल्पना वर्तमानकालीन वाचकांना येऊ शकेल.

गणेशोत्सवानिमित्त मुसलमानांचा पहिला दंगा

हिंदूंच्या सामाजिक जीवनावर मुसलमानी राज्यात किती विविध प्रकारचे निर्बंध असत आणि ते निर्बंध शिथिल करण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांनी केल्यास मुसलमान कसे तत्काळ अत्याचाराला प्रवृत्त होत असत, याचें एक उदाहरण म्हणून श्रीवर्धनमध्ये १८७७-त मुसलमानांनी गणेशोत्सवानिमित्त हिंदूविरुद्ध केलेल्या दंग्याची कथा येथे सांगण्याजोगी आहे. जंजिरा संस्थान हें श्रीवर्धनकर भट पेशव्यांचें मूलस्थान. येथील मुसलमानी राज्यकर्त्यांच्या अत्याचारांमुळेच भटवंशाला तेथून पलायन करून पुण्यात पेशव्यांचें विशाल साम्राज्य स्थापण्याची बुद्धि झाली. जंजिरा संस्थानात हिंदूंच्या वाद्यघोषावर असंख्य निर्बंध होते. शाबान, रज्जब आणि रमजान या तीन मासांत, तसेंच मोहरमच्या पहिल्या पंधरवड्यात हिंदूंना मिरवणुकी काढण्याची आणि वाद्यें वाजविण्याची संपूर्ण बंदी असे. त्याचप्रमाणे रविवार, गुरुवारच्या रात्रीत आणि शुक्रवारी अहोरात्र मिरवणूकबंदी आणि वाद्यबंदी असे. या अवधीत हिंदूंचे सण आल्यास त्यांचीं घरें मुसलमानांच्या घरांपासून, तसेंच मशिदींपासून दूर असल्यास त्यांना घरी वाद्यें वाजवू देत. अशा धर्मच्छळाच्या राज्यात १८७७ मध्ये हिंदूंनी नबाबसाहेबांना विनंति करून मशिदीपुढील वाद्यबंदीव्यतिरिक्त इतर सर्व निर्बंध संस्थानी सरकारकडून रद्द करून घेतले. तेथील इंग्रज प्रतिनिधि लार्कोम यांनीही या फेरबदलांना मान्यता दिली. यानंतर लौकरच मुसलमानांचा रमजान आणि हिंदूंचा गणेशोत्सव एकत्र आले. तेव्हा राजमार्गावर वाद्यें वाजविण्याच्या निमित्ताने १० ते १६ सप्टेंबरपर्यंत श्रीवर्धन येथे मुसलमानांनी दंगे करून हिंदूंच्या घरांत शिरूनही अनन्वित अत्याचार केले. तेथील हिंदूंनीही त्यांना थोडा फार तरी प्रतिकार केला. यानंतर मुसलमानांच्या समाधानाकरिता वाद्यनिर्बंध पुन्हा बदलले गेले, हें सांगण्यात काहीच स्वारस्य नाही. हा दंगा झाला, तेव्हा टिळक पदवी घेऊन महाविद्यालयातून बाहेर पडले असतील. त्या वेळी ते देशोद्धाराचा मार्ग शोधीत होते हें तर सत्य आहे. अशा वेळी या दंग्यापासून उचित तो बोध घेऊन हिंदूंना स्वदेशात स्वाभिमानाने जीवनयात्रा चालविता यावी, यासाठी त्यांनी योग्य संधि पाहून हेतुपुरस्सर गणपति उत्सव चालू केला.

कलकत्त्यातील हिंदुमेळा

टिळकांच्या गणेशोत्सवाशी अंशतः तुलना करता येईल, अशी हिंदुमेळा ही संस्था कलकत्त्यात नवगोपाळ मित्र यांनी चालविली होती.

हिंदु मेळ्याचा हेतु ख्रिस्ती पंथाकडे झुकलेल्या केशवचंद्र सेन यांच्यासारख्या सुधारकांच्या प्रचारामुळे हिंदूंच्या अस्मितेला उत्पन्न झालेला धोका दूर करणें हाच होता. या मेळ्यासंबंधी बिपिनबाबूंनी आत्मचरित्रात लिहिलें आहे :

As under the Moslem domination Hindu society developed a most dogmatic conservatism, with a view to prevent being overwhelmed by the aggressive civilization of Islam, so Rajnarayan Bose and others were opposed to the more radical reformers of their time, because they were afraid that unless this imitative social reform movement was checked very definitely it would strengthen the hold of the alien political authority established in the country by adding to it the moral and spiritual hold which the introduction of European customs and institutions in our society would inevitably bring about.

परक्यांच्या संसर्गात येताच कासव आपलीं सर्व अंगें आवरून कवचाच्या आत आश्रय घेतो, त्याप्रमाणेच हिंदु समाजालाही मुसलमानांच्या आक्रमणानंतर सोवळ्या ओवळ्याचे आणि रोटीबेटी व्यवहाराचे अति कडक नियम करून म्लेच्छसंसर्गापासून आत्मसंरक्षण करून घ्यावें लागलें. त्याप्रमाणेच प्रथम धर्मसुधारणेच्या भ्रमाने भ्रांत झालेल्या राजनारायण बोस आणि इतर मंडळींना जेव्हा स्पष्ट दिसू लागलें की, केशवचंद्र सेन यांच्या प्रभावाने ब्राह्मसमाज हिंदुत्वापासून अधिकाधिक दूर जात असून ख्रिस्ती पंथाच्या अधिकाधिक जवळ जात आहे, आणि यामुळे व्हिक्टोरिया राणीही केशवचंद्रांचा सत्कार करीत आहे, तेव्हा त्यांना कळून आलें की, या नव्या सुधारकांना तीव्र प्रतिरोध केला नाही तर भारतावरील ख्रिस्त्यांची सत्ता दृढतर होईल. कारण युरोपियनांच्या चालीरीती आणि संस्था यांचें अनुकरण करणारे लोक त्यांच्या ओंजळीने पाणी पिऊन भारताच्या पायांतील परदास्याच्या शृंखला अधिकच अवजड करणार, हें उघड आहे. याला आळा घालण्याकरिता ब्राह्मसमाजाच्या महर्षि देवेंद्रनाथांनी आणि राजर्षि राजनारायणांनी १८६७ पासून कलकत्त्यात प्रति चैत्रमासी हिंदु मेळा भरविण्याचा उपक्रम नवगोपाळ मित्र यांच्याकडून करविला. या मेळ्याचा कार्यक्रम सामान्यतः गणपति उत्सवाच्या कार्यक्रमाप्रमाणेच असून त्यांत धार्मिक विषयांपेक्षा प्रदर्शन आणि तत्सम करमणुकीच्या गोष्टी यांवर भर दिला जात असे. पण टिळकांच्या गणेशोत्सवात गणराज्याचा प्रचार करण्याची जी प्रेरणा होती आणि ज्या प्रेरणेमुळे तो तत्काळ देशभर वणव्यासारखा

पसरला, तशी प्रेरणा आदि ब्राह्मसमाजातील महाजनांनी चालविलेल्या हिंदु मेळ्यामागे नसल्याने काही हिंदुत्ववादी महाजनांनी चालविलेला वार्षिक उत्सव एवढेंच त्या मेळ्याचें स्वरूप राहून गेलें. हिंदु मेळ्याच्या प्रवर्तकांत महर्षि देवेंद्रनाथ, त्यांचे पुत्र द्विजेंद्रनाथ, सत्येंद्रनाथ, रवींद्रनाथ ज्योतिरिंद्रनाथ, पुतणे गणेंद्रनाथ, अमृतबाजारचे शिशिरकुमार घोष, राजा कमलकृष्ण, राजा चंद्रनाथ इत्यादि कलकत्त्याच्या हिंदु समाजातील प्रचंड धेंडें होतीं. पण राजा हा समाजातील प्रत्येक व्यक्तीपेक्षा मोठा असला तरी एकंदर समाजापेक्षा लहान असतो. या न्यायाने या सर्व महान् व्यक्तींचें कर्तृत्व टिळकांच्या प्रेरणेने जाग्रत् झालेल्या तेल्यातांबोळ्यांच्या कर्तृत्वाच्या मानाने तोकडें पडलें आणि सरासरी चौदा वर्षे चालून एके दिवशी हिंदु मेळ्याचा वार्षिक उत्सव बंद पडला. काही सत्यशोधकांनी अलीकडे असा आक्षेप घेतला आहे की, अलीकडील ब्राह्मण लेखकांनी टिळकांना तेल्यातांबोळ्यांचे पुढारी बनविलें आहे. पण वस्तुस्थिति तशी नाही. १८९५ च्या दिवसांत जेव्हा गोखले ब्रूटफोर्सच्या म्हणजे पाशवी शक्तीच्या आधाराने टिळक पुण्यावर राज्य करू पहात आहेत, असे आरोप करीत होते; त्याच दिवसांत त्यांचे अनुयायी टिळकांना तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणून हिणवीत होते. त्यांना जें दूषण वाटलें, तेंच टिळकांनी भूषण मानलें, हा टिळकांचा आणि त्यांच्या चरित्रकारांचा दोष.

प्रेम विरुद्ध न्याय

या हिंदुसंघटनाचे जन्मजात शत्रु असलेल्या गांधीवादी देवगिरीकरांनी वासुकाकांच्या चरित्रात टिळकप्रभृति गणपति उत्सवाच्या प्रवर्तकांना दोष देताना लिहिलें आहे: "दोनही समाजातील धर्म जाग्रत् झाला होता. आणि तो पिसाटाप्रमाणे हत्या करीत सुटला होता. (हा आरोप हिंदुसमाजापुरता सपशेल खोटा असूनही गांधीवादी निष्पक्षपातीपणाच्या निमित्ताने नेहमी करीत असतात. असो.) त्यांना आवरणारे कोण होते? सरकारचा आणि मुसलमानांचा अन्याय त्यांना दिसत होता. तें खरें असलें तरी त्यापेक्षा श्रेष्ठ मानवी धर्म आहे आणि त्या धर्माला न्याय नको असून प्रेम हवें आहे, याचें स्मरण कोणालाच होत नव्हतें." अशा प्रकारे हिंदुसमाजाचा बुद्धिभेद करणाऱ्यांना न्यायतत्त्वाची केवळ अकरणात्मक बाजू तेवढी दिसते. पण न्याय हा ईश्वराचा नेत्र आहे, ही गोष्ट त्यांना कळत नाही. मानवी प्रेम हें अंधळें असतें. पण ईश्वराचें प्रेम डोळस असतें आणि न्यायतत्त्वाच्या नेत्रानेच तें वस्तुस्थितीचें अवलोकन

करीत असतें. या न्यायतत्त्वाच्या नेत्राची कृपादृष्टि जेव्हा या धरित्रीवर होते, तेव्हाच ती उर्वरा होते; ही दृष्टि ज्या ठिकाणी अथवा ज्या भू-भागात पडते, तोच भूभाग ईश्वराच्या कृपाप्रसादाने धन्यधन्य होतो. नुसत्या रविकिरणांच्या उष्णतेने आणि पर्जन्याच्या वृष्टीने पृथ्वी उर्वरा होत नाही, सस्यश्यामला होत नाही. तिला न्यायरूपी परिसाचा स्पर्श झाला तरच तिच्यातून सोन्याचें पीक उगवतें. ज्या देशात न्यायाचें राज्य प्रस्थापित होतें, त्याच देशातील भूमि सस्यशालिनी आणि वीरप्रसू बनते. जेव्हा एका दिवसात कोटयवधि लोकांना न्याय मिळतो, म्हणजेच देशात अभूतपूर्व राज्यक्रांति घडून येते, त्या दिवशीच देशात कोटयवधि वीर खडे होतात.

प्रेमवादी हे प्रतिक्रांतिवादी

पण न्यायतत्त्वाचा मूर्तिमंत आविष्कार अशा क्रांतीचे पोवाडे प्रेमवाद्यांच्या पुढे गाण्यात काहीच अर्थ नाही. कारण पदोपदी न्यायविरोधी वर्तन करण्यात धन्यता मानणारे प्रेमवादी हे बोलून चालून प्रतिक्रांतिवादी म्हणजेच क्रांतीचे हाडवैरी असतात. यासाठीच फ्रेंच राज्यक्रांतीचे नामांकित इतिहासकार मिशेलेत् यांनी तळतळून लिहिलें आहे:

That fiction of the old world, that deceitful legend, which was ever on its tongue, was to substitute love in place of law. If that world, almost annihilated under the title of love, wounded by charity and heart-broken by grace, can revive, it will revive by means of law, justice and equity. O blasphemy, they had opposed grace to law and love to justice. As if unjust grace could still be grace, as if those things which our weakness divides were not two aspects of the same truth,... the right and the left hand of God.

एक अवास्तव कल्पना अथवा एक मायावी शब्दप्रयोग जुन्या जगाच्या जिव्हेवर नेहमी नाचत असे. तो म्हणजे न्यायाच्या स्थानावर प्रेमाची स्थापना करणें हा होय. यांच्या न्यायविरोधी प्रेमाने बहुतांशी नष्ट झालेलें, यांच्या भूतदयेने खंडित झालेलें आणि यांच्या क्षमेने विदीर्ण-हृदय झालेलें विश्व जर पुनश्च प्राणसंपन्न, अखंड आणि निरामय व्हावयाचें असेल तर तें कार्य विधिनिर्बंध, न्याय आणि धर्माधर्मविवेक यांच्या स्पर्शानेच होऊ शकेल. न्याय आणि प्रेम यांच्यामध्ये विरोध कल्पिणें म्हणजे शुद्ध पावित्र्यविडंबन आहे. तसेंच न्यायाची विटंबना करून केलेली क्षमा आणि कृपा ही खरोखरीची क्षमा अथवा कृपा कधीच होऊ शकत

नाही. ज्या नाण्यावर एका अंगाला प्रेम, दया आणि क्षमा यांचीं नांवें कोरलेलीं असतात, त्यांच्याच दुसऱ्या अंगाला विधिनिर्बंध, न्याय आणि धर्माधर्मविवेक यांचींही नांवें कोरलेलीं असतात. या तत्त्वामध्ये कलह कल्पिणाऱ्यांनीच आमच्या देशाचें पूर्ण वाटोळें केलें आहे.

असत्य इतिहासाच्या पुरस्कर्त्यांना उपदेश

अर्थात् ज्या पक्षांनी देशाचें पूर्ण वाटोळें केलें आहे, असें वर म्हटलें आहे, त्या पक्षांना आपलें कार्य पूर्ण झालें आहे, असें अद्यापि वाटत नाही. धर्मच्छळाचा तत्त्वतः आणि कृतीनेही पुरस्कार करणाऱ्या मुसलमान आणि ख्रिस्ती धर्मांच्या अनुयायांनी हिंदुसमाजावर केलेल्या अत्याचारांची स्मृतिच इतिहासात राहू न देण्याचा त्यांनी चंग बांधला असून त्यांचा हा हेतु विफल करण्याकरिता झटणाऱ्या हिंदु इतिहासलेखकांवर ते जातीयतेचा आरोप करीत असतात. त्यांना फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रसिद्ध इतिहासकार मिशेलेत् याच्या शब्दांत उत्तर देणें प्राप्त आहे.

May animosity ever decline. But it is necessary that reminiscences should remain, that so many woes and sufferings be never lost for the experience of men. It is necessary that the first and most sacred of our liberties, religious freedom go to strengthen and revive at the sight of horrible sights left by fanaticism. Let the stones speak in default of men.

दिवसेंदिवस द्वेष आणि मत्सर यांचा ऱ्हास होवो. पण इतिहासाची स्मृति चिरंतन होऊ दे. आजपर्यंत विधर्मी लोकांच्या धर्मच्छळाला बळी गेलेल्या हिंदूंचें 'व्यर्थ न हो बलिदान' एवढीच आमची इच्छा आणि प्रार्थना आहे. सर्व स्वातंत्र्यामध्ये श्रेष्ठ जें धर्मस्वातंत्र्य, त्या धर्मस्वातंत्र्याच्या भावनेला, धर्मच्छळाचा पुरस्कार करणाऱ्यांनी आपल्या देशात जे अतिभीषण अत्याचार करून आर्यसंस्कृतीचा संपूर्ण उच्छेद करण्याकरिता केलेल्या विध्वंसांच्या अवशेषांकडे पाहून तरी सामर्थ्य आणि संजीवन लाभो. आम्हां हिंदुत्वनिष्ठांना बोलावयाची बंदी असली तरी या अवशेषांची वाचा जिवंत हिंदुहृदयात प्रतिध्वनित झाल्यावाचून राहणार नाही.

कौलीन आणि राज्यक्रांति

राज्यक्रांति घडवून आणण्याला योग्य मुहूर्त म्हणजे राज्यकर्ता वर्ग जेव्हा उधळा, विलासी आणि त्यामुळेच लाचखाऊ बनतो, अथवा तो अत्याचारी, परपीडनप्रिय आणि फाशीच्या मांगासारखा निष्ठुर

बनतो, तो होय. टिळकांनी राज्यकर्त्या वर्गाचे हे दोनही नमुने क्राफर्ड आणि रॅण्ड यांच्या रूपाने पाहिले होते. असले सडलेले राज्यकर्ते कौलीन (scandal) करण्यात, कौलीन बोलण्यात आणि आपल्या संपर्कात येणाऱ्यांचें चारित्र्य भ्रष्ट करून त्यांना कौलीनाची दीक्षा देण्यात आनंद मानीत असतात. जेव्हा असल्या राज्यकर्त्या वर्गाचें कौलीन समाजाच्या सर्व स्तरांतून चर्चिलें जातें, तेव्हा तो राज्यकर्ता वर्ग अधिकारभ्रष्ट होण्याला पूर्णपणे पात्र होतो, याविषयी शंका नाही. अशा राज्यकर्त्यांचें उच्चाटन करू पाहणाऱ्यांना त्यांच्या अनैतिक आणि अमानुष आचरणाविरुद्ध प्रतिक्रिया घडवून आणण्याकरिता स्वाभाविकच नीतिमत्तेचे आणि धर्माचे पुरस्कर्ते बनावें लागतें. नीतिधर्मांच्या पुरस्काराने समाजात असल्या राज्यकर्त्या वर्गाविषयी जेव्हा घृणा उत्पन्न होते, तेव्हा त्या वर्गाच्या कौलीनाविषयी उत्पन्न झालेल्या घृणेने, तो आपोआपच मृतप्राय होतो. अशा प्रकारे हा वर्ग मृतप्राय झाल्यानंतर मग एखाद्या क्राफर्डची धिंड निघून तो देशांतरी गेला काय, अथवा एखादा रँड गोळ्या खाऊन लोकांतरी गेला काय, या दोन घटनांत दीर्घकालीन परिणामाच्या दृष्टीने फारसा भेद नाहीच. असल्या अधिकाऱ्यांचें जे भारतीय हस्तक असत, त्यांच्याविषयी टिळकांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांवरील निबंधात लिहिलें आहे. 'हे अधिकारी बहुतेक चुटपुटत्या ज्ञानाचेच अधिकारी होते, इंग्रजी राज्यात या मंडळीस नवीन मिळालेल्या अधिकाराने हें उद्दाम बनलेले होते. यांच्या अद्वातद्वा आचारविचारांचा विशेषेकरून पुढारी कुटुंबांच्या गृहस्थितीवर फारच वाईट परिणाम झालेला होता. ज्या देशातील पुढारी कुटुंबांची गृहव्यवस्था बिघडलेली असते, त्यांत चांगले पुरुष निपजणें कठीण आहे.'

राज्यकर्त्या वर्गाच्या प्रतिष्ठेवर पदाघात

या राज्यकर्त्या वर्गाच्या प्रतिष्ठेवर पदाघात करून समाजात त्याची पराकाष्ठेची अप्रतिष्ठा करण्याचें अतिशय प्रभावी साधन म्हणून गणेशोत्सवाच्या चालकांनी मेळ्यांच्या पदांचा प्रयोग केला आणि तो कल्पनेपलीकडे यशस्वी झाला. अँड्र्यू फ्लेचर नांवाच्या एका स्कॉट लेखकाने दोन शतकांपूर्वीच उद्‌गार काढले होते :

If a man would be allowed to make all the ballads, he need not care who should make the laws of the nation.

म्हणजे समाजाच्या हृदयांत ठसतील अशीं पदें आणि पोवाडे करण्याचें स्वातंत्र्य मला मिळालें तर देशाचे विधिनिर्बंध करण्याचें काम

कोणाच्या हाती आहे, याची मी क्षिति करणार नाही. या सुभाषितात एवढाच दोष आहे की ज्यांच्या हाती विधिनिर्बंध करण्याचा अधिकार असतो, ते लोक प्रत्येक पदाघात म्हणजे लत्ताप्रहार मानून पदकाराचें स्वातंत्र्यच हिरावून घेतात. महाराष्ट्रातील सडलेला राज्यकर्तावर्ग संपूर्ण गणेशोत्सवाचाच द्वेष्टा असला तरी त्यातल्या त्यात, त्या वर्गाचा मेळ्यातील पदांवर विशेष कटाक्ष होता. त्या पक्षाच्या लेखनातून कुठेही गणेशोत्सवाचा उल्लेख आला, म्हणजे त्या ठिकाणी मेळ्यातील पदांची निंदा हटकून केलेली आढळते. या राज्यकर्त्या वर्गाचे शिरोमणि गोपाळकृष्ण गोखले यांनी पुण्यातील एक सुप्रसिद्ध विधिज्ञ नीलकंठ वामन भिडे यांच्यावर मानहानीचा अभियोग भरून टिळकांच्या शिक्षेला आपण कारणीभूत झालो, असा आरोप करण्याच्या अपराधाकरिता त्यांना शासन करविलें. टिळकांच्या शिक्षेला गोखले कारणीभूत झाले होते, इतकेंच नव्हें तर लॉर्ड मिंटोंना त्यांनी 'केसरी' मुद्रणालयही सरकारजमा करण्याची चिथावणी दिली होती, असें लॉर्ड मिंटोंच्या वतीने मुंबईसरकारकडे गेलेल्या पत्रावरून कळून येतें. १९०८ मध्ये टिळकांना सहा वर्षें काळेपाण्याची शिक्षा सांगितल्यानंतरही लॉर्ड मिंटो यांच्या हृदयात गोखल्यांनी चेतविलेला क्रोधवह्नि शमला नव्हता. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर त्यांच्या प्रकरणावर आपला अभिप्राय व्यक्त करताना लॉर्ड मिंटो यांनी म्हटलें आहे :

The present is not the time to give a well known agitator like Tilak the benefit of any leniency, and I certainly think we should call the serious attention of the Bombay Government to the possibility of proceeding against his press in respect of the artical in the Kesari of the 9th June. The secretary of the department concerned conveying the Viceroy's wish to the Bombay Government said " I venture to think that we should deal Tilak as shrewd a blow as we can. He is by far the ablest and most dangerous of the rebel party in the country and his complete overthrow will stagger that party and show to all waverers the strength of the Government. It is not enough to imprison him when we can suppress his newspaper. The Kesari has a circulation of 20,000 which is an enormous circulation for India. This is no time for rosewater administration and I am confident that the great mass of moderate men will be glad to see Tilak completely overthrown. He ruined the national Congress at Surat and his methods have given great offence to the moderate party.

(– *How India Struggled for freedom* – *pp 190*)

टिळकांच्यासारख्या चळवळ्यांना दया दाखविण्याचे हे दिवस नव्हेत. तेव्हा ९–६–१९०८ च्या अंकांतील (हे उपाय टिकाऊ नाहीत, या खाडिलकरांच्या) लेखाच्या निमित्ताने केसरी मुद्रणालय सरकार-जमा करण्याची शक्यता आहे कीं नाही, याचा शोध घ्यावयाला मुंबई सरकारला कळविलें पाहिजे, असा अभिप्राय लॉर्ड मिंटो यांनी टिळक-प्रकरणावर लिहून ठेवल्यानंतर त्या विशिष्ट विभागाच्या प्रमुखाने मुंबई सरकारला लॉर्ड मिंटो यांची अनुमति घेऊन लिहिलें की टिळकांचा पुरता काटा काढला म्हणजे (तुमच्या प्रांतातील) मवाळांना परम संतोष होईल. यासाठी केसरी मुद्रणालय सरकारजमा करण्याचा काही मार्ग निघत असला तर पहा. स्वतः लॉर्ड मिंटो आणि त्यांचे वैयक्तिक कार्य-वाह डनलॉप स्मिथ यांच्याकडे मुंबई प्रांतातील 'राजमान्य सव्हॅंटराज हा नामदार गोपाळ' तेवढाच खेटे घालीत असे. तेव्हा वरील पत्राची प्रेरक शक्ति कोणती, हें इतिहासाच्या अभ्यासकांना सांगावयाला नकोच. मग याचे 'गाल निजबंधुजनाच्या रक्तें बनले लाल' असें दादा भिडयांनी लिहिलें तर त्यात काय अन्याय होतो? राजमान्य सव्हॅंटराजांना गणेशो-त्सवातून त्यांच्याविरुद्ध होणारा प्रचार असह्य झाला असेल आणि तो थांबविण्यासाठी त्यांनी सरकारी यंत्रणेचें साहाय्यही घेतलें असेल. पण तो प्रचार लोकशाहीच्या परंपरांना सोडून नव्हता, एवढेंच मला इथे सांगावयाचें आहे. सर आयव्हर जेनिंग्ज यांनी 'पार्टी पॉलिटिक्स' या ग्रंथात जोसेफ चेंबरलेन यांच्या राजकारणाचें असेंच वर्णन केलें आहे :

He had a message to deliver, much of which seemed then and even seemed now, to be sound. It assumed, however, that the other side consisted of fools and knaves, if not devils. The foundation of the machine in the vast public meeting and the use of invectives against opponents enabled enthusiasm to be kindled and maintained.

त्यांना जनतेला एक संदेश द्यावयाचा होता आणि तो शहाण-पणाचा होता. मग त्याला विरोध करणारे मूर्ख, पाजी, सैतान असले पाहिजेत, हें ओघानेच येतें. पक्षाचें यंत्र विराट सभांतून अस्तित्वात आणणें आणि प्रतिपक्षाविरुद्ध तीव्र भाषेचा प्रयोग करणें, या उपायांनी उत्साह उत्पन्न करता येतो आणि टिकविला जातो. सर आयव्हर जेनिंग्ज यांनी वर्णिलेल्या जोसेफ चेंबरलेन यांच्या प्रचारपद्धतीपेक्षा टिळकांची प्रचारपद्धति भिन्न नसून पुढें असहकारितेच्या आंदोलनात गांधींनीही तीच पद्धति वापरली.

✦ ✦ ✦

प्रकरण आठवें

शिवाजी उत्सव

राजकीय उत्सवाची आवश्यकता

१८९५ मध्ये टिळकांनी शिवाजीस्मारकानिमित्त जें आंदोलन आरंभिलें तसल्या आंदोलनाची त्या काळी आपल्या समाजात किती तीव्र आवश्यकता होती, याची वर्तमानकालीन वाचकांना काहीच कल्पना नाही. इतिहासात तत्कालीन भावनांचें साधार चित्रण करावें लागतें आणि तसें चित्रण करावयाचें म्हणजे सारा भर अवतरणांवर द्यावा लागतो. स्वतः टिळकांचें मत अवतरणें घेण्याला फार प्रतिकूल होतें. ते म्हणत की उतारा चांगला असला तरी लेखाला खातो आणि वाईट असला तरी लेखाला खातो. हा अभिप्राय खरा असला तरी लेखनसौंदर्याकडे दुर्लक्ष करून हें टिळकचरित्र शक्य तितकें साधार करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तेव्हा टिळकांच्या काळी पाश्चात्य राष्ट्रांतून भारतीय समाजासंबंधी जे दुर्ग्रह दृढमूल झाले होते, त्यांचें निर्मूलन करण्याकरिता शिवाजी उत्सवासारख्या राजकीय उत्सवाची किती तीव्र आवश्यकता होती, हें दाखवून देण्यासाठी (११–७–१९०७) 'वंदे-मातरम्' या दैनिकातील अरविंद बाबूंच्या लेखातला एक उतारा उतरून घेत आहे.

The European remains today as he was in the time of Aristotle, 'a political animal.' His nature has retained throughout history its ingrained and inalienable political bent; polity has played the greatest part in the moulding of his life and destiny; the ideas that have irresistibly moved him to heroic strivings, passionate hopes or death-defying sufferings have been mainly those of independence, freedom and liberty. The greatest names in his history are those of political heroes or governors; the one call that has ever sung truely in his ears and commanded his unquestioning obedience is the call to the service of his country, the courting of death for the fulfilment or the upholding of the above ideas has been as natural to him as breathing. The history of his country is the history of increasing consumation of those ideas in which faith and intellect has filled a subsidiary place.

Such is the European by constitution. To him India is an insoluble riddle. How a country of three hundred million can consent to be governed by a handful of foreigners, he simply cannot understand. He thinks of the Indian as the member of a subhuman race, outside the pale of his privileges, his code of morality, his civilization. And that newfangled specimen of the Indian race, the educated Indian only intensifies his contempt. That a man who has been nurtured in the literature of England and has read the history of Europe can still have failed to be touched by the European ideal, to be visited by an insatiable longing for liberty, freedom and can continue on the other hand in a life of contented acquiscence in foreign rule and feel happy and proud merely to serve under it and ensure its continuation, strikes the native of Europe as a most monstrous mockery, as some unimaginable and unaccountable perversity of human nature.

इतर पाश्चात्य समाजांप्रमाणेच इंग्रजांचा समाजही राजकारणाला वाहिलेला समाज आहे. पारलौकिक मुक्ति हें जर हिंदुसमाजाचें ध्येय असलें तर इहलोकातील मुक्ति म्हणजे स्वातंत्र्य हें सर्व पाश्चात्यां-प्रमाणेच इंग्रजांचें ध्येय आहे. या राजकीय स्वातंत्र्याच्या प्रेरणेनेच त्यांचें जीवन घडविलें जातें आणि दैव ठरविलें जातें. या स्वातंत्र्या-साठीच त्यांनी शौर्यवीर्यपराक्रमादि गुण प्रकट केले आहेत. स्वातंत्र्याच्या आशेच्या शृंखलेने बद्ध होऊन त्यांनी सर्व प्रकारच्या अमानुष अत्या-चारांना निर्भयपणे तोंड दिलें आहे. स्वातंत्र्यप्राप्ति करून देणारे, अथवा त्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थं प्राणार्पण करणारे, किंवा संकटप्रसंगी स्वातंत्र्याचें संरक्षण करणारे वीर हेच पाश्चात्यांचे अवतारी पुरुष. स्वदेशाप्रीत्यर्थ प्राणार्पण करणें हें त्यांना श्वासोच्छ्वास करण्याइतकें स्वाभाविक वाटतें. अशा पाश्चात्यांना आणि त्यांतही इंग्रजांना तीस कोटींचा हिंदुस्थान मूठभर परक्या लोकांच्या टांचेखाली चिरडला जात असताना बंड न करिता उलट राजनिष्ठेच्या गोष्टी कसा करतो, हें कोडेंच उलगडत नव्हतें. त्यांतूनही इंग्रजीशिक्षित राजनिष्ठांविषयीं त्यांना पराकाष्ठेचा तिरस्कार वाटत असे. इंग्रजी वाङ्मयाचा आणि युरोपच्या इतिहासाचा अभ्यास करून स्वातंत्र्याच्या भावनेचा ओलावा उत्पन्न न होता कोरडा पाषाण राहिलेला, उलट दास्याचे पोवाडे गाणारा हा प्राणी मानवी कोटीतील आहे, ही गोष्टच त्यांना पटत नव्हती. कोणत्या तरी शारीरिक नसल्यास मानसिक विकृतीमुळे बृहन्नडा बनलेले हें प्राणी पाहून काही जणांना त्यांची कींव येत असे तर इतरांना त्यांचा संसर्गसुद्धा नकोसा

वाटत असे. यामुळेच पाश्चात्यांच्या गोष्ठीतून प्रवेश करण्याची ते या प्राण्यांना बंदी करीत. गोखले महाशयांनी इंग्लंडांत एकदा भारतीयांच्या हाल-अपेष्टांसंबंधी आणि गाऱ्हाण्यांसंबंधी विलापपूर्ण व्याख्यान दिल्यानंतर एका कामगाराने उठून त्यांना विचारलें, 'तुम्ही केलेलें वर्णन हें सारें खरें आहे का ?' त्यांनी 'होय' असें उत्तर दिल्यानंतर त्याने उद्गार काढले, 'इतका छळ होत असताना जे लोक बंड करीत नाहीत आणि आमच्यापुढें विलाप करावयाला तुमच्यासारखे प्रतिनिधि पाठवितात, ते लोक एकतंत्री सत्तेच्या लाथा खावयालाच पात्र आहेत.' भारताविषयी असले दुग्रह ज्यांच्या मनात दृढमूल झाले होते त्यांना, स्वराज्याच्या प्राप्तीप्रीत्यर्थ भारताने क्रांतीच्या मार्गाने वाटचाल आरंभिली असल्याची प्रकट सूचना देण्याकरिता शिवाजीसारख्या स्वातंत्र्यवीराच्या उत्सवाची किती आवश्यकता होती, हें वरील विवेचनावरून कळून येईल.

खरी आणि खोटी देशभक्ति

खोटीं नाणीं खऱ्या नाण्यांना व्यवहारातून हाकून देतात, असा अर्थशास्त्राचा एक सर्वसामान्य सिद्धान्त आहे. या सिद्धान्ताला अनुसरून १८५७ पासूनच भारतातील नव सुशिक्षितांच्या हृदयांतून खोटचा देशभक्तीने खऱ्या देशभक्तीला सीमापार केलें होतें. या निर्वासित देशभक्तीला पुनश्च एकवार जनतेच्या हृदयसिंहासनावर बसवून आपण स्वतःच निर्वासनाची शिक्षा भोगण्याचें श्रेय वासुदेव बळवंतांनी प्रथम संपादिलें. त्यांच्या मागून त्यांचे अनुयायी या नात्याने टिळकांनीही तोच पंथ स्वीकारला. टिळकांच्या कार्याचें महत्त्व सांगताना इंदुलाल याज्ञिकांनी श्यामजी कृष्णवर्मा यांच्या चरित्रात लिहिलें आहे :

Hailing from a race and province that was the last to surrender its liberty to the alien power, and proud of the mighty deeds and heroic exploits of his ancestors, Tilak manfully refused to identify national patriotism with loyalty to Government. He made bold to rescue genuine nationalism from the ignoble variety that had been made current in and out of the Congress by government and its agents.

इंग्रजांना (जवळजवळ) सर्वांत शेवटी शरण गेलेल्या महाराष्ट्रात जन्मल्यामुळे आणि आपल्या पूर्वजांच्या महद्यशाचा आणि महान् पराक्रमाचा अभिमान मनात वसत असल्यामुळे टिळकांनी, स्वदेशाभिमान म्हणजेच परक्या राज्यकर्त्यांविषयी राजनिष्ठा हें रानडेपक्षाचें समीकरण मान्य करण्याचें नाकारलें. देशाभिमानाचें जें खोटें सोंग इंग्रजांनी आणि

त्यांच्या हस्तकांनी राजकारणाच्या रंगभूमीवर रूढ केलें होतें, त्याला तेथून हाकून देऊन खऱ्या देशाभिमानाचें त्यांनी जनतेला दर्शन घडविलें. चिपळूणकर, टिळकप्रभृतींची देशभक्ति स्वधर्म आणि स्वदेश यांच्या उज्ज्वल अभिमानावर आधारलेली असल्याने ती खरोखरीची स्वदेशी देशभक्ति होती. राष्ट्रीय पक्ष आणि रानडे पक्ष यांच्या विचारसरणीत असलेला मूलभूत विरोध १८५७ मधील क्रांतिसंग्रामाविषयीच्या उभय पक्षांच्या परस्परविरोधी विचारसरणीतून सुव्यक्त झाला आहे. चिपळूणकर आणि टिळक हे त्या क्रांतियुद्धाचें समर्थन करीत असत, इतकेंच नव्हे तर त्या क्रांतियुद्धातील नेत्यांची मानसपूजा करीत असत. १८७४ मध्ये नानासाहेब पेशव्यांना अटक झाल्याची वार्ता कानी येताच चिपळूणकरांनी आधीपासून ठरविलेला कोजागिरीचा कार्यक्रम रहित केला, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. क्रांतियुद्धातील नेत्यांचा उघडपणे उत्सव करणें अशक्य असल्यामुळेच टिळकांनी मुसलमानांविरुद्ध बंड करणाऱ्या शिवाजी महाराजांचा उत्सव आरंभिला. त्यांच्या उलट रानडे पक्षाचे पुढारी त्या क्रांतियुद्धातील इंग्रज सेनानी नील, निकलसनप्रभृतींची मानसपूजा करीत नसले तरी त्या क्रांतियुद्धाचा विषय निघाला की त्यांना कांपरें भरत असे, आणि त्या कंपवायूच्या भरात ते त्या युद्धातील नेत्यांची निर्गल निंदा करीत असत. झांशीच्या राणीवरील सुप्रसिद्ध लेखात टिळकांनी म्हटलें आहे, "पण आमच्यातील शहाणपणाचा आणि निष्पक्षपातीपणाचा टेंभा मिरविणाऱ्या श्वानवृत्ति ग्रंथकारांनी इंग्रज ग्रंथकारांवर सर्वस्वी भिस्त ठेवून स्वज्ञातीयांसच चोर, दरवडेखोरांपेक्षाही दुष्ट ठरविण्याचा प्रयत्न करावा, यापेक्षा गर्हणीय आणि हानिकारक गोष्ट ती कोणती?" टिळकांनी वरील वाक्यात समकालीन रानडेपक्षीयांप्रमाणेच सत्तावन्नमधील क्रांतियुद्धाला केवळ 'शिपाई गर्दी' हें नांव देऊन त्याची निंदा करणारे रानडे-गोखल्यांचे भावी चरित्रकार न. र. फाटक यांचेंही यथातथ्य वर्णन करून ठेविलें आहे, हें पाहून त्यांच्या द्रष्टेपणाचा वाचकांना विस्मय वाटल्यावाचून राहणार नाही. १८५७ चें क्रांतियुद्ध आणि त्या युद्धाचे नेते यांच्याविषयीची पूज्यबुद्धि, टिळकांचे वृत्तपत्रव्यवसायातील गुरु 'अमृतबाजारपत्रिके'चे संपादक शिशिरकुमार घोष यांनी १८६८ मध्ये पत्रिका चालू झाल्यापासून क्रमाक्रमाने आणि प्रसंगानुरोधाने व्यक्त करण्याला प्रारंभ केला होता. याचा अर्थ असा की १८५७ ची उठावणी हीच महाराष्ट्र, बंगाल, पंजाब प्रांतातील राष्ट्रीय पक्षाची स्फूर्तिदेवता होती. पण तिची उघडपणें उपासना करणें अशक्य असल्याने शिवाजी उत्सवाची चळवळ टिळकांनी हाती घेतली.

भौगोलिक देशाभिमान विरुद्ध राष्ट्रवाद्यांचा राष्ट्राभिमान

रानडेपंथाचा देशाभिमान आणि टिळकप्रभृति राष्ट्रवाद्यांचा राष्ट्राभिमान यांत महदंतर होतें. उदाहरणार्थ, स्वदेशात परराज्य असताना त्यावर परक्यांची स्वारी झाली तर तिचा प्रतिकार करणें हें देशाभिमानाचें कृत्य होऊ शकेल, पण तें राष्ट्रवाद्यांच्या राष्ट्रवादाला रुचणार नाही. कारण स्वातंत्र्याचें वेड आणि आपल्याला पारतंत्र्यांत ठेवणाऱ्यांचा तीव्र द्वेष हीं राष्ट्रवादातलीं मूलतत्त्वें आणि गृहीत कृत्येंच आहेत. जे लोक रानडेपंथी देशाभिमानी असतात आणि राष्ट्रवादी नसतात, त्यांचा देशाभिमान भौगोलिक देशाभिमान असतो. भौगोलिक देशाभिमान्यांचा सारा भर आर्थिक प्रश्नांवर असून त्यांना सांस्कृतिक प्रश्नांचें वावडें असतें. विशेषतः त्यांना स्वकीय संस्कृतीचें सोएर सुतक नसतें. राज्यकर्त्यांचें अनुकरण करणें हीच यांची संस्कृति. या भौगोलिक देशाभिमान्यांना स्वराज्यापेक्षा परराज्याचाच अधिक अभिमान असतो. कारण त्यांना वाटतें कीं परके लोक निष्पक्षपातीपणाने राज्य करीत असल्याने देशाची उन्नति होते. या काल्पनिक उन्नतीकरिता देशाला जी वार्षिक खंडणी द्यावी लागते, ती सुद्धा रानडेपंथाला न्याय्य आणि नैसर्गिकच वाटते. पण या देशाच्या उन्नतीत जी मानवांची आणि राष्ट्राचीही अवनति अंतर्भूत असते, तिची यांना ना खंत ना खेद. एकाच काळी देशाची उन्नति आणि मानवांची अवनति इंग्रजी राज्यात कशी होत होती, याचें एक उदाहरण येथे दिलें पाहिजे. रानड्यांच्या काळीं देशात वारंवार दुष्काळ पडून कोटयवधि लोकांचे प्राण जात असतानाही भारतातून धान्याची निर्यात नेहमीप्रमाणे चालू असे आणि भारतात सोन्याची आयातही चालू असे. देशात सोनें येणें इष्ट असलें तरी तें कोटयवधि प्राणांच्या विनिमयात येणें वाईट. राष्ट्रवाद्यांच्या दृष्टीने ही सारी चिकित्सा अनाठायी आहे. कारण राष्ट्रवादाचें आद्य तत्त्वच हें आहे की परराज्याचें अस्तित्व हाच मुळी त्या राष्ट्रातील मानवांचा असह्य अपमान. पण असला अपमान न जाणवणारे काही थोर लोक प्रत्येक परतंत्र राष्ट्रात असतात. ते ज्या देशात जन्मले असतात, त्यांचे ते खरे नागरिक नसून आपल्या हृदयाने ते जेत्यांच्याच देशाचे नागरिक असतात. असल्या थोर लोकांना राष्ट्रवादावर अगदी आधुनिक ग्रंथ लिहिणाऱ्या आचार्य के. आर. मिनोगुए यांनी माननीय विदेशी (Honorary Foreigners) अशी संज्ञा दिली आहे. 'Hence there is a special nationalist category of traitors or Honorary Foreigners' म्हणजे वंशाने स्वदेशबांधवांपासून अभिन्न असून वाचेने आणि मनाने परकीय बनलेल्या देश-

द्रोह्यांना राष्ट्रवादी पंथात 'माननीय विदेशी' अशी संज्ञा दिली जाते. असल्या माननीय विदेशी जनांची संख्या टिळककाळापासून वर्तमानकाळापर्यंत मोठ्या प्रमाणावर वाढली असल्याने आपल्या देशातील राज्ययंत्रच मुळी असल्या माननीय विदेशी जनांच्या हाती गेलें आहे आणि आपल्या राज्यकर्त्यांच्या भावी पिढीचें शिक्षण आपल्या संस्कृतीचे कट्टे शत्रु जे विदेशी धर्मप्रचारक, त्यांच्याच शाळांतून होत असल्याने या माननीय विदेशी जनांचें राज्य निदान चालू शतक संपेपर्यंत संपणार नाही, अशी आशंका निर्माण झाली आहे.

विवेकानंदांचें टीकास्त्र

असल्या 'माननीय विदेशी' जनांवर गेल्या शतकात विवेकानंदांनी अतिशय प्रखर टीका केली होती.

When I see Indians dressed in European apparel and costumes, the thought comes to my mind, perhaps they feel ashamed to own their nationality and kinship with the ignorant, poor and down-trodden people of India. Oh India, with this mere echoing of others, with this base imitation of others, with this dependence on others, this slavish weakness, will you attain by means of your disgraceful cowardice the freedom deserved only by the brave and heroic? You, the brave one, be bold, take courage, be proud that you are an Indian and proudly proclaim, "I am an Indian, every Indian is my brother."

म्हणजे पाश्चात्यवेषधारी भारतीयांना पाहिलें की मला वाटतें, अज्ञानी, दरिद्री, दलित अशा भारतीयांशी आपलें काहीही सोएरसुतक नाही, हें दाखविण्याकरिताच हे स्वराष्ट्राची लाज वाटणारे लोक परक्यांचा वेष अंगावर चढवीत आहेत. अशा प्रकारे परक्यांचा प्रतिध्वनि बनून, परक्यांची निंद्य नक्कल करून, परावलंबी बनून आपल्या तिरस्करणीय भेकडपणाने, केवळ शूर वीरांनाच लाभणारी स्वातंत्र्यलक्ष्मी कधी मिळणार आहे का? शूर व्हा, धैर्यधर व्हा, आपल्या भारतीयत्वाचा अभिमान बाळगा आणि अभिमानाने घोषणा करा की मी भारतीय आहे आणि प्रत्येक भारतीय माझा बांधव आहे. याच्या उलट 'माननीय विदेशी' बनलेल्या सुरेंद्रनाथांनी युरोपियनांच्या एका सभेत सांगितलें :

We have everything to lose and nothing to gain by the severance of our connection with England. We owe whatever position or prestige we have acquired to our English

education and culture. If you were to leave the country, our English education and culture would be at a discount. We are not particularly anxious to commit political suicide.

या भाषणात सुरेंद्रनाथांनी अगदी मार्क्सवाद्यांचें अनुकरण करून इंग्रजांना सांगितलें की, तुमच्या निर्गमनाने आमचा काहीही लाभ होणार नसून सर्वनाश मात्र होणार आहे. आम्हांला समाजात जी काही प्रतिष्ठा लाभली आहे, ती इंग्रजी शिक्षणामुळे आणि इंग्रजी संस्कृतीमुळे; तुम्ही उद्या येथून गेलात तर आज जो आमचा गुण दिसतो, तोच उद्या दोष ठरेल, यासाठी आम्ही तुम्हांला घालवून राजकीय आत्महत्या करण्याला उत्सुक नाही.

भिन्न धर्मांतील अनिर्बंध व्यापार आणि संरक्षण

रानडे-टिळकांच्या काळी हिंदुस्थानाच्या अर्थकारणाला सरकारने जें अनिर्बंध व्यापाराचें तत्त्व लागू केलें होतें, तेंच अनिर्बंध व्यापाराचें तत्त्व त्यांनी भारतीय धर्मकारणालाही लागू केलें होतें. विदेशी धर्मप्रचारकांनी त्यांच्या देशांतून अमाप द्रव्य घेऊन यावें आणि दुष्काळाची संधि साधून सहा, सहा आण्याला 'आत्मे' विकत घेऊन आपल्या कळपाची भरती करावी, असा हा हिंदु आत्म्यांचा अनिर्बंध व्यापार चालू होता. या अनिर्बंध व्यापाराच्या स्पर्धेत टिकण्यासाठी हिंदु समाजाने आपले निधि निर्माण करून आपले प्रचारक उभे करून आपला धर्म वाचविला पाहिजे, असा उपदेश सुधारक लोक त्या दिवसांत करीत असत. हा उपदेश ठीकच आहे. पण तेवढ्यावरच भरंवसा टाकून राहणें म्हणजे या धार्मिक अनिर्बंध व्यापाराला आपण मान्यता देण्यासारखें आहे. पण ही सपशेल चूक आहे. आपल्या उद्योगधंद्यांना जें संरक्षणाचें तत्त्व लावून आपण आपला आर्थिक उत्कर्ष करून घेतला आहे, तेंच संरक्षणाचें तत्त्व उद्योगधंद्यांहून अनंत पटीने अधिक महत्त्वाच्या धर्मकारणाला लावणें आवश्यक आहे. ही चूक राज्यकर्त्यांनी प्रस्तुत काळीही सुधारलेली नाही, हें आपण पाहताच आहो. कारण सुधारकांच्या भ्रांत विचारसरणीचा टिळककाळापेक्षा प्रस्तुत काळी राज्यकर्त्यांवर अधिकच प्रभाव झाला आहे. म्हणून त्या काळी टिळकांनी धार्मिक पुनरुज्जीवनाकरिता गणेशोत्सवाचा उपक्रम केल्यानंतर लगेच 'धर्म रक्षी ऐसा राजा' जो शिवाजी, त्याचा उत्सव आरंभिला.

शिवाजी उत्सवाची अपूर्वाई

टिळकांनी गणेशोत्सवाचा पुरस्कार करताना पुढारीपणाला उचित अशी बुद्धिमत्ता आणि दूरदर्शिता व्यक्त केली असली तरी एका अर्थी

त्या उत्सवाच्या मूळ कल्पनेत नावीन्याचा अथवा मीमांसकांच्या अपूर्वतेचा भाग फारसा नव्हता. कारण असले धार्मिक उत्सव आपल्या देशात अयुत वर्षांपासून चालू असून पुढेही अयुत वर्षे ते तसेच चालू राहतील. पण शिवाजी उत्सवाची स्थिति तशी नाही. शिवाजी उत्सव हा निधर्मी उत्सव असल्याने राष्ट्रीय दृष्टचा या उत्सवाची आवश्यकता किती आहे, हें ओळखून मगच त्याचें प्रवर्तन टिळकांनी केलें असलें पाहिजे, हें उघड आहे. या धर्मप्रधान भारतात शिवाजीउत्सवासारख्या निधर्मी उत्सवाचा प्रचार प्रथम टिळकांनीच केला, हें त्यांचें अद्वितीय कर्तृत्व कधीही विसरण्याजोगें नाही. त्या काळी राष्ट्रीय उत्सवांचीही आपल्या देशातील नेत्यांना कल्पना नव्हती, त्याप्रमाणेच राष्ट्रीयत्व या कल्पनेचे घटक काय असतात, याचीही त्यांना कल्पना नव्हती. एखाद्या देशाला राष्ट्रीयत्वाचा लाभ करून द्यावयाचा असल्यास, अथवा एखाद्या देशाचें राष्ट्र बनवावयाचें असल्यास, त्या देशाला काही निश्चित भौगोलिक सीमा असाव्या लागतात, त्या सीमांच्यामधील भौगोलिक क्षेत्रात एके काळी एक आदर्श राज्य, त्या आदर्शाला आधारभूत असलेला धर्म आणि त्या धर्माच्या आधाराने विकसित झालेली संस्कृति या सर्वांचें अस्तित्व असावें लागतें. पुढे कालगतीने त्या राज्यावर सीमेपलीकडील भिन्नवंशी, भिन्नधर्मी लोकांचें आक्रमण होऊन तेथील प्रजा परतंत्र झाली, तिचे घराबाहेर संचार करण्याचे राजकीय अधिकार नष्ट झाले आणि घरातील स्वधर्माचरणावरही बंधनें पडू लागलीं; म्हणजे त्या प्रजेत स्वधर्माच्या नेत्यांचें संरक्षण करण्याकरिता, त्यांच्यावर हात टाकणाऱ्या पाप्यांचा संहार करण्याकरिता आणि स्वधर्माची पुनश्च प्राणप्रतिष्ठा करण्याकरिता जें प्रतिक्रियात्मक तेज एखाद्या स्वातंत्र्यवीराच्या रूपाने निर्माण होत असतें, तो स्वातंत्र्यवीरच 'धर्मसंस्थापनेचे नर ते ते ईश्वरी अवतार' या समर्थांच्या वचनाप्रमाणे त्या देशाला पुनर्जन्म प्राप्त करून देणारा अवतारी पुरुष बनतो. अशा अवतारी पुरुषांच्या उत्सवानेच राष्ट्रीयत्व प्राप्त करून घेण्याला आवश्यक असलेले इतर सर्व घटक आपल्याला पूर्वीच प्राप्त झाले आहेत, याची पारतंत्र्यात पिचत असलेल्या त्या प्रजेला जाणीव होते. आणि मग शेळी, शेळी म्हणून वाढविलेल्या त्या प्रजेला आपण शेळीच्या जातीतील नसून सिंहिणीच्या जातीतील असल्याची प्रतीति होते. शिवाजीसारख्या स्वातंत्र्यवीरांच्या उत्सवाची हीं तात्त्विक भूमिका ध्यानात आणली म्हणजे टिळकांनी अखिल भारताला उद्देशूनच या उत्सवाचें प्रवर्तन केलें होतें, ही गोष्ट कळून येते. हिंदुकूश पर्वतापासून दक्षिणेला हिंदु महासागरापर्यंत बऱ्याच अंशीं निश्चित सीमा असलेलें जें

भौगोलिक क्षेत्र आहे, त्या क्षेत्राचें नांव हिंदुस्थान, त्याचा धर्म हिंदु, त्याची संस्कृतिही हिंदु. आर्यचाणक्यांनी सांगितल्याप्रमाणे हें चक्रवर्तिक्षेत्र आहे. या चक्रवर्तिक्षेत्रात पृथ्वीराज चौहानाचा वध करणाऱ्या महमद घोरीने मुसलमानी राज्य स्थापिलें. या राज्याच्या विस्ताराची परमावधि एकदा अल्लाउद्दीन खिलजीच्या काळी झाली. त्यानंतर लौकरच विद्यारण्यस्वामी आणि त्यांचे वीर हुक्क आणि बुक्क यांनी कर्नाटकापासून दक्षिणेचा प्रदेश यवनांच्या हातून सोडविला. पण त्यानंतर सरासरी सव्वादोनशे वर्षांनी तालिकोटच्या लढाईत विजयानगरचा सपशेल पराभव होऊन तेंही हिंदु राज्य नष्ट झालें. त्यानंतर शंभर वर्षांनी यवनांच्या साम्राज्याचा परमोत्कर्ष झाला असताना शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना करून यवनांच्या आक्रमणाची लाट पुरती परतविली. यावरून ही गोष्ट उघड होईल की, शिवाजीमहाराज हें महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्याचे वीर नसून भूषण कवीने म्हटल्याप्रमाणे अखिल भारताचे स्वातंत्र्यवीर होते. टिळकांनी अखिल भारतीय स्वातंत्र्यवीराचा उत्सव म्हणून ज्या शिवाजी उत्सवाचें प्रवर्तन केलें, तो शिवाजीउत्सव आज जातिनिष्ठ मराठ्यांनी जवळ जवळ आपल्या जातीपुरता आणि महाराष्ट्रापुरता मर्यादित करून टाकला असला तरी शिवाजी महाराज स्वतःला मराठा म्हणवीत नव्हते. आणि शहाजीमहाराजांनी तर आपण रजपूत असल्याचा साभिमान उल्लेख विजापूरच्या बादशहाला लिहिलेल्या पत्रात केल्याचें साऱ्या इतिहासज्ञांना सुविदित आहे. हें पत्र उजेडात येण्यापूर्वीच टिळकांनी कलकत्ता येथील शिवाजी उत्सवात बोलून दाखविलें होतें :

There is no reason to object to the festival because Shivaji was a Maratha. If Shivaji was a Maratha, it was because he was born near Poona. If you look at the ethnology you will find Shivaji belonged to the same stock as the Rajputs. You may call him a Rajput if you like and you may call him a Bengali if you like.

शिवाजी मराठा होता, म्हणून या उत्सवाला विरोध करावयाचें कारण नाही. कारण त्याचा जन्म पुण्यासन्निध झाला असला तरी तो वंशाने रजपूत होता. त्याला वाटल्यास रजपूत म्हणा, नाही तर बंगाली म्हणा. शिवाजी मुसलमानांशी लढला, म्हणून त्याच्या उत्सवाला विरोध करण्याचें कारण नाही, तो केवळ धर्मच्छळाविरुद्ध लढला आणि या लढ्यात धर्मच्छळाला विरुद्ध असलेल्या मुसलमानांचेंही त्यानें साहाय्य घेतलें. अशा प्रकारे शिवाजी उत्सवाची अखिल भारतीय भूमिका टिळकांनी

बंगाली पुढाऱ्यांना पटवून दिल्यामुळेच पुण्याच्या पाठोपाठ बंगाल्यातही तेव्हा शिवाजी उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होऊ लागला.

शिवाजी उत्सवाची जागतिक भूमिका

शिवाजी उत्सवाला केवळ महाराष्ट्रीय अथवा भारतीय भूमिके-व्यतिरिक्त एक जागतिक भूमिकाही आहे. पण तिची आमच्या अप्रबुद्ध इतिहासकारांना कल्पनाही नाही. किपलिंगने एका कवितेत म्हटलें आहे: 'What do they know of England, who only England Know? केवळ इंग्लंडचा परिचय असणाऱ्यांना इंग्लंडचें जगातील स्थान काय आहे, याची ज्याप्रमाणे कल्पना येणें शक्य नाही, त्याप्रमाणेच केवळ महाराष्ट्राच्या इतिहासाचे कागदपत्र चिवडणाऱ्या कूपमंडूक विद्वानांना महाराजांनी महाराष्ट्रात घडवून आणलेल्या क्रांतीचा जागतिक इति-हासातील एका क्रांतिकारक युद्धाशी कसा संबंध येतो, याची कल्पना येणें शक्य नाही. सतराव्या शतकात तुर्कांच्या इस्लामी साम्राज्याने युरो-पातील खिरस्ती राष्ट्रांवर अप्रतिहत आक्रमण चालविलें असताना पवित्र रोमन साम्राज्यात अंतर्भूत असलेल्या मध्य आणि पूर्व युरोपातील साऱ्या खिरस्ती राष्ट्रांनी पोलंडचा वीर नृपति जॉन सोबिएस्की याच्या नेतृत्वा-खाली व्हिएन्नाच्या वेढ्यात (१६८३) तें आक्रमण प्रतिहत करून मोठ्या कष्टाने ख्रिस्ती संस्कृतीचा प्राण वाचविला. याच्या उलट त्याच काळी सारा हिंदुस्थान पादाक्रांत करणारा सम्राट् औरंगजेब आपल्या अफाट सैन्यासह महाराष्ट्रावर चालून आला असताना सर्व प्रकारे असहाय झालेल्या मराठ्यांनी शिवाजीचें स्वराज्य तर राखलेंच, त्याव्यतिरिक्त त्यांनी औरंगजेबाची ससेहोलपट करून त्याला आपल्या लाजिरवाण्या पराजयाचें दृश्य उघड्या डोळ्यांनी पहात पहात प्राणत्याग करावयाला लाविलें. म्हणजे ज्या इस्लामी विकृतीच्या तावडीतून पवित्र रोमन साम्राज्याचें कसें तरी संरक्षण करण्याचें कार्य अनेक ख्रिस्ती राष्ट्रांनी एकत्रित होऊन केलें, त्याच इस्लामी विकृतीशी प्राणपणाने झुंज घेऊन आणि तिचा सपशेल पराभव करून आर्य संस्कृतीचें संरक्षण करण्याचें महत्कार्य शिवाजी महाराजांनी आणि त्यांच्या असहाय अनुयायांनी त्याच काळी करून दाखविलें. इस्लामी संस्कृतीवर आर्य संस्कृतीने हा महान् विजय त्या काळी संपादिला नसता तर या देशातील किती-तरी साहसी इस्लामी वीर आपल्या पराक्रमाला नवीं क्षेत्रें शोधण्या-करिता आणि तुर्की खलिफाला साहाय्य करण्याकरिता युरोपात गेले असते. मग सोबिएस्कीचा विजय हा क्रांतिकारक विजय ठरला नसता

आणि ख्रिस्ती संस्कृतीचें अस्तित्वही धोक्यात आलें असतें. एका अर्थी इस्लामी विकृतीविरुद्ध शिवाजीमहाराजांनी मिळविलेल्या विजयामुळे युरोपांतील ख्रिस्ती संस्कृतीचा आत्मसंरक्षणाचा मार्ग सुकर झाला. शिवकालापूर्वी पश्चिम युरोपातील स्पेन देशाने इस्लामी विकृतीविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध शतकानुशतकें लढवून स्वदेशातून त्या विकृतीचा सपशेल उच्छेद करण्याचें उदाहरण घालून दिलें होतें. महाराष्ट्राप्रमाणेच स्पेन-चीही राशि धनु असल्याने साम्राज्यांच्या सत्तेविरुद्ध वृकयुद्धें लढवून स्वातंत्र्याचें संरक्षण कसें करावें, या महत्त्वाच्या विषयाचें गुरुत्व याच दोन राष्ट्रांना ईश्वराने समर्पण केलें आहे.

शिवाजी उत्सवासंबंधी टिळकांची भूमिका

शिवाजी उत्सवाच्या प्रवर्तनापासून टिळकांवर राजद्रोहाचे आरोप करणाऱ्या देवांतक 'सुधारक' कारांना अधिकाधिक खाद्य मिळू लागलें. इंग्रजांच्या दास्यात आनंद मानणाऱ्या सुधारकांनी स्वराष्ट्राचा तेजोभंग करण्याची शल्यनीति स्वीकारून शिवाजीउत्सवालाही विरोध आरंभिला. केळकरांच्या टिळकचरित्रावरून असें समजतें की त्या काळी 'दख्खनसमाचार' नांवाच्या एका मासिकात एका सुधारकाला शिवाजी महाराज आणि आगरकर यांची तुलना करण्याची लहर येऊन त्याने असा निर्णय दिला की शिवाजीने सार्वजनिक हिताचें कृत्य असें काही केलें नाही. गोरगरिबांचे बळी घेतले, रक्तपात केला आणि स्वतःवर छत्र-चामरें उडवून घेतलीं. उलट, आगरकर किती देशहितैषी ! त्यांनी स्वार्थ-त्यागाने देशहित केलें, म्हणून त्याने आगरकरांनाच श्रेष्ठ ठरविलें! असल्या सुधारकांच्या टीकेला उत्तर देताना टिळकांनी म्हटलें आहे, "जो उत्सव सर्व महाराष्ट्रास एकराष्ट्रीयत्व आणण्यास साधन होण्याचा पूर्ण संभव आहे, त्याविषयी यत्किंचित्ही अपसमज होणें इष्ट नाही, म्हणून हे लेख लिहिले आहेत. शिवजयंती उत्सव आज राष्ट्रीय नसला तरी तो लवकरच महाराष्ट्रीय होईल आणि तो महाराष्ट्रीय झाला म्हणजे त्यास राष्ट्रीयत्वाचें स्वरूप देण्यास फारशी अडचण पडणार नाही अशी आमची समजूत आहे. यदा कदाचित् तो राष्ट्रीय झाला नाही तरी महाराष्ट्रीय झाल्यास काही लहान काम झालें असेंही नाही. ज्या कित्येकांस व्यक्ति-द्वेषामुळे अथवा मत्सरामुळे शिवजयंतीच्या उत्सवात भाग घ्यावयाचा नसेल, अथवा त्यात नसत्या खोड्या काढून त्याचें महत्त्व कमी करावें असें वाटत असेल, त्यांनी आपले घरबुडवेपणाचे उद्योग निःसंकोचपणे चालू ठेवावेत. ज्या वेळेस राष्ट्राच्या अभ्युदयाचा काळ येतो, त्या वेळेस चंद्रराव मोऱ्यांच्या

असल्या उद्योगांस भीक न घालता राष्ट्राची भरभराट होत असते.' (२६–५–९६) या लेखामुळे 'सुधारका'च्या संपादकांनी आपल्याला ठार मारण्याची टिळकांनी धमकी दिली असल्याचा कांगावा करून सरकारकडे कागाळ्या करण्याचा उपक्रम आरंभिला. शिवाजी उत्सवाचा हेतुच मुळी भारतातील इंग्रजी राज्य हें ईश्वरी वरदान मानणारा पक्ष नामशेष करणें हाच होता. याकरिताच १८९७ च्या शिवाजी उत्सवात 'म्लेच्छांना हिंदुस्थानाच्या राज्याचा ताम्रपट ईश्वराने लिहून दिला नाही' अशी टिळकांनी आपल्या पक्षाच्या वतीने घोषणा केली. या घोषणेचें घबाड हाती लागताच 'सुधारक' गटातील लोकांनी लगेच 'केसरी'तील शिवाजी उत्सवाचें प्रतिवृत्त भाषांतरित करून टाइम्सकडे पाठवून टिळकांनी राजद्रोहाचा प्रचार आरंभिला असल्याची चहाडी केली. ही चहाडी करणाऱ्यांना शिवाजी उत्सव करण्यातील टिळकांचा हेतु नेमका कळला होता, याविषयी शंका नाही.

शिवाजी जयंतीवर चाफेकरांचा आक्षेप

शिवाजी उत्सवाच्या कल्पनेलाच सुधारकांचा विरोध असला तर शिवाजीची जयंती करण्याच्या कल्पनेला देशभक्त, पण धर्मनिष्ठ अशा दामोदरपंत चाफेकरांचा तीव्र विरोध होता. या विरोधाचें विवरण करताना त्यांनी त्यांच्या आत्मवृत्तात लिहिलें आहे. ' आपली जयंती साजरी करण्याची कल्पना स्वतः शिवाजी महाराजांनासुद्धा रुचली नसती. कारण जयंती ही देवादिकांची करतात आणि आपल्याला देवादिकांच्या पायरीवर बसविण्याला स्वतः महाराजांनीच विरोध केला असता. महाराज कितीही महत्त्वाकांक्षी असले तरी आपली देवाप्रमाणे पूजा करावी, असा आग्रह त्यांनीही धरला नसता. महाराजांचे गुरु जे समर्थ रामदास त्यांचीसुद्धा केवळ पुण्यतिथि साजरी करितात, जयंती करीत नाहीत. मानवांची जयंती साजरी करण्याची पद्धति एकदा रूढ झाली म्हणजे उद्या कोणीही कोणाचीही जयंती करू लागेल. फार काय उद्या आपल्याला टिळकआगरकरांचीसुद्धा जयंती करावी लागेल ! या सर्व कारणांकरिता शिवाजी महाराजांची जयंती साजरी करून त्यांना देवाचा अवतार बनविण्याची कल्पना आम्हांला रुचत नाही. ' अशी जरी दामोदरपंतांची भावना होती, तरी ती भावना, व्यक्त करण्याकरिताच त्यांना शिवाजी उत्सवात भाग घ्यावा लागला. आपल्या आत्मवृत्तात ते लिहितात : 'पुण्यातील पहिला शिवाजी उत्सव सदाशिव पेठेतील नातूंच्या उद्यानात झाला. या उत्सवाच्या प्रसंगी जिनसीवाले आणि भानु यांच्या-

मध्ये मोठा कडाक्याचा वाद झाला. त्या वटवटीला अनुलक्षून बाळकृष्णाने एक श्लोक म्हटला. ‘एखाद्या. गोंधळ्याप्रमाणे शिवाजीचा पोवाडा म्हणून दाखवून काही स्वातंत्र्याचा लाभ होणार नाही. स्वातंत्र्यसंपादनासाठी शिवाजी आणि बाजी यांच्यासारखी साहसी कृत्यें करावीं लागतात. हें ध्यानात घेऊन सर्व सज्जनांनो, आता तुम्ही ढाल, तलवार हाती घ्या आणि दंड थोपटून सिद्ध व्हा. म्हणजे आपण असंख्य शत्रूंचा शिरच्छेद करू शकू.’ असले उद्‌गार ऐकून अनेकांनी आम्हांला विचारलें. ‘तुम्ही दुसऱ्यांना दोष देतां, पण आजपर्यंत तुम्ही स्वतः काय केलें आहेत?’ असल्या प्रश्नांना उत्तर देण्याकरिता बाळकृष्णाने दुसरा श्लोक रचला. ‘राष्ट्राकरिता धारातीर्थी प्राणार्पण करण्यास आम्ही सिद्ध आहोत. सर्वांसमक्ष प्रकट केलेला आमचा संकल्प म्हणजे नुसतें प्रहसन नव्हे. आमच्या धर्मशत्रूंचीं शिरें धरणीवर लोळविल्यावाचून आम्ही तरी मरणार नाही. शत्रूंना मारूनच आम्ही मरू. पण तुम्ही मात्र नुसते बायकांप्रमाणे आमचीं आख्यानें ऐकत बसाल.’ चाफेकरांचें मूळ मराठी आत्मचरित्र प्रसिद्ध झाल्यास हे श्लोक मूळच्या स्वरूपात वाचावयास मिळतील. स्वतंत्रतादेवीला आपलें शिरकमल वाहणारे महाराष्ट्रातील हे पहिले हुतात्मे स्वतः कवि होते. त्यांनी मेळ्यांच्या पदांचें एक पुस्तक मुंबईच्या सुवर्ण मुद्रणालयातून छापून घेतलें होतें. पण तें रक्षक विभागाने लगेच सरकारजमा केलें. त्यामुळे दुसरें पुस्तक छापावयाला देण्याचा विचार त्यांनी रहित केला. दामोदरपंतांची हीं पुस्तकें अजूनही रक्षक-विभागाच्या कागदपत्रांत असू शकतील. तीं उजेडात आणण्याचें श्रेय कोणा संशोधकांना लाभणार आहे, कोण जाणे !

वासुकाकांच्या चरित्रातील पुरावा

पुण्यातील शिवाजी उत्सवात चाफेकरांनी क्रांतीचा, आपल्या कवि-प्रकृतीला अनुसरून किती निकराने प्रचार केला, याचा अधिक पुरावा वासुकाकांच्या चरित्रातील २३६ पानावर उपलब्ध होतो. ‘रायगडला शिवाजी उत्सव झाला, त्याप्रमाणेच पुण्यासही झाला. पुण्याच्या उत्सवात चाफेकर फेटा बांधून आणि हातात काठी घेऊन अत्यंत तेजस्वी भाषेत बोलले. बाळासाहेब नातू या मंडळींना म्हणाले, ‘चाफेकराला आवरता आवरता पुरेवाट झाली.’ या उताऱ्यावरून पहिली गोष्ट ही व्यक्त होते की चाफेकर आवेशात आले म्हणजे त्यांना परिस्थितीचें भान रहात नसे आणि दुसरी गोष्ट ही की त्यांच्यावर बाळासाहेब नातूंचेंच काहीतरी नियंत्रण चालू शकत असे. यामुळेच पुढे चाफेकरांना शिक्षा झाल्या-नंतरही बरेच दिवस नातूबंधूंची सुटका होऊ शकली नाही.

चाफेकरांनी गणपति उत्सवात म्हटलेली कविता

शिवाजी उत्सवातील आपल्या कवित्वाची कहाणी सांगितल्यानंतर चाफेकरांनी आपण गणपति उत्सवात म्हटलेले श्लोक उतरून दिले आहेत. हे श्लोक मी रचले असें दामोदरपंतांनी म्हटलें असलें तरी त्यांच्या आत्मवृत्ताच्या इंग्रजी अनुवादावरूनसुद्धा ती कविता पुष्पवाटिका नांवाच्या तत्कालीन एका सरकारी आश्रयाने छापलेल्या विनायक कोंडदेव ओकांच्या नवीन कवितांच्या संग्रहातील कविता आहे, असें ओळखता आलें.

अरे मूर्ख हो, मर्द झाला कशाला ? ।
मिशा मोठमोठ्या धराव्या कशाला? ॥

न लज्जा तुम्हां भोगिता दास्य हाय ! ।
करा हो तुम्ही जीव जाया उपाय. ॥

स्वदेशाभिमानासि टाकोनि कैसे ।
उगे बैसता काय नामर्द तैसे, ॥

उठा सोडवा माय ही कष्टभागी ।
करा वीरता मानसांतील जागी. ॥

जया भाग्य देशांत जन्मास यावें ।
तयाला परांनी लुटावें कुटावें ! ॥

असें पाहता स्वस्थ कैसे बसावें ? ।
धरा लाज काही तरी रे स्वभावें. ॥

धरा धीर चित्तीं तसें शस्त्र हाती, ।
मुखी रामनामा जया साधु गाती१ ॥

करा निश्चयो म्लेच्छ मारावयाचा, ।
तुम्हांला जय प्राप्त होईल साचा. ॥

अरे कापिती वासरें आणि गाई, ।
महा दुष्ट चांडाळ जैसे कसाई. ॥

तयांचा धरित्रीस हा भार झाला, ।
करू तो कमी हें प्रिय श्रीप्रियाला. ॥


हिंदुस्थान असें जनांत म्हणती देशास या सर्वही ।
येथे म्लेच्छ कसे स्वराज्य करिती जाणा पहा लाज ही. ॥

नांवाला विसरू नका, दृढ धरा देशाभिमाना मनी ।
ठोका दंड, उठा, भिडा, सुयश या दुष्टांचिया कंदनीं. ॥

'शिवाजीचे उद्‌गार'

वरील कविता पुष्पवाटिकेतील असून आपणच ती रचली असल्याचा उल्लेख दामोदरपंतांनीं केला असला तरी त्यांच्या चरित्रकारांच्या (वि. श्री. जोशी) मताप्रमाणे त्यांनी स्वतःच रचून १८९७ च्या शिवाजी उत्सवात म्हणून दाखविलेल्या 'शिवाजीचे उद्‌गार' या कवितेचा मात्र त्यांनी आत्मवृत्तात कोठेंही उल्लेख केला नाही. या अनुल्लेखाचें कारण, टिळकांशी आपल्या कृतीचा संबंध जोडण्याला उपयोगी पडेल, असा पुरावा आपण होऊन शत्रूंना पुरवावयाचा नाही, असा त्यांचा दृढ निश्चय असला पाहिजे. 'शिवाजीचे उद्‌गार' ही कविता 'भवानी तलवार' या संज्ञेने 'केसरी'त प्रसिद्ध झाली होती. प्रमुख वर्तमानपत्रांत आपली कविता छापून आणावयाला लेखकाचें अथवा कवीचें संपादकांवर किती वजन असावें लागतें, हें वाचकांना विदित असेलच. त्याप्रमाणे दामोदरपंतांचें टिळकांवर वजन असल्यामुळेच ती कविता 'केसरीत' छापली होती. त्या कवितेचा रँडवधाच्या कृतीशी निकटचा संबंध असल्याने ती कविता रचणारे चाफेकर आणि तिला प्रसिद्धि देणारे टिळक या दोघांनाही रँडवधाच्या कटातील सहकारी ठरविण्याचा प्रयत्न सरकारकडून झाला असता. वासुकाकांच्या चरित्रांत देवगिरीकरांनी निःसंदेहपणे लिहिलें आहे : 'टिळकांचा त्या वधाशी यत्किंचित् जरी संबंध जोडता आला असता तरी सरकारने त्यांना फाशीची शिक्षा द्यावयास कमी केलें नसतें. असा आगीच्या बरोबर तो खेळ होता.' त्या वर्षीच्या शिवाजी उत्सवातील भाषणांसहच या कवितेबद्दलही टिळकांना १८९७ च्या सप्टेंबरमध्ये राजद्रोहाच्या निर्बंधाअन्वये शिक्षा झाली आणि त्यानंतर सरासरी दोन आठवड्यांनी दामोदरपंतांना रँडवधाबद्दल अटक झाली. त्यामुळे चाफेकर आणि टिळक यांच्या परस्परसंबंधांची न्यायालयात चिकित्सा झाली नाही. असो. या उभयता भारतरत्नांच्या चरित्रांशी संबंध असलेली ही ऐतिहासिक कविता येथे समग्र उतरून घेतली पाहिजे.


दुष्टां संहरुनी बहूत भुविचा तो भार केला कमी ! ।
देशा उद्धरिलें स्वराज्य करुनी, तारोनि धर्मास मी ॥
झाला शीण बहू तया दवडिण्या स्वर्लोक म्यां गाठिला ।
होतो निद्रित तों तुम्ही उठविलें कां लाडक्यांनो, मला ? ॥
पायाशुद्ध उदात्त नीति, रणिचे तें शौर्य कर्णासम, ।
देशाचा अभिमान, धाडस खरें, तें ऐक्य सर्वोत्तम ॥



दे. दामोदर बळवंत भिडे



हु. दामोदर हरि चाफेकर



बॅ. केशवराव देशपांडे



श्री. नी. वा. भिडे

ऐसे सद्गुण कल्पवृक्षचि जणूं भूमींत या लाविले ।
त्यांची दावित साल काय मजसी तीं गोड आता फळें ? ॥
अरे रे हें काई दिसत पडला मोडुन गड ।
नशीबे बैसाया मिळत मज विच्छिन्न दगड ॥
तसें कां जाईना हृदय मम हें आज फुटुनी ? ।
पहातों देशाचा शिव, शिव, असा नाश नयनीं. ॥
पैसा पाउससा अहो, खरचिला बांधावयातें जया, ।
ताजें तापट रक्त जेथ गळलें संपादण्यातें जया, ॥
गेलों चालुनि जेथुनी दरिंतुनी गर्जोनिया सिंहसा, ।
किल्ले ते मम ढासळूनि पडले विध्वंस हा कायसा ? ॥
लक्ष्मीतें जुलुमें परस्थ छळुनी नेती करें ओढुनी ।
गेली ती पळुनी सवें विपुलता, आरोग्यही मागुनी ॥
दुर्भिक्षासह सर्व देश फिरते ही दुष्ट आक्काबया, ।
रोगांची पसरूनि साथ विचरे मृत्यू न ज्यातें दया. ॥
माझा घर्म पडे तया क्षणि तिथें तें रक्त ज्यांचें गळे, ।
माझे जीव दुजे धुरंधर वदा ते हो, कुठे मावळे ? ॥
खाती भाकर एक वेळ तरि त्या तीही पडेना पुरी, ।
कष्टें काल कठीण कंठिति घड्या बांधोनि पोटावरी. ॥
शांतीच्या समयीं स्वधर्म अपुला पाळोनि जे राहिले, ।
त्यागोनी समयास दर्भ करिचे शस्त्रां करीं वाहिले, ॥
माझे सद्गुरु धर्मशिक्षक तया ज्यां ब्राह्मणां पाळिलें, ।
त्यातें कैद घडोनिया जन तुम्ही, क्षत्रीं कसें साहिलें ? ॥
धात्रीभूत लहानग्यास जननी सोडून जाते यदा ।
मूलाधार कृषीवलां, बहु असे लोकांस जी शक्तिदा, ॥
माझी माय म्हणोनि गाय पुजिली प्राणाहुनी रक्षुनी, ।
तीतें नित्य चराचरा चिरिति कीं वध्यस्थली नेउनी. ॥
'आला धावत नेमका अपणचि नेमांत बंदूकिच्या, ।
माते अस्वल वाटला, सुजति हो यांच्या प्लिहा रोजच्या ' ॥
गोरा लोक सुटे निरर्थ सबबी सांगोनिया या कसा ? ।
न्यायाच्या अजि मंदिरी दिसतसे अन्याय हा कारसा. ॥
होती काय बिशाद वक्र नयनें पाही परस्त्री कुणी, ।
म्यानांतून सहस्र तीक्ष्ण असिका बाहेर ये त्या क्षणीं, ॥

आता अग्निरथांत संधि बघुनी हस्ते स्त्रिया ओढती ।
षंढांनो, करिता कसें सहन हें ? लावूनी घ्या दाद ती. ॥
वेडा हा उचलोनि यास जलदी यात्रेसि द्या लावुनी, ।
चैनी तो, अधिकार घ्या मुदतिने घेतो, असें सांगुनी ॥
ऐशीं हातळतीं आतां नृपकुलें, दुर्दैव हें ओढलें; ।
सारे केवळ हे दळे बुदबुळे राजे कसे जाहले ॥
देखावा हृदया विदारिल असा पाहूं तरी मी कसा ? ।
नेतो दृष्टि दुजीकडे, कथुनिया संदेश बारीकसा, ॥
ज्यांच्या मावळतो कधी न रवि या राज्यावरी थोरल्या, ।
सांगा त्या प्रभुंना सलाम तुमच्या, दोस्तांस माझ्या भल्या. ॥
सांगा त्यांस 'अहो तुम्ही विसरला कैसी जुनी रीत ती ।
जेव्हा घेउनिया तुला करितसा विक्री वखारीत ती. ॥
होत्या होत कितीक वेळ सफरी बाजूस माझ्या तया ।
होतें शक्य तदा तुम्हां फिरुनही देशास लावावया. ॥
हिंदूचें परि शील थोर म्हणुनी तुम्हांस म्यां रक्षिलें, ।
नाहीं का उपकार थोर तुमच्या शीर्षी असे जाहले ? ॥
द्या, द्या, सूख तरी प्रजेस अपुल्या माझींच तीं लेकरें ।
व्हावें आज कृतज्ञ फेडुनि ऋणा हें लौकिकाला वरें ॥

टिळक-चाफेकरांचें सहकार्य

'शिवाजीचे उद्‌गार' प्रसिद्ध करताना टिळकांच्या मनात क्रांतिकारक कृत्यांना उत्तेजन देण्याचा हेतु असलाच पाहिजे. क्रांतिकारक पक्षात क्रांतीच्या योजनांचें अवडंबर माजविणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या चालकांसारखे काही लोक असतात. हे चालक इंग्रजांच्या विरुद्ध बंड करण्याच्या योजना करीत असताना इंग्रज हिंदुस्थानातून निघूनही गेले. एक सुसंघटित सरकार गुप्त संघटनेच्या सामर्थ्याने उलथून पाडणें दुर्घट असतें. यामुळे कर्त्या क्रांतिकारकांचा सारा भर योजनाबद्ध उठावणीपेक्षा यशस्वी साहसावर असतो. याकरिता स्वदेशातील स्वाभिमानी आणि साहसी जनांच्या अंतःकरणातून परतंत्र जीवनाच्या धिक्काराची नि द्वेषाची ज्वाळा पेटविणें आणि आपल्या दीनदुबळ्या देशबांधवांच्या हालअपेष्टांचें निराकरण करण्याचें दायित्व आपल्या शिरावर असल्याची जाणीव त्यांच्या हृदयात उत्पन्न करणें, हे हेतु मनात धरूनच टिळकांनी ही कविता प्रसिद्ध केली होती. टिळकांशी शत्रुत्व

करणाऱ्या आणि गणेश-शिवाजी उत्सवांनाही विरोध करणाऱ्या, आंग्लप्रभूंचे दासानुदास बनलेल्या सुधारकांनी, परकीय संस्कृतीने केलेला स्वकीय संस्कृतीचा पराभव, हाच आपल्या जीवनातील सर्वांत मोठा उत्सव मानून, परतंत्र जीवनाविषयीची लाजलज्जा सुधारलेल्या हृदयांतून कधीच घालवून दिली होती. वाचकांना सुविदित आहेच की, लज्जा ही पराकाष्ठेची मानिनी असल्याने एकदा हृदयातून घालवून दिल्यानंतर तेथे ती कधीच पुनः प्रवेश करीत नाहीं, आणि त्यामुळेच विश्वासघातक्यांचें, अथवा देशद्रोह्यांचें जीवन त्यांना सुसह्य होतें. पण परतंत्र जीवनाची लज्जा ही एखाद्या लाडक्या पण दुर्दैवी लेकीप्रमाणे आपल्या आगमनाने ज्यांच्या मानसमंदिरांचें लाक्षागृहात परिवर्तन करीत असते, त्यांना कारागृहातील यातनांच्या विनिमयात मानसिक स्वास्थ्य संपादन करून घ्यावें लागतें. त्यांतूनही असा कारावास चाफेकरांच्या सारख्या कृतिशूर सहकाऱ्यांच्या काव्यानिमित्त भोगावा लागला तर तो निःसंशय अधिक मनःस्वास्थ्यदायक आणि अधिक पुण्यप्रद. संपादक टिळकांच्यासाठी, वामन शिवराम आपटे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर आणि दामोदर हरि चाफेकर या त्रयीने आपल्या लेखनाने कारागृहाचीं द्वारें वेळोवेळीं स्वर्गद्वाराप्रमाणे अपावृत करून दिलीं. या त्रयीमध्ये सर्वांत अविद्वान्, पण सर्वांत पराक्रमी आणि त्यागी चाफेकरच होत. चाफेकरांनी रँडचा वध केल्यामुळेच सरकारने टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेविला, आणि चाफेकरांची ' शिवाजीचे उद्‌गार ' ही कविताच तो आरोप सिद्ध करण्याला मुख्य पुरावा म्हणून उपयोगी पडली. या कवितेतील 'षंढांनो, करिता कसें सहन हें' हे उद्‌गार ध्यानात ठेवून टिळक चाफेकरांना बोलले होते की स्वतः काही कृति केल्यानंतर मगच इतरांना असलीं विशेपणें लावावींत. आपल्या कवितेतील उद्‌गारांना अनुरूप अशी कृति करण्याला चाफेकर कचरले नाहीत, इतकेंच नव्हे तर आपल्या कृतीचें दायित्वही त्यांनी आपल्या पुढाऱ्यांवर ढकललें नाही, किंवा आपण केलेल्या रँडवधाचें श्रेयही त्यांनी अन्य कोणाला समर्पण केलें नाही. चाफेकरांच्या टिळकांवरील प्रभावाचें निदर्शन म्हणूनच शिवाजीचा उत्सव प्रथम शिवजयंतीच्या स्वरूपात चालू केला असतानाही १८९७ पासून टिळकांनी त्याचें व्यक्तिपूजेचें स्वरूप बदलून त्याला हिंदूंच्या स्वातंत्र्योत्सवाचें, म्हणजे राज्याभिषेकोत्सवाचें स्वरूप दिलें. टिळकांच्या मृत्यूनंतर पुण्यातील उत्सवाचे चालक बनलेल्या डॉ. पळसुल्यांनी चाफेकरांचे आक्षेप आणि टिळकांचा हेतु यांच्याकडे दुर्लक्ष करून पुनश्च शिवजयंती साजरी करण्याचा उपक्रम केला.

क्रांतिकारक समितीची स्थापना आणि चाफेकरांचें नेतृत्व

टिळकांनी शिवाजी उत्सवाचा उपक्रम करण्यापूर्वीच टिळक आणि अरविंद हे ज्या क्रांतिकारक समितीचे पुढे प्रमुख पुढारी बनले, ती समिति स्थापिली गेली होती. शिशिरकुमार मित्रांनी अरविंदांच्या इंग्रजी चरित्रात ४५ पानावर लिहिलें आहे.

In the nineties of the last century, a scheme was afoot in various parts of the country to organise secret societies for revolutionary work, particularly for preparing the field by infusion of revolutionary ideas. Bombay Presidency had its share in this movement of which Thakursaheb, a noble of the Udaipur state was a leader. The Bombay Council of the movement was helping him to organise Maharashtra and the Maratha states. He himself worked principally upon the Indian army, three or four regiments of which he had already won over. Shri Arobindo who was connected with this movement took a special journey to Central India to meet Indian sub-officers and men of one of these regiments. About this time Thakur set up a secret society at Poona and in 1896 Shri Arobindo was elected its president.... ... Chaphekar along with his brother had started an organization called Hindu Dharma Sangh. After the passing of its founder, this Sangh, the Secret Society of Thakursaheb (then absent in Japan for revolutionary work) and Tarun Sangh, a society of youths, organised under Shri Arobindo's direction were amalgamated and Shri Arobindo took over the management. Later he became the President of the central organization for the whole of Gujarat.

या अवतरणावरून कळून येतें की १८९० च्या दशकात केव्हा तरी (वस्तुतः पुण्यात गणेशोत्सव चालू झाला त्याच वेळी) मुंबई प्रांतात उदेपूर संस्थानातील एका ठाकूरसाहेबांनी (बहुधा प्रतुलगुप्तांच्या नानासाहेबांच्या इतिहासात त्यांनी ज्या साळुंऱ्याच्या ठाकुरांना भेट दिल्याचा उल्लेख येतो त्यांनी) एक क्रांतिकारक संस्था स्थापिली. या कार्यात त्यांना साहाय्य करण्याकरिता मुंबईत पांच जणांची एक समिति निर्माण केली होती आणि ती त्यांना महाराष्ट्रात आणि मराठी संस्थानात संस्थेचें जाळे पसरविण्याला साहाय्य करीत होती. स्वतः ठाकूरसाहेब मुख्यतः सैन्यात काम करीत असून त्यांनी त्या दिवसांत तीन चार पलटणी वश करून घेतल्या होत्या. त्यांपैकी एका पलटणीला अरविंदांनी मध्य-हिंदुस्थानात जाऊन भेटही दिली होती. याच वेळी पुण्यातही गुप्त समिति

स्थापली होती आणि १८९६ मध्ये अरविंदच तिचे अध्यक्ष होते. पुण्यात चाफेकरांची हिंदुधर्मसंघ ही संस्था होतीच. (बंगाल्यातील परंपरेप्रमाणे स्वतः अरविंदांनीच चाफेकरांच्याकडून क्रांतीची शपथ घेतली होती आणि त्यांच्याविषयी वाटणाऱ्या निरतिशय आदरामुळे भगिनी निवेदिता यांनी चाफेकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला भेट दिली होती.) चाफेकरांच्या निधनानंतर चाफेकरांची संस्था, ठाकूरसाहेबांची संस्था आणि अरविंदांनी गुजराथेत स्थापलेला तरुण संघ यांचें मीलन होऊन त्या संस्थेचें प्रमुखत्व अरविंदांच्याकडेच आलें. वरील इंग्रजी अवतरणातील माहितीपैकी ठाकूर साहेबांच्या पुण्यांतील संस्थेचे अध्यक्ष १८९६ मध्ये अरविंद झाले होते, ही गोष्ट अगदीच नवीन असल्याने तिला प्रत्यंतर पुरावा पाहिजे. चाफेकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या संस्थेचें नेतृत्वही अरविंदांच्याकडे गेलें, हें स्वाभाविक दिसतें. १८९३ च्या ऑगस्टपासून अरविंदांनी मुंबईच्या 'इंदुप्रकाश' साप्ताहिकात भारतीय राजकारणावर एक लेखमाला चालू केली. तेव्हापासूनच टिळकांचें त्यांच्याकडे लक्ष गेलें होतें. त्यानंतर १८९५ मध्ये बापट प्रकरणाच्या निमित्ताने टिळक बडोद्यात रहात असताना त्या उभयतांचा प्रत्यक्ष परिचय झाला असावा.

टिळकांची क्रांतिकारक विचारसरणी

टिळकांची विचारसरणी प्रथमपासून क्रांतिकारक पंथाची होती. पहिल्याच वर्षाच्या 'केसरी'त आयर्लंडच्या राजकारणाची चर्चा करताना त्यांनीं लिहिलें होतें: 'स्वातंत्र्यरूपी अमोलिक दक्षिणा मिळविण्यास नरमेधयज्ञावाचून इतर लौकिक साधनें व्यर्थ होत, हा जो ऐतिहासिक सिद्धान्त त्यास बाध कोणी आणावा?' टिळक राजकारणात पडले, ते नरमेधयज्ञाच्या सांगतेनंतर स्वातंत्र्याची अमोलिक दक्षिणा संपादण्याचा संकल्प करूनच राजकारणात पडले. ही वस्तुस्थिति ध्यानात घेऊन लालाजींनी लिहिलेल्या टिळकांच्या आठवणींतील पुढील परिच्छेदाचें मनन केलें असता तत्कालीन इतिहासावर अभिनव प्रकाश पडतो.

The Chaphekar brothers for the first time showed to the country how religious enthusiasm of the most orthodox kind could be combined with political aspirations of the most revolutionary nature. Nothing of the kind had been heard before during British rule in India and the incident thrilled the people with various kinds of emotional feelings. The educated community was convulsed with discussion as to the ethical nature of the crime. They had so far looked upon law and order as most sacred things and they never imagined that such religious men as

Chaphekar brothers were, could find justification in their ethical code of morality for political murders of this kind. The Chaphekar brothers were then in fact the founders of the revolutionary movement in India. They were the first to invoke Gita in support of political action of that kind and somehow or other people all over India believed that Tilak was their inspirer. Some thought that he had ordered the murders, others thought that while not approving of the murders and not being in any way responsible for the same, he was the inspiration behind the mentality which moved the hands and mind of the Chaphekar brothers.

याचा सारांश असा की केवळ सनातनी धर्मावरील उत्कट श्रद्धेने एखादी व्यक्ति क्रांतिकारक राजकारणाचें अंतिम जें बलिदान, तें बलिदानही किती अलौकिक धैर्याने करू शकते, याचें प्रात्यक्षिकच चाफेकरबंधूंनी दाखविलें. तत्पूर्वी इंग्रजी राजवटीत हिच्याशी तुलना करता येईल, असली घटनाच घडली नव्हती. या घटनेने लोकांचीं मनें परस्परविरोधी भावनांनी भारलीं गेलीं, थरारून गेलीं. चाफेकरबंधूंनी केलेल्या वधांच्या चर्चेने समकालीन सुशिक्षित तरुणांच्या विचारसागराचें मंथन झालें, असेंही म्हणता येईल. तोपर्यंत भारतीय दंडविधान (इंडियन पीनल कोड) हाच सुशिक्षित समाजाचा पवित्र ग्रंथ होऊन बसला होता आणि सरकारने सुव्यवस्थेच्या नावाने केलेल्या आज्ञा,या त्यांना लक्ष्मणरेषेप्रमाणेच अलंघनीय वाटत होत्या. त्यामुळे चाफेकरबंधूंसारखे धर्मनिष्ठ लोक स्वधर्माच्या विटंबनेने प्रक्षुब्ध होऊन राजकीय वधाला प्रवृत्त होतील आणि धर्माच्या आधाराने त्याचें समर्थन करतील, अशी कल्पनाही त्यांच्या ध्यानीमनी आली नव्हती. चाफेकरबंधु हे त्या काळी क्रांतिकारक पक्षाचे प्रस्थापक आणि प्रणेते होते. आपल्या क्रांतिकारक कृतीला भगवद् गीतेचा आधार घेणारे तेच पहिले क्रांतिवीर. ही भगवद्गीतेची प्रेरणा त्यांना टिळकांच्याकडून प्राप्त झाली असली पाहिजे, अशीच तेव्हा अखिल भारताची भावना झाली होती. काही जणांच्या मतें टिळकांच्या आज्ञेवाचून हे वध घडलेलेच नव्हते. इतरांच्या मताने टिळकांना या घटनेची गंधवार्तासुद्धा नसली तरी त्यांच्या आंदोलनापासून प्राप्त झालेल्या प्रेरणेनेच हे वध घडवून आणले होते. वरील अवतरणात भारतीय दंडविधान हाच ज्यांचा धर्मग्रंथ होऊन बसला होता, अशा ज्या उत्तरेतील सुशिक्षित समाजाचा लालाजींनी उल्लेख केला आहे, तोच समाज आज भारताचे निधर्मी राज्य चालवीत असून त्यामुळेच देशात दुर्दैवाच्या दशावतारांचा खेळ चालू झाला आहे, हें सर्वांना दिसतच आहे.

दासनीतीला टिळकांचा विरोध

एखाद्या देशावर परक्या लोकांची सत्ता प्रस्थापित झाली म्हणजे स्थानिक लोकांना नीति शिकविण्याचा लुटारू राज्यकर्त्यांना अधिकार प्राप्त होतो आणि त्यांच्या स्वार्थप्रेरित नीतीच्या उपदेशाला राज्य-कर्त्यांचें अनुकरण करणारा वर्ग बळी पडतो. हा वर्ग सोज्वळपणाचें सोंग आणून स्वसमाजाला समजावून देत असतो की सामाजिक दृष्टया राज्यकर्त्यांचें अनुकरण केलेत तर शेकडो वर्षांनंतर तुम्ही स्वराज्याला पात्र व्हाल. आज तुम्ही जित आहात, त्याअर्थी स्वराज्याला अपात्र आहात, हें वेगळें सांगायला नकोच. असल्या उपदेशकांना राज्यकर्ते लोक चांगले म्हणतात. असल्या चांगल्या लोकांसंबंधी नीच्छेच्या जरथु-श्ट्राने म्हटलें आहे.

Good men never speak the truth. False shores and false harbours were ye taught by the good. In the lies of the good were ye born and bred. Through the good everything has become false and crooked from the very roots.

वस्तुस्थितीचें यथार्थ निरीक्षण आणि वर्णन करण्याची अपात्रता, हा धर्मराजांचा, चांगल्या पुरुषांचा स्थायीभाव असल्याने ते खरें बोलू शकत नाहीत, भलत्याच सागरतीरांकडे आणि बंदराकडे ते समाजाला घेऊन जातात. या चांगल्या लोकांच्या असत्याचेंच तुम्हांला बाळकडू पाजलें जातें आणि त्यातच तुम्ही वाढता. या चांगल्यांच्या वर्तनानेच समाजात असत्य आणि कौटिल्य यांचें विषारी वातावरण निर्माण होतें.

चाफेकरांच्या कृतींची चर्चा

ज्या काळी भारतीय दंडविधान हा सुशिक्षित समाजाचा धर्मग्रंथ होऊन बसला होता, अशा काळी गोऱ्या सैनिकांनी पुण्यात केलेले अमानुष अत्याचार, त्या अत्याचारांचा चाफेकरांनी घेतलेला सूड आणि त्यानंतर परक्या सरकारने त्यांच्यावर घेतलेला प्रतिसूड या सर्व घटनांचा महाराष्ट्रातील देशभक्तांच्या मनावर कोणता परिणाम झाला, हें एका अन्य संदर्भात इंग्लंडचे प्रसिद्ध इतिहासशास्त्रज्ञ लॉर्ड अॅक्टन यांनी काढलेल्या उद्गारांवरून कळून येईल.

It forced men to conclude that authority was odiously stupid, and still more odiously ferocious, that existing government was accursed, that the gurdians and ministers of law were more guilty than their culprits. As there was no sanctity left in law, there was no mercy for its merciless defenders, and if they fell into avenging hands, their doom would not exceed their desert.

सत्ताधारी हे शकारासारखे चीड येण्याइतके मूर्ख आणि क्रूर असल्याने त्यांची सत्ता अभिशप्त झाली आहे. या सत्तेने नेमलेले रक्षक आणि न्यायाधीश हे त्यांच्यापुढे आणलेल्या आरोपीपेक्षा अधिक पापी आहेत. यांच्या सत्तेला, पावित्र्याचा आधार नसल्याने त्या सत्तेच्या निर्दय रक्षकांना कोणतीही दया दाखविण्याचें कारण नाही, आणि ते जर सूड घेणाऱ्या क्रांतिकारकांच्या तावडीत सांपडून बळी गेले, तर त्यांना अपराधाहून अधिक शासन झालें, असें मानण्याचें कारण नाही. अशी वस्तुस्थिति असूनही वर उल्लेखिलेले सज्जन परक्या सरकारचें आणि त्याच्या नीच हस्तकांचे पोवाडे गाण्यांत दंग झाले होते.

हुतात्म्यांना काव्यवंदना

काय ? असल्या विषारी वातावरणात भेकड अथवा विकृत मनोवृत्तीचे लोक त्यांच्या अकृत्रिम अथवा कृत्रिम अश्रुमुक्तांची माळ रँडसारख्या रावणाला वहात असताना खऱ्या देशभक्तांनी देशवीर दामोदराला शेवटची मानवंदनाही देऊ नये ? दहशतीमुळे त्यांच्या जिव्हा लुळ्या पडाव्यात ? चाफेकरांच्या अद्‌भुत पराक्रमाला आणि उदात्त धर्मनिष्ठेला उचित असा अर्घ्य अर्पण करण्याची कोणाही कवीच्या सरस्वतीला स्फूर्ति होऊ नये ? इतकें कां हें दास्यपंकातील कीटकांचें जीवन सुखदायक आणि आसक्तिदायक आहे ? परदास्याच्या घृणास्पद भाराखाली वाकलेल्या अभिमानशून्य हृदयातून अजून लपून राहिलेल्या भारतीयत्वाच्या भावना आकाशातील तारकांप्रमाणे थरथरा कांपत असून यांचें कंपन स्वतःपासून आणि परस्परांपासून कसें लपवावें, याच चिंतेने सर्व जण आतुर जाहला आहात ना ? पण नाही. स्वदेहाची आहुति समर्पण करून स्वराष्ट्राला नवजीवन देणाऱ्या चाफेकरांना मी निःशब्द वंदन करू शकत नाही. त्या सुधारलेल्या ख्रिस्त्यांच्या देवाने गोऱ्या रावणांना नरांची आकृति अर्पण करून जी चूक केली होती, ती चूक गणेशखिंडीच्या मार्गावर पिस्तुलांतील गोळ्यांनी सुधारणाऱ्या गोफण्या मारुतीच्या भक्ता, तुला मी मौनवंदना देऊ शकत नाही. सुडाची आग शमली म्हणून सत्याचा कंठही गोठून जावा काय ? रँडच्या अत्याचारांनी जिथे देवमूर्तींना सुद्धा घाम फुटला होता, तिथे कृतज्ञतेला वाचा फुटू नये काय ? सरकारी अत्याचारांचें सामर्थ्य कितीही प्रचंड असलें तरी त्यांचा सूड घेण्यासाठी जो स्वतःच्या प्राणांवरही उदार होतो, त्याचें सामर्थ्य त्या अत्याचारांच्या सामर्थ्याहून अधिक प्रभावी ठरते असा इतिहासाचा सिद्धान्त आहे. पण तो इतिहास जिवंत ठेवण्याइतकी कृतज्ञता आणि अभीरुता त्या

हुतात्म्यांच्या समाजांत अवशिष्ट असावी लागते, नाहीतर त्या नर-रत्नांचें आत्मार्पण व्यर्थ जाण्याची भीति निर्माण होते. याच भावनेने प्रेरित होऊन सावरकरांनी चाफेकरांचा फटका रचला, इतकेंच नव्हे तर त्यांच्या व्रताचाही स्वत: स्वीकार केला. ' त्यांच्या प्राणज्योतीने जाता जाता चेतविलेली शत्रुंजयवृत्ति, यज्ञकुंडांत समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणें असेल, तर त्याचें दायित्व आपणांवरही पडत आहे, अशी चाफेकरांच्या आत्मार्पणाने त्यांची भावना झाली.

चाफेकरांच्या कृतीचे परिणाम

सारा महाराष्ट्र असा हताश आणि असहाय झाला असताना आणि पुण्याच्या कीर्तिचंद्राला रँडच्या राहूने खग्रास ग्रहण लाविलें असताना चाफेकर बंधूंनी व्हिक्टोरिया राणीच्या हीरक महोत्सवाच्या रात्री रँड आणि आयर्स्ट यांना गोळ्या घालून एकाच क्षणी शत्रुमित्रांना स्तंभित करून सोडलें. त्यानंतर थोरल्या दोघा चाफेकरांना झालेली अटक आणि फाशी, त्यांचा विश्वासघात करणाऱ्या द्रविडबंधूंचा वध, त्या वधाच्या मागोमाग वासुदेव चाफेकर आणि रानडे यांची फाशी या साऱ्या घटनांनी अखिल महाराष्ट्र अक्षरशः दणाणून गेला. सावरकरांनी आत्मचरित्रात म्हटलें आहे. ' ह्या अत्यद्‌भुत, रोमहर्षक घटना इतक्या संतत आणि द्रुतक्रमाने घडत गेल्या की त्या धक्क्यामागून बसलेल्या धक्क्यांनी मुर्दाडातील मुर्दाडाच्या अंगातसुद्धा उत्तेजन आणि उत्क्षोभ संचरल्यावाचून राहिला नाही. असा सारा देश त्या निशेने धुंद झाल्यासारखा झाला. मग माझ्यासारख्या स्वदेशास स्वतंत्र करण्याची आधीच तळमळ लागलेल्या आणि शिवाजीच्या आणि पौराणिक वीरांच्या रंगातच रंगून राहिलेल्या युवकाची गोष्ट काय सांगावी.' वासुदेव आणि रानडे यांच्या फांशीचें वर्णन वाचून तर सावरकरांच्या मनःक्षोभाची परिसीमा झाली आणि ती शांत करण्याचा उपाय म्हणून त्यांनी स्वातंत्र्ययुद्धात विजयी होण्याची, नाहीं तर प्राण देण्याची प्रतिज्ञा केली. याच शपथेतून पुढे अभिनव भारत समितीचा जन्म झाला.

स्वर्गद्वाराचा मार्ग

चाफेकरांनी देशशत्रूंना मारून आत्मार्पण केल्याने महाराष्ट्रातील जनतेत जी मानसिक क्रांति घडून आली, तिचें स्वरूप जन्मजात मवाळांना कळणें अशक्यच होतें. पारतंत्र्यामुळे आणि विशेषतः सत्तावन्नमधील स्वातंत्र्ययुद्धामुळे भारतातील अनेक प्रमुख जातींच्या साहसी तरुणांना

सैनिकी व्यवसायात प्रवेश मिळेनासा झाला. आधीच पारतंत्र्यामुळे स्वदेशाच्या शत्रूंना संमुख समरात मारीत मारीत मरण्याचा आणि परमवीरपद मिळविण्याचा प्रत्येक साहसी राष्ट्रभक्ताचा नैसर्गिक अधिकार नष्ट होतो. उलट देशातील राष्ट्रीयत्वविरोधी समाजांना मात्र परक्या राज्यकर्त्यांच्या राज्यलोभाप्रीत्यर्थ स्व-परदेशातील स्वातंत्र्यभक्तांचे गळे चिरण्याचा सैतानी अधिकार प्राप्त होतो. हा नवा अधिकार प्राप्त करून घेण्याची खऱ्या राष्ट्रभक्तांना इच्छा नसतेच. त्यातूनही धोरण म्हणून त्यानी या व्यवसायात प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना चिरंतन दास्यात ठेवू पाहणाऱ्या परक्या राज्यकर्त्यांच्या सावधपणामुळे त्यांचा या व्यवसायात प्रवेश होत नाही. त्यामुळे टिळकांनी एका लेखात म्हटल्याप्रमाणे जगातील सर्वांत भयंकर वस्तु जी शय्या, त्या शय्येवर मरण्याची इच्छा नसलेल्या साहसी मंडळींची अतिशय कुचंबणा होते. दामोदरपंत चाफेकरांनी परक्या सरकारच्या सैन्याप्रमाणेच बडोदें, ग्वाल्हेर, इंदूर, हैद्रावाद, सांगली, गोवें येथील सरकारच्या सैन्यातूनही प्रवेश मिळविण्यासाठी अनेक प्रयत्न केले होते. पण परशत्रूच्या दहशतीमुळे त्यांना कोणत्याही सैनिकी तुकडीत प्रवेश मिळाला नाही. ही गोष्ट एका परीने चांगलीच झाली. कारण आपल्या देशमातेने जी जीवनाची ठेव आपल्या हाती दिली असते, ती ठेव त्या देशमातेप्रीत्यर्थ लढत मरताना परत तिच्या स्वाधीन करण्यात जें स्वर्गीय सुख आहे, तें सुख काही आपल्या शत्रूंच्या शत्रूविरुद्ध लढून मरण्याने लाभू शकत नाही. १८७७ मध्ये भारतात ब्रिटिशांच्या साम्राज्याची स्थापना झाल्यापासून ब्रिटिशांच्या साम्राज्यविस्ताराप्रीत्यर्थ लढून परदेशांतील स्वातंत्र्यवाद्यांचे शिव्याशाप संपादन करण्याचा अधिकार तेवढा नामधारी भारतीय सैनिकांस लाभला होता. म्हणजे पारतंत्र्याचा ग्रांथिक सन्निपात (प्लेग) पसरविणाऱ्या विश्वासाच्या पिसवा या नात्याने भारतीय सैनिक इंग्रजांच्या जगातील प्रभावक्षेत्रांतून संचार करीत होते. अशा परिस्थितीत चाफेकरांनी स्वदेशाच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थही नव्हे, तर केवळ, पारतंत्र्यातही पुण्यनगरीची मान ताठ रहावी, एवढ्याच हेतूने फाशीच्या वेदीवर तिघाही बंधूंचें एका सन्मित्रासह बलिदान करून स्वर्गीय देवतांचे हार कंठी घालून घेण्याचा अभिनव मार्ग दाखवून दिल्यामुळे तत्कालीन तरुणांचीं हृदयें व्यथित झालीं असलीं तरी त्यांच्या मुद्रा प्रफुल्ल झाल्या आणि त्यांच्या अंगावर हर्षाचे रोमांच उभे राहिले. सत्तावन्नच्या भाग्यशाली पिढीनंतर स्वतः वासुदेव बळवंतांनाही जें भाग्य लाभलें नाही, तें भाग्य चाफेकरांनी आपल्या उदाहरणाने सर्व देशभक्त तरुणांना मातृ-

भूमीचा मान राखण्याकरिता आपली मान फासातही अडकवून घेण्याला सिद्ध होणाऱ्या देशाभिमान्यांना उपलब्ध करून दिलें. आपल्या बलिदानाने त्यांनी फाशीचा स्तंभ हा राजांच्या सिंहासनापेक्षा,तसेंच राजाज्ञेप्रमाणे न्यायवितरण करणाऱ्या न्यायासनांपेक्षा अधिक उच्च असल्याचें सिद्ध करून दिलें.

Right forever on the scaffold
Wrong for ever on the throne.

अधर्मच सिंहासनावर अधिष्ठित झाल्यावाचून धर्मनिष्ठांना फाशीच्या काष्ठांना आलिंगन देण्याची संधि कशी लाभणार? चाफेकरांच्या सारख्या साहसी व्यक्ति समाजात संचार करीत असतात, तोपर्यंत त्यांच्या संसर्गाने आपल्यावरही आपदा येतील या भीतीने संसारी लोक त्यांचा द्वेष करतात. पण त्यांच्या बलिदानानंतर सर्वांचीच दृष्टि त्यांच्या फाशीच्या स्तंभावर खिळून राहते. त्यांच्या उदाहरणाने, हिंदुत्वनिष्ठ तरुणांना त्यागाच्या ज्या अभिनव आदर्शाने आवाहन केलें आणि आकृष्ट केलें, तो आदर्श नेहमीच्या निधि मागावयाला येणाऱ्यांनी जनतेच्या नेत्रांसमोर धरलेल्या रुपये, आणे, पै, यांच्या त्यागाच्या भिकार आदर्शापेक्षा अगदीच भिन्न आणि अतीव उदात्त होता. या आदर्शाचें अपूर्व रूप हें चितोडगडाच्या राज्यलक्ष्मीने 'मैं भूखी हूँ' असा उद्गार काढून पद्मिनीच्या पुत्रांना रणयज्ञात आपली आहुति टाकण्याचें जें आवाहन केलें होतें, त्या आवाहनाचेंच हें अभिनव स्वरूप होतें. असा आदर्श अनेक पिढ्यांतून एखाद्याच पिढीला लाभू शकतो. अशा आदर्शाच्या आवाहनाची तुतारी वाजू लागली की, असंख्य तरुण तरुणी आपलें लिंग आणि वय विसरून याच्या आराधनेप्रीत्यर्थ आत्माहुति समर्पण करण्याकरिता आतुर होतात. ज्यांना त्यांच्या मातापित्यांनी सर्व संकटांपासून सुदूर, सुखासमाधानात इतकेंच नव्हे तर विलासातही ठेविलें असतें, असे तरुणही अशा प्रसंगी विलासाच्या पिंजऱ्यातून बाहेर पडून, स्वार्थाचें कवच भेदून आत्मार्पणाला सिद्ध होतात. रँडच्या हाताखालील पशुतुल्य गोऱ्या सैनिकांनी पुण्यनगरीची सर्वप्रकारे विटंबना केल्यानंतर जे नागरिक साहाय्य याचनेसाठी आकाशातील प्रभूचा वेध घेऊं लागले आणि धावा करूं लागले, त्यांना अकस्मात् नित्याच्या संसारी जीवनात न दिसणारीं कर्तव्यें, कीर्ति, देशभक्ति, तसेंच भूतांचें पालन आणि कंटकांचें निर्दळण करणारी दया यांचीं अलौकिक शिखरें उंच आकाशात दिसूं लागलीं. पण या साऱ्या नील शिखरांहून अत्युच्च आणि शववस्त्राप्रमाणे भासणाऱ्या बर्फाने आच्छादिलेलें आत्मयज्ञाचें शिखरच त्यांना स्वर्गद्वाराला जाऊन भिडलेलें

दिसू लागलें. या शिखरानेच महाप्रस्थानाला चाललेल्या चाफेकरांना मोह घातला, सावरकरांना मोह घातला. त्यांच्यानंतर वंग आणि पंजाब प्रांतांतील झुंडीच्या झुंडी हें शिखर चढून जाण्याला सिद्ध झाल्या. आकंठ भोजन केलेल्या पाहुण्यांप्रमाणे कृतकृत्य होऊन त्यांनी या जीवनाचा निरोप घेतला. हा केवळ अर्थवाद नसून फाशीची शिक्षा सांगितल्यानंतर या हुतात्म्यांपैकी अनेकांचें वजन वाढल्याच्या कथा सुप्रसिद्ध आहेत. फ्रेंच क्रांतिकारकांचे नेते सीएस यांनी म्हटलेंच आहे.

Political oppression can never be right and resistance to oppression can never be wrong.

दामोदरपंतांची फाशी का अर्वाचीन काळातील पुरुषमेध ?

प्राचीन काळी पुरुषमेधात बळी देण्याकरिता एखाद्या सर्वगुणसंपन्न पुरुषाची निवड झाली की त्याला वर्षभर मनसोक्त विहार करू देत असत. या अवधीत त्याने स्त्रीसंग तेवढा करावयाचा नसे आणि याकरिता त्याच्यावर सतत देखरेख ठेवीत. ही गोष्ट लक्षात ठेवून चाफेकरचरित्रातील पुढील उतारा वाचला म्हणजे चाफेकरांची फाशी हा वैदिक मंत्रांवाचून झालेला अर्वाचीन पुरुषमेध असल्याचें कळून येईल. "चाफेकरांच्या गुणांच्या स्तुतिपर आणि इतरेजनांच्या भ्याडपणाच्या धिक्कारपर उक्तींनी ब्रुइनने सातच दिवसांत त्यांचें मन वधाचें दायित्व न स्वीकारण्याच्या निर्धारापासून विचलित केलें. भारतीय गुप्त हेरांच्या कर्तृत्वगाथांत हा त्याचा प्रयोग अजोड होता. एकीकडे तू वध केल्याचें मान्य केल्यास तुला फाशी न देता काळें पाणी मिळावें अशी व्यवस्था करू, पुढे चारपांच वर्षांतच तुला सोडवून आणू, पारितोषिकाचे वीस सहस्र रुपयेही तुलाच देऊ. तुझ्या नांवाने देऊळ उभारू, तुझ्या पत्नीलाही प्रतिमासी पंचवीस रुपये मिळण्याची व्यवस्था करू, अशीं वचनेंही ब्रुइनने त्यांना दिलीं. दुसरीकडे त्यांना असंभाव्य वाटणारा त्यांचा पाहुणचार ब्रुइनने आरंभिला होता. भरपूर आणि मिष्टान्नाचें जेवण, पत्ते, गंजिफा इत्यादि करमणुकीचीं साधनें, एक सुसज्ज दिवाणखाना, त्यात मेज, खुर्च्या, गाद्या, गिरद्या, लोड आणि व्यायामाचीं साधनें, फिरावयाला घोडागाडी, उंची कपडे, धर्मादायासाठी द्रव्य, देवदर्शन, लेखनसाहित्य, रक्षकांच्या देखरेखीखाली भ्रमण, इतक्या सोयींचा थाट ब्रुइनने त्यांच्यासाठी ठेवला. प्रथम त्यांनी स्वेच्छेने निवेदन करावें म्हणून नि निवेदन केल्यानंतर तें फिरवू नये म्हणून आणि सरतेशेवटी एवीतेवी आता फाशी जाणारच आहेत म्हणून त्यांचा तो थाट स्वर्गारोहणापर्यंत ब्रुइनने आणि सरकारने तसाच चालू ठेवला." तेव्हा चाफेकरांच्या फाशीला महाराष्ट्राने, अवैदिक

पद्धतीने अर्वाचीन काळी केलेला पुरुषमेध म्हणणेंच युक्त होईल. महान् संकटात सापडलेला मानव एका अर्थी पवित्र असतो. कारण तो देवाच्याच सान्निध्यात असतो.

ब्रुइन स्वतःच टिळकांचे हस्तक

दामोदरपंतांना भुरळ घालून ब्रुइन महाशयांनी त्यांना रँडवधाची मान्यता द्यावयाला लाविली, हें जरी खरें असलें तरी ते स्वतःच टिळकांच्या प्रभावपाशात सापडले होते, ही गोष्ट त्यांच्या निधनानंतर टिळकांनी लिहिलेल्या मृत्युलेखावरून उघड होते. "रँड यांच्या वधाकरिता नातू आणि टिळक यांच्या व्यतिरिक्त आणखी अनेक सद्‌गृहस्थांना कटवाले ठरवून बंदिशाळेत धाडता आलें तर त्या वेळी सरकारला हवें होतें आणि ही गोष्ट ब्रुइन यांनी केली असती तर त्यांची सरकारात फार वाहवा झाली असती. पण ब्रुइन यांनी त्या वेळीं डोकें फिरून गेलेल्या गोऱ्या अधिकाऱ्यांच्या धोरणाविरुद्ध वर्तन केलें. त्यांनी आपलें डोकें शांत ठेवलें. खरा प्रकार तेव्हाच ताडला. धूर्तपणाने चौकशी केली, मारहाण केली नाही आणि पुण्यावरील हें संकट टाळलें. किंबहुना त्या वेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जाऊन खोटया चहाडया सांगणारे बडे लोक आपल्यातीलच निघाले. पण ब्रुइन यांचें वर्तन त्याच्या अगदी उलट ठरलें." या अवतरणावरून आंग्लहिंदु ब्रुइन यांच्या मनातील देशाभिमान जाग्रत् करून टिळकांनी त्यांना पुण्यावरील संकट टाळण्याला प्रवृत्त केलें असल्याचें स्पष्ट होतें. केळकरांनाही या घडामोडींची कल्पना होती. त्यांनीही टिळकचरित्राच्या दुसऱ्या खंडात लिहिलें आहे : 'रँडवधात टिळकांचें अंग होतें असें सिद्ध करण्याची सरकारची इच्छा असताना त्या इच्छेला ब्रुइन यांनी विघात केला. तरी पण व्यक्तिशः टिळकांना वाचविण्यापेक्षा एका राजकीय पक्षालाच ब्रुइन यांनी वाचविलें, हीच गोष्ट अधिक खरी.' रँडवधाच्या रात्री रवि कर्क १।, चंद्र मेष ९, नेपचून मिथुन २०॥, हर्शल वृश्चिक २५-४१।, शनि वृश्चिक २५-७, गुरु कन्या ४।॥, मंगळ सिंह २०॥ शुक्र वृषभ १६।॥, बुध मिथुन १० आणि राहु कुंभ ८ असे सायन ग्रह होते. या साऱ्या भयानक अशुभ योगांत गुरु हा शुभ ग्रह पुण्याच्या लग्नावर होता आणि त्यानेच पुण्याचा बचाव झाला. याचा अर्थ असा की टिळकांनी ब्रुइन महाशयांना वश करून घेतल्यामुळे पुण्याचा बचाव झाला.

निर्वासितांचे कारखानदार

चाफेकरांनी रँडवध केल्यानंतर पांच आठवडयांत टिळकांना

अटक झाली आणि पुढे दामोदरपंतांना अटक झाल्यानंतर त्यांचे दोघे भाऊ भूमिगत झाले. तसेंच त्याच वेळी सुप्रसिद्ध गुजराथी क्रांतिकारक श्यामजी कृष्णवर्मा हे निर्वासिताचें जीवन कंठण्यासाठी लंडनला निघून गेले. अशा प्रकारे एकाच वेळी आणि रँडवधाच्या एकाच कृत्यामुळे बंदि-जीवन, भूमिगत जीवन आणि निर्वासित जीवन या स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गावरील त्रिविध पथिकांच्या तीन संस्थांचे कार्यक्रम चालू झाले. या तीन संस्थांपैकी महाराष्ट्रात भूमिगतांची संस्था कधीच संख्येने फारशी प्रबळ झाली नाही. पण टिळकांच्या कारावरणानंतर ज्या ज्या देशभक्त तरुणांचें स्वतंत्रतेच्या मंत्रगुरूंजवळ उपनयन झालें होतें, त्यांना, त्यांना ब्रह्मचर्याश्रमाचें व्रत पाळण्याकरिता न्यूनाधिक काळ कारानिवास करावा लागला, ही गोष्ट सर्वांना सुविदित आहे. पण याच वेळी स्वतः निर्वासित जीवन कंठण्याकरिता लंडनला निघून गेलेले श्यामजी कृष्णवर्मा हे तेथे राहून कालक्रमाने निर्वासितांचे कारखानदारच बनले, ही गोष्ट लोकांच्या लगेच लक्षात येत नाही. लंडन येथे गेल्यानंतर श्यामजींनी १९०५ मध्ये लाला लाजपतरायांच्या शुभ हस्तें 'भारतगृह' (India House) या संस्थेचें उद्घाटन केलें. या भारतगृहात १९०६ मध्ये सावरकरांचा प्रवेश झाल्यानंतर या गृहात प्रवेश करणाऱ्यांनी भारतात परत प्रवेश कर-ण्याच्या आशेचा परित्याग करावा, अशी अदृश्य अक्षरांनी लिहिलेली पाटीच त्या गृहाच्या दारावर लागली. निर्वासित जीवनात देशभक्तांना परतंत्र स्वदेशाच्या मानाने प्रचारस्वातंत्र्य पुष्कळच अधिक लाभतें. त्याचाही उपयोग श्यामजींनी चांगलाच करून घेतला. ते लंडनमध्ये 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट' नांवाचें नियतकालिक स्वातंत्र्यवादाच्या प्रसाराप्रीत्यर्थ चालवीत आणि त्याच्या प्रती हिंदुस्थानात चोरमार्गाने पाठवून ते भारतातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत. श्यामजी कृष्णवर्मा यांचें लंडनमधील कार्य हा चाफेकरांच्या रँडवधाचाच एक अप्रत्यक्ष परिणाम आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण नववें

रँड हत्याकाण्डाचे परिणाम

युरोपातील गुप्त मंडळयांचा इतिहास

१८९४ च्या सुमारास महाराष्ट्रात क्रांतिकारक समित्यांचा प्रादुर्भाव झाला. त्याच काळी यांच्या मार्गदर्शनासाठी विश्वनाथ काशीनाथ राजवाड्यांनी १८९४ पासूनच चालू केलेल्या 'भाषांतर' मासिकातून 'युरोपातील गुप्त मंडळयांच्या इतिहासाचें एक भाषांतरही प्रसिद्ध झालें. 'भाषांतर' मासिकाचा प्रसार विद्याभिलाषी वर्गातच होत असला तरी त्या मासिकाच्या चालकांत शिवरामपंत परांजपे यांच्यासारख्या क्रांतिकारक नेत्यांचा समावेश झाला होता आणि त्यांचें स्वतःचें 'काळ' पत्र निघून निरनिराळया देशांतील क्रांतिकारक चळवळींची माहिती त्यातून स्वातंत्र्याभिलाषी वाचकांना उपलब्ध होण्यापूर्वी युरोपातील गुप्त मंडळयांच्या इतिहासाचा त्यांनी क्रांतिकार्याच्या प्रचारासाठी शक्य तितका उपयोग केला असला पाहिजे. या मासिकाला बडोदेकरांनी पाचशे रुपयांची देणगी दिली होती. त्या दिवसांत 'युरोपातील गुप्त मंडळ्या' यांसारखे मार्गदीप मिळविण्याकरिता क्रांतिकारकांना कसें जिवाचें रान करावें लागे, हें लाजपतरायांच्या आत्मचरित्रावरून सुव्यक्त होतें. त्यांच्या तरुणपणी लाहोर येथील एका प्रमुख गृहस्थाजवळ गुप्त मंडळयांचा एक इतिहास होता. तो लाजपतरायांना पहावयाला मिळत असे, पण घरी न्यावयाला मिळत नसे. शेवटी त्यांनी लंडनला गेलेल्या एका विद्यार्थ्याकडून त्या ग्रंथाची प्रत इंग्लंडहून आणविली. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे 'भाषांतर' मासिकाने क्रांतिकारक पक्षाची किती अमोल कामगिरी बजाविली होती, याची वाचकांना कल्पना येईल. या ग्रंथाचा उपयोग चाफेकरांच्या समितीने कितपत करून घेतला, हें समजण्याला साधनें उपलब्ध नाहीत. पण द्रविड बंधूंच्या वधात भाग घेणारे महादेवराव रानडे हे 'भाषांतर' मासिकाच्या संपादकांचे भागिनेय होते आणि त्या निमित्ताने ते फाशीही गेले. पुढे सेनापति बापटांनी पारीनगरीतील रूसी क्रांतिकारकांकडून क्रांतीचे धडे घेतले आणि त्या धड्यांची पुस्तिका हीच तेव्हांपासून क्रांतिकारकांची गुप्त गीता बनली.

अंधेरी नगरी आणि झोटिंग पाच्छाई

ग्रंथिक सन्निपाताच्या दिवसांत पुण्यातील बहुतेक सुशिक्षित आणि सुखवस्तु लोक नगरातून निघून गेले असल्याने तेथे अंधेर नगरीच निर्माण झाली होती आणि या अंधेरनगरीत रँडचे लोक झोटिंगपाच्छाई चालवीत होते. स्वतः रँड हा मनाने नीच आणि हिंदुद्वेष्टा म्हणून आधीच प्रसिद्धीला आला होता. २७-९-१८९४ या दिवशी वाद्यनिर्बंधाचा भंग केल्याच्या निमित्ताने त्याने वाईतील तीन सावकार, नगरपालिकेचे प्रमुख, परगणा पालिकेचे (लोकल बोर्डाचे) प्रमुख आणि इतर आठ सभ्य गृहस्थ यांना सश्रम कारावासाच्या शिक्षा सांगितल्या होत्या. या शिक्षा सांगताना रँडमहाशयांनी आपलें काळेकुट्ट अंतःकरण व्यक्त करताना उद्‌गार काढले होते : 'It is not less clear to me as these men are all of respectable high caste families, they will feel more than others the degradation and inconvenience of imprisonment.' हे सारे आरोपी समाजात प्रतिष्ठित आणि उच्चकुलीन असल्याने बंदिवासातील विटंबना आणि हालअपेष्टा त्यांना चांगल्याच जाणवतील. असले परपीडक मनोवृत्तीचे, लोकांच्या छळात आनंद मानणारे हे अधिकारी प्लेगनिर्बंधाने पुण्याचे सर्वाधिकारी बनून इथे आल्यावर त्यांनी जो धुमाकूळ घातला त्याचें यथार्थ वर्णन कोणीच केलेलें नाही. उदाहरणार्थ ११-३-१८९७च्या 'देशमित्रा'वरून समजतें की, एके दिवशी बुधवार, शुक्रवारातील काही भागांना २०० स्वार आणि १०० पायदळ सैनिक आणून रँड महाशयांनी वेढा घातला. पुरुष, बायका, मुलें, यांना उघडे, बोडकें, अनवाणी असे युद्धबंद्यांप्रमाणे अथवा अटक केलेल्या चोर लुटारूंच्या टोळ्यांप्रमाणे प्लेगच्या छावण्यांकडे हाकून नेलें. त्यांच्या पाठीमागे त्यांच्या घरांतील वस्त्रप्रावरणांची जाळपोळ चालू झाली. अधिकाऱ्यांच्या समक्षच दुकानें फोडून लुटलीं गेलीं. १५ मार्चच्या 'ज्ञानसागर'ने लिहिलें होतें की, या जाळपोळीमुळे आणि घरफोड्यांमुळे पुण्याला जिंकून लुटलेल्या नगराची अवकळा आली आहे. रँडची प्लेगतपासणीची पद्धति आफ्रिकेतील निग्रोंनीच कदाचित् सहन केली असती. पुरुषांना अक्षरशः नागव्याने उभे करीत आणि बायकांना चोळ्या काढून, तसेंच लुगडीं वर करून उभ्या करीत. हें अत्याचार थांबविण्याची विनंती करण्याकरिता नागरिकांचें एक शिष्टमंडळ रँडमहाशयांना भेटलें आणि त्यांच्या विनवण्या केल्या की अशा प्रकारे आमच्या बायकांची राजमार्गावर विटंबना करू नका. तेव्हा त्यांनी औदार्याचा आव आणून सांगितलें की, पडदा पाळणाऱ्या मुसलमान स्त्रियांना हा छळ वाटेवर सोसावा लागणार नाही.

पण हिंदु आणि इतर धर्मांच्या लोकांच्या घरांतून मुसलमानांच्या घरां-पेक्षा अधिक अंधेर असल्याने त्यांच्या बायकांची राजमार्गावरच विटंबना करणें आवश्यक आहे. रँडच्या झोटिंगपाच्छाईत असेही प्रकार घडत होते की, त्यांच्या एका टोळीने धडधाकट लोकांना प्लेगच्या संशयावरून धरून रुग्णालयात न्यावें आणि लगेच दुसऱ्या टोळीने त्यांच्या कुटुंबा-तील इतर सर्व व्यक्तींना संसर्गाच्या निमित्ताने प्लेगच्या छावण्यांतून पाठवून घरातील सामानाची लुटालूट आणि जाळपोळ करावी. तो काल्पनिक रोगी रुग्णालयातून निरोगी असल्याचें सुटकापत्र घेऊन येतो, तों त्याला आपल्या घराची वाताहत झाल्याचें दृश्य दिसून येई. या साऱ्या अमानुष अत्याचारांनी त्या वेळी लोकांच्या अंतःकरणातील प्रति-काराच्या भावनेची तीव्रता इतकी वाढली होती की काही खरे लोकहित-वादी कोणतेंही साहस करावयास सिद्ध झाले होते. इतरांच्या मनांतून तेंच साहसाचे विचार थैमान घालीत होते आणि असल्या साहसी कृतींना, विचारांना विरोध करणारे कोणीच उरलें नव्हतें. या प्रकरणी जे फासा-वर चढले, तेही कृतकृत्य होऊन उद्गारले, 'आमची प्रतिज्ञा सफळ झाली. आता ध्येय आणि दैव या दोनही दैवतांना अंतिम प्रणाम.'

रँडवधानंतर त्यांच्या अत्याचारांचा निषेध

या वेळी पुणेकरांच्या भावनेची तीव्रता किती वाढली होती, याचें एक प्रमाण म्हणजे गोखल्यांच्या सारख्या इंग्रजभक्तांनी सुद्धा रँडवधा-नंतर का होईना क्षणभर विचलित होऊन गोऱ्या सैनिकांच्या पुण्यातील अत्याचारांना इंग्लंडातील मँचेस्टर गार्डियन पत्रात प्रसिद्धि दिली. या क्षणाचा त्यांना जो लगेच पश्चात्ताप झाला, त्यानेच पुण्याच्या नागरि-कांना या कोल्हापुराहून आयात केलेल्या पुढाऱ्याची ओळख पटली. फाटकांच्या गोखलेचरित्रात पुणेकरांनी गोखल्यांना ओळखलें नाही, असा आरोप केला आहे. हा आरोप किती निर्मूल आणि निराधार आहे, याचें विवेचन आता संक्षेपाने केलें पाहिजे. १८९७ मध्यें रँड आणि त्यांनी पुणेंकरांवर मोकाट सोडलेले गोरे सैनिक यांच्या असहनीय अत्या-चारांमुळे या नगरीच्या जीवनात जणू प्रलयकाळ ओढवला होता. तेव्हा गोखले इंग्लंडात होते आणि त्यांनी पुण्यातील सैनिकांच्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी थोडे तरी हातपाय हलवावेत, म्हणून त्यांचे मित्र आणि अनुयायी त्यांना हृदयद्रावक (Piteous) पत्रें लिहीत होते, असें स्वतः गोखल्यांनीच वर्णन केलें आहे. हीं सारीं पत्रें वाचूनही

आणि पुण्याहून आलेलीं वर्तमानपत्रें पाहूनही या मवाळांच्या राजाला काहीही हालचाल करावी, असें वाटलें नाही. त्यांनी पत्रलेखकांना लिहिलें की तुम्ही लॉर्ड सँढर्स्ट यांचा धावा करा. जणू काही त्या हतभाग्य नागरिकांनी आधीच तो उपाय अथवा उपचार केला नव्हता. वस्तुस्थिति अशी होती की पुण्यावर गोऱ्या सैनिकांना मोकाट सोडण्याला स्वतः लॉर्ड सँढर्स्ट यांनीच विरोध केला होता; पण वरिष्ठांच्या निकराच्या आज्ञांपुढे त्यांचा निरुपाय झाला होता. त्या वेळी ग्रंथिक सन्निपाताने लागलेल्या रोग्यांचा शोध करण्याच्या निमित्ताने गोरे सैनिक कोणत्याही घरात घुसून तेथे लुटालूट करीत आणि तेथील स्त्रीपुरुषांची विटंबना करीत. स्वतः गोखल्यांनीच 'मँचेस्टर गार्डियन' या पत्राला दिलेल्या निवेदनाप्रमाणे स्त्रियांना तपासणीच्या निमित्ताने राजमार्गावर ओढून आणून उघड्या करीत. ४–८–१८९७ या दिवशी मुंबईच्या विधिमंडळात बोलताना लॉर्ड सँढर्स्ट यांनी हा आरोप अंशतः मान्य केला आहे.

A great many houses in Poona are extremely dark. It was considered necessary to get all the inmates of such houses, not always in the streets but into some lighted room or into a courtyard to see if they looked ill. If there were indications that the persons were not in good health, a medical examination did ensue, but with every regard to decency.

पूर्वीच्या काळी चोरडाकूंच्या भीतीने घरें अंधेराने भरलेलीं असत आणि घरांचीं दारेंही ठेंगणीं असत. त्यांतून अपरिचित लोकांना सहज संचार करता येत नसे. तेव्हा लॉर्ड सँढर्स्ट म्हणतात की अशा घरातल्या एखाद्या उजेडाच्या खोलीत किंवा अंगणात परीक्षा करण्याची सोय नसल्यास मगच राजमार्गावर स्त्रीपुरुषांची तपासणीच्या निमित्ताने विटंबना होत असे. सैनिकांची तपासणी सभ्यपणाच्या मर्यादा संभाळून होत होती, असें जरी लॉर्ड सँढर्स्ट म्हणत असले तरी पुरुषांना पूर्ण विवस्त्र करून आणि स्त्रियांना अर्ध विवस्त्र करून ही तपासणी होत असे. ग्रंथिक सन्निपातात खाकेत, जांघेत अथवा पोटऱ्यांत गोळे येतात. तेव्हा या तीन ठिकाणची तपासणी किती सभ्यपणाने होत असेल, याची वाचकांना कल्पना येईलच. वास्तविक पाहता ही तपासणी करण्याची आवश्यकताच नव्हती. कारण या रोगात रोग्यांना तीव्र ज्वर येतो. तेव्हा केवळ तीव्र ज्वर आलेल्या व्यक्तींची पाहणी केली असती तरी भागलें असतें. पण ज्या दुर्दैवी स्त्रियांना त्या दिवसांत पुणें सोडून अन्यत्र जाता आलें नव्हतें, त्यांना दुःशासनकृत (वाईट राज्यकर्त्यांकडून) द्रौपदीवस्त्रहरणाचा

अनुभव देण्याचा संकल्प लॉर्ड सँढर्स्ट यांच्या वरिष्ठांनी केला होता आणि या संकटांत, त्यांच्या नातवाइकांनी आधुनिक गोपाळाचा धावा केला असता, त्याने कसलीही हालचाल करावयाचें नाकारलें. या आणी-बाणीच्या प्रसंगी आपण कोणतीही हालचाल करावयाचें कां नाकारलें, याचें खरें कारण स्वतः गोखले यांनीच ६–१–१८९८ या दिवशी आपल्या टीकाकारांना दिलेल्या उत्तरात आढळून येतें. Every instinct of self was counselling me to keep away. अर्थात् स्वतःची कातडी बचावण्याकरिता मी या विस्तवाशी खेळ करू इच्छीत नव्हतो. पण गोखल्यांनी दादाभाईंच्याकडून इंग्लंडच्या लोकसभेत प्रश्न विचारून हे अत्याचार उजेडात आणले असते तर त्यांच्या सत्यासत्यतेची लगेच चिकित्सा झाली असती आणि सरकारला आपले हात आवरावे लागले असते. त्यामुळे कदाचित् रँडचा वध आणि त्याच्या अनुषंगाने महा-राष्ट्रावर ओढवलेलें संकटहीं टळलें असतें. मग 'आई, हा बघ माझा बाळ, तुझा गोपाळ' असें म्हणण्याची संधिही मेळेवाल्यांना मिळाली नसती.

विवेकभ्रष्टाचा विनिपात

पण ही साधी, सरळ गोष्ट न करता, रँडचा वध होऊन इंग्लंडा-तील लोकमत पुणेकरांविरुद्ध पराकाष्ठेचें प्रक्षुब्ध होईपर्यंत गोखले मौन धारण करून बसले आणि मग घरी परत येण्याची वेळ झाली, तेव्हा 'अहो पुढारी महाराज, आपण पुण्यासाठी काय केलेत ?' असें विचा-रून लोक तोंडात गोमय घालतील या भीतीने त्यांनी मँचेस्टर गार्डियन पत्रात एक निवेदन प्रसिद्ध करविलें. या निवेदनात त्यांनी, गोऱ्या सैनि-कांनी पुण्यात चालविलेल्या लुटालुटीवर, गृहदेवतांच्या भ्रष्टीकरणावर आणि स्त्रीपुरुषांच्या विटंबनेवरच भर दिला असता तर त्या निवेदनात टीकाकारांना 'विवर' सांपडलें नसतें आणि गोखल्यांच्या विरुद्ध रान उठविण्याची इंग्रजांना संधि मिळाली नसती. पण या निवेदनातच आपल्या मित्रांच्या नीतिधैर्यावर विश्वास ठेवून गोखल्यांनी असें एक विधान केलें होतें की, गोऱ्या सैनिकांनी दोन स्त्रियांवर बलात्कार केले आणि त्यांच्यापैकी एकीने आत्महत्त्या केली. आता प्रत्येक संपादकाला ही गोष्ट माहीत असते की, बलात्काराचे आरोप सिद्ध करणें अतिशय अवघड असतें आणि गोखल्यांनी संपादकाचा व्यवसायही काही वर्षं केला होता. दुसरी गोष्ट अशी की, बलात्काराच्या वैयक्तिक उदाहरणां-पेक्षा सरसकट पुण्यनारींना अर्धवट तरी विवस्त्र करून राजमार्गावर

त्यांची जी पण्यनारींप्रमाणे विटंबना केली जात होती, ती अधिक लज्जास्पद होती. त्या विटंबनेकडे लक्ष वेधण्याच्या दृष्टीने बलात्कारांच्या भडक उदाहरणांचा उल्लेख करणें इष्ट नव्हतें. बरें, असा आरोप करणाऱ्यांच्या अंगी मोतीलाल नेहरूंच्याप्रमाणे धारिष्ट असतें तर आपल्याविरुद्ध उठविलेलें सारें काहूर त्यांनी धुडकावून दिलें असतें. एकदा मोतीलाल नेहरूंना राजबंद्यांच्या अमानुष छळासंबंधीचीं त्यांचीं विधानें साधार सिद्ध करण्याचें आव्हान सरकारने दिलें असता त्यांनी निर्भयपणे उत्तर दिलें. 'What am I to substantiate ? Am I to substantiate human nature ?' तेव्हा गोरा सैनिक ही काय चीज आहे, हें साऱ्या जगाला माहीत आहे, असें उत्तर गोखल्यांना देता आलें असतें. पण त्याच क्षणी त्यांना आपल्या पाठीवरील मऊ कातडीची आशा सोडावी लागली असती. कारण त्या दिवसांत पायोनियर पत्राच्या गोऱ्या संपादकाला सुद्धा त्याच्यावर चिडलेल्या गोऱ्या सैनिकांनी चाबकांनी झोडपलें होतें.

क्षमायाचनेतील गोखल्यांचे सहकारी

पुण्यात गोऱ्या सैनिकांचें पेंढारी धुमाकूळ घालीत असताना त्यांच्या अत्याचारांचा पुणेकरांनी 'He rights such wrong where it is given' या न्यायाने लगेच हातघाईवर येऊन प्रतिकार करावा असा प्रचार एकट्या 'सुधारक' पत्राच्या संपादकांनीच चालविला होता. पण त्या प्रसंगाची संधि साधून भिकार सैनिकांना नव्हे तर त्या सैनिकांच्या सूत्रधारांनाच शासन करून देशाच्या राजकारणाला राज्यक्रांतीचें वळण लावण्याचा टिळकांचा निश्चय होऊन चुकल्यामुळे त्यांनी त्या अत्याचारांचा नुसता निषेध करून त्याचा परिणाम बरा होणार नाही, एवढीच सरकारला सूचना दिली होती. या अत्याचारांचा सूड घ्यावयाचें ठरलें असल्याने त्यांना या प्रकरणी वाचिवीर्याचें प्रदर्शन करण्याचें काहीच कारण नव्हतें. तरीसुद्धा सरकारने त्यांच्याविरुद्ध अभियोग चालविल्यामुळे स्वाभाविकपणे सुबुद्ध लोकांत 'सुधारकां'तील लेखांसंबंधी चर्चा चालू झाली. तेव्हा दक्षिण शिक्षासंस्थेच्या व्यवस्थापक मंडळाचे गोरे अध्यक्ष आचार्य सेल्बी यांनी त्या लेखांच्या निषेधाप्रीत्यर्थ आपल्या पदाचें त्यागपत्र दिलें. कारण सुधारकाचे संपादक सीतारामपंत देवधर आणि लेखक वासुदेव बळवंत पटवर्धन हे त्या संस्थेचे आजीव सभासद होते. पण देवधर-पटवर्धनांनी आपल्या लेखनशौर्याविषयी खेद व्यक्त केल्यानंतर सेल्बी महाशयांनी पुढील परिणामापासून त्यांचें

संरक्षण केलें, असें त्या संस्थेच्या इतिहासात सांगितलें आहे. सुधारकातील लेख पटवर्धनांनी लिहिले होते आणि त्यांचें डोकें दामोदरपंत चाफेकरांनी सडकलें होतें, ही गोष्ट वाचकांनी येथे ध्यानात ठेवावी. 'सुधारका'च्या संपादकांच्या कर्तृत्वाची अधिक चर्चा पुढे येईलच.

लॉर्ड सँढर्स्ट यांचें निर्लज्ज निवेदन

पुण्यावर मोकाट सोडलेले गोरे पेंढारी स्त्रियांवर हात टाकतील, याची मुंबईच्या राज्यपालांना कल्पना असली तरी त्यामुळे हिंदी स्त्रियांची विटंबना होते, ही कल्पनाच त्यांना मान्य नव्हती. त्या दिवसांत लॉर्ड सँढर्स्ट यांनी पार्लमेंटापुढे केलेल्या निवेदनात पुढील निर्लज्ज विधान आढळतें. 'I do not believe the possibility of indignity to Native Women.' त्यांच्या मताप्रमाणे एतद्देशीय स्त्रियांना 'डिग्निटी'च नसल्याने तिला कमीपणा तरी कसा येणार? या दिवसांत स्त्रियांची जी अभूतपूर्व विटंबना चालू होती, तिचें वर्णन पंडिता रमाबाईंनी अमृतबाजार पत्रिकेतून केलें होतें. त्यांनी केलेलें ग्रंथिक रुग्णालयांचें आणि संसर्गबाधा झालेल्यांचें वर्णन वाचून वाचक आजारी पडलें नाहीत तरच नवल ! असो. संसर्गबाधेच्या निमित्ताने पुणेकरांना घराबाहेर काढल्यानंतर रिकाम्या घरांतून गोरे सैनिक लुटालूट करीत असत, हें पुराव्याने सिद्ध करण्याचीही आवश्यकता नाही. ज्यांना पुरावाच हवा असेल, त्यांना इतकीच आठवण देतो की १९४० च्या बाँबवर्षावाच्या दिवसांत लंडनचे नागरिक घरें मोकळीं टाकून निवाऱ्याच्या ठिकाणी निजावयास गेल्यानंतर त्यांचीं घरें लुटण्याचें काम इंग्रज सैनिक आवश्यक कर्तव्य म्हणूनच करीत असत. तेव्हा पुण्यातील नागरिकांचीं घरें त्यांनी न लुटता राहू दिलीं असतील, अशी कल्पनाही करता येत नाही. अशा सैनिकांच्यापाशी क्षमायाचना करताना गोखल्यांनी लिहिलें आहे की, गोरे सैनिक सांसर्गिक रोगापासून पुण्याचा बचाव करीत असताना त्यांच्या लीलांकडे औदार्यबुद्धीने पाहणें हें त्यांच्या टीकाकारांचें कर्तव्य होतें. पण 'गोऱ्या सैनिकांनो, तुम्ही आमच्या घरात घुसून येथील सांसर्गिक रोगाचीं बीजें नष्ट करा' अशा त्यांच्या विनवण्या काही पुणेकरांनी केल्या नव्हत्या. मग त्यांचे सारे अपराध निमूटपणे सहन करून आपलें कनक आणि प्रसंगविषयी कांताही त्यांनी आत्मीयतापूर्वक हाताळल्यानंतर त्यांचें अंतःकरणपूर्वक आभार मानण्याचें दायित्व गोखल्यांनी आपल्या कुप्रसिद्ध क्षमायाचनेच्या लेखाने स्वतःवर लादलेलें पाहून पुणेकरांचीं मनें गोखल्यांच्या विरुद्ध पराकाष्ठेचीं प्रक्षुब्ध होऊन गेलीं यात नवल

काय ? टिळकपक्ष बंडाची सिद्धता करीत असल्याच्या चहाड्या वेळोवेळी सरकारच्या कानी घातल्यामुळेच ग्रंथिक सन्निपाताच्या निःपाताच्या निमित्ताने सरकारने पुण्यावर गोरे सैनिक सोडले असल्याने त्यांच्या साऱ्या लीलांचें कौतुक करणें रानडेपक्षाच्या वर्तमानपत्रांचें कर्तव्यच होतें. या कर्तव्याच्या उलट वर्तन त्या पत्रांनी आणि त्या दिवसांत गुरुत्वाकर्षणातून सुटून लंडनला गेलेल्या गोखल्यांनी केलें, तेव्हा त्यांच्या गुरुंनी त्यांचे कान धरून त्यांच्याकडून सरकारचें समाधान होईल, असें तें कुप्रसिद्ध क्षमायाचनेचें पत्र लिहून घेतलें. फाटकांनी आपल्या गोखले चरित्राचें जें भारूड लिहिलें आहे, त्यात त्या कुप्रसिद्ध पत्राचा उतारा घेण्याचेंही टाळलें आहे. एवढ्यावरून गोखल्यांच्या चरित्रकाराचें मन त्याला कसें खात आहे, याची वाचकांना कल्पना येईल.

गोखल्यांची शरणागति टाळण्याचे टिळकांचे प्रयत्न

या आणीबाणीच्या प्रसंगी गोखल्यांनी आपलीं सर्व विधानें परत घेऊन सपशेल शरणागति पतकरल्यास अनन्वित हाल सोसलेल्या पुणेकरांच्या विटंबनेचा कळस होईल, यासाठी टिळकांनी असली क्षमायाचना टाळण्याचा प्रयत्न केला. तेव्हा रानडेपक्षात रघुनाथ दाजी नगरकर हे एक प्रमुख गृहस्थ होते. त्यांना टिळकांनी वासूकाका जोशी यांच्या द्वारा निरोप पाठविला की 'तुम्ही गोखल्यांना कळवा, विधानें परत घेऊन क्षमा मागण्याचें काही कारण नाही, मी हवा तितका पुरावा गोळा करून देतो. तो प्रसंग एकट्या गोखल्यांवर नसून आपणां सर्वांवर आहे, अशा जाणिवेने टिळक उद्योगाला लागले होते. २०-७-९७ च्या 'केसरी'त त्यांनी पुणेकरांना अशी विनंती केली की सैनिकांच्या दुर्वर्तनासंबंधी ज्या कोणाला साधार गाऱ्हाणीं करावयाचीं असतील, त्यांनी तीं गाऱ्हाणीं पुराव्यासह टिळकांच्याकडे आणून द्यावींत. या विनंतीस अनुसरून पुणेकरांनी पुराव्यासह जीं गाऱ्हाणीं टिळकांकडे आणलीं, तीं घेऊन ते २७ जुलैला मुंबईला गेले. त्या दिवशी रात्रीच त्यांना राजद्रोहासाठी अटक झाली. गोखले ३० जुलैला मुंबईला पोचताच अरविंदबाबूंचे मित्र बॅ. केशवराव देशपांडे यांनी आगनावेवरच त्यांना गाठून त्यांच्याजवळील सर्व कागदपत्र हस्तगत केले. त्यांच्यामागून मुंबईचे रक्षकप्रमुख गोखल्यांकडे येऊन त्या कागदपत्रांची मागणी करून हात हलवीत परत गेले. मुंबईत उतरल्यावर गोखले, रानडे आणि फिरोजशहा यांना भेटले. या भेटीत रानड्यांनी त्यांना पुरावा मिळविण्याकरिता पुण्याला जावयाला सांगितलें. त्यांना हें माहीत होतें की आपल्याला

उपयुक्त असा पुरावा टिळकांनी मुंबईस आणला आहे. पण त्याच वेळी मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाविरुद्ध इंग्लंडच्या पार्लमेंटातून आणि 'लंडन टाइम्स' या दैनिकातून विषवमन चालू झालें होतें. मुंबईचे पूर्वीचे राज्यपाल लॉर्ड हॅरिस यांनी 'टाइम्स'मध्ये लिहिलें, 'High Court was a supporter of sedition and inflammatory writing in the Native Press rather than an impartial tribunal of justice.' (रामगोपाळकृत टिळक चरित्र पान १५२) असल्या आरोपांमुळे बिचकलेल्या आणि बहुधा स्वतःच टिळकांविरुद्ध सरकारकडे गुप्त प्रतिवृत्त पाठवून टिळकविरोधकांत अंतर्भूत झालेल्या रानड्यांनी, २९ जुलै आणि २ ऑगस्ट या दिवशी टिळकांनी आपल्याला तारणावर सोडावें यासाठी केलेलीं आवेदनें फेटाळून दिलीं. पुढे ४ ऑगस्ट या दिवशी बद्रुद्दिन तय्यबजींनी टिळकांना तारणावर सोडलें. त्यामुळे त्यांच्या धारिष्टाची लोकांनी स्तुति केली आणि रानड्यांच्या परधार्जिणेपणाची निंदा केली, हें सांगावयाला नकोच. या कृत्यांनी गोखल्यांचे गुरु आपल्या अपकीर्तीत भर घालीत असतानाच त्यांनी तें कुप्रसिद्ध क्षमायाचनेचें पत्र गोखल्यांकडून प्रसिद्ध करविलें व ग्रंथिक सन्निपातात झालेल्या पुणेकरांच्या विटंबनेवर या कोल्हापूरच्या शहाण्यांनी आपल्या भेकडपणाचा कळस चढविला. तें पत्र ४ ऑगस्टला 'मँचेस्टर गार्डियन' आणि मुंबईचा 'टाइम्स' या दैनिकांतून एकाच वेळी प्रसिद्ध झालें. त्याच दिवशी दुपारी टिळक तारणावर मुक्त झाले. टिळकांनी मिळविलेला पुरावा क्षमायाचना टाळण्याला पुरेसा होता, असें गंगाधरराव देशपांड्यांनीही लिहिलें आहे.

गोखलेभक्तांच्या उलटच्या बोंबा

गोखले-रानड्यांच्या या भेकड वर्तनावर पांघरूण घालण्याकरिता त्यांच्या भक्तांनी या प्रकरणी उलट टिळकांवरच आग पाखडली आहे. जयपूरचे डॉ. माथूर हे त्यांच्या गोखलेचरित्रात लिहितात :

Another section of public opinion interpreted Tilak's inactivity and silence as meaningful. Gokhale's eminent biographer, J. k. Shahani has opined, "Some of the apologists of Tilak give out that he was at that time actually collecting authentic evidence, in support of Gokhale's statements, but it could be of no use since the latter had already tendered an unconditional apology. What can be more mischievous than this kind of talk? If Tilak had both the inclination and the ability to do service to one, to belittle whom had all along been his particular care, why did he not communicate his intentions to

Gokhale? Gokhale at least was not ambitious of ridicule, not absolutely a candidate for disgrace.

विकृत बुद्धीने लिहिलेल्या या विषारी उताऱ्याचा अनुवाद करण्याच्या भानगडीत मी पडत नाही. पण या टीकेला तितकेंच कटु उत्तर द्यावयाचें म्हणजे या आणीबाणीच्या प्रसंगी टिळकच जर गोखल्यांच्या उपयोगी पडले तर आपला सच्छिष्य आणि आपला राजकीय वारस टिळकांच्या हाती जाईल या भीतीने रानड्यांनी टिळकांना रक्षकांच्या तावडीतून मुक्त होऊ दिलें नाही, आणि त्यांची गोखल्यांशी गांठही पडू दिली नाही. माथुर आणि शहाणी या उत्तरेच्या दोन विद्वानांच्या इतका हलकटपणा टिळकांवर अत्यंत कटु टीका करणाऱ्या 'टिळकजीवनरहस्य'-कार बापूराव आंबेकरांनीही केला नाही. त्यांनी एवढाच आक्षेप घेतला आहे की गोखल्यांचें एक विधान अतिशयोक्त आणि दुसरें एक विधान निराधार होतें, असें २० जुलैच्या 'केसरी'त लिहिल्यानंतर टिळक गोखल्यांचें समर्थन तरी कसें करणार होते? पण गोखल्यांच्या निवेदनातील एक महत्त्वाचा आरोप म्हणजे राजमार्गावर स्त्रियांना अर्धनग्न करून तपाशीत, हा लॉर्ड सँढर्स्ट यांनी गोखल्यांची क्षमायाचना ज्या दिवशी प्रसिद्ध झाली, त्याच (४-८-९७) दिवशी आपल्या विधिमंडळातील भाषणात अंशतः मान्य केला. असेच अनेक आरोप सरकारला मान्य करावयाला लावून सरकारची क्षमायाचनेची मागणीच हास्यास्पद केल्यानंतर मित्रांच्या पत्रांवर विसंबून एखादें असिद्ध विधान केल्याचा खेद व्यक्त करण्याची पाळी गोखल्यांवर आली असती, तर तिचा परिणाम इंग्लंड आणि हिंदुस्थान येथील लोकमतावर अगदी भिन्न झाला असता. पण टिळक राजद्रोह करीत असल्याच्या चहाड्या गोखले आणि त्यांचे गुरु यांनी सरकारकडे केल्यानंतर सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा अभियोग चालू केला असताना त्याच टिळकांच्या साहाय्याने आपली क्षमायाचना पाण्याहून पातळ करण्यापेक्षा आपल्या प्रभूंच्या पायावर लोटांगण घालून आपले कान उपटून घेणेंच श्रेयस्कर, असें गोखल्यांना वाटणें स्वाभाविक आहे.

क्षमायाचनेने प्रक्षोभ

गोखल्यांच्या क्षमायाचनेने लोकमत इतकें प्रक्षुब्ध कां झालें, याचा आता विचार केला पाहिजे. या क्षमायाचनेत बलात्काराचा असिद्ध आरोप तेवढाच मागे घेतला नसून रँडच्या कारभारावरील एकूण एक आक्षेप परत घेतले होते.

"I withdraw all the allegations unreservedly and tender an unqualified apology for having made them." "I have been much less than just to the soldiers engaged in plague operations and have made grave and unwarranted charges against them, when they were engaged in work which required that their critics should be not only just to them but even generous."

'मी केलेले सारे आरोप मनात कोणताही किंतु न ठेवता परत घेतो. प्लेगापासून जनतेचें संरक्षण करण्याच्या कार्यात मग्न झालेल्या सैनिकांच्या कृत्यांचा केवळ न्यायबुद्धीनेच नव्हे तर उदार बुद्धीने विचार करावयाला हवा असताना मी त्यांना अन्याय केला.' या निर्लज्ज वाक्यांचा अनुवाद करतानासुद्धा माझ्या मनाला संकोच वाटला, इतकी या क्षमायाचनेची शिसारी टिळकांशी परिचित असणाऱ्या टिळकभक्तांच्या अंतःकरणात भिनली आहे. हे गोरे सैनिक पुण्यात काय करीत होते, तें गोखल्यांच्या 'सुधारका'च्या आधारानेच दाखवून दिलें म्हणजे गोखल्यांनी किती निगरगट्ट होऊन आपली क्षमायाचना लिहिली होती, याची वाचकांना कल्पना येईल. 'इतके दिवस चोरीवर भागत होते. पण आता बायकांच्या अंगावर हात टाकण्यापर्यंतही पाळी येऊन ठेपली आहे. आपल्या आप्तांची अब्रू बचावण्यासाठी थोडी तरी हालचाल करा. भागूबाईसारखे रडता काय? अडदांडास कायदा शिकवा.'(१९-४-१८९७) 'तुमच्या काकामामास दहा जणांनी मिळून नागवे केले आणि नाचावयाला लाविले, तुमच्या आयाबहिणी आणि लग्नाच्या बायका यांची विटंबना केली, त्यांच्या अंगावर फुलें टाकलीं, त्यांच्याशी पाठ शिवाशिवी केली, तरी तुम्ही आपले संथ ते संथच.'

पुण्यनगरीला काळिमा लागण्याचा काळ

गोऱ्या सैनिकांच्या पुण्यातील अत्याचारांच्या वार्ता लागलीच सर्व महाराष्ट्रभर पसरल्या. असले अमानुष अत्याचार पुण्यातील मानी लोक सहन कसे करतात, याविषयी विस्मय व्यक्त करणारीं पत्रें टिळकांना येऊ लागलीं आणि अन्य नगरांतील वर्तमानपत्रांतून पुणेंकरांच्या 'षंढपणा'वर प्रखर टीका होऊ लागली. बाजीरावापासून इंग्रजांनी पुणें जिंकून घेतलें, तेव्हा जितकें इंग्रज सैन्य जमविलें होतें, त्याहून अधिक गोरे सैनिक आज पुण्यात धिंगाणा घालीत आहेत, असें टिळकांनी त्या पत्रांना 'केसरी'तून प्रकट उत्तर दिलें. पण असल्या गणितांनी काही कुलीन स्त्रियांना आपली प्रकट विटंबना निमूटपणे सहन करण्याचें सामर्थ्य प्राप्त होत नाही. सरतेशेवटी सदाशिव पेठेतील मंडईच्या राज-

मार्गावरच विटंबना झालेल्या काही मानिनींनी शनीच्या पारावर डोकीं आपटून कपाळमोक्ष करून घेतला. हा प्रकार झाल्यावर मात्र सारें पुणें हादरून गेलें. त्या क्षणी भावनेच्या भरात अनेकांनी रँडवधाच्या प्रतिज्ञा केल्या. पण असल्या प्रतिज्ञांची पूर्ति होण्यासाठी प्रतिज्ञा करणाऱ्यांना नेत्यांच्या दिग्दर्शनाचीही आवश्यकता भासते. सातारचे भिडे गुरुजी आपल्या आत्मवृत्तात लिहितात, 'रँड साहेबास कोणी उडवणारा वीर आहे काय, म्हणून जिकडे तिकडे पुण्यात हालचाली चालू झाल्या. साहेबाने सातारकरांची वाईप्रांती रग जिरवून पुणें येथे मिशीस ताव दिलेला. सर्व पुणेकरांचा धर्म पायाखाली तुडविला. किती एक स्त्रियांची विटंबना केली. देशभक्ति रसातळास मिळविली. लोकमान्यांनी आणि गुरुजींनी (अण्णासाहेब पटवर्धनांनी) प्रश्न टाकला होता. दामूचा (चाफेकरांचा) विचार पक्का होता. ज्युबिली गाजत होती. तोच मुहूर्त ठरून जुळवाजुळव चालू होती. मी दोघांना सांगितलें (चाफेकर बंधूंना) बक्षिसाची रक्कम तयार ठेवा, पाहू. त्याप्रमाणे आधी दोन दिवस प्रचली बाबा (हे कोण ?) आणि गुरु या दोघांना सांगितलें होतें. दामूने लोकमान्यांची आज्ञा घेतली. दोघांनी काम यशस्वी केलें आणि मुंबई सुधारली; मी आणि गणपत साक्षी लांब राखणीवर होतो, ते गावातच राहिलो.' रँडवधाच्या कारस्थानातील जी व्यक्ति सर्वांत दीर्घायु झाली, तिनें केलेलें निवेदन असें आहे. या निवेदनावरून टिळक हे दामोदरपंतांच्या संस्थेचे नेते होते, ही गोष्ट निर्विवादपणे सिद्ध होते. संस्थेच्या सभासदांनी नेत्यांच्या अनुज्ञेवाचून परस्पर काही तरी कृति करून कार्यनाश करू नये, यासाठी साऱ्याच क्रांतिकारक संस्थांतून असे कडक निर्बंध घालावे लागतात.

वै. का. राजवाड्यांचीं दायित्वशून्य पत्रें

वासुकाकांच्या चरित्रात देवगिरीकरांनी शिवरामपंत परांजपे यांचाही या प्रकरणाशी संबंध जोडला आहे. '१२-६-१८९७ या दिवशी लकडीपुलासन्निध विठोबाच्या मंदिरात शिवरामपंतांचें सुप्रसिद्ध व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय राजसूय यज्ञ हा होता. या व्याख्यानाला चाफेकर गेले असले तर काही निश्चय करूनच बाहेर आले असतील. पुण्यातील काही लोकांना तरी शिवरामपंत रँडवधाला कारणीभूत झाले, असें वाटलें. अर्थात् मुख्य दायित्व टिळकांवरच टाकलें जात होतें. प्रो. वै. का. राजवाडे यांनी त्या सुमारास अहमदाबादेच्या कोणा पंडितांच्याकडे पत्र पाठवून त्यात शिवरामपंतांच्यासारखी माणसें फाशी

गेलीं पाहिजेत, असें लिहिलें होतें. तें पत्र पंडितांनी पुण्यास पाठवून दिलें.' गोखल्यांना इंग्लंडात पत्रें पाठवून नंतर त्यांना गोत्यात आणणाऱ्या व्यक्तींपैकी वै. का. राजवाडे हे एक होते आणि हे कशीं दायित्वशून्य पत्रें लिहीत असत, हें या प्रसंगावरून कळून येतें. देवगिरीकर पुढे लिहितात, 'टिळकांचा वधाशी यत्किंचित् जरी संबंध जोडता आला असता तरी सरकारने त्यांना फाशीची शिक्षा द्यावयाला कमी केलें नसतें, असा आगीच्यासह तो खेळ होता. पण टिळक सोडले तर वासुकाका, किंवा नातू, तसेच शिवरामपंत या प्रकरणी अगदी निर्दोषी असतील, असें वाटत नाही. देवगिरीकरांच्या या आरोपात इतिहास कितपत आहे, हें त्यांना ओळखणाऱ्या लोकांनी पाहून घ्यावें. तत्कालीन इतिहासाचें आमचें एकमेव साधन कै. बाबा विद्वांसासहच नष्ट झालें आहे. थोरल्या राजवाड्यांच्या पत्रावरून मला एवढेंच दाखवून द्यावयाचें आहे की, रँडच्या अत्याचाराविरुद्ध सत्यासत्यविवेक विसरून अतिरेकी प्रचार केला तो सुधारकांनीच केला. त्याचा परिणाम शेवटी त्यांच्याच नेत्यांची नाचक्की होण्यात झाला. पण त्यांच्या प्रचाराचें लक्ष्य जो रँड, तो नरकाला गेल्यानंतर मात्र हे लगेच प्रतिपक्षातील पुढाऱ्यांना फाशी दिलें पाहिजे म्हणून प्रतिपादू लागले. हे असले अतिरेकी लोक स्वतःला नेमस्त म्हणवून घेत असत, हें पाहिलें म्हणजे त्यांच्या आत्मवंचनेचें नवल वाटतें.

रँडविरुद्ध नातू-टिळक

रँडच्या सैनिकांचे अत्याचार चालू असताना एका गोऱ्या सैनिकाने एका हिंदु कुलस्त्रीचा विनयभंग केला. हें गाऱ्हाणें नातूबंधूंनी साक्षीपुराव्यासह अधिकाऱ्यांपुढे गुदरलें. पण त्यांनी तें नुसतेंच धुडकावून दिलें. आपल्या स्त्रिया परपुरुषांच्या दृष्टीस पडू नयेत अशी मुसलमानांची भावना असल्याने त्यांच्या घरातून गोरे सैनिक घुसवू नयेत, मुसलमान स्वयंसेवकांकडूनच त्यांच्या घरांच्या तपासणीचें काम करवून घ्यावें, असें नातूंनी सुचविलें. तेव्हा रँडने त्यांना अयोग्य वर्तनानिमित्त दोष देऊन स्वयंसेवकाचें काम करण्यालाच बंदी केली. चित्रशाळेच्या वासुकाकांनाच एकदा रँडच्या पेंढाऱ्यांनी पकडून रुग्णालयात नेलें होतें. पण प्लेगचा संसर्ग होण्यापूर्वी ते तेथून ओळखीच्या लोकांच्या खटपटीने निसटून येऊ शकले. हाच प्रयोग टिळकांच्यावर करून त्यांना प्लेग जडविण्याचा कट अधिकाऱ्यांनी केल्याची वार्ता तेव्हा रक्षकविभागात लेखनिक म्हणून काम करणाऱ्या बाबासाहेब देशपाड्यांनी एके दिवशी टिळकांना सांगितली. त्यामुळे टिळकांनी तातडीने स्वतंत्र हिंदु रोग्यांचें

ग्रंथिक सन्निपाताचें रुग्णालय उभें करून ज्यांना सरकारी रुग्णालयात जावयाचें नसेल, त्यांना या रुग्णालयात जाण्याची अनुज्ञा, रँडचा या रुग्णालयाला विरोध असतानाही मिळविली. पुढें एकदा रँडने हें रुग्णालय मोडून टाकण्याचा आदेश दिला असताना, टिळकांनी पुन्हा एकवार त्याच्या वरिष्ठांच्याकडून आपल्या रुग्णालयाला संजीवन प्राप्त करून दिलें. रँडने टिळकांच्या विरुद्ध हे जे डावपेच चालविले होते, त्यामुळेही त्याला बळी देण्याचा निर्धार टिळक-चाफेकरांनी केला असला पाहिजे. रँडचें पेंढार पुण्यावर मोकाट सोडण्याला रानडयांच्या पक्षाचा चहाडखोरपणाच कारणीभूत झाला होता, ही गोष्टही इथे सांगणें आवश्यक आहे. टिळकपक्ष बंडाची सिद्धता करीत असल्याचे आरोप विरुद्धपक्षाचीं वर्तमानपत्रें वेळोवेळी करीत असत आणि हे देशद्रोही चंद्रराव मोऱ्यांच्या पंथाने जातील, असें उत्तर कधी कधी टिळक कातावले म्हणजे त्या पत्रकर्त्यांना देत. २२-६-१८९७ या दिवशीच्या 'केसरी'तही आपल्यावर राजद्रोहाचा आरोप करणाऱ्यांना टिळकांनी हीच धमकी दिली होती. हीं वर्तमानपत्रांतील उत्तरें-प्रत्युत्तरें, तसेंच स्वतः गोखल्यांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या कानाशी लागून केलेली विषारी कुजबूज यांचा परिणाम असा झाला की, ग्रंथिक सन्निपाताची संधि साधून साऱ्या पुण्यातील बंडाच्या सिद्धतेची एकदाची पूर्ण चौकशी करण्याकरिता, अधिकाऱ्यांनी त्या रोगाच्या जंतूंपासून नव्हे तर बंडाच्या जंतूंपासून हें नगर निर्धोक करण्याकरिता पुण्य नगरीवर गोऱ्या सैनिकांनिशी स्वारी केली. साऱ्या हिंदुस्थानात जंतुप्रतिबंधक उपाय करण्याकरिता कोठेही गोऱ्या सैनिकांची योजना केली नसताना एकटचा पुण्यावर त्यांचें पेंढार मोकाट सोडण्याचें कारण अण्णासाहेब पटवर्धन केव्हा, केव्हा सुस्पष्ट करून सांगत. त्यामुळेच हें रहस्य माझ्या कानावर आलें आहे. या प्रसंगी एखादा कठोर अधिकारी पाठविण्याची मागणी १-२-१८९७ च्या अंकात 'ज्ञानप्रकाश'कारांनीच केली होती. रँडच्या रूपाने हा कठोर अधिकारी अवतीर्ण झाल्यानंतर त्याच्याविरुद्ध पुणेकरांना भडकावून देण्यासाठी अतिरेकी लेखन गोखल्यांच्या 'ज्ञानप्रकाश, सुधारकां'नीच केलें आणि रँडची शिशुपालाप्रमाणे शंभर पाप भरल्यानंतर दामोदर हरींनी जेव्हा त्याची जीवनलीला संपविली, तेव्हा रँडवधाचें दायित्व टिळकनातूंवर लादण्याला याच पक्षाचे लोक तातडीने पुढे आले. हें सारें कुटिल कारस्थान इंग्रजांशी संगमनत करून चाललें होतें, का यदृच्छेने घडून आलें, याचा ज्याने त्याने आपल्या मताप्रमाणे निर्णय करावा. मला स्वतःला या दिवसांत निदान 'सुधारक'कारांनी केलेलें वर्तन अत्यंत संशयास्पद वाटतें.

'सुधारका'चे संपादक चिथावणी देणारे हेर

३–५–१८९७ च्या अंकात सहनशीलतेचा निषेध करून पुणेकरांनी छळाचा प्रतिकार करण्याचा धडा महाराष्ट्राला घालून द्यावा, असाही 'सुधारकाने' उपदेश केला. हा उपदेश त्यांनी Agent provocateur (चिथावणी देणारे हेर) या नात्यानेच केला असावा, असें पुढील घटनांवरून दिसतें. कारण या आणीबाणीच्या दिवसांत एकट्या 'सुधारका'व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पुण्याच्या पत्रातून स्वतः सरकारी अधिकाऱ्याच्या मताने सुद्धा प्रक्षोभक ठरेल, असें लेखन प्रसिद्ध झालें नाहीं. रँडच्या वधानंतर जिल्हाधिकारी लँब यांच्या भाषणावर थोडी कडक टीका केल्यामुळे 'ज्ञानप्रकाश'ला क्षमायाचना करावी लागली आणि ती सरकारात पटलीही. पण टिळकशिष्य भाऊशास्त्री लेले (काशिनाथ वामन संपादक मोदवृत्त वाई) यांची क्षमायाचना मात्र सरकारला पटली नाही. त्यांना त्यांच्या लेखनासाठी शिक्षा झालीच. गोखले आणि 'ज्ञानप्रकाश'-कार यांच्या हातातून पटणाऱ्या शरणागतीचें महान् गुप्त शस्त्र असल्याने ते आपल्या सरस्वतीला स्वैर विहार करू देऊ शकत होते. पण टिळकांच्या हाती असलें महान् गुप्त शस्त्र नसल्याने त्यांना नेहमीच जपून लिहावें लागत होतें. या दिवसांत टिळकभक्त दत्तो आप्पाजी तुळजापूरकर यांनी आपण समक्ष पाहिलेल्या रँडशाहीच्या धुमाकुळाचें वर्णन साताऱ्याच्या 'महाराष्ट्रमित्रात' करून असल्या अनन्वित छळाला पुण्यातील लोक षंढाप्रमाणे मान कशी वाकवितात, याविषयीं आश्चर्य व्यक्त केलें होतें. इथे सांगण्याजोगी गोष्ट ही की त्या लेखातील काही भागांचें आणि 'केसरीं'तील काहीं उताऱ्यांचें भाषांतर करून एका देशद्रोही सुधारकाने 'शंकल्स' या टोपणनावाने तें टाइम्सच्या २८ जूनच्या अंकात प्रसिद्ध केलें आणि 'महाराष्ट्रमित्रा'तील लेखक आणि 'केसरी'कार यांना अंदमानाची यात्रा करावयाला कां पाठवू नये, असाही त्यात प्रश्न उपस्थित केला. हा लेखक 'सुधारक' पत्राच्या वर्तुळातील नसता तर त्याने आपल्या अतिरेकी राजनिष्ठेच्या भरात 'सुधारका'तील उताऱ्याचाही उल्लेख करून त्यांनाही टिळकांचे सहप्रवासी बनविण्याची मागणी केली असती. या दिवसांत टिळकांना तिलांजलि देण्यासाठी आतुर झालेल्या सुधारकाच्या संपादकानी, एकीकडे स्वतःच लोकांना भडकावून द्यावयाचें आणि आपल्या चिथावणीची प्रतिक्रिया जनतेत घडून आल्यानंतर टिळक लोकांना चिथवीत असल्याचा बोभाटा आपला सहप्रवासी जो टाइम्स, त्यातून करून सरकारने त्यांच्यावर शस्त्र उचलावें अशी व्यवस्था करून ठेवावयाची, असें दुटप्पी आणि दुहेरी कारस्थान चालविलें होतें. 'टिळक

कैलासवासी झाल्यावाचून आमचा कलह संपणार नाही,' असे सार्वजनिक सभेचे पदच्युत कार्याध्यक्ष विष्णु मोरेश्वर भिडे हे रावबहादुर एकटेच प्रकटपणे बोलून दाखवीत असले तरी त्यांच्या मताचे आणखी किती तरी लोक तेव्हा सुधारक पक्षात असतीलच. त्यावाचून काही या सुधारकपक्षाला रँडवधाच्या मुळाशी टिळक असलेच पाहिजेत, असें रक्षकविभागातील अधिकाऱ्यांना सांगण्याची स्फूर्ति त्या दिवसांत अकस्मात् झाली नसती. २८–६–१८९७ या दिवशी 'शॅकल्स'च्या पत्रात प्रथम रँडवधाशी टिळकांचा संबंध असला पाहिजे, असा स्पष्ट आरोप केला होता. 'शॅकल्स' हा छद्मनामधारी लेखक 'सुधारक' नसता तर त्याने 'केसरी' आणि 'महाराष्ट्रमित्र' या पत्रांच्या सह 'सुधारक' पत्रातील भडक लेखनाचे नमुनेही टाइम्सला पुरविले असते. आपण 'टाइम्स'ला पुरविलेल्या पुराव्यामुळे टिळकांना अंदमानाची यात्रा घडेल, अशी त्या नीच चहाडखोराला आशा वाटत होती; एवढेंच नव्हे तर आपल्या देशद्रोही पत्राचें अनुकरण करून टिळक 'सुधारका'तील उताऱ्यांचीं भाषांतरें 'टाइम्स'ला पुरवून आपला डाव आपल्यावरच उलटविणार नाहीत, असा त्याला पूर्ण भरवसा होता. या भरवशावरच देशद्रोही 'सुधारक'कारांनी असलीं भाषांतरें पुरविण्याच्या आपल्या व्यवसायाचें निर्लज्जपणे समर्थन केलें होतें. मी स्वतः सुधारकाचे अंक चाळले नसल्याने स्टॅनले वॉलपेट यांच्या टिळक आणि गोखले या इंग्रजी ग्रंथातून सुधारककारांचा हा आत्मसमर्थनपर उतारा घेतला आहे.

The impudence of the writer who pretends to be offended at an attempt to translate his literary outbursts that others might judge him because the translator thereby called the attention of a Government, ignorant of the idioms of the vernacular is patent enough; but this has been what the worthy editor of the Kesari and no less worthy editor of the Kal have been advancing for the consumption of their readers. What right have they to force on their readers a disreputable situation which any honourable man would not care to accept ? Are the readers of our contemporaries bound to be members of a sort of conspiracy against everyone who does not understand the language ?

हा उतारा 'पुनश्च हरि ओम्' या अग्रलेखाला उत्तर म्हणून लिहिला असून त्यात त्यांनी असा आव आणला आहे की, टिळक आणि परांजपे यांच्या लेखांचीं भाषांतरें आपण सरकारला पुरविलीं नाहीत, तर आपण त्यांच्या कटाचे सभासद ठरू. या प्रशंसनीय सावधानपणानिमित्त सरकारकडून त्यांना जें काही पारितोषिक मिळालें असेल, तें

काही त्यांचें पत्र जगविण्याला उपयोगी पडलें नाही. त्यांच्या देशद्रोही चहाडखोरीची टिळकांनी उपेक्षा केली आणि जनतेनेही केवळ उपेक्षेने, अनुल्लेखाने तें पत्र मारलें. असो. १८९९ मध्ये या देशद्रोही संपादकांना आपणही टिळकांच्या आणि परांजप्यांच्या कटाचे सभासद ठरण्याची जितकी भीति होती, त्यापेक्षा किती तरी अधिक भीति त्यांना १८९७ मध्ये वाटली असली पाहिजे. कारण टिळकांच्या संयत लेखनाच्या मानाने निरर्गल लेखन तेव्हा 'सुधारक'कारच करीत होते. हें निरर्गल लेखन चिथावणी देणारे हेर या नात्याने केलें, तरच पचण्याजोगें होतें.

सरकारी कागदपत्रांचा पुरावा

स्वतः 'सुधारक'कारच या दिवसांत चिथावणी देणाऱ्या हेराचें काम करीत असावेत. हा आरोप अतिशय गंभीर स्वरूपाचा असल्याने सरकारी कागदपत्रांवरूनच असें अनुमान काढणें कसें अपरिहार्य होतें, ही गोष्ट इथे दाखवून दिली पाहिजे. रँड आणि आयर्स्ट यांच्या वधाला कारणें काय झालीं, अशी पृच्छा हिंदुस्थान सरकारने केल्यानंतर वर्तमानपत्रांतील चिथावणीमुळेच हे वध घडले असले पाहिजेत, अशा समजुतीने लार्ड सँढर्स्ट यांनी प्राच्य भाषांच्या भाषांतरकारांकडे (ओरिएंटल ट्रान्स्लेटर) राजद्रोही लेखांचीं भाषांतरें मागितलीं. या लेखांची आणि ते लेख कोणत्या वृत्तपत्रात कधी प्रसिद्ध झाले, ही माहिती मुंबई सरकारच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासाचीं साधनें खंड २ या ग्रंथात ३४१-४२ पानांवर प्रसिद्ध झालीं आहे. तीं नांवें क्रमाने उतरून घेतलीं म्हणजे वाचकांना वस्तुस्थितीचा बोध होणें सोपें जाईल. 'राजनिष्ठेचा कळस', 'प्लेगसमितीने चालविलेला छळ,' 'भेकडांप्रमाणे असें रडता काय?' हें सारें १९-४-१८९७ च्या 'सुधारक' पत्रात. 'पुण्याच्या नागरिकांना उपदेश' सुधारक ३-३-१८९७. 'सरकार बंदोबस्त करीत नसल्यास तुमचा तुम्ही करा' सुधारक ३-५-१८९७. 'स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सिद्धता,' प्रतोद इस्लामपूर १७-५-१८९७. 'शिवाजीचे उद्‌गार' आणि शिवाजी उत्सवाचें प्रतिवृत्त १५-६-१८९७ केसरी.' पुणें वैभव'च्या ११-४-१८९७ च्या अंकातील तीन लेख. रँड आणि आयर्स्ट यांच्या वधापूर्वी प्रसिद्ध झालेल्या आक्षिप्त लेखांचीं हीं नांवें पाहिलीं म्हणजे प्लेग समितीच्या अत्याचाराविरुद्ध निकराचा प्रचार 'सुधारक' आणि ११ एप्रिलच्या एका अंकापुरता पुणें वैभव पत्राने केला होता. केसरीतील लेखांचा प्लेगसमितीच्या कारभाराशी काहीच संबंध नव्हता, असल्यास तो बादरायण संबंध होता. हीच गोष्ट इस्लामपूरच्या 'प्रतोद'

पत्राची दिसते. तेव्हा तत्कालीन परिस्थितीत 'केसरी'त प्लेग समितीच्या कारभाराविषयी काहीही आक्षेपार्ह लेखन प्रसिद्ध झालें नव्हतें, ही गोष्ट सरकारी कागदपत्रांनी सिद्ध होते. स्वतः टिळकांची चाफेकरांशी मैत्री असल्याने, किंबहुना टिळकच त्यांचे नेते असल्याने 'शिष्यापराधे गुरोर्दण्डः' या न्यायाने चाफेकर प्रकरणात ते गुंतले होते, आणि त्याचें प्रायश्चित्त त्यांनी केलें तरी 'केसरी'कार या नात्याने त्यांचें वर्तन निर्लेप होतें. पण वर्तमानपत्रातील चिथावणीने दामोदरपंतांनी रँडचा वध केला, अशी भूमिका घेणाऱ्या सरकारने या चिथावणी देणाऱ्यांचे अग्रणी, जे 'सुधारक'कार त्यांच्यावर कसलाही अभियोग भरला नाही. यावरून सरकारशी त्या पत्राचे संबंध कसे असतील याची कल्पना येते. वरील विवेचन लिहिल्यानंतर तेव्हाच्या टिळकांवरील राजद्रोहाच्या अभियोगाचें पुस्तक चाळताना असें आढळून आलें की, त्या साथीच्या दिवसांतील 'केसरीमराठ्या'तील लेख आपल्या बचावासाठीच टिळकांनी न्यायालयापुढे ठेविले होते.

'पुनश्च हरि ओम्'मधील स्पष्ट आरोप

पूर्वी अनेकदा उल्लेखिलेल्या रक्षक विभागाच्या प्रतिवृत्तासारखीं प्रतिवृत्तें अनुकूल सरकारी अधिकाऱ्यांच्या द्वारा टिळकांच्या हातीं येत असत. पण त्यांचा उल्लेख करून आपली माहिती मिळविण्याचीं द्वारें आपल्या हाताने बंद करणें आत्मघातकीपणाचें असल्यानें कोणीही संपादक अशा माहितीचा उच्चार करीत नाही. तथापि गोखलेकंपूचीं कारस्थानें, पुण्यात इतकीं कुप्रसिद्ध झालीं होतीं की, १८९९ मध्ये 'पुनश्च हरि ओम्' करून 'केसरी'चीं सूत्रें परत आपल्या हाती घेताना त्या कंपूच्या कारस्थानांचा प्रकटपणे 'केसरी'च्या अग्रलेखांतून टिळकांनी उल्लेख केला आहे. 'सरकारची वक्रदृष्टि १८९७ मध्ये काही पत्रकर्त्यांकडेच लागण्यास कोणीतरी मध्यंतरी आगीत तेल ओतणारे गृहस्थ कारणीभूत झाले असावेत, असें वाटणें स्वाभाविक आहे आणि त्याप्रमाणेच स्थितिही आहे, असें आम्हांस मोठ्या दुःखाने म्हणावें लागतें. पुण्यात ज्या वेळी 'माडरेशनचें नवीन पोलिटिकल स्कूल' (नेमस्तपंथाचें राजकारणाचें विद्यालय) निघालें, त्या वेळीच त्याचें पर्यवसान अशा प्रकारे होईल, अशी आम्हांस वाटलेली धास्ती आम्ही प्रदर्शित केली होती, आणि त्या वेळच्या लेखाबद्दल (म्हातारचळ कां पोरखेळ) कित्येकांनी आम्हांस नावेंही ठेविलीं असतील. एका हिंदूने त्याचा आणि दुसऱ्याचा काही बाबतीत मतभेद झाला म्हणून आपल्या प्रतिपक्षाच्या लेखाचा

विपर्यास करून त्यास राजद्रोही ठरविण्याचा प्रयत्न करणें आणि तो
खड्ड्यात पडला म्हणजे आनंद मानणें, यासारखें अश्लाघ्यपणाचें दुसरें
कृत्य नाही, असें आम्ही समजतो. असली मंडळी फारच थोडी, किंबहुना
हाताच्या बोटावर मोजण्याइतकी थोडी आहेत, हें एक सुदैवच आहे. पण
तशी मंडळी आहेत आणि ती या धंद्यास प्रवृत्त झाली आहेत, याबद्दल
आम्हांला बिलकूल शंका राहिलेली नाही. म्हणूनच आजच्या प्रसंगी
त्यांचा आवर्जून उल्लेख केलेला आहे.' या आरोपासंबंधी अधिक माहिती
परशुरामपंत चिंचाळकर 'रहस्य निरीक्षण'कर्ते यांनी आपल्या आठवणीत
सांगितली आहे.

न्यायविभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचें प्रतिवृत्त

'अशी एक आख्यायिका आहे की, रँडचा वध झाल्यानंतर राज-
कीय आंदोलनातून पुढाकार घेणाऱ्या न्यायविभागातील वरिष्ठ अधिका-
ऱ्यांनी सरकारात एक गुप्त प्रतिवृत्त पाठविलें, किंवा सरकारने त्यांना तें
पाठवावयाला लाविलें. राजकीय चळवळ करणाऱ्या पुण्यातील गृहस्थांचा
पूर्वी एकविचार होता. परंतु पुढे काही गृहस्थांच्या मनाचा कल बंड
केल्यावाचून इंग्रजांकडून आपल्याला अधिकार मिळण्याची अगदी आशा
नाही, असा झाला. मी या मताच्या विरुद्ध असून इंग्रजांच्या सहकार्यानेच
आपला लाभ होणार आहे, असें माझें ठाम मत असल्याने अर्थात् आम-
च्यांत दोन फळ्या झाल्या. बंडाच्या प्रवृत्तीकडे टिळक, बाळासाहेब नातू
पुणे वैभवकार केळकर इत्यादि मंडळींचा कल आहे.' या प्रतिवृत्ताच्या
आधारावर सरकारने नातूबंधूंना अटक करून टिळककेळकरप्रभृतींवर
खटले भरले. हें प्रतिवृत्त रक्षकविभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी
टिळकांना समक्ष दाखविलें असतानाही त्यांनी शेवटपर्यंत त्या कुऱ्हाडीच्या
दांड्याप्रमाणे गोतास काळ झालेल्यांच्या कृष्णकृत्याचा कोठेही उल्लेख
केला नाही. या आख्यायिकेत अप्रत्यक्ष रीतीने ज्यांच्यावर देशद्रोहाचा
आरोप केला आहे, ते थोर अधिकारी म्हणजे न्यायमूर्ति रानडे होत.
यांनी टिळकांच्या विरुद्ध असलें प्रतिवृत्त सरकारला सादर केलें होतें की
नाही, हें सरकारी कागद पाहून निश्चितपणे सांगणें रानड्यांच्या चरित्र-
कारांना सहज करता येईल. पण माझ्यासारख्या सरकारी पाहुणचाराला
पात्र झालेल्यांना हा उपाय उपलब्ध नसल्याने वरील आख्यायिकेचा निर्देश
करून स्वस्थ बसणें भाग आहे.

मध्यविभागप्रमुखांचें प्रतिवृत्त

या वेळी मध्य विभागाच्या प्रमुखांनी सरकारकडे पाठविलेल्या

प्रतिवृत्ताचे काही उतारे पूर्वीचे व्यापारमंत्री द. प. करमरकर यांनी त्यांच्या इंग्रजी टिळकचरित्रात उतरून घेतले आहेत.

The agitation against the payment of land revenue was kept up with considerable energy, but not much success. Side by side, the Shivaji celebrations were gradually converted into occasions for preaching violence and resistance to Government, the doing to death of Afzalkhan by Shivaji being specially made a subject of praise and held up as an example. In the meantime the plague broke out and offered another splendid opportunity of inveighing against the Government in the most malicious manner. The press surpassed all its previous efforts and after the plague had practically disappeared and repressive measures had been relaxed, for some weeks, the day of the Dimond jubilee was selected with a fiendish malignity for murdering in cold blood, the officers who had rid the city of the pestilence ... ... Widespread rumours and apparently extreme consensus of public opinion has from the very first connected the names of Natu with the murder and two members of that family are known to belong to the party in opposition to the Government. One of these members had a direct motive for personal feeling against plague measures and was heard to utter a threat of speedy vengeance against the Chief plague officers. Hari Natu was relesed from the segregation camp on the 18th June and Mr. Rand was murderd on the night of the 22nd. There is nothing but cumulative suspicion to connect seditious Brahmin faction with the murders.

कोणत्याही क्रांतिकारक आंदोलनाचा उपक्रम सरकारला कर देण्याचे नाकारण्याच्या आंदोलनापासून होत असतो. टिळकांच्या काळी शेतीच्या उत्पादनावरील कर हेंच सरकारी उत्पन्नाचें मुख्य साधन असल्याने त्यांनी शेतकऱ्यांना सरकारी कर नाकारण्याचें शिक्षण देऊनच ब्रिटिश साम्राज्यवादाचा पाया खिळखिळा करून टाकला. याच वेळी शिवाजी उत्सवाचें परिवर्तन हिंसेच्या आणि सरकारी छळाच्या उघड प्रतिकाराच्या प्रचारात होऊ लागलें होतें. खरेंच आहे. टिळकांना काही शिवाजी हा वाट चुकलेला देशभक्त वाटत नव्हता. त्यामुळे शिवाजीच्या ऐतिहासिक कार्याची चर्चासुद्धा परक्या सरकाराला धोकादायक वाटणें स्वाभाविक होतें. असो. विभागाधिकारी पुढे म्हणतात की, यानंतर पुण्यात ग्रंथिक सन्निपाताचें आगमन झालें आणि पत्रकर्त्यांना सरकारवर अत्यंत दुष्ट बुद्धीने टीका करण्याला उत्कृष्ट संधि सापडली. पुढे त्या

साथीचा नायनाट झाला आणि पुण्यातील दडपशाही बंद झाली तरी पुण्यातील लोकांनी पैशाचिक दुष्टबुद्धीने हीरकमहोत्सवाच्या रात्री साथीचा नायनाट करणाऱ्या अधिकाऱ्यांनाच मारून टाकलें. त्या वेळी इंग्रज अधिकाऱ्यांची भावना काय होती, याचें निदर्शक म्हणूनच हा उतारा घेतला आहे. ग्रंथिक सन्निपात गणपतीच्या सुमाराला उद्भवत असे आणि उन्हाळ्यात नष्ट होत असे. हा त्याचा नेहमीचा कार्यक्रम असल्यामुळे त्याचा नायनाट करण्याचें श्रेय रँड आणि मंडळींना देण्याचें कारण नाही, हें पुढे इंग्रजांनाही कळून आलें. पण हें ज्ञान होण्यापूर्वी राज्यकर्त्यांच्या अंतःकरणांत पुण्याच्या ब्राह्मणांविषयी जी द्वेषाची ज्वाळा भडकली, ती अद्यापि तशीच धगधगत राहिली आहे, असो. या अधिकाऱ्यांच्या वधाच्या प्रकरणात सर्व लोक एकमताने नातूंचें नांव घेत होते. नातूबंधूंपैकी हरिपंतांचें रँडशी समक्ष भांडणच झालें होतें आणि त्यांनी रँडवर लौकरच सूड उगविण्याच्या धमक्याही उच्चारल्या होत्या. ग्रंथिक सन्निपाताच्या कोंडवाड्यातून हरिपंतांची १८ जूनला सुटका झाली आणि २२ जूनला रँडला देहान्त प्रायश्चित्त प्राप्त झालें. हें ब्राह्मणांचेंच कृत्य असावें, असें मानण्याला परिस्थितिजन्य संशयावाचून अन्य काही पुरावा नाही.

नातू टिळकांना अटक करण्याची सूचना

रँडवधाचा पुरावा मिळण्यासाठी नातूटिळकांना अटक करणें आवश्यक आहे, असाही अभिप्राय विभागाधिकाऱ्यांनी व्यक्त केला होता.

If the brothers Natu and Tilak could by any possibility be placed in custody, evidence regarding the murder would very likely soon be forthcoming.

याच वेळी रक्षक विभागाच्या एका अधिकाऱ्याने पुण्यातील निवडक व्यक्तींच्या भेटी घेऊन त्यांच्याशी झालेल्या भाषणांची टिपणें सरकारला सादर केलीं.

This report along with notes of conversations of a police officer with some chosen citizens of Poona, most of whom were supporters of the Government and opponents of Tilak and his group, were placed before the Home member. Some of these conversations indicated an opinion that Tilak and his group was in some way responsible for the murders.

त्या अधिकाऱ्यांनी निवडलेल्या व्यक्ति टिळकविरोधी आणि सरकारचा पाठपुरावा करणाऱ्या पक्षातील होत्या. त्यांच्यापैकी काही व्यक्तींनी

टिळक आणि त्यांचे पक्षपाती यांच्यावरच रँडवधाचें दायित्व लादलें. हीं प्रतिवृत्तें पाहून गृहविभागाचे प्रमुख मि. न्यूजंट यांनी आपलें मत दिलें.

The circumstances of the murder seem to denote, not only a carefully preconcerted plan, but that a number of persons have been privy to the outrage....... Rumours point out to one particular clique of malevolent agitators, so it was said, known to exist in Poona and the timid native gentlemen whispered that Natu-Tilak and co. were no doubt at the bottom of it.

यावरून स्वच्छ कळून येतें की, पुण्यातील भेकड पक्षाच्या लोकांनी नातू, टिळक आणि मंडळींनी रँडवध घडविला, अशा चहाड्या करण्याचा सपाटा चालविला होता.

नेमस्तांच्या चहाड्यांसंबंधी केळकरांचें मत

टिळकांच्या प्रतिपक्षांच्या चहाडखोरीची आणि देशद्रोहाची केळकरांना जाणीव असूनही त्यांना त्यांचा राग येत नसे. 'गतगोष्टीं'च्या २४८ पानावर त्यांनी लिहिलें आहे की, टिळकांवर खटला झाला तो काही प्रमुख नेमस्तांच्या शिकवणीने आणि चिथावणीने झाला, ही कल्पना मला फारशी पटत नसे. 'केसरी'तील काही लेखांचीं भाषांतरें करून काही नेमस्तांनी तीं मुंबईच्या 'टाईम्स'कडे पाठविलीं, ही गोष्ट कर्णोपकर्णी मीही ऐकून होतो, परंतु टिळकांनी सरकारविरुद्ध कितीही लिहिलें तरी त्यांच्याविरुद्ध जो अभियोग झाला नाही, तो रँडवधामुळें झाला; तो वध झाला नसता तर नेमस्तांनी कितीही चहाड्या केल्या तरी खटला झाला नसता, असें माझ्या मनाला वाटत असे.' पण या प्रकरणी प्रस्तुत लेखकाची भावना अशी आहे की, सरकारने टिळकांवर खटला भरला किंवा न भरला तरी नेमस्त पक्षाच्या नेत्यांनी टिळकांविरुद्ध चहाड्या करून देशद्रोहाच्या पापांचे रांजण भरण्याचे जें अविरत व्रत चालविलें होतें, त्याचें ऐतिहासिक महत्त्व मुळीच उणें अधिक होत नाही. ही गोष्ट केळकरांना कळत नव्हती असें नाही. पण स्वपक्षात मित्र नाहीत आणि परपक्षात शत्रु नाहीत, अशा विचित्र अवस्थेत ते असल्याने त्यांना नेमस्तांच्या देशद्रोहाकडे दुर्लक्ष करावें, असें वाटत होतें. द्रविडबंधूंच्या वधानंतर तर या नेमस्तांच्या चिथावणीमुळे मुंबईच्या इंग्रजी पत्रांनी 'केसरी'च्या चिथावणीमुळेच त्यांचा वध झाला, असा प्रचार आरंभिला. इतकेंच नव्हे तर पुण्यातील टिळक शत्रूंनी आरोपींना भेटून त्यांना टिळकांचें नांव सांगण्याचा आग्रह केला होता, ही गोष्ट कुप्रसिद्ध आहे. विशेषत: वैजनाथ काशिनाथ राजवाड्यांनी आपले भाचे रानडे यांना टिळकांचें नांव सांगण्याचा आग्रह चालविला होता. पण त्यांच्या

दुर्दैवाने टिळकांच्या गळ्याला तात लावण्याचा त्यांचा प्रयत्न सपशेल फसला. टिळक आणि नेमस्त पक्ष यांचे ऋणानुबंध कसे होते, हें अर्वाचीन वाचकांना कळावें, एवढ्यासाठीच या गोष्टीचा उल्लेख केला आहे. यासाठीच इतिहासाचार्यांनी आपल्या बंधूंचा संबंध तोडला.

रँडवधातील एक गूढ घटना

रँडवधासंबंधी लिहिताना केळकरांनी गतगोष्टीत (पृ. ८५५) रँडची गाडी चाफेकरांना कशी ओळखता आली, याविषयी विस्मय व्यक्त केला आहे. ' गणेशखिंडीच्या बंगल्यातून गाड्यांमागून गाड्या येत असताना, या लोकांना नेमकी रँडसाहेबांची गाडी न्याहाळता यावी, धावत्या गाडीच्या मागे त्यांना चढता यावें, त्यांना पिस्तुलें नेम धरून उडविता यावींत हें माणसाचें कर्तृत्व म्हणण्यापेक्षा दैवाने घडवून आणलेली घटना असें म्हणावें लागतें. ' मानवाला यश लाभण्यासाठी दैवाची अनुकूलता असावी लागतेच. पण ही अनुकूलता तेव्हा चाफेकरांच्या कटातील एका अज्ञात व्यक्तीकडून मिळालेल्या अमूल्य साहाय्याच्या रूपाने व्यक्त झाली आहे. ही व्यक्ति म्हणजे जोगेश्वरी शेजारच्या भिडे यांच्या वाड्याचे तेव्हाचे स्वामी गणपतराव भिडे. इतिहासाचार्य राजवाड्यांची भगिनी या वाड्यात रहात असे. तिच्याकडे आलेल्या विसूभाऊंना भिड्यांच्या द्वाड गणूने एकदा पाय ओढून भुईवर आदळलें होतें, असें भटांनी राजवाडेचरित्रात लिहिलें आहे. हे मोठे झाल्यावर ग्वाल्हेर संस्थानचे पुण्यातील प्रतिनिधि होते. त्या नात्याने त्यांना गणेशखिंडीवरील हीरक-महोत्सवाच्या समारंभाचें आमंत्रण होतें. त्या समारंभाला गेल्यापासून गणपतरावांनी रँडवर सारखी पाळत ठेविली होती आणि त्याची गाडी निघाल्याची वार्ता त्यांनीच बाहेरच्या क्रांतिकारकांना दिली. नाही तर त्या रात्रीच्या वद्य सप्तमी अष्टमीच्या अंधारात नेमकी रँडची गाडी ओळखणें अवघडच होतें. हे गणपतराव उत्कृष्ट विदूषक, आणि त्यांच्या परंपरेला शोभेल असाच त्यांचा अचाट आहार होता. हे माझ्या माता-महांचे जिवलग मित्र असल्याने लहानपणापासून मी यांना ओळखत होतो आणि त्यांनीच मला ही कथा सांगितली आहे. बाळशास्त्री हरदासांनीही यांचा आपल्या ग्रंथात (५७ ते सुभाष) उल्लेख केला आहे. असो, गणपतरावांनी गुप्तपणे केलेल्या सहकार्यामुळेच रँडचा वध होऊ शकला आणि यीट्स या आयर्लंडच्या कवींनी म्हटल्याप्रमाणे (Terrible beauty has been born again) राजकीय वध आणि फाशी यांची भीषणसुंदरी पुन्हा अवतार घेऊ शकली.

सार्वत्रिक उठावणीविरुद्ध वैयक्तिक वध

ही गोष्ट खरी की वैयक्तिक वधामुळे सार्वत्रिक उठावणीच्या कार्यक्रमात विघ्न उत्पन्न होतें, इतकेंच नव्हे तर ती उठावणी पुष्कळदा अशक्य होते. पण या प्रश्नाच्या विचाराची दुसरीही एक दिशा आहे. ती ही की, शत्रूकडून होणाऱ्या राष्ट्रीय अपमानाचाही ज्यांना सूड घेता येत नसेल, त्यांच्या हातून सार्वत्रिक उठावणी तरी कशी होणार ? उदाहरणार्थ, लालाजींवर लाठी चालविणाऱ्यांचा सूड भगतसिंग आणि राजगुरु यांनी घेतला नसता तर चितागांवच्या क्रांतिकारकांप्रमाणेच लाहोरच्या क्रांतिकारकांनाही व्यापक प्रमाणात उठावणी करावयाला सवड मिळाली असती. पण लालाजींच्या निधनाने विदीर्णहृदय झालेल्या भारतमातेने चित्तरंजन दासांची सहधर्मचारिणी वासंती देवी यांच्या मुखाने जेव्हा देशात एक तरी पुरुष उरला आहे कीं नाही अशी पृच्छा केली, तेव्हा सारा उपयुक्ततावाद विसरून भगतसिंग आणि राजगुरु यांना प्रथम सॉंडर्सहत्येचा कार्यक्रम हाती घ्यावा लागला. अशाच प्रकारे १८९७ मध्येही पुण्यातील जनतेच्या खऱ्या नेत्यांना उपयुक्ततावादाचें वर्जन करून प्राप्त कर्तव्य म्हणून रँडवधाचा कार्यक्रम हाती घ्यावा लागला. टिळकांना आणि टिळकपक्षाला महाराष्ट्रात बंड घडवून आणण्यात यश आलें नसलें तरी आपले कट्टे शत्रु जे गोखले त्यांना एकवार बंडाचा पुरस्कार करावयाला लावण्यात यश आलें होतें. 'हिंदी लोक राष्ट्रीय बुद्धीने एक होऊन सरकारचा समाचार घेण्याची सिद्धता करीत आहेत. तुम्ही न्यायाने स्वराज्य दिलें नाहीत तर हिंदी लोक स्वतःच्या सामर्थ्याचा प्रयोग करून स्वराज्य घेऊ पाहतील, तेव्हा त्यांचा प्रतिकार करण्याकरिता इंग्लंडातून सैन्य येणार नाही, एवढी व्यवस्था तुम्ही करा.' असा उपदेश स्वत: गोखल्यांनी १९०५ च्या उत्तरार्धात इंग्लंडातील श्रमिकांना केला होता. यासाठीच ते परत आल्यानंतर त्या वर्षी मंडई विद्यापीठात सभा भरवून टिळकांनी त्यांचें प्रकट अभिनंदन केलें होतें. टिळकांनी बंडाचा पुरस्कार आरंभिला असल्याच्या कागाळ्या सरकारकडे करणाऱ्या गोखल्यांच्या सारख्या नेमस्तांनी हिंदुस्थानात स्वराज्यप्राप्तीकरिता बंडाची सिद्धता चालू असून तें बंड उद्भवल्यास त्याचा बीमोड करण्याकरिता इंग्लंडातून सैन्य न येण्याची व्यवस्था करण्याचा इंग्रजांना उपदेश करण्याइतकी प्रगति अल्पकाळपर्यंत केली असली तरी तिथून त्यांनी लौकरच पद्धतशीरपणे पीछेहाट करून घेतली. कृष्ण राधेच्या घरी मोठा होत असला तरी यशोदेच्या घरी तो लगेच

लहान होत असे. त्यातलीच गत गोपाळकृष्णांची होती. त्यांचा हा इंग्लंडातील पराक्रम आणि त्या पराक्रमी भाषणातील विचारसरणी-विरुद्ध त्यांनी हिंदुस्थानात केलेलें वर्तन या सर्वांवर त्यांच्या फाटक, माथुर इत्यादींनी लिहिलेल्या चरित्रातून मौनाचें पांघरूण टाकलें आहे, हें सांगायला नकोच.

बंगाल्यांत शिवाजी उत्सवाचा प्रवेश

बंगाल्यात विष्णुपंत बोपर्डीकरांनी १८९५ मध्येच शिवाजीस्मार-काच्या चळवळीचें लोण पोचविलें होतें, असें रामगोपाळांनी 'भारताचा स्वातंत्र्यासाठी लढा' या पुस्तकात लिहिलें आहे. यांनी कलकत्त्यात हिरेंद्रनाथ दत्त यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा (२२-११-१८९५) भरवून शिवाजीचें स्मारक करण्याचा ठराव संमत करून घेतला. राज-वाड्यांना त्यांच्या पहिल्या खंडातील गोविंदपंत बुंदेल्यांचा ऐतिहासिक पत्रव्यवहार मिळवून देणाऱ्या मित्रांत एक बोपर्डीकर होते. कलकत्त्यात शिवाजी उत्सवाला चालना देणारे विष्णुपंत बहुधा त्यांच्या नात्यातील असतील. पण कलकत्त्यात शिवाजी उत्सव चालू झाला, तो १९०२ मध्ये अनुशीलन समितीची केंद्रशाखा स्थापल्यानंतर चालू झाला. या क्रांतिकारकांना आपल्या राजकीय दरवड्यांच्या कार्यक्रमाचें एक अर्वा-चीन दैवत, या नात्याने शिवाजी उत्सवाची उपयुक्तता पटली होती. त्यांच्या साऱ्या क्रांतिकेंद्रांतून शिवाजीचा उत्सव होत असे आणि कल-कत्त्यातील शिवाजी उत्सवाच्या निमित्ताने १९०६ आणि १९०७ या दोन वर्षी क्रांतिकारकांच्या सर्व प्रमुख कार्यकर्त्यांचें संमेलन भरलें होतें. या संमेलनांना क्रांतिकारकांचे प्रमुख नेते या नात्याने टिळकही उपस्थित राहिले होते. बंगाल्यात स्वराज्य शब्दाचा प्रचार या उत्सवामुळेच झाला. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेत स्वराज्य हें आपलें ध्येय असल्याची घोषणा दादाभाईंनी केली, हा उत्सवाच्या प्रवर्तकांचा सर्वांत मोठा विजय होय.

चाफेकर आणि बिरसा भगवान्

दामोदरपंतांच्या आत्मचरित्रात त्यांनी आपला भाऊ बाळकृष्ण याला नेपाळकडे काही कार्याकरिता १८९५ मध्ये पाठविल्याचा उल्लेख केला आहे. या प्रकरणाची सविस्तर कथा बाळकृष्णानेच लिहावी, अशी इच्छाही त्यांनी तिथे व्यक्त केली आहे. बाळकृष्णपंतांनी ही कथा लिहिली असल्यास ती आज उपलब्ध नाही. त्यामुळे या प्रकरणाविषयी कल्पना करण्यापलीकडे अन्य साधन लेखकाच्या हाती नाही. पण पूर्वीचे राष्ट्रपति

डॉ. राधाकृष्णन् यांचे चिरंजीव डॉ. गोपाळ यांच्या 'British Policy in India, 1858-1905' (पान १९५) या ग्रंथावरून त्या वेळी नेपाळ आणि बिहार या प्रांतांतून क्रांतीचीं गूढ कारस्थानें चालू होतीं, एवढें ज्ञान होतें.

In 1894, while all was quiet on the surface, there were rumblings below, particularly in Bombay. As on the eve of the revolt of 1857, chapatis were in circulation, and there had been at least one effort to incite Indian troops. Towards the end of March, there were reports from the northern districts of Bihar that trees were being daubed with mud and hair; and thereafter the practice, spread to southern districts, to the North West Provinces, Oudh, and even the Punjab. The fact that the smearing began from the Nepal border and followed the roads supported the theory that they had their origin in the Janakpur shrine in Nepal and were intended to attract pilgrims. The Lieutenant Governor of Bengal saw in it alarming evidence of power of combination and conspiracy, and of Government's lack of close unity with the people...... The new Viceory Elgin reported fires undoubtedly existed. ......He advised the Secretary of State against any severity at this stage in dealing with the Indian Princes.

या उताऱ्यावरून कळून येतें की, वरकरणी सर्व काही शांत शांत दिसत असतानाही महाराष्ट्रात आतून काही कारस्थानें शिजत असल्याचीं लक्षणें दिसत होतीं. १८५७ मध्ये क्रांतीच्या अग्रदूत बनलेल्या चपात्या १८९४ मध्येही पुन्हा वाटल्या जाऊ लागल्या आणि भारतीय सैनिकांना चिथावण्याचा निदान एक प्रयत्न तरी उघडकीला आला. पुढे मार्चमध्ये बिहारमधल्या वृक्षांना केशमिश्रित मृत्तिकेचा लेप दिलेला दिसू लागला लौकरच ही साथ आग्रा, अयोध्या आणि पंजाब या प्रांतांतूनही पसरली. या साथीचा जन्म नेपाळच्या सीमेवरील जनकपूर नगरात झाला असून तेथील मंदिराला यात्रेकरूंनी भेट द्यावी, या उद्देशानेच हें कृत्य केलें जात होतें, अशी अनेकांनी कल्पना केली. हा प्रकार घडला, तेव्हा बिहार प्रांत बंगालला जोडलेला होता. त्यामुळे कटवाल्यांच्या कल्पकतेच्या, संघटनेच्या आणि गुप्ततेच्या या निदर्शनाने बंगालच्या दुय्यम राज्यपालांना अतिशय चिंता वाटू लागली. त्यांची समजूत अशीच होती की, जिथे जिथे वृक्षांना हें प्रलेप केले जात आहेत, तेथे तेथे आपले पक्षपाती आहेत, हें क्रांतिकारकांना सुचविण्याकरिताच ही क्लृप्ति उपयोगात आणली जात आहे. त्या वेळचे राजप्रतिनिधि लॉर्ड

एलिगन यांनीही वरिष्ठांना कळविलें की क्रांतीचे वह्नि आतून धुमसत असल्याने सध्या संस्थानिकांशी सौम्यपणाने वागावें. याच्या पुढच्याच वर्षी बिहारी मुंडा समाजात बिरसा भगवान् या नांवाने प्रसिद्ध असलेल्या प्रेषिताचा उदय झाला. याचें शिक्षण जर्मन धर्मोपदेशकांच्या शाळेत झालें होतें आणि काही काळ तो ख्रिस्तीही बनला होता. मुंडा समाजात स्वातंत्र्याची आकांक्षा प्रथमपासूनच प्रभावी असून तिला जर्मन प्रचारकांनी खतपाणी पुरविलें असावें, हें उघड आहे. आपल्या डोळ्यांदेखत आदिवासी समाजांना आजही ख्रिस्ती धर्मप्रचारक सरकारविरुद्ध बंड करावयाला चिथावीत आहेतच. असो. बिरसा भगवानने सैतानी चालीरीती, सैतानी मनोवृत्ति आणि सैतानी सरकार यांच्याविरुद्ध प्रभावी प्रचार चालू केला. या प्रचाराने विचलित होऊन इंग्रजांनी त्याला आणि त्याच्या अनुयायांना पकडून १८९५ च्या नोव्हेंबरमध्ये दोन दोन वर्षांच्या शिक्षा ठोठावल्या. याच दिवसांत बाळकृष्णपंत चाफेकर हे नेपाळकडे आले होते. त्यांचा या आंदोलनाशी योगायोग घडून आला होता कीं नाही, हें आज सांगता येत नाही. असो. १८९८ मध्ये बिरसा भगवान् आणि त्याचे अनुयायी बंधमुक्त झाल्यानंतर त्यांनी सैन्याची जमवाजमव करून ख्रिस्त्यांच्या बाटवाबाटवीच्या केंद्रांवर हल्ले करण्याला प्रारंभ केला. या दिवसांत बिरसा भगवानाच्या हाताखाली सहस्रावधि सैनिक असल्याने इंग्रजांना प्रत्यक्ष लढाया करूनच त्या सैन्याचा मोड करावा लागला. त्यानंतर त्यांनी बिरसा भगवानाच्या अनुयायांवर इतके अनन्वित अत्याचार आरंभिले की, त्यांच्यापासून आत्मसंरक्षण करून घेण्याकरिता त्या आदिवासी लोकांना ख्रिस्ती बनून ख्रिस्ती धर्मोपदेशकांचाच आश्रय घ्यावा लागला. बिहारमधील आदिवासी ख्रिस्त्यांचा पूर्वेतिहास असा आहे. स्वतः बिरसा भगवान् दुसऱ्यांदा इंग्रजांच्या हाती लागला नाही आणि त्याचा अंत कसा झाला, हेंही इतिहासाला अविदित आहे.

कलकत्त्यातील वृक्षांना गोमयाचा लेप

१ जून १८९४ या दिवशी कलकत्त्याच्या मैदानातील चार वृक्षांना गोमयाचा लेप दिलेला आढळून आल्यामुळे त्या नगरीत मोठी खळबळ झाली होती. तेव्हा इंग्लिशमन या दैनिकाने, सत्तावन्नच्या बंडापूर्वी चपात्या वाटण्याच्या निमित्ताने जसा गुप्त संदेश जनतेला दिला होता, त्यापैकीच हाही प्रकार असून हिंदूंच्या लढाऊ वृत्तीच्या पुनरुज्जीवनाकडे सरकारने काळजीपूर्वक लक्ष द्यावें, असा उपदेश केला होता.

✦ ✦ ✦

प्रकरण दहावें

राजद्रोहाचा पहिला अभियोग आणि बंदीजीवन

१८९७ मध्ये जुलै मासाच्या अंती टिळकांना राजद्रोहाच्या निमित्ताने पहिली अटक झाली. त्या वेळी राजद्रोहाची व्याख्या काय होती, हें स्वतः टिळकांनीच २०-७-९७ च्या 'केसरी'त विस्ताराने सांगितलें आहे. 'भारतीय दंडविधान निबंध १२४ अ यात राजद्रोही भाषण करणाऱ्यास, किंवा लेख लिहिणाऱ्यास शिक्षा सांगितली आहे. सरकारचे विषयी लोकांच्या मनात अप्रीति किंवा द्वेष उत्पन्न करणें यांस राजद्रोह म्हणतात, पण या निबंधात सरकारच्या कृत्याविषयी निषेध (disapprobation) आणि अप्रीति या दोहोंमध्ये भेद केला आहे. त्याचें स्पष्टीकरण असें आहे की, सरकारच्या कोणत्याही कृत्याविषयी कोणीही आपला निषेध कितीही कडकपणे व्यक्त करण्यास प्रत्यवाय नाही. मात्र असा निषेध व्यक्त करताना सरकारच्या नैर्बंधिक अधिकाराचें अतिक्रमण करण्याची, किंवा सरकारची सत्ता नष्ट करण्याची बुद्धि जाग्रत् होणार नाही, असे शब्द वापरले पाहिजेत. या स्पष्टीकरणावरून राजद्रोहाचा अर्थ काय करावयाचा हें बहुतेक स्पष्ट होतें. ज्या लेखाने राज्याची उलथापालथ किंवा बंड होण्याचा संभव आहे, त्या लेखांचा यात समावेश होतो.' टिळकांच्या मनातून कितीही राजद्रोह ज्वालामुखीच्या तप्त रसाप्रमाणे बाहेर येऊ पहात असला तरी त्यांच्या आत्मसंयमनामुळे लेखनाच्या द्वारा त्याला आपली दाहकता व्यक्त करण्याला अवसर लाभत नसे. त्या दिवसांत 'पायोनियर' सारख्या साम्राज्यवाद्यांच्या मुखपत्रानेही बोलून दाखविलें होतें :

The gravamen of the charge against Tilak lay not so much in that he caused certain words to be written and published, but that he seized on a particular time in which to write and to a particular section of the people adding fuel to a fire already smouldering.

म्हणजे टिळकांनी विशिष्ट वेळी आणि विशिष्ट वर्गाला उद्देशून प्रचार करून आधीच धुमसणाऱ्या आगीत तेल ओतलें, हा त्यांच्यावर आरोप होता. त्यांनी वापरलेले शब्द विशेष आक्षेपार्ह होते, असें नाही.

यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की आपल्या लेखात राजद्रोह नाही, असें जें टिळक प्रतिपादीत होते, तें सत्यच होतें.

प्रीतीचा अभाव म्हणजे राजद्रोह

यामुळेच न्यायमूर्ति स्ट्राची यांनी पंचांना अभियोग समजावून सांगताना राजद्रोहामध्ये प्रीतीच्या अभावापासून बंडाच्या चिथावणीपर्यंत सर्व अवस्थांचा समावेश होतो, असें अधिकारपदावरून विधान केलें. हें विधान करताना त्यांनी दुहेरी अप्रामाणिकपणा व्यक्त केला होता. अप्रीति म्हणजे प्रीतीचा अभाव, ही त्यांची व्याख्या अप्रामाणिकच नव्हे तर ती हास्यास्पदही होती आणि ही हास्यास्पद व्याख्या खपून जावी म्हणून त्यांनी दडपून सांगितलें की, कलकत्त्याच्या वरिष्ठ न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश सर कोमर पेथेराम यांनी अशीच व्याख्या केली आहे. या वेळी टिळकांचा बचाव करणारे बॅ. प्यू यांनी न्यायाधीशांना चुकीची माहिती सांगताना तत्काळ अडवावयाला हवें होतें. कारण प्यू हे स्वतःच कलकत्त्याचे राहणारे असून सर कोमर पेथेराम यांनी ज्या 'वंगवासी' वरील अभियोगात disaffection means contrary to affection असा अधिकृत अभिप्राय व्यक्त केला, तेव्हा ते स्वतःच सरकारपक्षाकडून काम करीत होते. पण ही गोष्ट त्याच क्षणी त्यांच्या हातून घडून आली नाही. पंचांनी ही स्ट्राची महाशयांची अद्भुत व्याख्या उतरून घेतली आणि त्या व्याख्येला अनुसरून साऱ्या पाश्चात्य पंचांनी टिळकांना दोषी ठरविलें. मागाहून न्यायमूर्तींनी सुखसंवादात बोलून दाखविलें की ती केवळ माझ्या जिभेची चूक होती, माझ्या न्यायबुद्धीची चूक नव्हती. पण हें केवळ जिव्हास्खलन नसून त्यांच्या न्यायबुद्धीचेंच स्खलन होतें. या न्यायमूर्तींची मुंबईतील नेमणूक ही तेथील सरकारच्या इच्छेविरुद्ध भारत-सचिवांच्या आज्ञेने झालेली होती आणि टिळकांच्यावरील अभियोगही लॉर्ड सँढर्स्ट यांच्या इच्छेविरुद्ध भारतसचिवांच्या आज्ञेनेच उभा केलेला होता. 'वंगवासी'च्या अभियोगात आठ युरोपीय आणि एक भारतीय असे पंच निवडून आलेले पाहून सर कोमर पेथेराम यांनी विस्मय व्यक्त केला होता आणि त्या पंचांनी सात विरुद्ध दोन मतांनी आरोपीला दोषी ठरविलेलें पाहून त्यांनी बहुमताचा निर्णय ग्राह्य न मानता हा अभियोग पुन्हा चालविण्याची आज्ञा दिली होती. याच्या उलट मुंबई सरकारने सहा भारतीय आणि एक पाश्चात्य इतक्या पंचांना विरोध करून सहा पाश्चात्य आणि तीन भारतीय असे पंच निवडून आणले आणि त्या अभारतीयांचा अन्यायी निर्णय न्यायमूर्तींनी ग्राह्य मानला. टिळकांच्या

खटल्यासहच त्या वेळी 'पुणें वैभवा'चे संपादक शंकरराव केळकर यांच्यावरही सरकारने खटला भरला होता. पण या प्रसंगी नऊ पंचांपैकी चार पंचांनी आरोपी निर्दोषी असल्याचा अभिप्राय दिल्यामुळे त्यांचा खटला पुन्हा चालविण्याची आज्ञा झाली. कारण पंचांपैकी निदान सहा-जणांचें एकमत झालें तरच त्यांचा निर्णय न्यायाधीशांना स्वीकारता येतो. पुढे केळकरांनी कृतापराधाची क्षमा मागितली आणि चार पंचांकडून थप्पड मिळाली असल्यामुळे सरकारने ती मुकाटचाने स्वीकारली.

न्यायमूर्तींच्या अज्ञानाचा नमुना

टिळकांना शिक्षा सांगताना न्यायमूर्ति स्ट्राची हे असें उद्‌गारले.

I have come to the conclusion that I ought to pass upon you half the full term of imprisonment allowed by the section, namely, a sentence of eighteen months' rigourous imprisonment.

याचा अर्थ असा होतो की राजद्रोहाच्या निर्बंधानुसार केवळ सश्रम कारावासाची शिक्षा सांगता येते, अशी या न्यायमूर्तींची समजूत होती, म्हणून त्यांनी तीन वर्षे सश्रम कारावासापैकी अर्धी शिक्षा टिळकांना सांगितली. पण राजद्रोहाच्या निर्बंधात केवळ कारावासाचा उल्लेख असल्याने त्या निर्बंधाप्रमाणे साधी कारावासाची शिक्षा सांगता येते, ही साधी गोष्टही त्या द्वेषांध न्यायमूर्तींच्या ध्यानात आली नाही. या खटल्यातील सहा पंच ज्या युरोपीय समाजापैकी होते. त्या समाजाने लॉर्ड सँढर्स्ट यांनी टिळकांवर खटला न भरल्यास त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घालण्याची धमकी दिली होती. पंचांना न्यायमूर्तींनी मान-भावीपणाने उपदेश केला होता की, न्यायालयाबाहेर ऐकलेल्या सर्व गोष्टी विसरून आपण न्यायदान केलें पाहिजे. पण या युरोपीय समाजाचीं मुखपत्रें जीं 'टाइम्स' आणि 'गॅझेट', त्यांनी टिळकांविरुद्ध केलेल्या विषारी प्रचारामुळे हा खटला उद्‌भवला होता. इतकेंच नव्हे तर या प्रकरणात टिळक निर्दोष सुटले तर ते लगेच 'टाइम्स', 'गॅझेट' विरुद्ध मानहानीचा अभियोग आणतील, अशी त्यांना भीति वाटत होती. न्याय-मूर्ति स्ट्राची यांचें अन्यायाशी सततचें साहचर्य असल्याने टिळकांना तारणावर सोडणारे न्यायमूर्ति बद्रुद्दिन तय्यबजी यांच्यामागून तीन मासांनी त्यांची नेमणूक झाली असूनही भारतसचिवांनी वडिलकीचा मान स्ट्राचींनाच दिला होता.

खटले मुंबईत कां ?

सरकार टिळकांना केव्हा शिक्षा ठोठावणार, म्हणून १८९४

पासून प्रतीक्षा करणाऱ्या गोखल्यांच्या अनुयायांनी १९०८ मध्ये टिळकांना काळेपाण्याची शिक्षा सांगितल्यानंतर आनंदाश्रमात जमून पेढे खाल्ले ही गोष्ट नी. म. केळकरांसारख्या हरिभाऊंच्या चरित्रकारांनी ग्रंथनिविष्ट करून ठेविली आहे. टिळकांच्यावर दोन वेळा राजद्रोहाचे अभियोग झाले असताना वरिष्ठ न्यायालयातील इंग्रज पंचांनी त्यांना दोषी ठरविलें आणि पारशी अथवा अन्य जातीतील पंचांनी निर्दोषी ठरविलें. यावरून अनेक चरित्रकारांनी असें म्हटलें आहे की हे अभियोग पुण्यात मराठी जाणणाऱ्या पंचांपुढे चालले असते तर त्यांचा निर्णय वेगळ्या प्रकारे लागला असता. पण पुण्यात सरकारजमा मवाळ पक्षाच्या पंचांसमोर अभियोग चालून त्यांनी आपल्याला राजद्रोही ठरविण्याचा धोका पतकरण्यापेक्षा मुंबईतील इंग्रज पंचांकडून अन्याय मिळविणें अधिक श्रेयस्कर असा विचार करून अभियोगाच्या वार्ता कानांवर येऊ लागताच टिळक आपल्या पायांनी मुंबईला जात.

मराठीच्या अज्ञानासाठी स्वराज्याची मागणी

टिळकांवरील राजद्रोहाच्या दोनहीं अभियोगात मराठी न जाणणारे पंच आणि न्यायाधीश यांनी आपले मराठी लेख राजद्रोही ठरवून आपल्याला शिक्षा सांगणें किती हास्यास्पद आहे, हें टिळकांनी त्या लेखांच्या भाषांतरांची चिकित्सा करताना दाखवून दिलें आणि मराठी न जाणणारे राज्यकर्ते महाराष्ट्रावर राज्य करण्यास किती अपात्र आहेत, हेंही त्यासहच सिद्ध केलें. यासंबंधी अमेरिकेचे स्टॅनले वॉलपेर्ट यांनी म्हटलें आहे,

Tilak's challenge cut to the heart of the question of a foreign people's capacity to rule over a land whose languages they neither read nor spoke with fluency. Tilak insisted that a judge and a jury, not reading Marathi lacked the ability to try his case with intelligence. This argument was to be the key-note of his second sedition trial defence as well and served to undermine the very premise of rule by law introducing the demand for Swarajya into the court room and jury-box of British India.

गोखलेपक्षाने टिळकांच्या लेखांची आणि भाषणांचीं भाषांतरें सरकारला विनामूल्य पुरविण्याचा देशघातकी व्यवसाय पुण्यात चालू केला नसता तर टिळकांनीही इंग्रज पंचांपुढे आत्मसमर्थन करण्याचा प्रसंग स्वतःवर ओढवून घेतला नसता.

अन्यायाची जाणीव

या वेळी न्यायाधीश आणि पंच यांना मराठी येत नसल्याने

आपल्या हातून अन्याय होण्याचा संभव असल्याची जाणीव न्यायमूर्तीनाही झाली होती आणि त्यांनी न्यायालयात बोलूनही दाखविलें :

In a matter of this kind it is extremely difficult for the jury who are not Marathi scholars, and for me also to say what is the proper meaning of these passages. And I think that I should consider the matter fully between this and tomorrow whether or not I should myself call a witness who is an expert in Marathi, to give an opinion as to some of these passages.

मला वाटतें की यातील काही उताऱ्यांचा खरा अर्थ समजून घेण्याकरिता एखाद्या मराठी तज्ज्ञाला साक्षीला बोलवावें काय? याचा मी विचार करीत आहे. पण या विचाराप्रमाणे त्यांनी कोणाही तज्ज्ञाला साक्षीला बोलाविलें नाही आणि आरोपीला न्याय देण्यापेक्षा न्याय देण्याचा देखावा करून त्याला शक्य तितक्या लौकर शिक्षा सांगण्याकडेच आपल्या मनाचा कल असल्याचें सिद्ध केलें. स्टॅनले वॉलपेर्ट स्वतःच म्हणतात,

Strachy defined the section under which Tilak was tried in so ludicrously inaccurate a manner that his words stand as a monument to the abdication of wisdom in the face of fear.

सुरेंद्र बानर्जींचा मध्यस्थीचा प्रयत्न

'बंगवासी'वरील राजद्रोहाच्या अभियोगाच्या प्रसंगी वंगीय पत्रकारांच्या वतीने सुरेंद्रनाथांनी पुढाकार घेऊन सरकारला असें अभिवचन दिलें होतें की, 'वंगवासी'च्या संपादकांची क्षमायाचना सरकारने स्वीकारल्यास त्याच्याकडून पुनश्च राजद्रोहाचा अपराध घडणार नाही, अशी हमी आम्ही पत्रकार द्यावयाला सिद्ध आहोत. या त्यांच्या म्हणण्याला मान देऊन सरकारने वंगवासीवरील अभियोग पुढे चालविला नाही. टिळकांच्या पहिल्या अभियोगाच्या प्रसंगी सुरेंद्रनाथांनी पुन्हा एकवार तसाच प्रयत्न करून पाहिला. पण या प्रकरणी 'दोघेही प्रबळ हटी' असा त्यांना अनुभव येऊन त्यांचा प्रयत्न वाया गेला. यासंबंधी मोतीलाल घोष यांचे चरित्रकार लिहितात :

At this juncture some friends of Lokamanya Tilak suggested to him to make up his quarrel with the Government by making an apology. But when this proposal reached Tilak he was deeply pained. As a matter of fact, Motilal in consultation with some of his friends thought of approaching Government to pursuade them to drop the case against Tilak as they had done in the Bangawasi case. So Motilal wrote to Tilak about this

matter. In this connection, Lokmanya wrote a letter to Motilal from which is given the following extract. "The other side expects me to do what amounts to be pleading guilty. I am not prepared to do so. My position among the people entirely depends upon my character, and if I am cowed down by the prosecution–in the heart of my hearts I know the case for the prosecution is the weakest ever placed before the jury – I think living in Maharashtra is as good as living in the Andamans. On the merits of the case, I am confident of success though I cannot in this letter and in the present state of my health give you all my reasons. I am afraid of a non-Marathi knowing jury and not of justice. You as well as I know that we are incapable of nourishing any sinister feeling against British rule, and it is thus impossible for any of us to be convicted of such a heinous charge as sedition. Such risks however we must take if we dabble in politics. They are the risks of our profession and I am prepared to face them. If you all advise, I am prepared to go only so far as this : "I do not think that the articles are seditious but the advisers of the Government think otherwise. I am sorry for it." I do not think this will satisfy the Government. Their object is to humiliate the Poona leaders and I think in me they will not find a Kutcha reed as they did in prof. Gokhale and the editor of the Dnyanaprakash. Then you must remember, beyond a certain stage, we are all servants of the people. You will be betraying and disappointing them if you show a lamentable lack of courage at a crucial time. but above all as an honest and honourable man, how can I plead guilty to the charge of entertaining sedition when I had none ? If I am convicted, the sympathy of my countrymen will support me in my trouble."

या प्रसंगी टिळकांच्या काही मित्रांनी त्यांना गोखल्यांचें अनुकरण करून आपली सुटका करून घेण्याची सूचना केली. पण ही सूचना पाहून टिळकांना पराकाष्ठेचें दुःख झालें. तेव्हा 'अमृतबाजार'चे मोतीलाल घोष आणि त्यांचे काही मित्र यांनी वंगवासीच्या संपादकांप्रमाणेच टिळकांवरील अभियोगही सरकारने काढून घ्यावा, असा प्रयत्न चालविला होता. पण 'बंगवासी'वर सरकारची वक्रदृष्टि होण्यापूर्वी कलकत्त्यात कोणा इंग्रज अधिकाऱ्याचें बलिदान झालें नव्हतें आणि आपल्या सर्व चळवळींना भगवंताचें अधिष्ठान आहे असा विश्वास असलेले टिळक, भगवंताच्या

विरुद्धपक्षाला शरण जाण्याला सिद्ध नव्हते. यामुळे त्यांनी मोतीबाबूंना लिहिलें, "प्रतिपक्षाची अशी अपेक्षा आहे की, मी अतिपतित दुराचारी आहे अशी मान्यता देऊन क्षमा मागावी. सरकारपुढे असें लोटांगण घालण्याची माझी सिद्धता नाही. समाजात माझी जी प्रतिष्ठा आहे, ती सारी माझ्या शीलावर अवलंबून आहे आणि असल्या अभियोगांनी मी भेदरलो तर मला महाराष्ट्रातील निवास अंदमानातील निवासाइतकाच तापदायक होईल. सरकार पंचापुढे नेत असलेल्या आरोपात काहीच तथ्य नाही. केवळ पुराव्यावरून निर्णय झाला तर मलाच यश लाभेल, असा मला पूर्ण विश्वास वाटतो. या पत्रात आणि माझ्या प्रकृतीच्या सध्याच्या अवस्थेत मला सविस्तर कारणें कळविता येत नाहीत. मला न्यायाची भीति वाटत नाही. केवळ मराठी न जाणणाऱ्या पंचांची भीति वाटते. माझ्याप्रमाणेच तुम्हांलाही माहीत आहे की, आपण (पत्रकार लोक) ब्रिटिश राज्याविषयी आपल्या मनातून दुर्बुद्धि बाळगण्याला असमर्थ आहोत आणि त्यामुळे राजद्रोहासारख्या निंद्य अपराधानिमित्त आपल्याला शिक्षा होणें अशक्य आहे. पण आपण राजकारणात भाग घेतला म्हणजे असल्या साऱ्या धोक्यांना तोंड द्यावें लागतें. ही आपल्या व्यवसायातली संकटं आहेत. तुमचा सर्वांचा आग्रह असला तर मी इतकेंच म्हणू शकेन की 'केसरी'तील लेख राजद्रोही आहेत, असें मला वाटत नाही. पण सरकारच्या विधिविशारदांना तसें वाटत असल्यास मलाही त्याबद्दल खेद होत आहे. पण एवढ्याने सरकारचें समाधान होणार नाहीं. त्यांचा उद्देशच पुण्याच्या पुढाऱ्यांची विटंबना करणें हा आहे. पण प्रो. गोखले आणि ज्ञानप्रकाशचे संपादक यांच्याप्रमाणे मी कच्चा नाहीं, हें त्यांना कळून येईल. तुम्हीही ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की, एका विशिष्ट मर्यादेपलीकडे आपण सारे लोकसेवक बनतो. तेव्हा आणीबाणीच्या प्रसंगी आपण शोचनीय भेकडपणा व्यक्त केला तर त्यामुळे आपण समाजाचा विश्वासघात आणि निराशा केल्यासारखें होईल. माझ्या लेखनात राजद्रोह नसताना त्या आरोपाला मी कशी मान्यता द्यावी? मला शिक्षा झालीच तर माझ्या देशबांधवांच्या सहानुभूतीचा आधार माझ्या संकटात उपयोगी पडेल.

स्ट्राची निर्णयावरील टिळकभाष्य

राजद्रोहाच्या प्रचलित निबंधाप्रमाणे आपण निर्दोषी आहोत, हा आग्रह टिळकांनी शिक्षा झाल्यानंतरही सोडला नाहीं. ४-७-१८९९ या दिवशी 'केसरी'च्या संपादनाची धुरा पुनश्च आपल्या स्कंधावर घेताना

लिहिलेल्या 'पुनश्च हरि ओम्' या लेखात त्यांनी स्ट्राची निर्णयावर भाष्य करताना म्हटलें आहे: 'जेणेंकरून राज्याला धोका येईल, अथवा राज्याची उलथापालथ होऊ शकेल, किंवा सरकारची निर्बंधानुसारी सत्ता न जुमानण्यास लोकांना उत्तेजन मिळेल, त्यास राजद्रोह म्हणावयाचें असा पूर्वीच्या निर्बंधाप्रमाणे राजद्रोहाचा अर्थ होता, असें आम्हीच नव्हे तर सर्व विधिविशारद तेव्हा समजत होते. किंबहुना ज्या इंग्रजी विधिविशारदाने दंडविधानात १२४ अ निर्बंध प्रथम समाविष्ट केला, त्यानेही तो निर्बंध संमत करून घेताना विधिमंडळात असाच याचा अर्थ आहे, असें स्पष्टपणे बोलून दाखविलें होतें. एवढी श्रेष्ठ हमी मिळाल्यावर मग 'केसरी'कारांच्या मनात त्याच्या अर्थाविषयी कधीही संशय येण्याचें काही कारण नव्हतें आणि त्याने आपले लेख या निर्बंधाच्या या अर्थाच्या दृष्टीने राजद्रोही होऊ नयेत, अशा बेतानेच लिहिले होते. पण राजद्रोहाचें हें माप सरकारास संमत नसल्यामुळे तें संकुचित करण्याचा त्यांचा बरेच दिवस संकल्प झालेला होता म्हणून म्हणा, किंवा अन्य कारणांमुळे म्हणा, त्यास आमचे लेख भयंकर वाटू लागले. इतकें झालें तरी आमची अशी समजूत होती की, निर्बंधात असलेलें राजद्रोहाचें लक्षण जर बदलावयाचें असेल तर तें नवा निर्बंध करून बदलतील आणि त्यानंतर आमच्या विचारांस कोणतें स्वरूप द्यावयाचें याचा आपणांस विचार करता येईल. परंतु ही आमची आशा व्यर्थ ठरली. इंग्रजी राज्यपद्धतीप्रमाणे निर्बंध बदलण्याच्या दोन पद्धति आहेत. एक विधिमंडळात नवा निर्बंध आणून पूर्वीचा निर्बंध बदलून नवा निर्बंध संमत करून घ्यावयाचा; आणि दुसरी म्हणजे प्रमुख न्यायाधीशांकडून प्रचलित असलेल्या निर्बंधाचाच निराळा अर्थ करून घ्यावयाचा. या दोन पद्धतींपैकी पहिल्या रीतीने निर्बंधात फेरफार झाला असता, तो फेरफार जेव्हा होईल, त्या दिवसापासून त्याची बजावणी होते. पण दुसऱ्या रीतीने फेरफार झाला असता फेरफार करणाऱ्या न्यायाधीशांपुढे जो अभियोग असतो त्यासच तो पहिल्याने लागू होऊन निदान एक तरी निर्बंधाचा बळी अशा वेळी नैवेद्य म्हणून न्यायदेवतेस द्यावा लागतो. हें तत्त्व निर्बंधांचा अभ्यास करणाऱ्या सर्व लोकांस माहीत आहेच. प्रकृत स्थली असाच प्रकार घडून आला, हें विशद करून सांगण्याची फारशी आवश्यकता नाही. सरकारने विधिमंडळात नवा निर्बंध आणून राजद्रोहाची व्याख्या पहिल्यानेच बदलली असती तर 'केसरी'कारांचा बळी घेण्याची आवश्यकता उरली नसती. कारण ज्या वेळी जसा नियम असेल, त्या-

प्रमाणे आपलें वर्तन ठेविलें पाहिजे, हें 'केसरी'कारांस पूर्ण अवगत आहे. पण सरकारची मनोवृत्तिच चमत्कारिक झालेली असल्याने त्या वेळी प्रचलित असलेल्या नियमांचा न्यायालयाकडून निराळा अर्थ करून घेऊन नंतर मग तो अर्थ दुसरा कोणी न्यायाधीश मान्य करणार नाही अशा समजुतीने स्ट्राची महाशयांनी केलेल्या अर्थास पुन्हा नियम वदलून वैध स्वरूप देऊन घेतलें. तात्पर्य, निर्बंध बदलण्याच्या ज्या दोन पद्धति वर सांगितल्या आहेत, त्या दोहोंचाही एका काळीच प्रयोग झाल्याने 'केसरी'कारांस आणि त्यासह दुसऱ्या काही वर्तमानपत्रकारांस निर्बंधांचे बळी व्हावें लागलें.'

न्यायमूर्ति रानड्यांची भागीदारी

सरकारच्या या कारस्थानात न्यायमूर्ति रानडेही भागीदार होते. या वेळी रानड्यांच्या पुढेही राजद्रोहाचे काही खटले आले होते. त्या निमित्ताने त्यांना राजद्रोहाच्या निर्बंधाचा अर्थ न्यायमंत्र्यांनी विधिमंडळापुढील भाषणात जो केला होता, तोच करून स्ट्राची महाशयांनी निर्मिलेल्या पाखंडाचा नायनाट करता आला असता.

Let it be shown that the matter complained of, was not consistent with disposition to obey the law; let it be shown that it was consistent with a disposition to resist the law by force and it did fall under that section. Otherwise not.

न्यायमंत्र्यांच्या या स्पष्टीकरणाप्रमाणे 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें'? या सावरकरांच्या कवितेतील आशय तेवढा आक्षेपार्ह ठरला असता. 'शिवाजीचे उद्गार' ही चाफेकरांची कविता राजद्रोही ठरली नसती. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की राजद्रोहाच्या निर्बंधाने नुसती कारावासाची शिक्षा सांगितली होती, तिचा अर्थ साधी कारावासाची शिक्षा करणें स्वाभाविक होतें. सरकारविरोधी इतर कृत्यांना सश्रम अथवा साधी अशी दोन प्रकारची शिक्षा सांगितली असल्याने राजद्रोहासाठी सांगितलेल्या कारावासाच्या शिक्षेचा अर्थ नुसता कारावास असा करणें शक्य होतें, इतकेंच नव्हे तर तें स्वाभाविकही होतें. पण या साध्या गोष्टी करण्याची इच्छा आणि धैर्य रानड्यांनी दाखविलें नाही. मग त्यांना सरकारच्या अन्यायी कारस्थानातील भागीदार कां म्हणू नये? या न्यायमूर्तींच्या चरित्राची चिकित्सा करताना 'काँग्रेस आणि तिचे पुढारी' या लेखात शिवरामपंत परांजप्यांनी तळतळून लिहिलें आहे. "देशहिताच्या गोष्टी बोलणें आणि सरकारसेवा करणें, असा जोपर्यंत

आपल्यातील श्रेष्ठ लोकांचा वर्तनक्रम चालला आहे आणि असल्या वर्तनक्रमाला जेथे स्मारकाचा मान मिळत आहे, तेथे लोकांनी प्रतिमासी चार पांच सहस्र रुपयांवर, सरकारच्या संतोषावर, पदव्यांवर, विधि-मंडळातील स्थानांवर, सरकारी उद्यानोपहारांवर पाणी सोडण्याला काय म्हणून सिद्ध व्हावें ? सरकारने ज्याचा मान केला, त्याचेच लोकांनी देव्हारे माजवावयाचे आणि सरकारने ज्याला वाईट म्हटलें त्यांना सदोदित पाण्यात पहावयाचें, अशा प्रकारची जेथील लोकांची पारितोषिक द्यावयाची रीत आहे, तेथील लोकांना चांगले पुढारी कसे मिळावे? सरकार-सेवा करून देशहिताचीं कामें करता यावयाचीं नाहीत असें नाही, सर-कारला संतुष्ट राखल्यानेच आपला अंती लाभ आहे, सध्या सरकारला असंतुष्ट करून चालण्याचा काळ नाही, असलीं जीं कित्येक शहाणपणाचीं म्हणून सूत्रें आपल्यामध्ये अलीकडे प्रचारात आलीं आहेत, तीं आपल्या मनावर प्रत्यही अबाधित रीतीने ठसविलीं जात असता आपल्यात खरे लोकनायक निर्माण होत नाहीत, यात आपल्याला आश्चर्य काय म्हणून वाटावें ? न्यायमूर्तींसारख्या सरकारी सेवेच्या जाळ्यात पाय सापडलेल्या लोकांनी आपलीं अधिकारपदें तर जाऊ नयेत आणि लोकांचेही पुढारी म्हणवून घेण्याची आपल्याला संधि मिळावी, या हेतूने हीं सूत्रें प्रचलित केलीं आहेत, हें उघड आहे. असलीं स्वदेशविघातक सूत्रें प्रचलित करून या लोकांनी कदाचित् आपलें हित साधून घेतलें असेल आणि सर-कारचेंही बरेंच हित साधण्याला ते कारणीभूत झाले असतील ; परंतु त्यांनी स्वदेशाची मात्र असल्या सूत्रांनी अत्यंत हानि करून ठेविली आहे. स्वतः त्यांच्या हातून तर काही झालें नाहीच, पण पुढील पिढीच्या हातूनही विशेष काही होऊ नये, अशी व्यवस्था या सद्गृहस्थांनी करून ठेविली आहे. '

शिक्षेचा जनतेवरील परिणाम

न्यायमूर्ति स्ट्राची यांनी टिळकांना शिक्षा सांगितली, त्या दिवशी मद्रास येथील नागरिकांनी दुपारपासूनच ' हिंदु ' दैनिकाच्या कार्यालया-समोर गर्दी केली होती आणि ' हिंदू'च्या चालकांनीही येतील त्या तारांच्या प्रती बाहेर फलकांवर लावण्याची व्यवस्था केली होती. निर्ण-याची तार आल्यानंतर टिळकांना दीड वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा झालेली पाहून दुःख तर सर्वांनाच झालें. त्यातल्या त्यात भावनाप्रधान लोकांना हृदय पिळवटून टाकणाऱ्या वेदना झाल्या. मद्रास मेलसारख्या आंग्लभारती पत्रानेही लिहिलें होतें :

The news of Mr. Tilak's conviction was received as a national calamity. It would be impossible for a good length of time to forget the memory of that eventful evening.

टिळकांना झालेली शिक्षा म्हणजे आपल्या राष्ट्रावर कोसळलेलें संकटच मानून मद्रासच्या नागरिकांनी शोक केला. त्या घटनाबद्दल संध्याकाळची स्मृति पुसली जावयाला बराच काळ जावा लागेल. मद्रासी लोकांत उत्तरेच्या लोकांविषयी अलीकडे जी द्वेषाची ज्वाळा भडकली आहे, तिच्या प्रकाशात हा जुना इतिहास वाचतानाही मनाला विषाद वाटतो. असो. या शिक्षेनंतरचें राष्ट्रीय सभेचें अधिवेशन त्या वर्षी उमरावतीला भरलें आणि टिळकांचे परममित्र दादासाहेब खापर्डे हेंच स्वागतसभेचे अध्यक्ष होते. तरीसुद्धा त्यांना सभेच्या व्यासपीठावर टिळकांचें चित्रही लावतां आलें नाही, किंवा राष्ट्रीय सभेकडून त्यांच्या शिक्षेसंबंधी एखादा निषेधाचा ठरावही करून घेता आला नाही. नाही म्हणावयाला सुरेंद्रनाथ बानर्जींनी नातूबंधूंच्या अटकेवरील भाषणात टिळकांचा उल्लेख केला. 'My heart goes to Tilak through the walls of his prison.' 'टिळकांना तुरुंगात डांबून ठेवणाऱ्या भिंती ओलांडून माझें मन टिळकांकडे ओढ घेतें.' हें वाक्य ऐकून सभेत टाळ्यांचा जो प्रचंड गजर झाला, त्या गजरानेच सभेत उपस्थित असलेले पुढारी आणि अनुपस्थित असलेले पुढारी यांच्यातील प्रभेद सभासदांनी व्यक्त करून दाखविला.

टिळकांचें बंदीजीवन

बंदिवासात कदन्न खावें लागतें, झोप मिळत नाही, कष्टाचीं कामें करण्याची सवय नसल्यास शारीरिक हालअपेष्टांना तोंड देता येत नाही आणि औषधपाणी वेळेवर मिळत नाही. या कष्टांपैकी टिळकांची निद्रा अगदी आज्ञाधारक असल्याने झोपेच्या बाबतीत त्यांचे हाल झाले नसावेत. बंदिशालेतील अन्न त्यांना खाववत नसल्याने त्यांची चक्क उपासमार होत होती. त्यामुळे दोनतीन मासांच्या अवधीत त्यांचें वजन पंचवीस पौंडांनी उतरलें. टिळकांना न मिळणारा दूधभात मला मिळत असूनही माझें वजन दोन मासांत पंधरा पौंडांनी उतरलें. पण टिळक सश्रम कारावासाचे बंदी होते आणि मी नुसता स्थानबद्ध होतो. मी प्रथम ब वर्गातील स्थानबद्ध असल्याने नागपुरातील उन्हाळ्यात मला मानवी गुरांच्या गोठ्यात (म्हणजे आदानकेंद्र नांवाच्या बराकीत) ठेविलें होतें. पण टिळकांना चार लोकांत ठेवण्याची सोय नसल्याने त्यांना प्रथमपासून

स्वतंत्र कोठडीत ठेविलें असावें. येरवड्यात टिळकांना ज्या कोठडीत ठेविलें, त्या कोठडीत त्यांचें मोठें चित्र लावून तिचें टिळकमंदिरातच परिवर्तन केलें आहे. येरवड्यात असताना मी ज्या दिवशी त्या कोठडीचें दर्शन घेतलें, त्याच्या दुसऱ्या दिवशीच माझी नागपुराला पाठवणी झाली. या टिळकमंदिरात आता बंदिजनांना ठेवीत नाहीत. ही बंदी झाली नव्हती, तेव्हा काही दिवस गोगट्यांनाही त्याच कोठडीत ठेविलें होतें. असो. पहिल्या दोनतीन मासांतच टिळकांचें वजन पंचवीस पौंडांनी उतरल्यामुळे दीड वर्षाची शिक्षा भोगून ते जिवंत परत येतील, असा भरंवसा वाटेना. तेव्हा मुंबईचे ॲ. सेटलूर यांनी लंडन येथील बंदिशालासुधारणासंस्थेचे कार्यवाह टालाक यांना पत्र लिहून टिळकांचे कष्ट दूर करण्याची विनंती केली. त्या सद्‌गृहस्थांनीही मोठ्या तत्परतेने तेव्हाचे भारतसचिव लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांना जाणीव करून दिली की, टिळकांचें बंदिवासात निधन झालें तर त्याचा जगभर बोभाटा होईल आणि अशी गोष्ट घडणें सरकारच्या दृष्टीने अनिष्ट आहे. त्यानंतर भारतसचिवांनी टिळकांच्या प्रकृतीची काळजी घेण्याची सूचना मुंबईसरकारला केली. त्याच वेळी १८९८ च्या जानेवारीत मुंबईत ग्रंथिक सन्निपाताची साथ असल्याने टिळकांना लस टोचली आणि त्यामुळे त्यांना बराच ताप आला. त्यातून उठल्यानंतर त्यांची येरवड्यात बदली झाली. तिथे त्यांना दूध, तूप आणि भात मिळू लागल्यानंतर त्यांच्या प्रकृतीत थोडी सुधारणा होऊ लागली. येरवड्यात १९६५ मध्येही खरें दूध मिळत होतें. मग १८९८ मध्ये तर टिळकांना चांगलें दूध मिळालें असेलच. येरवड्यात आणल्यावर लेखनवाचनाची आणि रात्री खोलीत दिवा ठेवण्याची अनुज्ञा मिळाली. याच सुमाराला पंडित मोक्षमूलरभट्ट (मॅक्समुल्लर यांनीच आपल्या नांवाचें हें संस्कृतीकरण केलें आहे. माझे जपानी विद्यार्थी हिदेओ किमूरा हे स्वतःला हृदयकुमार म्हणवीत, हें पुष्कळांना माहीत असेल.) यांनी आपली सायणभाष्यासहित ऋग्वेदाची आवृत्ति टिळकांना भेट म्हणून पाठविली आणि तिचा अभ्यास करतानाच टिळकांना वैदिक आर्यांचें मूलस्थान दीर्घरात्रीच्या देशात म्हणजे ध्रुवकटिबंधात असल्याचा क्रांतिकारक शोध लागला. मॅक्समुल्लर यांच्या पुरस्कारामुळेच इंग्लंडातील अनेक विख्यात व्यक्तींनी टिळकांची, शिक्षा संपण्यापूर्वी सुटका करावी अशी राणीसरकारला विनंती केली आणि तिचा कालांतराने कां होईना, सुपरिणाम होऊन, टिळकांनी पुन्हा राजद्रोह केला तर उरलेली षण्मासाची शिक्षा भोगावी, या अटीवर त्यांची १८९८ च्या सप्टेंबरमध्ये सुटका झाली. टिळकांचा 'ओरायन' अथवा वेदकालनिर्णय हा इंग्रजी

ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर त्या ग्रंथासंबंधी त्यांचा मॅक्समूलर यांच्याशी पत्रव्यवहार झाला होता. त्या परिचयाचा टिळकांना असा आणीबाणीच्या प्रसंगी उपयोग झाला. टिळकांनी विदेशी विद्वानांशी संबंध जोडण्याच्या दृष्टीनेच 'वेदकालनिर्णय' आणि 'वैदिक आर्यांचें मूलस्थान' हे ग्रंथ इंग्रजीत लिहिले होते. नारायणराव बामणगांवकरांशी चर्चा करताना त्यांनी बोलून दाखविलें होतें: "देशाच्या सद्यःस्थितीत राजकारणाचा काळ (व्यवसाय) हा भरतीचा आणि ओहोटीचा असणार. याकरिता राजकारणाला वाहून घेणाऱ्या लोकांनी राजकारणाव्यतिरिक्त आपली मति चालेल अशा एखाद्या विषयाचा व्यासंग अवश्य करावा. म्हणजे ओहोटीचा काळ निराशेत जात नाही आणि आपल्याला अवगत असलेल्या विषयातील तज्ज्ञांशी आपलें सहकार्य होतें आणि अशा रीतीने कार्याची व्याप्ति वाढते." असा सारा विचार करूनच टिळकांनी आपला सवडीचा वेळ वेदाध्ययनाला वाहिला होता आणि त्या विषयातील विदेशी तज्ज्ञांशी संबंध जोडण्याच्या दृष्टीनेही त्यांनी आपले वैदिक संशोधनविषयक ग्रंथ इंग्रजीत लिहिले. या दूरदर्शीपणाचा त्यांना कसा उपयोग झाला, हें आपण आताच पाहिलें आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण अकरावें

टिळकांचें कोल्हापूरच्या क्रांतिकारकांशी सहकार्य

टिळकांनी शिवाजी उत्सवाचा उपक्रम केल्यानंतर शिवाजीच्या चरित्राचें अनुकरण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात ज्या अनेक संस्था अस्तित्वात आल्या होत्या, त्यांपैकी कोल्हापूरची शिवाजी समिति ही एक प्रमुख संस्था होती. या संस्थेच्या नेत्यांनी १८९६ पासूनच आपल्या कार्याला प्रारंभ केला होता आणि रँडवधानंतर पुण्यातील चाफेकरांच्या समितीची वाताहत झाल्यामुळे १८९८ मध्ये शिवाजी समिति हेंच क्रांतिकारकांचें आशास्थान बनलें होतें. या वर्षाच्या सप्टेंबरमध्ये टिळकांची सुटका झाल्यानंतर त्यांनी बीड येथील बंड आणि कर्झन-वधाचा प्रयत्न हीं जीं दोन महत्त्वाचीं कारस्थानें केलीं, त्यांत या समितीच्या नेत्यांचा प्रमुख भाग होता. या गूढ कारस्थानांचे संदर्भ अनेक ठिकाणी विखुरलेले आहेत. ते सारे एकत्रित केल्यानंतर टिळकांच्या तत्कालीन उलाढालींचा अंशतः बोध होऊ शकतो. १८९८ मध्ये कोल्हापूरच्या शिवाजी समितीचे सरासरी तीनशे सभासद होते. त्यांच्या नेत्यांनी त्या वर्षी बीड आणि औरंगाबाद येथे जाऊन तेथे बंडाची सिद्धता करीत असलेल्या क्रांतिकारकांना एक सहस्र रुपयांचें अमूल्य द्रव्यसाहाय्य पोचविलें. या द्रव्याचा उपयोग करून तेथील क्रांतिकारकांनी आणि शिवाजीसमितीच्या नेत्यांनी मिळून त्या जिल्ह्यात १८९९ मध्ये बंड उभारून तेथील इंग्रजी सैन्याशी तीन दिवस चांगलीच झुंज केली. या अविदित इतिहासाचा पहिला संदर्भ मला लठ्ठेकृत शाहू छत्रपतिचरित्रात आढळून आला :

In 1898 one or two of its members visited a sister institution at Beed and Aurangabad, where the Kolhapur branch assisted the common fund by a substantial sum of one thousand rupees and a small rising in arms was followed by the suppression of the movement there and the flight of the orgniser to Goa under a false name.

या बंडाचे जे सूत्रधार गोव्याला पळून गेल्याचा लठ्ठयांनी उल्लेख केला आहे, ते म्हणजे सेनापति बापटांना १९१२ मध्ये पकडून देणारे

जे. आबासाहेब रामचंद्र. त्यांच्या चरित्राचा धागा हाती घेण्यापूर्वी या बंडाळीच्या इतर सूत्रधारांचा परिचय करून घेतला पाहिजे.

बीड येथील बंडाचे भागीदार

पु. पां. गोखले यांच्या 'जागृत सातारा' (पान ७१) या ग्रंथावरून 'समजतें की, कोल्हापूरच्या शिवाजी समितीचे नेते हणमंतराव मुर्कीभावीकर यांना, चाफेकर समितीतील भिडेगुरुजी आणि त्यांचे सहकारी नित्सुरे यांनीच क्रांतिकार्याची दीक्षा दिली होती. हे हणमंतराव स्वतःच दामूअण्णा जोशी आणि लक्ष्मण पतकी यांच्यासह बीडला गेले होते. काळ' मधील 'चिनी ब्राह्मणाचीं पत्रें' या लेखमालेतून सशस्त्र गुप्त समित्या स्थापण्याचें मार्गदर्शन तेव्हा शिवरामपंत परांजपे करीत होते. शिवाजी समितीच्या सभासदांवर हणमंतराव मुर्कीभावीकर यांचा जो प्रभाव पडला होता, तो अविस्मरणीय होता. अशा प्रभावी व्यक्तीवरही आपली छाप ठेवणाऱ्या भिड्यांनी या बीडच्या बंडात प्रमुख भाग घेतला होता. सातारकरांनी प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या आत्मवृत्तात भिडे म्हणतात, 'मलकापुरास असताना बीडला रावसाहेब पेशवे काम करीत आहेत, तिकडे जावें, असें ठरलें. तेव्हा तेथून निघून तिसरे दिवशी संध्याकाळी जालन्यास पायी गेलो. तेथे रावसाहेबांचे हस्तकाची गाठ पडली. त्याला खूण पटल्यानंतर रावसहेब भेटले. त्यांचेसहच मी असे. बीडला लूट केली. रु. ८०००० रावसाहेबांचे हस्तकाचे स्वाधीन. तीन दिवस लढाई झाली. मुख्य पुढारी धोंडजी आणि शहाजी. धोंडजी दोनशे माणसांसह पकडला गेला. रावसाहेब आणि शहाजी उत्तर हिंदुस्थानात गुप्त झाले. मी औरंगाबादेस जाऊन सिद्धता करीत होतो. दसरा (?) जवळच होता. एक सहस्र माणूस घेऊन औरंगाबादेची छावणी झोडावयाचा विचार होता. रावसाहेबांच्या आदेशाची वाट पहात होतो. नानासाहेब भिडे सीनगांवकर, कर्तबगार माणूस, एक सहस्र माणूस सज्ज, त्यातच ते आणि मी रात्रंदिवस फिरत होतो. दसरा (?) झाला. आज्ञा नाही. निराश झालो. रावसाहेबांचा पत्ता नाही...रावसाहेबांचा राग आला. रुपये गेले. माणसें गेलीं.' या अवतरणावरून बीड येथील बंडाची योजना किती व्यापक प्रमाणावर आखली होती, याची कल्पना येईल. १८९८ च्या सप्टेंबरमध्ये टिळक सुटून घरी आले. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये रावसाहेब पेशवे बीडला गेले, असें हैद्राबादेच्या रक्षकविभागाच्या प्रतिवृत्तावरून समजतें. रावसाहेब बीडला गेल्यानंतर लगेच त्यांना साहाय्य करण्याकरिता टिळकांनी भिडे गुरुजींना त्यांच्याकडे पाठविलें आणि

कोल्हापूरच्या क्रांतिकारकांकडून त्यांना सहस्र रुपयांची किंचित् व्यावहारिक दक्षिणा पोचविली. भिडेगुरुजी हेच मुर्कीभावीकरांचे दीक्षागुरु असल्याने ही दक्षिणा त्यांनीच स्वीकारली आणि बीडच्या उठावणीत तिचा उपयोग केला, हें सांगावयाला नकोच.

रक्षकविभागाचें प्रतिवृत्त

रावसाहेबांच्या बीड प्रांतांतील हालचाली नोव्हेंबर पासून चालू झाल्या, यावरून भिडे गुरुजींनी दसऱ्याच्या सुमारास बीड येथील घटना घडून आल्याचा जो उल्लेख केला आहे, तो विस्मरणामुळे केला असला पाहिजे. सेतुमाधवरावांच्या 'हैद्राबादेतील स्वातंत्र्यसंग्रामा'च्या इतिहासात उद्धृत केलेल्या रक्षकविभागाच्या प्रतिवृत्तावरून असें समजतें की "बीड प्रदेशांत सरासरी लाख रुपयांपर्यंत लुटालूट झाली, पण रावसाहेबांच्या अनुयायांशी सरकारी घोडदळाची मुख्य लढाई १४–४–१८९९ या दिवशी म्हणजे पाडव्यानंतर झाली, या लढाईत बरीच माणसें मारलीं गेलीं, तेव्हा उरलेलीं उधळून गेलीं." रावसाहेबांच्या योजनेतील कच्चा दुवा हा होता की स्वतःचे कडवे सैनिक उभारण्यापेक्षा इंग्रजांच्या सेवेत असलेल्या देशी सैनिकांना पैसे चारून विकत घेण्यावर त्यांचा फार भर होता. रावसाहेब नित्य घोडदळाकडे जात. एकंदरीत बोलण्यावरून असें दिसतें की, घोडदळाच्या लोकांना पैसे चारावेत आणि त्यांनी रावसाहेबांच्या अनुयायांवर शस्त्रें उचलू नये, अशी योजना असावी. अशाच एका बैठकीत हिरासिंग जमादाराला दीड सहस्र रुपये आणि दोन मुठी सोन्याच्या मोहरा (सरासरी १५० मोहरा) दिल्या. एवढ्याने त्याचें समाधान न झाल्याने तो आणखी पांच सहस्र रुपये मागत होताच. रावसाहेबांच्या ध्वजावर हिंस्रपशूच्या शिरावर पक्षी चित्रित केलेला होता. हा ध्वज हिंस्र इंग्रजी नरपशूच्या शिरावर द्विज-ब्राह्मणांना दाखवून पुनश्च ब्राह्मणी राज्य येणार असल्याची घोषणा करीत होता. रावसाहेब नेहमी इंग्रजांच्या विरुद्ध बोलत. ब्राह्मणांना पदरी ठेवीत. आलेलीं पत्रें बाळगीत नसत. तीं वाचून नाहीशी करीत. देशी पलटणींच्या अधिकाऱ्यांना भेटत. खेड्यांतील लोकांशी बोलताना नेहमी 'बरं, बरं' असें म्हणत. राहणी साधी, स्त्रियांचें अथवा इतर काही व्यसन नव्हतें. बुद्धिबळातील सुरक्षित राजाप्रमाणे नेहमी घोडा जवळ बाळगीत. त्यांच्या ध्वजावरून ते ब्राह्मणी राज्याचे प्रतिनिधि, अर्थात् पेशवेकुलीन असल्याची कल्पना येते. टिळकांचें घराणें पेशव्यांचे पदरी असल्याने त्यांच्या मनात त्या कुळाविषयी निष्ठा होतीच. त्या

निष्ठेमुळे रावसाहेबांच्या बीड येथील बंडाला त्यांनी आपल्याकडून शक्य तितकें साहाय्य केलें. पण बंडाळी म्हणजे दरवडेखोरी नव्हे, असा त्यांचा सिद्धान्त असल्याने केवळ दरवडे घालण्याच्या कार्यक्रमाला मात्र टिळकांनी, म्हणजेच त्यांच्या विश्वासातील भिडे गुरुजींच्या सारख्या क्रांतिकारकांनी साहाय्य करण्याचें नाकारलें.

सर मोरोपंतांच्या घरी रावसाहेबांचीं कारस्थानें

औरंगाबादेहून गुप्त झाल्यानंतर १९०१ मध्ये उमरावतीचे सुप्रसिद्ध विधिविशारद मोरोपंत जोशी यांच्या घरी रावसाहेबांचें आगमन झालें. ती कथा बाबासाहेब खापडर्यांनी दादासाहेबांच्या चरित्रात पुढीलप्रमाणे दिली आहे. 'रावसाहेब नांवाचे गृहस्थ उमरावतीला आले होते. ते मोरोपंत जोशी यांच्याकडे राहात असत. मार्चच्या दैनंदिनीत त्यांचा निर्देश आढळतो. इतरत्रही उल्लेख आहेत. रावसाहेब आणि मोरोपंत आमच्याकडे वारंवार येत आणि दादासाहेबांशी यांचें काही तरी गुपित कारस्थान चालें. बरेच दिवसांनी अशी गुणगूण बाहेर आली की हे रावसाहेब स्वत: नानासाहेब पेशव्यांचें पुत्र अथवा वंशज असल्याचें सांगत असत. तत्कालीन काही गुप्त गोष्टी त्यांना माहीत होत्या. हे रावसाहेब आणि मी अनेकदा घोड्यांवर बसून हिंडायला गेलो होतो. त्यांचा माझा जवळून परिचय झाला. पुरुष देखणा, उंच, सुदृढ बांध्याचा आणि मिठास स्वभावाचा होता. बोलता बोलता पाण्याचा थांग लागतो काय हें पाहण्याचा मी यत्न केला. पण त्यांनी मला दाद दिली नाही. उमरावतीस यानंतर अनेकदा ते आले आणि गेले. आपल्या अंगावर हें प्रकरण शेकू नये, म्हणून मोरोपंतांनी त्यांना सावध केलें, असें ऐकतो.' बाबासाहेबांच्या या साक्षीवरून सर मोरोपंत आणि दादासाहेब हे त्यांना पेशवे घराण्याला उचित अशा सन्मानाने वागवीत असत, असें दिसून येतें. अजून रावसाहेबांनी दिलेला ध्वज आणि दगडी आसन जोशी कुटुंबात असावें.

कारस्थानाची इतिश्री

या कारस्थानाची इतिश्री कशी झाली, हें भिडे गुरुजींनी आपल्या आत्मवृत्तात लिहून ठेविलें आहे. 'एके दिवशी अण्णासाहेबांसह रावसाहेब मुलांचें संचलन पाहण्यास आले. आमच्या ओळखी पटल्या. परंतु बंगल्यावर भेटून बोलू असें ठरलें. त्या दिवशी जेवणासच बंगल्यावर गेलो. औरंगाबादेहून गुप्त झाल्यापासूनची सर्व कथा एकमेकांस समजली.

पुढे काय हा प्रश्न निघाला. त्यांचें म्हणणें, वऱ्हाडात पुन्हा दरवडे चालू करावेत आणि पैसे रावसाहेबांस द्यावेत. तें मला पटेना. शिवाजीराव होळकर यांचा या कार्याशी संबंध जोडू लागले. पण मला तें पटेना. एक मास बोलणें चालू होतें. शेवटी मी अण्णासाहेबांसमक्ष सांगितलें, 'लढाई चालू करा, माझ्या दोन सहस्र लोकांनिशी मी सिद्ध आहे. इतर गोष्टींत मी पडणार नाही. मी सर्व अनुभव घेतला आहे. आपण भित्रे आहात. वेळ आली की पाय काढता. विनाकारण जगून काय करावयाचें,' माझें म्हणणें शहाजी पाटलास...त्या वेळी त्याचे शीख रिसालदार होते ...राग आला. ठोकर खाऊन पूर्ण अनुभव घेतला. पण सहस्र रुपये घेतल्याने लोकमान्यांना तोंड...मी त्यांचाच असल्यामुळे नेमका...बंद झालें. वऱ्हाडचे लोकांस या गोष्टी मुळीच माहीत—' ही सारी कथा भिडेगुरुजींच्या आत्मचरित्रात जशी छापली आहे, तशीच उतरून घेतली आहे. लठ्ठयांच्या पुस्तकातील अवतरणाच्या साहाय्याने या त्रुटित वाक्यांचा अर्थ लागतो. शिवाजी समितीच्या सभासदांनी बीडला सहस्र रुपये आणून दिले, ते लोकमान्यांच्या सांगण्यावरून. हें द्रव्य भिडे गुरुजींच्या स्वाधीन केलें असलें पाहिजे. बीडच्या लुटीतील द्रव्य घेऊन रावसाहेब उत्तर हिंदुस्थानात गुप्त झाल्यामुळे पुढचे कार्यक्रम थंड झाले आणि भिडे गुरुजी तोंडघशी पडले. त्यांना लोकमान्यांना तोंड दाखविता येईना. हे रावसाहेब पेशवे टिळकांच्या ओळखीचे नसल्यास दादासाहेब खापर्डयांच्या तर पूर्ण परिचयाचे होते. १८९८ मध्ये ६ सप्टेंबरला टिळकांची बंदिशाळेतून सुटका झाली. त्यानंतर लगेच त्यांनी शिवाजीसमितीच्या सभासदांकडून बीड येथे धाडलेल्या भिडे गुरुजींना पैसे पोचवून तेथील बंडाळी घडवून आणली. ही गोष्ट अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टींसारखीच वाटते. त्याहीपेक्षा अद्भुत गोष्ट ही आहे कीं, त्या वेळी शाहूछत्रपतींनी अद्यापि ब्राह्मणांविरुद्ध युद्ध पुकारलें नसल्याने ते स्वतः आणि त्यांच्या परिवारातील मंडळी या दिवसांत शिवाजी समितीला साहाय्य करीत असल्याच्या वार्ता विश्वसनीय व्यक्तींकडून इंग्रज सरकारला कळल्या होत्या. आपल्या ग्रंथाच्या पहिल्या खंडात ३२७ पानावर लठ्ठे लिहितात :

The Government seems to have been informed by someone whose words had to be taken seriously that the Shivaji Club thefts were organised by His Highness, his brother Bapusaheb and some other chiefs in Kolhapur.

पुढे आपणच समितीचे हितकर्ते आणि आश्रयदाते असल्याची

भूमिका घेऊन महाराज दामूअण्णांच्याकडून गुप्त माहिती काढून घेत, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

शाहूमहाराजांचें पक्षांतर

गोविंदराव याळगींच्या चरित्रात पुंडलीक कातगडे यांनीही स्पष्ट शब्दांत लिहिलें आहे : "कोल्हापूरची शिवाजी समिति ही शाहूमहाराजांच्या प्रेरणेनेच कार्य करीत होती, असें म्हटल्यास तें सत्याला सोडून होणार नाही. परंतु कोल्हापुरातील जिरगेप्रकरणामुळे शाहू महाराज अशा पेचात सापडले होते की, त्यांनी आपलें राज्य तरी गमवावें, किंवा इंग्रज सरकारला त्यांच्या सांगण्याप्रमाणे अथवा आपणच त्यांची इच्छा ओळखून त्याप्रमाणे सर्व प्रकारची राष्ट्रीय चळवळ हाणून पाडण्याला साहाय्य करावें, यावाचून गत्यंतर उरलें नव्हतें. परिस्थितीने जिरगेप्रकरणामुळे असें वळण घेण्यापूर्वी सर्व देशभक्तांना शाहूमहाराज आपले आणि आपल्या चळवळीचे साहाय्यक आहेत, असेंच विश्वासपूर्वक वाटत होतें. अनेक प्रसंगी त्यांना तसा अनुभवही येत होता." या जिरगेप्रकरणासंबंधी एवढी गोष्ट सांगितली म्हणजे पुरे की, त्या कुळातील एक सुंदर मुलगी महाराजांच्या कामवासनेला बळी पडली होती आणि या अत्याचाराच्या निमित्ताने इंग्रज सरकारने त्यांना पदच्युत करण्याची धमकी दिली होती. त्यामुळे महाराजांना क्रियाशील राजनिष्ठ बनून राष्ट्रीय पक्षाचा नायनाट करण्याचें कंकण बांधावें लागलें होतें. तेव्हा लठ्ठ्यांनी आपल्या ग्रंथात लिहिल्याप्रमाणे महाराज आणि त्यांचे सामंत शिवाजी समितीला साहाय्य करीत असल्याच्या वार्ता विश्वसनीय लोकांकडून इंग्रजांना समजल्या असल्या तर त्यात काही नवल नाही.

टिळक आणि रावसाहेब यांची काशीतील भेट

उमरावतीतील वाटाघाटी फसल्यानंतर या रावसाहेबांनी १९०२ मध्ये कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचें अधिवेशन आटोपल्यानंतर परत येताना टिळक काशीत उतरले असता त्यांची भेट घेतली. या भेटीची माहिती देवगिरीकरांनी त्यांच्या ग्रंथात पुढीलप्रमाणे दिली आहे : "काका म्हणतात, काशी येथे आम्हांला भाऊसाहेब (हें रावसाहेबांचें काशीतील नांव) भेटले. या भाऊसाहेबांनी आणि कोल्हापूरच्या मंडळींनी औरंगाबादेस बंड केलें. बंड संपवून ही मंडळी काशीला पळून आली होती. भाऊसाहेब रेशीमकाठी धोतर नेसून मोठ्या आरामात आणि ऐटीत राहात असत. ते वाटेल तें करणारे होते. त्यांनी काकांना आणि टिळकांना एका

उद्यानात थाटाचें जेवण दिलें. या मंडळींनी बंडाच्या निमित्ताने लोकांकडून पसे मिळविले. पाटील आणि हे भाऊसाहेब एकमेकांना शिव्या देत. या पाटलांनी एक लाख रुपये बंडाकरिता मिळविले होते आणि तें द्रव्य ते भाऊसाहेबांना देत नव्हते. म्हणून दोघांचें वैर होतें." या उताऱ्यावरून बीडच्या बंडाचे नेते जे रावसाहेब पेशवे, त्यांची आणि टिळकांची १९०२ च्या जानेवारीत काशी येथे गाठभेट होऊन त्यांचे काही संकल्प ठरले असावेत, असें दिसतें. १९०८ मध्ये टिळकांना सहा वर्षे काळेपाण्याची शिक्षा झाल्यानंतर मुंबई सरकारने भारतसचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटलें आहे:

Sometimes, he (Tilak) advocated insurrection as at the Shivaji celebrations of 1902 where he pointed out that the Boer system of warfare which had been successful against the British, was that which had been used by Shivaji against the Mahommedans. From this he drew the lesson that it was not impracticable or impossible for any other people to do the same by acting together with due caution.

'वर्तमान रणनीती'ची स्फूर्ति

या अवतरणावरून असें कळतें की, १९०२ च्या शिवाजी उत्सवात टिळकांनी इंग्रजांविरुद्ध बंड करण्याचाच पुरस्कार केला. बोअर लोकांना ज्या वृकयुद्धाच्या पद्धतीने युद्ध दीर्घकाल लढविण्यात यश आलें, त्याच पद्धतीचा उपयोग शिवाजीने मुसलमानी राज्यांविरुद्ध लढताना पूर्वीच केला होता आणि ती पद्धत आपल्या हाडामासी खिळली असून योग्य पथ्यें पाळून तिचा उपयोग केल्यास वर्तमानकाळीही आपल्याला यश मिळविता येईल. या भाषणाचा परिणाम चिरस्थायी व्हावा म्हणून त्या वर्षी १७ जूनच्या अंकापासून 'केसरी'च्या अग्रलेखातून टिळकांनी वृकयुद्धासंबंधी एक लेखमालाच आरंभिली. ही लेखमाला २६ ऑगस्टच्या अंकांत समाप्त झाली. ही लेखमाला रावसाहेब पेशव्यांच्या बंडाच्या कार्यक्रमाला तर पोषक होतीच, त्याचप्रमाणे त्या वर्षी अरविंदांनी आपली जी क्रांतिकारक संघटना उभी केली होती, तिलाही ही लेखमाला स्फूर्ति-दायक ठरली. कारण १९०६ मध्ये 'युगांतर' पत्र चालू केल्यानंतर लगेच त्या पत्रातून अरविंदांच्या अनुयायांनी वर्तमान रणनीतीचा परि-चय करून देऊन वृकयुद्धाची चर्चा आरंभिली. अविनाशचंद्र भट्टाचार्यांचा 'वर्तमान रणनीति' हा ग्रंथ पुढे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्याने त्याला सरकारजमा होण्याचा मान लाभला आणि खाडिलकरांनी 'केसरी'तून

लिहिलेल्या या लेखमालेला तो मान लाभला नाही. या लेखमालेतील शेवटचा लेख टिळकांच्या विधिविशारद मित्रांच्या विरोधामुळे अप्रकाशित राहिला नसता, तर तेव्हाच टिळकांना अंदमानाला पोचविण्याचें श्रेय खाडिलकरांना लाभलें असतें. पण त्या दिवसांत बाबामहाराजांच्या विश्वस्तपदाचें प्रकरण निकरावर आलें असताना त्यात राजद्रोहाच्या अभियोगाची भर पडावयाला नको, म्हणून तो लेख तेव्हा प्रसिद्ध केला नाही.

वृकयुद्धाची तात्त्विक चर्चा

खाडिलकरांच्या लेखसंग्रहाचीं पाऊणशे पानें व्यापणाऱ्या या लेखमालेतील पांचव्या लेखांत (५-७-१९०२) वृकयुद्धाची तात्त्विक चर्चा केली आहे. ही चर्चा आज माओच्या अनुयायांनी वाचली तरी त्यांना खाडिलकरांचें विवेचन किती अद्ययावत् आणि मूलग्राही आहे, याची कल्पना येईल. "शत्रूच्या सैन्याने आपल्या साम्राज्याच्या सर्व सामर्थ्यासह एखादा देश पादाक्रांत केला म्हणजे वृकयुद्धाला प्रारंभ होतो. अर्थात् या युद्धाची रणभूमि, शत्रूने पादाक्रांत केलेला सर्व प्रदेश आणि सभोवतालचे प्रांत, ही होय. रणनीतीचा एक महत्त्वाचा नियम हा की रणभूमि परक्यांच्या प्रदेशात नेऊन टाकावी. या नियमाचा लाभ वृकयुद्धात दुर्बल पक्षास पूर्णपणे मिळतो. कारण शत्रूने सारा देश पादाक्रांत केला असल्याने त्याच्या शृंखलांवाचून त्याचें काहीच नष्ट व्हावयाचें नसतें. शत्रूने देश पादाक्रांत केला असल्याने सैनिकीं केंद्रें संभाळणें, शासनसंस्थेचीं केंद्रें संभाळणें, या द्विविध केंद्रांतील मार्ग सुरक्षित ठेवणें, नवीन जिंकलेला प्रदेश आणि शत्रूचा मूळ देश यांच्यामधील वाहतुकीचे मार्ग निर्भय ठेवणें हीं सारीं महत्त्वाचीं कामें शत्रूसच करावीं लागतात. यामुळे दुर्बल पक्षास रणभूमि आणि रणभूमीचा पाया यासंबंधीचीं कर्तव्यें फारच कमी करावयाचीं असतात. चार लोकांचें साहाय्य मिळून जेथे एखादी टोळी निर्माण होते तो प्रांत त्या टोळीच्या रणभूमीचा पाया आणि पराभव न पावता, तसेंच सर्वस्वी नष्ट न होता जेवढ्या प्रांतात त्या टोळीचा संचार होऊ शकेल, ती तिची रणभूमि. ही टोळी एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात गेली की तिचा रणभूमीचा पाया बदलतो. कारण प्रत्येक ठिकाणी अन्नसामग्री आणि शक्य तितका शस्त्रास्त्रांचा पुरवठा तिला जनतेकडून होत असतो. लांबलांबच्या आणि दूरदूरच्या वार्ता आणणारे हेर या टोळीला लागत नाहीत. कारण हें काम अन्नसामग्री पुरविणाऱ्या जानपदानेच करावयाचें असतें. शत्रूचें सैन्य कितीही अवाढव्य असलें तरी सारा प्रदेश

त्याला व्यापून टाकता येत नाही. तेव्हा टोळीचा जन्म शत्रूच्या छावण्यापासून काही अंतरावर होतो. या छावण्यांतून चोरट्या मार्गाने मिळविलेलीं शस्त्रें किंवा छापे घालून मिळविलेली युद्धसामग्री लपवून ठेवण्यासाठी रानात आणि डोंगरात पुरावी लागते, अशी सामग्री पुरलेल्या रानातून अथवा डोंगरांतून त्या टोळीला हुसकून लावलें तरी ती सामग्री वाया जात नाही. कारण ही टोळी जशी अन्यत्र संचाराला जाते, तशीच कालांतराने दुसरी एखादी दूरची टोळी या खोखोच्या डावात त्याच रानात अथवा डोंगरात येते, तेव्हा तिला हा पुरलेला साठा उपयोगी पडतो. या सर्व गोष्टी घडून येण्याला स्थानिक लोकांचें साहाय्य आवश्यक असतें. वृकयुद्ध म्हणजे एका सैन्याचें दुसऱ्या सैन्याशी युद्ध नसून विजयी सैन्याचें पराभूत झालेल्या देशांतील जनसमुदायाशी हें युद्ध असतें. या स्वातंत्र्यप्रिय जनसमुदायात काही देशद्रोही असतात. जेत्यांच्या कच्छपी लागून त्यांचेंच कल्याण चिंतणारे काही लोक सर्व राष्ट्रांत असावयाचेच. तथापि सामान्यतः लोकांचा कल लढणाऱ्या स्वदेशबांधवांच्याकडे असला पाहिजे, इतकेंच नव्हे तर शत्रूकडून लगेच सूड उगवला जाण्याची भीति नसली म्हणजे कायावाचामनेकरून आणि खिशातील पैसे काढून, लढणाऱ्या देशबांधवांस, साहाय्य करण्यास लोक सिद्ध असावे लागतात. वार्ता पोचविणें, सामग्री पुरविणें आणि लढणाऱ्या सैन्यात नवीन देशवीरांची भर घालणें या सर्व गोष्टी सरकारच्या ऐवजी जनसमुदायाने व्यक्तिशः कराव्या लागतात. इतकी बुद्धिमत्ता, संकटें सोसणारी सहनशीलता, त्यागी वृत्ति आणि देशभक्ति समाजात मुरल्यावाचून हीं वृकयुद्धाचीं कार्यें घडून येत नाहीत. राष्ट्रात सर्वत्र असल्या लहान टोळ्या निर्माण झाल्यामुळे, अथवा पूर्वीचें सैन्य चोहोकडे विखरून त्याच्या टोळ्या बनल्यामुळे म्हणा, राष्ट्रभर सर्वत्र लहान, लहान रणभूमि आणि त्यांचीं साधनसामग्रीचीं केंद्रें निर्माण होतात. असल्या रणभूमीतून संचारणाऱ्या टोळ्या अस्थिर असल्यामुळे नित्य रणभूमि बदलत जाते आणि शत्रूला अनपेक्षित परिस्थितीला तोंड द्यावें लागल्याने त्याला ठिकठिकाणी पराजयही सोसावे लागतात. अशा प्रसंगी आगगाड्या रोखून शत्रूची साधनसामग्री लुटावयास मिळते. वृकयुद्धाच्या नेत्यांना शत्रूच्या अन्नपाण्यावर आणि शस्त्रसामग्रीवर हात मारून जगता येऊ लागलें म्हणजे त्या वृकयुद्धाचा मुख्य भार स्वजनांवर न पडता परशत्रूवर पडू लागतो." अशा दिवसांतसुद्धा स्वजनांचा उत्साह, धैर्य वाढविण्यापुरत्याच चकमकी करणें शहाणपणाचें असतें. स्वातंत्र्यवाद्यांना सुसज्ज सैन्याचें साहाय्य मिळेपर्यंत शत्रूंना सतावणें हें वृकयुद्धाच्या नेत्यांचें प्रमुख कर्तव्य

असतें. हें साहाय्य भारतात भारतीय सैन्याकडून मिळणें शक्य होतें. एकंदरीने आसरा घेण्याला आणि शत्रूंना झुकांड्या देण्याला अनुकूल प्रदेश, शत्रूशी लपंडाव खेळून स्वजनांना, साहाय्य करण्याइतका बुद्धिमान् आणि उत्साही जनसमुदाय, देशाभिमानी, शूर आणि चपल स्वातंत्र्य-सैनिक, सरतेशेवटी क्षणोक्षणी लढाईचें धोरण बदलणारे, नवीन आघाड्या निर्माण करणारे, प्रसंगोचित डावपेचांनी शत्रूला हातटेकीला आणणारे सेनापति या सर्वांचा स्वरसंगम झाला, म्हणजे वृकयुद्धाला अत्यंत प्रभावी स्वरूप प्राप्त होतें.

वृकयुद्धाच्या चर्चेचें महत्त्व

१९०२ मध्ये टिळकांनी वृकयुद्धावरील जी लेखमाला प्रसिद्ध केली, तिच्यावरून ते देशात क्रांति घडवून आणण्याला किती उतावळे झाले होते, याची कल्पना येते. राज्यक्रांतीच्या बाबतीत अतिशहाण्यांच्या निष्क्रियतेपेक्षा कर्मयोग्यांचा उतावीळपणाच अधिक उपकारक असतो. याचें कारण असें आहे की, क्रांतीचे पुढारी म्हणविणाऱ्यांपैकी काहीजण जरी 'याच देही, याच डोळा' क्रांतीच्या विजयोत्सवाचें दर्शन घेण्याला आतुर झाले असले तरी बहुतेक सारे पुढारी मनातून असेंच म्हणत असतात की क्रांति व्हावयाचीच असली तर ती पुढच्या पिढीत होऊ दे, आपल्या पिढीत नको. स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे क्रांतीचें संकट टाळण्याकरिताच ते क्रांतीचे पुढारी झालेले असतात. असल्या पुढाऱ्यांपैकी टिळक नव्हते, हें सांगावयाला नकोच. लोकांवर अत्याचार चालू असेपर्यंत समाजात काही ना काही प्रतिक्रिया व्हावयाच्याच. या प्रतिक्रिया केवळ पुढाऱ्यांच्या इच्छेने होत नाहीत. पण असल्या प्रति-क्रियेत भाग घेणाऱ्यांना आपल्या अनुभवाचा लाभ देणें आणि त्यांच्या कर्तृत्वाला राष्ट्रहितकारक वळण लावणें, एवढीच गोष्ट पुढाऱ्यांच्या स्वाधीन असते. आपल्या उपदेशाविरुद्ध वर्तन करूनही तरुण अनुयायांनी काही अत्याचारांचा सूड घेण्याची कृति केली तरी त्यांचा त्याग न करणें हें पुढाऱ्यांचें कर्तव्यच असतें. म्हणजे अनेकदा नेत्यांना आपल्या उता-वळ्या अनुयायांचे अनुयायी बनावें लागतें. टिळकांनी 'केसरी'त स्पष्टच लिहिलें होतें, 'लोक आणि पुढारी यांतील संबंध धनी आणि चाकर यांच्यामधील संबंधापेक्षा फार निराळा आहे. पुढारी हे लोकांचे धनी नव्हत, तर चाकर होत. जोपर्यंत पुढाऱ्यांचें मत लोकमताहून फारसें भिन्न नसतें, तोपर्यंतच ते लोकांच्या आदरास पात्र होतात.' 'देशाचें दुर्दैव' या आक्षिप्त लेखातही टिळकांनी लिहिलें होतें, 'इंग्रजी अधिकारीवर्गाच्या

अरेरावी वर्तनावर, किंवा शिरजोरपणावर कडक टीका करणाऱ्या हिंदी पुढाऱ्यांच्या लेखांमुळे, अथवा भाषणांमुळे सध्याची भयंकर परिस्थिति उद्भवली आहे, असा त्यांनी (इंग्रजांनी) त्या पुढाऱ्यांवर आरोप ठेविला आहे आणि नंतर अशी सूचना केली आहे की, या पुढाऱ्यांच्या भाषणांस, लेखांस किंवा चळवळीस अधिक आळा घातला पाहिजे. आमच्या मतें ही सूचना अत्यंत वेडेपणाची आहे. "अतिशय पाऊस पडून नदीस आलेल्या पुराने जर धरण फुटलें तर त्याचा दोष पुराकडे न देता पावसाकडे दिला पाहिजे." म्हणजे अनुयायांवर होत असलेल्या अत्याचारांमुळे उत्पन्न होणारा मनःक्षोभ हा क्रांतिकारक कृतीचें आदिकारण असून पुढारी हा केवळ निमित्तकारण असतो. अनुयायांचे अनुयायी बनण्याची ही टिळकांची भूमिका अनुयायांवर अनिर्बंध सत्ता गाजविणाऱ्या पुढाऱ्यांच्या भूमिके- हून सपशेल भिन्न होती. त्यामुळेच त्यांच्या लोकमान्य पदवीचा विग्रह लोक ज्यांना मान्य होते, ते लोकमान्य असा करावा लागतो.

बीडच्या उठावणीची अधिक माहिती

बीड येथील उठावणीत रावसाहेब पेशवे आणि भिडेगुरुजी यांच्यासहच धारदेवासच्या पवार राजघराण्यापैकी जयसिंगराव यांनीही भाग घेतला होता आणि नंतरच्या पळांत यांनी जे. आबासाहेब रामचंद्र या नांवाने गोवे प्रांतात मडगाव येथे आश्रय घेतला. गंगाधरराव देशपांड्यांच्या आत्मचरित्रात यांच्याविषयी एक स्वतंत्र प्रकरणच आलें आहे. 'मोगलाईत असलेल्या बीड गावामध्ये एक वंजारी जातीचा पाटील असून त्याच्या साथीदारांच्या साहाय्याने आपण एक बंड उभा- रलें होतें, पण त्यांत यश आलें नाही, आपण मोठ्या युक्तीने त्यातून बचावलो, इत्यादि मोठ्या गोष्टी रसभरीत वर्णनें करून तो (जयसिंग- राव) सांगत असे.' (पान १५२) या वंजारी क्रांतिवीरांकडे कोणीतरी वसंतराव नाईकांचें लक्ष वेधलें पाहिजे. म्हणजे या प्रकरणाचा सविस्तर इतिहासही उपलब्ध होईल. त्यांचें स्मारकही होईल. असो. लठ्ठचांच्या ग्रंथात बीडच्या बंडाचा सूत्रधार गोव्याला पळून गेल्याचा जो उल्लेख आला आहे, तो यांच्यासंबंधीच. गंगाधरराव पुढे लिहितात, 'टिळकांची ओळख आहे आणि त्यांच्या प्रभावळीतील काही मंडळींचा तर चांगलाच स्नेह असल्याचें त्यांनी सांगितलें. पण टिळक आणि त्यांची मंडळी यांची त्याने आमच्यापुढे यथेष्ट निंदा करून हे सर्व लोक देशभक्तीचा विना- कारण डौल मिरविणारे आहेत आणि आयत्या वेळी दगा देणारे आहेत, असा त्या मंडळींवर त्याने आरोप केला. रावसाहेब नावाचा आपला

एक स्नेही होता. त्याने इंग्रजाविरुद्ध पुष्कळ सिद्धता केली होती. पण त्याची भिस्त पुण्याच्या टिळकप्रभृति मंडळींवर होती. शेवटी सर्व डाव अंगावर येऊन तो बिचारा प्राणाला मात्र मुकला.' रावसाहेबांच्या मृत्यूची कथा भिडेगुरुजींनी सांगितली आहे, 'रावसाहेब वारंवार पंजाबात जात. पंजाबांतील सैनिक त्यांना थापा देत. करता करता शेवटी कंटाळले. कालीखड्गाची प्राप्ति व्हावी म्हणून सरदारपूरला बसले. चाळीस दिवस उपोषण केलें. एकेचाळिसाव्या दिवशी गुप्त हेराने त्यांस धरलें. धरल्यानंतर चार तासांनी प्राण सोडला. आपल्या कृत्यांपैकी काही एक सांगितलें नाही. ही गोष्ट १९०५ मध्ये घडली. जे. आबासाहेब आणि रावसाहेब या व्यक्ति अभिन्न होत्या, अशी गंगाधरराव देशपांड्यांच्या एका मित्राची म्हणजे गोविंदराव याळगींची दामूअण्णा जोश्यांच्या सांगण्यावरून समजूत झाली होती. याची निश्चिति करण्याकरितां एकदा गंगाधरराव, गोविंदराव आणि दामूअण्णा असे तिघेही गोव्याकडे गेले होते. त्या वेळच्या भेटीत 'मी बीड बंडांत असलो तरी रावसाहेब नाही' असें आबासाहेबांनी त्यांना सांगितलें. याळगींच्या चरित्रातील या माहितीवरून शिवाजी समितीचे जे सभासद बीडच्या क्रांतिकारकांना द्रव्यसाहाय्य करावयाला गेले होते, त्यांच्यामध्ये दामूअण्णा होते, ही गोष्ट उघड आहे. पण त्यांचा रावसाहेबांशी प्रत्यक्ष संबंध आला नसावा. त्यामुळे ते आबासाहेबांनाच रावसाहेब मानीत होते. पण भिडेगुरुजी या दोघांनाही चांगले ओळखत होते. आबासाहेब हे रावसाहेबांच्या मृत्यूनंतर वऱ्हाडात आले असताना भिड्यांनी त्यांचें पूर्वचरित्र प्रकट करून त्यांना त्या प्रांतात थारा मिळणें अशक्य करून सोडलें. 'जे. आबासाहेब लबाड माणूस. यास्तव घरात नको. सर्वांना तोंडघशी देईल. त्यानेच पुढे पां. म. बापट यांना फसविलें. हा माणूस मडगाव गोवें प्रांती होता. स्वतःकरिता दुसरे बळी देऊन आपण इंग्रजांचा हेर बनला. याने हैदराबाद प्रांती लोकांस फसवून कित्येकांच्या स्त्रिया भ्रष्टविल्या, लांबविल्या. त्याने सात लग्नें केलीं होतीं.' तेव्हा भिडेगुरुजींच्या रागावर हे गृहस्थ टिळकांची आणि त्यांच्या हस्तकांची निंदा करीत होते, हें उघड आहे. यांनीच एक लक्ष रुपयांसाठी नानासाहेब पेशव्यांना धरून देण्याची सूचना क्लीव्हलंडमहाशयांना केली होती. रावसाहेब पेशव्यांचा आणि त्यांचा स्नेह लक्षात घेतला म्हणजे त्यांना खरे नानासाहेब बंडवाले माहीत होते, याविषयी संशय उरत नाही. गंगाधररावांच्या आत्मचरित्रावरून समजतें की १९०८–०९ च्या दिवसांत इंग्रजांच्या मागणीवरून गोवे सरकारने आबासाहेबांना सीमापार करून

त्यांच्या स्वाधीन केलें. त्यानंतर त्यांना पुण्याला आणून त्यांच्याविरुद्ध सद्वर्तणुकीसाठी तारण मागण्याचा अभियोग चालविला आणि तारण न मिळाल्याने त्यांना बंदिशाळेत पाठविलें. येथून सुटल्यानंतर ते बिलिमोरा येथे तीस पस्तीस अनुयायांसह राहून क्रांतिकारक वाङमयाचा प्रसार करीत होते. येथेच सेनापति बापटांचा आणि त्यांचा परिचय झाला. सेनापतींचा त्यांनी विश्वासघात केला असला तरी त्यांच्या पूर्वायुष्यांतील कार्यासंबंधी ते आदरानेच बोलत.

बाबासाहेब हेच रावसाहेब

सेतुमाधवरावांच्या पुस्तकांत 'बाबासाहेबांची उठावणी' या प्रकरणात रावसाहेबांच्या बंडाची रक्षकविभागाच्या प्रतिवृत्तावरून एकत्रित केलेली माहिती दिली आहे. त्यावरून असें समजतें की, बीड येथे त्यांना मुख्यतः शिवराव शंकर मुधोळकर यांनी फार साहाय्य केलें. वऱ्हाडात त्या वेळी रंगनाथ नरसिंह मुधोळकर नांवाचे प्रसिद्ध विधिविशारद आणि पुढारी होते. हे एकवार कॉंग्रेसचे अध्यक्षही झाले. शिवरावांचा या घराण्याशी संबंध असल्यास त्यांची आणि रावसाहेबांची वऱ्हाडातच ओळख झाली असावी. रावसाहेब बीडला आल्यानंतर शिवरावांनी तेथील प्रमुख ब्राह्मणांना जेवायला बोलावून बंडाच्या कारस्थानाचा उपक्रम केला. या बंडाळीला खेड्यावरील लोकांचीही संपूर्ण सहानुभूति होती, असें महंमद हनीफ आणि गोपाळराव या रक्षकांच्या अनुभवावरून कळून येतें. १-४-९९ या एप्रिलफूलच्या दिवशी हे उभयता देवगाव येथे रावसाहेबांच्या टोळीची माहिती मिळविण्याकरिता गेले असता तेथील लोकांनीं त्यांना वाजेला बांधून टोळीकडे नेलें आणि तेथे अधिक शासन म्हणून हनीफचा कान कापून टाकला. असो. रावसाहेबांचा उठावणीचा उपक्रम एकंदरीने वासुदेव बळवंतांच्याच पद्धतीचा दिसतो. वासुदेव बळवंतांचे एक अनुयायी टिळक हे त्यांना साहाय्य करीत होते, हें वर आलेंच आहे, वासुदेव बळवंतांना असा आत्मविश्वास होता की, माझ्या हाती पांच सहस्र रुपये असते तर मी सर्वत्र माणसें पाठवून एकाच काळी देशभर बंडाळी घडवून आणली असती. पण रावसाहेबांच्या हाती या बंडाळीमुळे ऐंशी सहस्र रुपये येऊनही त्यांचा तादृश उपयोग झालेला दिसत नाही. याचें मुख्य कारण हें दिसतें कीं स्वतः रावसाहेबांना जनतेविषयी प्रेम नसावें आणि जनतेच्या उठावणीचें सामर्थ्य किती असतें, याची कल्पना नसावी. त्यांचा सारा भर सैनिकांना पैसे चारून आपल्या

पक्षाला वळविण्यावर होता. सैनिकांचे नातेवाईक ज्या खेड्यातून असत तीं खेडीं निवडून वश करून घेतलीं असतीं तर त्यांना अधिक यश आलें असतें.

बीडच्या बंडवाल्यांशी टिळकांचा संबंध

वरील सर्व संदर्भांचा साकल्याने विचार केला म्हणजे बीडच्या बंडाचा पाया टिळकांनी रचला होता, ही गोष्ट उघड होते. 'रचिला पाया त्याची भली उभारणी झाली,' असें कृष्णाप्रमाणे त्यांना म्हणता आलें नाही ही गोष्ट वेगळी. कोल्हापूरच्या शिवाजी समितीने द्रव्यसाहाय्य करून आणि माणसें पुरवून या बंडाचा पाया रचला. समितीने दिलेलें द्रव्य ज्या भिडेगुरुजींनी स्वीकारलें, ते चाफेकरांच्या समितीचे एक प्रमुख सभासद होते. लठ्ठयांनी सांगितल्याप्रमाणे शिवाजी समितीचे जे एक दोन पुढारी द्रव्य घेऊन बीडला गेले, ते हणमंतराव मुर्कीभावीकर आणि दामूअण्णा जोशी हेंच असावेत. यांच्यापैकी हणमंतरावांनी तर नेपाळच्या कारस्थानात खाडिलकरांच्या इतकाच महत्त्वाचा भाग घेतला आणि दामूअण्णा जोशी हेंही नेपाळात गेले होते. यावरून ते टिळकांच्या विश्वासातले होते, हें उघड आहे. रावसाहेब पेशव्यांची आणि टिळकांची प्रथमपासूनच ओळख असल्यावाचून काही रावसाहेबांनी त्यांना काशीत उद्यानभोजन दिलें नसतें. या कटात रँडवधापूर्वीपासून टिळक भाग घेत असावेत. म्हणूनच १८९८ च्या सप्टेंबरमध्ये स्वतःची सुटका झाल्यानंतर लगेच त्यांनी शिवाजी समितीच्या सभासदांना बीडकडे धाडून दिलें. या बंडात चाफेकर बंधूंनी आणि त्यांच्या अनुयायांनी भाग घेतला असता, तर त्याला काही निराळेंच स्वरूप आलें असतें. पण पुण्याचे शेर्लॉक होल्मस् जे ब्रुइन, त्यांनी चाफेकरसमितीची धूळधाण करून टाकल्यामुळे बीडच्या कारस्थानाला अधिक विशाल स्वरूप प्राप्त झालें नाही. तरीसुद्धा पुण्यातील शेर्लॉक होल्मस् जे ब्रुइन त्यांनाच आपल्या खिशात घालून अथवा चकवून विंचुरकरांच्या वाड्यातील प्रो. मोरिआर्टीनी बीडच्या बंडाची उभारणी केली, हें कर्तृत्व काही सामान्य नाही. यामुळेच प्रो. मोरिआर्टीची भूमिका घेणाऱ्या टिळकांना आपले प्रतिस्पर्धी ब्रुइन यांचा मृत्युलेख लिहून कॉनन डॉइलच्या ग्रंथातील उणीव भरून काढण्याची लहर आली. रक्षक विभागातील इतर अधिकाऱ्यांशी व्यवहार करताना टिळकांनी अनेकदा या लेखाचा दाखला दिला असावा.

दामूअण्णांचा कर्झनवधाचा प्रयत्न

आपल्या ग्रंथाच्या ३२८ पानावर लठ्ठे लिहितात:

The most prominent member of the Club was Damu Joshi, who left Kolhapur to avoid suspicions and in consultation with some seditionists outside Kolhapur, he is said to have unsuccessfully pursued Lord Curzon in his tours in 1902 with the object of murdering him. After wandering over the whole country including the villages of the Nepal state and discussing the methods of amassing money by robbery and the possibility of collecting arms to shoot the white enemy with several well known persons of disloyal proclivities, Damu returned to Kolhapur.

शिवाजी समितीचे एक प्रमुख सभासद दामूअण्णा हे १९०२ मध्ये कर्झनचा पाठलाग करीत होते. पण त्याच्या वधाचा प्रयत्न करण्याची त्यांना संधि मिळाली नाही. तेव्हा भारत आणि नेपाळ या देशांचें भ्रमण संपवून द्रव्यशस्त्रसंपादनाच्या काही योजना ठरवूनच ते कोल्हापुराला परत आले. पुढे दामूअण्णांच्याकडून युक्तिप्रयुक्तीनें सर्व माहिती मिळवून महाराजांनी इंग्रजांच्या राजदूताला कळविलें :

His Highness asked the Political Agent to instruct his European assistant to investigate the information he had obtained regarding the man who had shadowed Lord Curzon in 1902, so that though nothing could be legally proved, a moral conviction about the truth of the report might put Government on its guard.

म्हणजे लॉर्ड कर्झन यांच्या मागे लागलेल्या व्यक्तीची सारी माहिती महाराजांनी इंग्रज राजदूताला पुरवून ही सारी खरी आहे की, नाही याची हाताखालच्या गोऱ्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्याची त्यांना विनंती केली होती. नेपाळातील कारस्थानांची माहितीही दामूअण्णांच्याकडूनच महाराजांना मिळाली असें देवगिरीकरांनी वासुकाकांच्या चरित्रात सांगितलें आहे. 'कोल्हापूरचे दामूअण्णा जोशी हे नेपाळला गेले होते. हें गृहस्थ तडफदार आणि क्रांतिकारक होते. नेपाळातील घडामोडी त्यांना माहीत होत्या. कोल्हापूरच्या एका प्रकरणात अटक होऊन त्यांचा छळ झाला. त्यानंतर महाराजांनी साखर पेरली. दामूअण्णांनी महाराजांना इत्थंभूत कथा सांगितली. नेपाळात खाडिलकरांच्यासह हणमंतराव मुर्कीभावीकर हे शिवाजी समितीचे संस्थापक आणि नेते गेले होते, तेही टिळकांच्या आज्ञेनेच गेले होते. त्याच समितीचे दामूअण्णा कर्झनच्या पाठलागात काही दिवस गुंतले असले, तर

तीही गोष्ट त्यांनी टिळकांची संमति घेऊन केली असली पाहिजे, हें उघड आहे. खाडिलकर नेपाळात जाण्यापूर्वी उमरावतीला मोरोपंत जोश्यांच्याकडेच उतरले होते आणि तिथेच खापर्डे, खाडिलकर, जोशी यांची गुप्त चर्चा होऊन मग ते पुढे गेले. रावसाहेब पेशवेही मोरोपंतांच्या घरींच उतरत असत. यामुळे मोरोपंत जोशीही राजद्रोही आहेत, असा सरकारचा ग्रह झाला होता आणि त्यांच्या कन्येशी सांगलीकरांचा विवाह होण्यापूर्वी त्या विवाहाला सरकारने विरोध केला होता. पुढे गोखल्यांच्या मध्यस्थीने तें शुभमंगल झालें, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. प्रस्तुत पिढीला हणमंतराव मुर्कीभावीकर यांची काहीच माहिती नाही.

I. G. P. Indore State report that Hanmantrao Kulkarni alias Bhimaji Murkibhavikar, the originator and the leader of the Shivaji Club, Kolhapur who has been turned out of Nepal Territory, has now been reported as having come to Indore State and joined the P.W.D. at Indore.

यावरून शिवाजी समितीचे संस्थापक आणि नेते मुर्कीभावीकर यांना नेपाळातून घालवून दिल्यानंतर त्यांना इंदुरात आश्रय मिळाला असें समजतें. नेपाळ प्रकरणासारख्या रहस्यपूर्ण कारस्थानातून पूर्ण विश्वासाचीं माणसें घेतलीं असतील, हें उघड आहे. शिवाजी समितीचे कृष्णाजी दामोदर लिमये यांच्या निवेदनावरून समजतें कीं, १९०८ च्या दिवसांत खाडिलकर अफगाण स्वारीची अपेक्षा करीत असून देशात इंग्रजांचे वध करून इथे क्रांतिकारक असल्याचें सिद्ध करण्याची आवश्यकता दामूअण्णांना पटवून देत होते. या माहितीवरून १९२० मध्ये खाडिलकर गांधींना कां मिळाले, हें कळून येतें.

कर्झनवधाची योजना

भारतीय क्रांतिकारकांच्या मुख्य समितीने सम्राट् सातवे एडवर्ड यांच्या राज्यारोहणानिमित्त दिल्ली येथे बोलाविलेल्या राजेरजवाड्यांच्या वैभवशाली संमेलनाच्या मिरवणुकीतच लॉर्ड कर्झन यांचा वध करावयाचें निश्चित केलें होतें. या प्रकरणाची माहिती पुण्यातील एक पूर्वीचे न्यायाधीश चारुचंद्र दत्त यांच्या टिळकदिनानिमित्त मराठा साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या लेखात आली आहे :

We had among us three or four very eminent people, a great poet, a famous scientist, my father-in-law Mr. Mallik, a prominent dock owner, besides the famous Japanese author and

artist Okakura. Suren Tagore and I were the two youngest conspirators.

वरील अवतरणात उल्लेखिलेले महाकवि रवींद्रनाथ ठाकूर हेच असून त्यांचे परममित्र जगदीशचंद्र वसु हेच विख्यात शास्त्रज्ञ होते. जगदीशचंद्रांना इंग्रजांनी वाईट रीतीने वागविलें, म्हणून भगिनी निवेदिताही भडकून गेल्या होत्या. मग जगदीशचंद्र आणि रवींद्रनाथही सरकारवर चिडले असल्यास नवल नाही. या दिवसांत जगदीशचंद्रांच्या मनावर रशियन क्रांतिकारक प्रिन्स क्रोपाट्किन यांचाही प्रभाव पडलेला होता. रवींद्रनाथांनी तर १८७७ पूर्वीच क्रांतिकार्याप्रीत्यर्थ प्राण देण्याची आणि घेण्याची शपथ वाहून राजनारायण वसूंच्या संजीवनी या क्रांतिकारकांच्या सभेत प्रवेश केला होता. सुरेंद्रनाथ ठाकूर हे त्यांचे पुतणे. मल्लिक यांचे चिरंजीव राजा सुबोधचंद्र मल्लिक हे अरविंद घोषांचे परममित्र होते. यांना पुढे १८१८ च्या निर्बंधाच्या आधाराने इंग्रजांनी अटक केली. ओकाकुरा हे जपानमधील सरदार घराण्यात जन्मलेले लेखक आणि कलावंत. विवेकानंदांच्या एका अमेरिकन शिष्येच्या प्रेरणेने ते भारतात क्रांतीचा प्रसार करण्याकरिता आले आणि त्यांनीच बॅ. प्रमथ मित्र यांची दास्यात संतुष्ट राहण्यानिमित्त निर्भर्त्सना करून त्यांना अनुशीलन समितीची स्थापना करण्याला प्रवृत्त केलें. स्वतः चारुचंद्र दत्त हे योगी अरविंदांच्या पूर्ण विश्वासातील कार्यकर्ते. चारुचंद्रांचा आणि टिळकांचा चांगला परिचय होता. टिळक कलकत्त्याला गेले म्हणजे बॅ. प्रमथ मित्रांना भेटत. खापर्ड्यांच्या दैनंदिनीतही त्यांची टिळकांनी भेट घेतल्याचा उल्लेख आढळतो. असो. कलकत्त्याच्या या सर्व थोर मंडळींनी परमेश्वर नांवाच्या एका बिहारी मारेकऱ्याकडून केनेडीप्रमाणेच कर्झनचा हत्तीवरून मिरविताना बंदुकीने वध करविण्याचा बेत केला होता. पण त्या परमेश्वराला आयत्या वेळी आकाशातील परमेश्वराने अन्य बुद्धि दिल्याने लॉर्ड कर्झन हे बंगालची फाळणी करावयाला जिवंत राहिले. त्या दिवसांत भारतीय क्रांतिकारकांना बाँबची विद्या अवगत नसल्याने आणि पिस्तुलाच्या गोळीच्या टप्प्यात राजप्रतिनिधींची गांठ पडणें अशक्य असल्याने संधि दिसेल तिथे त्यांच्यावर आक्रमण करणें अशक्य होतें. याकरिता दिल्लीचा प्रयत्न फसल्यानंतर चारुचंद्रांनी लॉर्ड कर्झन यांना कसाऱ्याच्या घाटातील उलटच्या वळणाजवळ (रिव्हर्सिंग) मारण्याची योजना केली. त्या वेळी कर्झनमहाशय इंग्लंडला चालले होते :

His special train to Bombay had to stop at a spot called

the reversing station on the Ghats. During this stoppage a determined man could easily rush up to the Saloon and take a couple of pot shots at the victim. A young Bengali volunteerd for the job. I gave him a few shooting lessons with a small rifle of mine and got a platelayer's uniform made for him.

या उलटचा वळणापाशी लोहपथ कामगाराच्या वेषाने टेहेळणी करून राजप्रतिनिधींच्या डब्याकडे धावत जाऊन त्यांना गोळ्या घालणें शक्य होतें. एका बंगाली तरुणाने ही कामगिरी पतकरली होती. पण त्याच्याविषयी चारुबाबूंना शंका आल्याने त्यांनी त्याला बडोद्याला अरविंदांच्याकडे पाठविला. अरविंदांनाही तो भरंवशाचा दिसेना. तेव्हा ही कल्पना सोडून द्यावी लागली.

कर्झनवधाचें पुण्यातील कारस्थान

चारुबाबूंनी आपली योजना करताना मुख्य समितीच्या नियमांप्रमाणे टिळकांची संमति घेतली असलीच पाहिजे. कारण ज्या प्रांतात क्रांतिकारकांना काही कृति करावयाची असे, त्या प्रांतांतील समितीच्या नेत्याची त्यांना प्रथम संमति घ्यावी लागे. चारुचंद्राची योजना फसल्यानंतर टिळकांच्या पुण्यातील अनुयायांनी तीच योजना कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केला होता. फाटकांच्या गोखले चरित्राच्या ४०० व्या पानावर पुण्याच्या क्रांतिकारकांपैकी पाळंदे यांनी आपण कर्झनवधाचा प्रयत्न केल्याचें आणि गोखलेवधाचा कट केल्याचें नाशिककटाच्या चौकशीत मान्य केल्याचा उल्लेख आला आहे. या उल्लेखावरून कर्झनवधाच्या प्रयत्नात टिळक किती गुरफटले होते, याची अधिक कल्पना येते. कारण चारुचंद्र दत्तांनी या कार्याकरिता निवडलेला बंगाली मुलगा अविश्वसनीय असल्याचा अभिप्राय अरविंदांनी व्यक्त केल्यानंतर टिळकांनी या कामाकरिता पाळंद्यांची निवड केली असावी. त्यांच्याही हातून तें कार्य होऊ शकलें नाही. पण त्याची वाच्यताही त्यांच्याकडून १९१० पर्यंत झाली नव्हती. या संदर्भाच्या अनुरोधाने नाशिक प्रकरणी न्यायमूर्तींचा निर्णय वाचताना पुढील माहिती मिळाली.

Shidhaye and Palande took active steps to see whether a plan to commit political murder in a train could be successfully carried out. Bhave proposed the murder of a certain high official which was discussed by all these accused with the exception of Shidhaye.

आगगाडीत एका व्यक्तीचा वध करण्याची योजना यशस्वी होईल की नाही, याची पाळंदे आणि शिधये यांनी पाहणी केली. भाव्यांनी एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा वध करण्याची कल्पना सुचविली. तिची शिधये-व्यतिरिक्त सर्वांनी चर्चा केली. हे वरिष्ठ अधिकारी लॉर्ड कर्झनच असल्याचें अन्य संदर्भावरून कळून आलें आहे. या मंडळींपैकी शिधये यांच्याशी माझें एकवार दोन तास बोलणें झालें होतें, (१९२४) पण तेव्हा मला या भानगडी माहीत नव्हत्या. ब्रह्मगिरीबुवा, पाळंदे आणि भावे यांचा टिळकांशी निकटचा संबंध होता. 'अफजुलखानाचा वध करणें हें पुण्यकर्म असल्याचा प्रचार टिळकांनी पूर्वीच केला होता. कर्झनला तर टिळक औरंगजेबच मानीत असत. कर्झनच्या राजवटीचें समालोचन करताना टिळकांनी औरंगजेबाशीच त्याची तुलना केली होती आणि तीच तुलना गोखल्यांनी त्यांच्या काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात पुढे समाविष्ट केली. कर्झन औरंगजेब ठरल्यावर त्याचा वध करणें आवश्यक आहे, असें टिळकांचा कर्मयोग त्यांना सांगत होता. असलें दुष्कर कर्म करण्याला, किंवा ती कृति न घडल्यास असलीं प्रक-रणें अंगावर न उलटण्याला, जीं विश्वासाचीं माणसें लागतात, तीं टिळकांच्या हाताशी होतीं. शिवरामपंतांनी 'काळ'पत्रातून कर्झनवधाचा प्रत्यक्ष किंवा परोक्ष प्रचार केला होता. हा प्रचार इंग्रजी राज्याच्या मर्मावर आघात करणारा असल्याने 'काळ'कर्त्यांना न्यायालयात खेच-ण्याचें धैर्य सरकारला होत नव्हतें, हें पुढे दाखविलेंच आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या असता नाशिक कटाच्या खटल्यात मी कर्झनला मारायला गेलो होतो, असें जें निवेदन पाळंद्यांच्या सारख्या टिळकांच्या विश्वासांतील तरुणाने केलें होतें, त्याचें महत्त्व कळून येतें.

दामूअण्णा जोश्यांचें निवेदन

केळकरांनी टिळकचरित्रातील चिरोल प्रकरणात दामूअण्णा जोशी यांच्या निवेदनातील काही माहिती उतरून घेऊन तिच्यावर उपहासगर्भ टीका केली आहे. 'महाराष्ट्रातील पुढाऱ्यांच्या उपदेशाप्रमाणे अग्नि-गोलांचा एक मोठा कारखाना काढावयाचा होता. दिल्ली येथील सामंत-संमेलनाची संधि साधून लॉर्ड कर्झन यांचा वध करावयाचा होता. या-करिता शिवरामपंत परांजप्यांनी मला पैसे दिले. ही गोष्ट टिळकांनाही माहीत होती.' या निवेदनाचा केळकरांनी उपहास केला असला तरी ती सत्य आहे. ही माहिती टिळक मंडालेला असताना आणि शिवरामपंतही ठाण्याच्या बंदिशाळेत असताना सरकारच्या कानावर आली. त्यामुळे

सरकारने या प्रकरणात अधिक लक्ष घातलें नाही. दिल्ली येथे कर्झन-वधाचा प्रयत्न करण्याचीं जीं कारस्थानें चाललीं होतीं, त्यांचा रक्षक-विभागाला काही तरी सुगावा लागला होता. त्यासाठीच वासुकाकांनी दामूअण्णांना लपविण्याकरिता नेपाळात पाठविलें होतें, असें स्वतः दामू-अण्णांनीच खाडिलकरांच्या आठवणीत ६० पानावर सांगितलें आहे. 'दिल्लीहून कोठें तरी अज्ञात ठिकाणी पाठविण्याच्या दृष्टीने वासुकाकांनी आम्हांला नेपाळकडे पाठविलें होतें.' तेव्हा दामूअण्णांना लपविण्याची आवश्यकता १९०३ मध्ये उपस्थित झाली होती, हें उघड आहे. ही माहिती दामूअण्णांनी स्वतंत्र हिंदुस्थानात सांगितली असून पूर्वी रक्षक-विभागापुढे केलेल्या निवेदनाशी ती सुसंगतच आहे. तेव्हा टिळकांचा कर्झनवधाच्या प्रयत्नासारख्या प्रकरणाशी संबंध असता तर सरकारने त्यांचें शिर भाल्यावर टोचून ते राजधानीत मिरविलें असतें, हा केळ-करांचा आक्षेप निरर्थक आहे.

माल चांगला, सावधपणे विकत घ्या.

वरील विवेचन लिहून झाल्यानंतर खाडिलकरस्मरणीतील गंगाधर-राव देशपांड्यांची पुढील स्मृति वाचनात आली. त्या स्मृतीत त्यांनी दामूअण्णांचें नांव न देता असें सांगितलें आहे की, या गृहस्थांच्या विषयी मी खाडिलकरांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी 'माल चांगला, पण सावधपणे विकत घ्या,' असा अभिप्राय व्यक्त केला. ते पुढे म्हणतात की, काकांनी 'माल चांगला आहे' म्हणून त्या गृहस्थाची जी योग्यता ठरविली होती, ती चुकीने ठरविली गेली होती असें मला म्हणवत नाही. बोलून चालून क्रांतिकार्य म्हणजे विस्तवाशी खेळ. अशा कार्यात धोका हा असावयाचाच. तरी सुद्धा अनेक संकटांतून तावून सुलाखून निघालेल्या आणि अनेक कार्यांत उपयोगी पडलेल्या व्यक्तींवर 'विश्वस्ते नातिविश्व-सेत्' या व्यासवचनाला अनुसरून अति विश्वास ठेवणें अनिष्ट असलें तरी थोडा फार विश्वास ठेवावा लागतो. त्या कारणाकरिता दामूअण्णांवर टिळक, खाडिलकर, वासुकाका जोशी इत्यादि मंडळी मर्यादित विश्वास ठेवीत असत. रक्षकांचा छळ थांबविण्याकरिता खऱ्या खोट्यांची भेसळ करून नित्य नवीं निवेदनें करून त्यांच्या बुद्धीत व्यामोह निर्माण करावा लागतो. त्यामुळे स्वतःव्यतिरिक्त अन्य व्यक्तींविरुद्ध त्या निवेदनांचा काहीही उपयोग करता येत नाही. हें शास्त्र दामूअण्णांना सुविदित होतें, असें त्यांच्या एकंदर वर्तनावरून दिसतें. असो. अशा दामूअण्णांना कर्झनवधाचा प्रयत्न करण्याकरिता पैसे पुरविणाऱ्या आणि आपल्या

वर्तमानपत्रांतून वळणावळणाने का होईना कर्झनवधाचा पुरस्कार करणाऱ्या 'काळ'कर्त्यांची भूमिका काय होती, तिचें आता थोडें स्पष्टीकरण केलें पाहिजे.

'काळ'कर्ते परांजपे

'काळ'कर्ते परांजपे ही टिळकपक्षातली एक प्रचंड व्यक्ति आणि शक्ति होती. (हें वाक्य लिहिताना मला आठवण होत आहे की, मी 'नूतन मराठी'त असताना, क्रांतिकारकांच्या 'विहारी' पत्राचे एकेकाळचे संपादक गु. दामूअण्णा चिपळूणकरांनी माझ्या पाठीत एक प्रचंड धपका घालून गु. केळकरांना सांगितलें होतें की नाना, ही एक प्रचंड वल्ली आहे बरें का) एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांत धर्मद्रोह, समाजद्रोह आणि राजद्रोह या तीन विभिन्न तत्त्वांना वाङ्मयात चिरंतन स्वरूप देणारे तीन विभिन्न प्रकृतीचे भाषाप्रभु उदयास आले. यांपैकी पहिले Blasphemer अर्थात् देवधर्मनिंदक आगरकर, दुसरे Cynic अर्थात् समाजाची निंदा आणि कुत्सा करणारे कोल्हटकर, तिसरे Satirist अथवा राज्यकर्त्यांचें आणि त्यांच्या दासानुदासांचे निंदक परांजपे. या तिघाही लेखकांचा विषय निंदा हाच असला तरी त्यातील सर्वांत दुष्कर कार्यभाग हा आपला वाटा असेंच परांजप्यांनी ठरविलें होतें. कित्येकांना वाटेल कीं देवधर्मनिंदक आगरकरांची समकालीन समाजाने यथेच्छ निंदा केल्यामुळे त्यांच्याच वाटयाला सर्वांत अवघड कार्यभाग आला होता. पण समकालीन समाज आगरकरांची निंदा करीत असला तरी त्यांना त्या समाजात सुखाने कालक्रमणा करता आली. त्यांच्या उलट satire चा विषय दोन विभिन्न कालांतील, अथवा दोन विभिन्न समाजांतील विरोध हाच असल्याने परांजप्यांना एकाच काळी दोन युगांत निवास करावा लागत असे, आणि त्यामुळे त्यांच्या जीवनाची रशिखेच कशी सारखीच चालू असे, याची तज्ज्ञांवाचून इतरांना कल्पना येणें शक्य नाही. सकृद्दर्शनी राज्यकर्त्यांची आणि त्यांच्या दासानुदासांची निंदा हाच satire चा नेहमीचा विषय. त्यातून परांजप्यांच्या satire चें लक्ष्य बनलेले राज्यकर्ते परकीय आणि त्यांचे दासानुदास स्वसमाजातले देशद्रोही असल्याने त्यांच्या वक्रोक्तीची धार सारखी तीव्र, तीव्रतर आणि तीव्रतम होत गेली. टिळक आणि परांजपे हे दोघेही देशभक्त असले तरी टिळकांची देशभक्ति ही स्वसमाजाविषयीची आसक्ति आणि सहानुभूति या भावनांनी प्रेरित झाली होती. त्यांच्या उलट परांजप्यांची देशभक्ति ही दुःसह दास्यशृंखलांच्या द्वेषाने आणि

स्वजनांच्या अपमानाच्या त्वेषाने प्रेरित झाली होती. द्वेषाने, त्वेषाने, तसेच क्रोधाने मनाला तिढे पडले, म्हणजे तें मन सरळ बोलूच शकत नाही. वक्रोक्ति हेंच त्या मनाचें नेहमीचें वचन आणि भाषण बनून जातें. यासाठीच कुटिलनीतीचे आचार्य शुक्राचार्य यांची क्रोधांध कन्या कचाला म्हणते :

'मलिन, कुटिल, नीरस, लघु, जड, अजड पुनर्भवपणेंहि कच साच, ।
धरिला शिरींहि न स्वप्रकृतिगुण त्यजिसि नाम कच साच ॥'

असो.

तिघा निंदकांच्या तीन लेखनपद्धति

वर उल्लेखिलेल्या तिघा निंदक भाषाप्रभूंच्या तीन विभिन्न लेखन-पद्धति असतात. उदाहरणार्थ Blasphemer आगरकरांचें लेखन हें आव्हान-प्रचुर असे. त्यांचे शिष्य रँग्लर परांजपे यांनी स्वतः देवालाच आव्हान केलें होतें, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. Cynic कोल्हटकरांचें लेखन अव-हेलनाप्रचुर असे. या उभयतांच्या उलट Satirist वक्रोक्तिव्यवसायी परांजप्यांचें लेखन प्राधान्याने आवाहनप्रचुर असे. भारताच्या पूर्ववैभव स्मृतीच्या पिशाच्चांचें आवाहन हा परांजप्यांच्या लेखनाचा स्थायीभावच होता. पारतंत्र्यामुळे आपल्या पूर्वजांच्या वारसापासून वंचित झालेला क्षुब्ध आणि क्रुद्ध प्रतिभावंतच या पिशाच्चांचें आवाहन करून त्यांच्या-सहवासात रममाण होऊ शकला नाही तरी तन्मय होऊ शकतो आणि मग त्यांच्या संगतीचा गुण लागून समकालीन देशद्रोह्यांच्या यशः-शरीरांचें शवच्छेदन करून त्यांचा दशदिशांना बलि देण्याला प्रवृत्त होतो. तत्कालीन भारतीय राजकारणाच्या रंगभूमीवर हॅम्लेट नाटकाचा अभिनय कसा चालला होता, याचें वर्णन करताना स्वतः परांजप्यांनीच लिहिलें आहे. 'हॅम्लेटला त्याच्या बापाचें भूत भेटलें, तशा प्रकारचें हिंदु-स्थानाच्या पूर्ववैभवाचें भूत देशातील प्रत्येक दुर्गापुढे दिसत आहे. हॅम्लेटमधील भुताने आपला सारा पूर्वेतिहास हॅम्लेटला निवेदन केला आणि अंतर्धान पावण्याच्या वेळी अत्यंत दीनमुद्रेने त्याला सांगितलें, 'Remember me' माझी आठवण असू दे. तेच शब्द आपल्या पूर्व-वैभवाचें भूत आपल्याला सांगत आहे. अशी भुताने विनंती केल्यानंतर हॅम्लेटने जो निश्चय केला, तोच निश्चय आपणही केला पाहिजे. 'Thy Commandment alone shall live within the books and volume of my brain. माझ्या मेंदूच्या ग्रंथात तुझी आज्ञा तेवढीच उज्ज्वल अक्षरांनी तळपत राहील. या आज्ञेव्यतिरिक्त इतर सर्व स्मृति मी

स्मृतिफलकावरून पुसून टाकीन. अशी प्रतिज्ञा करणाऱ्या परांजप्यांनी आपल्या राष्ट्रमातेच्या जाराला, म्हणजे राजप्रतिनिधि लॉर्ड कर्झनला मारण्याकरिता मारेकरी घातले असले तर त्यात अविश्वसनीय काहीच नाही. या परदेशी नाटकातील रूपकापेक्षा शुद्ध स्वदेशी 'कर्म' या कथेत पिशाच्चांशी झुंज करून क्षीण होणाऱ्या प्रतिभावंतांच्या जीवनाचें जें दारुण चित्रण परांजप्यांनी केलें आहे, तें अधिक वास्तव आणि करुणास्पद आहे. आपल्या ब्रह्मचारी जीवनातील सुखी दारिद्र्याचा त्याग करून पूर्वकालीन ऐश्वर्याचा भोग घेऊ पाहणाऱ्या कथानायकावर त्या ऐश्वर्यराशीशी निगडित झालेल्या पिशाच्चांशी प्रत्येक अमावास्येला झगडा करण्याची पाळी येऊन त्याचें जीवन त्याला कसें दुस्सह होतें याचें परांजप्यांनी या कथेत वर्णन केलें आहे. अशा पूर्वकालीन स्मृतिपिशाच्चांशी झुंज करण्यात ज्यांनी जीवनाचा दीर्घकाल व्यतीत केला आहे त्या वेतालभट्टांना परांजप्यांच्या जीवनातील भीषणतेची आणि दारुणतेची यथार्थ कल्पना येईल. 'कर्म' कथेतील नायकाचें जीवन फाशी जाऊन अगदीच साधारण पद्धतीने समाप्त झालें असलें तरी स्वतः परांजप्यांचें क्रांतिजीवन, ज्या धूमधूसर यामिनीत, त्यांनी सरकारजमा झालेल्या 'काळातील निवडक निबंधां'चा होम केला, त्या यामिनीतच संपून गेलें होतें. त्यानंतरच्या त्यांच्या अस्तित्वाकडे देशभक्त त्यांच्या पूर्वीच्या क्रांतिकारक जीवनाचें स्मरण करून देणारें एक जिवंत प्रतीक या नात्यानेच पहात असत. किंबहुना असेंही म्हटलें तरी चालेल, १९०८ नंतरच्या काळात टिळक या क्रियापदाचा भूतकाळ परांजपे, वर्तमानकाळ केळकर आणि भविष्यकाळ खाडिलकर झाले होते. पण अंती वर्तमानकाळानेच भविष्यकाळ खाऊन टाकला.

वक्रोक्ति आणि विनोद

संस्कृतसाहित्यात वक्रोक्तीचा वापर सामान्यतः चमत्कृतिजन्य विनोद निर्माण करण्याकरिता करतात. याचें एक सर्वप्रसिद्ध उदाहरण म्हणून बाणभट्टांच्या कादंबरीतील शुकशारिकांच्या वक्रोक्तिप्रचुर संवादाचा उल्लेख करता येईल. पण परांजप्यांच्या लेखनात वक्रोक्तीचा वापर केला जातो, तो निर्मळ हास्य निर्माण करण्याकरिता नसून प्रतिपक्षांना हास्यास्पद करण्याकरिता केला जातो. परांजप्यांच्या वक्रोक्तीला विनोदाच्या थिल्लरपणाचेंच नव्हे, तर प्रत्यक्ष विनोदाचेंही वावडें आहे. कारण विनोदनिर्मितीला लेखकाचें मन सहिष्णु असावें लागतें. पण या गुणाचा अथवा दुर्गुणाचा स्पर्श परांजप्यांना क्वचितच झाला असावा.

कारण त्यांचें मन देशस्वातंत्र्याच्या ध्यासाने आणि देशद्रोह्यांच्या द्वेषाने वेडेंपिसें झालें होतें. संस्कृत साहित्यातील नायिकेला जशा, तिला न्यूनत्व आणणारी कोणतीही घटना सहन न करणाऱ्या 'असहन' सख्या असतात, तसल्या असहन सखीचीच भूमिका परांजप्यांच्या प्रतिभेने स्वतंत्रता-देवीच्यासंबंधी स्वीकारलेली आहे. स्वतंत्रतेचीं स्तोत्रें गाताना परांजप्यांची प्रतिभा गौरीहरापुढे उपासनेला बसलेल्या नवसौभाग्यकांक्षिणी-प्रमाणे भावविव्हल झालेली दिसून येते, पण आपल्या वक्रोक्तीने देश-द्रोह्यांची निदारुण विटंबना करण्यात तीच प्रतिभा ज्या नित्यनूतन कुटिल कौशल्यांचा आविष्कार करीत असते, त्यांचें निरीक्षण करणाऱ्यांना नित्य नूतन प्रवंचनेचीं पातकें करणाऱ्या इंद्राच्या अप्सरांचेंच स्मरण झाल्यावाचून राहणार नाही. मात्र ही इंद्राची अप्सरा तत्कालीन भारतात इंद्रपदावर आरूढ झालेल्या कु-राज्यकर्त्यांना पदभ्रष्ट करण्या-करिताच नर्तन करीत होती. हें तिचें विसदृश आणि विपरीत वर्तन पाहून कुपित झालेल्या इंद्राने काही काळ तिला नृत्य करण्यालाच बंदी केली होती, इतकेंच नव्हे तर जनमानसमंदिरातील तिचे पूर्वीचे पदक्षेपही पुसून टाकले होते. अर्थात् शिवरामपंत परांजप्यांचें 'काळ' पत्रातून प्रकट झालेलें आणि महाकाळाच्या चरणी अर्पण केलेलें कापालिक वाङ्मय सरकारजमा केलें होतें. या स्वकीय सारस्वताच्या दहनानेंच परांजप्यांचा, स्वानुभवाच्या अश्रूंनी भिजलेला 'भासाची भवितव्यता' हा अतिकरुण लेख लिहिला गेला.

स्वभावोक्ति आणि वक्रोक्ति

परके राज्यकर्ते स्वतंत्रतेच्या भक्तांना बंदिशाळेत कोंडून आणि त्यांचें वाङ्मय सरकारजमा करून त्यांना छळत असले तरी त्यांचा प्रति-छळ करण्याचें एक साधन स्वातंत्र्यभक्तांना उपलब्ध असतें. हें साधन म्हणजे 'सत्यं वद' या मंत्रात सांगितलेलें साधन होय. या साधनाची महती सांगताना मॅझिनीचा मार्गदर्शक इटालियन लेखक युगो फोस्कोलो म्हणतो,

Write. Persecute your oppressors with truth. Pronounce judgement upon your oppressors. Amid the abasement of prisons and punishments you will raise yourselves high above the man of power.

लिहा. तुमचा छळ करणाऱ्यांचा, सत्याचा पुरस्कार करून तुम्ही प्रतिछळ करा. छळवाद्यांच्या दुष्कृत्यांवरील तुमचे निर्भीड अभिप्राय

प्रकट करून त्यांना क:पदार्थ बनवा. बंदिशालांच्या आणि शिक्षांच्या विटंबनेतसुद्धा तुमच्या निर्णायक अभिप्रायाच्या प्रभावामुळे तुम्ही शिक्षा करण्याची सत्ता हाती असलेल्या लोकांपेक्षा श्रेष्ठ ठराल. हा उपदेश वाचला म्हणजे स्वाभाविकपणेच स्वतःला शिक्षा होण्यापूर्वी टिळकांनी उच्चारलेल्या धीरोदात्त उद्‌गारांचें स्मरण झाल्यावाचून रहात नाही. ही गोष्ट सत्य असली तरी टिळकांच्या हातून त्यांचा छळ करणाऱ्यांचा प्रतिछळ करण्याचें काम नीटसें झालें असें म्हणता येत नाही. कारण टिळक हे स्पष्टवक्ते असल्याने स्वभावोक्ति हाच त्यांच्या लेखनाचा नेहमीचा अलंकार. या स्वभावोक्तीने टिळकांना प्रतिपक्षांवर आघात करून त्यांना क्षतविक्षत करता येत असे. पण वक्रोक्तिकुशल परांजप्यांच्या प्रमाणे त्यांना शत्रूंच्या क्षतात मीठ भरून त्यांच्या हृदयातून आगीचा डोंब पेटविता येत नसे.

राजप्रतिनिधींच्या वधाचे प्रयत्न

संस्कृत नाटकांत मुद्राराक्षस हें परांजप्यांचें विशेष आवडतें नाटक होतें. या नाटकाचा नायक आर्यचाणक्य एका प्रसंगी शत्रुपक्षाच्या काही नृपांचीं नांवें घेऊन म्हणतो : ' नामान्येषां लिखामि ध्रुवमहमधुना चित्रगुप्तः प्रमार्ष्टु ' । यांचीं नांवें मी माझ्या पत्रात लिहितो. आता चित्र-गुप्त तीं नांवें (आपल्या वहीतून) पुसून टाकू दे. इतक्या आत्मविश्वासाने नसलें तरी कर्झनच्या विनाशाची आशा मनात बाळगूनच परांजप्यांनी आपल्या पत्रात लिहिलें होतें : 'अशी स्थिति असताना आपण फिरून राजप्रतिनिधि होऊन येणार ही गोष्ट सहन करण्याला हिंदुस्थानातील लोकांनी कसें सिद्ध व्हावें,' पण एकट्या कर्झन यांच्यापुरताच नव्हे तर इतर कोणत्याही राजप्रतिनिधींना यमसदनीं पाठवून क्रांतिकारकांचें कर्तृत्व सिद्ध करण्याचा केंद्रसमितीचा प्रयत्न कधीच यशस्वी झाला नाही. लॉर्ड मिंटो यांच्यावर अहमदाबादेत टाकलेला अग्निगोल वाया गेला. पुढे लॉर्ड हार्डिंज आणि त्यांची पत्नी हीं उभयता १९१२ च्या डिसेंबरमध्ये आहत झाली, तरी हत झाली नाहीत. लॉर्ड चेल्म्सफोर्ड आणि लॉर्ड रीडिंग यांच्या हत्येचे प्रयत्नच झाले नाहीत. तरीसुद्धा तेव्हा गांधींचें अनुयायित्व पतकरलेल्या चित्तरंजन दासांनी लॉर्ड रीडिंग यांना मारण्यासाठी शचींद्र सान्यालांना दशसहस्र रुपये देऊ केले होते, ही गोष्ट जोगेश चट्टोपाध्यायांनी प्रकट केली आहे. लॉर्ड आयर्विन यांची गाडी उलथून पाडण्याचा दिल्लीच्या क्रांतिकारकांचा प्रयत्न अयशस्वी झाला. असो. या अयशस्वी प्रयत्नांचा उपक्रम टिळक आणि परांजपे,

तसेच रवींद्रनाथ ठाकूर आणि जगदीशचंद्र बसु यांनी केलेल्या कर्झन-वधाच्या प्रयत्नांपासून झाला, ही गोष्ट टिळकयुगाच्या इतिहासांत समाविष्ट करणें आवश्यक आहे. टिळकांनी कर्झनचें वर्णनच मुळी लोक-विनाशासाठी उपस्थित झालेला धूमकेतु (उपप्लवाय लोकानां धूमकेतु-रिवोत्थितः) असेंच केलें आहे. या वर्णनावरून कर्झनविषयीची टिळकांची भावना कळून येते.

कर्झनवधाच्या चर्चेचें अपत्य 'कीचकवध'

काळकर्त्यांनी प्लेव्हे आणि कर्झन यांच्यावर संयुक्त लेख लिहून कर्झनवधाचा अप्रत्यक्ष प्रचार केल्यानंतर त्यांचे निकटचे स्नेही खाडिलकर यांनी भारतातील लहानमोठ्या गोऱ्या साम्राज्यवाद्यांच्या वधांचा पुरस्कार करण्याकरिता कीचकवध हें नाटक लिहिलें. या नाटकातील पांडवांचा अज्ञातवास म्हणजे भारताने आपण होऊन पतकरलेलें दास्य होय. या नाटकात सैरंध्री-द्रौपदी कंक-युधिष्ठिराला म्हणते, 'पांडवांचा अज्ञातवास म्हणजे पांडवांनी स्वेच्छेने आपली पूर्वीची थोरवी विसरून दुसऱ्यांच्या सत्तेखाली राहण्याचें मान्य करणें होय. महाराज, स्वातंत्र्याचा आस्वाद घेणाऱ्या मनाने दोन दिवस स्वेच्छेने दास्यात घालविले तर तें मन तत्काळ लेचेंपेचें होतें. मानापमान त्याला कळेनासा होतो. किंबहुना अपमान सहन करणें आणि पूर्वपीठिका विसरणें हाच सद्‌गुण असें त्याला वाटू लागतें...महाराज, राजमंदिरातील सुखाला लालचावलेले आजचे पांडव शरीराने तुकतुकीत पण मनाने षंढ बनलेले पाहून कौरव आनंदाने टाळ्या पिटतील.' असल्या पांडवांचा पुढारी बनलेला कंक-युधिष्ठिर भीम-द्रौपदींना उपदेश करतो. 'पांडवांना दुसऱ्यांच्या सत्तेखाली निमूटपणे दिवस काढण्याचें ठाऊक नव्हतें. अज्ञातवास मान्य केल्याने दुसऱ्यांची सत्ता पांडवांनी स्वेच्छेने मान्य केल्यासारखी आहे. अशा स्थितीत त्यांचा छळ होत असला तरी त्यांनी उघडपणे, अडदांडपणाने वागणें योग्य नाही. द्रौपदी, शाब्दिक अपमान सांप्रतच्या स्थितीत आम्ही मुकाट्याने गिळणेंच इष्ट आहे. पण तो दुष्ट कीचक आपल्या शब्दाप्रमाणे खरोखरच वागण्यास प्रवृत्त झाला तर सुदेष्णेच्या हातापाया पडून, आर्जवें करून महाराणीच्या सत्यनिष्ठेवर आणि औदार्यावर अवलंबून रहा, म्हणजे तुला कीचकापासून त्रास होणार नाही.' युधिष्ठिराचें हें विवेचन खाडिलकरांनी गोखल्यांच्या तत्कालीन भाषणातून उतरून घेतलें आहे, की काय असा भास होतो. फाटकांच्या गोखलेचरित्रात ३८९ पानावर स्वतः गोखल्यांचेच उद्‌गार दिले आहेत. 'देशहितासाठी राज्यनिष्ठा

अवश्य असल्याच्या भावनेनेच ती टिकविली पाहिजे. मग आपला मार्ग आपणांला स्वच्छ दिसू लागेल आणि आपण धीराने—नव्हे आनंदाने—परक्यांच्या राजवटीत अटळ असलेले अपमानाचे प्रसंग देशहिताला आवश्यक आहेत, अशा जाणिवेने सहन करण्याला समर्थ होऊ. स्वाभिमानाचें दमन हा एक स्वार्थत्यागच आहे.'

दयाळू निष्ठुरपणा आणि क्रूर निष्ठुरपणा

कीचकवधाला विरोध करताना धर्मराजाने तिसऱ्या अंकात म्हटलें आहे, 'ज्याला आज दुःख द्यावयाचें आहे, त्याचें त्या दुःखापासून अधिक कल्याण होणार आहे, अशी दयाळू न्यायदेवतेची पूर्ण श्रद्धा असल्यावाचून क्रूरपणाचें प्रत्येक कृत्य पापमय आहे, असें समजावें.' पण धर्मराजाला नसली तरी खाडिलकरांना ही गोष्ट सुविदित होती की, अशी श्रद्धा बाळगूनच ख्रिस्ती लोकांचीं धर्मन्यायालयें आपल्या प्रतिपक्ष्यांचें दहन करीत असत. विपत्तीपासून मानवांचें कल्याण होतें, असें युधिष्ठिराच्या कुंतीमातेचेंच मत असल्याने तिने 'विपदः सन्तु नः शश्वत्' असा वर देवापासून मागून घेतला होता. तेव्हा या वराचा अल्प आस्वाद भीमाने आपल्या शत्रूंना देण्याचें मनात आणलें तर त्याला युधिष्ठिराने विरोध करण्याचें काहीच कारण नव्हतें. पुष्कळांचें पुष्कळ सुख या तत्त्वाचा वाचेने पुरस्कार करणाऱ्या इंग्रजांनी आपल्या कृतीने पुष्कळांचें पुष्कळ दुःख या तत्त्वाचा अवलंब करून हिंदुस्थानाचा उद्धार करण्याचा उद्योग आरंभिला असताना, त्यांच्या कल्याणाकरिताच त्यांना दुःखाचे थोडे चटके देणें आवश्यक होतें. पण भारतीयांनी असें काही करून आपली सत्ता झुगारून देण्याला सिद्ध होऊ नये, यासाठी इंग्रज त्यांना सांगत की, आमच्या मनांतील तुमच्याविषयींची सहानुभूति तुमच्या कृतीने तुम्ही नष्ट करू नका. या सहानभूतीची भाषा ऐकून अंगाचा भडका झालेली सैरंध्री कीचकाला म्हणते, 'कसलीरे मेल्या सहानुभूति, आग लागो तुझ्या या सहानुभूतीला. सहानुभूति, सहानुभूति म्हणून आम्हां सर्वांना तुझ्या रांडाच बनविणार की नाही?' 'या गाढवाला आपल्या ह्या असल्या सहानुभूतीचा दिमाख दाखवावयालाही लाज वाटत नाही.' द्रौपदीच्या या जळजळीत उद्‌गारांनी इंग्रजांच्या सहानुभूतीला जपणाऱ्या आणि त्यांच्या सहानुभूतीवर जगणाऱ्या पक्षांच्या नैतिक अधोगतीची पुरेशी कल्पना येते. इंग्रजांच्या राजकीय रखेल्यांच्या पक्षात आपण समाविष्ट व्हावयाचें की कीचकवधाचा कार्यक्रम हाती घ्यावयाचा, हा तेव्हा द्रौपदीराष्ट्रीयसभेपुढे प्रश्न होता. या प्रश्नाला खाडिलकरांनी

दिलेलें उत्तर इतिहासाने दिलेल्या उत्तराशी जुळलें कीं नाही, याची चर्चा इतिहासकारांनी करावी.

राजप्रतिनिधींचा क्रियाशील राजनिष्ठेचा उपदेश

परक्या सरकारला सुद्धा जिंकलेल्या प्रजेवर राज्य करताना त्या प्रजेच्या संमतीची, सहानुभूतीची आणि सहकार्याची आवश्यकता असते. कारण प्रजेचें सहकार्य आणि सहानुभूति लाभली तरच परक्या सरकाराला नीतिनिर्बंधांच्या मर्यादा संभाळून राज्य चालविता येतें. प्रजेची संमति, सहानुभूति आणि सहकार्य लाभलें नाही तर परक्या सरकारची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींची न्यायालयांतून उघड चौकशी करून त्यांना यथापराध शिक्षा करणें अशक्य होतें. मग त्यांना अज्ञात ठिकाणी अनिश्चित काळपर्यंत अटकेंत ठेवणें, अथवा त्यांच्या घातकी हालचालींकडे दुर्लक्ष करणें हे दोनच मार्ग सरकारला मोकळे राहतात. यांपैकी दुसरा मार्गच नानासाहेब पेशव्यांच्या संबंधात सरकारने अवलंबिला होता, हें अन्यत्र दाखविलें आहेच. आपल्या सरकाराची अशी अगतिक अवस्था होऊ नये, याकरिता परकी सत्ता ही आपल्या देशावरील ईश्वरी कृपा, असें मनःपूर्वक प्रतिपादणारा गोखलेपक्ष परक्या सरकारला जितका प्रिय तितकाच आवश्यकही असतो. भारतात टिळकांचा राजद्रोही प्रजापक्ष प्रभावी झाल्यानंतर राजप्रतिनिधींनी सर्व राज्यपालांना पाठविलेल्या एका परिपत्रकात म्हटलें आहे :

The maintenance of British rule is necessary for the good of India and in the interest of the people entrusted to his charge Governor General in Council is determined to suppress all attempts to subvert his authority. He desires to do this by conciliatory methods but if these fail, he is convinced that in applying sterner methods he will have the support and co-operation of the loyal and law-abiding people.

हिंदुस्थानाच्या हिताकरिता ब्रिटिश राज्य आवश्यक आहे, म्हणून आपल्या स्वाधीन केलेल्या प्रजेच्या कल्याणाकरिताच, आपली सत्ता उलथून पाडण्याचे सारे प्रयत्न हाणून पाडण्याचा हिंदुस्थान सरकारचा निर्धार आहे. हें धोरण सौम्य मार्गांनी आणि तडजोडीच्या उपायांनी यशस्वी झालें नाही, तर अधिक कडक उपायांचा अवलंब करताना राजनिष्ठ प्रजेचें आम्हांला पाठबळ आणि सहकार्य लाभेल, असा विश्वास वाटतो.

देशद्रोह्यांच्या साहाय्याची आवश्यकता

भारतीय जनतेत राजद्रोह पसरून सरकारचें कार्य दुर्घट होऊं नये, यासाठी सरकार गोखलेपक्षाच्या केवळ सदिच्छेवर अवलंबून होतें, असें नव्हे. सरकारला त्या पक्षाच्या सक्रिय राजनिष्ठेचीही आवश्यकता होती. असल्या सक्रिय अथवा क्रियाशील राजनिष्ठेचा गोखल्यांनी आपल्या भाषणांतून पुरस्कारही चालविला होता. वर उल्लेखिलेल्या सरकारी परिपत्रकात राजप्रतिनिधींनी सर्व जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांना आपल्या क्षेत्रांतील वजनदार व्यक्तींना उदासीनतेचे धोके दाखवून देऊन त्यांना क्रियाशील राजनिष्ठ बनण्याला प्रवृत्त करावें अशी आज्ञा केली आहे :

Such individuals should be urged to assist not only by furnishing information themselves, but also by inducing unwilling witnesses to give evidence.

अशा वजनदार व्यक्तींनी स्वतः सरकारला त्याच्या शत्रूंची सारी माहिती पुरवावी, इतकेंच नव्हे तर अशी माहिती पुरविण्याला अनुत्सुक असलेल्या व्यक्तींचीं मनें वळवून त्यांना क्रियाशील राजनिष्ठ बनवावें. अशा प्रकारे परकी सरकार चहाडखोरांवर पुष्कळ अंशी अवलंबून असलें आणि टिळकांच्या 'पुनश्च हरि ओम्' या लेखावर टीका करताना 'सुधारक'कारांनी (सी. ग. देवधर, वासुदेव बळवंत पटवर्धन) चहाड्या करण्याच्या आपल्या जन्मसिद्ध अधिकारांचें आवेशाने समर्थन केलें असलें तरी 'केसरी' आणि 'काळ' यांच्या संयुक्त प्रचाराच्या प्रभावामुळे म्हणा, अथवा क्रांतिकारक पक्षाच्या दहशतीमुळे म्हणा, आपल्या प्रतिपक्ष्यांच्या पत्रांतील आक्षिप्त लेखांचीं तातडीने भाषांतरें करून सरकारला पुरविणें आणि त्यांच्यावर तातडीने अभियोग भरण्याचें काम सुकर करणें, या कर्तव्याकडे त्यांनीं बरेंच दुर्लक्ष केलें असावें असें दिसतें. कारण १९०० च्या जूनमध्ये मुंबई सरकारने 'काळ' पत्रावर खटला भरण्याला अनुज्ञा मागितली असता, केंद्र सरकारने आक्षिप्त लेख ९ मार्चचा असताना मुंबई सरकारने हें प्रकरण २९ एप्रिलपर्यंत सरकारी विधिविशारदांकडे कां पाठविलें नाही आणि त्याने लगेच दुसरे दिवशी आपला अभिप्राय दिला असताना ६ जूनपर्यंत मुंबई सरकारचा निर्णय कां झाला नाही, यानिमित्त त्या सरकारला दोष लावून इतक्या उशिराने खटला भरावयास अनुज्ञा देण्याचें नाकारलें.

परांजप्यांवर शस्त्र उचला, गोखल्यांना बरें वाटेल !

'काळा'वर राजद्रोहाचा खटला भरण्याची मागणी हिंदुस्थान सर-

कारने एकवार फेटाळली असली तरी शिवरामपंत परांजप्यांना खोड्यात अडकविण्याचा मुंबई सरकारचा कृतनिश्चय होऊन चुकला असल्याने १९०३ आणि १९०४ या वर्षांतील एकंदर १५ लेखांचीं भाषांतरें करून तीं सरकारी विधिविशारदांपुढे मुंबई सरकारने ठेविलीं. या लेखांपैकी 'सेंट डॉमिंगो येथील एक रात्र' 'आपल्या वडील बंधूंची मातृभक्ति' 'जुनीं मढीं आणि नवीं अंतःकरणें,' 'जगाच्या उच्च रंगभूमीवरील नीच कृत्य,' 'फितुरी,' 'शिवाजीचें पुण्याहवाचन,' आणि 'प्लेहे' हे लेख 'काळाच्या सहाव्या आणि सातव्या खंडांतून आज वाचावयाला मिळतात. सरकारी विधिविशारदांना हे लेख आक्षेपार्ह वाटले तरी 'काळ'कर्त्यांच्या अनेकार्थी भाषेमुळे न्यायालयात ते शिक्षेला पात्र ठरतीलच, असा त्यांना भरंवसा वाटेना. अशा अडचणीत मुंबई सरकारचे एक कार्यवाह हिल्ल (पुढे सर क्लॉड हिल्ल) यांनी राज्यपालांना सुचविलें की आपण यातील काही लेख मुंबईतील एखाद्या प्रमुख इंग्रजी दैनिकात छापून घेऊन त्या दैनिकाच्या संपादकांना त्या लेखांवर कडक टीका करण्याला प्रवृत्त करावें. या सूचनेप्रमाणे हिल्ल यांनी १०-७-१९०४ या दिवशी 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्राचे गर्विष्ठ संपादक लॉव्हॅट फ्रेझर यांच्याकडे 'काळा'तील आक्षिप्त लेखांचीं भाषांतरें पाठवून त्यांच्यावर कडक टीका करण्याची त्यांना विनंती केली. हें पत्र असभ्य भाषेत लिहिलें असलें तरी त्याच्या ऐतिहासिक महत्त्वामुळे आणि राष्ट्रीय पुढाऱ्यांना इंग्रज अधिकारी करीत असलेल्या गालिप्रदानाचा नमुना म्हणून त्याचें अवतरण घेणें भाग आहे.

My proposal was that the 'Times of India' or some prominent English paper might take up and reproduce prominently the articles of this stamp which are published by the 'Kal' and comment upon them. Paranjape, himself a miserable little cur, imagines he can publish this kind of thing (as he frankly admits because it pays). Paranjape would be terrified if he found that his outpourings were noticed in this way and if he felt that light was being thrown on his articles. On the other hand, the majority of moderates—Gokhale and so forth—would welcome such exposure, for Paranjape's writings bring disrepute upon the Moderate party.

'काळ'पत्र हें मवाळ पक्षाच्या मुळावर आलें असल्याने 'टाइम्स'कारांनी त्याच्यावर शस्त्र उचललें म्हणजे गोखले आणि त्यांचे अनुयायी या कृतीचें स्वागत करतील, आणि उलटपक्षी अशा प्रकारें पर्यायाने का

होईना, सरकारने डोळा वटारल्याने 'काळ'कर्ते भिऊन जातील, असा वरील उताऱ्याचा सारांश आहे. विरोधी पक्षाच्या आक्षेपार्ह लेखांचीं भाषांतरें छापून त्याचा काटा काढण्याचा सरकारला आग्रह करण्याच्या व्यवसायात 'टाइम्स'सारखा प्रबळ साथीदार मिळालेला पाहून गोखले-गटाला आनंद होणें स्वाभाविकच आहे. ही गोष्ट सरकारी अधिकारी आणि टिळकांचे मेळेवाले या उभयतांनाही सारखीच सुविदित होती. उभयतांच्यामध्ये भेद इतकाच होता की, सरकारी अधिकाऱ्यांची गालि-प्रदानप्रचुर पत्रें अज्ञात रहात आणि मेळेवाले आपल्या भावना रांगड्या पदांतून प्रभावीपणाने प्रकट करीत. गोखलेनिंदेचीं मेळ्यांतील सर्वांत प्रसिद्ध पदें हीं टिळक मंडालेला गेल्यानंतर गणेशोत्सवातून म्हटलीं गेलीं. पण विठ्ठलराव घाटयांसारखे साहित्यिक कालातीत असल्याने त्यांनी तींही पदें टिळकांच्या देखत म्हटलीं गेल्याचा चुकीचा उल्लेख केला आहे. टिळक पुण्यात असताना म्हटलेल्या पदांशी आपला काहीही संबंध नाही, असें त्यांनी प्रसिद्ध केल्याचा एक उल्लेख घाटयांनीच केला आहे. तें कसेंही असो. गोखल्यांची निंदा करण्याचीं पदें टिळकांच्या संमतीने रचलीं किंवा म्हटलीं नसलीं तरी त्या पदांतील निंदा सत्यावर आधार-लेली होती, हें तत्कालीन गुप्त पत्रांवरून सिद्ध होत आहे.

कर्झनवधाची सूचना

हिल्ल यांचें वर उल्लेखिलेलें पत्र १०-७-१९०४ या दिवशी लिहिलें असलें तरी लोव्हॅट फ्रेझर या टाइम्सच्या तत्कालीन संपादकांनी सप्टेंबर-पर्यंत तिकडे दुर्लक्षच केलें. पण सप्टेंबर २ च्या अंकात काळकर्त्यांनी प्लेव्हे आणि कर्झन यांच्यावरील सुप्रसिद्ध लेख प्रसिद्ध करून साऱ्या शत्रुमित्रांना आपल्याकडे दुर्लक्ष करणें अशक्य करून सोडलें. त्यानंतर सिमल्याहून हिंदुस्थान सरकारनेच मुंबईसरकारला पुढील पत्र लिहिलें :

I am desired to invite attention to an article which appeared in the 'Kal' of 2nd September last, instituting a comparison between M. de Plehve and Lord Curzon. The article in question makes the broad statement "that political murders are not like the common murders for which offenders are tried in judicial courts every day." They are declared to be laudable and to be as it were "the terrible and deafening cry uttered by the oppressed masses when the rich and the great are plunged in all sorts of gaities and have no time to listen to the grievances of the poor." Such murders are perpetrated for the good of the world. It proceeds to state that murders are unnecessary in a free

country, but that Russia is a country, favourable to revolutionary propaganda and as revolutionary measures are extremely popular with the middle class in Russia, there is considerable unrest there. The article then turns to Lord Curzon and after quoting from an " open letter to Lord Curzon" which appeared in the paper '*India*' (12 August) it proceeds to observe (a) that in spite of the unwillingness of the people of India, Lord Curzon has determined to return to this country to promote its welfare, (b) that the list of grievances specified in the open letter is certainly much longer than the list of M. de Plehve's acts specified in the manifesto of the Central Committee of the socialists. ...It appears to the Government of India, that the article was intended as a direct instigation to the assassination of Lord Curzon. While they recognize the undesirability of attracting public attention to the fact that the idea of assassination has been mooted at all, they feel that it is impossible to ignore the numerous threats or suggestions as contained in the article referred to.

या महत्त्वाच्या पत्रात हिंदुस्थान सरकारने परांजप्यांच्या लेखाची जी चर्चा केली आहे, ती अगदीच तांत्रिक आहे. प्लेव्हेंच्या वधासंबंधी 'काळ'कर्त्यांनी लिहिलें होतें, 'जग हें जें परमेश्वराचें विराट् शरीर, तें सर्व शरीर दोषी संसर्गाने येथून तेथून नासून जाऊ नये म्हणून आपल्या विषाने त्या शरिरातील इतर अवयवांना असह्य वेदना देणारा असा जो अवयव, तोच छाटला जावा, असा असल्या वधातील उदात्त हेतु असतो. परमेश्वराच्या विराट् शरीराला अपकार झाला असता त्याला उपकार करण्याचा हा एक वैद्यकीय उपाय आहे. जेव्हा सर्व बड्या लोकांचे कान नाच, तमाशे, गाणीं यांनी वधिर झालेले असतात आणि दीनांचीं गाऱ्हाणीं ऐकण्याला कोणालाच सवड नसते, त्या वेळी सगळ्या जगाच्या कानठळ्या बसून जातील, अशी छळाने गांजलेल्या लोकांची ही एक भयंकर किंकाळी होय. यात झाकून ठेवावयाचें असें काहीच नसतें. असलीं कृत्यें जगाच्या कल्याणासाठी असतात आणि तीं करताना जरी गुप्त असलीं तरी तीं केल्यावर प्रांजलपणे सर्व जगाच्या पुढे ठेवण्यात येतात.' 'असें करण्यात एक प्रकारचें शिक्षण आहे.' या लेखात पुढे प्लेव्हेंच्या दुष्कृत्यांची मालिका प्रसिद्ध करून त्यांचें आख्यान संपविलें होतें आणि 'आता आपण कर्झन साहेबांच्या आख्यानाकडे वळू,' असें सांगून तत्कालीन मवाळ कॉंग्रेसच्या वतीने लंडन येथून निघणाऱ्या

'इंडिया' या नियतकालिकात त्याच वेळी प्रसिद्ध झालेल्या एका प्रबंधाच्या आधारे लॉर्ड कर्झन यांच्या राजवटीचें समालोचन केलें होतें. आणि 'असले राजप्रतिनिधि पुन्हा एकदा हिंदुस्थानात येणार ही गोष्ट सहन करण्याला येथील लोकांनी कसें सिद्ध व्हावें,' असा प्रश्न विचारला होता. या लेखामुळे सरकारी गोटात फारच खळबळ होऊन सरकारच्या तातडीच्या विनंतीवरून 'टाइम्स'कारांनी या लेखाचें भाषांतर प्रसिद्ध करून 'काळ' पत्र लॉर्ड कर्झन यांचा वध करण्याला चिथावणी देत असल्याने सरकारने त्यावर तत्काळ खटला भरावा अशी मागणी केली. त्या वेळी प्रयागच्या 'पायोनियर' पत्राने म्हटलें होतें :

Kal is possibly the first Indian paper which has unequivocally and publicly commended political assassination.

म्हणजे आपल्या लेखनात कसलीही अस्पष्टता न ठेवता प्रकटपणे राजकीय वधाची प्रशंसा करणारें काळ हेंच पहिलें भारतीय पत्र दिसतें. याप्रमाणे टाइम्स आणि पायोनियर यांनी गरळ ओकल्यानंतर टिळकांनी मराठी 'काळ' आणि इंग्रजी 'काळ' (टाइम्स) यांची तुलना करून २७-९-१९०४ चा 'केसरी'चा संपूर्ण अंक काळकर्त्यांचें समर्थन करण्याला वाहिला होता. त्यात काळातील लेख उतरून घेऊन त्यावरील टाइम्सची टीकाही समग्र दिली होती. त्याच वेळी इंग्लंडात हाइंडमन यांनी इंग्लंडातील 'जस्टिस' पत्रात 'काळा'तील टीकेपेक्षा किती तरी अधिक कडक टीका लॉर्ड कर्झन यांच्यावर केली होती, तीही उतरून घेतली होती. राजकीय वधाला चिथावणी देण्याचा आरोप लंडन येथील 'ग्लोब' आणि मुंबईचा 'टाइम्स' यांनी स्वत: टिळकांवर केला असता, ग्यांना १८९९ मध्ये कशी क्षमायाचना करण्याची पाळी आली होती, याची आठवण देऊन असली चूक सरकारने आता करू नये, असें सांगून तो विषय संपविला होता. या लेखामुळे एकट्या काळकर्त्यांवर खटला भरणें सरकारला अशक्य झालें. कारण तो लेख 'केसरी'ने उतरून घेऊन स्वत:-वरही खटला भरण्याचें सरकारला आव्हान दिलें होतें. अशा वेळी टिळक आणि गोखले यांच्या तुलनेचीं काही पदें मेळेवाल्यांनी म्हटलीं तर तेवढ्यावरून खऱ्या पाप्यांना सोडून टिळकांना निष्कारण पापी ठरविणाऱ्यांना सारासार विवेक नाही, एवढेंच म्हणून हा विषय सोडून देणें इष्ट आहे.

कर्झन पत्नीच्या दुखण्याने खटला स्थगित

या वेळी ताईमहाराज प्रकरणातून टिळक नुकतेच निर्दोष सुटले

होते. असें असूनही लगेच 'काळ'कर्त्यांच्यासह राजद्रोहाच्या अथवा राजकीय वधाला उत्तेजन देण्याच्या आरोपात स्वतःला अडकवून घेण्याची मनाची सिद्धता करणें हें त्यांच्या अलौकिक धैर्याचें एक निर्विवाद प्रमाणच आहे. त्या लेखाच्या निमित्ताने 'काळ' आणि त्याचें पुनर्मुद्रण करणारा 'केसरी' यांच्यावर खटला न भरण्याचीं कारणें सरकारी पत्रव्यवहारांतून आता प्रसिद्ध झालीं आहेत. वर उतरून घेतलेल्या हिंदुस्थान सरकारच्या पत्रात 'काळ'कर्त्यांनी उघड उघड कर्झनवधाला चिथावणी दिली आहे, असें सरकारचें मत आहे, असें स्पष्ट सांगितलें असून कर्झनवधाची चर्चा चालू असल्याचा बभ्रा देशात होणें अनिष्ट असलें तरी असल्या लेखासारखे लेख देशात प्रसृत होण्याच्या धोक्याचा विचार करून लेखकांना शासन करणें आवश्यक आहे, असा अभिप्राय व्यक्त केला होता. या पत्राला उत्तर देताना हिल्ल यांनी कळविलें की 'काळ'कर्त्यांनी प्लेव्हे आणि कर्झन यांची तुलना अतिशय कुशलतेने केली असल्याने त्या लेखाच्या जोडीला अन्य काही लेखांवरही आरोप ठेवल्यावाचून परांजप्यांना शिक्षा व्हावयाची नाही. त्यावर केंद्र सरकारच्या वतीने हर्बर्ट रिस्ले यांनी लिहिलें :

I am to add that the postponement of Lord Curzon's return and the universal sympathy which, the cause of it has evoked, afford, in the opinion of the Government of India, strong additional reasons for not undertaking a prosecution with reference to the article of the 2 nd September.

पत्नीच्या दुखण्याने लॉर्ड कर्झन यांचें आगमन लांबलें असून त्यांच्याविषयी भारतातील जनतेने सरसकट जी सहानुभूति व्यक्त केली आहे, तिचा विचार केला असता 'काळ' पत्रावर कर्झनवधाच्या चिथावणीचा खटला भरू नये, असें सरकारचें मत आहे.

सरकारी भाषांतरें 'टाइम्स'ला पुरविलीं

वरील पत्रात हर्बर्ट रिस्ले यांनी सरकारी भाषांतरें 'टाइम्स'ला पुरविण्याची चूक मुंबई सरकारने केल्यामुळेही 'काळा'वर खटला करणें अशक्य झालें आहे, असा हिंदुस्थानसरकारचा अभिप्राय कळविला आहे :

A prosecution would have been highly inexpedient by the unfortunate circumstance that the leading article in the Times of India commenting on the utterances of 'Kal' was based on translations of the latter furnished by the Government of Bombay. The Native press has already drawn the obvious conclusion

that the editor of the Times of India was assisted by the Bombay Government in the preparation of the article in question ... and there can be little doubt that in the event of a prosecution, the point would be brought out and pressed home by the defence to the prejudice of the Government case.

दास्यकर्दमातील राजकारण

एखाद्या वृत्तपत्रावर सरकारने न्यायालयात अभियोग आणण्यापूर्वी स्वतःच त्याच्याविरुद्ध विरोधी वृत्तपत्रांतून प्रचार करून मग त्या पत्रकर्त्याला न्यायालयात खेचणें ही एक प्रकारची न्यायालयांची विटंबनाच आहे. कारण न्यायाधीशांकडे सोपविलेल्या प्रश्नांची सार्वजनिक रीत्या चर्चा करणें म्हणजे त्यांच्या अधिकारांचें अतिक्रमण करणें आणि त्यांच्याविषयी अविश्वास व्यक्त करणेंच होय. यासाठी सरकारला 'सुधारका' सारख्या घरभेद्या चहाड भाषांतरकारांची आवश्यकता होती. पण १९०४ च्या दिवसांत त्यांना १८९७ मधील आपला व्यवसाय पुढें चालविण्याचें धाडस आणि साहस उरलें नसावें. त्या काळीं टिळक आणि परांजपे यांच्यासारखे मराठी पत्रकारांचे मुकुटमणि आपल्या पूर्ण तेजाने झळकत असताना आपले देशद्रोही विषदंत व्यक्त करणें हें 'सुधारक'-कारांना जवळ जवळ अशक्यच झालें होतें. या दिवसांत देशद्रोही सुधारक पक्षाविषयी आणि 'सुधारक' पत्राविषयीही समाजात इतकी अप्रीति पसरली होती कीं, तें पत्र चालणेंच अशक्य झालें होतें. यामुळे 'सुधारका'चे संपादक हे त्या दिवसांत समानशील अशा स्वराज्यद्रोही श्रीमंतांच्याकडे आश्रयाची याचना करीत होते. यानंतरच्या दिवसांत 'सुधारक'कारांनी शाहू छत्रपतींच्याकडे उदार आश्रयाची याचना केली होती आणि तो त्यांना लाभलाही होता. असल्या याचक 'सुधारका'च्या अगदी उलट त्या दिवसांत 'टाइम्स'ची स्थिति होती. त्याच्या संपादकांनी आपल्यावर टीकास्त्र सोडू नये, याकरिता साऱ्या संस्थानिकांना त्या पत्राला आश्रय द्यावा लागे. एकट्या सयाजीराव महाराजांनी मात्र बडोद्यातील इतर खिचड्यांसह 'टाइम्स'ची खिचडीही बंद केल्यामुळे तें पत्र त्यांचे हाडवैरी बनलें होतें. असो, पुण्याची भूमिका घेऊन हें पापी पत्र तेव्हा पुण्यनगरीतील सर्वांत श्रेष्ठ संपादकद्वयांवर तुटन पडत असे. पण त्याला ही साधी गोष्ट कळत नव्हती की, देशाभिमानी प्रतिभासंपन्नांचा प्रभाव शासनामुळे वृद्धिगतच होतो आणि आपल्या निष्क्रियतेलाच राजकारणनैपुण्याचें स्वरूप देणारा नेमस्तांचा पक्ष अधिकाधिक निष्क्रिय बनून नष्ट होतो. सरकारजीवी नेमस्तांचें दुटप्पी वर्तन नित्य उघड्या

डोळ्यांनी पहात असताना औपरोधिक लेखन टाळणें हें परांजप्यांना अशक्यच झालें होतें. आणि स्वतःच्या औपरोधिक लेखनकौशल्यावर ते स्वतःच प्रेम करीत असल्यामुळे त्यांनी आपल्या साऱ्या प्रतिपक्षी लोकांचें शत्रुत्व संपादिलें होतें. हीच त्यांच्या संपादनकौशल्याची पराकाष्ठा आणि लेखनकौशल्याची परिसीमा होय. चिपळूणकर, टिळक, परांजपे यांच्या पैकी कोणीच आपल्या प्रतिपक्षी मंडळींवर सौम्य टीका करण्याकरिता सुप्रसिद्ध नव्हते. कारण शत्रूंशी युद्धें करावयाचीं, तीं निर्वाणीचीं युद्धें मानून निकरानेच करावीं लागतात. सध्याच्या हिंदुस्थानसरकाराप्रमाणे जें सरकार शत्रूंशी दयार्द्र बुद्धीने आणि कोमल मनाने युद्ध करतें तें सरकार वस्तुतः आपल्या प्रजाजनांच्या विरुद्ध पराकाष्ठेच्या निष्ठुरपणाने युद्ध करीत असतें. या उदाहरणावरून अनुभवाने शहाणपणा शिकणाऱ्यांना प्रतिपक्षी मंडळीवर केळकरांच्याप्रमाणे कोमल टीका करण्याचें अंतिम पर्यवसान कळून येईल. टिळकपरांजप्यांचे प्रतिपक्षी सुधारक, नेमस्त त्या दिवसांत देशभक्तांना अपरिहार्य अशी कोणतीहि कृति करण्याचें महान् संकट टाळून नुसता देशभक्तीचा देखावा करण्याकरिता आपली वरिष्ठ वर्गापुरती मर्यादित असलेली 'A pretty, tiny, witty charming, darling, little she' या मनोहर वर्णनाला सुपात्र अशी चिमुकली राष्ट्रीय सभा भरविण्याचे महान् कष्ट करीत असत. त्या राष्ट्रीय सभेत देशद्रोहाच्या असंख्य पापांची प्रौढी मिरविणारे सरकारी पदवीधर आणि स्वदेशापेक्षा स्वदोषांवर निष्ठापूर्वक प्रेम करणारे सुधारक जमत असत. जिकलेल्या लोकांनी सुखाच्या मागे लागणें म्हणजे स्वप्रयत्नाने पंकांत अधिकाधिक निमग्न होण्याचा विक्रम करणें होय, हें न ओळखणाऱ्या या सुखवादी सुधारकांनी समाजातील सर्व व्यक्तींना सुखसंशोधनाच्या निमित्ताने सर्व प्रकारचीं निषिद्ध कर्मं आणि पापें करण्याचे मार्ग मोकळे करून दिले होते. इंग्रजांच्या असत्पक्षाचें समर्थन करण्यासाठी सुधारकांना आवश्यक असलेला निगरगट्टपणा प्राप्त करून घेण्याकरिता ते 'सुधाकर' बनले होते. आपल्या निर्लज्ज वर्तनालाच ते ऋजुता हें नांव देत होते. देशभक्तीच्या पापाव्यतिरित इतर सर्व पापांना क्षमा करणारें सरकार हेंच या साऱ्या सुधारकांचें एकमेव आश्रयस्थान बनलें होतें. असल्या अपराधी, पापी सुधारकांना आश्रय देणारें सरकार त्यांच्याहून अधिक अपराधी आणि पापी होतें हें सांगावयाला नकोच. कारण अपराधी आणि पापी सरकारालाच समाजबाह्य जनांच्या राजनिष्ठेच्या आश्रयाची आवश्यकता भासते. त्याच्या उलट चांगल्या राज्यकर्त्यांना समाजातील नीतिनिष्ठांच्या

राजनिष्ठेचा लाभ सहजगत्याच होत जातो. असे चांगले राजे केवळ सुदैवी प्रजेलाच लाभतात. पण टिळक परांजप्यांच्या काळी भारतीय प्रजा इतकी सुदैवी नसल्यामुळे त्या प्रजेला आपले राजे नसले तर निदान राजप्रतिनिधि तरी परलोकी पाठविण्यासाठीं प्रयत्न करावेसे वाटत असे.

अस्थायी राजप्रतिनिधि अँप्टहिल्ल यांचें पत्र

'काळ'कर्त्यांनी प्लेव्हे आणि कर्झन यांची तुलना केल्यानंतर तेव्हा अस्थायी राजप्रतिनिधि असलेले लॉर्ड अँप्टहिल्ल यांनी भारतसचिवांना लिहिलेलें पत्र 'मोर्लेमिटोंच्या राजवटीतील भारत' या डॉ. एम्. एन्. दास यांच्या ग्रंथात प्रसिद्ध झालें आहे.

There was an outrageous article in the Kal, a seditious Bombay newspaper hinting broadly at assassination by drawing an invidious comparison between the grievances of Indians and the grievances of Russians which led to the murder of Mon Plehve. I am afraid that the Indian penal code does not provide against criminal suggestions of this kind. It only contemplates acts which might bring the Government as a whole into hatred and contempt.

'काळ' नांवाच्या मुंबई प्रांतातील एका राजद्रोही वर्तमानपत्रात प्लेव्हे आणि कर्झन या उभयतांनी अनुक्रमे रशिया आणि हिंदुस्थान येथील प्रजेचा जो 'छळ' केला होता, त्याची तुलना करून कर्झन यांच्या वधाला चिथावणी देणारा एक अत्याचारप्रवर्तक लेख प्रसिद्ध झाला आहे. पण भारतीय दंडविधानाच्या कक्षेत तो बसत नाही, अशी मला भीति वाटते. पण १९०४ मध्ये इंग्रज राज्यकर्त्यांना ही जी भीति वाटू लागली, तशी भीति चार वर्षांपूर्वी त्यांना वाटत नव्हती. १९००च्या डिसेंबरमध्ये भारतसचिव लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनी दादाभाईंना लिहिलें होतें,

You seem to think that a free press means that pressmen are free from the restraint of the ordinary law of the land and at liberty through their news-papers to advocate assassinations, outrage and racial distrurbance and riot. For these offences alone have prosecutions been instituted.

वध, अत्याचार, जातीय दंगे अशांसारख्या अपराधांना उत्तेजन देणाऱ्यांवरच तेवढे आम्ही खटले भरतो.

प्लेव्हेवधाचा अप्रत्यक्ष परिणाम

परांजप्यांच्या प्रभावाने प्लेव्हे यांच्या वधाची कथा टिळकयुगाच्या

इतिहासात चिरंतन झालेली पाहून रशियाचे शेवटचे झार निकोलस यांच्या वैयक्तिक संरक्षणविभागाचे प्रमुख सेनापति अलेक्झांडर स्पिरिडोव्हिच यांनी लिहिलेल्या रूसी क्रांतिकारकांच्या इतिहासातील त्यांच्या वधाचा अध्याय वाचून पाहिला. तो वाचून आपल्या देशातील कर्झनवधाच्या प्रयत्नांची कींव आल्यावाचून रहात नाही. कारण प्लेव्हे यांच्या वधासाठी सरासरी पंचवीस रूसी क्रांतिकारक निदान अर्धवर्ष तरी अविश्रांत झटत होते, तरी दोन वेळा प्रयत्न फसून सरतेशेवटी १५-७-१९०४ या दिवशी त्या कुप्रसिद्ध प्रधानाचा वध झाला. त्या क्षणी स्वित्झर्लंडमध्ये रूसी क्रांतिकारकांची एक परिषद भरली असताना तिथे अकस्मात् ही वार्ता येऊन पोचल्यानंतर परिषदेतील कामकाज विसरून सभासदांनी आपला आनंद व्यक्त करण्याकरिता एवढा मोठा दंगा केला की त्या तटस्थ राष्ट्राच्या रक्षकांनीसुद्धा ती परिषद मोडून टाकली. ही अवांतर गोष्ट झाली. इथे सांगावयाची महत्त्वाची गोष्ट ही की प्लेव्हे-वधानंतर रशियन क्रांतिकारकांनी आपली रसायन प्रयोगशाला पारी नगरीत आणली. ही प्रयोगशाला श्वाइत्झेर यांच्या विऱ्हाडी असून तेथेच रूसी क्रांतिकारकांतील कृतिसमितीचे कार्यकर्ते अग्निगोलांचा अभ्यास करीत असत. प्रिन्स क्रोपाट्किन यांच्या ओळखीने बापटांचा या क्रांतिकारकांशी परिचय झाला. सेनापति लिहितात, "ठेंगणा, रुंद बांध्याने, दाढी स्वच्छ रुळे उरी । वृद्ध तो युवका ऐसा, उत्साहें करि चाकरी ॥ शिपी आचार्य तिसरा प्रतिसंहारकाग्रणी । तेणें आम्हांसी दिधली गोलकृति पुस्तिका । रूसी ती हस्तलिखिता सुटचा तद्गतपत्रिका ॥" श्वाइत्झेर आणि प्रिन्स क्रोपाट्किन या उभयतांच्याप्रमाणेच बोल्शेव्हिक पक्षाचे एक सभासद पाव्हलोव्हिच (व्हेल्टमान) यांच्याशीही बापट आणि हेमचंद्र दास यांचा संबंध आला होता. बापटांच्या लेनिनभक्तीचें मूळ या परिचयातच असावें. 'Revolutionary Silhouettes in India in struggle for Independence' या १९२५ मध्ये मॉस्को येथे प्रसिद्ध झालेल्या गुर्कोक्रुझिन आणि व्हेल्टमान यांच्या पुस्तकाचा संदर्भ रूसी निबंधकारांनी ३०६ पानावर दिला आहे. भारत स्वतंत्र आणि समाजवादी बनल्यावाचून जगावर समाजवादाचा प्रभाव पडणार नाही, या भावनेने प्रेरित होऊन वर उल्लेखिलेले रशियन क्रांतिकारक भारतीय क्रांतिकारकांना इतिहास, समाजशास्त्र, धर्म इत्यादि विषयांसह समाजवाद आणि युद्धशास्त्र यांचेही धडे देत असत. यांच्या शिक्षणाचें दृश्यफल म्हणजे क्रांतिसंघटनेचीं मूलतत्त्वें नांवाची पुस्तिका दास आणि बापट यांनी भारतात आणली, हेंच होय.

◆ ◆ ◆

प्रकरण बारावें

सयाजी महाराज आणि टिळक

राजद्रोहाचें 'सूत उवाच'

सयाजी महाराजांवरील राजद्रोहाच्या आरोपांचें 'सूत उवाच' अरविंदबाबूंनी १८९३ मध्ये बडोदें संस्थानच्या सेवेत प्रवेश केला, तेव्हापासूनच झालें होतें. इतिहासकार सरदेसायांनी सयाजी महाराजांच्या सहवासातील आपल्या आठवणींचा जो ग्रंथ लिहिला आहे, त्यात महाराज इंग्रजांशी विद्रोह करतात, हा आरोप आणि त्याचा आंग्ल-भारती वर्तमानपत्रातील प्रचार कर्झनशाहीच्या उद्दामपणातून उद्भवला असा स्वतःचा अभिप्राय व्यक्त केला आहे. पण महाराज राजद्रोही असल्याचा आरोप कर्नल बिडुल्फ यांनी १८९५ मध्येच केला होता. पण त्या दिवसांत सरदेसाई गायकवाडांच्या सेवेत नसल्याने त्याचा त्यांना वास आला नसेल. बाबू अरविंद घोष, त्यांचे परमस्नेही खासेराव आणि माधवराव जाधवबंधु आणि बॅ. केशवराव देशपांडे या सयाजी महाराजांच्या सेवेतील चार वरिष्ठ अधिकाऱ्यांवर इंग्रजांच्या कंटकसंशोधन विभागाची वक्रदृष्टि फारा दिवसांपासून होती. अरविंद बडोद्याच्या महाविद्यालयात आचार्य असले तरी त्यांच्या इंग्रजीतील नैपुण्यामुळे आणि परीक्षेतील यशामुळे महत्त्वाच्या लेखनाच्या कामांसाठी महाराज त्यांना बोलावून घेत. मुख्यतः कर्झनच्या राजवटीत महाराजांचे हिंदुस्थान सरकारशी जे वाद चालू असत, त्यांतील बरेचसें लेखन अरविंदांच्यासारख्या इंग्रजद्वेष्टयांच्या हातचें असल्याने राजप्रतिनिधींनी महाराजांवर राजद्रोहाचा आरोप करणें अगदी स्वाभाविक होतें. खरें म्हणजे घोष आणि गायकवाड या दोन उपनामांचा अर्थ एकच असल्यानें, या उभयतांचे परस्परसंबंध 'सुवर्ण करीं सुवर्णकंकण । कोण कुणाचें सांगा भूषण ?' यासारखेच होते. यामुळे या द्वंद्वापैकी एकाने दुसऱ्याला राजद्रोही बनविलें, असा आळ घेण्याचें काहीच कारण नाही.

भगिनी निवेदिता यांचा सयाजीमहाराजांना उपदेश

महाराज आणि अरविंद यांचें संगनमत असल्यामुळेच एकदा

भगिनी निवेदिता यांना महाराजांची भेट घेऊन त्यांना क्रांतीचा उपदेश करता आला. निवेदिता यांच्या कार्यासंबंधी बोलताना अरविंदांनी पुढील उद्‌गार काढले होते.

She was one of the revolutionary leaders. She went about visiting places and contacting people. She was open, frank, talked openly of revolutionary plans to everybody. There was no concealing on her part. She went about among the Thakurs of Rajputana preaching revolution. Once she came to Badoda to persuade the Gaekwad to support the secret revolutionary party. She told him, if you have anything more to ask, you may ask Mr Ghosh.

निवेदिता या क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यांपैकी होत्या. सर्वत्र संचार करून त्या लोकांशी संबंध जोडीत आणि त्यांना उघडपणे क्रांतीचा उपदेश करीत. राजपुतान्यांतील ठाकूर मंडळींना त्यांनी क्रांतीचा उपदेश केला होता. एकदा बडोद्याला येऊन त्यांनी स्वतः महाराजांनाच क्रांतिकारकांच्या समितीला साहाय्य करण्याचा उपदेश केला आणि शेवटी सांगितलें की आपल्याला आणखी काही माहिती हवी असल्यास ती घोष महाशयांना विचारा.

टिळकांचा सयाजीमहाराजांशी परिचय

अरविंद बडोद्यास आले, त्याच वर्षी टिळकांचा महाराजांशी परिचय झाला. टिळकांच्या वडिलांचे आणि त्यांचे स्वतःचे एक ज्येष्ठ स्नेही बापूसाहेब आठल्ये हे बडोद्यात न्यायाधीश झाल्यानंतर त्यांनी तेथील श्रावणमासदक्षिणेच्या निधीतून धर्मशास्त्रातील अवघड प्रश्नांवर प्रबंध मागवून आणि शास्त्री लोकांकडून त्यांची परीक्षा करून त्यांना पारितोषिकें देण्याची एक योजना महाराजांच्या कडून करविली होती. या स्पर्धेसाठी टिळकांनीही एक प्रबंध लिहून पारितोषिक मिळविलें होतें. त्यांच्या प्रबंधाचे परीक्षक राजारामशास्त्री बोडस आणि बाळशास्त्री आगाशे हे होते. या प्रबंधाचें हस्तलिखित बडोदें आणि पुणें या दोन ठिकाणी कुठेतरी उपलब्ध व्हावें. असो. या योजनेप्रमाणेच बडोदें संस्थानच्या वतीने फ्रान्सजर्मनीसारख्या देशांतून बुद्धिमान् तरुण पाठवून त्यांनी व्यापार आणि राजकारण यांची विशेष माहिती मिळवावी, अशीही एक योजना आठल्यांनी महाराजांच्याकडून संमत करून घेतली होती. तिला अनुसरून गज्जर यांना व्यापार आणि टिळक यांना राजकारण यांचें समक्ष ज्ञान करून घेण्यासाठी पाठवावें, असें ठरलेंही होतें. पण हा संकल्प तसाच राहून गेला. १८९३ मध्ये बापट प्रकरण उपस्थित

होण्यापूर्वी टिळक बडोद्याला गेले होते. तेव्हा आठल्यांनी महाराजांविरुद्ध बडोद्यात चाललेल्या कारस्थानांची आणि शेतसारा ठरविण्यात येणाऱ्या विघ्नांची माहिती टिळकांना सांगितली. त्यामुळेच टिळकांनी बापटांचें आणि त्यांच्यासहच महाराजांच्या राज्यकारभाराचें समर्थन करण्याकरिता आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. याच दिवसांत केव्हा तरी दादाभाई नौरोजींच्या सांगण्यावरून महाराजांनी टिळकांना बोलावून घेऊन त्यांची ओळख करून घेतली. महाराजांनी टिळकांच्या आठवणी सांगताना म्हटलें आहे. "पुण्यात टिळक आम्हांस भेटले, त्या वेळी ते मुंबईच्या विधिमंडळाचे सभासद होते. आम्ही त्यांना विचारिलें, 'आपण ग्रंथलेखन कां करीत नाही? निदान काही थोर संस्कृत अथवा इंग्रजी ग्रंथांचे अनुवाद तरी आपण करावेत." तेव्हा टिळकांनी उत्तर दिलें की, मी राजकारणात पडल्यामुळे या कामास वेळ फार थोडा मिळतो, तरी पण आपली सूचना मी अवश्य कृतीत आणीन. त्यावर आम्ही त्यांस म्हटलें, 'आपण आर्यनीतिमीमांसेवर माहिती एकत्र करावी, अशी आमची इच्छा आहे.' त्यावर टिळक बोलले की त्यासंबंधी काही माहिती मी जमविली आहे आणि आणखीही मिळवीत आहे, या विषयावर ग्रंथ लिहावयाचाच माझा विचार आहे.' हें ऐकून आपण असा ग्रंथ लिहिण्यास पात्र आहात, असें आम्ही त्यांना सांगितलें.' गीतारहस्याला टिळकांनी Hindu Philosophy of Life, Ethics and Religion हें जें नांव दिलें, त्याचें बीज वरील संवादात दिसून येतें. गीतारहस्य लिहून झाल्यानंतर टिळकांच्या मनात सुटकेनंतर जर्मनीला जाण्याचा विचार घोळत होता. या विचाराचें बीजही टिळकांना जर्मनीला पाठविण्याच्या महाराजांच्या जुन्या योजनेतच पेरलेलें होतें. टिळकांच्या सुटकेनंतर लौकरच दुसरें महायुद्ध चालू झालें नसतें तर ते जर्मनीला गेलेही असते आणि त्यामुळे भारतीय राजकारणाला क्रांतिकारक कलाटणी मिळाली असती. मार्सेइ येथे निसटून जाण्यात सावरकरांना आलेलें अपयश आणि टिळकांच्या जर्मनीला जाण्याच्या संकल्पात आलेलीं विघ्नें, यांचा भारतीय राजकारणावर अतिशय अनिष्ट परिणाम झाला आहे. असो. एक तत्त्वज्ञानाचे अभ्यासक या नात्याने टिळकांकडे पाहणारे महाराज त्यांना क्रांतिकारकांचे पुढारी म्हणून कधीपासून ओळखू लागले, हें निश्चितपणे सांगता येत नाही. ग्वाल्हेरच्या माधवराव महाराजांच्या चरित्रकारांनी सयाजीराव महाराजांसंबंधी पुढील उल्लेख केला आहे:

He had sought to study the psychologies of Indian Mazzinis and understand their idealistic aspirations.

म्हणजे भारतीय माझिनींच्या मनोभूमिकांचा अभ्यास करण्याचा महाराजांनी प्रयत्न केला आणि त्यांच्या ध्येयवादी आकांक्षा त्यांनी समजून घेतल्या.

इंग्रज राजदूतांचें दुर्वर्तन

टिळकांचा बडोद्याच्या राजकारणाशी प्रत्यक्ष संबंध १८९४ पासून आला. या वेळी कर्नल बिडुल्फ हे इंग्रज सरकारच्या वतीने सयाजीराव-महाराजांच्या सासूचें काम करीत होते. महाराजांच्या राजवटीत प्रथम प्रथम नेमलेले राजदूत हे वस्तुस्थिति जाणण्याची शक्ति आणि थोर लोकांना हाताळण्याची कला या दोन महत्त्वाच्या गुणांत उणे होते, असें स्वतः लॉर्ड हार्डिंज यांनी महाराजांविरुद्ध केलेल्या आरोपपत्रकात म्हटलें आहे.

Though we admit that his education by Mr. Elliot was far from satisfactory and that the Residents who from time to time have been posted to Badoda may not always have been conspicuous for tact and Judgement, yet it is significant that all these officers, men differing widely one from another, in character and ability, have formed the same conclusion as regards the Gaekwad and all with one exception have found him impossible to deal with, suspicious, parsimonious, and insincere, bitter against the Government of India, in proportion as they thwarted the attainment of his ideal of perfect independence. Colonel Biddulf indeed charged the Gaekwad with being disloyal both in thought and action. It may also be true that prior to 1905 there was a tendency to intervene over much in Badoda affairs.

या अवतरणावरून इंग्रजांचे राजदूत बडोद्याच्या कारभारात निष्कारण नाक घालीत आणि स्वातंत्र्यप्रिय महाराजांना नेहमी त्यांच्याशी टक्कर घेण्याला सिद्ध रहावें लागे, या गोष्टी सुस्पष्ट होतात. महाराजांना अधिकार मिळाल्यानंतरचे राजदूत कर्नल बिडुल्फ यांनी तर महाराज राजद्रोही असल्याचा सुस्पष्ट आरोप केला होता.

महाराजांविरुद्ध प्रचार

या बिडुल्फ महाशयांनी इंग्रजांच्या नेहमीच्या भेदनीतीला अनुसरून बडोद्यात गुजराथी विरुद्ध दक्षिणी हा वाद चेतवून दिला. सार्जंट यांच्या 'बडोद्याचा राज्यकर्ता' या ग्रंथात महाराजांनी काजी शहाबुद्दीन यांना लिहिलेल्या पत्रात गुजराथी पत्रांतून मुख्य प्रधान मणिभाई तेवढे



बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड

चांगले असून आपण मात्र वाईट लोकांच्या सांगण्यावरून न्यायाच्या कामात अडथळे आणीत आहोत, असा प्रचार असल्याचा उल्लेख आला आहे. (पान ९५) दक्षिणी पक्षाचा म्हणजे पर्यायाने महाराजांचाच काटा काढण्याकरिता कर्नल बिडुल्फ यांनी मणिभाईंच्या साहाय्याने महाराजांचे राजगुरु मि. इलियट यांच्या हाताखालील प्रमुख अधिकारी रावसाहेब बापट यांच्यावर लाच खाल्ल्याचा आरोप ठेवून १८९४ मध्ये त्यांची चौकशी आरंभिली. यापूर्वीच महाराजांची आणि टिळकांची ओळख झाली होती आणि महाराजांविरुद्ध कारस्थानें करणाऱ्यांचें लक्ष्य बनलेले बापट हे तर टिळकांचे महाविद्यालयापासूनचे स्नेही होते. त्यामुळे त्यांचें संरक्षण करण्यासाठी टिळकांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या प्रकरणात टिळकांना बहुतांशी यशही आलें. या प्रकरणाची महाराजांना किती दहशत बसली होती, तिचा त्यांनी १३-१२-१८९५ या दिवशी राजगुरु इलियट यांना लिहिलेल्या पत्रांतून उल्लेखही केला आहे.

If there was any delay in the decision of the Bapat case, it merely was the result of extreme caution on my part, arising from the fear of the Residency. Had the case been treated in the ordinary judicial way, the State might have been saved two or three lakhs of rupees.

या प्रकरणी विलंब झाला तो केवळ इंग्रज राजदूताच्या भीतीमुळे झाला. नेहमीच्या न्यायालयात या प्रकरणाची चौकशी झाली असती तर संस्थानाचे दोन तीन लाख रुपये वाचले असते.

बिडुल्फ यांनी महाराजांवर केलेले आरोप

बापट प्रकरणात टिळकांच्या भगीरथ प्रयत्नांमुळे कर्नल बिडुल्फ यांचीं कारस्थानें फसल्यानंतर त्यांनी १८९५ मध्ये हिंदुस्थान सरकारला पुढील आशयाचें पत्र लिहिलें.

There is a tendency among the Mahrattas of Poona and Bombay to interest in Badoda affairs. This has been so much marked that I cannot avoid the suspicion that there is a settled policy among the disloyal Poona Brahmins to use Badoda as a focus of opposition to the British Government. It is remarkable that no other class except Mahrattas have shown any desire to interfere in Badoda affairs. The most important offices in the State with one or two exceptions are in the hands of the Mahrattas, and recent events have shown to what length they are pre-

pared to go to retain predominant authority in the State. Their constant interference in Badoda affairs, the continued irritation kept up in Gaekwad's mind against the Government of India, the great pains taken about the army, the constant glorification of the Gaekwad by the Mahratta press, all point to a concerted object. The improper support afforded by the Gaekwad, to the national Congress can only be due to the instigation of these men. This feature in Badoda affairs requires careful watching as there is the possibility of much trouble in it. It is probable that the Gaekwad himself is unconscious of the use that is being made of him, but his belief that he is the foremost chief in India and the natural head of the Mahrattas, his assumption of a royal style and his arrogant claim to sovereignty over Kathiawad chiefs and many of the Gujarath chiefs, all point to political aspirations of a dangerous nature.

पुण्यामुंबईच्या मराठ्यांत बडोद्याच्या कारभारात लक्ष घालण्याची प्रवृत्ति दिसून येते. मला तर असें वाटतें की पुण्याच्या राजद्रोही ब्राह्मणांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध कारस्थानांचें केंद्र म्हणून बडोद्याचा उपयोग करावयाचें ठरविलें आहे. मराठ्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणी बडोद्याच्या कारभारात लक्ष घालीत नाहीत. एक दोन अपवाद वगळले तर येथील वरिष्ठ अधिकारी सारे मराठे (दक्षिणी) आहेत. हे लोक आपल्या हाती सत्ता राखण्याकरिता वाटेल ते उपाय योजावयाला कमी करीत नाहीत, हें नुकतेंच दिसून आलें आहे. हे येथील कारभारात ढवळाढवळ करतात आणि महाराजांच्या अंतःकरणातील इंग्रजविरोधात तेल ओतीत असतात. यांच्या वर्तमानपत्रांतून महाराजांचें माहात्म्य वाढविलें जातें. सैन्याच्या सिद्धतेकडे यांचें सतत लक्ष असतें. यांच्यामुळेच महाराज राष्ट्रीयसभेला साहाय्य करतात. हे लोक आपला काय उपयोग करून घेतात, हें कदाचित् महाराजांना कळत नसेल. पण आपण मराठ्यांचे प्रमुख आहोत ही त्यांची भावना, साऱ्या संस्थानिकांत मीच सर्वश्रेष्ठ आहे हा त्यांचा आत्मविश्वास, सार्वभौम राजाप्रमाणे वागण्याची त्यांची प्रवृत्ति, काठेवाडातील आणि गुजराथेतील पुष्कळसे संस्थानिक आपले मांडलिक असल्याचा त्यांचा हट्ट, या सर्वांवरून त्यांच्या धोका उत्पन्न करणाऱ्या महत्त्वाकांक्षेची कल्पना येते. कर्नल बिडुल्फ यांच्या पत्रात मराठे आणि पुण्याचे अराजनिष्ठ ब्राह्मण यांचा समानार्थक उपयोग केला आहे, यावरून ही गोष्ट कळून येते की, या भेदनीतिप्रवीण लोकांना बडोद्यातील राजकारणात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या वादाचें विष

पेरता आलें नव्हतें. या वेळी पुण्याच्या राजद्रोही ब्राह्मणांनी ब्रिटिश सत्तेला विरोध करण्याचें केंद्र म्हणून बडोद्याचा उपयोग करून घ्यावयाचें ठरविलें होतें, हा कर्नल बिडुल्फ यांचा आरोप खरा आहे. कारण सत्तावन्नच्या क्रांतियुद्धाचे नेते नानासाहेब पेशवे हे साधूच्या वेषानें त्या दिवसांत बडोदें संस्थानाच्या परिसरातच निवास करीत असत, ही गोष्ट पुण्याच्या राजद्रोही ब्राह्मणांना माहीत होती.

संस्थानिकांना परदेशगमनाची बंदी

लॉर्ड कर्झन हे राजप्रतिनिधि होऊन आल्यानंतर लौकरच त्यांनी संस्थानिकांच्या परदेशगमनावर नियंत्रणें घातलीं. त्यापूर्वी असा संकेत असे की, संस्थानिकांनी परदेशी प्रवासाला जाण्यापूर्वी हिंदुस्थानसरकारला प्रवासाची सविस्तर योजना कळवून ठेवावी. म्हणजे त्याप्रमाणे परदेशांतील सरकारांना सूचना देणें हिंदुस्थान सरकारला सोपें जात असे. पण कर्झन महाशयांनी त्यांना विदेशगमनासाठी आवेदनें करणें भाग पाडलें. या आवेदनांची सूक्ष्म तपासणी करून काही तरी खुसपट काढून तीं फेटाळलीं जात. कर्झनशहांची समजूत अशी होती की, संस्थानिक म्हणजे हिंदुस्थानसरकारचे सेवकच. त्यांनी नेहमी आपल्या कार्यस्थळी उपस्थित राहिलें पाहिजे. या विद्वानांनी अशा आशयाचें एक पत्रकही प्रसिद्ध केलें, तेव्हा स्वत: भारतसचिवांनी त्यांना अगदीच पंतोजीपणा करण्यानिमित्त दोष दिला. प्रवासबंदीचा हा निर्बंध सयाजीराव महाराजांना विशेषच जाचक झाला. कारण त्यांना प्रवासाचा नादच लागला होता. कर्झन महाशयांच्या कारभारावर सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी रमेशचंद्र दत्त यांनी वेळोवेळी कडक टीका केलेली पाहून महाराजांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेऊन अमात्य हें पद दिलें. कारण त्यांना मुख्यप्रधान करावयाचें झाल्यास राजप्रतिनिधींची अनुज्ञा घ्यावी लागली असती.

सयाजीमहाराज आणि लॉर्ड कर्झन

लॉर्ड कर्झन यांच्या राजवटीत सयाजी महाराजांनी असा आग्रह धरला की, संस्थानातील सर्व युरोपियनांचे दिवाणी फौजदारी दावे स्थानिक न्यायाधीशांपुढेच चालले पाहिजेत. त्याचप्रमाणे बडोदें संस्थानात युरोपियन अथवा अमेरिकन गोऱ्यांना स्थावर संपत्ति विकत घेण्याला बंदी करण्याचा आपल्याला अधिकार आहे. या दोनही प्रकरणी लॉर्ड कर्झन यांनी महाराजांचें म्हणणें फेटाळून लाविलें. तेव्हा महाराजांनी आपल्या

प्रदेशातील आगगाडीचें काम स्थगित केलें. कारण आगगाडीच्या क्षेत्रात बडोदेकरांची सत्ता चालू देण्याला सरकारने नकार दिला होता. डॉ. गोपाळ लिहितात :

For long Gaekwad had sought to assert his rights and shake off as much as he could of British supervision. This led him to prohibit Europeans and Americans from acquiring immovable property in his state and to claim full powers of civil and criminal jurisdiction over Europeans resident in Badoda. Both claims were rejected as contravening the prerogative of the paramount power. The Gaekwad then declined to proceed with plans for Railway construction if this involved a cession of jurisdiction over the territory across which the railway would run.

१९०० मध्ये महाराणी चिमणाबाई यांच्यावर एक शस्त्रक्रिया लंडनमध्येच केली पाहिजे, असें तज्ज्ञांनी ठरविलें. पण त्यांच्यासह लंडनला जावयाला लॉर्ड कर्झन यांनी महाराजांना बंदी केली. या प्रकरणी इंग्लंडातील एका नामांकित शस्त्रवैद्यांनी लंडन 'टाइम्स'ला पत्र लिहून या बंदीचा निषेध केला. अर्थात् महाराजांनी त्या बंदीला भीक न घालता महाराणीसह लंडनला प्रयाण केलें, हें सांगावयाला नकोच. याच वेळी लॉर्ड कर्झन हे भर दुष्काळात येणारा तेरावा मास या नात्यानेच बडोदें संस्थानाला भेट द्यावयाला येणार होते. तेव्हा त्यांच्या स्वागताचा भार महाराजांनी मुख्य प्रधानांवर टाकला, याचा त्यांना पराकाष्ठेचा राग आला. त्यानंतर १९०१, १९०२ आणि १९०३ या तीनही वर्षी लॉर्ड कर्झन यांनी साम्राज्य सरकारला पत्रें लिहून महाराजांवर असभ्य वर्तनाचा आणि अराजनिष्ठेचा आरोप केला.

The Gaekwad is the sole important prince in India of whom I would distinctly and deliberately say that he is not loyal to the British Government, that he would do anything he could to injure us, and that he deserves no consideration at our hands.

१९०२ मध्ये तर महाराजांनी हिंदुस्थानसरकारला स्वच्छ कळविलें होतें की, परदेशी जाताना अनुज्ञा मागावयाला मी काही तुमचा दासानुदास नाही. या वेळी हिंदुस्थानसरकारने महाराजांना अतिशय कठोर पत्र लिहून हिंदुस्थानात राहणें त्यांना भाग पाडलें होतें. तेव्हा १९०२ मध्ये टिळक आणि अरविंद हे उभयता आपापल्या परीने कर्झन-वधाच्या कारस्थानातून कां भाग घेत होते, याची कल्पना येईल.

महाराजांनी लॉर्ड कर्झनना धाब्यावर बसविलें

१९०२ मध्ये महाराज कर्झनमहाशयांच्यापुढे नमले असले तरी १९०५ मध्ये त्यांनी त्यांना धाब्यावर बसविण्याचा संकल्पच केला. या वेळी बडोद्यांतील इंग्रजांच्या दूताने महाराजांना दम दिला.

If His Highness left India, the Government of India could not of course take him prisoner, but very unpleasant consequences might follow.

महाराज प्रवासाला गेले तर अर्थात् हिंदुस्थान सरकार त्यांना बंदी करू शकत नाही. पण त्यांच्या कृतीचे परिणाम फार वाईट होतील. त्या वेळी महाराजांना प्रकृतीच्या निमित्ताने युरोपच्या प्रवासाला जावयाचें होतें आणि त्याच वर्षी पुढे पाचवे जॉर्ज या नात्याने सम्राट् बनलेले इंग्लंडचे युवराज भारतदर्शनाला येणार होते. त्यांचें स्वागत करण्याची विटंबना आणि व्यय टाळण्याकरिताच महाराज परदेशी जाऊन राहणार आहेत अशी लॉर्ड कर्झन यांची समजूत असल्याने राजपुत्रांच्या स्वागताप्रीत्यर्थ उपस्थित राहणार असाल तरच तुम्हांला विदेशी जाण्याला अनुज्ञा मिळेल, असें त्यांनी स्पष्ट शब्दांत कळविलें होतें. उलटपक्षी महाराजही तितकेच स्पष्टवक्ते असल्याने त्यांनी उत्तर दिलें की, असें खिडीत गाठून वचन घेतलेत तर कदाचित् तसें वचन देऊनही मी परदेशी जाईन आणि राजपुत्रांच्या स्वागताला परत न येण्यासाठी नवीं निमित्तें शोधून काढीन. असें उत्तर मिळाल्यानंतर राजप्रतिनिधींनी त्यांना परदेशी जाण्याकरिता अनुज्ञा देण्याचेंच नाकारलें. तेव्हा महाराजांनी सांगितलें की मी काही आपला बंदी नाही आणि आपल्या अनुज्ञेवाचून मला परदेशी जाता येणार नाही, असें नाही. १९०५ मध्ये इंग्लंडच्या युवराजांनी भारताला भेट दिली तेव्हा महाराज चीन, जपान आणि अमेरिका या देशांच्या दर्शनाला गेले होते.

कर्झनवधाच्या कटात महाराज ?

वरील विवेचनावरून लॉर्ड कर्झन आणि सयाजीराव महाराज यांचे परस्परसंबंध कसे होते, याची वाचकांना कल्पना आलीच आहे. अशा परिस्थितीत कर्झनवधाच्या कटाशी महाराजांचा संबंध आला होता काय, हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाला अस्तिपक्षी उत्तर देण्याला थोडा पण महत्त्वाचा परिस्थितिजन्य पुरावा उपलब्ध आहे. १९०२ च्या अंती अहमदाबाद येथे राष्ट्रीय सभेची बैठक बसली असता तेथील औद्योगिक प्रदर्शनाच्या उद्‌घाटनाकरिता सयाजीराव महाराजही

तेथे आले होते. या प्रसंगी टिळक आणि अरविंद यांची भेट होऊन टिळकांनी महाराष्ट्रातील आंदोलन कसें आणि कोणत्या धोरणाने चालविलें जातें, याची सविस्तर माहिती त्यांना सांगितली. अरविंदांचे चरित्रकार शिशिरकुमार मित्र लिहितात :

There Tilak took Sri Aurobindo out of the pandal and talked to him for an hour in the grounds expressing his contempt for the tinker work show and explaining his own line of action in Maharashtra.

ही भेट घडली, हें सिद्ध करण्याकरिता अवतरणाची आवश्यकता नव्हती. पण केळकरांनी टिळकचरित्रात चुकून लिहिलें आहे की, अहमदाबादेच्या राष्ट्रीय सभेला टिळक गेलेच नव्हते. पण त्या अधिवेशनावर 'केसरी'त लिहिलेल्या अग्रलेखात टिळकांनी तेथील स्वागतसभेचे प्रतिनिधींची सुव्यवस्था ठेवल्यानिमित्त मनःपूर्वक आभार मानले आहेत. त्यावरून आणि बंगाल्यातील परंपरेवरून ते तिथे उपस्थित होते याविषयी शंका नाही. स्वतः केळकरांनीही १९३५ च्या 'सह्याद्री'त लिहिलेल्या संक्षिप्त चरित्रात टिळक अहमदाबादेला अनुपस्थित असल्याचा उल्लेख केलेला नाही. पुढे १९०३ मधील मद्रासच्या अधिवेशनात मात्र ते अनुपस्थित होते. केळकरांच्या या चुकीचा शिवरामपंत करंदीकरांनीही अनुवाद केला आहे. पण तत्कालीन पत्रकर्त्यांत टिळकांप्रमाणेच 'लीडर' पत्राच्या चिंतामणींची स्मरणशक्ति फार चांगली होती. त्यांनी आपल्या आठवणीत सांगितलें आहे की १९०२ मध्ये मी पुण्यास गेलो होतो आणि टिळक, केळकर, विजापूरकर यांस भेटलो, तेव्हा या वर्षी राष्ट्रीय सभेला मी येणार नाही असें टिळक म्हणाले होते, पण शेवटी दोन दिवस तरी ते उपस्थित होतेच. टिळक, अरविंद आणि महाराज ही मंडळी अहमदाबादेत असताना लॉर्ड कर्झन यांची दिल्लीत हत्तीवरून मोठी मिरवणूक निघाली. या मिरवणुकीत भाग घेण्याची लॉर्ड कर्झन यांनी सर्व संस्थानिकांना आज्ञा केली होती, तरीसुद्धा सयाजीराव महाराजांनी त्या मिरवणुकीत भाग घेण्याचें नाकारलें, असें दाजीसाहेब आपटयांनी महाराजांच्या चरित्रात लिहिलें आहे. या मिरवणुकीतच संधि साधून राजप्रतिनिधींना गोळ्या घालण्याचा कट रवींद्रनाथ, जगदीशचंद्र, चारुचंद्र दत्त इत्यादींनी केला होता. या वेळी टिळक-परांजप्यांच्या विश्वासातील दामूअण्णा जोशी हेही दिल्लीत मिरवणुकीच्या संधीचा सदुपयोग करण्याच्या प्रयत्नात होते. तेव्हा दिल्लीहून काही सुवार्ता येते की काय, याची या तिघांनीही अहमदाबादेत उत्कंठेने वाट पाहिली असावी. शेवटी दिल्लीतील मिरवणूक

निर्विघ्नपणे पार पडली, ही वार्ता वाचून महाराज तेथील सामंत-संमेलनाला निघून गेले. १९०२ मध्येच लॉर्ड कर्झन यांनी महाराजांना अतिशय कठोर पत्र लिहून हिंदुस्थानाबाहेर जाण्याला बंदी केली होती. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे याच वर्षी भारतीय क्रांतिकारकांनी त्यांच्या वधाचा सतत प्रयत्न कां केला, याची कल्पना येते. निदान बडोद्यापुरते तरी महाराज स्वतःच क्रांतिकारकांचे नेते होते, असा आरोप एका इंग्रज राजदूताने केला होता.

We must strike at the head of the anti-British movement in Badoda and the head is the Maharaja himself.

बडोद्यातील इंग्रजविरोधी कटाचे नेते स्वतः महाराज असल्यामुळे टिळकांनी अहमदाबादेत अरविंदांना राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनातून बाहेर नेऊन महाराष्ट्रांतील कार्याचा सविस्तर परिचय करून दिला.

राजप्रतिनिधींना धडा शिकविणें

कर्झनवधाच्या कटात भाग घेण्यापूर्वी, त्यांच्या पूर्वीचे राजप्रतिनिधि लॉर्ड एल्गिन यांना धडा देईल, असा कोणी पुरुष भारतात नसल्याचा टिळकांनी प्रकटपणे खेद व्यक्त केला होता. १८९६ च्या दुष्काळात लॉर्ड एल्गिन यांना देशी संस्थानांचें सिंहावलोकन करण्याची लहर आली. अशा प्रसंगी राजप्रतिनिधींच्या संतोषासाठी कशी अमाप उधळपट्टी होत असे, याची वाचकांना कल्पना असेलच. या सिंहावलोकनाच्या निमित्ताने हा ब्रिटिश सिंह बडोद्याला आला असताना त्या वेळच्या समारंभात काही अपघात होऊन पांच पन्नास माणसें प्राणाला मुकलीं. असल्या अपघाताच्या प्रसंगी राज्यकर्त्यांनी जीं उचित कर्तव्यें करावयाचीं, तीं सयाजीराव महाराजांनी पूर्ण केलीं असतीलच. पण सम्राज्ञीचे प्रतिनिधि म्हणविणाऱ्यांनीही अशा प्रसंगी अपघाताच्या स्थळांना भेट देऊन सहानुभूति व्यक्त करण्याचा देखावा करणें आणि दुःखनिवारणासाठी किंचित् व्यावहारिक द्रव्य देणें, हा एक शिष्टाचार आहे, हें विसरून लॉर्ड एल्गिन आपल्याच नाचरंगात दंग होऊन राहिले होते. या त्यांच्या अश्लाघ्य वर्तनावर कडक टीका करताना टिळकांनी तापून उद्‌गार काढले होते की, दुर्दैवाने या राजप्रतिनिधींना धडा शिकवू शकेल असा या अखिल भारतात कोणीच नाही. ही टीका प्रसिद्ध होताच मुंबईच्या टाइम्सने टिळकांच्या उद्धट आणि अराजनिष्ठ टीकेचा उल्लेख करून अशी सूचना केली होती की, टिळकांच्या आजपर्यंतच्या वर्तनाचा विचार करून त्यांची विधिमंडळावर पुन्हा निवडणूक झाली तर मुंबईच्या


राज्यपालांनी तिला मान्यता देऊ नये. या प्रसंगी टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्याचीही सरकारात चर्चा झाली. पण तें प्रकरण तेव्हा तेवढ्यावरच थंड झालें.

माधवराव जाधवांचें स्विट्झर्लंडगमन

टिळकचरित्रातील अनेक गूढ प्रकरणांपैकी बडोद्याच्या सैन्यातील माधवराव जाधव यांना त्यांनी स्विट्झर्लंड येथील सैनिकी विद्यालयात प्रवेश मिळवून दिल्याचें प्रकरण म. म. पोतदारांनी उघडकीला आणलें आहे. यासंबंधी पोतदारांनी प्रसिद्ध केलेल्या एका पत्रात मुंबईच्या रूसी राजदूतांनी लिहिलें आहे : 'रूसी साम्राज्यसरकारच्या विनंतीवरून स्विट्झर्लंडमधील उच्च सैनिकी अभ्यासक्रमासाठी कॅ. माधवराव जाधव यांना प्रवेश मिळाला. यासंबंधीची माननीयांची गुप्त तार पोचली. या प्रकरणी अत्यंत सावधगिरीने वागण्याची आवश्यकता असल्याने मी माधवरावांना भेटण्याचा प्रयत्न केला नाही. कारण त्यांना युरोपातील सैनिकी विद्यालयात प्रवेश मिळवून देण्याची विनंती जाधव यांच्याकडून आली नसून देशभक्तांच्या पक्षातील एक सभासद ब्राह्मण टिळक यांच्याकडून आली. टिळकांकडून मला एवढेंच कळलें की माधवराव पूर्वी हिंदी संस्थानी सेनेत होते. पण कोणच्या भागात होते, तें माहीत नाही. ते पुण्याचे निवासी असून निःसंशय देशभक्तांच्या पक्षातील आहेत. हा देशभक्तांचा पक्ष ब्रिटिश साम्राज्य उलथून पाडण्याविषयी हिंदुस्थानाच्या संपूर्ण स्वायत्ततेचीं स्वप्नें पहात आहे. माधवराव यांचा युरोपात सैनिकी शिक्षण घेण्याचा हेतु उघडपणे असा आहे की कालांतराने प्रसंग येईल तेव्हा ब्रिटिशांपासून फुटून निघालेल्या देशी सैनिकांचें अथवा बंडवाल्यांचें नेतृत्व स्वीकारता यावें.'

सयाजीरावमहाराजांचा माधवरावांशी संबंध

हे माधवराव आणि त्यांचे बंधु खासेराव जाधव हे सयाजीरावमहाराजांच्या नात्यातील होते आणि या उभयतांवर त्यांचा विश्वास होता. आपल्या अधिकाऱ्यांना सैनिकी शिक्षणासाठी परदेशी पाठविण्याची कल्पना त्यांच्या मनात घोळत होती. नानासाहेब शिंद्यांच्या आत्मचरित्रात त्यांनाच इंग्लंड अथवा जपान येथे सैनिकी शिक्षणाकरता पाठविण्याचा विचार महाराजांनी बोलून दाखविल्याचा उल्लेख आहे. (पान ९९) पण महाराजांचा त्यांच्यावर विश्वास नव्हता. म्हणून त्यांना न पाठविता माधवरावांना परदेशी पाठविलें. माधवराव दोन वर्षांच्या लांब



श्री. खासेराव जाधव



कॅ. माधवराव जाधव



सौ. लीलावती दत्त



न्या. चारुचंद्र दत्त

रजेवर युरोपात गेल्याचें नानासाहेबांनी एके ठिकाणी लिहिलें आहे. (पान १०५) इंग्लंड आणि स्विट्झर्लंड येथून सैनिकी शिक्षण संपादून परत येताना माधवरावांनी युद्धशास्त्रावरील जवळ जवळ दोनशे पुस्तकें आणलीं होतीं. अरविंदांच्या चरित्रात शिशिरकुमार मित्रांनी लिहिलें आहे,

Madhavrao was sent to Europe for military training, bomb-making and procuring arms for revolutionary work.

म्हणजे युद्धशास्त्राचीं पुस्तकें घेणें, सैनिकी शिक्षण घेणें, अग्निगोल करण्याची विद्या शिकणें आणि परदेशांतून चोरून शस्त्रें पाठविणें इतकी कामें त्यांच्याकडे सोपविलीं होतीं. या सर्व कामांसाठी त्यांना पैशाचा पुरवठा करणें अवघड होतें. यासाठीच टिळकांनी श्यामजी कृष्णवर्मा यांना पत्र लिहून कळविलें होतें की, माधवराव जाधव काही विशेष कामाकरिता आपल्याला भेटणार आहेत, त्यांच्यावर आपण पूर्ण विश्वास ठेवावा. अरविंद स्वतः गायकवाडांच्या सेवेत होते, तोंपर्यंत माधवरावांकडे नियमितपणे द्रव्य धाडीत, असें त्यांनी स्वतःच पत्नीला लिहिलेल्या पत्रांवरून समजतें. सयाजीराव महाराजांच्याकडून त्यांना नेहमीच्या वेतनाव्यतिरिक्त काही मिळत होतें कीं नाही, त्याचा कोठे उल्लेख नाही. माधवरावांच्या परदेशातील सैनिकी शिक्षणाचा व्यय तुम्हांला झेपणार नाही, अशी सूचना रशियाच्या व्यापारी प्रतिनिधींनी टिळकांना दिली होतीच.

शिक्षणस्थळाच्या वाटाघाटी

माधवरावांना सैनिकी शिक्षणाकरिता परदेशी पाठविण्याचें केंद्र-समितीने ठरविल्यानंतर त्यांना कोठे पाठवावें, या प्रश्नाची बरीच चर्चा झाली होती. रशियाच्या व्यापारी प्रतिनिधींशी बोलताना टिळकच असें म्हणाले की, माधवरावांना अमेरिकेतील फ्लोरिडा संस्थानातील सैनिकी विद्यालयात पाठविण्याविषयी आम्ही पत्रव्यवहार केला असून भारतीय तरुणांना प्रवेश देण्याला ते सिद्ध आहेत. यावर रशियाच्या प्रतिनिधींनी आक्षेप घेतला की, युद्धशास्त्रात अमेरिका हें पहिल्या प्रतीचें राष्ट्र नसल्याने तुम्ही माधवरावांना फ्रान्समध्ये पाठवा. पण रशियाच्या मध्यस्थीनेही माधवरावांना फ्रान्सच्या सैनिकी विद्यालयातून प्रवेश मिळाला नाही. कारण इंग्लंडला दुखविण्याला फ्रान्स सिद्ध नव्हता. शेवटी तटस्थ स्विट्झर्लंडमध्येच त्यांना प्रवेश मिळाला.

स्विस अधिकारी आणण्याचा प्रयत्न

माधवरावांचें युद्धशास्त्राचें शिक्षण स्विट्झर्लंडमध्ये झाल्यानंतर महाराजांनी आपल्या सैन्यात तेथील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा

प्रयत्न केला. लॉर्ड हार्डिंज यांच्या सरकारने १९११ च्या नोव्हेंबरमध्ये सयाजी महाराजांविरुद्ध जें आरोपपत्रक भारतसचिव मार्क्विस क्र्यू यांना सादर केलें होतें, त्यात पुढील आरोप आहे :

In 1909 the Gaekwad admitted that he had actually been negotiating with certain officers of the Swiss army with a view to their entering his service.

महाराजांनी मान्य केलेली ही घटना अतिशय महत्त्वाची आहे. कारण लॉर्ड कर्झन यांच्या, संस्थानातील सैन्यांचें साम्राज्यसेनेत (इंपीरियल सर्व्हिस ट्रुप्स) अंशतः रूपांतर करण्याच्या योजनेला सर्व संस्थानिकांत एकट्या सयाजी महाराजांनीच विरोध केला होता. त्यावरून त्या राजप्रतिनिधीशी त्यांचें कडाक्याचें भांडणही झालें होतें.

Lord Curzon's government in their secret dispatch dated 13 July 1905 characterised his attitude on the Imperial Service Troops question as unreservedly hostile.

म्हणजे साम्राज्य सेनेच्या प्रश्नावर महाराजांचें धोरण सपशेल शत्रुत्वाचें आहे, असा आरोप लॉर्ड कर्झन यांच्या सरकारने १३-७-१९०५ या दिवशीच्या पत्रात केला होता. आपल्या सैन्याच्या कार्यक्षमतेकडे महाराजांचें सतत लक्ष असे, हेंही इंग्रज सरकारच्या अंतःकरणातील एक शल्यच होऊन बसलें होतें. अशा परिस्थितीत महाराजांनी आपल्या सैन्यात स्विस सेनाधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा प्रयत्न करावा, ही गोष्ट इंग्रज सरकारने सहन करणें अशक्य होतें. आपल्या सैन्यात स्विस अधिकाऱ्यांची भरती करण्याची कल्पना टिळकांनी स्विट्झर्लंडच्या सैनिकी विद्यालयात प्रवेश मिळवून दिलेल्या माधवरावांनीच महाराजांना सुचविली असावी, आणि त्या अधिकाऱ्यांशी बोलणींही त्यांच्याच वतीने झालीं असावीत, हें उघड आहे. या अधिकाऱ्यांना बडोद्याला आणता आलें असतें तर युद्धशास्त्रशिक्षणाचें केंद्रच बडोद्यात प्रस्थापित झालें असतें. नाही तरी माधवराव जाधवांसारख्या एखाद्या व्यक्तीला विदेशी सामरिक विद्यालयातून प्रवेश मिळून क्रांतीच्या रथाची कितपत प्रगति होणार, याची टिळकांना कल्पना असेलच. पण स्वतः माधवरावांच्या शिक्षणासह त्यांना शिक्षण देणाऱ्या द्रोणाचार्यांनाच वश करून बटोदरपुरीत आणल्यास हिंदुस्थानातच सामरिक शिक्षणाचें एक उत्कृष्ट केंद्र निर्माण करता येईल, अशीही टिळकांची दूरदृष्टि असावी, आणि तिला अनुसरूनच महाराजांनी स्विस अधिकाऱ्यांशी बोलणीं चालविलीं असावीत.

युद्धशास्त्रशिक्षणाची तळमळ

लॉर्ड कर्झन यांच्या, साम्राज्यसंरक्षणाप्रीत्यर्थ संस्थानी सैन्याचा काही भाग विशेष प्रकारे युद्धसज्ज करण्याच्या योजनेत भाग घेण्याचें महाराजांनी नाकारलें, याचें एक प्रमुख कारण हें होतें की या निमित्ताने संस्थानी सैन्यातून इंग्रज अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा लॉर्ड कर्झन यांचा संकल्प होता. बडोद्याच्या सैन्यात थोडेफार युरोपियन अधिकारी असत. पण त्यांच्यावर महाराजांचा अधिकार चालत असे. पण कर्झन यांच्या योजनेनिमित्त नेमलेल्या अधिकाऱ्यांवर त्यांचा अधिकार चालला नसता. यासाठी त्यांच्या योजनेलाच महाराजांनी तीव्र विरोध केला. ते म्हणत की संस्थानी सैन्य पुरेसें कार्यक्षम नसल्यास आमच्या अधिकाऱ्यांना सँढर्स्ट आणि वुलविच येथील सैनिकी महाविद्यालयांतून प्रवेश द्या, म्हणजे सहजच संस्थानी सैन्य इंग्रजी सैन्याच्या तोडीचें होईल. स्वतः संस्थानिकांच्या आणि त्यांच्या सरदारांच्या कुळातील मंडळींनाही युद्धशास्त्रशिक्षणाच्या विद्यालयांतून प्रवेश न देता साम्राज्यसंरक्षक सैन्याची योजना दामटण्यावर टिळकांनीही टीका केली होती. पण भारतीय अधिकाऱ्यांना सँढर्स्ट आणि वुलविच येथील युद्धशास्त्रशिक्षणाच्या विद्यालयांतून प्रवेश करू देऊन तीं विद्यालयें भ्रष्टविण्याची कल्पनाच मुळी लॉर्ड कर्झन यांना राजद्रोही वाटत होती. तेव्हा महाराजांची सूचना अथवा कल्पना त्यांनी विचारात घेतली तर ती केवळ त्यांच्या राजद्रोहाचा निर्विवाद पुरावा म्हणूनच त्यांनी ध्यानात ठेविली असावी. असो. यावरून माधवराव जाधवांना टिळकांनी स्विट्झर्लंडच्या युद्धशास्त्रशिक्षणाच्या विद्यालयात जो प्रवेश मिळवून दिला, त्याचें महाराजांना किती महत्त्व वाटलें असेल, याची वाचकांना कल्पना येईल. स्वतः टिळकांना सैनिकी शिक्षणाचा ध्यास १८९० पासून लागलेला होता, असा पुरावा उपलब्ध आहे. कारण त्या वर्षीच मुंबईच्या सैन्याचे सेवानिवृत्त सेनापति आणि व्हिक्टोरिया राणीचे दुसरे चिरंजीव ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या स्मारकाच्या निमित्ताने पुणेकरांनी सैनिकी शिक्षणाची शाळा स्थापण्याचा प्रयत्न केला होता. १८-३-१८९० च्या 'केसरी'च्या अग्रलेखात टिळकांनी लिहिलें आहे, 'गेल्या आठवड्यात ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्याकडे पुण्याहून जें शिष्टमंडळ गेलें होतें, त्याचा त्यांनी योग्य सन्मान करून आपल्या नांवाने सैनिकी शिक्षणाची शाळा काढण्यास मोठ्या आनंदाने अनुज्ञा दिली आणि अशा शाळांची देशात आवश्यकता असून आज नाही तर काही दिवसांनी तरी अशा शाळा काढण्याची अनुज्ञा

सरकारला द्यावी लागेल, असा आपला अभिप्रायही त्यांनी स्पष्ट बोलून दाखविला. पण सरकार राजपुत्रांच्या बारशाला जेवलें असल्याने त्याने त्यांचा अभिप्राय झिडकारून टाकून १९३० च्या सुमाराला शिवाजी सैनिकीशिक्षणविद्यालय अस्तित्वात येईपर्यंत भारतीय जनांना युद्धविद्येचें शिक्षण मिळू न देण्याचा आपला हट्ट चालविला.

गोव्यात स्वतंत्र सरकार स्थापण्याचें कारस्थान

गोवें प्रांत पोर्तुगीज फिरंग्यांच्या ताब्यात असताना, कोणत्याही कारणाने भारतातील जीवन असह्य झालेले लोक त्या प्रांतात आश्रय घेत असत. त्या नियमाला अनुसरून पारतंत्र्यातील जीवन असह्य झालेल्या टिळकांचेंही त्या प्रांताकडे लक्ष गेलें होतें. गोखले नेहमीच म्हणत की, टिळक अठराव्या शतकात जन्मले असते तर त्यांनी स्वतःचें स्वतंत्र राज्यच स्थापलें असतें. गोखल्यांचें हें म्हणणें खरें करण्याकरिता बाबामहाराजांच्या विश्वस्ताचें पद पतकरल्यामुळे ओढवलेल्या संकटातून मुक्त होताच टिळकांनी गोव्यात क्रांतिकारक पक्षाचें स्वतंत्र सरकार स्थापण्याचें कारस्थान आरंभिलें होतें. या कारस्थानाचा गाभा असा होता की गोव्याच्या पोर्तुगीज राज्यपालाला लाच देऊन तो सारा प्रांत भारतीय क्रांतिकारकांनी आपल्या ताब्यात घ्यावयाचा. मात्र या प्रकरणी त्या पोर्तुगीज राज्यपालावर कसलाही आरोप येऊ नये याकरिता, देखाव्यापुरतें गोव्यात एक बंड उभारून पोर्तुगीज राज्यपाल आणि त्यांच्या हाताखालील अधिकारी यांना अटक करावयाची. पण त्यानंतर पोर्तुगालचा मित्र या नात्याने इंग्रजांच्या युद्धनौका लगेच गोवें बंदरावर चालून येतील, त्यावर उपाय काय ? या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून टिळकांनी असें ठरविलें की गोव्यातील क्रांतिकारकांच्या सरकाराला एखाद्या प्रमुख राष्ट्राने लगेच मान्यता दिली तर गोव्यावर आक्रमण करण्याला इंग्रज धजणार नाहीत. अशी मान्यता देण्याला जर्मनी आणि फ्रान्स यांच्या सरकारांनी नकार दिला. मात्र त्यांनी एवढें आश्वासन दिलें की, या कारस्थानाची वार्ता आमच्याकडून कदापि फुटणार नाही. त्यानंतर टिळकांच्या अत्यंत विश्वासू मित्रांपैकी महादेव राजाराम बोडस यांनी मुंबईतील रशियाच्या व्यापारी प्रतिनिधींची भेट घेतली. त्यांनी आश्वासन दिलें की इंग्रजांना अपशकुन करण्याकरिता आमचें सरकार स्वतंत्र गोव्याच्या सरकाराला अवश्य मान्यता देईल. पण या कारस्थानात कोण प्रमुख आहेत आणि त्यांचें समाजातील स्थान काय आहे, हें सारें सविस्तर वृत्त मला आमच्या सरकारला कळवावें लागेल. दुसरी गोष्ट ही

की आता सध्या आमचें नौदल जपानशी युद्ध करावयाला गेलें आहे. त्या युद्धात त्याचा जय झाला तरच आम्ही तुम्हांला साहाय्य करू शकू. नाही तर नाही.

I am sure my government would not miss an opportunity of doing some harm to England after the disgraceful, treacherous way in which she has been helping Japan in the present war.

सध्या चालू असलेल्या युद्धात इंग्लंड निर्लज्जपणाने आणि विश्वासघातकी पद्धतीने जपानला साहाय्य करीत असल्याने इंग्लंडला अपशकुन करण्याची संधि माझें सरकार व्यर्थ दवडणार नाही.

स्वतंत्र गोवें सरकारचे प्रमुख चारुचंद्र दत्त ?

पण रशियाच्या व्यापारी प्रतिनिधींची आणि भारतीय क्रांतिकारकांची ही अपेक्षा जपानचे सुप्रसिद्ध नौसेनानी टोगो यांच्या पराक्रमामुळे फोल ठरली, कारण १९०५ च्या मेमध्ये त्यांनी जपानवर चालून आलेलें रशियाचें सारें नौदल सुशिमा सामुद्रधुनीच्या लढाईत बुडविलें. त्या वेळी क्रांतिकारकांनी गोवें ताब्यात घेतलें असतें तर तेथील स्वतंत्र सरकारचे प्रमुख म्हणून चारुचंद्र दत्त यांना करावयाचें टिळकांनी ठरविलें होतें. या प्रकरणाची माहिती लिहिताना चारुबाबूंनी म्हटलें आहे की, भारतीय क्रांतिकारकांची केंद्रसमिति त्या दिवसांतही केवळ राजकीय वधांचे कट करीत नसून अधिक महत्त्वाच्या योजनाही करीत असे. गोव्याचें कारस्थान केंद्रसमितीतील पुढाऱ्यांनी रचलें होतें. एके दिवशी डॉ. नानासाहेब देशमुख यांचें ओळखीचें पत्र घेऊन बोडस चारुचंद्रांच्याकडे गेले (आणि त्यांनी स्वतंत्र गोव्याच्या सरकाराचें प्रमुखपद स्वीकारण्याची त्यांना विनंती केली.) टिळकांनी हें कारस्थान शिजविलें, तेव्हा अरविंद बाबू बंगालची संघटना करण्याकरिता त्या प्रांतात गेले होते. आपल्या नेत्यांच्या अपरोक्ष या कारस्थानात भाग घेण्याला चारुबाबू काकू करीत होते. पण बोडसांनी त्यांना निक्षून सांगितलें की, केंद्र समितीच्या आदेशानेच मी आपल्याकडे आलो आहें.

He stated to me solemnly at the outset that he had been sent by the highest authorities.

चारुचंद्रांनी आपल्या आठवणीत एवढेंच लिहिलें आहे की, रशियाच्या व्यापारी प्रतिनिधींना भेटून बोडसांना पुरेसा पाठिंबा आहे, ही गोष्ट त्यांच्या मनावर ठसवावयाचें काम माझ्याकडे सोपविलें होतें.

I was to see the Consul later and assure him that Bodas had a substantial backing.

स्वतंत्र गोव्याच्या सरकारला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याकरिता चारुचंद्रांनाच त्या सरकारचे प्रमुख करावयाचें ठरविलें असावें. अरविंदांच्या अपरोक्ष आपण हें काम पतकरावें कीं नाही, अशी त्यांना शंका वाटावयाला नको म्हणून बोडसांनी आपण सर्वांत वरिष्ठ अधिकारी व्यक्तींकडून आल्याचा उल्लेख केला होता. यावरून क्रांतिकारक समितीतील शिस्तीची कल्पना येते. ही सर्वांत वरिष्ठ अधिकारी व्यक्ति म्हणजे स्वतः सयाजीमहाराजच असावेत. १९०४ च्या अंतीच महाराजांनी गायकवाडवाडा टिळकांना विकला. याच वेळी गोव्यात स्वतंत्र सरकार स्थापण्याचीं कारस्थानें चालू होतीं. १९०५ च्या मार्चमध्येच माधवरावांना सैनिकी शिक्षणाच्या शाळेत प्रवेश मिळवून देण्याकरिता टिळकांनी रशियाच्या व्यापारी प्रतिनिधींची भेट घेतली. याच दिवसांत सयाजीराव महाराज प्रकृतीच्या निमित्ताने परदेशी जावयाचे होते. या त्यांच्या विदेशगमनाला इंग्रज राजदूताने विरोध केला असता ते तसेच निघून गेले.

गोवें प्रकरण आणि जे. आबासाहेब रामचंद्र

गोव्याचें कारस्थान फसल्याची कथा सांगून झाल्यानंतर चारुचंद्रांनी लिहिलें आहे.

A little Ashram in Panjim was very quietly broken up later on by the Goa Government and everything forgotten.

त्यांचा पणजीमधील हा आश्रम म्हणजे गोव्यातील पोर्तुगीजसरकाराला अटक करण्याकरिता जें लुटुपुटीचें बंड उभें करावयाचें होतें, त्याचें केंद्रस्थान. पोर्तुगीज सरकारच्या अधिकाऱ्यांनी लाच घेऊन गोवें प्रांत विकला असा त्यांच्यावर आरोप येऊ नये याकरिता या केंद्रातून बंड उभें करून त्यांना अटक करावयाची होती. हें केंद्र बहुधा बीडच्या बंडातून पळून आलेल्या जे. आबासाहेब रामचंद्र यांच्याच आश्रमात असावें. या आश्रमाचें अथवा छावणीचें वर्णन गंगाधरराव देशपांड्यांनी त्यांच्या जीवनकथेच्या १५४ पानावर केलें आहे. पन्नासपाउणशे तरुण मंडळी तेथे होती. त्या सर्वांवर आबासाहेबांचें वजन असून सर्व मंडळी मोठ्या भक्तीने आणि पुढील कार्याच्या आशेने खाण्यापिण्याचे अत्यंत हाल सोसून तेथे राहात होतीं, असें आम्हांस दिसलें. एखाद्या सैन्याच्या छावणीत जशी सावधपणाची व्यवस्था असते, तशीच त्या आश्रमातही होती. रात्रंदिवस पाहरा,

आश्रमाचा सीमेत यावयाचें झाल्यास खुणेचा शब्द सांगून येणें इत्यादि गोष्टी तेथे चालत. त्या आश्रमात काही मुलें सैनिकी शिक्षण, किंवा दारू गोळा करण्याचें शिक्षण घेण्याकरिता आलीं होतीं. स्वतंत्र गोव्याच्या सरकारला रूसी सरकाराची मान्यता मिळणें अशक्य झाल्याने या आश्रमाची आवश्यकता उरली नव्हती. पण जे. आबासाहेब रामचंद्र यांना आपल्या सैन्याचें विसर्जन करवत नसल्याने आणि त्यांना ब्रिटिशांच्या पासून धोका वाटत असल्यामुळे त्यांनी तो आश्रम तसाच चालविला होता. त्याचा अंत कसा झाला, हें बीडच्या बंडाच्या वर्णनात आलेंच आहे. गोव्यांतील उठावणी संबंधीचें वचन टिळकप्रभृति मंडळींना पाळता न आल्याने त्यांचा त्या मंडळींवर राग झाला असावा. पण तें वचन पाळणें कसें अशक्य झालें हें वर आलेंच आहे.

सयाजीराव महाराजांवरील एक संकट

पुण्यातील जुन्या क्रांतिकारकांपैकी अद्यापि विद्यमान असलेले गोविंद पांडुरंग बापट यांच्या निमित्ताने सयाजीराव महाराजांवर एक संकट ओढवलें होतें. सेनापति बापट आणि हेमचंद्रदास यांच्या प्रयत्नांनी अग्निगोलांची विद्या बंगाली क्रांतिकारकांना साध्य झाली असली तरी त्यांना त्यांच्या कवचांचा सर्वोत्कृष्ट नमुना उपलब्ध झाला नव्हता. असें सर्वोत्कृष्ट कवच करण्याची विद्या पुण्यात गोविंदराव बापटांनी सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनापूर्वीच साध्य करून घेतली होती. साधी स्फोटक दारू, गनकॉटन, नायट्रोग्लिसरीन आणि त्यातूनच पुढे कॉर्डाइटची भयंकर स्फोटक दारू बनविण्यात ते प्रवीण झाले होते. यांचे पुष्कळसे प्रयोग सिंहगडावर चालत. त्यामुळे ते टिळकांच्या निदर्शनास आले आणि बापटांच्या कर्तृत्वावर त्यांचा विश्वास बसला. १९०७ मध्ये अग्निगोलाचें पितळी कवच त्यांनी मोठ्या कुशलतेने आणि कल्पकतेने ओतून बनविलें. तें इतकें चांगलें साधलें होतें की, अग्निगोल सहज फेकला असता तो खाली पडताक्षणी आपोआप भयंकर स्फोट व्हावा. अशा प्रकारे १९०७ मध्ये हिंदुस्थानातील पहिला यशस्वी अग्निगोल पुण्यात सिद्ध झाला. सुरतेच्या अधिवेशनातील सभाभंगानंतर अरविंद बाबू पुण्यास आले असताना टिळकांसह त्यांना या अग्निगोलाचा बापटांनी प्रयोग करून दाखविला. या प्रयोगाच्या यशस्वितेने अरविंद बाबू प्रभावित झाले आणि त्यांनी बापटांकडून दोन अग्निगोल मागून घेतले. बापटांनी त्यांना आपल्या कृतीची संपूर्ण माहितीही दिली. अरविंदांनी पुण्याहून अग्निगोलाचीं दोन कवचें आणून आपल्या सहकाऱ्यांच्या स्वाधीन केलीं आणि

सांगितलें की परीक्षा घेऊन यांना मान्यता देण्यासाठी टिळकांनी ही तुमच्याकडे पाठविलीं आहेत. स्वातंत्र्याच्या इतिहासाच्या सरकारी साधनांत बापटांच्याविषयी पुढील महत्त्वाची माहिती आढळते.

He used to visit Tilak and received instructions and encouragement from that quarter. He was also a follower of Dr. Annasaheb Patwardhan who also helped him in such pursuits. While in custody before the trial he wrote a letter to Dr. Patwardhan and gave it secretly to the sepoy for posting. From this letter the fact, that he was in the hands of Tilak and Patwardhan, is amply established.

बापटांचा टिळकांप्रमाणेच अण्णासाहेब पटवर्धनांशीही संबंध होता, ही गोष्ट अटकेतून त्यांनी त्यांना लिहिलेल्या पत्रावरून पूर्णपणे सिद्ध होते. हें पत्र त्यांनी एका रक्षकाजवळ चोरून पाठविण्यासाठी दिलें होतें.

बापटांच्या पत्राचे दूरगामी परिणाम

बापटांनी अटकेच्या कोठडीतून लिहिलेलें पत्र हा न्यायालयात टिकणारा पुरावा नसल्याने सरकारला पटवर्धनांच्या विरुद्ध काहीही करता आलें नाही. पण त्यांच्याकडून सार्वजनिक सभेत पानसुपारी घेतल्याच्या निमित्ताने सरकारने सयाजीराव महाराजांना कसें छळलें याची कथा ‘टिळकांच्या आठवणी’ या ग्रंथाचे कर्ते श्री. सदाशिवराव बापट यांनी महाराजांच्या मुखानेच १-८-१९६७ च्या ‘केसरी’त वर्णिली आहे. टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर महाराज जेव्हा युरोपच्या प्रवासाहून परत आले, तेव्हा टिळकांनी एकदा गुप्तपणे त्यांची भेट घेतली. तेव्हा त्यांच्या अनुपस्थितीत घडलेल्या गोष्टी सांगताना महाराज म्हणाले, ‘आमच्या मातुश्री फार आजारी झाल्या. बडोदें, मुंबई इत्यादि ठिकाणच्या डॉक्टरवैद्यांचे सर्व उपाय झाले. पण गुण नाही. निराश झालो. शेवटी पुण्याचे बाळासाहेब नातू आम्हांस म्हणाले की, येथील महर्षि अण्णासाहेब पटवर्धनांचे उपाय करून पहावेत. महर्षींची कीर्ति आम्ही ऐकली होती, म्हणून त्यांचे उपाय चालू केले. चमत्कार असा घडला की, ज्या आमच्या मातुश्रींना पलंगाखाली उचलून घेण्यास दोन माणसें लागत होतीं, तेथे दोन मासांत कसब्याच्या गणपतीच्या दर्शनाला जाण्याइतकी त्यांची प्रकृति सुधारली. तेव्हा महर्षींची संभावना कशी करावी, असें आम्ही नातू यांना विचारलें. ते म्हणाले ‘गेल्या चाळीस वर्षांत सहस्रावधि लोक त्यांनी बरे केले, पण कोणाकडून एक पैसाही कधी घेतला नाही. ते निरिच्छ साधु आहेत. कोणी जर

त्यांच्यापुढे नारळ ठेविला तर तोही कसब्याच्या गणपतीकडे पाठवून देतात.' महाराज म्हणाले, 'आम्ही फार आग्रह केल्यावरून नातूंनी आमची तीव्र इच्छा महर्षींना सांगितली. त्यावर महर्षि म्हणाले की, महाराजांची इतकी तीव्र इच्छा असेल तर त्यांनी आमच्या 'पुणें सार्वजनिक सभा' या संस्थेला भेट द्यावी आणि तिची पानसुपारी स्वीकारावी. हें ऐकून तर आम्हांस नवलच वाटलें. या संस्थेची राजमान्यता सरकारने काढून घेतल्याचें आम्हांस माहीत होतें. तरीही आम्ही आनंदाने आमंत्रण स्वीकारलें. सार्वजनिक सभेच्या सभागृहात मोठा समारंभ झाला. प्रथम अध्यक्ष महर्षि पटवर्धन यांचें भाषण झालें. मग कार्यवाह केळकर यांनी मानपत्र वाचून दाखविलें आणि सत्कारपूर्वक आम्हांस तें दिलें. विगत स्वराज्याच्या पेशव्यांच्या राजधानीतील सभेचा तो थाट पाहून आमचें मन उचंबळून आलें. आम्ही आमच्या भाषणात चालू परिस्थितीसंबंधी काही अपरिहार्य भावना व्यक्त केल्या, आणि शेवटी म्हणालो. 'जगात नसेल एवढें मोठें कुलूप आमच्या तोंडास लाविलें असल्याने आमचें मन उघडें करून दाखविता येत नाही. पण आमच्या ह्या भाषणाचा परिणाम फार विपरीत झाला. हिंदुस्थानसरकारला आमचा राग आला, इतकेंच नव्हे तर आम्हांला पदच्युत करण्याच्या विचारापर्यंत पाळी आली. शेवटी आम्ही सरकारला कळविलें की केवळ एक सामाजिक समारंभ म्हणून आम्ही हें निमंत्रण स्वीकारलें आणि त्याचा आम्हांला आता खेद वाटतो. अशा प्रकारे या गंडांतरातून आम्ही निसटलो.

या प्रकरणावर सरकारचा अभिप्राय

पुढे १९११ मध्ये पांचवे जॉर्ज यांच्या भारतातील आगमनापूर्वी राजप्रतिनिधि लॉर्ड हार्डिंज आणि त्यांचें कार्यकारी मंडळ यांच्या स्वाक्षरीसह महाराजांच्या विरुद्ध जी आरोपपत्रिका भारतसचिव मार्क्विस क्र्यू यांना सादर केली गेली, तीत वरील प्रकरणाचा पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.

In 1909 His Highness visited the Sarvajanik Sabha in Poona. This the Government of Bombay have declined torecognise. The vice-President Annasaheb Patwardhan and the secretary N. C. Kelkar are notorious extremists and political agitators, the latter having been convicted for contempt of Court in the Tilak case. His Highness's speech to the Sabha was characterised by the Government of Bombay as a "thinly veiled disparagement of

British rule. A remonstrance from the Government of India resulted in a disclaimer being published by the Gaekwad in a Mahratta newspaper to the effect that in case his visit to the Sabha might create an impression that His Highness sympathised with the extremists, it was desired to correct it.

म्हणजे सार्वजनिक सभेची मान्यता मुंबई सरकारने काढून घेतलेली, तिचे उपाध्यक्ष अण्णासाहेब पटवर्धन हे बापटांच्या पत्रावरून अग्निगोल करणाऱ्यांना साहाय्य करीत असल्याचें उघड झालेलें, कार्यवाह केळकर यांना आदल्या वर्षीच वरिष्ठ न्यायालयाची मानहानि केल्यानिमित्त शिक्षा झालेली, अशा लोकांच्या बैठकीत बसून महाराजांनी ब्रिटिश साम्राज्याची प्रच्छन्न निंदा करावी, यापरता देशभक्त संस्थानिकाकडून अन्य कोणता अपराध होऊ शकेल? पण 'पुत्राचे सहस्र अपराध माता काय मानी तयांचा खेद' या न्यायाने लॉर्ड मिंटो यांनी केवळ खेद व्यक्त करण्यावर तें सारें पोटात घालून पुढे बडोद्याला भेटही दिली.

बडोद्यातील इंग्रजद्रोह

लॉर्ड हार्डिंज यांच्या आरोपपत्रिकेत बडोद्यातील इंग्रजद्रोहाच्या वर्णनाचा प्रारंभ अरविंद घोष महाराजांचे कार्यवाह झाले, तेव्हापासून केला आहे. त्या संस्थानातील अनेक अधिकारी अरविंदांचे निकटचे मित्र असून त्यांच्यापैकी केशवराव देशपांडे यांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या आंदोलनात पुढाकार घेतला असून राष्ट्रीय आणि इंग्रजद्रोही शिक्षण देणाऱ्या गंगनाथ विद्यालयाशी त्यांचा निकटचा संबंध आहे. बडोदें संस्थानात गुप्त समित्या अस्तित्वात असून त्यांत महंत माणिकरावांचा आखाडा हा प्रमुख आहे. बडोद्यात इंग्रजद्रोहाचा प्रचार उघडपणे होत असून तो थांबवायला सांगितल्यास महाराज उत्तर देतात की इंग्रजी राज्यात गायकवाडसरकारविरुद्ध होणारा प्रचार थांबवा, म्हणजे आम्ही इंग्रजविरोधी प्रचार थांबवू. बडोद्याच्या मुख्य प्रधानांनी स्वतःच राजदूतांना सांगितलें आहे की, संस्थानातील पुष्कळसे अधिकारी जहाल (राष्ट्रीय) पक्षाचे आहेत. १९०९ च्या गणपति उत्सवात कलाभुवन आणि गंगनाथ विद्यालयातून अतिरेकी राष्ट्रवादी भाषणें झालीं. बडोद्यात वासुदेव पुरुषोत्तम साठे यांना पुढारी पत्र चालविण्याला अनुज्ञा दिली. या पत्रातील इंग्रजद्रोही लेखांविरुद्ध बडोदें सरकारकडे अनेकदा गाऱ्हाणीं केलीं, तरी त्यांनी त्यांना काही शासन केलें नाही. शेवटी मुंबई सरकारने यांचीं दोन नाटकें सरकारजमा केल्यानंतर १९१० च्या सप्टेंबरमध्ये

बडोदेकरांनी त्यांचा छापखाना बंद केला. (मला असें आठवतें की, या देशभक्त नाटककारांनी एकवीस नाटकें लिहिलीं आणि 'पुढारी' पत्रही एकवीस मास चालविलें.) 'चाबूक' नांवाच्या पत्रातून असेंच इंग्रजद्रोही लेखन चालू असे. तें थांबविण्यासाठी बडोदें सरकारवर दडपण आणल्यानंतर १९१० च्या डिसेंबरमध्ये तें पत्र बंद केलें. १९११ च्या जानेवारीत 'बडोदें गॅझेट' पत्रात पंचम जॉर्जच्या भारतातील आगमनासंबंधी आक्षेपार्ह लेख आला होता. त्या पत्राला अद्यापि काही शासन झालें नाही. गंगनाथ विद्यालय या राष्ट्रीय शाळेकडे बडोदे सरकारचें लक्ष वेधलें असता मुख्य प्रधानांनी उत्तर दिलें :

The Ganganath institution aimed at nationalist development and ideas incompatible with acquiscence in the present British rule, but no good can be done by attempting to suppress its growth.

म्हणजे गंगनाथ विद्यालय आजच्या पद्धतीच्या ब्रिटिश राज्याच्या विरोधी आहे, परंतु तें बंद करून राष्ट्रीय भावना दडपण्याचा प्रयत्न करणें हितावह होणार नाही. ज्वालाग्राही पदार्थांचा निर्बंध, मुद्रणालयांचा निर्बंध, तसेंच शस्त्रनिर्बंध यांच्यात इंग्रज सरकारने सांगितलेली सुधारणा करण्याला बडोदेकरांनी नकार दिला.

महाराजांचे राजद्रोह्यांशी संबंध

१९०८ मध्ये इंग्रज सरकारला कळलें की गणेश दामोदर सावरकरांचे मित्र शंकरराव वाघ यांना राजपुत्र शिवाजीरावांनी आपल्या सेवेत ठेविलें आहे. तेव्हा राजदूतांनी त्यांना काढून टाकण्याची मागणी केली असता महाराजांनी त्यांना राजपुत्राच्या सेवेतून काढून आपल्या सेवकांत समाविष्ट केलें. महाराजांच्यासह त्यांनी युरोप अमेरिकेच्या यात्राही केल्या. तसेंच संत निहालसिंग यांच्याशी संबंध न ठेवण्याची त्यांना विनंति केली असता त्यांनी त्या संताचें बडोद्यात सरकारी पाहुणे म्हणून स्वागत केलें. व्हँकूव्हर येथे डॉ. तारकनाथ दास यांच्याकडून त्यांनी मानपत्राचा स्वीकार केला.

There is further the strongest ground for believing that the Gaekwad met the most prominent of Indian revolutionaries including Madame Cama at Soiree near Paris in November 1910. On this occasion the Gaekwad is reported to have said that he had no intention of being in India when the King-Emperor visited the country, as he did not wish to pay His Majesty the customary servile homage. Whether this be true or not, it is

admitted that the Maharani whose opinions are well known to be extreme and whose influence with His Highness is considerable, when at Vichy in the summer of 1910 established close relations with Madame Cama, associated with her publicly and exchanged visits; while, as your Lordship is aware, His Highness's second son Shivajirao has adopted and expresses openly the most extreme nationalist views. His Highness himself has recently admitted to your Lordship that when in England he made a donation to the notorious agitator Bipinchandra Pal.

१९१० च्या नोव्हेंबरमध्ये पारी नगरीसन्निध एके संध्याकाळी महाराज आणि प्रमुख भारतीय क्रांतिकारक (त्यात कामाबाईही होत्या) यांची भेट झाली आणि या प्रसंगी महाराजांनी सांगितलें की सम्राट् जॉर्ज भारतात जातील, तेव्हा परदेशीच रहावयाचा आमचा विचार आहे, कारण त्यांच्यापुढे दास म्हणून मिरवावयाची इच्छा नाही. त्यांच्या महाराणींची आणि कामाबाईंची १९१० च्या उन्हाळ्यापासून मैत्री झाली असून त्यांचें महाराजांवर फार वजन आहे. राजपुत्र शिवाजीरावही असेच जहाल बनले असून महाराजांनी बिपिनचंद्र पाल यांना देणगी दिल्याचें त्यांनी स्वतःच आपल्याला सांगितलें होतें. या सुदीर्घ आरोपपत्रिकेत वासुदेव पुरुषोत्तम साठे यांना महाराजांनी दोनशे रुपयांची देणगी दिल्याचा उल्लेख कसा गाळला आहे, कळत नाही. साठे हे बडोद्यातील एक प्रखर राष्ट्रवादी नाटककार असून यांच्या २१ नाटकांपैकी बहुतेक नाटकें मुंबई सरकारने सरकारजमा केलीं होतीं.

महाराजांवरील संकट टाळण्याचा प्रयत्न

१९११ च्या डिसेंबरमध्ये सर्व सामंताच्या समक्ष सम्राटांचा अपमान केल्याबद्दल सयाजीराव महाराजांच्या विरुद्ध जें वादळ उठलें, त्याची सिद्धता बरेच दिवस आधीपासून चालू होती. या प्रकरणाची कुणकूण अनेक प्रमुख संस्थानिकांना लागली असून त्यांनी १९११ च्या जूनमध्ये महाराजांवरील हें संकट टाळण्याचा एक प्रयत्नही करून पाहिला. 'सयाजीरावांच्या सहवासांत' या पुस्तकात इतिहासकार सरदेसाई लिहितात :

"सम्राट् जॉर्ज यांचा राज्याभिषेकसमारंभ संपला. त्या वेळी लहान मोठे दहावीस हिंदी संस्थानिक लंडन येथे एकत्रित झाले होते. त्या सर्वांनी सम्राटांना संतुष्ट करण्याची एक योजना मनात आणली. आपसांत वर्गणी करून सम्राटांना स्कॉटलंडमध्ये शिकारीला न्यावें, तसेंच

त्यांचा एखादा पुतळा उभारून आपले काही हेतु साध्य करून घ्यावेत. या कामासाठी द्रव्य गोळा करणें हा त्या संस्थानिकांच्या हातचा मळ होता. पण त्यांची इच्छा अशी होती की या कामात सयाजीरावमहाराजांनी पुढाकार घ्यावा. पण या योजनेला त्यांची संमति मिळवावी कशी ? महाराजांना या वाटाघाटींची कुणकूण लागल्यापासून एक तर ते एकांतात आपलीं कामें करीत बसत, नाही तर एखाद्या ग्रंथालयात वाचावयाला जात. माधवराव शिंदे तर सयाजीरावमहाराजांना अति घाबरत, हें त्यांनीच मला अनेकवार बोलून दाखविलें आहे. आमच्या निवासस्थानी वेळी अवेळी येऊन शिंद्यांनी शोध घेतला. राजकन्या इंदिरा यांच्याकडून त्यांना माहिती मिळाली की पुष्कळदा मला घेऊन सयाजीरावमहाराज हाइडपार्कमध्ये फिरावयाला जातात. त्यांनीच मला एके दिवशी निरोप सांगितला की उद्या सकाळी सात वाजता शिंदे महाराजांनी आपल्या येथे भेटीस बोलाविलें आहे; काम काय तें मला माहीत नाही; पण तुमची त्यांना एकांतात भेट पाहिजे आहे."

राजकुमारी जेव्हा काम काय तें मला माहीत नाही असें सांगतात, तेव्हा तें काम त्यांच्या जिव्हाळ्याचें असलें पाहिजे, हेंही त्यांच्या पंतोजींना उमजलें नाही. (त्या वेळी माधवरावमहाराजांचें इंदिराराजे यांच्याशी लग्न ठरलेलें होतें.) सरदेसाई माधवमहाराजांच्या भेटीला गेले असता त्यांनी या पंतोजींचा हात धरून त्यांना आपल्या मंचावर बसविलें, याचाही अर्थ मदनाचें राजकारण न कळणाऱ्या त्या विगत-यौवन सेवकाला समजला नाही. महाराजांनी आपल्या हाताने सरदेसायांना चहा दिला. (या उपचारांचा अर्थ हा होता की राजकुमारींना मंचकावर शेजारी बसवून त्यांना स्वहस्ते पेला देण्याची संधि तुम्ही मला मिळवून द्या.) या प्रसंगी माधवमहाराजांनी सरदेसायांना सांगितलें की तुमच्या महाराजांनी सरकारशी वाद घालून त्यांचा रोष संपादला आहे तो काढून टाकून त्यांचें आणि सम्राटांचें सख्य घडवून आणावें, हा माझा मुख्य हेतु आहे. हा हेतु साध्य झाला तरच माधवमहाराज हे सयाजीराव महाराजांचे जावई होऊ शकत होते, नाही तर नाही. महाराज राजद्रोही ठरले तर त्यांच्या कन्येशी विवाह करण्याची माधवमहाराजांच्या मनाची सिद्धता नव्हती. आपलें ठरलेलें लग्न मोडू नये, अशी राजकुमारी इंदिरा यांचीही इच्छा होती. सरदेसाई पंतोजीकडून महाराजांचें मन वळविण्याची कल्पना राजकुमारींचीच. त्यांनीच शिंदेसरकारांचा निरोप सरदेसायांना सांगितला. पण त्यांच्या पंतोजींना मदनाच्या राजकारणाचे हे धागेदोरे काहीच कळले नाहीत. त्याचप्रमाणे महाराजांचा अभिमन्यु

करण्याचें शठांचें करस्थानही त्यांना उमगलें नाही. स्वतः सरदेसायांनीच अन्यत्र लिहिलें आहे :

" महाराजांकडून सम्राटांचा अपमान झाल्याचा आरोप आणि राजकन्या इंदिरा यांचा माधवमहाराजांशी ठरलेला विवाह मोडणें, या दोनही प्रकरणांनी महाराजांचें मनःस्वास्थ्य जें एकदा बिघडून विपरीत बनलें, तें पुनः परत मूळपदावर आलेलें मी कधी पाहिलें नाही. " हा दारुण आघात टाळण्यासाठी सम्राटांना शिकारीला नेण्याच्या आणि त्यांचा पुतळा उभारण्याच्या योजनेला सयाजीराव महाराजांची संमति मिळविण्याचें काम त्या लग्नाला उत्सुक झालेल्या युगुलाने सरदेसायांच्या-वर सोंपविलें होतें. पण या कार्यभाराचा निर्वाह करण्याला ते अपात्र आणि असमर्थ ठरले.

✦ ✦ ✦

प्रकरण तेरावें

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे

स्वराज्य, स्वदेशी, स्वधर्म

स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध अधिकार असल्याची घोषणा टिळकांनी दि. २-५-१९०८ या दिवशी अकोल्याच्या शिवाजी उत्सवात केली. ती अशी: 'स्वराज्य शब्दाची उत्पत्ति शिवाजीचे वेळी झाली. शिवाजी उत्सव चालू झाल्यानंतर बारा वर्षांनी राष्ट्रीय सभेत स्वराज्य शिरलें. स्वराज्याची कल्पना महाराष्ट्रातील पूर्वजांनी आम्हांस दिली आहे. स्वराज्य हें अंतिम साध्य असें म्हणतात. मी म्हणतो, हा आमचा नैसर्गिक अधिकार आहे. स्वराज्याच्या कल्पनेचें आम्हांला काही काळ विस्मरण झालें असलें तरी ती कल्पना अद्यापि महाराष्ट्रात जिवंत आहे. आपणांस स्वराज्याच्या कल्पनेचें विस्मरण झालें होतें; तें होऊ नये, म्हणून पुढाऱ्यांनी यत्न करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. मनुष्याला नाक, कान असतात, त्याचप्रमाणे त्यांच्यासहच स्वातंत्र्याची कल्पनाही उत्पन्न झालेली असते. ज्याला स्वातंत्र्य हें नैसर्गिक वाटत नाही, तो पशु समजावा.'

टिळकांच्या या अमर वाणीचा चालू पिढीतील वाचकांना काहीच परिचय नाही. दहापंधरा वर्षांपूर्वी सर रुस्तुम मसानीसारख्या मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंनी माझ्या एका मित्राला प्रश्न विचारला होता. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे, हा उद्‌गार टिळकांनी केव्हा आणि कोठें काढला?' त्यांची समजूत अशी होती की स्वराज्य या ध्येयाचा उच्चार दादाभाईंनी कलकत्ता काँग्रेसमध्ये केला असून त्यांचें श्रेय आम्ही महाराष्ट्रीय टिळकांना देत आहोत. पण असल्या समजुती त्यांचें राजकारणाचें अज्ञानच दर्शवितात. स्वराज्य हें हिंदुस्थानाचें ध्येय असल्याची पहिली घोषणा दाजी आबाजी खऱ्यांनी १९०६ मध्ये रायगडच्या शिवाजी उत्सवात केली. तिच्यावर अधिकृतपणाचा छाप दादाभाईंनी कलकत्त्यातील काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून मारला. तोपर्यंत स्वराज्य हा शब्द अन्य प्रांतातून रूढ झाला नव्हता. उदाहरणार्थ, तेव्हा बंगालयातील राष्ट्रीय पक्षाचे पुढारी स्वाधीनतेच्या गोष्टी बोलत.

स्वराज्याच्या बोलत नसत. असो. स्वराज्य हें अंतिम ध्येय आहे, म्हणून सांगणें वेगळें आणि स्वराज्य हा नैसर्गिक अधिकार असल्याची घोषणा करणें वेगळें. या घोषणेने Man is born free, but is everywhere found in chains, या रूस्सोच्या सूत्राचें स्मरण होतें. असो. याच अकोल्याच्या घोषणेचें १९१६ मधील स्वराज्याच्या आंदोलनात स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे, असें भाषांतर झालें. शिवाजी उत्सव आणि स्वराज्याची मागणी यांचा असा अन्योन्यसंबंध असल्याने १९०६ मध्ये कलकत्त्याला देउसकरांच्याकडून टिळकांनी अतिशय मोठ्या प्रमाणावर शिवाजी उत्सव घडवून आणला होता.

स्वदेशी आणि स्वधर्म

स्वराज्याचें आंदोलन हें नेहमी स्वत्वावर आधारलेलें असतें. स्वराज्याचें भौतिक स्वरूप स्वदेशी असून त्याचा आत्मा स्वधर्म हाच असतो. अर्थवादी राजकारणामुळे ज्यांना केवळ भौतिक दृष्टीने विचार करण्याची सवय झाली आहे, त्यांना ही साधी गोष्ट कळत नाही की, स्वदेशीच्या मागे स्वधर्माची प्रेरणा असली तरच ती स्वदेशी सुप्रतिष्ठित होते. नाहीतर ती जीवनसत्त्वाच्या अभावी सुकून जाते. उदाहरणार्थ, रानडे आणि त्यांचे अनुयायी अधून मधून स्वदेशीचें नांव घेत असत. नाही, असें नाही. पण त्यांच्या स्वदेशीमागे स्वधर्माची प्रेरणा नसल्याने केवळ बुद्धिचापल्यामुळे ते आज एक तत्त्व सांगत असत, तर उद्या दुसरें तत्त्व सांगत असत. त्यामुळे स्वदेशीचा एका तोंडाने पुरस्कार करणारे हे रानडे दुसऱ्या तोंडाने परदेशी भांडवलाचाही पुरस्कार करीत असत. त्यांचेच चरित्रकार फाटक लिहितात, 'परदेशी भांडवल हिंदुस्थानात आलें म्हणून काही हानि होत नाही, असा माधवरावांचा बालंबाल विश्वास असल्याने त्यांनी औद्योगिक परिषदेपुढील भाषणात परदेशी भांडवलवाल्यांना आपल्या विचारातून वगळलें नव्हतें. पुण्यात १८९० नंतर उदयास आलेल्या नव्या देशभक्तांना माधवरावांनी परदेशी भांडवलाविषयी दाखविलेली अनुकूलता आवडली नाही आणि त्यांनी ती अनुकूलता व्यक्त करू नये, असा टिळक, नामजोशी इत्यादि नव्या देशभक्तांचा आग्रह पडल्याने माधवरावांनी तेवढा भाग गाळण्याचें मान्य केलें. पारतंत्र्याच्या काळात परदेशी भांडवलाचा पुरस्कार करणें म्हणजे गालिबने म्हटल्याप्रमाणे आपला वध करावयाला उद्युक्त झालेल्या मारेकऱ्याला आपणच हत्या करण्याकरिता सुरा आणि पुढची व्यवस्था करण्याकरिता कफन पुरविण्याइतकेंच आत्मघातकी कृत्य आहे. वर

उल्लेखिलेल्या परिषदेत उभय पक्षांनी संधीच्या अटी मोडल्यामुळे भांडणें झालींच. या भांडणावरून धडा घेऊन पुढच्या वर्षी डेक्कन कॉलेजात भारतीय अर्थशास्त्र हें सुप्रसिद्ध व्याख्यान देताना (३०-७-१८९२) रानड्यांनी परदेशी भांडवलापासून असलेल्या धोक्याचा पुढील निर्देश केलेला आहे.

Industries started by European capitalists and conducted by them, or their agents in this country intensify the dangers of absentee landlordism in taking away not only the rent of the land but also the profits of the enterprise and add to our difficulties by compelling us to meet competition on our own soil and from within, in addition to that from without.

म्हणजे युरोपियन भांडवलवाल्यांनी भारतात धंदे चालू केले तर धंद्यातील सारा लाभ ते परदेशी नेतात आणि परदेशाहून आलेल्या मालाशी होणाऱ्या स्पर्धेत येथील परदेशी मालाच्या स्पर्धेची भर पडते. इतकें जर रानड्यांना प्रथमपासून कळत होतें, तर ते विदेशी भांडवलाचा पुरस्कार करीत होते कशासाठी? पण या रानडेपक्षाचें स्वदेशीचें प्रेमच वेगडी होतें. रानड्यांचे इंग्रजी चरित्रकार रावबहादूर गणपतराव मानकर यांनी अगदी आवर्जून सांगितलें आहे की, देशी उद्योगधंद्यांना संरक्षण द्यावें, या मताचे रानडे होते, असें समजण्याची चूक करू नका.

In reality he was not protectionist in the ordinary acceptation of the term.

स्वधर्माधिष्ठित स्वदेशी

स्वदेशाला स्वदेशीची दीक्षा कोणी दिली, याचें संशोधन करून इतिहासाच्या लेखकांनी १८४९ मधील लोकहितवादींच्या लेखापासून आणि सार्वजनिक काकांच्या स्वदेशीच्या पुरस्कारापासून सर्व फुटकळ प्रयत्नांचा साक्षेपाने समाचार घेतला आहे. स्वदेशी हा एक स्वतंत्र आर्थिक प्रश्न आहे, अशा समजुतीने त्यांनी त्या आंदोलनाची पूर्वपीठिका सांगितली असली तरी वस्तुस्थिति तशी नाही. खरी स्वदेशी ही धर्माधिष्ठित असते. म्हणजे धर्माला अनुसरणाऱ्या समाजाची जी एक विशिष्ट राहणी बनते आणि ऋतुपरिवर्तनांना अनुलक्षून त्या समाजाचें वार्षिक व्रतोत्सवांचें जें चक्र बनतें, ती राहणी आणि तें चक्र त्या त्या समाजांतील स्वदेशीचा मुख्य आधार असतें. या मूलाधार चक्रापासूनच आर्थिक स्वदेशीला तिचा जीवनरस लाभतो. ख्रिस्ती धर्माच्या आणि इंग्रजी

शिक्षणाच्या प्रचाराने जेव्हा भारतातील अधिकाधिक लोकांची राहणी पाश्चात्यांच्या पद्धतीची होऊ लागली, तेव्हाच देशात विदेशी आदर्शांचें आणि वस्तूंचेंही प्रस्थ वाढू लागलें; आणि देशाच्या वाढत्या दारिद्र्या-मुळे स्वदेशी धंदे बुडविणाऱ्या, तसेंच स्वधर्माला विसरावयाला लाव-णाऱ्या विदेशी वस्तूंचा खप डोळ्यात खुपावयाला लागला. बाटून ख्रिस्ती झालेल्या समाजाची आणि त्याचें अनुकरण करावयाला आतुर झालेल्या सुधारकांची विदेशी संस्कृति अथवा विकृति, हीच देशातील सर्व अन-र्थांचें मूळ आहे, असें ओळखून सनातनी समाजाने जेव्हा हिंदु संस्कृतीच्या पुनरुद्धाराचें आंदोलन आरंभिलें, तेव्हाच या आंदोलनाचें एक अंग या नात्याने स्वदेशीच्या पुरस्कारालाही समाजात प्रतिष्ठा लाभली. ही घटना संमतिनिबंधाच्या निमित्ताने जेव्हा महाराष्ट्रात सनातनी आणि सुधारक यांचें निकराचें युद्ध जुंपलें, तेव्हा म्हणजे १८९० नंतरच्या दश-कात घडून आली. याच दशकात टिळकांनी 'ओरायन अथवा वेद-कालनिर्णय' हा प्रबंध प्रसिद्ध करून आधुनिक संशोधकांच्या पद्धतीने वेदांचें प्राचीनत्व सिद्ध करून हिंदु धर्माला आणि आपल्या व्यक्तित्वा-लाही अभिनव प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. टिळकांच्या 'केसरी'प्रमाणेच कलकत्त्याच्या 'वंगवासी' पत्राने त्या दिवसांत संमतिनिबंधाविरुद्ध निकराचा प्रचार केला होता आणि स्वदेशीचा प्रचारही चालविला होता. संमतिनिबंधाविरुद्ध 'वंगवासी'करांनी लिहिलेल्या लेखांनिमित्त त्यांच्यावर राजद्रोहाचा अभियोगही ओढवला होता. पण टिळकांच्या सारखे प्रकांड पांडित्य आणि प्रभावी व्यक्तित्व त्यांना लाभलें नव्हतें. तसेंच राजद्रोहाच्या अभियोगात त्यांनी क्षमायाचना केल्यामुळे त्यांच्या उपदेशाला बंगाली समाजातही सर्व चळवळींना आवश्यक असें नैतिक अधिष्ठान उरलें नव्हतें. समर्थांनी सांगितलेंच आहे, 'सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील त्याचें। परंतु तेथे भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे।' या अमर ओवीतील भगवंताचें अधिष्ठान म्हणजेच वर उल्ले-खिलेलें नैतिक अधिष्ठान होय. स्वदेशी चळवळीला धार्मिक अधिष्ठा-नाची दुसऱ्याही एका कारणाकरिता आवश्यकता होती. स्वदेशी हें एक व्रत होतें आणि त्या व्रताचें पालनही धार्मिक व्रतांचें पालन करण्याचा प्रथमपासून अनुभव असलेल्या समाजालाच शक्य होतें.

लंकावस्त्रदहन

गणेशोत्सवाचा उपक्रम होऊन महाराष्ट्राची मनोभूमिका स्वदेशी व्रताचा स्वीकार करण्याला उपयुक्त झाली असतानाच १८९४ मध्ये

हिंदुस्थान सरकारने वार्षिक आयव्यय पत्रकात मँचेस्टर येथून भारतात येणाऱ्या कापडावरील कर काढून टाकल्याची घोषणा केली. या अन्यायामुळे महाराष्ट्रातील राष्ट्राभिमानी लोकांना पराकाष्ठेची चीड आली.

"या अन्यायाच्या वर्तनाचा आपल्याला जो तिटकारा आला आहे, तो नुसता सभा भरवून, अथवा आवेदन पाठवून सरकारच्या दृष्टीस आणून स्वस्थ बसावें, अशा प्रकारचा नाही, असें पुष्कळांचें मत आहे. या पक्षपाती वर्तनाचे वास्तविक परिणाम सरकारास कळणें इष्ट आहे, अशी बऱ्याच मंडळींनी इच्छा प्रदर्शित केल्यावरून सरकार लँकेशायरहून येणाऱ्या सुती कापडावर कर बसवीपर्यंत तें कापड वापरणार नाही, अशा शपथा घेऊन त्याप्रमाणे वागण्याचा निश्चय करावा आणि ही गोष्ट सिद्धीस जाण्यास काय योजना करावी, याचा विचार करण्याकरिता १४–६–१८९४, गुरुवारी सायंकाळी सार्वजनिक सभेत मंडळी येणार आहेत तरी तेव्हा आपण अगत्य येण्याची कृपा करावी. अप्रतिहत व्यापारासंबंधाने आणि देशी कापड वापरण्यासंबंधाने कोणाचीं काहीही मतें असलीं तरी तीं या वेळी एकीकडे ठेवून निदान मँचेस्टरच्या कापडावर कर बसेपर्यंत तें कापड वापरणार नाही असा मनाचा निर्धार करून सर्व ठिकाणी प्रभावी चळवळ करून लोकांचीं मनें या उघड अन्यायाविषयी जाग्रत् केलीं पाहिजेत, असें येथे बऱ्याच मंडळीस वाटत आहे. याकरिता त्याचा विचार करण्याकरिता मंडळी जमणार आहेत. त्या वेळी येण्यास आपण अनमान करणार नाही, अशी पूर्ण आशा आहे." वरील पत्रक १३–६–१८९४ या दिवशी गोपाळ कृष्ण गोखले यांनी सार्वजनिक सभेचे कार्यवाह या नात्याने काढलें होतें. या प्रसंगीच प्रथम सभेत निषेध आणि सरकारकडे आवेदनें हें नेहमीचे चळवळीचे मार्ग त्याज्य ठरवून अन्यायाचा प्रतिकार करण्याकरिता जनतेला संघटित करण्याची आवश्यकता पुण्याच्या राष्ट्रीय पक्षाने प्रतिपादण्यास प्रारंभ केला. हें पत्रक गोखल्यांच्या नांवाने निघालें असलें तरी पुढे एक दोन वर्षांत ते स्वतः सार्वजनिक सभा सोडून गेले आणि वंगभंगानंतर ते जेव्हा बहिष्काराच्या आंदोलनास विरोध करू लागले, तेव्हा, या पत्रकाचा टिळकांनी गोखल्यांचें नैतिक अधिष्ठान नष्ट करण्याकरिता ब्रह्मास्त्र म्हणून उपयोग केला. यावरून या पत्रकातील विचारसरणी कोणाची होती, हें वाचकांना कळेलच. १८९४ मधील हा अन्याय पचल्यानंतर १८९६ मध्ये सरकारने मँचेस्टरच्या कापडाला उत्तेजन देण्याकरिता दरिद्री समाजाला लागणाऱ्या देशी जाड कापडावरही साडेतीन टक्के कर बसविला. त्यामुळे लँकेशायरच्या गिरणीवाल्यांना जाड कापडाच्या बाबतीतही स्वदेशी

गिरणीवाल्यांशी चढाओढ करता येऊ लागली. तेव्हा टिळकांनी केसरीतून त्याच विचारसरणीचा अनुवाद केला.

सरकारने जरी अन्याय केला तरी त्याचा प्रतिकार करणें काही अंशी तरी तुमच्या स्वाधीन आहे. तो प्रतिकार कोणता म्हणाल तर सर्वांनी देशी कपडा वापरावयास लागावें, हाच होय. मुंबई, पुणें, सातारा, नगर आणि उमरावती या ठिकाणी लोकांच्या सभा भरवून देशी कपडा वापरण्याचे ठराव संमत झाले आहेत. इतर ठिकाणचे लोक ह्यांचे अनुकरण करतील अशी आम्हांस आशा आहे. जोपर्यंत तुमच्या अंगात अशा प्रकारे प्रतिकार करण्याची शक्ति आली नाही, तोपर्यंत तुमच्या आवेदनास अथवा विधिमंडळातील तुमच्या प्रतिनिधींच्या युक्तिवादास कोणीही भीक घालणार नाही. यापेक्षा अधिक लिहिणें अशक्य आहे.

याप्रमाणे लेखात जें लिहिणें अशक्य होतें, तें म्हणजे मारुतीच्या लंकादहनाप्रमाणे भारतात निदान लंकावस्त्रदहन करणें, तें त्या दिवसांत टिळकांच्या अनुयायांनी परस्पर आरंभिलें होतें. याचा उल्लेख अमलेश त्रिपाठी यांनी 'राष्ट्रीय पक्षाचे आव्हान' (The extremist challenge) या ग्रंथात ५१ पानावर १७–३–१८९६ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या अंकावरून केला आहे.

Mass meetings were held to secure pledges of Swadeshi. Public burning of British clothing was resorted to.

टिळकांच्या अनुयायांनी हें जें लंकावस्त्रदहन १८९६ मध्येच आरंभिलें होतें, त्यावरून ग्रंथिक संन्निपाताच्या आगमनापूर्वीच महाराष्ट्राचें राजकीय वातावरण किती संतप्त झालें होतें, याची कल्पना येईल. स्वदेशी, बहिष्कार आणि लंकावस्त्रदहन यांच्या प्रचाराच्या प्रभावाने मुंबईत त्या वर्षी तेरा नवीन कापडाच्या गिरण्या निघाल्या. याचा अर्थ असा की टिळक पक्षाने लँकेशायरला माघार घ्यावयाला लाविली की गुजराथी गिरणीवाले तो प्रदेश ताब्यात घेऊन त्याची पुढील सुव्यवस्था लावून देत !

'आर्थिक राष्ट्रवादाचा उदय आणि वाढ'

दिल्लीचे एक आचार्य विपानचंद्र यांनी 'भारतातील आर्थिक राष्ट्रवादाचा उदय आणि वाढ' या विषयावरील आपल्या ग्रंथात टिळकांच्या १८९६ मधील स्वदेशी चळवळीची अधिक माहिती दिली आहे. त्यावरून असें दिसून येतें की त्या वेळी महाराष्ट्रात ठिकठिकाणी स्वदेशी संघ स्थापले होते आणि या संघांच्या वतीने सभा आणि पत्रकें

यांच्याद्वारा स्वदेशीचा तर प्रचार होत होताच. त्याव्यतिरिक्त या निराकार उपदेशाला साकार स्वरूप देण्याकरिता विदेशी वस्त्रांच्या होळ्याही होत होत्या.

In order to give a concrete visible proof of the popular determination to boycott English cloth it had organised a public demonstration where people had burnt their English clothing. According to the '*Times*' Correspondent it was impossible for a respectable citizen to go with a new English piece of cloth without being asked a hundred perplexing questions. The students of the new English School also organised a similar public burning of foreign cloth. According to the '*Nyayasindhu*' of 2 March of 1896, huge bundles of English clothing were thrown into the Holi fire that year. (page 130)

यावरून असें समजतें की १८९६ मध्येच न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी परदेशी कापडाची होळी केली होती. त्या वर्षाच्या होळीत सर्वत्र लंकावस्त्रदहन चालू झालें होतें, असें २–३–१८९६ च्या 'न्यायसिंधू'वरून समजतें. या सर्व होळ्यांच्या मुळाशी टिळक होते, असें सरकारी हेरांचीं प्रतिवृत्तें सांगतात. १९०५ मध्ये सावरकरांच्या उद्योगामुळे सीमोल्लंघनाच्या मुहूर्तावर लकडी पुलापलीकडे झालेल्या लंकावस्त्रदहनाच्या प्रसंगी शिवरामपंत परांजप्यांचें जें प्रभावी भाषण झालें, त्या भाषणाच्या रूपरेषा पंतांनी १८९६ च्या दिवसांतच गिरविल्या असाव्यात.

राष्ट्रैक्यासाठी स्वदेशीचा उपयोग

स्वदेशी कापडाचा धंदा मारून टाकण्याकरिता इंग्रज सरकारने गिरण्यांच्या जाडयाभरडया कापडावरही जेव्हा कर बसविला, तेव्हा या राष्ट्रीय संकटाला तोंड देण्याकरिता सर्वांनी मतभेद विसरून एकत्र यावें, असा कळकळीचा उपदेश टिळकांनी 'मराठा' पत्रात केला होता.

Sceptical English opponents of young India have always been crying themselves hoarse, that India can never be a nation. Let this terrible crisis make us one. This is not a time for hesitations and scruples. All private differences must be sunk for the national cause, and natives and Anglo-Indians must unite to face the common enemy.

इंग्रज संशयात्मे भारत हें कधीच एकराष्ट्र बनणार नाही, असा प्रचार करीत असतात. याकरिता या आणीबाणीच्या प्रसंगी आपण सर्व एक होऊन या आक्षेपाला उत्तर देऊ या. शंकाकुशंका काढण्याची, किंवा

द्विधा वृत्ति व्यक्त करण्याची ही वेळ नव्हे. राष्ट्रहितासाठी भारती आणि आंग्लभारती यांनीही आपले भेद विसरण्याची ही वेळ आहे. या आंदोलनाचें मूल्यमापन करताना आचार्य विपानचंद्र म्हणतात :

In its political implications this miniature boycott of foreign cloth campaign in Maharashtra was not less significant than the political agitation against the excise duty, for it represented a new form of direct action by the people themselves. It represented the spirit of self-help, as against reliance on appeals to foreign rulers for redress of grievances.

गिरणी कापडावरील कराविरुद्ध चालविलेल्या आंदोलनाच्या मानाने विदेशी कापडावरील बहिष्काराचें महाराष्ट्रातील आंदोलन कमी महत्त्वाचें नव्हतें. कारण या आंदोलनाने परक्या राज्यकर्त्यांना विनवण्या करण्याच्या लज्जास्पद धोरणाचा त्याग करून जनतेला स्वावलंबी बनण्याचा नवा मार्ग दाखवून दिला होता. पण परक्या राज्यकर्त्यांपाशीच ज्यांनी स्वार्थत्यागाचे आणि देशभक्तींचे अभिनव धडे घेतले होते, त्यांनी स्वदेशाच्या स्वार्थाचा आणि स्वाभिमानाचाच त्याग करू नये तर काय करावें ? तेव्हा आंग्लभारती वर्तमानपत्रांना अनुसरून टिळकांनी आरंभिलेल्या स्वदेशीच्या आंदोलनाला अपशकुन करण्याचें काम रानडेपक्षाचे वाच्छा आणि गोखले हे १८९६ मध्येही करीत होते. 'देशी कापड वापरण्याबद्दल मि. वाच्छा यांचे विचार' (दि. १७–३–१८९६) या अग्रलेखात टिळकांनी वाच्छांचा समाचार घेतला असून 'उत्तरच पाहिजे तर हें घ्या' (दि. ३१–३–१८९६) या अग्रलेखात गोखल्यांच्या 'सुधारक' पत्राचा समाचार घेतला आहे. पुढे स्वदेशी चळवळीच्या दिवसांत सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकरांनी परदेशी साखरेचा कैवार घेऊन टिळकांच्या 'सर आणि साखर' या सुप्रसिद्ध अग्रलेखाला जन्म देण्याचें श्रेय संपादलें. बहिष्काराची चळवळ चालू झाल्यानंतर तिला विरोध करण्याकरिता, एके काळी सार्वजनिक सभेच्या वतीने बहिष्काराचीं पत्रकें काढणारे गोखले प्रतिपादू लागले की आमचा बहिष्काराला विरोध असला तरी प्रामाणिक स्वदेशीला विरोध नाही. या प्रसंगी टिळकांनी सार्वजनिक सभेच्या वतीने गोखल्यांनी दहाबारा वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेलें बहिष्काराचें पत्रक प्रकाशित करून गोखल्यांच्या प्रामाणिकपणावर पुरेसा प्रकाश पाडला. १८९० पासून १९२० पर्यंतच्या दिवसांत टिळकांच्या लक्षावधि अनुयायांनी स्वदेशी कापड आणि साखर वापरण्याच्या शपथा घेऊन त्या धार्मिक व्रताप्रमाणे पाळल्या नसत्या तर या

धंद्यातून मोठ्या प्रमाणावर भांडवल घालण्याचा धीरही भांडवलवाल्यांना झाला नसता. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की विदेशी भांडवलाचें स्वागत करावयाला सिद्ध झालेल्या रानडेपक्षाचें सार्वजनिक सभेतूनच नव्हे तर जवळजवळ सार्वजनिक जीवनातूनही उच्चाटन करून आपल्या क्रांतिकारक पक्षाची दहशत मुंबई प्रांतातील युरोपियनांना टिळकांनी बसविली नसती तर कलकत्त्यातील ताग, नीळ, चहा इत्यादि धंद्यांप्रमाणेच मुंबईचा कापडधंदाही विदेशी भांडवलवाल्यांच्या हाती गेला असता आणि मग मुंबई ही स्वराज्याच्या आंदोलनाची राजधानीही होऊ शकली नसती. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात टिळकांचें वैदिक संशोधन आणि विवेकानंदांचा प्रभावी प्रचार यांमुळे झालेल्या हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या पायावरच भारताच्या औद्योगिक उन्नतीचा भव्य प्रासाद उभा राहिला आहे. हें साधें ऐतिहासिक सत्य ज्यांना आजपर्यंत समजलें नाही आणि हें सांगितल्यानंतरही ज्यांना तें पटणार नाही, अशा अर्थवाद्यांशी बुद्धिवाद करण्यात स्वतः परमेश्वरालाही अपयश येईल!

स्वदेशी आंदोलनाला धर्माचा प्रभावी पाठिंबा

स्वदेशीचें आंदोलन हें प्रथम महाराष्ट्रातच उद्भवलें. वासुदेव बळवंतांचे पुण्यातील अनुयायी स्वदेशीचीं पदें म्हणून प्रचार करीत असल्याचा बोभाटा इंग्लंडच्या लोकसभेत १८८० च्या दिवसांतच झाला होता. जमशेटजी टाटांनी १८८५ मध्ये मुंबईत कापडाची गिरणी चालू केली, तिला स्वदेशी हें नांव देऊन महाराष्ट्रातील स्वदेशीनिष्ठा साकार करून ठेविली होती. तरीसुद्धा गणेशोत्सवाने धार्मिक भावनेचें पुनरुज्जीवन करीपर्यंत स्वदेशी आंदोलनाला काहीच महत्त्व प्राप्त झालें नाही. या उदाहरणापासून धडा घेऊन १९०५ च्या दिवसांत बंगाली नेत्यांनीही आपल्या स्वदेशी आंदोलनाला धर्माचें अधिष्ठान मिळवून दिलें. रूसी लेखकांनी लिहिलेल्या टिळकयुगावरील प्रबंधात म्हटलें आहे :

> The swadeshi movement in Bengal soon acquired a strong religious tinge. Its leaders appealed to the religious feelings of the people who began to take the Swadeshi vow. That was no accident. Religion had a tremendous place in India which was just embarking on the capitalist road.

बंगालयातील स्वदेशी आंदोलनाला लौकरच धार्मिक स्वरूप प्राप्त झालें. त्या आंदोलनाचे नेते लोकांना स्वधर्माला स्मरून स्वदेशीच्या शपथा घेण्याचा उपदेश करू लागले. हा काही अपघात किंवा अपवाद

नव्हता. हिंदुस्थानात त्या वेळीं धर्माचा प्रचंड प्रभाव होता. असल्या प्रभावी शक्तीचा ज्याला सदुपयोग करून घेता येत नव्हता, तो लोकपक्षाचा पुढारी बनणेंच शक्य नव्हतें.

स्वदेशीमध्ये सर्वधर्मांचें सहकार्य

टिळक हे हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनासाठी झटत असले तरी त्यांचें धर्मप्रेम इतर धर्मांच्या द्वेषावर आधारलेलें नव्हतें. हिंदुस्थानाचें एक-राष्ट्र बनविताना हिंदुत्वाची उपेक्षा करणें जसें चूक, तसेंच अन्य धर्मांची उपेक्षा करणेंही चूक असें त्यांना जाणवत होतें. १९–१–१९०४ च्या 'केसरी'त त्यांनी लिहिलेंच होतें :

"हिंदुस्थानातील तीस कोटि प्रजेस एकत्र आणण्याकरिता हिंदुत्वा-व्यतिरिक्त दुसरींही काही साधनें पाहिलीं पाहिजेत, हें खरें, पण त्याच्या बरोबर हेंही लक्षात ठेविलें पाहिजे की तीस कोटींपैकी वीस कोटी प्रजा हिंदुत्वाने एकत्र झालेली आहे, तिचें बंधन टिकविणें हें राष्ट्रीयदृष्ट्या अधिक सोयीचें, शक्य आणि आवश्यक आहे."

भारतातील सर्व धर्मांच्या अनुयायांना एकत्र आणण्याचें अमोघ साधन म्हणजे स्वदेशी हें टिळकांनी १८९६ च्या स्वदेशी चळवळीतच सांगितलें होतें. या संबंधीचा 'मराठ्या'तील लेखाचा उतारा वर घेतलाच आहे, याचेंच अधिक स्पष्टीकरण करताना ९–६–१९०६ या दिवशी कलकत्त्याच्या शिवाजी उत्सवातील एका सभेत बोलताना त्यांनी प्रति-पादन केलें :

Swadeshi corresponded to what they called in English nationality and patriotism. Swadeshism included that and something more, all that was meant by nationality and partiotism, combined together. Hindus and Mahomedans, Christians and Jains, Parsis and Buddhists could be combined if they brought Swadeshi in their religion. Swadeshi taught them to hold their own against other nations.

इंग्रजीत ज्याला राष्ट्रीयता, देशाभिमान म्हणतात, तद्वतच आपली स्वदेशी आहे. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, जैन, पारशी आणि बौद्ध यांनी आपल्या धर्मांत स्वदेशीचा अंतर्भाव केला, म्हणजे ते एका सूत्रात बांधले जातील. याच तत्त्वाच्या प्रभावाने आपण इतर राष्ट्रांना तोंड देऊ शकू.

स्वदेशी आंदोलनाचा प्रारंभ

१९०५ च्या उत्तरार्धात वंगभंगाची प्रतिक्रिया म्हणून स्वदेशी बहिष्काराचें आंदोलन चालू झालें. अरविंदांचे नातेवाईक कृष्णकुमार मित्र यांच्या संजीवनी पत्राने बंगालमध्ये बहिष्काराचा प्रथम पुरस्कार केला, तो अरविंदांच्या प्रेरणेने केला, हें सांगावयाला नकोच. अरविंदांना १८९६ मधील टिळकांच्या स्वदेशीवस्त्रपुरस्काराच्या आणि विदेशीवस्त्रदहनाच्या आंदोलनाचा इतिहास पुरता अवगत होता. त्या इतिहासाच्या प्रेरणेनेच त्यांनी वंगभंगाच्या अत्याचाराचा प्रतिषेध आणि प्रतिकार करण्याकरिता, किंबहुना प्रतिशोध घेण्याकरिता कृष्णकुमार मित्रांच्या हस्ते स्वदेशीबहिष्काराच्या संयुक्त आंदोलनाचें ध्वजारोहण केलें. मात्र या वेळचें बंगाल्यातील आंदोलन एकट्या स्वदेशी वस्त्रापुरतें मर्यादित न ठेविता सर्वच विदेशी वस्तु वर्ज्य करण्याचा कलकत्त्याच्या राष्ट्रीय पक्षाने संकल्प सोडला. त्यातल्या त्यात विदेशी वस्त्र, साखर आणि मीठ यांच्यावर वंग नेत्यांचा विशेष कटाक्ष होता. यामुळे १९०५-मधील आंदोलन हेंच स्वदेशी आंदोलन म्हणून ओळखलें जातें आणि तें नांव सार्थच आहे. या आंदोलनाचा मुख्य भर विदेशी वस्त्रवर्जनावरच होता आणि या कार्यक्रमात बंगाली नेत्यांना मुंबईतील गिरणीवाल्यांच्या सहकार्याची आवश्यकता होती. यासाठी त्यांनी स्वदेशी कापडाच्या राजांची अनुकूलता आपल्या आंदोलनासाठी संपादन करण्याची कामगिरी टिळकांवर सोपविली. पण १९०५ मध्ये मुंबईचे गिरणीवाले हे घोड्यावरस्वार झाले होते. कारण रूसो-जपानी युद्धापासून चीनचा कापडाचा व्यापार हस्तगत करण्याच्या उद्योगात ते गुंतले होते. हें महत्कार्य स्थगित करून स्वदेशीच्या शपथा प्रथमच घेणाऱ्या बंगाल्यांना स्वस्तात स्वदेशी कापडाचा पुरवठा करण्यात त्यांचा काहीच लाभ नव्हता. त्यामुळे नरोत्तम मुरारजी अथवा त्यांच्या गिरण्यांचे मुख्य व्यवस्थापक दिनशा वाच्छा यांनी टिळकांची भेटसुद्धा घेण्याचें नाकारलें, यात काहीच नवल नाही. पण पुढे जपानचा रशियाशी संधि झाल्यामुळे जपानी मालाचा चीनमध्ये जेव्हा पुनः प्रवेश झाला, तेव्हा या गिरणीवाल्यांचें स्वदेशी आंदोलनाकडे लक्ष जाऊ लागलें. ही गोष्ट १९०७ मध्ये घडली. त्या वर्षाच्या प्रारंभी चीनकडील निर्यात अगदीच रोडावल्यामुळे मुंबईतील सुताच्या २४ गिरण्या बंद पडल्या. पण त्या वर्षी स्वदेशी आंदोलनाचा प्रभाव फार असल्याने त्यांपैकी अर्ध्याअधिक गिरण्या १९०७ च्या उत्तरार्धात परत चालू झाल्या. त्यामुळेच मुंबईच्या गिरण्यांतील कामगारवर्ग टिळकांना अन्नदाता म्हणून ओळखू लागला.

गोखल्यांच्या हस्तकांचा स्वदेशीला विरोध

या परिस्थितीतही गोखल्यांच्या के. नटराजन्सारख्या (इंडियन सोशल रिफॉर्मरचे संपादक) हस्तकांनी स्वदेशीबहिष्काराला विरोध चालविला होताच.

It can be easily shown that boycott is the economic antithesis of swadeshi. Capital is produced by saving. The boycott, by raising prices, reduces the saving capacity of the people and thus decreased their power of producing capital.

या स्वदेशीच्या आणि स्वदेशाच्या हितशत्रूंच्या भ्रामक युक्तिवादाप्रमाणे भारतीय जनतेने महाग स्वदेशी कापड विकत घेतलें म्हणजे भांडवल उत्पन्न करण्याचें तिचें सामर्थ्य कमी होतें. पण या जनतेने स्वस्त परदेशी कापड विकत घेतलें म्हणजे स्वदेशात भांडवल उत्पन्न करण्याची शक्यताच नष्ट होते, ही महत्त्वाची गोष्ट हे देशद्रोह्यांचे हस्तक लपवून ठेवीत होते. इंडियन सोशल रिफॉर्मरने १९०७ च्या मेमध्ये हे विचार व्यक्त केले, त्याच सुमाराला सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकरांनी सुरत येथील मुंबई इलाखा प्रांतिक परिषदेत अध्यक्ष या नात्याने स्वदेशीचा ठराव आणण्यालाही बंदी केली होती. यावरून या देशद्रोही पक्षाच्या कृतींची वाचकांना थोडी फार कल्पना येईल.

'सर आणि साखर'

स्वदेशीच्या आंदोलनात परदेशी साखरेवरील बहिष्काराला अतिशय महत्त्व आलें होतें. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून जावा, मॉरिशस येथील उसाच्या साखरेसह जर्मनीची बीटनामक वनस्पतीपासून केलेली साखर इतक्या मोठ्या प्रमाणावर येऊ लागली की, बीट साखरेची आयात नियंत्रित करण्याकरिता तिच्यावर आयातकर बसविण्याची आज्ञार्थी सूचना इंग्लंडच्या उपनिवेशमंत्र्यांनी लॉर्ड कर्झन यांना केली होती. १९०० पासून १९०५ पर्यंतच्या अवधीत हिंदुस्थानातील उसाची लागवड पांच लक्ष एकरांनी कमी झाली आणि विदेशीसाखरेची आयात पावणेदोन लक्ष टनांनी वाढली. विदेशी साखर अगदी शुभ्र दिसावी, यासाठी ती स्वच्छ करण्याकरिता हाडाची पूड वापरीत असत. या हाडाच्या पुडीचा बोभाटा प्रथम पंजाबात होऊन तेथील व्यापाऱ्यांनी १९०५ च्या अंती परदेशी साखरेवर कडक बहिष्कार पुकारला. विदेशी साखर स्वच्छ करण्याकरिता हाडाची पूड वापरतात, ही गोष्ट मराठी क्रमिक पुस्तकांतूनही छापली होती. पण स्वदेशीचें वारें सुटेपर्यंत तिकडे कोणाचें लक्ष

गेलें नव्हतें. १९०७ च्या मेमध्ये शिक्षणविभागातील कोणी निवृत्त अधिकारी मुंबईच्या सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकरांच्याकडे गेले आणि क्रमिक पुस्तकांतल्या, साखरेतील हाडाची पूड काढून टाकण्याची सरकारला विनंती करण्याकरिता ते सर भालचंद्रांना विनवू लागले. या अधिकाऱ्यांच्या विनंतीला अनुसरून सर भालचंद्रांनी सरकारला लिहिलेल्या पत्राची एक प्रत टिळकांच्या हाती लागली. तेव्हा सरकारला सत्यापलाप करावयाला शिकविणाऱ्या या पदवीधरांचा उद्धार टिळकांनी 'सर आणि साखर' या लेखात केला होता. (ही माहिती गार्गी भाटवडेकर यांच्या ग्रंथावरूनच मी घेतली आहे.) या प्रकरणी टिळकांविरुद्ध मानहानीचा अभियोग चालविण्याची चर्चाही भाटवडेकरांच्या परिवारात झाली. शेवटी त्या स्नानसंध्याशील गृहस्थांना देवाने सुबुद्धि दिल्याने ते स्वस्थ बसले.

युवराजांवर बहिष्कार

स्वदेशी आंदोलनाच्या प्रारंभापासून टिळकांनी स्पष्टपणे सरकारी अधिकाऱ्यांना धाब्यावर बसविण्याचा उपदेश आरंभिला :

'दहा पंधरा सहस्र लोक कलकत्त्यातच काय, पण भारतातील कोणत्याही नगरात केव्हाही एकत्र आणता येतील. पण एका रक्षकाच्या दरडावणीने वाऱ्यापुढे जसें भूस चोहोकडे उडून जातें, तद्वत् हे लोक जर पांगून जातील, तर ते जमले काय आणि न जमले काय सारखेंच ! लोकमताचें बल निश्चयात आहे, केवळ समुच्चयात नाही. शब्द नकोत, कृति पाहिजे आणि तीही निश्चयाची कृति पाहिजे. अशा वेळी आम्ही जर कर्तव्यास चुकलो आणि युवराज (पुढे पांचवे जॉर्ज) इकडे आल्यावर इंग्रजी 'डायमंड लेदरचा बूट' चढवून लोटांगण घालीत त्यांच्याकडे गेलो, तर आमच्या आणि आमच्या मतांच्या पोचटपणास पारावार नाही, असें राज्यकर्त्यांच्याच नव्हे तर सर्व जगाच्या निदर्शनास येऊन चुकणार आहे.

अशी निश्चयाची कृति या नात्यानेच टिळकांनी राष्ट्रीय सभेच्या काशी येथील अधिवेशनात युवराजांच्या स्वागताला निकराने विरोध केला होता. या विरोधाचें नेतृत्व आपल्यासारख्या राजद्रोही पुणेकराने करण्यापेक्षा राजनिष्ठ पंजाबातील आणि गोखल्यांच्या विश्वासातील लाजपतरायांनी करणें इष्ट म्हणून त्यांनी त्यांना पुढे केलें होतें. पण शेवटी गोखल्यांच्या प्रभावाला लालाजी बळी पडल्यामुळे युवराजांच्या स्वागताला राष्ट्रीय सभेत विरोध करण्याची योजना बारगळली.

बहिष्कारयोगाचा पुरस्कार

राष्ट्रीय सभेत युवराजांच्या स्वागतावर जरी बहिष्कार घालता आला नाही, तरी बहिष्काराचा ठराव संमत झाला होता. बहिष्काराच्या चळवळीचे विचार टिळकांच्या मनात प्रथमपासूनच घोळत होते.

"बहिष्कार हा शब्द मूळ जरी धार्मिक शिक्षेचा वाचक असला तरी काळें पाणी या रूपाने त्याचा राजकीय दंडविधानात म्हणजे पिनलकोडात समावेश झालेला आहे. या राजकीय रूपांतराप्रमाणेच त्याचें व्यावहारिक रूपांतर व्हावयास पाहिजे, असें 'केसरी'त पहिल्या वर्षी (१८८१) आयर्लंडातील लँडलीग संबंधी लिहिताना आम्ही लिहिलें होतें. एकदा बहिष्कारास व्यावहारिक शिक्षेचें स्वरूप मिळाल्यास त्यापासून आपणांस पुष्कळ उपयोग करून घेता येईल आणि ज्या सहस्रावधि गोष्टी आपली हानि करण्यास कारण होतात त्यांचा पुरता प्रतिबंध करता येईल, असें त्या वेळी आम्ही म्हटलें होतें."

बहिष्कार ही बंडाच्या अलीकडची पायरी

'राष्ट्रीय बहिष्कार' (२२-८-१९०५) या लेखात टिळकांनी लिहिलें होतें. "राज्यकर्ते जेव्हा प्रजेचें ऐकत नाहीत, तेव्हा प्रजा क्षुब्ध होऊन राजास शासन करण्यास प्रवृत्त होते. याचें एक मोठें उदाहरण इंग्लंडच्या इतिहासात घडून आलें आहे. अनेक आचारविचारांनी विभक्त झालेल्या आणि राज्यकर्त्यांनी निःशस्त्र केलेल्या अनाथ हिंदुस्थानास हा उपाय करणें शक्य नाही. पण उत्तम रामबाण औषध मिळत नाही, म्हणून सामान्य औषधाचीही आम्ही योजना करू नये असें कोण म्हणेल? शस्त्रास्त्रें गेलीं म्हणजे केवळ संघशक्तिच उरते. या संघशक्तीचा उपयोग वैध रीतीने राज्यकर्त्यांची धुंदी उतरण्याकरिता करता येईल तर धैर्याने आणि आत्मविश्वासाने अशा प्रकारचा उद्योग करणें हें हिंदुस्थानाविषयी आत्मीयता बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य होय. याकरिता जो उद्योग करावयाचा तो हिंडमन यांनी आपल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे निग्रहाने, निश्चयाने, किंबहुना माथेफिरूपणानेही केला पाहिजे. त्यावाचून गत्यंतर नाही."

या लेखातील स्वदेशीचा प्रचार माथेफिरूपणानेही करण्याची टिळकांची सूचना माथेफिरू लोकांनी मोठ्या आदराने आपल्या मस्तकी धारण केली असावी. त्या दिवसांत टिळकांचे लेख काशी, प्रयाग, कलकत्ता, अहमदाबाद, लाहोर, मद्रास इत्यादि नगरांतील वृत्तपत्रांतून

प्रसिद्ध होत असत आणि त्या मृतसंजीवनी मात्रेचा मूर्च्छित राष्ट्राला शुद्धीवर आणण्याकरिता अतिशय चांगला उपयोग होत असे.

स्वदेशी आंदोलनाचें यश

स्वदेशी आंदोलनाला कितपत यश आलें, याचा पद्धतशीरपणे विचार करणें आवश्यक आहे. पण या ग्रंथात त्रोटक माहिती देऊनच भागवावें लागेल. स्वदेशी आंदोलन चालू झाल्यापासून देशी कापडाचें मूल्य सरासरी दहा टक्क्यांनी वाढलें आणि विदेशी कापडाचें मूल्य पंचवीस टक्क्यांनी उतरलें. रूसो-जपानी युद्धाच्या समाप्तीनंतर १९०७-पासून देशी कापडाच्या धंद्यात जी मंदी येऊ लागली होती, ती त्या वर्षी स्वदेशीचें आंदोलन जोरात असल्याने टळली. ही कापडाच्या धंद्या-पुरती कथा झाली. याच आंदोलनात स्वदेशी विमा मंडळयांचीही स्थापना झाली. यासंबंधी लल्लुभाई सामळदासांनी अशी कथा सांगितली होती की, स्वदेशी आंदोलनाने प्रभावित झालेल्या सुब्रह्मण्य अय्यर नांवाच्या गणितज्ञांनी आम्हांला त्या दिवसांत एका स्वदेशी विमामंडळीची योजना करून दिली. तिचा विचार करून आम्ही काही जणांनी मिळून स्वदेशी विमामंडळीची स्थापना केली आणि तिच्या व्यवस्थापकाचें काम सुब्र-ह्मण्यांनाच दिलें. पण लौकरच सरकारने स्वदेशी आंदोलन बंद पाडलें, म्हणून आम्ही स्वदेशी नांव टाकून नुसते मुंबई आयुष्यविमा मंडळी हें नांव घेतलें. कलकत्त्यातही याच वेळी हिंदुस्थान सहकारी विमा मंडळीची स्थापना सुरेंद्रनाथ ठाकूर यांनी केली. चुनीलाल सरैय्यांची स्पेसी बँक आणि हरकिसनलालांची पीपल्स बँक या मोठ्या पेढ्याही याच दिवसांत निघाल्या. चिदंबरम् पिले यांनी स्वदेशी नौकानयनाची मंडळी याच दिवसांत काढली. कलकत्त्याला स्वदेशी तागाची गिरणी याच दिवसांत निघाली असताना डेव्हिड यूल महाशयांनी आपल्या तागाच्या धंद्यात विदेशी लोक घुसल्याचें इंग्रज सरकारकडे गाऱ्हाणें नेलें होतें. या स्कॉच गृहस्थाच्या मताप्रमाणे भारतीय लोक भारतात विदेशी होते. याच स्वदेशीच्या आंदोलनात जमशेदपूरच्या पोलादाच्या कारखान्याकरिता आठ सहस्र भारतीयांनी टाटांना तीन मासांत तीन कोटींहून अधिक भांडवल पुरविलें.

टिळकांच्या अध्यक्षपदाला मुसलमानांचा पाठिंबा

स्वदेशी आंदोलनामुळे मुसलमान कोष्टयांचें कोटकल्याण होत होतें. बंगाल्यात मुसलमान कोष्टयांची संख्या मोठी होती. या मुसल-

मान कोष्टयांचा समावेश कोळी, रंगारी इत्यादि इतर जातींप्रमाणे मोमीन या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या दलित मुसलमानांत होत असे. स्वदेशी आंदोलनामुळे या मुसलमान कोष्टयांना, अनेक वर्षें अपरिचित असलेलें पोटभर अन्न मिळू लागलें. हें अन्न मिळवून देणाऱ्या आंदोलनाचा नेता म्हणून त्यांना टिळकांचें नांवही परिचित झालें. तेव्हा त्यांनीच १९०६ मध्ये टिळकांना राष्ट्रीय सभेचें अध्यक्षपद द्यावें, अशी मागणी करण्याला प्रारंभ केला. आज पूर्वपाकिस्तानाचें प्रमुख सागरनगर असलेल्या चितागांगमध्ये १९०६ च्या सप्टेंबरमध्ये १५००० मुसलमानांची प्रचंड प्रकट सभा भरली आणि या सभेने असा ठराव केला की, बंगालच्या बाहेर स्वदेशीवहिष्काराचें आंदोलन यशस्वी करण्याकरिता टिळकांच्या इतके कोणत्याही नेत्याने परिश्रम केले नसल्याने यंदा टिळकांनाच राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष करावें. या दिवसांत केवळ मुसलमानांच्या सभांतून भाषणें करण्याकरिता टिळकांना ठिकठिकाणचीं आमंत्रणें येत असत आणि त्यांचा ते सादर स्वीकार करीत असत. याच दिवसांत सुप्रसिद्ध उर्दू कवि हसरत मोहानी हे टिळकभक्त आणि त्यांच्या राजकारणाचे अनुयायी बनले, आणि या पापाकरिता त्यांना दोन वर्षें खडतर कारावास भोगावा लागला. टिळकांना कलकत्त्यातील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद देण्याच्या कल्पनेचे सर्वांत प्रमुख पुरस्कर्ते विपिनचंद्र पाल हें होते. या दिवसांत विपिनबाबू नवीनच स्वातंत्र्यवादी बनले असल्याने नवदीक्षितांच्या स्वभावधर्माप्रमाणे ते टिळकांपेक्षाही अधिक प्रखरपणे स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असत.

लॉर्ड मिंटोंची प्रामाणिक स्वदेशी

१९०६ च्या अंती राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या प्रसंगी कलकत्ता येथे स्थानिक सरकारजमा पुढाऱ्यांनी एक औद्योगिक प्रदर्शन भरवून त्याच्या उद्घाटनाकरिता राजप्रतिनिधि लॉर्ड मिंटो यांना पाचारण केलें होतें. या प्रसंगी लॉर्ड मिंटो यांनी स्वदेशी ही शुद्ध, प्रामाणिक स्वदेशी असावी, तिच्यात राजकारणाची भेसळ करून ती अप्रामाणिक बनवू नये अशा आशयाचा उपदेश केला.

I shall at any rate rejoice if my presence should contribute to confirm the dissociation of honest Swadeshi from political aspirations. There is no occasion, there is no justification for confusing the two.

या भाषणाला टिळकांनी कलकत्त्यातच अतिशय निर्भीड उत्तर दिलें.

Lord Minto had spoken of what he called honest Swadeshi dissociated from political association and political aspirations. This definition of Swadeshi was incorrect, misleading and distorting the truth. We repel the insinuation in Minto's statement that the agitators are making the use of Swadeshi to further their own ends. If we were dishonest, honest people had no business to associate with us. Nor need we associate with them. Government has always mixed up politics with commerce and so long as they did so, Indians would be perfectly justified in connecting politics with Swadeshi. It was impolitic if not dishonest to try to dissuade us from mixing up politics with Swadeshi.

लॉर्ड मिंटोंनी राजकारणाच्या संसर्गापासून निर्लेप असलेल्या प्रामाणिक स्वदेशीचा उल्लेख केला आहे. त्यांची ही स्वदेशीची व्याख्या चूक आहे, इतकेंच नव्हे तर चुकीच्या मार्गाला नेणारी आणि विकृत आहे. मिंटोंच्या विधानात, त्यांनी राजकीय नेते वेगळींच उद्दिष्टें साधण्या-करिता स्वदेशीचा दुरुपयोग करीत आहेत, असा जो आरोप केला आहे; तो आम्ही सपशेल धुडकावून देतो. आम्ही अप्रामाणिक असलो तर प्रामाणिक लोकांनी आमच्याशी संबंध ठेवण्याचें कारण नाही. आणि आम्हांलाही त्यांच्याशी संबंध ठेवण्याचें कारण नाही. व्यापार आणि राजकारण यांची सांगड स्वतः सरकारनेच घातली आहे; सरकार जोपर्यंत या धोरणाचा त्याग करीत नाही, तोंपर्यंत आम्ही त्यांचें अनुकरण करणें पूर्णपणे न्याय्य आहे. स्वदेशी आणि राजकारण अलग ठेवण्याचा लॉर्ड मिंटोंचा उपदेश सपशेल अप्रामाणिकपणाचा नसला तर निदान अदूरदर्शीपणाचा द्योतक आहे. ही टीका लॉर्ड मिंटो यांना फार झोंबली आणि ते टिळकांचे कट्टे शत्रु बनले. वास्तविक पाहता हिंदुस्थानचा राज्यकारभार करणें हें आमचें काम आणि हिंदुस्थानातील धन इंग्लंडात नेणें हें तुमचें काम, हीं कामें परस्परांच्या सहकार्यानेच चाललीं पाहिजेत, असें लॉर्ड कर्झन यांनी उघडपणे इंग्रजी व्यापाऱ्यांच्या सभेत बोलून दाखविलें असता लॉर्ड मिंटोंनी प्रामाणिक स्वदेशीचा भारतीयांना उपदेश करण्याचा अव्यापारेषु व्यापार करावयाला नको होता. असो. पुढे १९०८ मध्ये टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवल्यानंतर मिंटोंनी दावर यांच्याशी कशी तारातारी केली आणि टिळकांचें 'केसरी' मुद्रणालयही सरकार-जमा करण्याची सूचना मुंबई सरकारला कशी केली, या गोष्टी पुढे येणारच आहेत.

बिपिनचंद्र पाल स्वातंत्र्यवादी कसे बनले ?

स्वातंत्र्याच्या ध्येयाची बिपिनबाबूंना प्रथमपासून आवड असली तरी आपण स्वातंत्र्याला पात्र होण्याकरिता प्रथम सामाजिक आणि धार्मिक सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत, अशा प्रकारच्या भ्रमाने ते ग्रासले होते. याच भावनेने प्रेरित होऊन ते इंग्लंडात थिऑलॉजी म्हणजे धर्मशास्त्र शिकण्याकरिता गेले असताना त्यांच्या वक्तृत्वाने प्रभावित झालेल्या काही अमेरिकन स्नेह्यांनी त्यांना मितपानाचा पुरस्कार करणाऱ्या संस्थेसाठी व्याख्यानें देण्याकरिता अमेरिकेला नेलें. तिथे हें आत्मसंतुष्टपणाने भाषणें करीत फिरत असताना एका अमेरिकनाने त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितलें :

Free world would not receive its lessons, however true or lofty these might be, from a slave.

स्वतंत्र जगाला दासांच्याकडून नीतिपाठ घेण्याची इच्छा नाही. हें झणझणीत अंजन नेत्रांत पडल्यानंतर आधी राजकीय की आधी सामाजिक या प्रश्नाचें उत्तर मिळून ते भारतात परत आले आणि सखाराम गणेश देउस्कर यांनी प्रवर्तित केलेल्या शिवाजी उत्सवात भाग घेऊन टिळकपंथी राजकारणाचा परिचय करून घेऊ लागले. देउस्करांनी बंगाल्यात केलेल्या महान् कार्याची महाराष्ट्राला काही जाणीवही नाही. हेमचंद्र दासांनी आपल्या 'विप्लवप्रचेष्टे'त त्यांच्याविषयी म्हटलें आहे :

Though he did not have a group of his own, he held a leading position. At that time he alone produced literature worth mentioning which served to propagate the ideas of revolution.

देउस्करांची स्वतःची एखादी समिति नसली तरी क्रांतीच्या नेत्यांत त्यांना फार मान होता. वंगभंगाच्या पूर्वीच्या दिवसांत एकट्या देउस्करांनीच क्रांतिकारकांना मार्गदर्शन करणारें वाङ्मय लिहिलें. त्यांनीच क्रांतिकारक समित्यांत शिवाजी उत्सव प्रचलित केला. त्या दिवसांत ते सुरेंद्रनाथांच्या बंगाली 'हितवादी' पत्राचे सहसंपादक होते. पुढे सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या विफल अधिवेशनानंतर सुरेंद्रनाथांनी त्यांना टिळकनिंदेचे लेख लिहावयाला सांगितले असताना त्यांनी तें नीच कृत्य करावयाचें नाकारून 'हितवादी'चें त्यागपत्र दिलें. त्यानंतरचें त्यांचें जीवन फार हालात गेलें. कारण देशभक्तांची नेहमीची सखी जी दरिद्रता तिने त्यांच्या सदनातून आपला निवास हलविण्याचें नाकारलें आणि अशा परिस्थितीतच त्यांच्या शरीरातील एकामागून एक प्रांत महारोगासारख्या

दुर्धर व्याधीने व्यापले. १९०६ मधील कलकत्त्याच्या अधिवेशनाच्या प्रसंगी बिपिनबाबूंनीच स्वातंत्र्यवादी पक्षाचें नेतृत्व स्वीकारलें होतें आणि तें अधिवेशन संपल्यानंतर लौकरच त्यांनी दक्षिण भारतात स्वातंत्र्यवादाचें बीजारोपण करण्याकरिता मद्रास प्रांतावर स्वारी केली.

बिपिनचंद्रांविषयी इतिहासाचार्यांचा अभिप्राय

लाल, बाल, पाल या त्रयीत खरे भाषाप्रभु बिपिनचंद्र पाल हेच होते. मी त्यांचीं दोन व्याख्यानें पुण्यात ऐकलीं आहेत. त्यांच्या प्रचार-कौशल्याकरिता इतिहासाचार्य राजवाडे त्यांना फार मान देत असत.

हिंदुस्थान स्वायत्त बनविण्याची कल्पना पद्धतशीर रीतीने आणि राज्यशास्त्रास अनुसरून सातत्याने लोकांपुढे मांडण्याचा पहिला मान बिपिनचंद्र पाल यांच्याकडे जातो. त्यांचें यासंबंधीचें विवेचन इतकें स्पष्ट, मूलगामी, तर्कशुद्ध आणि मनोहर असे की, मुंबईच्या टाइम्सनेही त्यांची केव्हा केव्हा स्तुति केली होती. ज्या काळात उपनिवेशांचें स्वराज्य मागण्याचें धाडस राजकारणी लोक आणि राष्ट्रीय सभा करीत नसे, त्या काळात हिंदुस्थान स्वायत्त होऊन त्याची इंग्लंडशी समान भूमिके-वरून मैत्री होणें हें उभय राष्ट्रांच्या, विशेषतः इंग्लंडच्या हिताचें कसें आहे, हें राजकीय तत्ववेत्त्याच्या भूमिकेवरून ते मांडीत असत. हें विवे-चन करताना ते इंग्रजांपुढे (पॅन इस्लामिझम) सार्वभौम इस्लामवाद आणि पिवळें अरिष्ट यांचें भय उभें करीत आणि त्यापासून ब्रिटिश साम्राज्याचें संरक्षण करण्याकरिता इंग्रजांना स्वायत्त हिंदुस्थानची मैत्रीच उपयोगी पडेल असें प्रतिपादीत.

या विचारसरणीत मोठा दोष हा होता की, ज्या वेळी बिपिनचंद्र सार्वभौम इस्लामवादाची इंग्रजांना भीति दाखवीत होते, त्याच वेळी खनिज तेलाच्या वाढत्या महत्त्वामुळे इंग्रज सरकार अधिकाधिक मुस्लिम-धार्जिणें बनत होतें. पिवळें अरिष्ट आणि इस्लामी अरिष्ट या दोहोंचें भय एकटया हिंदूनाच असल्याचें पुढे बिपिनबाबूंच्या प्रत्ययास आल्या-मुळे स्वदेशी आंदोलनानंतरच्या दिवसांत ते इंग्रज विरोधापासून परावृत्त झाले होते, हें सर्वांना माहीत आहेच. पण स्वदेशी आंदोलनाच्या दिव-सांत त्यांनी फार मोठें कार्य केलें. त्यांच्या 'न्यू इंडिया' साप्ताहिकातील स्वातंत्र्यवादाच्या प्रचारामुळे प्रभावित होऊनच सावरकरांनी आपल्या गुप्त समितीला 'अभिनव भारत' हें नांव दिलें.

मद्रासेतील इंग्रजी पेढ्यांचें दिवाळें

सन १९०६ च्या ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये मद्रासप्रांतातील दोन प्रसिद्ध इंग्रजी पेढ्यांचें दिवाळें निघालें. यांपैकी अर्बथनॉट या पेढीचा व्यवसाय १८०० पासून चालू होता आणि लोकांचा असा विश्वास होता की इंग्रजी राज्य अस्तित्वात असेपर्यंत अर्बथनॉट पेढीला भय नाही. पण स्वदेशी आंदोलनाने इंग्रजी राज्याला ग्रहण नव्हे, नुसता वेध लागला तर तेवढ्या धक्क्यानेच अर्बथनॉट पेढी बुडून मद्रासेतील प्रजेचे दोन कोटी रुपयांचें भांडवल रसातळाला गेलें. ही पेढी बुडाल्यानंतर तिच्या इंग्रज चालकांनी केलेल्या लफंगेगिरीच्या व्यवसायांची लोकांत प्रसिद्धि झाली आणि इंग्रजांच्या व्यापारी नीतीचा मद्रासी लोकांना पुरेसा परिचय होऊन त्यांना धक्काच बसला. या पेढीच्या दिवाळ्यानंतर बिन्नी आणि मंडळी या दुसऱ्या मोठ्या इंग्रजी पेढीनेही आपलें दिवाळें काढलें. या अनुभवाने सावध होऊन भारतीयांनी इंग्रजांच्या हाती आपलें भांडवल समर्पण न करता स्वदेशी पेढ्या आणि विमा मंडळ्या काढाव्यात असा देशभक्तांनी प्रचार आरंभिला. १९०७ च्या प्रारंभी मद्रासेत बिपिनचंद्र पाल यांनी केलेलीं भाषणें अत्यंत यशस्वी होण्याला त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाप्रमाणेच मद्रासी लोकांच्या मनात इंग्रजांविषयी उत्पन्न झालेला अविश्वासही कारणीभूत झाला.

गोखल्यांचा बहिष्कारला विरोध

स्वदेशी चळवळीच्या दिवसांत गोखल्यांनी असा श्लेष काढला होता की माझा स्वदेशीला विरोध नाही, पण बहिष्काराचें तत्त्व द्वेषदूषित असल्याने तें तत्त्व मला मान्य नाही. वस्तुतः, बहिष्काराच्या आंदोलनात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी अंतर्भूत असल्यामुळे गोखल्यांचा बहिष्कारला विरोध होता. १९०५ च्या जुलैमध्ये मवाळांचे एक मोठें आधारस्तंभ सर विल्यम वेडरबर्न यांनी ग्रीनविच येथील एका भाषणात म्हटलें होतें :

The Italians had always refused to accept the Austrian rule as the national rule and had boycotted the Austrians so as to make the administration impossible. The Indians, on the other hand, so far from boycotting the Britishers, had offerred them their cooperation and had accepted the British rule as their national rule. The resolutions of the Indian National Congress showed how grievances might be redressed and the people rend-

ered prosperous and contented thus making British rule popular and strong.

इटालीमधील लोकांनी प्रथमपासूनच ऑस्ट्रियाच्या राज्याला मान्यता देण्याचें नाकारलें होतें, आणि ऑस्ट्रियाच्या नागरिकांवर बहिष्कार टाकून त्यांनी त्या परराष्ट्राला स्वदेशावर सत्ता चालविणें दुर्घट करून सोडलें होतें. त्यांच्या उलट भारतीयांनी प्रथमपासून इंग्रजांशी सहकार्य केलें होतें आणि त्यांच्या राज्याला आपली संमति दिली होती. राष्ट्रीय सभेच्या ठरावांचा उद्देशच प्रजेचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचा मार्ग दाखवून ब्रिटिशांचें राज्य लोकप्रिय आणि बलिष्ठ बनविणें हा होता. या उद्देशाचा पायाच बहिष्काराच्या ठरावाने उखडला जात असल्याने त्याला गोखल्यांचा तीव्र विरोध होता.

टिळकपक्षातील गोखल्यांचे समर्थक

स्वदेशी चळवळीच्या दिवसांत टिळकपक्षातही शंकरराव लवाटयांच्या सारखे गोखल्यांच्या अनुकरणाने बहिष्कारावर बहिष्कार टाकणारे लोक होते. असल्या लोकांचा सदुपयोग करून १९०८ मध्ये टिळकांनी मदिरालयांच्या निरोधनानिमित्त पुण्यात प्रतिसरकारच निर्माण केलें होतें. त्यांनी स्वतःच आपल्या आंदोलनाचें वर्णन करताना २८-४-१९०८ च्या 'केसरी'त म्हटलें आहे :

"दारूची बंदी हें बाहेरचें सोंग असून वस्तुतः हें ब्राह्मणांचें बंड पुन्हा उपस्थित होऊ पहात आहे. चारचौघांना एके जागी गोळा करून, स्वयंसेवकांना शिस्त लावून रक्षकांशी आणि अधिकाऱ्यांशी झुंजावयास शिकविण्याचा ह्या बंडखोरांनी आता उपक्रम केला आहे. उघड राजकीय कामासाठी जर ह्यांनी स्वयंसेवकांच्या टोळ्या निर्माण केल्या असत्या तर सरकारने विलंब न लावता टोळ्यांना निजधामाला पाठविलें असतें. ह्यांच्या खऱ्या स्वरूपासंबंधी सरकारास व्यामोह पडावा म्हणून यांनी दारूबंदीचें सोंग घेतलें आहे. ब्राह्मण किंवा पांढरपेशा जातींवाचून इतर जातींचें साहाय्य या चळवळीला नाही. सत्तेचा दुरुपयोग करून ऋग्वेदातील, मनुस्मृतीतील, साधुसंतांच्या बोधामृतातील वचनें पुढे करून इतर जातींना हें धूर्त विद्वान् आपल्या लगामी लावीत आहेत. कोणाला कोणचे अधिकार द्यावयाचे आणि कोणाचे कोणते अधिकार काढून घ्यावयाचे, याचा सर्वाधिकार स्वतःकडे घेणारे इंग्रज सरकार जिवंत असताना, समर्थ असताना ह्या चळवळ्यांनी दारूच्या गुत्त्यांपुढे निरोधन करून पानस्वातंत्र्यात अडथळा करणें म्हणजे इंग्रजी

राजसत्तेपैकी काही भाग संघसामर्थ्याने आत्मसात् करण्यासारखें आहे. शारीरिक दांडगाई स्वयंसेवक करीत असतात, असें म्हणण्यास भक्कम पुरावा सरकारकडे मिळत नाही. याचें कारण लोकांच्या मनावर यांनी एक प्रकारचा वचक बसविला आहे. लहान लहान देशी अधिकाऱ्यांच्या मनांवरही या बंडखोरांनी दरारा बसविला असल्याने यांचीं कृष्णकृत्यें न्यायालयांतून उजेडात आणणें अवघड झालें आहे. स्वयंसेवक म्हणून शेदीडशे तरुणांनी गोळा व्हावें आणि सरकारच्या अधिकारास खग्रास ग्रहण लावावें, हें सरकारच्या प्रतिष्ठेस न्यूनत्व आणणारें नाही काय!"

हें सारें वर्णन टिळकांनी आपल्या प्रतिपक्षांच्या तोंडी घातलें असलें तरी त्या मिषाने त्यांनी निरोधनाचें पर्यवसान प्रतिसरकाराच्या निर्मितीत कसें होतें, हें स्वतःच्या अनुयायांनाही समजावून सांगितलें आहे.

बहिष्कारसमित्यांचें प्रतिसरकार

टिळकांनी बहिष्कारयोगाचा प्रचार आरंभिल्यानंतर पूर्वबंग प्रांतात काय परिस्थिति झाली होती, याचें वर्णन एका वार्ताहराने ६–७–१९०७ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्रात केलें होतें :

There was a time when Police was a real object of fear in every village. He abused the authority, took bribes and extorted money. The Indian sub-inspectors acted as tyrants but today it is they who go in fear and trembling, taking the orders from the local boycott committees and hindering instead of helping any attempt to inquire into assault or any Swadeshi cases.

म्हणजे एके काळी रक्षकविभागाचे अधिकारी खेड्यापाड्यांतून सुलतानासारखें वर्तन करून प्रजेला छळीत आणि लुटीत, पण आता त्या अधिकाऱ्यांना स्थानिक बहिष्कार समित्यांच्या आज्ञेप्रमाणे वर्तन करावें लागतें. त्यामुळे स्वदेशीवाल्यांच्या अपराधांची चौकशीच होऊ शकत नाही. खेड्यांतील बहिष्कारसमित्या म्हणजे प्रतिसरकारेंच बनलीं होती. विदेशी मालाचा व्यापार त्यांनी बंद पाडला होता. त्यांचे नियम मोडणाऱ्यांना त्या दंड करीत आणि आपापल्या क्षेत्रात शांतता नि सुव्यवस्था राखण्याचें कामही त्यांनी आपल्या हाती घेतलें होतें. अशा प्रकारे लोकपक्षाचें प्रतिसरकार अस्तित्वात आणणें हा बहिष्काराच्या आंदोलनाचा मुख्य उद्देश होता आणि तो अनेक ठिकाणी न्यूनाधिक प्रमाणात यशस्वी झाला.

बहिष्कारवाद्यांचें परराष्ट्रीय राजकारण

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्न करणाऱ्यांना परराष्ट्रांशी संबंध जोडून त्यांचें साहाय्य मिळविण्याचे प्रयत्न नेहमीच करावे लागतात. तसे प्रयत्न करण्याचें एक साधन म्हणून टिळक बहिष्काराचा पुरस्कार करीत होते. बहिष्कारयोगाच्या प्रभावाने बुडविलेला इंग्रजांचा व्यापार त्यांच्या शत्रुराष्ट्रांना देऊ करून त्यांची सहानुभूति स्वपक्षाला मिळविणें आणि त्यांच्या व्यापारी नौकांमधून शस्त्रास्त्रांची चोरटी आयात करून देशांत स्वातंत्र्ययुद्धाची सिद्धता करणें हें बहिष्कारयोगाचें अंतिम साध्य होतें. हें कितपत यशस्वी होईल, याची चाचणी करण्याच्या दृष्टीने टिळकांनी ऑस्ट्रिया, जर्मनी, रशिया यांच्या मुंबईतील व्यापारी दूतांच्या भेटीही घेतल्या होत्या. उलट पक्षी, भारतीय क्रांतिकारकांना शस्त्रें पुरविण्याचे मार्ग आपल्याला उपलब्ध व्हावेत, यासाठी जर्मनीतील नौकानयनाच्या व्यवसायाचे अग्रणी हेर फोन बाल्लिन हे जर्मन विश्वविद्यालयांतून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांशी संबंध जोडून त्यांना क्रांतिकार्यात सर्वतोपरीने साहाय्य करण्याला आपण सिद्ध असल्याचीं आश्वासनें देत होते. त्यांनी आपल्या व्यापारी नौकांवरून काही शस्त्रें बंगाली क्रांतिकारकांना पुरविलीं. पण त्यांचें वंगभंगाचें शल्य निघाल्यानंतर त्यांनी इतःपर आपल्याकडे शस्त्रें न पाठविण्याची हेर फोन बाल्लिन यांना सूचना केली. या एका घटनेवरूनही बहिष्कारयोगाच्या दूरगामी प्रभावाची आणि परिणामांची वाचकांना कल्पना येईल.

टिळकांनी केलेलें बहिष्काराचें विवेचन

बहिष्काराच्या परराष्ट्रीय राजकारणाची चर्चा लेखांतून, अथवा सार्वजनिक व्याख्यानांतून करणें अशक्य असल्यामुळे या प्रश्नावर लिहिताना वीर वामनराव जोशी यांच्या आठवणीचाच आधार घेणें आवश्यक आहे. १९०६ मध्ये कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेला टिळक जात असताना उमरावतीच्या काही तरुण मंडळींनी त्यांच्याशी बहिष्कारासंबंधी चर्चा केली. तेव्हा टिळकांनी सांगितलें: "बहिष्काराचें तत्त्व पांच वर्षं प्रामाणिकपणे पाळलें तर युरोपात युद्ध उत्पन्न झाल्यावाचून रहात नाही. आजचें सारें राजकारण व्यापाराच्या खुंटाभोवती घुटमळत आहे. युरोपातील प्रत्येक प्रबळ राष्ट्र जगातील व्यापाराच्या पेठा हस्तगत करण्याकरिता रात्रंदिवस धडपडत आहे. हिंदुस्थानाची व्यापारपेठ इंग्रजांनी सर्वस्वी व्यापून टाकली आहे, ही गोष्ट युरोपातील प्रत्येक बलाढ्य

राष्ट्राच्या मनात शल्यासारखी बोचत आहे. आपल्यात इंग्रजांशी लढण्याचें सामर्थ्य नाही. तेव्हा इंग्रजांशी लढण्याला जे समर्थ आहेत, त्यांना तरी आपण चिथावू या. हिंदुस्थानाची व्यापारपेठ इंग्रजांच्या मगरमिठीतून सोडवून जर्मनांच्या अथवा अमेरिकनांच्या हातांत काही काळ आपल्याला देता आली तर इंग्रज लोक त्यांच्याशी हातघाईवर आल्यावाचून राहणार नाहीत आणि इंग्रज कोठे तरी बाहेर भांडणात गुंतल्यावाचून आपणांस आपले हातपाय पसरण्यास अवकाश मिळावयाचा नाही. हिंदुस्थानाच्या व्यापारपेठेतून इंग्लंडला हुसकावून देऊन जर्मनीला आत घेतल्यास तोही एक दिवस आपली मानगुटी धरल्यावाचून राहणार नाही, हें खरें; म्हणूनच हें भावी संकट टाळण्याकरिता बहिष्कारास स्वदेशीची जोड दिली आहे. स्वदेशीच्या साहाय्याने परदेशी व्यापाऱ्यांच्या दाढेतून जेवढा प्रांत आपणांस सोडविता येईल, तेवढा सोडविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावयाचीच. परंतु आज स्वदेशी सर्वांगपरिपूर्ण करता येणें शक्य नाही. स्वदेशीच्या कक्षेबाहेरील क्षेत्रातून इंग्रजांचें उच्चाटन करणें आपल्यास आवश्यक आहे. याकरिता बहिष्काराने शत्रूच्या शत्रूंचें साहाय्य मिळविणें आणि स्वदेशीने आपल्या आर्थिक उत्कर्षाचा प्रासाद उभा करणें, असा हा दुहेरी डाव आहे. काट्याने काटा काढल्यानंतर तो काही कोणी आपल्या पायात रुतवून घेत नाही. बहिष्कार हें नैमित्तिक कर्म असून स्वदेशी हें नित्यकर्म आहे. शत्रूच्या घरात यादवी माजविणें, अथवा शत्रूच्या शत्रूंना उत्तेजन देणें एवढाच आत्मोद्धाराचा मार्ग दुर्बलांना नेहमी उपलब्ध असतो. सुंदोपसुंदांची कथा हें या तत्त्वाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. सुंदोपसुंदांचें मरण त्यांच्या परस्परांच्याच हातीं होतें. अन्य कोणी त्यांना मारण्याला समर्थ नव्हते. तेव्हा त्या उभयतांमध्ये कलह उत्पन्न करणें एवढाच उपाय देवांना उरलेला होता. सर्व जग पादाक्रान्त करू पाहणाऱ्या युरोपातील बलाढ्य राष्ट्रांची आज सुंदोपसुंदांसारखीच स्थिति आहे. ते आपसात लढतील, तरच मरतील. तेव्हा त्यांच्या आहारी पडलेल्या, किंवा पडण्याच्या अवस्थेत असलेल्या राष्ट्रांनी जगाचें रक्तशोषण करणाऱ्या या दस्यूंचें आपसांत युद्ध कसें जुंपेल, याचीच काळजी वाहिली पाहिजे. स्वदेशी-बहिष्काराच्या शस्त्राचा शहाणपणाने उपयोग केल्यास हिंदुस्थानची व्यापारपेठ तिलोत्तमेप्रमाणे हें यादवीचें कार्य हटकून घडवून आणील."

या आठवणीने टिळकांच्या तत्कालीन परराष्ट्रीय राजकारणाप्रमाणेच हिंदुस्थानाने आपलें परराष्ट्रीय राजकारण कोणत्या धोरणाने चालवावें, या प्रश्नावरही उज्ज्वल प्रकाश पडत असल्याने ती

सविस्तर उतरून घेतली आहे. जगातील बलाढ्य राष्ट्रांमधील युद्धें थांबविण्याचा प्रयत्न करून शांततापरितोषिकें मिळविण्याचें राजकारण कसें राष्ट्रघातकी आहे, हें या स्मृतीवरून आजच्या पिढीला समजून येईल.

✦ ✦ ✦

प्रकरण चौदावें

टिळकशत्रूंचीं गुप्त कारस्थानें

पार्लमेंटात प्रतिनिधित्व मिळविण्याचे प्रयत्न

पार्लमेंटात आयर्लंडचे प्रतिनिधि खुल्या निवडणुकीने जातात, तसे भारताचे प्रतिनिधिही जावेत, अशी कल्पना रानडयांच्या डोक्यात बरेच दिवस घोळत होती आणि १८७४ मध्ये त्यांनी या कल्पनेच्या पुरस्काराप्रीत्यर्थ साऱ्या देशातील पुढाऱ्यांच्या स्वाक्षऱ्याही गोळा केल्या होत्या, असें फाटकांनी 'भारतीय राष्ट्रवादाचा इतिहास' या पुस्तकात लिहिलें आहे. १८९७ मध्ये रानडयांचे शिष्योत्तम गोखले यांनी वेल्बी मंडळापुढे साक्ष देताना हिंदुस्थानाचे प्रतिनिधि पार्लमेंटात घेतल्यास हिंदुस्थानाच्या पैशाची निरंकुश रीतीने उधळपट्टी करण्याच्या सवयीला आळा पडेल, असें प्रतिपादन केलें होतें. गोखल्यांचें हें प्रतिपादन ऐकून आयर्लंडचे पुढारी जॉन रेडमंड यांनी भारतीय पुढाऱ्यांना अशी सूचना केली की तुम्ही पार्लमेंटांतील आयर्लंडच्या पक्षाला प्रतिवर्षी साठ सहस्र पौंड देणगी द्यावयाचें मान्य केलेंत, तर पार्लमेंटांतील आमच्या आठ जागा आम्ही तुम्हांला देऊ; मात्र तुमच्या सभासदांनी आयर्लंडच्या प्रश्नावर आम्हांला पाठिंबा द्यावा आणि आमचे सभासद भारताच्या प्रश्नावर तुम्हांला पाठिंबा देतील. ही सूचना जॉन रेडमंड यांनी मायकेल डेव्हिट यांच्या द्वारा दादाभाई नौरोजींच्या कानी घातली होती. पण त्यांनी तिचा विचार न करताच ती धुडकावून दिली. कदाचित् आयर्लंडला भागीदार करून 'तीन पायांची शर्यत' खेळण्याची कल्पना त्यांना रुचली नसेल. पण परराष्ट्रीय प्रचाराच्या दृष्टीने ही सूचना अत्यंत योग्य होती. ती कृतीत आणली असती तर आयर्लंड आणि भारत यांच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात एकसूत्रता आली असती आणि आपली मुक्तताही लवकर झाली असती. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर पार्लमेंटाची नवी निवडणूक झाली तेव्हा टिळकांनी वासुकाका जोशी आणि सकलातवाला यांना आयर्लंडच्या नेत्यांकडे पाठवून रेडमंडची जुनी सूचनाच त्यांच्यापुढे नव्या स्वरूपात मांडली. तेव्हा ते पुढारी म्हणाले: 'काही जागाच काय, आम्ही आमच्या सर्वच जागा तुम्हांला द्यावयाला

सिद्ध आहोत, पण पार्लमेंटात आम्हीच काही करू शकत नाही, तिथे तुम्ही जाऊन काय करणार आहात ?' खरी परिस्थिति ही होती की तेव्हा निवडून येतील त्या सभासदांची स्वतंत्र घटनासमिति बनविण्याचा त्यांचा संकल्प ठरला होता, त्यामुळे त्यांना आपल्या पक्षात हें विजातीय द्रव्य नको होतें. असो. पार्लमेंटाच्या निवडणुकीतून आपल्या पक्षाच्या मतप्रतिपादनाला अवसर म्हणून परस्परविनिमयाने काही सभासदांच्या जागा मिळविणें वेगळें आणि हिंदुस्थानातून पार्लमेंटासाठी प्रतिनिधि निवडून देणें हें अगदीच वेगळें आणि घातुक होतें. याची रानडे-गोखल्यांना नसली तरी टिळकांना अतिशय चांगली जाणीव होती. पण वैयक्तिक महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन राजकारणाचा खेळखंडोबा करणाऱ्या गोखल्यांना हा विवेक नव्हता. यासाठी त्यांनी एकदा राष्ट्रीय सभेच्या विषयनियामक समितीत असा ठराव मांडला की, इंग्लंडने आपल्या घटनेत किंचित् बदल करून भारताचे काही प्रतिनिधि आपल्या लोकसभेत घ्यावेत. या ठरावाला त्यांनी अनेक आशाळभूत मवाळांची मान्यता मिळविली. विषयनियामक समितीतील बहुतेक सभासदांना तो ठराव निरुपद्रवी वाटला आणि त्यापासून झालाच तर आपला लाभ होईल अशा समजुतीने त्यांनी त्याचें समर्थन केलें. अशा वेळी गोखल्यांचे मूर्तिमंत दुर्दैव जे टिळक, ते उठून उभे राहिले. मद्रासेतील 'फेडरेटेड इंडिया' अर्थात् संयुक्त भारत पत्राचे संपादक व्यासराय आपल्या स्मृतीत लिहितात :

Tilak stood up in the manner of a leader giving his considered verdict without haste or without hesitation. He pointed out that there could be no representation in British Parliament without payment of taxation and if the British nation was likely to change the constitution of England for the sake of India, it might more readily alter the constitution of India itself. India must be governed in India, he said and stressed that while all our problems lay around freeing India from such British control as has come to exist, it would be folly to complicate the position still further by sprinkling a few Indians in the British House of Commons. Mr. Gokhale who had elaborated a case with his usual lucidity of exposition and made it look quite plausible, sat like one whose speech had deserted him and heaved a sigh, and the Subjects Committee passed on to the next item.

(आठवणी खं. ३ पान इं. १०८)

लहान मुलांच्या निबंधावर टीका करावी, तशा पद्धतीने टिळकांनी गोखल्यांच्या ठरावावर टीका करताना म्हटलें : ज्या प्रजाजनांवर कर बसविण्याचा अधिकार इंग्लंडच्या लोकसभेला नाही, त्या प्रजेचे प्रतिनिधि इंग्लंडच्या लोकसभेत बसू शकत नाहीत. हिंदुस्थानाच्या प्रजेला प्रतिनिधित्व देण्याकरिता इंग्लंडने आपली घटना बदलण्यापेक्षा हिंदुस्थानाची घटना बदलणें इंग्लंडला अधिक सुकर आणि स्वाभाविक आहे. दुसरी गोष्ट ही की हिंदुस्थानावर अधिकार गाजविणारी सत्ता हिंदुस्थानातच असावी, इंग्लंडातून येणाऱ्या आदेशाप्रमाणे हिंदुस्थानसरकारने आपलीं धोरणें बदलू नयेत, ही तर आपली मूलभूत मागणी आणि चार भारतीयांना आपली पायधूळ इंग्लंडच्या लोकसभेत झाडता यावी, येवढ्याकरिता या मूलभूत मागणीच्या उलट जाऊन आपली परिस्थिति अधिक अवघड आणि घोटाळ्याची करून घेणें हें महामूर्खपणाचें कृत्य होईल. टिळकांचा हा अभिप्राय ऐकून गोखल्यांची वाचाच बसली आणि विषयनियामक समितीने दुसऱ्या विषयाकडे लक्ष वळविलें. या महत्त्वाच्या प्रसंगाचा उल्लेख टिळकचरित्रकार सहसा करीत नाहीत, यावरून त्यांनी आपल्या चरित्रनायकाच्या चरित्राचा कितपत अभ्यास केला असावा,याची कल्पना येते. इथे जाता जाता एका योगायोगाचा उल्लेख करावा, असें वाटतें. टिळकांचे तीन प्रमुख महाराष्ट्रीय प्रतिपक्षी रानडे, गोखले आणि शाहूछत्रपति हे तिघेही भौगोलिक योगायोगाने कोल्हापूरच्या परिसरात वाढले होते. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे पुणेंकरांच्या राजकारणाचे प्रतिनिधि बनलेल्या टिळकांना त्यांनी आजीव विरोध केला, याचें मुळीच नवल वाटत नाही. पुण्याचें वैशिष्टच सांगताना मुंबईचे एक राज्यपाल सर रिचर्ड टेंपल हे तत्कालीन राजप्रतिनिधि लॉर्ड लिटन यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात की देशाच्या इतर कोणत्याही भागात इतकी चिरस्थायी, इतकी अविच्छिन्न परंपरेने चालत आलेली आणि जिची तृप्ति करणें आपल्याला सर्वथैव अशक्य अशी दूरगामी राष्ट्रीय आणि राजकीय महत्त्वाकांक्षा मला आढळून आली नाही ; शिवाजीच्या नांवाचा तर महाराष्ट्रावर जादूप्रमाणे परिणाम होतो. पण या गोष्टी पुणेकरांना अत्यंत स्वाभाविक असल्या तरी सतत पुणेंविरोधी कारस्थानें करणाऱ्या कोल्हापूरच्या परिसरात वाढलेल्यांना त्या अस्वाभाविकच होत्या. यासाठीच शिवाजीने अफजलखानावर प्रथम शस्त्र चालविलें, असा अभिप्राय देऊन रानड्यांनी आपल्या परीने शिवाजी उत्सवालाही विरोध केला होता.

रानडे-गोखल्यांचें महत्पाप

१८९४ पासून आगरकर आणि गोखले या 'सुधारक' पत्राच्या मत्सरग्रस्त संपादकांनी टिळकांचा काटा काढण्याकरिता त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप करण्याचा व्यवसाय आरंभिला असला तरी आगरकरांना १८९५ मध्ये यमसदनी जावें लागल्यामुळे त्या व्यवसायाची धुरा पुढे या दोन गोपाळरावांपैकी एकट्या गोपाळराव गोखल्यांनाच वहावी लागली आणि ती त्यांनी एकनिष्ठपणे वाहिली. राजद्रोही टिळकांचा संपर्क नको म्हणून १८९६ मध्ये गोखल्यांनी जेव्हा डेक्कन सभा स्थापिली, तेव्हा टिळकांनी प्रजापक्ष दुभंग करणाऱ्या गोखल्यांवर आणि त्यांच्या गुरूवर 'केसरी'तून अगदी आग ओकली. हा लेख केळकरांनी टिळकांच्या लेखसंग्रहात छापला नसल्याने टिळकचरित्रात त्यांनी दिलेला सारांशच येथे उतरून घेतला आहे. "रानड्यांनी डेक्कन सभा काढून फार मोठी चूक केली. दुष्काळाचीं कारणें शोधताना केरूनानांना सूर्यावरचे डाग उजेडात आणावे लागले, त्याचप्रमाणे या रानड्यांनी पाडलेल्या राजकारणचातुर्याच्या दुष्काळात त्यांच्या अंगचे दोष दाखविणेंही प्राप्तच आहे. न्यायमूर्ति बेकन जसा मानवजातीत अति बुद्धिमान् पण अतिनीच, त्याप्रमाणेच रानड्यांची बुद्धि व्यापक असली तरी अंतःकरण उदात्त नव्हे. ईश्वराला खालच्या प्रतीचाही सहकारी खपत नाही. तसेंच रानड्यांना टिळक खपले नाहीत. त्यांनी सार्वजनिक सभेच्या छातीवर पाय देण्याकरिता डेक्कन सभा काढली, पण मुहूर्त अमावास्येचा मिळाला आणि प्रसंगही ताडीच्या उद्यानातील भोजनाचा. अशा वाईट वेळी, बुद्धिभ्रंशकारक प्रसंगी कुत्सित कल्पनाच जन्मास यावयाची. रानड्यांच्या हातून भ्रूणहत्येचें पातक घडलें, विषवृक्ष असला तरी आपल्या हाताने तो लावला गेलेला, म्हणून तोडू नये, ही नीति ब्रह्मदेवालाही पटली, पण रानड्यांना पटली नाही. त्यांनी सार्वजनिक सभेला सवत निर्माण करून कौटिल्य, अनुदारता आणि क्षुद्रबुद्धि जगप्रसिद्ध केली. टिळक किंवा नातू हे इंग्रज सरकारचें राज्य बुडविणार आणि न्यायमूर्ति रानडे अथवा गोखले तें तारणार ! असें प्रत्यक्ष किंवा परंपरेने म्हणणें म्हणजेच आधी आपला नीचपणा अथवा मूर्खपणा व्यक्त करण्यासारखें आहे. सुधारणेत जसा गरमनरमांचा भेद आहे, तसा राजकारणात नाही. उष्ण सुधारकांनी स्वतःला थंड राजकारणी म्हणवून घेऊन इतर लोकांवर पर्यायाने राजद्रोहाचा आरोप करणें हा निव्वळ पाजीपणा होय."

'आधुनिक भारता'तील अभिप्राय

टिळकांनी रानडेगोखल्यांवर केलेल्या टीकेचें मर्मच केळकरांना समजलें नाही. आणि टिळकांच्या लेखसंग्रहातून त्यांनी तो लेख वगळला आहे. जावडेकरांनी 'आधुनिक भारता'त या लेखाचें पुढील समर्थन केलें आहे. "टिळकांनी या वेळी रानड्यांवर जी टीका केली, तिच्या बुडाशी एक अत्यंत महत्त्वाचें तत्त्व होतें. मागील पिढीने स्थापन केलेली राजकीय संस्था पुढील पिढीने बहुमत करून हस्तगत केली तर जुनी पिढी बहुमताच्या निर्णयाला झुगारून आपलें राजकारण चालविण्याकरिता स्वतंत्र राजकीय संस्था काढू लागल्यास राष्ट्रांत एकी राहावी कशी आणि राष्ट्राची शक्ति संघटित होऊन तिचा प्रभाव परकीय सत्तेवर पडावा कसा ? न्यायमूर्तींचें त्या वेळचें कृत्य राष्ट्रीयत्वाच्या विकासास आणि लोकसत्तेच्या तत्त्वांस पूर्णपणे हरताळ फासणारें आणि वाढत्या राष्ट्रवृक्षावर दुहीच्या विषरसाचें सिंचन करणारें होतें." या समर्थनातही टिळकांच्या भूमिकेचें मर्म स्पष्टपणे व्यक्त होत नाही. परतंत्र देशांत प्रजापक्ष हा एक आणि अविभाज्य असावा लागतो. कारण प्रजापक्षात दुफळी झाली की त्यातली एक फळी देशद्रोह करून सरकारपक्षाला मिळावयाचीच, हें निश्चित असतें. ' A subject nation knows no politics' असा सूत्रमय सिद्धान्त एके काळचे युगांतरचे पुढारी आशुतोष चौधरी यांनी त्यांच्या एका सुप्रसिद्ध भाषणात मांडला होता. त्याचा खरा अर्थ हाच होता. डेक्कन सभा काढल्यापासून गोखले जे सरकारजमा झाले, ते शेवटपर्यंत तसेच होते. इतर देशांतील क्रांतीच्या इतिहासांतून तेथील नेमस्तांनी लोकपक्षाचा असा विश्वासघात केल्याचीं उदाहरणें नाहीत, हे क्रेन ब्रिंटन यांनी सांगितलेंच आहे. पण या नियमाला अपवाद पुण्यातच रानडेगोखल्यांनी निर्माण केला.

पुण्यातील नेमस्तांचा अपवाद

अमेरिकेतील इतिहासाचे एक आचार्य क्रेन ब्रिंटन यांनी 'क्रांतीचें शारीरशास्त्र' (Anatomy of Revolution) नांवाचा एक ग्रंथ लिहून त्यात अनेक क्रांतींचा तुलनात्मक विचार केला आहे. अशी तुलना करून एक सामान्य सिद्धान्त सांगताना ते म्हणतात :

Now the Moderates seem in all these revolutions to be following the slogan used so conspicuously ...... no enemies to the Left ...... All the force of the ideas and sentiments with which the Moderates entered the revolution gave them a sort of twist

towards the Left. Emotionally they cannot bear to think of themselves as falling behind in the revolutionary process. More-over many of them hoped to outbid the extremists for popular support, to beat them at their own game.

या साऱ्या क्रांतींमधून, डाव्या पक्षांमध्ये शत्रु करावयाचे नाहीत, या नियमाला अनुसरून नेमस्त पक्षाचे नेते वर्तन करीत असलेले दिसून येतात. ज्या विचारांच्या आणि भावनांच्या भरात ते क्रांतीच्या प्रवाहात आकर्षिले जातात, त्यांच्या प्रवाहाने त्यांच्या कार्यक्रमाला डाव्या पक्षाचें वळण लागलेलें असतें. या ओघात आपण मागे पडण्याची भावना त्यांना असह्य होते. लोकमताचा पाठिंबा मिळविण्यात आपण जहालांना मागे टाकू, अशीही त्यांना आशा वाटत असते. क्रेन ब्रिटन यांनी हें जें प्रामाणिक नेमस्तांचें वर्णन केलें आहे, त्या वर्णनाला पुण्याचे अप्रामाणिक नेमस्त हे प्रथमपासून अपवादभूत होते. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षापासून स्वत: शक्य तितकें दूर राहणें आणि टिळकपक्षाविरुद्ध सरकारकडे नित्य कागाळ्या करणें हाच रानडे-गोखले पंथाचा मुख्य कार्यक्रम होता. स्वतः सर फिरोजशहा मेथांनीही बामणगावकरांच्या जवळ बोलून दाखविलें होतें, 'राजनिष्ठा व्यक्त करणें, टिळकांच्यापासून दूर राहणें, त्यांचें नि आमचें पटत नाही असें तीव्रतेने सरकारला भासविणें आणि आमचें म्हणणें सरकार मान्य करीत नाही म्हणून टिळकांचें विनाशक राजकारणाचें धोरण लोकप्रिय होतें, असें उठल्याबसल्या सरकारच्या कानीकपाळी ओरडणें एवढाच आमचा कार्यक्रम आहे.' या कार्यक्रमाची सीमा ओलांडून टिळक राजद्रोही असल्याबद्दलच्या चहाड्या करणें हा पुण्यातील नेमस्तांचा कार्यक्रम होता. हा कार्यक्रम किती यशस्वी झाला होता, हें ३०-१०-१८९४ च्या 'केसरी'तील टिळकांच्या लेखावरून कळून येतें. "हाताखालील अधिकाऱ्यांच्या दुरुपदेशांनी आणि देशी वर्तमानपत्रकारांच्या लेखांनी आमचे लॉर्ड हॅरिस चिडून गेले आहेत आणि त्यांस महाराष्ट्रभर राजद्रोहाचीं, बंडाचीं आणि राजाज्ञाभंग करण्यास उत्तेजन देण्याचीं लक्षणें दिसू लागलीं आहेत. चिडलेल्या राज्यपालांच्या उद्‌गारांस भिऊन त्यांच्या हाताखालील काही रावसाहेब आणि त्यांचे अनुयायी यांनी आपल्या शहाणपणाचा प्रकाश पाडण्याकरिता म्हणा, अथवा राज्यपालांचा संतोष संपादण्याकरिता म्हणा, इंग्रजी, मराठी वृत्तपत्रांतून कोठें Moderation चें आणि कोठे भागूबाईचें स्वरूप घेऊन देशी पत्रकर्त्यांस शिव्या देण्यास प्रारंभ केला आहे. आमच्या ऐकण्यात असेंही आलें आहे की, ही श्ववृत्ति देशहितचिंतक मंडळी लौकरच 'जी सरकार'

या नांवाचें वृत्तपत्र काढणार आहेत." केळकरांनी टिळकचरित्राच्या ४९६ पानावर लिहिलें आहे की, ही कुचेष्टा सुधारक पत्राला उद्देशून असावी. 'अशा लोकांनी टिळकांच्या लेखनात राजद्रोह आहे, असें सुचविण्याचा उपक्रम आरंभिला.' तेव्हा आगरकर आणि गोखले सुधारकाचे संयुक्त संपादक होते, त्यावरून या शब्दसमूहात सोज्वळ समजलेल्या या दोघा सद्गृहस्थांचा समावेश होतो, हें उघड आहे. टिळकांप्रमाणे आपण राजद्रोही नाही, इतकेंच नव्हें तर आपली इंग्रजनिष्ठा अगदी अव्यभिचारी असल्याचें प्रदर्शन करण्याकरिताच पुढे गोखल्यांनी जपानच्या अभिनंदनावर बहिष्कार घातला.

जपानच्या अभिनंदनाशी गोखल्यांचा असहकार

१९०५ मध्ये जपानने रशियाचा पराजय केल्यानंतर पुण्यातील तरुणांनी जपानच्या सम्राटांचें अभिनंदन करण्याकरिता सभा भरविण्याचें ठरवून त्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची टिळकांना विनंती केली. तेव्हा 'अमानी मानदो मान्यो' अशा लोकमान्यांनी निर्मत्सरपणे सुचविलें की या सभेला राजप्रतिनिधींच्या विधिमंडळातील पुण्याचे प्रतिनिधि ना. गोखले यांना अध्यक्षपद द्यावें. टिळकांच्या या सूचनेप्रमाणे विद्यार्थी गोखल्यांकडें गेले असता त्यांनी निमित्त सांगितलें की आपण दास्याच्या अवस्थेत आहोत, दास्यातील लोकांनी एका स्वतंत्र विजयी देशाचें अभिनंदन करण्याची कल्पना मला पटत नाही, पुण्यासारख्या एका लहान नगरातल्या मूठभर विद्यार्थ्यांनी जपानचें अभिनंदन करणें चमत्कारिक दिसणारें आहे. गोखल्यांचें इंग्रजदास्य इतकें पराकोटीला गेलें होतें की, जपानच्या सम्राटांचें अभिनंदन करून इंग्लंडच्या राजाशी असलेल्या आपल्या राजनिष्ठेला बाट लावण्याची कल्पनाही त्यांना खुपत होती. आपण दास असलो तर स्वतंत्र विजयी देशांचें लोकमत आपल्याला अनुकूल करून घेण्याची आवश्यकता अधिकच असते. एवढेंही गोखल्यांना कळत नव्हतें, नाहीतर जपानच्या सम्राटांचें अभिनंदन करण्याच्या कल्पनेने त्यांच्या अंगावर असा काटा उभा राहिला नसता. या सभेचें महत्त्व टिळकांना कळत असल्यामुळे त्यांनी गोखल्यांचें मन वळविण्यासाठी प्रथम न. चि. केळकर आणि नंतर बार्शीचे रामभाऊ साने यांना त्यांच्याकडे पाठविलें. रूसो-जपानी युद्ध चालू झालें तेव्हा स्वतः टिळक ताई-महाराज-प्रकरणात अडकले होते. पण त्या संकटातून सुटका होताच त्यांनी जपानच्या साहाय्यासाठी युद्धदुःखनिवारण निधि जमवून तो जपानला पाठविण्याचा उपक्रम आरंभिला. टिळकांच्याकडून एका

मासातच वीस सहस्रांहून अधिक येनचें साहाय्य मिळाल्याने जपानच्या वतीने काउंट हयासी यांनी टिळकांचे आभार मानले. जपानी सम्राटांच्या अभिनंदनाच्या सभेत टिळकांनी बोलून दाखविलें, 'बोअर युद्धात त्यांची राजधानी प्रिटोरिया इंग्रजांनी जिंकली, तेव्हा सर्वत्र सभा भरवून इंग्लंडचें अभिनंदन करण्यात आलें. तो जर लहान तोंडी मोठा घास होत नाही तर इंग्लंडच्या मित्राचें, जपानचें अभिनंदन करतानाच असें कां व्हावें? अशा प्रकारचें अभिनंदन करणें हा आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे. तो आम्ही योग्य समयी न बजावणें म्हणजे आपल्या पायावर आपण होऊन धोंडा पाडून घेण्यासारखें आहे.' या प्रसंगावरूनही गोखल्यांचें दासराजकारण आणि टिळकांचें स्वातंत्र्याभिलाषी राजकारण यांतील प्रभेद वाचकांना कळून येईल.

गोखल्यांचें दासराजकारणातील नेतृत्व

त्याच वर्षी गोखल्यांच्या दासराजकारणातील नेतृत्वाचा राजप्रतिनिधि मिंटोंनी कसा उपयोग करून घेतला, ती कथा येथे त्यांच्या पत्नीच्या शब्दांतच सांगितली पाहिजे.

Minto truly was no sooner in the saddle than he was called upon to deal with a difficult situation. Their Royal Highnesses were to be boycotted. A crisis seemed imminent. "Send for Gokhale. I must see him." said the Viceroy ...... As Gokhale left the Viceroy's room, he turned to Col. Dunlop Smith and said, "His Excellency showed sympathy and understanding. I will stop the boycott."

मिंटो अधिकारावर आल्यानंतर लौकरच त्यांना कळून आलें की वंगभंगाने संतप्त झालेले बंगाली पुढारी तेव्हा भारतभेटीसाठी यावयाला सज्ज झालेल्या सपत्नीक युवराजांवर बहिष्कार पुकारणार आहेत. अशा संकटात लॉर्ड मिंटोंनी गोपाळकृष्णांचा धावा केला. त्यांच्या हाकेला धावलेल्या गोखल्यांनी तत्काळ त्यांना बहिष्काराची चर्चा बंद पाडण्याचें आश्वासन दिलें. हें आश्वासन पूर्ण करण्याकरिता गोखल्यांना आपल्या कुटिल राजनीतिकौशल्याचा अंत पहावा लागला. बंगाली नेत्यांच्या प्रक्षुब्ध भावनांना लगाम लावता यावा, यासाठी काही अंशी तरी त्यांच्या संतप्त मनःस्थितीचें समर्थन करणारें आणि बंगाली जनतेची चाटुस्तुति करणारें भाषण त्यांनी राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षपदावरून करून स्वतःविषयी त्यांच्या मनात आत्मीयबुद्धि निर्माण केली आणि

मग एकीकडे सरकारी सामर्थ्याचें सैनिकी सिद्धतेच्या रूपाने प्रदर्शन करून आणि दुसरीकडे इंग्लंडच्या प्रवासातील आपले सहकारी लाला लाजपतराय यांना भीड घालून त्यांच्याकडून युवराजांच्या स्वागताच्या ठरावाला विरोध करावयाला उत्सुक असलेल्या आग्रही बंगाली प्रतिनिधींसह टिळकांना त्या प्रसंगी मांडवाबाहेर चर्चेत गुंतवून त्यांनी आपला कार्यभाग साधला. लालाजी हे तेव्हा पंजाब आणि उत्तरप्रदेश या दोन प्रांतांतील क्रांतिकारकांचे सर्वाधिकारी असल्याने त्यांच्या अधिकाराखालील प्रांतांत युवराजांच्या स्वागतावरील बहिष्काराचा पुरस्कार करून इंग्रजी राज्याला प्रकट आणि प्रखर विरोध करण्याचें कार्य टिळकांनी त्यांच्याकडे सोपविलें होतें. पण गोखल्यांचें अंतरंग न ओळखणारे लालाजी त्यांच्या भिडेला बळी पडल्याने ती योजना बहुतांशी फसली.

चंदावरकर न्यायमूर्ति कसे बनले ?

टिळकांचे मुंबईतील एक वर्गबंधु आणि पुढील आयुष्यातील शत्रु नारायणराव चंदावरकर हे न्यायाची विटंबना करण्याकरिता न्यायमूर्ति कसे बनले, याचा इतिहास 'भारतीय राष्ट्रवादासंबंधी इंग्रजांचें धोरण' या ग्रोव्हर यांच्या पुस्तकावरून उपलब्ध झाला आहे. १९०० मध्ये मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयात चंदावरकरांची तात्पुरती नेमणूक झाली आणि त्याच वर्षी त्यांना लाहोर येथे भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष निवडले. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून न्यायमूर्तींच्या आसनावर उडी मारण्याची तेव्हाच्या पुढाऱ्यांची पद्धतच होती. आपल्या अध्यक्षपदामुळे न्यायमूर्तींच्या आसनावरील अधिकार नष्ट होऊ नये म्हणून त्यांनी आपलें अध्यक्षीय भाषण ऑक्टोबरमध्येच भारत सचिवांच्याकडे धाडून दिलें होतें. तरीसुद्धा काँग्रेसचें अध्यक्षपद स्वीकारल्यामुळे ते न्यायमूर्तिपदाला अपात्र ठरले आहेत, असा आग्रह तेव्हाचे भारतसचिव लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनी धरला. तेव्हा त्यांची समजूत घालण्याकरिता मुंबईचे तेव्हाचे राज्यपाल लॉर्ड नॉर्थकोट यांनी त्यांना कळविलें :

> He is a reasonable and moderate man. His appointment as President was much resented by the disloyal party of the Congress and he would be of great use in dealing with the extreme section.

थोडक्यात सांगायचें म्हणजे राष्ट्रीय पक्षाचा काटा काढावयाला यांचा चांगला उपयोग होईल, याच बुद्धीने लॉर्ड नॉर्थकोट यांनी चंदावर-

करांची भेट घेऊन त्यांना राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान पतकरण्याची अनुज्ञा दिली होती. या प्रश्नावर भारतसचिवांनी लॉर्ड कर्झन यांचें मत मागितलें असता त्यांनीही लॉर्ड नॉर्थकोट यांच्या मतालाच पाठिंबा देऊन कळविलें की, यांची नेमणूक आपल्याला फार लाभदायक ठरेल. (great advantage) याच प्रश्नाची प्रकट चर्चा तेव्हा वृत्तपत्रांतूनही चालू होती. टिळकांच्या 'मराठा' पत्राने राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून न्यायमूर्तींच्या आसनावर आरूढ होणाऱ्या या नकली नेत्यांची निंदा केली होती. याचा सूड चंदावरकरांनी ताईमहाराज प्रकरण त्यांच्या न्यायालयापुढे आलें असताना घेतला. आपल्या निर्णयात चंदावरकरांनी लिहिलें होतें :

We are driven to believe that a considerable number of men of good position have conspired together to give false evidence.

या वाक्यात चंदावरकरांनी ज्या प्रतिष्ठित व्यक्तींवर खोटी साक्ष देण्याचा कट केल्याचा आरोप केला होता, त्यात टिळकांचा प्रामुख्याने समावेश केला होता. या नीच आरोपाला प्रिव्ही कौन्सिलच्या न्यायाधीशांनी पुढील उत्तर दिलें आहे.

It is a priori difficult to understand how these with no object to gain and no interest to serve are supposed to have entered into a conspiracy and committed the perjury which the High Court found out. Their Lordships think the conclusion come to by the learned judges to be entirely unwarranted by facts.

त्या वेळी एका नामांकित इंग्रजी वृत्तपत्राने या निर्णयावर टीका करताना म्हटलें होतें :

Referring to the statement made by Chandavarkar that Tilak and others had conspired together to give false evidence, their Lordships said that they did not believe that one word of it was justified by the evidence. It was not a revision. It was a rebuke, severe and scathing.

या उताऱ्यांचा सारांश असा की, टिळकप्रभृति प्रतिष्ठित व्यक्तींवर न्यायमूर्तींनी खोटी साक्ष देण्याचा कट केल्याचा जो आरोप केला आहे, त्याला काडीचाही आधार नाही. असा अभिप्राय व्यक्त करून प्रिव्ही कौन्सिलने त्या न्यायमूर्तींची अतिशय कठोर कानउघाडणीच केली आहे.

टिळकांविषयी खोटया कंडया

ही कानउघाडणी झाल्यानंतर चंदावरकरांनी टिळकांविषयी आणखी खोटया कंडया पिकवून आपल्या कानांचा हलकेपणा आणि मनाचा नीचपणा व्यक्त केला. प्रिव्ही कौन्सिलचा निर्णय हिंदुस्थानात कळल्यानंतर मुंबईचे तेव्हाचे मुख्य न्यायमूर्ति सर बेसिल स्कॉट चंदावरकरांना म्हणाले :

Lowndes told me that when the judgement of the Privy Council came out, Sir Robert Finlay remarked that "Privy Council had delivered a shocking judgement."

तेव्हा सर नारायणांनी मुख्य न्यायमूर्तींना सांगितलें :

I had it from Ferozeshah Mehta that Tilak had made his speech affirming his loyalty under an arrangement made through Daji Abaji Khare and communicated to Government. Mehta told me that he had no idea at that time he became a party to the arrangement that the real object of Tilak was to create a prejudice in Tilak's favour in view of the hearing of the Tai Maharaj appeal before the Privy Council.

सर नारायण सांगतात की, टिळकांनी आपली राजनिष्ठा व्यक्त करण्याचें जें निवेदन दाजी आबाजी खरे यांच्या द्वारा सरकारशी बोलणीं करून नंतर केलें, त्या बोलण्यात सर फिरोझशहांनीही भाग घेतला होता. पण या निवेदनाचा मुख्य हेतु ताईमहाराज प्रकरणाचा प्रिव्ही कौन्सिलचा निर्णय करणाऱ्यांचें मत आपल्याला अनुकूल व्हावें, हा होता, ही गोष्ट तेव्हा माझ्या ध्यानात आली नाही. हे सारे 'सर' टिळकद्वेषाने अंध झाले नसते तर त्यांना हें दिसलें असतें की टिळक सुटल्यानंतर लॉर्ड सिडेनहॅम यांच्या मुंबई सरकाराने 'टिळक हे सरकारचे शत्रु आहेत' अशा आशयाचें पत्रक काढल्यानंतर लौकरच महायुद्ध चालू झाल्यामुळे राजनिष्ठा व्यक्त करणें अथवा मंडालेला परत जाणें यावाचून टिळकांच्या पुढे तिसरा पर्यायच नव्हता; तेव्हा ताईमहाराज प्रकरणाचा निर्णय आपल्यासारखा व्हावा, याकरिता टिळकांनी राजनिष्ठा व्यक्त केली, असलीं मुक्ताफळें उधळून टिळक सरकारचे शत्रु असल्याने आपण खोटे निर्णय दिले, हे लोकांचे आरोप आपण पर्यायाने मान्य करीत आहोत. सर फिरोजशहा आणि सर नारायणराव यांच्यासारख्या मुरलेल्या विधिविशारदांना इतकें तरी कळावयाला हवें होतें की, आपल्या स्वैरालापाने टिळकांना काहीच न्यून येत नसून इंग्लंडच्या सर्वांत वरिष्ठ

न्यायालयाच्या कीर्तीला मात्र काळिमा लागत आहे. राजनिष्ठा व्यक्त करण्याच्या विनिमयात टिळकांना जर आपल्या अभियोगांचे निर्णय आपल्यासारखे करून घेता येत असते तर त्याचवेळी चिरोल प्रकरणाचा निर्णयही अनुकूल करून घेण्याची व्यवस्था त्यांनी केली असती. यात आणखी तिरस्करणीय गोष्ट ही होती की, प्रिव्ही कौन्सिलचा निर्णय टिळकांना अनुकूल झाल्यानंतर लॉर्ड शॉसारख्या न्यायाधीशांवर अन्याय्य आरोप करणाऱ्या आणि त्यांच्यावरील पक्षपाताचा आक्षेप मिटक्या मारीत ऐकणाऱ्या सर बेसिल स्कॉट यांनीच, टिळकांची अश्लाघ्य निंदा न्यायासनावरून करणाऱ्या दावर न्यायमूर्तींची मानहानी केल्यानिमित्त केळकरांना क्षमायाचना करीपर्यंत बंदिशाळेत ठेवण्याची अमानुष शिक्षा सांगितली होती. या साऱ्या किळसवाण्या प्रकारावर अधिक टीका करण्याची आवश्यकता नाही. नाशिक कटाच्या प्रकरणी चंदावरकरांनी व्यक्त केलेलें कर्तृत्व सुप्रसिद्ध आहे. यांना न्यायाधीश नेमले म्हणजे हे राष्ट्रीय पक्षाचा काटा काढण्याला चांगले उपयोगी पडतील, ही लॉर्ड नॉर्थकोट यांची अपेक्षा चंदावरकरांनी तंतोतंत सफळ केली, याविषयी शंका नाही.

चंदावरकरांचे बंधु दावर

मुंबई न्यायालयातील चंदावरकरांचे दुसरे सहकारी अन्यायमूर्ति दावर होत. इथे दावर महाशयांना अन्यायमूर्ति हें विशेषण लाविलें आहे, तें त्यांनी टिळकांना सहा वर्षें काळेपाण्याची शिक्षा सांगितली, म्हणून लाविलेलें नाही. न्यायमूर्तिपदावर असताना हे सरकारशी कारस्थानें करीत होते आणि तिकडून येणाऱ्या सूचना तंतोतंत कृतीत उतरवीत होते, यासाठी लाविलेलें आहे. याचा एक पुरावा डॉ. वि. म. भट यांनी आपल्या अभिनव भारताच्या इतिहासात दिला आहे. 'मुंबईच्या तारविभागातील मोघे हे एके दिवशी दावर न्यायमूर्तींनी राजप्रतिनिधि लॉर्ड मिंटो यांना पाठविलेली तार घेऊन संस्थेच्या केंद्रावर आले.

'Defence grave, dependent jury'

बचावाचें भाषण फार महत्त्वाचें, पण पंच विश्वासाचे. या तारेवरून टिळकांवरील अभियोगाचीं सूत्रें राजप्रतिनिधींच्या कार्यालयांतून कशीं हलत होतीं, हें दिसून येतें. याचा दुसरा पुरावा स्वतः श्रेष्ठ न्यायाधीश असलेल्या जयकरांनी आपल्या आत्मचरित्रातून वाचकांना पुरविला आहे. ते लिहितात :

It is a curious fact, but none the less true, that the precise

sentence pronounced by the judge towards midnight was being talked of at 5-30 in the evening amongst the members of the bar who it was said derived the information from a highly placed police officer attending to the case.

मी सांगतो ही घटना विचित्र असली तरी सत्य आहे. न्यायमूर्ति दावर यांनी मध्यरात्रीच्या सुमाराला टिळकांना जी शिक्षा सांगितली, तितकीच शिक्षा होणार असल्याच्या गोष्टी संध्याकाळी साडेपांच वाजता विधिविशारद आपापल्यांत बोलत होते आणि त्यांना ही माहिती सरकारच्या वतीने या अभियोगाचीं सूत्रें हलविणाऱ्या रक्षक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कळली होती. टिळकांना सहा वर्षें काळे पाण्यावर पाठविण्याची सूचना सरकारने न्यायमूर्तींना केली होती, ही गोष्ट १९०८ मध्ये सारेच लोक बोलत होते आणि मला वाटतें याच गोष्टीचा उल्लेख केळकरांनी 'मराठा' पत्रातील आपल्या लेखात केल्यामुळे त्यांना न्यायालयाच्या मानहानिनिमित्त पहिली शिक्षा झाली. असो. डॉ. भटांनी न्यायमूर्ति दावर हे राजप्रतिनिधींना तारा करून त्यांच्या सदिच्छेचें भांडवल जमवीत असल्याचा जो उल्लेख केला आहे, त्याला स्टॅन्ले वॉलपेर्ट यांच्या 'मोर्ले अँड इंडिया (१९०६-१९१०) या पुस्तकातील माहितीवरून दुजोरा मिळतो.

Lord Minto ultimately recommended Bombay's High Court justice D. D. Davar, the man who sentenced Tilak to six years transportation for sedition in 1908. Morley rejected Davar on purely political grounds, writing, " What the Indians think of our nominee is as important an element in deciding as the qualifications of the nominee himself; and the record of Davar in the case of Tilak has not tended to make him popular with our Indian friends.

सत्येंद्रप्रसन्न सिंह यांनी राजप्रतिनिधींच्या कार्यकारिणीचें त्यागपत्र दिल्यानंतर लॉर्ड मिंटोंनी त्यांच्या विधिमंत्र्याच्या पदासाठी न्यायमूर्ति दावर यांचें नांव सुचविलें. पण लॉर्ड मोर्ले यांनी राजकीय कारणाकरिता त्यांची नेमणूक करण्याचें नाकारलें. आपल्या नेमणुकीवर भारतीय मित्रांचा अभिप्राय काय पडेल, याचाही त्या व्यक्तीच्या पात्रतेसहच विचार करणें आवश्यक आहे आणि दावर यांनी टिळक प्रकरणात केलेलें वर्तन त्यांना लोकप्रियता मिळवून देणारें नव्हतें. 'त्रयाणामेकवाक्ये संप्रत्ययः' असें आर्य चाणक्यांनी म्हटलें आहे. त्याप्रमाणे तीन विभिन्न मार्गांनी उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून दावर यांच्या चरित्राची आणि त्यांच्या

न्यायालयांत कशा प्रकारचा न्याय मिळत असे, याची कल्पना येते. डॉ. भटांनी त्यांच्या ग्रंथाच्या ५७ पानावर असेंही लिहून ठेविलें आहे की, १९०८ मध्ये दावरला मारण्याकरिता एका श्रीमंत सावकाराने आठ सहस्रांचें परितोषिकही देऊ केलें होतें. अण्णा कर्वे त्यासाठी काही दिवस दावरवर टेहेळणीही करीत होते. ब्रह्मगिरिबुवा आणि र. वि. भावेही त्या उद्योगात होते. पण संधि सांपडली नाही. टिळकांनी विशेष पंचांना (स्पेशल ज्यूरीला) विरोध केला, तेव्हा दावर महाशयांनी त्यांना आश्वासन दिलें होतें की पंचांत मराठी जाणणाऱ्यांचें बहुमत राहील, अशी मी स्वतः व्यवस्था करीन. हें आश्वासन उलटया अर्थाने पाळून त्यांनी ज्या पंचात अवघे दोघेच मराठी जाणणारे होते, असे पंच निवडून आणले.

रानडे-गोखलेपक्षाकडून टिळकांचा छळ

सद्गुणाचें नाम आणि रूप धारण करून आक्रमण करणाऱ्या पापांप्रमाणे रानडेगोखलेपक्षाने टिळकांचा किती भयानक छळ केला, याची अर्वाचीन पिढीला काहीच कल्पना नाही. पण ही वस्तुस्थिति टिळककालीन त्रयस्थ लोकांना सुद्धा सुविदित होती. आणि त्यांच्यापैकी काहीजणांनी ती स्पष्ट शब्दांत बोलूनही दाखविली होती. १८९७ मधील टिळकांवर झालेल्या राजद्रोहाच्या अभियोगाचा इतिहास छापताना अॅडव्होकेट सेटलूर आणि बॅ. केशवराव देशपांडे यांनी लिहिलें आहे :

Mr. Tilak has perhaps been the greatest victim of misrepresentation and backbiting; but the fact that he has never taken steps to counteract them is the best proof that 'self' was always the last consideration with him.

प्रतिपक्षांच्या चहाडया आणि विपर्यास यांनी ग्रस्त झालेल्या व्यक्तींत टिळक हेंच कदाचित् सर्वांत श्रेष्ठ असतील. पण त्यांचा प्रतिकार करण्याकरिता त्यांनी कोणतेही उपाय योजले नाहीत, हाच त्यांचें 'स्व' कडे कधीच लक्ष नसतें, याचा सर्वोत्कृष्ट पुरावा आहे. आंध्रप्रांताचे पहिले प्रधानमंत्री टी. प्रकाशम् यांनीही त्यांच्या आठवणीत असेच उद्गार काढले आहेत.

None of his position in India has sufferred such long terms of imprisonment at the hands of the Government and such horrid vilification at the hands of his own countrymen.

(आठवणी खं. ३ पान इं. ५३)

त्यांच्याइतक्या श्रेष्ठ पदवीच्या कोणाही व्यक्तीला सरकारच्या शत्रुत्वामुळे इतका दीर्घ कारावास भोगावा लागला नाही. तसेंच स्वतःच्या देशबांधवांच्याकडून झालेल्या इतक्या भयंकर खोटयानाटया आरोपांना आणि छळाला तोंड द्यावें लागलें नाही. त्या दिवसांत पक्षसमर्थनाच्या अभिनिवेशाने टिळकांच्या प्रतिपक्ष्यांनी केलेले भयानक खोटेनाटे आरोप आणि त्यांनी नीचपणाने केलेला टिळकांचा छळ यांच्याकडे प्रस्तुत लेखकाने दुर्लक्षही केलें असतें. पण इतक्या नीचपणाने टिळकांचा छळ करणाऱ्या पक्षाचे पुरस्कर्ते जेव्हा साळसूदपणाचा आव आणून टिळकांनीच आपल्या चरित्रनायकांचा छळ केल्याचा कांगावा करतात, तेव्हा टिळकसमकालीन त्रयस्थ व्यक्तींच्या अभिप्रायाकडे त्यांचें लक्ष वेधावें लागतें.

टिळकांच्या अटकेला गोखल्याचा हातभार

१९०८ मध्ये टिळकांना राजद्रोहानिमित्त अटक झाली, तेव्हा हिंदुस्थानसरकारने भारतमंत्र्यांना विद्युत्संदेश पाठविला होता की, टिळकांना अटक केल्यावाचून हिंदुस्थानात शांतता होणार नाही, असें गोखल्यांचेंही मत आहे. ती तार भाजेकर, विजापूरकर, खापर्डे आणि वासुकाका जोशी या सर्वांनी वाचली. गोखले इंग्लंडहून परत आल्यावर काकांचें आणि त्यांचें बोलणें झालें, तेव्हा गोपाळराव म्हणाले की ही गोष्ट खरी आहे. गोखल्यांनी टिळकांच्या अटकेला हातभार लावल्याचा उल्लेख वासुकाका अनेकदा करीत असल्याने पुण्यातील प्रसिद्ध हेर बाबासाहेब देशपांडे (हे माझ्या मातामहांचे मित्र असल्याने यांना मी बाळपणापासून ओळखत होतो.) यांनी काका मला आणि गोपाळराव गोखल्यांना मारणार आहेत, असे पुण्याच्या रक्षकप्रमुखांना कळविलें होतें. या प्रसंगी लेखकाला अतिपरिचित असलेल्या बाबासाहेबांनी आपल्याच पंक्तीला गोखल्यांना बसविलें, यावरून गोखले हे अधिक श्रेष्ठ प्रतीचे बाबासाहेब असल्याचें त्यांचें मत होतें, हें दिसून येतें. गोखल्यांचे घरगुती नांव बाबासाहेबच होते. ही सारी माहिती ज्या देवगिरीकरांच्या ग्रंथावरून घेतली आहे, त्यांनी बाबासाहेबांच्या वर्णनात लिहिलें आहे. 'गहिवरणें, रडणें, सहानुभूति दाखविणें आणि पोटांत शिरून गुप्त वार्ता काढून घेणें, या कलेत ते निष्णात होते. या साऱ्या कला बाबासाहेब गोखल्यांनाही अवगत होत्या. या कलांचा उपयोग करून त्यांनी सावरकरांनासुद्धा इंग्लंडात चकविलें. मग इतरांची काय कथा! या कर्तृत्वाकरिताच अरविंदांनी त्यांना बिभीषण ही सार्थ पदवी समर्पण केली होती.

गोखल्यांचे कट्टे शत्रु खाडिलकर

टिळकपक्षात गोखल्यांचे कट्टे शत्रु खाडिलकर हेच होते. टिळक असताना आणि टिळक मंडालेला गेल्यानंतरही गोखल्यांच्यावर जी कडक टीका 'केसरी'त येत असे, ती सारी खाडिलकरांच्या हातची असे. सन्मित्र समाज मेळ्यातील पदानिमित्त नीलकंठ वामन भिडे यांच्यावर गोखल्यांनी मानहानीचा अभियोग आणला, तेव्हा त्यांच्या पक्षाचे समर्थन करण्याकरिता खाडिलकरांनीच बॅ. बॅप्टिस्टा यांना बोलावून आणलें. गोखल्यांना मारावयाचा संकल्प करून ज्या तरुणांनी काही उद्योग केले, त्यांत खाडिलकरांचे भाचे वासुदेवराव भावे यांचे वडील बंधु हेच प्रमुख होते. खाडिलकरांच्या गोखलेद्वेषामुळेच ते आणि केळकर या उभयतांतील स्वभावभेद हें असहकारितेच्या थरापर्यंत जाऊन पोचले. आपल्या अन्नदात्यांच्या या गोखलेद्वेषाचा उल्लेख फाटकांनी गोखलेचरित्रातून गाळला असला तरी टिळकनिधनानंतर टिळकांचे जे अनुयायी गांधीपक्षाला मिळाले, तेच गोखल्यांचे कट्टे शत्रु होते, ही वस्तुस्थिति लपविणें म्हणजे सत्यापलाप करणें होय, ही गोष्ट त्यांनी विसरू नये. गोखले हे काही काळ तरी टिळकांचे सहकारी असल्याने त्यांच्या मनात गोखल्यांविषयी जी ममत्वबुद्धि होती, तिचा विटाळ त्यांच्या अनुयायांना होण्याचें काहीच कारण नव्हतें. खाडिलकरांनीच ५-५-१९०८ च्या केसरीत गोखले पक्षाच्या ब्रीदवाक्यांवर (क्रीड) लिहिताना म्हटलें होतें " राजकीय चळवळ करणाऱ्यांचें कुल नाशाप्रत नेण्याकरिता मवाळाचें ब्रीद (क्रीड) निर्माण झालें आहे. आपसातील भांडणात, स्वतःच्या सामर्थ्यावर आणि उद्योगावर वर्चस्व मिळविण्याच्या प्रामाणिक महत्त्वाकांक्षेने हें ब्रीद पुढे आणलेलें नसून कुलधर्माचा त्याग करून कुलाच्या बाहेरच्या अधिकारी वर्गाकडून प्रथम कुलाचा एक भाग आणि मागाहून सर्वभाग नाशास नेणाऱ्या देशद्रोहामुळे हें ब्रीद जन्मास आलें आहे." गोखल्यांनी सुरतेपूर्वी केलेल्या कारस्थानांचा परिचय करून घेतला म्हणजे खाडिलकरांचा वरील अभिप्राय किती यथार्थ होता तें कळून येतें.

बंगालचा छळ करण्याची मागणी

सुरत येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनापूर्वी आपले मित्र लाला लाजपतराय यांची सुटका करण्याची विनंति करीत असतानाच बंगाली नेत्यांचा छळ करण्याची गोखल्यांनीं सरकारला सूचना केली होती.

In Gokhale's view an undue harshness had been shown to Punjab, while Pal of Bengal was softly treated and the seditious

articles published in the Sandhya went unpunished. Beadon Square should have been silenced long ago.

—(अमलेश त्रिपाठींचा ग्रंथ पान १८२)

गोखल्यांनी राजप्रतिनिधींचे कार्यवाह डनलॉप स्मिथ यांना सांगितलें की, तुम्ही पंजाबचा छळ करता, पण बंगालला कां दया दाखविता? लाजपतरायांना सीमापार केलेत, पण विपिनचंद्रांची काय वाट? संध्या पत्रावर राजद्रोहाचा अभियोग अजून का चालू केला नाही? सभाबंदी करून बीडन स्क्वेकरमधील वक्त्यांच्या तोफा बंद कां पाडल्या नाहीत? गोखल्यांच्या या सूचनांना अनुसरून सरकारने बिपिनबाबूंना बंदिशाळेत पाठविलें. संध्या पत्राचे ब्रह्मबांधव अटकेतच स्वर्गवासी झाले आणि सभाबंदीचा निर्बंध संमत करून घेतला.

गोखल्यांचीं सुरतेपूर्वीचीं कारस्थानें

कलकत्त्याची राष्ट्रीय सभा संपल्यानंतर १९०७ च्या प्रारंभापासून गोखल्यांनी (अरविंदांनी आरोप केल्याप्रमाणे) बिभीषणाची भूमिकाच घेतली होती. या बिभीषण महाशयांना राजप्रतिनिधींच्या मंत्रिमंडळात घेण्यासंबंधी बोलणींही तेव्हा चालू होतीं. २४-३-१९०७ या दिवशी सर हारकोर्ट बटलर यांनी राजप्रतिनिधींचे कार्यवाह डनलॉप स्मिथ यांना लिहिलेल्या पत्रात अशी सूचना केलेली आहे:

Moderation does not last under the Indian Sun. If the Government does not draw them to itself, the Moderates will turn to the Extremists and the pressure of racial feeling will hurry them on their way. What we do not give as grace will be wrung from us soon of necessity. Why not create an educational portfolio in development of the policy of nationalising education by making vernacular education free? And why not make Gokhale the first member?

हिंदुस्थानातील कडक उन्हाळयात नेमस्तपक्षाचें दंव काही टिकत नाही. नेमस्तांना सरकारने स्वतःच्या पक्षात समाविष्ट करून घेतलें नाही तर ते राष्ट्रीय पक्षाला मिळतील आणि मग स्वजातीयांच्या दडपणामुळे तेही वहात जातील. आज जे अधिकार आपण त्यांना सुखासमाधानाने देत नाही, ते उद्या त्यांच्याच हाती सोपविणें अपरिहार्य होईल. सारें शिक्षण सरकारी करण्याच्या धोरणाचा भाग म्हणून प्राथमिक शिक्षण निःशुल्क कां करीत नाही? आणि शिक्षणविभागाचे पहिले सभासद गोखल्यांनाच कां करीत नाही?

आहे की नाही मी साहेबाचा सर्व्हंट ?

या आमिषामुळे गोखल्यांचा मासा राजप्रतिनिधींच्या गळाला लागला होता. म्हणून राजप्रतिनिधींच्या सान्निध्यात गोखले किती लज्जास्पद आणि घृणास्पद वर्तन करीत असत, याची गोखल्यांच्या भक्तांनाच काय, त्यांच्या शत्रूंनासुद्धा कल्पना करता येणार नाही. २८-३-१९०७ या दिवशी कलकत्त्यातील राजप्रतिनिधींच्या भवनात इतर अनेक अतिथींसह गोखल्यांनाही तिसऱ्या प्रहरी चहाप्रीत्यर्थ पाचारण केलेलें होतें. त्या भवनात प्रवेश केल्यानंतर प्रथम त्यांनी त्यांचा सजातीय, राजप्रतिनिधींचा लाडका जॅक, याच्यावरच पदन्यास केला, तेव्हा एका पार्श्वचराने त्यांची त्या धर्मराजाच्या विश्वासू सहचराच्या तावडीतून मोठ्या कष्टाने सुटका केली. त्यानंतरचा प्रसंग इथे राजप्रतिनिधींचे कार्यवाह डनलॉप स्मिथ यांच्या भाषेतच उतरून घेतला पाहिजे.

Lady Violet left one of her gloves behind at lunch and it was returned to her a short time afterwards with the following letter. " Honoured Madam, I have the honour to return to your Ladyship this glove to your honoured hand. I renched it (sic) from the hand of the wretch Salimulla. The finger marks on it are not dirt. Your devoted Gokhale.

लेडी व्हायोलेट ही लॉर्ड मिंटोंची सर्वांत धाकटी कन्या. तिच्या हातातील एक मोजा या चहाच्या प्रसंगी मेजावर पडून राहिलेला पाहून ढाक्याचे नबाब सलीमुल्ला यांनी तो उचलला. तोंच गोखल्यांनी त्यांच्यावर झडप घालून तो त्यांच्या हातून हिसकावून घेऊन आपल्या इंग्रजीच्या चुकीने दूषित झालेल्या पत्रासह लेडी व्हायोलेटकडे पाठवून दिला. या सलीमुल्लांनीच त्या वेळी पूर्व बंगाल्यातील मुसलमानांना हिंदूंच्या बायका पळवून त्यांच्याशी बलात्काराने निका लावण्याची चिथावणी दिली होती. या अत्याचारपीडित अबलांच्या संरक्षणासाठी अबलोन्नतिपंथाच्या गोखल्यांनी कोणतीच हालचाल केली नव्हती, हें लक्षात घेतलें म्हणजे लेडी व्हायोलेटच्या मोजासाठी सलीमुल्लांवर झडप घालणाऱ्या या अर्वाचीन गोकलखांच्या वर्तनाची शिसारी आल्यावाचून रहात नाही. वरील पत्रात गोखल्यांनी सलीमुल्लांचा नीच म्हणून उल्लेख केला आहे, त्यावरून इतरांना गालिप्रदान करण्याच्या त्यांच्या नीच प्रवृत्तीचीही जाणीव होते. या स्मिथसन्निधच त्यांनी मोतीलाल घोष यांना 'स्नीक' म्हणजे चोरटे कारभार करणारा, सुरेंद्रनाथ बानर्जींना पुढारीपणाला अपात्र इत्यादि विशेषणें लाविलीं होतीं. वर आपण असें बोललो नाही, असें

उत्तर देऊन अंग झाडून टाकण्याचीही खोड त्यांना होती. त्यामुळे त्यांची भेट होताच त्या वेळी झालेल्या संवादाचीं टिपणें करण्याचा परिपाठ डॅनलॉप स्मिथनी ठेविला होता. ते म्हणतात :

I gathered that Mr. Gokhale is somewhat tired of Bengalis. He says that Motilal Ghosh is not straight. He is a sneak, that Surendranath Banerjee is incapable of organisation. He never does any real work and habitually mistakes the form for substance. I have jotted down the main heads of what Gokhale said as his memory and imagination sometimes led him astray when he gives account of interviews.

(सर्व्हंट ऑफ इंडिया पान १२३)

एखाद्या भेटीत घडलेल्या गोष्टींची पुनरावृत्ति करताना गोखल्यांची स्मृति आणि कल्पनाशक्ति त्यांना केव्हा केव्हा वस्तुस्थितीपासून दूर नेते, असा अनुभव डनलॉप स्मिथसारख्या राजप्रतिनिधींच्या कार्यवाहांनाही आला होता. हाच ज्या फाटक-माथुरप्रभृति त्यांच्या चरित्रकारांचा आदर्श पुरुष, त्यांनी सत्यापलाप केला तर त्यात काहीच नवल नाही.

गोखले रडले

वरील प्रसंगानंतर एका वर्षाने २८-३-१९०८ या दिवशी गोखल्यांनी आयव्ययपत्रकावर बोलताना मिंटो-मोर्लेच्या सरकारावर थोडी कडक टीका केली. तेव्हा राजप्रतिनिधींनीही सभ्य भाषेत गोखल्यांचा उद्धार केला. त्यानंतर लगेच गोखल्यांनी डनलॉप स्मिथला पत्र लिहून राजप्रतिनिधींना दुखविल्याचा आपल्याला पराकाष्ठेचा खेद (terribly distressed) वाटत असल्याची वार्ता त्यांना विदित केली. तेवढ्यानेही गोखल्यांच्या पश्चात्तापाचें समाधान न होऊन लगेच पंधरा मिनिटांनी ते डनलॉप स्मिथना भेटावयाला गेले. ते लिहितात :

I have never seen Gokhale so deeply moved. There were tears in his eyes when he said how he felt having seemed even by implication to attribute anything like hesitancy to his Excellency.

म्हणजे जरा एखादा कडक टीकेचा शब्द तोंडातून निघाल्यानिमित्त राजप्रतिनिधींनी झाडल्यानंतर मुळुमुळू रडणाऱ्या या पुढारीब्रुवांचा सरकारवर प्रभाव तरी काय पडणार? गोखल्यांच्या या भेकड रुदनाशी मोतीलाल घोष यांच्या भावनाप्रधान रुदनाची तुलना केली

म्हणजे टिळकांचे रुदनशील मित्र आणि शत्रु यांच्यातील प्रभेद वाचकांना अंशत: तरी कळून येईल. लॉर्ड कर्झन यांचे कार्यवाह सर वाल्टर लॉरेन्स यांच्याशी वंगभंगासंबंधी मोतीलाल घोष चर्चा करीत असताना शेजारच्या खोलीत इंग्लंडचे राजपुत्र भावी पांचवे जॉर्ज आले. त्यांची चाहूल लागल्यावर सर वॉल्टर यांनी राजपुत्रांची मोतीलाल घोष यांच्याशी ओळख करून दिली. तेव्हा भावनावश झालेल्या मोतीलालांनी राजपुत्रांचें चरणचुंबन घेऊन स्फुंद-स्फुंदून रडत उद्‌गार काढले.

My future Emperor, remember poor India. She is in a bad way.

भावी सम्राट्, दुर्दैवी भारताची आठवण ठेवा. भारतमाता आज दु:खाने पीडली आहे. राजपुत्रांनी उत्तर दिलें की भारतमातेला काहीच झालेलें नाही, मी तर सर्वत्र सुखी प्रजा पहात आलो आहे. हें अनपेक्षित दृश्य पाहून चमकलेल्या लॉरेन्सनी मोतीलालना त्या खोलीतून बाहेर नेलें. असल्या चरणचुंबनांच्यामुळेच 'अमृतबाजार'च्या संपादकांवर टिळकांच्यासारखीं अरिष्टें कोसळलीं नाहीत, हें उघड आहे. असो.

डनलॉप स्मिथची सूचना आणि गोखल्यांचें गालिप्रदान

गोखले हे डनलॉप स्मिथशी कशीं कारस्थानें करीत, हें समजून आल्यानंतर १९०७ मध्ये गोखल्यांचे सूत्रधार कोण होते, हें सांगावयाला नकोच. त्या वर्षीच्या ऑक्टोबर मासात गोखल्यांचे एक हस्तक आल्फ्रेड नंदी यांनी डनलॉप स्मिथना भेटून त्यांचा आदेश वाच्छा-गोखल्यांना कळविला की नागपुराहून राष्ट्रीय सभेचें अधिवेशन अन्यत्र नेणें हाच मवाळ पक्षाला सरकारशी मिळतें घेण्याचा एकमेव मार्ग आहे. सरकारची ही सूचना कानीं आल्यापासून, अथवा तिची चाहूल लागल्यापासूनच गोखल्यांनीं नागपूरच्या राष्ट्रीय पक्षाच्या सभासदांना गलिच्छ गालिप्रदान करण्याला प्रारंभ केला होता.

नागपूरच्या राष्ट्रीयपक्षाला गोखल्यांच्या शिव्या

१९०७ मधील राष्ट्रीय सभेचें अधिवेशन प्रथम नागपूर येथे भरवावयाचें ठरलें होतें. या अधिवेशनाचें अध्यक्षपद टिळकांनीच अलंकृत केलें पाहिजे, असा नागपूरच्या राष्ट्रीय पक्षाने आग्रह धरला होता. त्यामुळे गोखलेपक्षाच्या नागपुरातील वर्चस्वाला सुरुंग लागला होता. त्या दिवसांत स्थानिक स्वागतसमितिच अध्यक्षांची निवड करू शकत असे. पण १९०७ मध्ये गोखलेपक्षाने स्वागत समितीवर असा नवीन

निर्बंध लादला होता की ही निवड तीनचतुर्थांश बहुमताने झाली पाहिजे. त्यासाठी राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांनी आटोकाट प्रयत्न केला तरी त्यांना तीनचतुर्थांशाइतकें बहुमत मिळविता आलें नाही. पण टिळकांवाचून अन्य कोणीही अध्यक्ष तेथे निवडला जाणार नाही, इतकें निर्विवाद बहुमत त्यांच्या पक्षाने प्रस्थापित केलें होतें. त्यामुळे स्वागतसमितीच्या सभेत काही हुल्लड झाल्याच्या निमित्ताने गोखलेपक्षाने राष्ट्रीय पक्षाला गालिप्रदान करण्याला प्रारंभ केला. या गालिप्रदानात असत्यपटु आणि गालिप्रदानपटु गोखल्यांनीही भाग घेतला होता. कृष्णस्वामी अय्यर यांना लिहिलेल्या पत्रात गोखले विषवमन करतात :

A small minority is endeavouring to force its views as regards the selection of the President by means of organised ruffianism.

या इंग्रजीच्या तज्ज्ञांनी प्रतिपक्षाला रफियन म्हणजे दारू पिऊन दंगा करणारा, पशुतुल्य वर्तन करणारा, लुटारू, हत्या करणारा अथवा अशासारख्या अर्थाची शिवी देणें किती नीचपणाचें आहे, हें सांगायला नकोच. त्या वेळी नागपूरच्या राष्ट्रीय पक्षावर संघटित 'रफियानिझम्'-चा असत्य आरोप करणाऱ्या गोखल्यांनी त्या 'रफियानिझम्'चा वस्तुपाठ पुढे सुरत येथे स्वतः घालून दिला. खाडिलकरांच्या लेखसंग्रहाच्या पहिल्या भागात न. र. फाटकांच्या धन्यांनीच लिहिलेला 'सुरतची राष्ट्रीय सभा' हा खाडिलकरांचा चाळीस पानांचा विस्तृत आणि विदारक लेख छापलेला आहे. तो लेख वाचण्याचा उद्योग जे कोणी करतील, त्यांना सुरतेत टिळकांच्या प्रतिपक्ष्यांनी आपल्या नीचपणाचें कसें प्रदर्शन केलें, याची संपूर्ण कथा वाचावयास मिळेल.

गळाला लागलेल्या गोखल्यांचीं कारस्थानें

सुरत काँग्रेसच्या पूर्वी गोखल्यांनी लॉर्ड मिंटोंच्या सरसकट साऱ्या सूचनांचा पुरस्कार आरंभिला होता. या वेळी गोखल्यांनी मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ मिळावेत, यासाठीही उद्योग आरंभिला होता. हा उद्योग लॉर्ड मिंटोंशी समरस होऊन त्यांच्या कार्यकारिणीत स्थान मिळविण्याकरिता नसल्यास, गोखल्यांच्या राजकारणातील अंधत्वाचा पुरावा म्हणून त्याचा निर्देश करता येईल. पण याच दिवसांत टिळकनिंदेच्या निमित्ताने Purity of Politics अथवा राजकारणाच्या पावित्र्याचा डांगोरा पिटविणारे गोखले हे राजप्रतिनिधि आणि त्यांचे कार्यवाह यांच्या आहारी जाऊन स्वतः किती दुटप्पीपणाचीं कारस्थानें करीत असत आणि

आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्या भोळ्या अनुयायांची, विशेषतः बंगाली अनुयायांची किती निष्ठुरपणाने वंचना करीत असत, हें लॉर्ड मिंटो यांनी लॉर्ड मोर्ले यांना लिहिलेल्या पत्रांवरून उघडकीस आलें असल्याने तीं पत्रें वाचताना पराकाष्ठेचा उद्वेग आणि संताप आल्यावाचून रहात नाही. वंगभंगानंतर राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष बनून आपल्या बंगाली देश-बांधवांविषयी वक्तृत्वपूर्ण भाषेत मानभावी समवेदना व्यक्त करणारे गोखले आणि 'What Bengal thinks today India shall think tomorrow' म्हणजे आज बंगालचें जें मत आहे, तेंच उद्या साऱ्या भारताचें मत बनेल, असें बोलून बंगाली लोकांना उत्तेजन देणारे आणि त्यांच्या विरोधकांना विषण्ण करणारे गोखले हे वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांशी संभाषणें करताना कसे लोण्यासारखे पाघळत, हें लॉर्ड मिंटोंच्या पत्रातील पुढील अवतरणावरून कळून येईल.

Even Gokhale said he was not opposed to partition that he recognised the Mahomedan claims and so on, that he knew that the anti-partition feeling in Bengal was really nothing but sentimental froth.

(५-११-१९०७ सय्यद राजीवास्तींचा ग्रंथ)

स्वतः गोखल्यांनीही सांगितलें की, माझा वंगभंगाला विरोध नाही, मुसलमानांच्या मागण्यासुद्धा मला मान्य आहेत, वंगभंगविरोधी आंदोलन हा केवळ भावनेचा उद्रेक आहे. हें संभाषण १९०७ मध्ये नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात झालें. म्हणजे त्या वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये टिळकांना राष्ट्रीय सभेचें अध्यक्षपद मिळू नये याकरिता त्या सभेचें अधिवेशन नागपुराहून अन्यत्र नेण्याची सूचना डनलॉप स्मिथ यांनी केली होती आणि बंगाली लोकांचा, तसेंच एकंदर हिंदु राष्ट्राचा विश्वासघात करण्याची योजना नोव्हेंबरच्या आरंभीच राजप्रतिनिधींच्या भेटींत शिजली होती. या गोखल्यांच्या भानगडी उघडकीला आल्यानंतर डिसेंबरच्या अंती गोऱ्या पिशाच्चांचें झाड बनलेल्या गोखल्यांनी आपल्या अनुयायांच्याद्वारा टिळकांना मारहाण करण्याचा प्रयत्न करून राष्ट्रीय सभेतून टिळक-पक्षाचें उच्चाटन घडवून आणलें, याचें काहीच नवल वाटत नाही. सुरतेचा पराक्रम गाजवून झाल्यानंतर गोखल्यांनी १५-१-१९०८ या दिवशी डनलॉप स्मिथ यांची भेट घेतली.

Dunlop Smith felt that Gokhale really welcomed the Surat fiasco as it cleared the air.

(मोर्ले-मिंटोकालीन भारत – दास).

डनलॉप स्मिथना अशी जाणीव झाली की, टिळकपक्षाला घालवून दिल्याचा आनंद गोखल्यांच्या पोटात मावत नव्हता.

गोखल्यांच्या देशभक्तीचें सत्यस्वरूप

आतून सरकारशी असलीं कारस्थानें करणारे गोखले आपण राष्ट्रीय सभेत ऐक्य टिकविण्याचे प्रयत्न करीत असल्याचा देखावा करून लाला लाजपतरायांचें सहकार्य संपादन करून घेत होते.

'He pledged Gokhale cooperation 'in your noble efforts to preserve harmony.'

हें पाहिलें म्हणजे गोखल्यांच्या अभिनयपटुत्वाचें कौतुक करावें का लालाजींच्या भोळेपणाची कीव करावी, हेंच समजत नाही. मात्र सुरतेतील राष्ट्रीय सभेचें अधिवेशन मोडणें अपरिहार्य व्हावें, अशी परिस्थिति निर्माण करणाऱ्या गोखलेपक्षाच्या देशभक्तीच्या खऱ्या स्वरूपाची इथे वाचकांना ओळख करून देणें आवश्यक आहे. भिक्षांदेहि हेंच ज्यांचें राजकारण होतें, अशा गोखलेपक्षाची देशभक्ति म्हणजे राष्ट्रीय पक्ष शत्रूंशी झुंजताना राजवंदी झालेला पाहून त्याच्या सदनातून पळवून आणलेलें आणि आपल्या भिक्षांदेहीच्या व्यवसायाला उपयोगी पडावें म्हणून लुळें पांगळें बनविलेले राष्ट्रवादाचें मूल, या निर्दयपणे लुळ्या-पांगळ्या बनविलेल्या पोरक्या पोराविषयी (देशभक्तीविषयी) यत्किंचित्ही आस्था आणि आत्मीयता नसली तरी त्याच्यावाचून गोखलेपक्षाचा भिक्षांदेहीचा व्यवसाय एक दिवसही चालणें शक्य नव्हतें.

सुरतेनंतरच्या चहाड्या

भिक्षेकऱ्यांचा व्यवसाय करणाऱ्यांत अनेक सरकारी हेर असतात, हें सर्वांना सुविदित आहेच. तेव्हा भिक्षेकऱ्यांचा हा जोडधंदाही गोखले करीत असल्यास त्याचें अर्वाचीन वाचकांस नवल वाटावयाला नको. सुरतेच्या अधिवेशनानंतरच्या भेटीत गोखल्यांनी डनलॉप स्मिथना सांगितलें:

The difference between the two parties is this, that the Moderates wish to proceed along the lines along which the Englishmen have made their political progress by persistent and orderly agitation on constitutional lines. The Extremists on the other hand wish to avow open implacable hostility to the British Government and to work by secret methods based on those of the Russian terrorists. There is no possibility of the two parties coming together again.

नेमस्त आणि राष्ट्रीय पक्षांत एवढाच भेद आहे की, नेमस्तांना इंग्रजांच्या नेतृत्वाखाली आपलें आंदोलन चालवावेसें वाटतें आणि राष्ट्रीय पक्षाच्या लोकांना रशियन क्रांतिकारकांच्या मार्गाने आंदोलन चालवावेसें वाटतें, असा गोखल्यांच्या चहाड्यांचा सारांश होता. हे दोन पक्ष इत:पर एकत्र येण्याची शक्यता नाही, या गोखल्यांच्या वचनाचा उघड अर्थ हा होतो की सुरतेचें अधिवेशन मोडण्याचा पराक्रम मीच केला असून यापुढेही या दोन पक्षांचा समेट मी होऊ देणार नाही. इथे मला एकच गोष्ट सांगावीशी वाटते, ती ही की १९१५ मध्ये गोखल्यांनी भूपेंद्रनाथ वसूंना लिहिलेल्या पत्राला टिळकांनी गुप्त पत्र म्हटलें म्हणून अकांडतांडव करणारे आणि जणू काय आपला वध करण्याचीच चिथा-वणी टिळकांनी दिली आहे असा कांगावा करणारे हे राजमान्य गोखले, टिळकपक्षावर रशियन क्रांतिकारकांच्या मार्गाचा अवलंब करण्याचा आरोप करीत आहेत. हा आरोप खरा असेल, तो प्रश्न इथे नाही. गोख-ल्यांच्या सारख्या सार्वजनिक जीवनात एका पक्षाचा पुढारी म्हणून वावरणाऱ्या व्यक्तीने याप्रमाणे परक्या सरकारची हेरगिरी करावी कीं नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. गोखल्यांच्या एका पत्राला टिळकांनी गुप्त पत्र म्हटलें म्हणजे तो त्यांचा अक्षम्य अपराध होतो, असें ज्या गोखल्यांना वाटतें, त्यांना राजप्रतिनिधींच्या कार्यवाहाकडे जाऊन टिळक रशियातील क्रांतिकारकांच्या अनुकरणाने गुप्त कटांच्या मार्गाने चळवळ चालविण्याच्या उद्योगात आहेत, अशा चहाड्या करण्यात आपण काही अक्षम्य अपराध करीत आहोत असा संशयसुद्धा येत नाही. गोखले हे तोंडाने देशभक्तीच्या मंत्रांचा उच्चार करीत आणि अत्याचारी राज्य-कर्त्यांच्या पावलांवर पावलें टाकून चालत.

दीनबंधु अँड्रूज यांची हेरगिरी

गोखल्यांचे मित्र आणि गोखलेशिष्य गांधींचेही मित्र चार्ली अँड्रूज हेही आपल्या मित्रांच्या प्रमाणेच समाजसेवेसह हेरगिरीचा जोड-धदा करीत असें डनलॉप स्मिथच्या चरित्रावरून कळून येतें. राष्ट्रीय सभेच्या सुरत येथील अधिवेशनानंतर त्यांनी राजप्रतिनिधींच्या कार्य-वाहांना लिहिलेल्या पत्राने गोखलेपक्षाच्या तत्कालीन मनोवृत्तीवर आणि पत्रलेखकांच्याही चरित्रावर नवीन प्रकाश पडत असल्याने तें येथे उतरून घेणें भाग आहे.

The temper of the moderates is this. Surat has been a great gain, but at a great cost. Government do not realize

how much we had to suffer in making the split. We are very very sore about it,...... sore with the Tilak party for the insults we have received from them, and sore with the Government for not holding out the hand of friendship to us and making some generous concessions...... above all for playing into the hands of Tilak on the Transval question.

मवाळांची मनोभावना अशी आहे. सुरतेत आम्ही मोठा विजय मिळविला, पण तो विजय आम्हांला फार महाग पडला आहे. काँग्रेसमधून राष्ट्रीय पक्षाला घालवून देण्यासाठी आम्हांला किती कष्ट करावे आणि सोसावे लागले, याची सरकारला जाणीव नाही. त्याचा आम्हांला फार खेद वाटतो. टिळकपक्षाने आमचा उपहास आणि उपमर्द केला, म्हणून जसे आम्हांला कष्ट होतात, तसेच सरकारने मैत्रीचा हात पुढे न केल्याने आणि उदारपणाने आम्हांला काही अधिकाराच्या पदांवर न नेमल्यानेही आमच्या मनाला कष्ट होतात. ट्रान्स्वालप्रकरणात तर टिळकांच्या अपेक्षेप्रमाणेच वर्तन करून सरकारने त्यांचाच पक्ष बलिष्ठ केला आहे. या पत्राच्या अंती गुप्त हेराचा जोडधंदा करणारे अँड्र्यूज लिहितात :

Please do not trouble to answer. It is only because I am in a peculiarly favourable position to hear daily from inside what the Moderates are saying that I write.

या पत्राचें उत्तर देण्याचा उपद्रव करून घेऊ नका. या मवाळांच्या अंतर्वर्तुळात नित्य होत असलेलीं बोलणीं ऐकण्याची अलभ्य संधि मला लाभली असल्याने तिचा तुम्हांला उपयोग व्हावा, म्हणून मी हें लिहीत आहे. या वाक्यातून चोरून हेरगिरी करणाऱ्या या गांधींच्या आणि गुरुदेवांच्या गोऱ्या मित्रांचें काळेंकुट्ट अंतःकरण व्यक्त झालें आहे. मला असें आठवतें की १९२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील एका हिंदु पुढाऱ्याने अँड्र्यूजवर हेरगिरीचा स्पष्ट आरोप केला असता त्यांनी किती कांगावा करून भारताची सेवा इतःपर न करण्याची धमकी दिली होती. तरीही ते इथून गेले नाहीत.

सुरतेपूर्वीचीं सुरेंद्रांचीं कारस्थानें

१९०६ मधील कलकत्याची काँग्रेस लाल, बाल आणि पाल यांनी अंशतः जिकल्यानंतर १९०७ च्या मार्चमध्ये सुरेंद्रनाथ बानर्जी हे दरभंग्याच्या महाराजांसह हिंदुमुसलमानांचें एक शिष्टमंडळ घेऊन

राजप्रतिनिधींना भेटावयाला गेले. तेव्हा झालेल्या संवादाचा सारांश भारतसचिवांना कळविताना लॉर्ड मिंटो लिहितात:

It was simply marvellous with the troubles and anxieties of a few months ago, still fresh in one's memory to see the king of Bengal sitting on my sofa with his two Mahomedan opponents asking for my assistance to moderate the evil passions of Bengali and inveighing against the extravagances of Bipinchandra Pal. I hope you will forgive me a little feeling of exaltation at the confidence expressed in me by these representatives of hostile camps and their declaration of faith in you, Mr. Fraser and myself.

'म्हणजे गेल्या कित्येक मासांतील चिंताक्लेशांची छाया अजून नष्ट झाली नसतानाच बंगालचे हे 'मूर्धाभिषिक्त महाराज' आपल्या मुसलमान प्रतिपक्ष्यांसह माझ्याकडे येऊन बंगाली लोकांच्या क्षुब्ध मनोविकारांना आळा घालण्याकरिता सहाययाचना करीत आहेत आणि पाल महाशयांना गालिप्रदान करीत आहेत, हें दृश्य खरोखरीच विस्मयानंदकारक होतें. त्यांनी माझ्यावर इतका विश्वास टाकलेला पाहून मला थोडी अहंकाराची बाधा झाली असली तर आपण त्याची क्षमा करालच. भारत सचिव, राजप्रतिनिधि आणि दुय्यम राज्यपाल या सर्वांविषयी निष्ठा व्यक्त करावयालाही ते चुकले नाहीत.' अशा प्रकारे सुरेंद्रसिंहाने राजप्रतिनिधींच्याकडे जाऊन लांगूलचालन केल्याचा परिणाम असा झाला की, पंजाब सरकारच्या तांतडीच्या मागणीवरून लाजपतराय आणि अजितसिंग यांना सीमापार करून मांडलेला नेऊन ठेविल्यानंतर लॉर्ड मिंटो यांनी बिपिनचंद्रांनाही सीमापार करण्याची अनुज्ञा मागितली. ती न देता लॉर्ड मोर्ले यांनी बिपिनबाबूंविरुद्ध वाटल्यास राजद्रोहाचा अभियोग चालवावा, असें उत्तर दिलें. पण कलकत्त्यातील पंच बिपिनचंद्रांना निर्दोषी ठरवितील, या भीतीने राजप्रतिनिधींनी तो प्रयोग करून पाहिला नाही. सुरेंद्रनाथांचे एक परममित्र अंबिकाचरण मुजुमदार (१९१६ च्या लखनौ कॉंग्रेसचे अध्यक्ष) यांनी १८९७ च्या अमरावती येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात आपली राजनिष्ठा व्यक्त करताना पुढील उद्गार काढले होते :

Born of a people whose ancestors often sacrificed their own children for the supposed welfare of their kings, we disdain to take lessons in loyalty from those whose liberties are bathed and consecrated in royal blood.

'म्हणजे आपल्या प्रभूचें कल्याण व्हावें, याकरिता स्वतःच्या तान्ह्या बाळांना बळी देणाऱ्या भारतीयांचे आम्ही वंशज असल्याने ज्यांनी प्रजेच्या अधिकारांकरिता राजांना बळी दिलें, असल्या लोकांच्या जवळ राजनिष्ठेचे धडे घेण्याचा आम्हांला तिरस्कार वाटतो.' अंबिकाचरणबाबूंनी इतक्या निर्लज्ज शब्दांत व्यक्त केलेल्या आंग्लप्रभुनिष्ठेशी मवाळांची देशभक्तीची भावना स्पर्धा करू शकत नसल्यास त्यात नवल काय ?

मिदनापूरचा देशद्रोही

सुरत येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात सुरेंद्रनाथ बानर्जी हे अध्यक्षांचें नांव सुचविण्यासाठी उभे राहिले असताना बंगाली प्रतिनिधींनी 'मिदनापूरचा देशद्रोही' (Midnapur traitor) असा ओरडा करून त्यांना बोलू दिलें नाही. डॉ. मुंजे यांनी सांगितलें आहे की, या ओरड्यात नागपूरवऱ्हाडच्या प्रतिनिधींनीही बंगाली बंधूंना साथ दिली. सुरेंद्रनाथांचा राष्ट्रीय सभेत असा अपमान होण्याचें कारण काय, याचासुद्धा टिळकचरित्रकारांनी शोध घेतलेला नाही. ७-१२-१९०७ या दिवशी मिदनापूर येथे राष्ट्रीय आणि नेमस्त या उभय पक्षांच्या संगनमताने जिल्हापरिषद भरली असता त्या परिषदेच्या अध्यक्षांनी राष्ट्रीय पक्षाचा काटा काढण्याकरिता रक्षकविभागाचें साहाय्य घेतलें. अरविंदांचें एक चरित्रकार शिशिरकुमार मित्र लिहितात :

At the instance of the Moderate leaders, the police served notices on certain Midnapore nationalists to abstain from taking part in any procession. Not satisfied with this, they called in the Police Superintendent and had him seated between the President and Surendranath Banerji. Later the Magistrate was also asked to assist at the conference. This self-humiliating alliance with Bureaucracy heightened the irritation of the Midnapore nationalists who regarded it as an abominable outrage on national sentiment.

या उताऱ्यावरून समजतें की सुरेंद्रांच्या अनुयायांनी रक्षकविभागाकडून राष्ट्रीयपक्षाच्या काही नेत्यांना मिरवणुकीत भाग घेण्याला बंदी करविली. रक्षकप्रमुखाला अध्यक्ष आणि सुरेंद्रनाथ यांच्या मध्ये बसविलें. दुसऱ्या दिवशी स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनाच परिषदेत भाग घेण्याला पाचारण केलें. सुरेंद्रपक्षाचें सरकारी अधिकाऱ्यांशी झालेलें हें लाजिरवाणें संगनमत पाहून राष्ट्रीय पक्षाचे अनुयायी प्रक्षुब्ध होऊन गेले होते. याहून

अधिक गंभीर आरोप अमलेश त्रिपाठी यांनी The Extremist Challenge या पुस्तकात केले आहेत :

Surendranath accused Arobindo not only of forcing a split in the Bengal Congress but also of an attempt on Sir Andrew Fraser's life.

बंगालच्या कॉंग्रेसपक्षात फूट पाडण्याचा आणि सर अँड्र्यू फ्रेजर (पश्चिम बंगालचे दुय्यम राज्यपाल) यांच्या वधाचा प्रयत्न केल्याचा आरोप सुरेंद्रनाथांनी अरविंदांच्यावर केला. सुरेंद्रनाथांनी असले आरोप करणें हा चक्क विश्वासघात होता. कारण सुरेंद्रनाथांच्याच सांगण्यावरून युगांतर पक्षाच्या नेत्यांनी सर बॉंफील्ड फुल्लर यांना मारण्याकरिता पहिला अग्निगोल केला, इतकेंच नव्हे तर त्यांनी क्रांतिकारकांना सात आठ सहस्र रुपये मिळवून देण्याचें अभिवचन दिलें होतें. सर अँड्र्यू फ्रेजरची गाडी उडविण्याचा प्रयत्न मिदनापूर परिषदेच्या आदल्या दिवशी म्हणजे ६-१२-१९०७ या दिवशीच झाला होता. १९०५ च्या काशी येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या दिवसांत टिळकांनी देवव्रत बसूंना विचारलें होतें की, अत्याचार करणाऱ्या अधिकाऱ्यांची तुम्ही डोकीं कां फोडत नाही ? त्या वेळी टिळक आणि सुरेंद्रनाथांचें मतैक्यच होतें. पण १९०७ च्या प्रारंभापासून सुरेंद्रनाथ राष्ट्रीय पक्षापासून दूर जाऊ लागले.

अध्यक्षपदाचीं कारस्थानें

१९०६ मध्ये टिळकांच्या हाती राष्ट्रीय सभा जाऊ नये, याकरिता सुरेंद्रनाथांनी दादाभाईंना लंडनहून बोलावून आणलें. १९०७ मध्ये बंगाल प्रांताचा एकमुखी पाठिंबा टिळकांना मिळू नये, याकरिता गोखल्यांनी राशबिहारी घोष यांचें नांव अध्यक्षपदासाठी सुचविलें. पण त्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये लाजपतरायांची मांडलेहून सुटका झाल्यानंतर टिळकांनी त्यांचें नांव अध्यक्षपदासाठी सुचवून देशांत प्रचार आरंभिला. हें पाहून सचित झालेल्या सुरेंद्रांनी गोखल्यांना लिहिलें की कसेंही करून लालाजींना आपलें नांव परत घ्यावयाला लावा. लाजपतराय आणि गोखले हे उभयता १९०५ मध्ये इग्लंडात राष्ट्रीय सभेच्या प्रचाराकरिता गेले असताना त्या उभयतांचा निकटचा संबंध आला होता. पुढे काशी येथील अधिवेशनात इंग्लंडच्या युवराजाच्या स्वागताला विरोध करण्याचें काम टिळकांनीं लाजपतरायांचेकडे सोपविलें असताना त्यांनी गोखल्यांच्या विनवण्यांना मान देऊन आपला विरोध परत घेतला,

इतकेंच नव्हे तर टिळकांनाही विरोध करू दिला नाही. अशा प्रकारे गोखल्यांना त्यांनी आणीबाणीच्या प्रसंगातून वाचविल्यामुळे लाजपतरायांना निर्वासित करून मांडले येथे ठेवल्यानंतर त्यांच्या मुक्ततेकरिता गोखल्यांनी आपले हातपाय हलविले होते. या उपकारांच्या विनिमयात लाजपतरायांनी अध्यक्षपदाची अपेक्षा सोडून द्यावी, असा गोखल्यांनी आग्रह केला असता त्यांनी त्यांच्या आग्रहाला मान तुकाविली. लालाजींनी राष्ट्रीय पक्षाचा हा चक्क विश्वासघात केला होता. त्यामुळे अरविंद घोष अतिशय भडकून गेले.

Lajpatrai pledged Gokhale cooperation, 'in your noble efforts to preserve harmony.'

म्हणजे गोखल्यांना ऐक्य टिकवावयाचें आहे, अशा भावनेने लाजपतराय गोखल्यांशी सहकार्य करीत होते आणि गोखले अप्रामाणिक वर्तन करून त्यांची प्रवंचना करीत होते. अमलेश त्रिपाठी लिहितात :

The Moderates did not play their cards honestly. They had changed the venue. They had out-manoeuvred Extremists in the selection of the President, and they now put forward vitally altered resolutions on the four subjects hoping to pass them by a contrived majority. The comprehensiveness and force of the original Calcutta resolutions were deliberately restricted by the use of new wordings.

गोखले पक्षाचें वर्तन प्रामाणिकपणाचें नव्हतें. प्रथम त्यांनी अधिवेशनाचें स्थळ बदललें. नंतर लाजपतरायांना बनवून आपलें नांव परत घ्यावयाला लाविलें आणि सरतेशेवटी त्यांनी कलकत्त्याच्या त्या चार ठरावांतील प्राणच काढून घेतला.

पुणेकर आणि गोखले

पुणेकरांना गोखल्यांची ओळख पटली नाही, असा कांगावा अलीकडे गोखलेभक्तांनी आरंभिला आहे. हा कांगावा पाहिला की मिल्टनच्या नष्टनंदनातील सैतानाने आपल्याला न ओळखण्यानिमित्त देवदूतांचा केलेला धिक्कार आणि त्यांनी दिलेलें सैतानाच्या सत्यस्वरूपाची जाणीव करून देणारें उत्तर यांचें स्मरण होतें.

'Know ye not then' said Satan filled with scorn,
'Know ye not me?'

तुम्हांला अजून ओळख पटली नाही? ओळख पटली नाही माझी? या कांगाव्याला देवदूतांनी उत्तर दिलें :

Think not revolted spirit thy shape the same
Thou resemblest now thy sin and place of doom.

अरे देवशत्रु बनलेल्या देवदूता, तुझें पूर्वावतारातील स्वरूप अजून तुला चिकटून राहिलें आहे, असें समजू नकोस. आता तें तुझ्या कुत्सित पापांना अनुरूप, तुझ्या नरकातील निवासाला अनुरूप बनलें आहे.

सुरतेतील दोन महत्त्वाच्या घटना

गोखलेपक्षाने राष्ट्रीय सभेचें अधिवेशन नागपूरहून सुरतेला न्यावयाचें ठरविलें, तेव्हा स्वत: गोखल्यांची अशी अपेक्षा होती की, टिळक-पक्ष नागपूरलाच आपलें स्वतंत्र अधिवेशन भरवील आणि सुंठीवाचून खोकला जाईल. नागपूर येथील मुंजेपक्षाची आणि अरविंदांच्या युगांतर समितीची मनीषा तशीच होती. पण सुरतेच्या अधिवेशनात आपण भाग घेऊन राष्ट्रीय सभा दुभंग करण्याचें दूषण गोखलेपक्षावर लादणें हें प्रचाराच्या दृष्टीने आणि धोरणाच्या दृष्टीनेही राष्ट्रीय पक्षाला हितावह ठरेल, असा विचार करून साऱ्या देशातील राष्ट्रवाद्यांना सुरतेला येण्याचा संदेश टिळकांनी पाठविला आणि अरविंदांनीही टिळकांच्या संदेशाला आपला पाठिंबा दिला. अशा प्रकारें राष्ट्रीय पक्ष अनिच्छेनेच सुरतेला आला असल्याने त्या पक्षाचे अनुयायी गोखलेपक्षाशी काडीमोड करण्याकरिता एखाद्या कुरापतीचीच वाट पहात होते. त्यामुळेच अधिवेशनात टिळकांना बोलू न दिल्याच्या निमित्ताने तें अधिवेशनच मोडून टाकणें आणि त्यानंतर नेमस्त पक्षाने पुढे केलेल्या राजनिष्ठ ध्येयपत्रिकेवर स्वाक्षरी करण्याचें नाकारून राष्ट्रीय पक्षाने राष्ट्रसभेचा त्याग करणें, या घटना अपरिहार्यपणे घडून आल्या. या दोन्ही घटना टिळकांच्या इच्छेविरुद्ध आणि त्यांना न विचारताच अरविंदांनी घडवून आणल्या. ते म्हणतात:

Very few people knew that it was I (without consulting Tilak) who gave the order that led to the breaking of the Congress and was responsible for the refusal to join the new-fangled Moderate Convention, which were the two decisive happenings at Surat. Even my action in giving the movement in Bengal its militant turn, or founding the revolutionary movement is very little known.

(मित्र अरविंद चरित्र पा. ९३-९४)

परांजप्यांनी टिळकांना स्थानबद्ध केलें

राष्ट्रीय सभेचें अधिवेशन मोडल्यानंतर नेमस्त नेत्यांनी आपल्या अनुयायांची आपल्याच अटींवर परिषद भरवून राष्ट्रीय सभा हा स्वतःच्या पक्षाचा बालेकिल्ला करावयाचें ठरविलें. त्यानंतर लाजपतराय टिळकांकडे येऊन सांगू लागले की, राष्ट्रीय सभेत फूट पडली तर सरकारने अगदी निर्दयपणाने राष्ट्रीय पक्षाचा उच्छेद करावयाचें ठरविलें आहे. टिळकांच्या मते तेव्हा असल्या निर्दय छळाला तोंड देण्याची देशाची सिद्धता नसल्याने नेमस्त आणि सरकार या दोघांचेही डाव फसविण्याकरिता राष्ट्रीय पक्षाने नेमस्तांच्या अटींवर स्वाक्षरी करून त्यांच्या परिषदेत भाग घ्यावा. खरें म्हणजे टिळक तेव्हा नेमस्तांच्या परिषदेत नेमस्तांना भाग घ्यावयाला निघालेच होते. पण अरविंदांच्या प्रमाणेच नेमस्तांना शरण जाण्याच्या विरुद्ध असलेल्या 'काळ' कर्त्यांनी आणि वासुकाकांनी त्यांना अक्षरशः धरून जाऊ दिलें नाही. त्यांचें म्हणणें असें होतें की स्वाक्षरी करूनही गोखले टिळकांना त्यांच्या परिषदेत भाग घेऊ देणार नाहीत. हें त्यांचें म्हणणें साधार होतें. अरविंदांनी आपला अभिप्राय व्यक्त केला की बंगाल आणि महाराष्ट्र हे दोन प्रांत सरकारी छळाला तोंड देऊ शकतील आणि राष्ट्रीय चळवळ तात्पुरती दडपली गेली तरी सर्व राष्ट्राच्या भावनांत आमूल परिवर्तन होऊन पुनश्च संधि मिळताच ते राष्ट्रीयत्वाचा आणि स्वातंत्र्याचा पुरस्कार करतील. ही गोष्ट खरी होती. असल्या राष्ट्रीय आंदोलनांचा नैसर्गिक नियमच हा असतो की पहिलें आंदोलन ज्या अवस्थेत दडपून टाकलें असेल, त्याच अवस्थेपासून पुढील आंदोलनाचा प्रारंभ होतो. हाच विश्वास टिळकांनी त्यांना दोषी ठरविल्यानंतरच्या न्यायालयातील उद्‌गारात उच्चारून दाखविला होता.

In spite of the verdict of the Jury, I maintain that I am innocent. There are higher powers that rule the destiny of things and it may be the will of the Providence that the cause which I represent may prosper more by my suffering than by my remaining free.

पंचांनी कसाही निर्णय केला तरी मी निर्दोषी आहे, असेंच माझी मनोदेवता मला सांगते. या भौतिक जगातील भवितव्यतेवर अधिक श्रेष्ठ शक्तींचा अधिकार चालत असतो. तेव्हा मी ज्या कार्याचा प्रतिनिधि बनलो आहे, तें कार्य माझ्या मुक्तीपेक्षा माझ्या बंदिवासातील छळांनीच अधिक यशस्वी व्हावें, असाही ईश्वरी संकेत असेल. हा विचार वरिष्ठ न्यायालयात शिक्षा सांगण्याच्या क्षणी टिळकांना स्फुरलेला नसून

या ईश्वरी संकेतावरच आता सर्व भार टाकला पाहिजे, हें त्यांनी सुरतेतच निश्चित केलें होतें.

स्वातंत्र्याच्या उघड प्रचारातील धोका

राजद्रोह नांवाच्या निर्बंधाच्या पिंजऱ्यातील वाघाच्या तावडीत न सापडता त्याच्या सन्निध येऊन त्याला चिडविणे ही टिळकांच्या बुद्धिमत्तेची लीला आणि त्यांच्या राजकारणातील कुशलता. राजकारण करावयाचें तें कार्यनाश होणार नाही, अशा पद्धतीने करावें, असा टिळकांचा आग्रह असे. यामुळे ते अविवेकी क्रांतिकारकांच्या हेटाळणीला पात्र झाले होते. याचा उल्लेख डॉ. आठल्यांनी त्यांच्या आत्मवृत्तात सुरतेच्या संदर्भातच केला आहे. 'बाबा सावरकरांनी सुरतेच्या अधिवेशनाचें वृत्त सर्वांना सांगितलें. या अधिवेशनात टिळकांनी दाखविलेल्या धैर्याचें त्यांनी कौतुक केलें. पण अरविंद घोषांशी तुलना करून त्यांनी त्यांची हेटाळणीही केली. ते म्हणाले की टिळकांजवळ अरविंद बाबूंचा निर्भेळ स्वातंत्र्यवाद नाही, हा आपलें साम्राज्यांतर्गत स्वराज्याचें तुणतुणेंच वाजविणार; पण याने सुरतेत बरेंच धैर्य प्रकट केलें. हें सर्व सांगताना टिळकांचा उल्लेख बाबा तुच्छतेने करीत होते. अरविंदबाबूंशी तुलना करताना टिळक कःपदार्थ होत, असें ते आमच्या मनावर बिंबवीत होते.' स्वातंत्र्याच्या ध्येयाचा पुरस्कार करावयाचा कीं नाही, हा प्रश्न कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनंतर प्राधान्याने पुढे आला. कलकत्त्यातच हा प्रश्न टिळकांना विचारला असता त्यांनी दिलेलें उत्तर अंबिकाप्रसाद वाजपेयी या प्रसिद्ध हिंदी संपादकांनी आपल्या आठवणीत उद्धृत केलें आहे.

As an ideal it is all right; but you cannot work for it without bringing yourselves within the clutches of the law. Working for it will be waging war against the king.

ध्येय या दृष्टीने स्वातंत्र्याला कोण विरोध करील? पण तें कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केलात, तर निर्बंधांच्या कचाट्यात सापडाल. कारण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्न करणेंही राजाविरुद्ध युद्ध पुकारणें ठरतें. पुढे १९०९ मध्ये बाबा सावरकरांना 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें' यासारख्या कविता केल्याच्या निमित्ताने राजाविरुद्ध युद्ध केल्याचा आरोप ठेवून त्यांना जेव्हा जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा ठोठावली गेली, तेव्हा त्यांच्या आणि त्यांच्या अनुयायांच्या डोळ्यापुढे काजवेच चमकले. डॉ. भटांनी अभिनव भारताच्या इतिहासात लिहिलें आहे

की बाबांना राजद्रोहाखाली फार तर पांच सहा वर्षांची शिक्षा होईल, अशी आमची अपेक्षा होती; पण त्यांच्यावर बंडाचा आरोप ठेवून त्यांना जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा होऊ शकेल, अशी आम्हांला कोणीच सूचना दिली नव्हती. सूचना देणाऱ्यांची हेटाळणी आरंभिल्यानंतर सूचना द्यावयाला तरी कोण पुढे येणार? अभिनव भारताच्या सभासदांकडून होणारी हेटाळणी टिळकांना मुकाटयाने सोसणें भाग होतें. कारण क्रांतिकार्यातील कार्यकर्त्यांना गुप्ततेचें महत्त्व शिकविताना स्वतःचें क्रांतिकार्यच गुप्त राखावें लागतें.

हिंदुस्थानचें वाटोळें करणारे गोखले

मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या द्वारा भारताच्या फाळणीचें बीज लॉर्ड मिंटो यांनी पेरलें, अशी सार्वत्रिक कल्पना आहे. या कल्पनेला अनुसरून वर्तुळ परिषदेनिमित्त लंडनला गेले असताना गांधी लॉर्ड मिंटो यांच्या पत्नीला म्हणाले,

Minto-Morley Reforms have been our undoing. Had it not been for the separate electorates then established, we should have settled our differences by now.

मिंटो-मोर्ले सुधारणांनी मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करून ठेवले नसते, तर यापूर्वीच आम्ही आमचीं भांडणें मिटविलीं असतीं आणि हिंदुस्थानाचें वाटोळें व्हावयाचें टळलें असतें. या आक्षेपाला मेरी मिंटो यांनी उत्तर दिलें.

You forget Mr. Gandhi that separate electorates were proposed by your leader and predecessor Mr. Gokhale.

हिंदुस्थानाचें वाटोळें करणाऱ्या मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघाचें पितृत्व अंशतः तरी गोखल्यांच्याकडे जातें, इकडे गोखल्यांच्या चरित्रकारांनी साळसूदपणे डोळेझाक केली आहे.

सरकारला मुसलमानांची भीति

मोर्ले-मिंटो सुधारणात मुसलमानांना इतकें भरमसाट प्रमाणात प्रतिनिधित्व दिलें होतें की, आपण केलेल्या पक्षपाताचें स्वतः सरकारलाच भय वाटू लागलें होतें. 'मोर्ले-मिंटो कालीन भारत' या ग्रंथात एम्. एन्. दास लिहितात :

Elections to the Councils were going on in India. Early in January 1910, as the results poured in for the Imperial Legislative

Council, the Government was justifiably nervous about Muslim gains.

यावरून असें समजतें की, सुधारणांनंतरच्या पहिल्याच निवडणुकीत मुसलमानांना भरमसाट जागा मिळालेल्या पाहून स्वतः सरकारलाच बिचकल्यासारखें झालें. त्या वेळी दिल्लीच्या विधिमंडळात निवडणुकीने अवघ्या २७ जागा भरावयाच्या होत्या, हें लक्षात ठेवून वाचकांनी लॉर्ड मिंटोंचे पुढील उद्‌गार वाचावेत.

The Mahommedans are still victorious and there is bound to be grumbling. I have already got 11 on my Council and am consequently doubtful about giving a nomination to Baluchistan and the North West Frontier Province, which would necessarily have to be Mahommedan, and would bring the number to twelve which is beyond all reasonable proportions and yet I don't like withholding it.

मुसलमानांना नवीन विधिमंडळाच्या निवडणुकीत ज्या जागा मिळाल्या आहेत, त्यांच्यामुळे आमच्यावर टीका होणारच. माझ्या विधिमंडळात आधीच ११ मुसलमान निवडून आले असून बलुचिस्थान आणि सीमाप्रांत यांच्याकरिता एका प्रतिनिधीची नेमणूक केल्यानंतर त्यांची संख्या बारावर जाईल. सत्ताविसात बारा म्हणजे मुसलमानांना भलतेंच प्रतिनिधित्व मिळालें आहे. त्या वेळीं भारतात मुसलमानांचें प्रमाण शेकडा बावीस तेविसाच्या आसपास असावें आणि त्यांना प्रतिनिधि मिळाले होते शेकडा ४४॥ या प्रमाणात. ही परिस्थिति बदलून त्यांचें दिल्लीच्या विधिमंडळातील प्रमाण शेकडा ३३ पर्यंत तरी खाली आणण्याकरिता टिळकांना लखनौ येथील तडजोड स्वीकारावी लागली. लखनौ येथे टिळकांनीं नवीन काही चुका केल्या नसून पूर्वीच गोखल्यांनी हिंदूंचें आणि हिंदुस्थानाचें जें वाटोळें करून ठेवलें होतें, तें अंशतः तरी कमी करण्याचा प्रयत्न केला इतकेंच काय तें. मोर्ले-मिंटो सुधारणांना जन्म देण्यात त्या उभयतांइतकाच गोखल्यांचाही वाटा होता, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

मोर्ले विरुद्ध गोखले

मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघाची सूचना अथवा कल्पना लॉर्ड मिंटो आणि गोखले यांनी पुरस्कारिली असली तरी लॉर्ड मोर्ले यांनी तिला आपल्याकडून शक्य तितका विरोध केला. त्यांनी या

सुधारणांविषयी अभिप्राय व्यक्त करण्याकरिता लंडनमध्ये एक समिति नेमली होती. या समितीत लॉर्ड मॅक्डोनेल, सर लॉरेन्स जेकिन्स, सर वॉल्टर लॉरेन्स, सर कृष्णगोविंद गुप्त, सय्यद हुसेन विल्ग्रामी इत्यादि प्रमुख व्यक्ति होत्या. या समितीने एकमताने ठराव केला :

The committee decided that the best plan for securing the representation of the Mahommedan community (as of all other communities) in the various Councils would be a system of electoral colleges, a cumulative voting in case of minor minorities whereby the representation of each great division of the population in accordance with the proportion of the whole population would be preserved, such system when necessary to be supplemented by nomination.

म्हणजे अनेक सभासद निवडण्याचा अधिकार असलेला मतदारसंघ निर्माण करून त्यातील सभासदांना प्रतिनिधींच्या संख्येइतकीं मतें एकत्र अथवा वाटून देण्याचा अधिकार द्यावा म्हणजे सर्व लहानमोठ्या समाजांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व लाभेल. पण या योजनेला सुरुंग लावण्याचें आणि मिंटोंच्या कारस्थानांप्रमाणे मुसलमानांना भरमसाट प्रतिनिधित्व मिळवून देण्याचें पाप गोखल्यांनीच केलें. पुण्याच्या डेक्कन सभेत एक भाषण करून गोखल्यांनी घोष केला की, सर्व महत्त्वाच्या अल्पसंख्य समाजांना स्वतंत्र मतदारसंघ असावेत, या मताचा मी प्रथमपासून पुरस्कर्ता आहे. अशाच आशयाचीं पत्रें त्यांनी रिस्लेपरिपत्रकाचा कुप्रसिद्ध कर्ता सर हर्बर्ट रिस्ले यांसही पाठविलीं. शेवटी गोखले आणि मिंटो यांच्या कारस्थानांना यश येऊन मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ लाभले.

—('लॉर्ड मिंटो अ‍ॅण्ड दि इंडियन नॅशनॅलिस्ट मुव्हमेंट' लेखक सय्यद राजीवास्ती, पान १६९)

* * *

प्रकरण पंधरावें

बंडाची प्रस्तावना

शेतकऱ्यांचें बंड आणि ह्यूम यांचें परिपत्रक

संमतिवयाच्या वादानंतर लौकरच १८९२ च्या वसंत ऋतूत टिळकांनी भारतीय शेतकरी लौकरच बंड करतील काय, या प्रश्नाची चर्चा आरंभिली. ही चर्चा राष्ट्रीय सभेचे जनक ह्यूम यांनी स्वदेशी परत जाताना काढलेल्या एका गुप्त परिपत्रकाच्या निमित्ताने उद्‌भवली होती. १६-२-१८९२ या दिवशी केवळ राष्ट्रीय सभेच्या कार्यकर्त्यांकरिता काढलेल्या या गुप्त परिपत्रकात त्यांनी लिहिलें होतें :

The cup of misery of scores of millions of our masses is nearly full and that day by day, poverty, the mother of anarchy is pressing with a heavier and heavier hand on ever-growing portion of our population. As surely as night follows day, sooner or later out of this state of affairs must a terrible rising evolve.

भारतातील कोटयवधि लोकांच्या दुःखदारिद्र्याचा पेला काठोकाठ भरत आला असून अराजकाची माता जी अकिंचनता, तिचा भार प्रतिदिनीं अधिकाधिक असह्य होत चालला आहे. अशा परिस्थितीत दिवसामागून रात्र येण्याइतकेंच भारतात अति भयंकर बंड होणें अपरिहार्य आहे. याच पत्रकात ह्यूम महाशय पुढे लिहितात :

No earthly power can stem an univeısal agrarian rising in a country like this. My countrymen will be as men in the desert, vainly struggling for a brief space, against the simooms. There will be no foe to meet in the field, but rail and road will become impassable, bridges will be wrecked, telegraphs cease to exist, supplies will be arıested, thousands of rioters will be killed, but to what avail, when there are millions on millions who have nothing to look forward to but death, nothing to hope for but vengeance; as for leaders—with the hour comes the man—be sure there will be no lack of leaders.

पृथ्वीवरील कोणतीही सत्ता शेतकऱ्यांच्या सार्वत्रिक बंडाला विरोध करू शकत नाही. अशा बंडाच्या प्रसंगी माझ्या देशबांधवांची स्थिति वाळवंटातील सिमूम वाऱ्यांना तोंड देणाऱ्या प्रवाशांसारखी होईल. रणांगणात तोंड द्यावयाला शत्रूचें दर्शनच होणार नाही. पण आगगाड्या व राजमार्ग वाहतुकीला उपयोगी पडणार नाहीत. पूल पाडले जातील, तारा तोडल्या जातील. सर्व सामग्रीचा पुरवठा थांबून जाईल. सहस्रावधि दंगेखोर मारले जातील; पण त्याचा अंतिम पर्यवसानावर काहीच परिणाम होणार नाही. कारण कोटचवधि लोक यमराजाच्या प्रेरणेने आणि सुडाच्या आशेने चालून येत राहतील. त्यांना पुढाऱ्यांचाही तोटा पडणार नाही. कारण काळ आला की पुढारी उत्पन्न होतात. चीनवादी साम्यवाद्यांच्या प्रेरणेने भारतात शेतकऱ्यांचें बंड झालें तर देशाची अवस्था वरील उताऱ्यात वर्णिल्यासारखीच होईल. अशा प्रकारचें बंड एकदा उद्‌भवलें म्हणजे त्यात सरकार, भूस्वामी आणि सुशिक्षित वर्ग या सर्वांचीच 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' या न्यायाने आहुति पडते.

बंडाचें केंद्र महाराष्ट्रात

अशा प्रकारचें शेतकऱ्यांचें बंड सर्वांत आधी महाराष्ट्रात होऊ शकेल, अशी भीति ह्यूम आणि त्यांचें मित्रमंडळ यांना वाटत असल्यामुळे त्यांनी या भावी बंडाचें केंद्र जें पुण्यपत्तन तेथेच आपल्या बनावट राष्ट्रसभेची स्थापना करावयाचें ठरविलें होतें, असें शिवरामपंत परांजपे यांनी 'काँग्रेस आणि तिचे पुढारी' या लेखात लिहिलें आहे. "बऱ्याच ठिकाणच्या शेतकरी लोकांत दारिद्र्यामुळे आणि उपासमारीमुळे अतिशय असंतोष उत्पन्न होऊन मारामाऱ्या, दरवडे आणि दंगे यांचा प्रारंभ झाला होता. हे दंगे एकदा शमल्यावर काही वर्षांनी बहुतेक त्याच प्रदेशात वासुदेव बळवंतांच्या बंडाचा प्रसार झाला. पहिल्यामध्ये नुसते शेतकरी लोकच होते. पण दुसऱ्या बंडामध्ये पुष्कळ सुशिक्षित लोकही भाग घेत आहेत, अशी सरकारला बळकट शंका आली होती, असें सरकारने न्यायमूर्ति रानडचांच्या केलेल्या बदल्यांवरून आणि इतरही अनेक गोष्टींवरून स्पष्ट दिसत होतें. त्या वेळी महाराष्ट्रातील शेतकरी तर उघड बिथरले होते आणि सरकारला आलेला संशय खरा असेल तर सुशिक्षितपणामुळे नपुंसक बनविलेले लोकही बंडें करण्याच्या खटपटीस लागले होते, असें दिसतें. शेतकरी लोक आणि सुशिक्षित लोक हेच काय ते कोणत्याही देशात झाले तरी मुख्य आधारभूत असे दोन वर्ग होत. त्यांचीच जर अशी स्थिति झालेली असेल तर त्यांच्या मानेवर बसविलेलें

राज्य ढासळून पडण्याला किती अवकाश आहे ?" (काळ १९०३) हें संकट टाळण्याकरिताच ह्यूम महाशयांनी राष्ट्रीय सभा अस्तित्वात आणलीं असल्यामुळे त्यांनी काढलेल्या या गुप्त परिपत्रकाचा त्याच दृष्टीने विचार केला पाहिजे. 'स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासाचीं साधनें' प्रसिद्ध करणाऱ्या संपादकांनी लिहिलें आहे की, प्रयाग, मुंबई, मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या चालकांनी असलें पत्रक वाटणें हें बंडाचेंच कृत्य ठरेल, या भीतीने त्या पत्रकाचा प्रसार करावयाचेंच नाकारलें. राष्ट्रीय सभेच्या कार्यकर्त्यांत प्रत्यक्ष बंडाचा पुरस्कार करणारे कार्यकर्ते कोण आहेत, हें उघडकीस आणणें हाच जर ह्यूम यांच्या पत्रकाचा हेतु असला तर तो हेतु सामान्यतः सफल झाला, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. कारण महाराष्ट्रात या पत्रकाचें समर्थन पुण्याचे टिळक आणि उमरावतीचे रावबहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांनीच उघडपणें केलें. १८-४-१८९२ च्या 'वऱ्हाड समाचारा'च्या अंकात पुढील वार्ता आढळते. 'उमरावती येथील सुप्रसिद्ध विधिविशारद रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांनी ह्यूम महाशयांच्या पत्रात वाऊ वाटण्याजोगें काही नाही, त्यांनी दुःखस्थितीचा बावटा उभारून जागें केलें याकरिता त्यांचे उतराई होणेंच योग्य आहे,' अशा अर्थाचें एक पत्र इंग्लिश पत्रात प्रसिद्ध केलें आहे. बीड येथील १८९९ च्या बंडात भाग घेणारे शिवरावकाका मुधोळकर कदाचित् यांचेच हस्तक असतील. टिळकांनी १३-१२-१८९२ च्या 'केसरी'त या बंडाच्या शक्यतेसंबंधी लिहिलें होतें : "दुष्काळात लाखो लोक आज मुकाट्याने उपासमार होऊन प्राणास मुकतात. पण इंग्रजी राज्यपद्धतीचें लोकांना जसजसें ज्ञान होत जाईल, तसतशी दारिद्र्याचीं कारणें काढून टाकण्याकडे त्यांच्या मनाची अधिकाधिक प्रवृत्ति होईल. त्यामुळे शेवटी सर्वत्र शेतकऱ्यांचे दंगे चालू होतील. शेतकरी लोक अज्ञान आहेत, अथवा सज्ञान असून सुखी आहेत, तोपर्यंत काही एक भीति नाही. पण दारिद्र्य आणि ज्ञान हीं एकत्र झालीं म्हणजे लगेच चकमक झडून त्यापासून ठिणगी पडते, असें विल्फ्रिड स्कावेन ब्लंट यांनी म्हटलें असून त्यांचें म्हणणें अगदी यथार्थ आहे." इंग्रजी राज्याच्या लुटारू धोरणामुळे पेशवाईत अतिशय सुखी असलेल्या शेतकऱ्यांची, नव्या राजवटींत किती दुरवस्था झाली होती, हें एकट्या मुंबई प्रांतात १८८० पासून १८९० पर्यंतच्या दशकातच साडेआठ लक्ष शेतकऱ्यांची वीस लक्ष एकर शेती शेतसारा भरता न आल्याने विकली गेली, यावरून कळून येईल. ढोबळ मानाने सांगावयाचें म्हणजे एकंदर शेतकऱ्यांपैकी एक अष्टमांश शेतकऱ्यांची शेती एका दशकात त्यांच्या घरादारांसह, तसेंच त्यांचे

नांगर, भांडीं, अंथरूण, पांघरूण यांच्यासह विकली गेली. शेतकऱ्यांना याप्रमाणे नागविणारें सरकार स्वतःला शेतकऱ्यांचे कैवारी म्हणवून घेऊन त्यांच्या सुशिक्षित देशबांधवांना मात्र त्यांचे वैरी मानीत असे.

शेतकऱ्यांवरील अत्याचार

इंग्रजी राज्यात कर देऊ न शकणाऱ्या शेतकऱ्यांवर किती अत्याचार होत असत, याची माहिती ९-१०-१९०० च्या 'केसरी'त टिळकांनी सविस्तर दिली आहे. "दुष्काळाच्या वर्षी जे शेतकरी शेतें सोडून पळून गेले नाहीत, त्यांना कर न देण्यानिमित्त मार खावा लागे. एवढ्याने भागलें नाही तर त्यांना बायकामुलांसह घरातून बाहेर काढून घराच्या दाराला पट्ट्या मारून घरी जाणें अशक्य करीत. पळून गेलेल्या लोकांची घरें फोडून लुटालूट करीत. सारा न देणाऱ्या शेतकऱ्यांना विहिरीवर पाणी भरू देत नसत. कित्येकांच्या दारावर महार बसवून तेथील दळणवळण बंद पाडीत, कित्येकांना उघडेंनागडें करून तीनतीन दिवस अन्नपाण्यावाचून कोंडून ठेवीत." मराठी राज्यात शेतकरी लोकांना जो सारा भरावा लागत होता, त्याच्या चौपटीपासून सातपटीपर्यंत सारावाढ इंग्रजांनी केल्यामुळे अज्ञानी शेतकऱ्यांना कर भरणें अशक्यप्राय झालें होतें. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देणें आणि त्यांना नेतृत्व पुरविणें, हें पुढारी लोकांचें प्रमुख कर्तव्य होतें. याकरिताच 'केसरी'चा प्रचार खेड्यापाड्यांतून होण्याइतका तो स्वस्त आणि सोपा असला पाहिजे, असा टिळकांचा आग्रह होता. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना नैर्बंधिक साहाय्य फुकट मिळावें, यासाठी दहा पंधरा वर्षें तरी कागदपत्र घेऊन घरी येणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मार्ग दाखविण्याचा विनामूल्य विधिविशारदाचा व्यवसाय टिळक करीत असत. 'केसरी'ने सुशिक्षित नागरजनांची भूक भागत नसल्यामुळे 'काळाची' लोकप्रियता वाढत असलेली पाहूनही टिळकांनी कधी आपलें लेखनाचें धोरण बदललें नाही.

वाढती लुटारू वृत्ति

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात शेतकऱ्यांना बंड करावें लागणार काय, या प्रश्नाची चर्चा चालू झाली. त्याच वेळी परक्या राज्यकर्त्यांच्या निर्लज्ज आणि निर्दय लुटारू वृत्तीचाही कळस झाला. १३-३-१९०० च्या 'केसरी'त टिळकांनी लिहिलें आहे, '१८७६ मध्ये ज्या दुष्काळी जिल्ह्यांचा सारा १४० लाख होता, त्या जिल्ह्यात

सव्वा दोन लक्षांची साऱ्याची सूट आणि पन्नास लक्षांचा सारा स्थगित केला होता. पण १८९६-९७ चा दुष्काळ अधिक कडक असल्याचें मुंबई सरकारला मान्य असूनही त्या दुष्काळात पावणे दोन कोटि साऱ्याच्या दुष्काळपीडित जिल्ह्यांत अवघी पंधरा सहस्रांची सूट आणि पावणेआठ लक्षांची सारास्थगिति दिली होती.' इतक्या द्रव्यलोभी सरकाराविरुद्ध साराबंदीची चळवळ चालू करणें किती धाडसाचें काम होतें, याची वाचकांना कल्पना येईल. पण पुण्याच्या सार्वजनिक सभेजवळ धाडसी, देशभक्त कार्यकर्त्यांचा अभाव नव्हता आणि त्यांच्या आधारावर टिळकांनी १८९६ मध्ये 'घरेंदारें विकून सारा भरू नका,' असा उपदेश शेतकऱ्यांना करण्याचें कार्य हातीं घेतलें. या दिवसांत जिल्हाधिकारी कोणाचीही कशीही विटंबना करावयाला कसे वचकत नसत, याचें एक अद्‌भुत उदाहरण सर बॉंफील्ड फुल्लर यांच्या आत्मवृत्तावरून येथे उतरून घेण्याजोगें आहे. त्या वेळी फुल्लर महाशय हे पूर्वीच्या मध्यप्रांतात काम करीत असताना असा प्रसंग घडला की तेथील एका गोऱ्या जिल्हाधिकाऱ्यांनी एका विधिविशारदांनाच कोंडवाड्यातील गुरांत कोंडून ठेविलें असताना त्यांच्या मित्रांनी कोंडवाड्याचा दंड भरून त्या पशुकोटीप्रत पोचविलेल्या विधिविशारदांना तेथून सोडविलें. तरीसुद्धा त्या दिवशीच्या त्यांच्या तृणभोजनाचें द्रव्य त्यांच्याकडून न घेण्याचा उदारपणा आपण दाखविला, असें ते जिल्हाधिकारी ऐटीत प्रतिपादीत होते. मध्यप्रांतातील या रानटी जिल्हाधिकाऱ्यांच्या मानाने अधिक सुसंस्कृत, पण अधिक सूडबुद्धि बाळगणाऱ्या अधिकाऱ्यांशी पुण्याच्या पुढाऱ्यांचा नित्य संबंध येत असे. असो. या परिस्थितीतही शेतकऱ्यांचें बंड कां झालें नाही, याचीं माझ्या मतें तीन कारणें असावीत. एक तर अशिक्षित शेतकऱ्यांनी विकलेलीं शेतें अधिक शिक्षित आणि सधन लोकांच्या हाती गेल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांना पूर्वीप्रमाणे अनिर्बंध अत्याचार चालविणें अवघड झालें. दुसरें कारण म्हणजे या दिवसांत महाराष्ट्रात ग्रंथिक संन्निपाताचा प्रादुर्भाव होऊन त्यात तरुण लोकांचा मोठ्या प्रमाणावर संहार झाला, हें होय. अशा साथीच्या रोगातील संहारानंतर जिवंत राहिलेल्या जनांचें जीवनमान सुधारतें या अर्थशास्त्रातील नियमाप्रमाणे शेतकऱ्यांची स्थिति थोडीफार सुधारली. तिसरें कारण म्हणजे विसाव्या शतकापासून हिंदुस्थान सरकाराने चलनवाढ आरंभिल्यामुळे महागाई होऊन शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा आपोआप उतरू लागला, हें होय.

परतंत्र देशांचें राजकारण

परतंत्र देशांचें राजकारण हें मुख्यत: अवतारवादाच्या आश्रयाने चालतें. कारण पारतंत्र्याच्या पराकाष्ठेच्या अवनतावस्थेत ईश्वरी अवताराच्या अपेक्षेवाचून अन्य कोणताही त्या देशाच्या नेत्यांना आधार नसतो. 'आपली स्थिति अत्यंत विपन्न झाली आहे, परमेश्वर आणि धर्म यांवाचून आम्हांला कोणी त्राता उरला नाही,' असे उद्गार स्वदेशी आंदोलनाच्या दिवसांत टिळकांच्या तोंडी अनेकदा येत. असले निर्वाणीचे उद्गार तोंडी यावयाला रामाच्या आधींचा रावणाचा आणि कृष्णाच्या पूर्वीचा कंसाच। अवतार पृथ्वीवर व्हावा लागतो. या पापिष्ठांनी ईश्वरभक्तांचा पराकाष्ठेचा छळ आरंभिला म्हणजेच ईश्वर अवतार घेतो. हा ईश्वराचा अवतार म्हणजे आसुरी राज्यकर्त्यांनी आपल्या स्वकीय अथवा परकीय प्रजेचा जो छळ चालविला असतो, त्या छळाविरुद्ध होणारी जनतेची तीव्र प्रतिक्रिया होय. अत्याचारी परकीय सम्राटांचा उच्छेद करण्याची प्रक्रिया वाल्मीकींनी रामचरित्राच्या साहाय्याने रामायणात सुबोध करून सांगितली आहे. त्याच्या उलट स्वकुलीन अत्याचारी दुःशासनांचा आणि कंसांचा उच्छेद करण्याची प्रक्रिया व्यासांनी महाभारतातील भीमाच्या आणि हरिवंशातील कृष्णचरित्राच्या मिषाने सांगितली आहे. अशा प्रकारे रामायण आणि महाभारत या दोन महाग्रंथांतून मिळून परकीय आणि स्वकीय अत्याचारी राज्यकर्त्यांविरुद्ध राज्यक्रांति घडवून आणण्याचे आदेश आणि वस्तुपाठ आपल्या ऋषींनी भारतीय प्रजेला देऊन ठेविले आहेत. या दोन राष्ट्रीय ग्रंथांच्या शिकवणीचा संक्षिप्त सारांश हा आहे की, परकीय अथवा स्वकीय राज्यकर्त्यांनी आपल्या असहाय प्रजाजनांवर बलप्रयोग करणें हें महापाप असून या बलप्रयोगाविरुद्ध त्यांच्या दलित प्रजेकडून रामाच्या अथवा कृष्णाच्या नेतृत्वाखाली जी प्रतिक्रिया होते, ती पवित्रतम आहे. इतकेंच नव्हे तर अशी प्रतिक्रिया हाच ईश्वरी अवतारांचा आद्य हेतु असून असल्या प्रतिक्रियेची आवश्यकता संपली की त्या अवतारांचें अवतारस्वरूपही नष्ट होतें. या महान् ग्रंथांच्या शिकवणीचा टिळकांच्या मनावर चिरस्थायी परिणाम झाला असल्याने हिंदुस्थानावर राज्य करणाऱ्या परकीय सरकारच्या बलप्रयोगाविरुद्ध दलित प्रजेत होणारी प्रतिक्रिया ही टिळकांना निषेधार्ह न वाटता उलट स्वागतार्ह वाटत असे. याच भावनेने प्रेरित होऊन रँडवधापासून १९१९ मधील रौलॅट विधेयकाविरुद्ध पंजाबात झालेल्या प्रतिक्रियेपर्यंत जेव्हा जेव्हा दलित भारतीय प्रजेने आपल्या

जिवंतपणाचा प्रत्यय सैतानी सरकारला आणून दिला तेव्हा तेव्हा टिळकांनी त्या प्रतिक्रियेचा निषेध करून स्वजनांचा उपमर्द करण्याचें पाप करावयाचें सपशेल नाकारलें. अमृतसर काँग्रेसच्या प्रसंगीही गांधींनी पुढे आणलेला पंजाबी जनतेच्या निषेधाचा ठराव विषयनियामक समितीत टिळकांच्या प्रभावाने असंमत झाला होता. पण गांधींनी नेहमीप्रमाणे काँग्रेस सोडून देण्याची धमकी दिल्यानंतर पंजाबी नेत्यांच्या इच्छेला मान देऊन टिळकांनी आपला विरोध परत घेतला. या प्रकरणीं स्वतः टिळकांनी गोविंद कृष्ण टिळक यांच्याजवळ बोलताना पुढील उद्‌गार काढले होते. 'विषयनियामक समितीत पंजाबातील अत्याचारांबद्दल सरकारी अधिकाऱ्यांचा जसा निषेध करावयाचा, तसाच तो लोकांचाही केला पाहिजे, असें गांधींचें आग्रहाचें म्हणणें होतें. पण तें आम्हांला मुळीच मान्य नव्हतें. आमच्याच पक्षाचें प्रचंड बहुमत होतें तरीसुद्धा त्यांचें म्हणणें समेटाच्या दृष्टीने मान्य करून त्यांना सुधारणा निराशाजनक असल्याचा ठराव मान्य करावयास लाविला.' असला समेट चांगला कीं वाईट, याविषयीं मतभेद होऊ शकेल. माझें म्हणणें हें की सरकारने चालविलेल्या छळाची जनतेत होणारी प्रतिक्रिया टिळकांना निषेधार्ह वाटत नव्हती, हें वरील स्मृतीने सिद्ध होतें.

चीड व्यक्त करण्याचें कर्तव्य

उलटपक्षी, हिंदी प्रजेला राज्यकर्त्यांच्या अन्यायाविरुद्ध चीड यावी आणि ती चीड, किंवा त्वेष तिने कृतीने व्यक्त करावा असेंच टिळकांना वाटत असे. असल्याच एका अत्यंत त्वेषजनक प्रसंगाला अनुलक्षून टिळकांनी 'केसरी'त लिहिलें होतें : 'हिंदी पुरुषांच्या अंगी अँग्लो-इंडियनांपासून आपल्या बायकांच्या शीलाचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य नाही, असें आढळून आल्यावर वीरनवाली आपला खटला परमेश्वराच्या न्यायासनापुढे सादर करण्यास गेली आहे. शेकडो राजद्रोही भाषणांनी अथवा सहस्रावधि लेखांनी होणार नाही, इतका संताप आणि त्वेष असला खटला हिंदी लोकांच्या अंतःकरणात उत्पन्न करीत असतो, हें गोऱ्या लोकांनीं लक्षात ठेवावें. वीरनवालीच्या आत्मयज्ञात गलितधैर्य पुरुषांना साहसी आणि निश्चयी करण्याचें किती सामर्थ्य आहे, हें हिंदुस्थान सरकारने नीट समजून घ्यावें. अशा प्रसंगाने खवळलेलीं मनें शांत होणें शक्य नाही.' लोकांच्या मनात पारतंत्र्यातील अत्याचारांविरुद्ध प्रथम चीड, नंतर त्वेष आणि सरतेशेवटी प्रक्षोभ निर्माण करणें आणि त्या प्रक्षोभाला साजेशी कृति घडून आल्यास तिचें पर्यायाने समर्थन करणें,

हें कार्य टिळकांनी त्यांना काळेंपाण्याची शिक्षा होईपर्यंत अखंड चालू ठेविलें होतें.

'अत्याचारांची चिकित्सा'

अवतारवादाच्या दृष्टीने टिळकांच्या राजकारणाची चर्चा करताना मला पदोपदी जोर्ज सोरेल या फ्रेंच तत्त्वज्ञान्याच्या 'Reflections on Violence' या अभ्यसनीय ग्रंथाचें स्मरण होतें. त्याचें म्हणणें असें आहे की क्रांतिकारक पक्षाचे नेते नेहमीच आपल्या आंदोलनाला सत्पक्ष आणि असत्पक्ष यांच्यामधील निर्वाणीच्या युद्धाचें स्वरूप देतात. असें निर्वाणीच्या युद्धाचें स्वरूप आंदोलनाला प्राप्त झालें की, त्यांतून बुद्धिवादी आणि तडजोडवादी पुढारी बाहेर पडून ते अधिकारारूढ असत्पक्षाला मिळतात. युद्धें थांबविण्यासाठी लढविलेल्या युद्धाप्रमाणेच, आंदोलनें संपविण्याकरिता चालविलेल्या अंतिम आंदोलनाला रामरावणयुद्धाचें अथवा टिळकांनी शिवाजी उत्सव चालू करून दिलेलें शिवाजी आणि औरंगजेब यांच्या युद्धाचें स्वरूप प्राप्त झालें की, त्यातून सुधारणावाद्यांना आपोआपच बाहेर पडावें लागतें. त्यानंतर ते अधिकारारूढ पक्षाला मिळून जनतेचा विश्वासघात करण्याचा व्यवसाय करीत राहतात, असें तत्कालीन इतिहासावरून कळून येतें. राजकारणाला रामरावणयुद्धाचें स्वरूप येण्याच्या प्रक्रियेला जोर्ज सोरेल् यांनी 'मिथ' असें नाव दिलें आहे.

These constructions, knowledge of which is so important for historians, I propose to call myths. The myths are not descriptions of things, but expressions of a determination to act. A myth that serves to weld together a nation, people or class must be capable of arousing their most profound sentiments, and must at the same time direct energies towards the solution of the real problems which the group faces in its actual environment.

हीं जीं कल्पनाचित्रें, स्वप्नें रंगविलीं जातात, तीं वस्तुस्थितीची निदर्शक म्हणून रंगविलीं जात नसून प्रस्तुत परिस्थितीत आवश्यक असलेली कृति करण्याची प्रेरणा मिळावी म्हणून रंगविलीं जातात. असल्या स्वप्नांतून अथवा कल्पनाचित्रांतून एखाद्या राष्ट्राला अथवा समाजाला एका विचाराने भारून टाकणाऱ्या भावना व्यक्त होतात आणि सद्यःकालीन प्रश्न सोडविण्याकरिता कृति करण्याची प्रेरणाही त्या स्वप्नांपासून लाभते. क्रांतिकारक आंदोलनाला अत्यावश्यक असलेल्या ज्या स्वप्नाचें वर्णन सोरेलने आपल्या ग्रंथात केलें आहे, तें स्वप्न शिवाजी

आणि गणपति उत्सवांतून टिळकांनी महाराष्ट्रात साकार केलें. असलीं स्वप्नें शस्त्राचारावाचून यशस्वी होत नाहीत, हा सोरेल्चा दुसरा सिद्धान्त आहे. याविषयी वेगळा प्रचार करण्याचें टिळकांना कारणच नव्हतें. शिवाजीचा आदर्श समाजासमोर ठेवल्यानंतर शस्त्राचारांचा वेगळा उपदेश करावा लागत नाही. राजकारणात अहिंसावाद शिरणें हें समाज सडावयाला लागल्याचें लक्षण आहे, असें सोरेल्चें साधार प्रतिपादन सांगतें.

An open recognition of the necessity of violence can reverse the social degeneration. Violence however can serve this function, can be kept free from brutality only if it is linked to a great myth—Myth and violence reciprocally acting on each other, produce not senseless cruelty and suffering, but sacrifice and heroism.

सोरेल्चें तत्त्वज्ञान सांगतें की, अहिंसावादाच्या प्रचारासहच समाजात असत्याचा आणि लाचलुचपतीचा सुकाळ होऊन समाज सडावयाला लागतो. याच्या उलट दुर्जनांपासून धर्म आणि समाज यांच्या संरक्षणाला हिंसा आवश्यक आहे, असें उघडपणें मान्य केलें म्हणजे समाज सडण्याची क्रिया थांबून त्याचें क्रमाने पुनरुज्जीवन होऊ लागतें. मात्र हिंसेच्या तत्त्वज्ञानाने समाजाचें पुनरुज्जीवन व्हावयाला ती हिंसा पाशवी प्रवृत्तींपासून सर्वस्वी अलिप्त असावी लागते. हिंसेला पाशवी प्रवृत्तींपासून आणि निरर्थक क्रौर्यापासून सर्वस्वी अलिप्त राखण्याकरिता तिचा भव्य, दिव्य आणि महान् अशा स्वप्नाशी अथवा कल्पनाचित्राशी संयोग व्हावा लागतो. अशा स्वप्नाशी हिंसेचा संयोग झाला म्हणजेच आत्मोत्सर्गाचे आणि अपूर्व पराक्रमांचे आदर्श निर्माण होतात.

नैराश्यं परमं सुखम्

सोरेल्चा हिंसेचा पुरस्कार हा त्याच्या निराशावादावर आधारलेला होता.

The optimist in politics is an inconstant and even dangerous man, because he takes no account of the great difficulties presented by his projects. If he possesses an exalted temperament, and if unhappily he finds himself armed with great power the optimist may lead his country into the worst disasters.

राजकारणात आशावादी मनुष्य हा चंचल आणि भयानक मनुष्य ठरतो; कारण त्याच्या कार्यक्रमांच्या आणि योजनांच्या मार्गातील दुर्लंघ्य

अडचणींचा तो विचारच करीत नाही. असले आशावादी नेहमीच अव्यवहारी वातावरणात विहार करीत असतात. आणि त्यांचा समाजावर अनिर्बंध अधिकार चालत असला तर ते आपल्या राष्ट्रावर भयंकर अरिष्टें ओढविण्यास कारणीभूत होतात. टिळक स्वतः निराशावादी होते, हें विश्ववृत्त मासिकाच्या पहिल्या अंकात 'नैराश्यं परमं सुखम्' या सूत्रावर त्यांनी 'आशेची निराशा आणि निराशेची आशा' हा जो लेख लिहिला होता, त्यावरून कोणालाही कळून येईल. टिळक निराशावादी होते, म्हणूनच आपल्या राष्ट्राचें नेतृत्व करण्याला ते पूर्णपणे पात्र होते. त्यांच्या उलट आशाळभूत गोखले हें सरकारने कसलीही क्षुद्र आशा दाखविली की उतावीळपणाने तिच्या मागे धाव घेत आणि आत्मवंचनेसहच आपल्या राष्ट्राचीही वंचना करीत. वरील सर्व विवेचनावरून टिळकांनी क्रांतिकारकांची संघटना करण्याचा कार्यक्रम कां हाती घेतला होता, याची वाचकांना कल्पना येईल.

टिळकांनी क्रांतिकारकांना शपथ दिल्याचा प्रसंग

टिळकांनी क्रांतिकारकांना शपथ दिल्याचा पुरावा पुंडलीक कातगडे यांच्या गोविंदराव याळगींच्या चरित्रात ८० पानावर उपलब्ध होतो. १९०६ मध्ये टिळक स्वदेशीप्रचारानिमित्त पंढरपूरला गेले होते. त्या कार्तिकी एकादशीच्या वारीतच विजापूरचे श्रीनिवासराव कौलजगी आणि आजरेकर, नाशिकचे विश्वनाथपंत केतकर आणि बाबाराव खरे, पंजाबचे काही पुढारी अशी मंडळी एकत्र आली होती. ही सर्व मंडळी चंद्रभागेच्या वाळवंटात टिळकांसह एकंदर देशस्थितीसंबंधाने चर्चा करीत. या चर्चेचा परिणाम म्हणून या लोकांनी स्वराज्यप्राप्तीवाचून स्वस्थ न बसण्याची, इंग्रजांची या देशातून हकालपट्टी करण्याची, तसेंच ऐक्यसंरक्षणाची, देशासाठी सर्व प्रकारचें कष्ट सोसण्याची आणि गुप्त गोष्टी न फोडण्याची शपथ गीताग्रंथावर हात ठेवून घेतली. ही शपथ घेणाऱ्यांत गंगाधरराव आणि हणमंतराव देशपांडे होते. या सुवर्णप्रसंगी गोविंदराव याळगी तेथे नव्हते. त्यामुळे गंगाधररावांच्या तोंडून या प्रसंगाचें वर्णन ऐकून त्यांना चुटपूट लागून राहिली.

बिपिनचंद्र पाल यांनी केलेला उलगडा

कर्झन-मिंटोंच्या राजवटीतच क्रांतिकारक समित्यांचा सार्वत्रिक प्रसार कां झाला, हें वर्तमानकालीन वाचकांना सहज समजणें शक्य नाही. याचें एक प्रमुख कारण बिपिनबाबूंनी 'Nationality and Empire' या ग्रंथांत सांगितलें आहे.

Lord Curzon told the people in the plainest possible terms that as long as the Government of India continued to be British, so long the supreme political authority in this country must vest in the representatives of the British people, and that the people of India must be content to perpetually occupy a subordinate place. The highest functions of the state in the due exercise of which the highest manhood of a people find scope and opportunity to fully realise itself, must always be reserved for the foreigner in India and not for the children of the soil. Not the evolution of the self-government but the establishment of good government was Britain's recognised mission and responsibility in India. And even Lord Morley lent support to this Curzonian ideal by declaring that Government of India, must so far as his imagination went, continue to be a personal government. This cruel truth had never before been so cruelly proclaimed in India or England by any British statesman. It broke into our dreams, dispelled our illusion and quickened a sense of unreality of all our political ideas and activities. It generated the conviction that there was an irreconciliable conflict between the interests of India and those of England. It was just this conviction which converted the old discontent into the new unrest.

लॉर्ड कर्झनच्या काळापूर्वी राणीच्या घोषणेवर आणि काही धूर्त इंग्रजांच्या गोड वाक्यांवर विश्वास ठेवणाऱ्या लोकहितवादी, रानडे यांच्यासारख्या पुढाऱ्यांना अशी आशा वाटत होती की सामाजिक सुधारणा करून भारतीयांनी आपली पात्रता सिद्ध केली की, इंग्रजसरकार आपल्याला क्रमाक्रमाने स्वराज्याचे अधिकार देईल. पण हा लोकभ्रम, किंवा नेतृवृंदभ्रम लॉर्ड कर्झन यांनी राणीच्या घोषणेला अशक्य सनद ही संज्ञा देऊन, तसेंच इंग्रजीसत्तेचें भारतातील उद्दिष्ट स्वराज्य नसून सुराज्य असल्याची घोषणा करून आणि सर्व विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकारांचीं पदें इंग्रजांच्याकरिता राखून ठेवलीं असल्याचें सुस्पष्ट शब्दांत सांगून नष्ट करून टाकला. हीं इंग्रजांकरिता राखून ठेवलेलीं पदें भारतीयांना उपलब्ध झालीं तरच राष्ट्रातील पौरुषाचा पूर्ण विकास होईल, अन्यथा नाही, हें शल्य सर्व राष्ट्रभक्तांच्या अंतःकरणात खुपूं लागलें. लॉर्ड कर्झन यांच्याच म्हणण्याचा अनुवाद करून लॉर्ड मोर्ले यांनीही आपला सिद्धान्त सांगितला की, हिंदुस्थानात एकतंत्री राज्यच अस्तित्वात राहील, ही पद्धति बदलण्याचीं कोणतींही लक्षणें मला दिसत नाहीत. हें

निष्ठुर सत्य इतक्या निष्ठुरपणाने यापूर्वी कोणाही अत्युच्च अधिकारपदावरील व्यक्तीने इंग्लंडात किंवा भारतात बोलून दाखविलें नव्हतें. या उद्‌गारांमुळे आम्ही स्वप्नांतून जागे झालों आणि मायाजालातून मुक्त झालों. याच क्षणी इंग्लंड आणि हिंदुस्थान यांचे हितसंबंध अपरिहार्यपणे परस्परविरोधी असल्याची आम्हांला जाणीव झाली.

बंगाली नेत्यांना पश्चिमेच्या संस्थेची दीक्षा

क्रांतिकारकांची केंद्र समिति अस्तित्वात आली, तेव्हा महाराष्ट्रीय ब्राह्मणांप्रमाणेच बंगाली लोकांनाही सैन्यात प्रवेश मिळत नसे. याकरिता यतींद्रनाथ वंद्योपाध्याय यांनी काही दिवस प्रयाग येथे राहून हिंदी लोकांप्रमाणे आपली भाषा आणि राहणी बनविली. आपलें नांवही ते जतिंदर उपाध्याय म्हणून लावू लागले. अशी पूर्वसिद्धता करूनही त्यांनी अनेक संस्थानी सैन्यांतून प्रवेश मिळविण्याचा केलेला प्रयत्न फसला. शेवटी ते बडोद्याला आले असताना अरविंदांनी खासेराव जाधवांच्याद्वारा त्यांना सैन्यात प्रवेश मिळवून दिला. त्यांचें शिक्षण संपून ते अधिकारी बनल्यानंतर अरविंदांनी त्यांना दीक्षा देऊन क्रांतिकार्याच्या प्रचाराकरिता १९०२ मध्ये बंगाल्यात पाठविलें. तोपर्यंत तेथे प्रमथ मित्रांची अनुशीलन समिति, विपिन गांगुलींची आत्मोन्नति समिति अशा अनेक समित्या अस्तित्वात आल्या होत्या. या संस्थांच्या नेत्यांशी यतींद्रनाथांचा परिचय झाल्यानंतर अरविंदांनी त्या सर्वांची भेट घेऊन त्यांना पश्चिम भारतातील प्रमुख क्रांतिकारक संस्थेची दीक्षा दिली. याच वर्षी अरविंदांनी गीता आणि तरवार हाती देऊन आपले बंधु बारींद्रकुमार यांनाही क्रांतिकार्याची दीक्षा दिली. त्यानंतर बारींद्रकुमार हें टिळकांचें पत्र घेऊन आपले पूर्वीचे शिक्षक सखाराम गणेश देउस्कर यांना भेटले आणि त्यांना बंगाल्यांतील क्रांतिकारक समितीची आणि पुढील योजनांची रूपरेखा सांगितली. यावरून असें दिसून येतें की, यापूर्वीच टिळकांचा देउस्करांशी परिचय झाला होता आणि तेही त्यांच्या क्रांतिकार्यांत भाग घेत. देउस्करांनी समितीच्या सभासदांना भारताचें अर्थकारणही पद्धतशीर रीतीने शिकविलें आणि नंतर अरविंदांच्या सांगण्यावरून याच विषयावरील आपला सुप्रसिद्ध ग्रंथ 'देशेरकथा' लिहिला. याच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्यानंतर हा ग्रंथ सरकारजमा झाला. या देउस्करांनीच बंगाल प्रांतात स्वराज्य शब्द रूढ केला. हे प्रथम देवघर येथे शिक्षक होते. पण एका सरकारी अधिकाऱ्याविरुद्ध वार्तापत्र प्रसिद्ध केल्याच्या अपराधामुळे त्यांचें काम गेलें. तेव्हा सुरेंद्रनाथांनी त्यांना 'हित-

वादी' पत्रात सहाय्यक संपादक म्हणून नेमून घेतलें. त्यामुळे कलकत्त्यातील समितीच्या कार्यात ते प्रथमपासून भाग घेत असत. या वर्षीच अरविंदांनी मिदनापूर येथे समितीची स्थापना करून आपला मामा सत्येंद्र बोस आणि हेमचंद्र दास या विख्यात क्रांतिकारकांना दीक्षा दिली. या वर्षीच अरविंदांची भगिनी निवेदिता यांच्याशी ओळख होऊन त्यांचाही समितीच्या नेत्यांत समावेश झाला. त्यांनी आपल्याजवळचे दुर्मिळ ग्रंथ क्रांतिकारकांच्या ग्रंथालयाला देऊन स्वतः त्यांचे वर्गही चालविले. या ठिकाणीच अग्नियुगाचा आविष्कार करण्यातील त्यांच्या कर्तृत्वाचा उल्लेख करणें सोयीचें होईल. मुरारीपुकुरमार्गावरील ज्या घरात 'अग्निगोलक' करण्याचे प्रयोग चालत, त्या प्रयोगात त्या कधी कधी भाग घेत. तत्कालीन इंग्रजी विश्वकोशाच्या तेराव्या खंडात अग्निगोल करण्याची संपूर्ण कृति दिली होती. हिंदु क्रांतिकारकांनी त्या ग्रंथाचा सदुपयोग आरंभिलेला पाहून पुढच्या आवृत्तीत प्रकाशकांनी तो भाग गाळून टाकला. असो. एखाद्या घरात अग्निगोल करण्यापेक्षा रसायनाच्या प्रयोगशाळेत ते करणें अधिक सुलभ असल्याने प्रेसिडेन्सी महाविद्यालयातील प्रयोगशाळेतच ते करण्याची व्यवस्था जगदीशचंद्र वसु आणि प्रफुल्लचंद्र राय यांच्या कृपेने झाली. या उभयतांना सहाय्यक सहकारी लागत आणि ते पुरविण्याचें काम भगिनी निवेदिता यांनी स्वयंप्रेरणेने पतकरलें होतें. या सहकाऱ्यांसंबंधी त्यांच्या वरिष्ठांचें एकच गाऱ्हाणें होतें. तें हें की हीं पोरें आम्लांचा (ॲसिड्सचा) फार अपव्यय करतात.

प्रफुल्लचंद्र राय आणि पुलिनविहारी दास

जगदीशचंद्र आणि प्रफुल्लचंद्र हे दोघेही आचार्य क्रांतिकारकांच्या कार्यातून गुप्तपणे भाग घेत असत. यांपैकी जगदीशचंद्रांचा उल्लेख यापूर्वी अनेकदा आला असल्याने इथे केवळ प्रफुल्लचंद्र राय यांच्या कार्याचा उल्लेख केला म्हणजे पुरे. अनुशीलनसमितीचें नेतृत्व पुलिनविहारी दास यांच्याकडे आल्यानंतर प्रफुल्लचंद्रांनी एकदा त्यांची गुप्तपणे गाठ घेतली आणि त्यांना आपल्या प्रयोगशाळेतून अग्निगोल करून देण्याचें अभिवचन दिलें. अशी कथा नलिनीकिशोर गुह यांनी आपल्या आठवणीत लिहिली आहे.

अनुशीलनचे पहिले पुढारी

प्रमथ मित्रांच्या नेतृत्वाखाली अनुशीलन समितीची स्थापना झाली, तेव्हा त्या समितीचे अध्यक्ष प्रमथ मित्रच होते. अरविंद घोष

आणि चित्तरंजन दास हे उपाध्यक्ष. यतींद्रनाथ वंद्योपाध्याय हे कार्यवाह आणि बिपिनचंद्र पाल, सरलादेवी (चौधुराणी), भगिनी निवेदिता इत्यादि प्रमुख व्यक्ति त्या समितीच्या कार्यकारिणीत होत्या. ही समिति केंद्रसमितीला जोडून घेतली होती. त्या केंद्रसमितीचे नेते स्वत: टिळकच होते. यामुळेच त्या वर्षी राजकीय दरवड्यांच्या प्रश्नाची चर्चा करण्याकरिता सरलादेवी टिळकांच्याकडेच आल्या होत्या. टिळकांना दरवड्यांची उपयुक्तता पटत नसली तरी त्यांनी त्यांच्याविरुद्ध प्रचार करावयाचें नाकारलें. पण प्रमथ मित्रांचा जवळ जवळ शेवटपर्यंत दरवड्यांना विरोध चालू होता. १९०६ आणि १९०७ मधील पक्षाच्या गुप्त वार्षिक सभांतूनही या प्रश्नाची चर्चा झाली. तेव्हा कित्येकांनी केवळ सरकारी द्रव्य लुटण्याच्या धोरणाचा पुरस्कार केला. पण सरकारी द्रव्य लुटावयाला संघटना फार बलिष्ठ असावी लागते. तशी आपली अवस्था नसल्याने राजकीय दरवडे घातल्यानंतर, ज्यांच्यावर दरवडे घातले असतील, त्यांना त्यांच्या लुटलेल्या द्रव्याच्या पावत्या द्याव्यात, असें ठरलें.

राजकीय दरवड्यांचा प्रश्न

क्रांतिकार्याकरिता दरवडे घालून द्रव्यसंचय करण्याचा संकल्प केंद्रसमितीने प्रथमपासूनच केला होता. विवेकानंदांचे धाकटे बंधु भूपेन्द्रनाथ दत्त म्हणतात की, मी समितीत प्रवेश केला, त्यापूर्वीच या प्रश्नाचा निर्णय होऊन चुकला होता. कारण क्रांतिकार्याविषयी जनतेत प्रेम उत्पन्न करून तिच्याकडून कर्तव्यबुद्धीने यथाशक्ति द्रव्य मिळविणें अशक्य होतें. दोघे चौघे अशील नसलेले बॅरिस्टर समितीचे नेते होते आणि तेच कार्य चालू राहण्याकरिता थोडेंफार द्रव्यसाहाय्य करीत. तेव्हा प्रथम असा ठराव झाला की, इंग्रजांचे अथवा सरकारचें द्रव्य लुटून आपला कोश भरावा. पण स्वदेशीच्या युगात दरवडे घातले, ते आपल्याच लोकांवर. कारण ते नि:शस्त्र असल्याने त्यांच्यावर दरवडे घालणें सोपें होतें. या राजकीय दरवड्यांत बंगाल प्रांताने पुढाकार घेतला. कारण 'आनंदमठ' आणि 'देवी चौधुराणी' या बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्यांतील दरवड्यांचें क्षेत्र बंगाल हेंच होतें. या दरवड्यांमुळे अनेक दुष्परिणामही घडून आले. कारण त्यामुळे क्रांतिपक्षात खऱ्या क्रांतिकारकांच्यासह, दरवडेखोरांचीही भरती होऊ लागली. त्याचप्रमाणे लुटीचें द्रव्य ज्यांच्या स्वाधीन केलें, त्यांनीच तें आत्मसात् केलें असेही प्रकार घडून आले. पण हा प्रकार वर्गणीच्या द्रव्यासंबंधीही होऊ

शकतो. असो. दरवडे घालण्याची संधि साधण्यासाठीच क्रांतिपक्षात प्रविष्ट झालेले तरुण रक्षकांच्या हाती सापडले म्हणजे सर्व गुप्त गोष्टी उघड करीत. त्यामुळे क्रांतिपक्षाची मोठी हानि आणि दुष्कीर्तिही होत असे. हे सारे दुष्परिणाम किरकोळ दरवडे घालण्यामुळे घडून आले होते, हें उघड आहे. स्टालिनप्रमाणे मोठ्या प्रमाणावर संघटना करून त्यांनी एखादी पेढी (बँक) लुटली असती, तर त्यांच्या मागची द्रव्याची विवंचना मिटली असती आणि विश्वासघातामुळे होणारी हानिही टळली असती.

राजकीय दरवडेखोरांची प्रतिज्ञा

इंग्रजीत एक म्हण आहे. 'Honour among thieves, honour among lovers.' चोरांचीं वचनें आणि प्रेमिकांचीं वचनें सारखींच विश्वासार्ह. तरी सुद्धा राजकीय दरवडे घालणाऱ्यांना जनाची नसली तरी मनाची काही लाज वाटावी, म्हणून पुढील प्रतिज्ञा करावी लागे. 'स्वातंत्र्यसंपादनाप्रीत्यर्थ द्रव्याची अत्यंत आवश्यकता असल्याने आपद्धर्म म्हणूनच मी दरवडे घालण्याला प्रवृत्त होत आहे. लुटीचें सर्व द्रव्य मी नेत्याच्या स्वाधीन करीन. तो जें द्रव्य माझ्या हाती देईल, तेवढ्यावर मी संतुष्ट राहीन. देशद्रोही, सरकारचे गुप्त हेर, कपटी, मद्यपी, वेश्यासक्त, दुर्बलांवर अत्याचार करणारे, भरमसाट व्याज घेणारे अतिकृपण धनिक यांच्या घरावरच मी दरवडे घालीन. दरवड्याच्या प्रसंगी स्त्रिया, मुलें, वृद्ध, रुग्ण, इत्यादिकांना काहीही उपद्रव देणार नाही.' समितीच्या पुढाऱ्यांपैकी भगिनी निवेदिता, सरलादेवी (चौधुराणी,) प्रमथ मित्र यांनी दरवड्यांना कसून विरोध केला होता. पण पक्षाच्या बहुमतापुढें त्यांचें काही चाललें नाही. हें बहुमत अर्थात् अरविंदांच्या अनुयायांचें होतें. आणि त्यांना टिळकांचा प्रथमपासून पाठिंबा होता. दरवडे घालण्याच्या तत्त्वाला टिळकांचा विरोध नसला तरी त्यांच्या उपयुक्ततेसंबंधी त्यांचें मन साशंक होतें. तरीसुद्धा बिपिनचंद्र पाल यांच्याप्रमाणे त्यांनी राजकीय दरवड्यांना उघड विरोध कधीच केला नाही. स्वदेशी चळवळीच्या दिवसांत अरविंदांचे मामा सत्येंद्र बसु आणि क्षुदिराम बसु (खुदिराम) यांनी 'सोनार बांग्ला' नांवाचीं पत्रकें प्रसिद्ध करून दरवडे घालण्याच्या धोरणाचा उघड पुरस्कार केला असता बिपिनचंद्रांनी आपला प्रिय शिष्य क्षुदिराम वाट चुकलेला देशभक्त बनत असलेला पाहून त्या पत्रकाचा 'वंदेमातरम्' दैनिकातून प्रकटपणे निषेध केला. या पापाकरिता त्यांना त्या सुप्रसिद्ध

दैनिकाच्या संपादकीचें त्यागपत्र द्यावें लागलें. त्यानंतर अरविंद 'वंदे-मातरम्'चे संपादक झाले.

सरलादेवींची टिळकांना विनंती

टिळकांनी राजकीय दरवड्यांचा निषेध करावा, अशी विनंती सरलादेवींनी १९०२ च्या अंतीच केली होती. सरलादेवी या साताऱ्याचे गेल्या शतकातील एक न्यायाधीश सत्येंद्रनाथ ठाकूर यांच्या कवयित्री कन्या स्वर्णकुमारी, यांच्या कन्या. या विसाव्या शतकाच्या प्रारंभी क्रांतिकारक समितीच्या पुढाऱ्यांपैकी असून त्यांनी बंगाली तरुणांना मुष्टियुद्ध, लाठी, दांडपट्टा इत्यादि आत्मसंरक्षणाच्या विद्यांचा अभ्यास करण्याला प्रवृत्त करून फार मोठें कार्य केलें. पण पुढे या तरुणांनी देशात दरवडे घालण्याला प्रारंभ केला. सरलादेवींनी टिळकांच्या आठवणीत लिहिलें आहे :

I realised that with the soldierly instinct in those boys denied an open and honourable outlet, it was seeking this underground and dishonourable channel for self-expression. I was hard put to convince them that it would be unworthy of their manhood. For against all my reasonings was brought in, the personality of Tilak and his approval as the greatest argument in favour of the dacoities. So I wended my way to Poona, to have a personal talk with Lok. Tilak and learn his views on the matter. I had three hours talk with him, the only other person present being Mr. Kelkar. Tilak told me distinctly that he did not approve of the dacoities, much less authorize them, if for nothing else, simply on the score of their being practically useless for political purposes. But looking to the differences in human nature and the varying processes of evolution suited to different temperaments, he did not condemn them openly.

(आठवणी खंड १, पान ५११)

या अवतरणावरून असें कळून येतें की, बंगालच्या क्रांतिकारक तरुणांनी विसाव्या शतकाच्या प्रारंभीच जेव्हा दरवडे घालण्याला प्रारंभ केला, तेव्हा ते तरुण टिळक आमच्याच मताचे आहेत, असें सांगून आत्मसमर्थन करीत होते. यामुळे या प्रश्नासंबंधी टिळकांचें मत समक्ष समजून घ्यावें आणि शक्य तर त्यांच्याकडून राजकीय दरवड्यांच्या निषेधाचा संदेश मिळविता आला तर पहावा, या हेतूने तेव्हा सरलादेवी पुण्याला आल्या होत्या. त्या वेळी एकट्या केळकरांच्या समक्ष

त्यांची आणि टिळकांची तीन तास एकांतात चर्चा झाली. टिळकांनी त्यांना स्पष्ट सांगितलें की, दरवड्यांचा राजकीय दृष्ट्या जवळ जवळ काहीच उपयोग होत नसल्याने माझें मत त्यांच्याविरुद्ध आहे; पण 'मतिर्विभिन्नाः स्मृतयो विभिन्नाः' या तत्त्वाला अनुसरून आणि प्रत्येकाच्या उत्क्रांतीच्या अवस्थेप्रमाणे भिन्न भिन्न मार्गांचा उपयोग होत असल्याने मी उघडपणे त्यांचा निषेध करणार नाही. सरलादेवींच्या या स्मृतीवरूनही टिळकांचा राजकीय दरवड्यांना तत्त्वतः विरोध नव्हता, असेंच दिसतें. नाहीतर दरवड्यांच्या समर्थनासाठी आपल्या नांवाचा दुरुपयोग होत आहे, असें त्यांना वाटलें असतें तर त्यांनी त्या मार्गाचा स्पष्ट निषेध केलाच असता. या आठवणीवरूनही १९०२ मध्ये टिळक हे क्रांतिकारकांचे एक प्रमुख नेते असल्याचें कळून येतें.

कलकत्त्यातील क्रांतिकारकांना मार्गदर्शन

१९०६ मध्ये शिवाजी उत्सवाच्या निमित्ताने टिळक कलकत्त्याला गेले असताना तेथील क्रांतिकारकांचे पहिले पुढारी बॅ. प्रमथ मित्र यांची त्यांनी दोन तीनदा भेट घेतली, असें दादासाहेब खापर्ड्यांच्या दैनंदिनीवरून समजतें. त्या प्रसंगी कदाचित् दरवड्याच्या प्रश्नाचीही चर्चा झाली असेल. कारण तो मार्ग प्रमथ मित्रांना रुचत नसला तरी त्यांच्या अनुशीलन समितीचे इतर सर्व नेते दरवड्याच्याच पक्षाचे होते. त्यामुळे त्यांनीही आपल्या अनुयायांना विरोध करण्याची कल्पना सोडून दिली होती. शिवाजी उत्सवानिमित्त कलकत्त्याला गेले असताना टिळकांनी तत्कालीन हिंदुस्थानाच्या राजधानीत सिनफेन पक्षाच्या वाङ्मयाचा प्रसार केला, असें श्यामसुंदर चक्रवर्तींनी 'आठवणी'च्या प्रथम खंडात लिहिलें आहे.

Tilak brought with him a large number of pamphlets containing the history of Sein Fein movement and caused them to be distributed among the huge audience. (पृ. ५०१)

टिळकांनी आपल्यासह सिनफेन पक्षाच्या इतिहासाच्या पुस्तिका आणल्या होत्या आणि त्या पुस्तिका त्यांनी कलकत्त्यातील सभेत वाटण्याची व्यवस्था केली. त्या वेळी आर्थर ग्रिफिथ्स यांनी आयर्लंडात सिनफेन पक्षाची नवीनच स्थापना केली होती. या पक्षाशी संबंध जोडून टिळकांनी त्यांचें वाङ्मय मिळविलें असावें. त्या वाङ्मयाच्या आधाराने टिळकांनी 'केसरी'त सिनफेन पक्षावर एक लेखमाला लिहिली होती. त्या लेखमालेचा इंग्रजी अनुवाद त्यांनी कलकत्त्यात वाटला असावा.

या उल्लेखावरून बंगाली क्रांतिकारकांना मार्गदर्शन आणि साहाय्य करण्यात टिळक किती तत्पर होते, याची कल्पना येईल. तसेंच विवेकानंदांनी टिळकांना बंगाल्यात येऊन तेथील तरुणांचें नेतृत्व करण्याची जी सूचना केली होती, ती त्या प्रांतात निवास न करताही ते कशी कृतीत आणीत असत, हें या प्रसंगाने कळून येतें. १९०७ च्या जुलैत केव्हातरी टिळक बंगाल्यात गेले होते, असें तेथील गुप्तहेर विभागाच्या एका प्रतिवृत्तावरून समजतें. याच्या आधी जूनमध्ये टिळकांनी दादासाहेब खापर्डे यांना काही महत्त्वाच्या कार्याकरिता पुणें येथे बोलावून घेतलें होतें. पण त्या कामाचा त्यांनी त्यांच्या दैनंदिनीत उल्लेख केलेला नाही. यातूनच टिळकांची कलकत्त्याची फेरी उद्भवली असेल. तत्कालीन घटनांशी परिचित असलेले क्रांतिकारक गोविंदराव बापट यांनी आपल्या आठवणीत लिहिलें आहे, " सिमला येथे 'प्रेस ॲक्ट' संमत करण्याची घिसाडघाई चालली होती. त्या वेळी तेथे अग्निगोलाचा उपयोग करण्याच्या प्रयत्नात आम्ही होतो. कोल्हापूरचे दामूअण्णा जोशी सिमल्याचे माहीतगार होते. त्यांनीही तें काम अंगीकारिलें होतें. पण पुढे कोठेतरी माशी शिंकून तें काम तसेंच विराम पावलें." इथे बापटांनी वृत्तपत्रनिर्बंधाचा जो उल्लेख केला आहे, तो चूक आहे. त्या वेळी सभाबंदीच्या निर्बंधाची भानगड उद्भवली होती. या प्रकरणी टिळकांनी कलकत्त्याच्या पुढाऱ्यांशी वाटाघाटी केल्या कीं काय न कळे.

क्षुदिरामचा अग्निगोल पुण्याचाच

३०-४-१९०८ या दिवशी क्षुदिरामने उडविलेला अग्निगोल पुण्याहूनच पाठविला होता, ही जी माहिती बापटांनी सांगितली आहे, ती खरी दिसते. ते म्हणतात: 'सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्यानंतर १९०८ चे जानेवारीत अरविंदबाबू पुण्यास आले. लोकमान्यांनी ठराविक माणसांकडून आम्हांस बोलावून नेऊन अरविंदबाबूंना अग्निगोलाचे प्रयोग दाखविण्यास सांगितलें. त्याप्रमाणे रात्री नवाच्या सुमाराला जेवणें झाल्यावर त्यांना प्रयोग करून दाखविला. त्यांना तो फारच रुचला. ते म्हणाले की नायट्रोग्लिसरिनसारखे पदार्थ आम्ही बनवितो. पण बाह्य कवच अजून आम्हांस साधलें नाही. त्यांनी मागितल्यावरून तें करण्याची कृति लिहून देऊन दोन पितळी कवचें, आतील दारू, अग्निगोल उडविण्याची कृति हें सर्व लिहून त्यांच्या स्वाधीन केलें.' अरविंदांनी पुण्याहून नेलेल्या वस्तु चारुचंद्र दत्तांनाही दाखविल्या होत्या आणि त्या टिळकांकडून मिळाल्याचा उल्लेखही त्यांनी आपल्या आठवणीत केला आहे.

कलकत्त्यात उल्हासकर दत्तांनी केलेले अग्निगोल सदोष असून अकस्मात् स्फोट होऊन माणसें दगावण्याचा धोका त्यात राहून गेला होता. याचा अनुभवही माणिकतोळ्याच्या कटवाल्यांना आला होता. त्यामुळे पुण्याहून आलेले सुरक्षित अग्निगोलच त्यांनी किंग्सफोर्ड महाशयांच्या शासनासाठी पाठविले होते. ८ मे या दिवशी मोर्लेनी सर जॉर्ज क्लार्क यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलें आहे:

The bombs are a disquieting feature ... I suppose Poona is more likely than Bengal for these diabolical operations.

लाजपतरायांना सीमापार केल्याचे परिणाम

लाजपतरायांना सीमापार करण्याच्या संबंधी 'मोर्ले-मिंटोकालीन भारत' या ग्रंथाचे कर्ते आचार्य दास लिहितात:

The Minto government faced its greatest danger from the terrorists. By 1907 the Punjab had been suspected as a centre of subversive activities with Lajpatrai as the leader, whom the Government had decided to deport. Lajpat's deportation was to serve as a lesson to other extremist leaders. Lamington, the Governor of Bombay, wrote to Minto, "Our leaders here are keeping very quiet, evidently the chance of a cheap journey to the farthest portions of the empire has no attractions when quietly conducted."

मिंटो सरकारला क्रांतिकारकांपासून सर्वांत अधिक भय होतें. १९०७ मध्ये पंजाब हें क्रांतिकारकांचें एक प्रमुख केंद्र असून लाजपतराय हे त्याचे नेते आहेत, अशी सरकारची समजूत झाली होती. म्हणून राजप्रतिनिधींनी त्यांना सीमापार करून मांडलेला नेऊन ठेविलें. या उदाहरणापासून इतर पुढाऱ्यांनी धडा घ्यावा अशी सरकारची अपेक्षा होती. या घटनेनंतर मुंबईच्या लॉर्ड लॅमिंग्टनने राजप्रतिनिधींना कळविलें. आमचे इथले पुढारी अगदी शांत आहेत. साम्राज्याच्या सीमेवरील प्रदेशाकडे स्वस्तात प्रवास करण्याची इच्छा त्यांना दिसत नाही.

खरे विधिविशारदांची आठवण

या वेळी टिळक काय करीत होते, हें पुण्यातील माझ्या परिचयाचे विधिविशारद कृष्णाजी गोपाळ खरे यांच्या आठवणीवरून वाचकांना कळून येईल. लालाजींना अटक झाल्यानंतर खरे आणि त्यांचे मित्र यांना वाटू लागलें की, अशा प्रकारे प्रजेच्या पुढाऱ्यांना अन्यायाने अटक

करणाऱ्यांना अग्निगोलांनीच उत्तर दिलें पाहिजे. पण याचा देशातील राजकारणावर दुष्परिणाम होईल काय, अशी शंका येऊन ते आपल्या एक दोन मित्रांसह टिळकांच्याकडे आले. तेव्हा त्यांच्याशी टिळकांनी तीन तास चर्चा करून त्यांना समजावून दिलें की, लोकजागृतीकरिता उघड चळवळ चालविणें हेंच प्रमुख कार्य असलें तरी प्रत्याघाताच्या स्वरूपाचीं काही कृत्यं अधून मधून घडणें आवश्यक आहे. कारण त्यावाचून काही लोकांचा निश्चय आणि निग्रह अटळ रहात नाही. यानंतर खऱ्यांनी अग्निगोल करण्याच्या कार्याला स्वतःला वाहून घेतलें, ही गोष्ट सुविदित आहे.

बिपिनबाबूंना निर्वासित करण्याची मागणी

लाजपतरायांना निर्वासित केल्यानंतर मद्रासचे राज्यपाल आर्थर-लाली यांनी बिपिनचंद्र पाल यांना निर्वासित करण्याची लॉर्ड मिंटो यांच्याकडे मागणी केली. कारण त्या वेळी पालमहाशयांच्या वक्तृत्वाचा तोफखाना सागरगर्जनांशी स्पर्धा करीत मद्रासनगरावर आग ओकीत होता. त्या दिवसांत स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, वंग-भंग इत्यादि विषयांवर बिपिनबाबूंनी केलेलीं भाषणें किती प्रभावी झालीं होतीं, हें लंडनच्या मेघनादानेही (लंडन टाइम्स) त्यांची निर्मत्सर मनाने स्तुति केली होती, यावरून कळून येईल. तेव्हा मद्रासेच्या राज्यपालांनी त्यांना निर्वासित करण्याची मागणी करणें स्वाभाविक होतें. सरकारच्या विधिविशारदांनी त्यांच्याविरुद्ध राजद्रोहाचा अभियोग चालविण्याची सूचना केली. पण परप्रांतांतील पुढाऱ्यांवरील अभियोगाचा उपद्रव आपल्यामागे लावून घेण्यापेक्षा त्यांना निर्वासित करणें अधिक सोयीचें. त्यामुळे राज्यपालांनी ती सूचना फेटाळली. पश्चिम बंगालचे दुय्यम राज्यपाल सर अँड्र्यू फ्रेजर यांनीही राजद्रोहाच्या खटल्याला विरोध केला. त्यांनी सांगितलें की, कलकत्त्यातील पंच बिपिनबाबूंना दोषी ठरवितील असा भरंवसा मला नाही. तेव्हा फ्रेजर, लाली आणि मिंटो या सर्वांनी मिळून पाल महाशयांना लालाजींच्या मार्गाने पाठवावयाचें ठरविलें होतें. पण लॉर्ड मोर्ले यांनी निकडीचा संदेश पाठवून त्यांच्या कारस्थानांना खीळ घातली. पुढे अरविंदांच्या वरील राजद्रोहाचा आरोप सिद्ध करण्याकरिता बिपिनबाबूंनी साक्ष देण्याचें नाकारल्यामुळे त्यांना षण्मासाची शिक्षा झाली.

टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्याचा विचार

१९०७ मध्ये लाजपतरायांना ब्रह्मदेशात स्थानबद्ध करून ठेवल्या-

नंतर सरकारने अरविंद आणि पाल यांच्यावर जसे कुजके आरोप ठेवून त्यांना बंदिशालेत डांबण्याचा प्रयत्न केला, त्याप्रमाणेच टिळकांवरही 'इंग्रज कोठावळ्याचा रशियन जुलूम' या लेखावरून राजद्रोहाचा आरोप ठेवावा, असें लॉर्ड लॅमिंग्टन यांच्या मनात फार होतें. या वेळी 'आमच्या प्रांतातील पुढारी चूपचाप बसले असल्याचा' कुत्सित उल्लेख त्यांनी लॉर्ड मिंटो यांना लिहिलेल्या पत्रात केला होताच. याच वेळी जूनच्या प्रारंभी टिळकांनी काही विशेष चर्चेकरिता दादासाहेब खापर्डे यांना तारेने बोलावून घेतलें होतें. १९०६ आणि १९०७ या दोन वर्षांच्या जूनमध्ये कलकत्त्यात बंगाली क्रांतिकारकांचीं गुप्त संमेलनें भरलीं होतीं. यांपैकी १९०६ च्या संमेलनाच्या प्रसंगी शिवाजी उत्सवाच्या निमित्ताने टिळक, खापर्डे, मुंजे हे सर्वच कलकत्त्यात होते. १९०७ च्या शिवाजी उत्सवात टिळकांचें पुण्यात भाषण झालें. त्यानंतर जुलैच्या प्रारंभी त्यांचें कलकत्त्यात व्याख्यान झाल्याचा उल्लेख कलकत्त्याचे कंटकसंशोधनप्रमुख डेनहॅम यांच्या प्रतिवृत्तात आढळतो. या वेळी काही विशेष साहसाची योजना ठरविण्याकरिता टिळक तेथे गेले असावेत. कारण वर उल्लेखिलेल्या लेखात त्यांनी स्पष्टपणे लिहिलें आहे : "लाला लाजपतराय किंवा बिपिनचंद्र पाल यांनी काबूलच्या अमिराला भेटून त्यास हिंदुस्थानावर स्वारी करण्यास सांगितलें, असल्या खोटचा-नाटचा गप्पा विलायतच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करून साम्राज्याचा यत्किंचित् लाभ व्हावयाचा नाही. सरकार विहिरीत विष घालून प्लेगचा रोग वाढविते अशी कंडी पिकविणाऱ्या अडाणी लोकांस कडक शिक्षा झाली पाहिजे, असें जर आम्ही म्हणतो तर १८५७ प्रमाणे हिंदुस्थानात आता बंड होणार आहे, किंवा लाला लाजपतराय अमिरास भेटले आहेत इत्यादि खोटचा कंड्या विलायतेत पसरविणाऱ्या शाहण्यासुर्त्या लोकांस शतपट अधिक शिक्षा व्हावयास नकोत काय ? पण मौज अशी की मोर्ले महाशय त्यांचा नुसता निषेधसुद्धा करीत नाहीत.... ही भयंकर स्थिति राजा आणि प्रजा दोघांसही हितकारक नाही.... राष्ट्रातील लोकांस कोणती तरी दिशा नित्याची स्वीकारण्याची वेळ आली आहे आणि ती दिशा शांततेची आणि सनदशीर अथवा कायदेशीर भांडणाची असावी, अशी जर सरकारची इच्छा असेल तर तसें घडवून आणणें सर्वस्वी सरकारच्या हातात आहे." (१३–८–१९०७) या लेखातील शेवटच्या प्रच्छन्न धमकीचा अर्थ उघड आहे. प्रजेने रशियन क्रांतिकारकांचा मार्ग स्वीकारावा कीं नाही, हें सरकारनेच ठर-

वावें. या धमकीच्या निमित्ताने टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्याचा सरकारचा संकल्प विधितज्ज्ञांच्या प्रतिकूल अभिप्रायामुळे फोल झाला. या वेळी गुजरानवाला येथील साप्ताहिक 'इंडिया'पत्रात पिंडीदास यांनी अमेरिकेतील अफगाण आणि भारतीय नागरिकांनी सैनिकांना उद्देशून एक अनावृत पत्र प्रसिद्ध करून त्यांना स्वराज्यसंपादनाप्रीत्यर्थ उठावणी करण्याची चिथावणी दिली होती, त्याचा उतारा छापला होता. या अनावृत पत्राच्या प्रती काही सैनिकांच्या झडतीत सापडल्याही होत्या. या प्रकरणी पिंडीदासांना राजद्रोहानिमित्त शिक्षाही झाली होती. पण टिळकांनी त्यांचा लेख लिहिला, तेव्हा त्यांना या गोष्टी अविदित असतील.

फुल्लरवधाचे प्रयत्न

भारतीय क्रांतिकारकांनी लॉर्ड कर्झन यांचा वध कोणत्या विशिष्ट कारणाकरिता करावयाचें ठरविलें होतें, याचा उल्लेख कोठे आढळत नाही. पण ते निजधामाला गेल्यानंतर त्यांनीच पूर्वबंगालच्या दुय्यम राज्यपालपदावर नियुक्त केलेले आणि मुद्राराक्षसातील अमात्य राक्षसाप्रमाणे 'भर्तुर्ये प्रलयेऽपि पूर्वसुकृतासंगेन निःसंगथा। भक्त्या कार्यधुरं वहन्ति कृतिनो ते दुर्लभास्त्वादृशाः ॥' अशा निष्ठेने निजधामाला गेलेल्या प्रभूंच्या धोरणाची निर्धाराने बजावणी करणाऱ्या सर बॉंफील्ड फुल्लर यांचा वध करण्याचा संकल्प कां सुटला होता, हें सुरेंद्रनाथ बानर्जींनी त्यांच्या आत्मचरित्रात सांगितलें आहे.

We have formed a plan to shoot Fuller and we are going tonight for this purpose. The immediate cause of provocation they said was his gurkhas stationed at Banaripara have been outraging some of our women and we want to take revenge upon him. We will take our chance and, if need be, suffer for the honour of our women.

एके दिवशी काही क्रांतिकारक तरुण सुरेंद्रनाथांच्याकडे आले आणि म्हणू लागले, की फुल्लरने आमच्या नगरावर आणि ग्रामांवर गुरखे सैनिक मोकाट सोडले आहेत आणि बनारीपाड्यांतील स्त्रियांवर त्यांनी बलात्कार केले आहेत. तेव्हा आम्ही त्याला मारणार, निदान आमच्या भगिनींच्या हालअपेष्टा थांबविण्याकरिता आम्ही आमच्यावर हालअपेष्टा ओढवून घेणार. पण त्या वेळी फुल्लरमहाशयांनी त्यागपत्र दिल्याची वार्ता सुरेंद्रनाथांना कळली असल्याने त्यांनी त्या तरुणांना

मृतमारणापासून परावृत्त केलें. क्रांतिकारकांनी फुल्लरमहाशयांना मारलें असतें तर मिंटोमोर्ले या दुक्कलीला बरेंच वाटलें असतें. कारण लॉर्ड मिंटोंनी भारतसचिवांना लिहिलें होतें की, लॉर्ड कर्झन त्यांच्या भारतातील हस्तकांशी पत्रव्यवहार करून (अर्थात् फुल्लरमहाशयाशी) येथील कारभारात ढवळाढवळ करीत आहेत. त्या वेळी बंगाली नेत्यांचेंही तसेंच मत होतें. वंगभंगाचीं पहिलीं कारस्थानें १९०३ च्या जानेवारीतील सामंतसंमेलनानंतर फुल्लर आणि कर्झनचें सरकार यांच्यातच झालीं. त्या वेळी सर बाँफील्ड हे आसाम प्रांताचे अधिपति होते. तेव्हा भारतीय राजकारणात लॉर्ड कर्झन यांचे वारस म्हणूनच बंगाली क्रांतिकारकांनी फुल्लर यांचा वध करावयाचें ठरविलें होतें. उल्हासकर दत्तांचा पहिला अग्निगोल सिद्ध झाल्यानंतर क्रांतिकारकांचे नेते बारींद्रकुमार हे स्वतः तो घेऊन सुरेंद्रनाथांकडे गेले असता त्यांनी आपल्या यज्ञोपवीताला स्पर्श करून त्या अग्निगोलाला आशीर्वाद दिला आणि त्या अस्त्रानेच फुल्लरवध करण्याचा आदेश दिला. हा वध करण्याकरिता त्यांनी बारींद्राला सहस्र रुपये आधी देऊन यश मिळाल्यास आणखी सप्त सहस्र रुपये देण्याचें वचनही दिलें होतें. पण तो धूर्त पक्षी बारींद्राच्या जाळ्यात सापडला नाही. तेव्हा सुरेंद्रांनी बारींद्रकुमारांचे कान धरून त्यांच्याकडून सहस्र रुपये मोजून परत घेतले. ही कथा बाबूजींचें नांव न घेता बारींद्रांनी आत्मचरित्रात लिहिली आहे. अशा सुरेंद्रनाथांनी त्यागपत्र दिलेल्या सर बाँफील्डच्या वधाला विरोध केला, ही त्यांनी आत्मचरित्रात लिहिलेली कथा सत्यच असली पाहिजे. कारण राजकीय दृष्ट्या मृतप्राय झालेल्या फुल्लरच्या वधाची तेव्हा आवश्यकता उरली नव्हती आणि हीं मुलें आपल्याशी एकनिष्ठ राहिलीं, त्यांनी 'सरकारी साक्षीदार निर्माण करण्याच्या गिरणीत' अर्थात् रक्षकांच्या तावडीतही आपलें नांव घेतलें नाही, तरीही तीं यशस्वी झाल्यास त्यांचे सात सहस्र रुपये जाणार होते. फुल्लरवधानंतर सुरेंद्रनाथांनी बारींद्राला सप्त सहस्र रुपये देऊ केले होते, असें विवेकानंदांचे बंधु भूपेंद्रनाथ दत्तांनी आपल्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासात लिहिलें आहे.

अग्नियुगाचा प्रवर्तक क्षुदिराम बसु

क्षुदिराम फाशी गेला तेव्हा तो अवघा अठरा वर्षांचा असला तरी त्याने गीतेचें अध्ययन केलें होतें आणि गीतेवर त्याची पूर्ण श्रद्धा होती. शिक्षा सांगितल्यानंतर त्याला त्याच्या विधिविशारदांनी विचारलें, 'तुला भय नाही का वाटत?' 'नाही. मी गीता वाचली आहे. मला भय नाही.

वाटत.' बंदिशाळेत त्याला कोणी बिहारी तरुण, अधिकाऱ्यांच्या ओळखीने चोरून भेटले होते, तेव्हा त्याने त्यांना गीता वाचण्याचा आणि बिपिनचंद्र पाल यांना भेटण्याचा उपदेश केला होता. त्यावरून त्याच्या मनावर, शुभ्र बोकड कालीमातेला बळी देण्याचा उपदेश करणाऱ्या विपिनबाबूंच्या परिचयाचा पुष्कळच प्रभाव झालेला दिसतो. क्षुदिरामचा टिळकांशी कधी संबंध आला नसला तरी त्यांच्या गीतेप्रमाणेच त्यांच्या 'केसरी'चाही (हिंदी आवृत्ति) तो भक्त होता. ३०-४-१९०८ या दिवशी पहिला अग्निगोल फेकून गोऱ्या लोकांचा वध करणाऱ्या या तरुणाने १९०६ मध्येच भारतीय राजकारणात केवढी खळबळ उडवून दिली होती, याची वर्तमानकाळी कोणालाच वार्ता नाही. १९०६ मध्ये क्षुदिराम आणि त्याच्याप्रमाणेच पुढे फाशी गेलेले सत्येन्द्र बसु या उभयतांनी मिळून 'सोनार बांग्ला' ही सुप्रसिद्ध पत्रिका लोकांत प्रसृत करून बंगाली तरुणांना क्रांतिकार्याकरिता दरवडे घालण्याचा उपदेश केला होता. १९०६ च्या वसंतात मिदनापूर येथील स्वदेशी प्रदर्शनात ही पत्रिका वाटण्याच्या निमित्ताने तेव्हाच सरकारने त्यांच्याविरुद्ध राजद्रोहाचा अभियोग आणला होता. या प्रकरणी रक्षकांनी त्याला प्रथम पकडलें असता त्यांच्या हाताला हिसडा देऊन तो निसटून गेला. पुन्हा पकडल्यानंतर न्यायालयात आणल्यावर तो अल्पवयी बालक असल्याचें दिसून आल्यामुळे सरकारने त्याच्यावरील अभियोग पुढे चालविला नाही. 'टिळक आणि भारतीय स्वातंत्र्याचा लढा' या ग्रंथात रशियन लेखकांनी एकत्रित केलेल्या माहितीत 'सोनार बांग्ला'चा उल्लेख करून त्यांनी लिहिलें आहे :

The British authorities republished a leaflet exorting the Indians to unite and drive the colonialists. The Pioneer in reply to the call to throw the British into the Ganges said, 'we would descend upon them with fire and sword and we would shoot and hang as remorselessly as in 1857 or perhaps even more so.

(सप्टेंबर १९०६)

इंग्रज सरकारने काही मासांनंतर क्रांतिकारकांची दुष्कीर्ति करण्याकरिता आपण स्वतःच हें पत्रक प्रसिद्ध केलें. या पत्रकात गोऱ्यांना गंगेत लोटून देण्याचाही उपदेश केलेला पाहून पिसाळलेल्या प्रयागच्या 'पायोनिअर' या इंग्रजांच्या प्रमुख पत्राने १८५७ च्या पेक्षा अधिक क्रूरपणाने साऱ्या बंगाल प्रांताचें खांडववन करून तेथील लोकांचा सार्वत्रिक संहार करण्याची धमकी दिली होती. १९०६ च्या उत्तरार्धांत

या पत्रकाची चर्चा चालू असताना बिपिनबाबूंनी 'वंदेमातरम्' दैनिकात या पत्रकावर कडक टीका केली. पण ही टीका क्रांतिकारकांच्या ठरलेल्या धोरणाविरुद्ध असल्याने त्या दैनिकाच्या चालकांनी बिपिनबाबूंना निरोप दिला. या प्रसंगापासून बिपिनबाबू क्रमशः सौम्य बनत गेले. अशा प्रकारे १९०६ मध्येच इंग्रजांचें व्याघ्रस्वरूप आणि बिपिनबाबूंचें वैष्णवस्वरूप उजेडात आणण्याचें कार्य क्षुदिरामच्या पत्रकाने केलें होतें. 'सोनार बांग्ला' पत्रकात प्रतिपादल्याप्रमाणे वर्तन करण्याचा प्रयत्न क्षुदिरामने एकदाच केला होता. १९०७ च्या दुर्गापूजेच्या दिवसांत त्यांनी एका डाकदूतावर डाका घालून त्याच्या हातातील पत्रांची पिशवी पळविली होती. पण त्या लुटीत त्यांना फारसें धन मिळालें नसावें.

अरविंदांचें पत्र

या दिवसांत अरविंदांचें मन अत्यंत प्रक्षुब्ध झालें होतें. त्यांनी आपल्या पत्नीला लिहिलें, 'आमि स्वदेशके मा बलिया जानि, भक्ति करि, पूजा करि, मार बुकेर उपर बसिया जदि एकटा राक्षस रक्तपाने उद्यत होय, ताहा हइले छेले कि करे? निश्चिन्त भावे आहार करिते बसे, स्त्रीपुत्रेर संगे आमोद करिते बसे, ना माके उद्धार करिते दौडाइयी जाय?' म्हणजे मातेच्या छातीवर बसून कोणी राक्षस रक्तपान करता असला, तर मुलाने स्त्रीपुत्रांच्या संगतीत विलास करावेत का मातेचा उद्धार करण्याकरिता धावावें?' हाच मातृमोचनाप्रीत्यर्थ धावण्याचा आणि किंग्स्फोर्ड राक्षसाला मारण्याचा आदेश १९०८ च्या एप्रिलमध्ये क्षुदिराम आणि प्रफुल्ल चाकी यांना क्रांतिकारकांच्या केंद्रसमितीने दिला. या आदेशावर इतर दोन नेत्यांसह अरविंदांचीही स्वाक्षरी होती. अरविंद आपली स्वाक्षरी 'काली' या नांवाने करीत, हें इथे सांगितलें पाहिजे. खरें म्हणजे अरविंदांनी केवळ कृतज्ञतेमुळे तरी किंग्स्फोर्डला मारण्याचा आदेश द्यावयाला नको होता. कारण १९०७ मध्ये स्वतः अरविंदांवरच राजद्रोहाचा आरोप ठेविला असता किंग्स्फोर्ड महाशयांनीच त्यांना निर्दोषी म्हणून सोडलें होतें. आणि ज्या 'युगांतरा'तील उतारे 'वंदेमातरम्' मध्ये छापल्यावरून हें प्रकरण उद्भवलें होतें, त्या 'युगांतरा'चा नेहमीचा सूर राजद्रोही नाही, असाही त्यांनी अभिप्राय दिला होता. पण अरविंदांवरील अभियोगात बिपिनचंद्रांनी साक्ष देण्याचें नाकारल्यामुळे त्यांच्याविरुद्ध न्यायालयाच्या मानहानीचा अभियोग चालवून त्यांना त्यांनी षण्मासाची शिक्षा दिली आणि ज्यांना राजद्रोही भाषणासाठी शासन करणें सरकारला शक्य झालें नव्हतें, त्यांना न्याया-

लयात मौन धारण करण्याकरिता शासन केलें. तेव्हाच्या निदर्शनात गोऱ्या रक्षक अधिकाऱ्यांनी घोडे घातले असताना सुशीलकुमार सेन नामक एका किशोर विद्यार्थ्याने घोड्यावर उडी मारून त्या अधिकाऱ्यावर आक्रमण केल्याच्या आरोपावरून किंग्स्फोर्ड न्यायाधीशांनी त्या मुलाला न्यायालयासन्निधच पंधरा फटके मारण्याची शिक्षा दिली. फटके खाऊन तो मुलगा बेशुद्ध पडला. त्यानंतर या अघोर अत्याचाराविरुद्ध 'संध्या' दैनिकाचे संपादक ब्रह्मबांधव उपाध्याय यांनी 'कसाई काजी किंग्स्फोर्ड' यांच्यावर प्रक्षोभक लेख लिहून प्रचार चालविला असता त्यांच्यावरच सरकारने राजद्रोहाचा आरोप ठेविला. या अटकेत चौकशी पुरी होण्यापूर्वीच ब्रह्मबांधव अंतर्गळाच्या विकाराने कारागृहातूनच यमसदनी गेले, तेव्हा किंग्स्फोर्ड यमसदनी गेला पाहिजे, असा वंग क्रांतिकारकांनी आग्रह धरला. कारण ब्रह्मबांधवांनी सरकारला स्पष्ट शब्दांत धोक्याची सूचना दिली होती की, वृत्तपत्रांवर राजद्रोहाचे आरोप ठेवणें म्हणजे नागराजाच्या पुच्छावर पाय देणेंच आहे, या कृतीने अभियोग चालविणाऱ्यांचें मरण ओढवल्यावाचून राहणार नाही.

क्रांतिकारकांचा विनिपात

वर उल्लेख केल्याप्रमाणे किंग्स्फोर्डला मारावयाचा प्रयत्न करावयाला शंभर निमित्तें झालीं असतील. तरीसुद्धा हा प्रश्न उरतोच की तें कृत्य शहाणपणाचें होतें कीं नाही? अर्थात् नाही. त्याचें कारण असें आहे की, युद्धाला प्रारंभ करणें आपल्या हाती असलें तर शत्रूची अधिकात अधिक हानि ज्या कृतीने होईल, अशी कृति करून युद्धारंभ करावा. चाफेकरांनी रँडवध केला, तो इंग्रजविरोधी युद्धाची प्रस्तावना म्हणून केला नव्हता. केवळ पुण्यातील अत्याचारांचा स्थानिक सूड आणि त्याच क्षणी राणीच्या हीरकमहोत्सवाला एक अपशकुन, या नात्याने केला होता, तरीसुद्धा त्यांनी एखाद्या सामान्य गोऱ्या सैनिकाला न मारता त्या सैनिकांकडून नागरिकांचा छळ करविणाऱ्या रँडमहाशयांचाच वध केला होता. त्याच्या उलट युगांतर समितीच्या नेत्यांनी वर वर्णिल्याप्रमाणें प्रथम कर्झनवधाचा प्रयत्न केला. तो साधला नाही, तेव्हा त्यांनी प्रतिकर्झन फुल्लर याच्याकडे आपली वक्रदृष्टि वळविली. तोही अकस्मात् त्यागपत्र देऊन निघून गेल्यानंतर वंगभंगातील कर्झनचे दुसरे भागीदार सर अँड्र्यू फ्रेजर (पश्चिम बंगालचे दुय्यम राज्यपाल) यांचा त्यांनी पाठलाग आरंभिला. तोही प्रयत्न फसल्यानंतर त्यांनी किंग्स्फोर्ड याला मारण्याकरिता क्षुदिराम आणि प्रफुल्ल यांची नेमणूक केली. या

उभयतांनी तेथील स्थानिक लोकांचें साहाय्य न मिळविता जी कृति केली, तिच्यामुळे एका इंग्रज विधिविशारदाची पत्नी आणि कन्या या मात्र परलोकी गेल्या. ‘ शिरः शार्वं स्वर्गात् पतति शिरसस्तत्क्षितिधरम् । महीध्रादुत्तुंगादवनिमवनेश्चापि जलधिम् ।। अधो गंगा सेयं, पदमुपगता स्तोकमथवा । विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः ।।’ या श्लोकात वर्णिलेल्या गंगेच्या अधःपाताप्रमाणे युगांतरसमितीचा हा जो विनिपात घडत गेला, त्याचे परिणाम भारतीय राजकारणावर फार गंभीर झाले आहेत. अशा प्रकारे पूर्वीचें धोरण सोडून अधिकाऱ्यांच्या वधाचा कार्यक्रम हाती घेण्याला महाराष्ट्रीय क्रांतिकारकांचा विरोध होता, हें हेमचंद्र दास यांनी आपल्या विप्लवप्रचेष्टा या ग्रंथात लिहून ठेविलें आहे. इंग्रजींत एक म्हण आहे. Not failure, but low aim is crime या सूत्राप्रमाणे आपलें उद्दिष्ट खाली आणण्याचा अपराध या प्रसंगी झाला आहे, असें म्हणावें लागतें. अशा प्रकारे खालच्या अधिकाऱ्यांच्या वधाचा एकदा उपक्रम झाला की, स्थानिक गटांवर केंद्राचें नियंत्रण रहात नाही आणि त्यामुळे एकंदर कार्याचा विचका होतो. असाच महाराष्ट्रातील कार्याचा विचका पुढे नाशिक येथील जॅक्सनवधानंतर झाला. आता ही गोष्ट सत्य आहे की शस्त्राचारी व्यक्ति नेहमीच उतावीळ असतात. कारण आपल्या मार्गातील कंटक सत्वर नष्ट करण्याकरिताच मानवाने शस्त्रांचा शोध लाविला आहे. यासाठीच शस्त्रधारी सैनिकांना अतिशय कडक शिस्त लावावी लागते. नाही तर सशस्त्र सैनिकांचेंच अराजक निर्माण होतें. बंगाल्यातील क्रांतिकारकांचें त्या दिवसांत इंग्रजांनी ‘अनार्किस्ट’ म्हणजे अराजकवादी असें वर्णन केलें. या आरोपाचा प्रतिवाद तेव्हा टिळकांनी आणि सावरकरांनीही प्रभावीपणाने केला. क्रांतिकारकांची विचारसरणी अराजकवादी नव्हती. पण त्यांच्या कृतीमुळे अराजक निर्माण होण्याचा धोका दिसत होता, ही गोष्ट सत्य होती. बंगाल्यातील क्रांतिकारकांच्या संस्थांपैकी अनुशीलन समिति ही आपल्या सभासदांना कडक शिस्त लावण्याबद्दल प्रसिद्ध होती. या समितीने १९०८ पासून चालू झालेल्या अधिकारीवधाच्या कार्यक्रमात भाग घेतला नाही. अरविंदांचे साक्षात् शिष्य सारे अनुशीलनसमितीमधून फुटून त्यांच्या युगांतर गटात समाविष्ट झाले होते. या फुटीर गटाच्या कृतीमुळे स्वदेशी बहिष्काराचें आंदोलन अकाली बंद पडलें आणि लॉर्ड मिंटो यांनी मुसलमानांना आणि गोखल्यांना देशद्रोह करण्याची प्रेरणा देऊन मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ अस्तित्वात आणले आणि भारताची फाळणी अपरिहार्य करून ठेविली. अरविंदांच्या अनु-

यायांनी अकाली केलेल्या कृतीमुळे आणि गोखल्यांच्या देशद्रोहामुळे वंगभंगविरोधी आंदोलनाचें अंतिम पर्यवसान भारतभंगात झालें.

मुजफरपूरच्या हुतात्म्यासंबंधी सावरकरांचें पत्रक

भारताच्या अग्नियुगांतील पहिले हुतात्मे क्षुदिराम आणि प्रफुल्ल यांच्या मृत्यूनंतर सावरकरांनी काढलेलें पत्रक अहलुवालिया यांनी त्यांच्या 'Freedom Struggle in India 1858—1909 या ग्रंथातील परिशिष्टात प्रसिद्ध केलें आहे. या अत्यंत ओजस्वी पत्रकावरून अग्नियुगाच्या उपक्रमामुळे देशांतील तरुणांचीं मनें स्वातंत्र्याच्या चिदाकाशात कशीं भराऱ्या मारू लागलीं याची यथार्थ कल्पना येते. या पत्रकाच्या प्रारंभी मिल्लच्या 'लिबर्टी' या ग्रंथातील पुढील अवतरण घेतलें आहे. "एखाद्या अन्यायी व्यक्तीने समाजांत प्रचलित असलेले विधिनिर्बंध आपल्याला कसलेंही शासन करू शकणार नाहीत, असें अत्युच्च पद प्राप्त करून घेतलें असलें तर त्याचा वध करण्याने कोणाही नागरिकाला पाप लागत नाही, उलट पुण्यच लाभतें, असेंच सर्व राष्ट्रांचें, तसेंच विद्वत्तेने, साधुत्वाने श्रेष्ठ असलेल्या व्यक्तींच्या बहुमताचें मत आहे."

स्वातंत्र्यपथावरील शंकाकुशंका

'स्वतंत्रता देवीच्या कृपाप्रसादाने माझें हृदय जेव्हा अत्युच्च वातावरणात स्वैर विहार करू लागलें, तेव्हा तें दास्याच्या कर्दमापासून सर्वस्वी मुक्त झालें. पण स्वतंत्रतेच्या चिदाकाशात भराऱ्या मारण्याचें सामर्थ्य माझ्या अंगी बाणलें नसल्यामुळे मला सत्वरच निराशेने ग्रासलें. आत्म्याला स्वस्वरूपाची जाणीव देणारे दिव्य क्षण नेहमीच थोडे असतात आणि ते दिव्य क्षण अनेकदा सभोवतालच्या दास्यदौर्बल्यदायक वातावरणात निरर्थक आणि निरुपयोगी भासतात. आमचे धूर्त शत्रु कानीकपाळी असा घोष करीत आहेत की, इतर राष्ट्रें पराकाष्ठेचीं बलाढ्य असून हिंदुस्थान देश मात्र निःशस्त्र आणि निर्बल आहे. असें असल्यास माझ्या देशाला या जगात जीवनहेतुच उरला नाही कीं काय? भारताने आपलें भावी जीवन या दास्यकर्दमात सडण्यातच घालवावयाचें कीं काय? नाही. माझ्या राष्ट्रमातेच्या कुक्षीत आज नवजीवनाची निर्मिति होत आहे. माझ्या वीर देशबांधवांच्या हातून राष्ट्राकरिता आत्मोत्सर्गाचीं कृत्यें घडून आलीं तर माझी राष्ट्रमाता स्वतंत्र होईलच. माझ्या मातेसाठी आत्मोत्सर्ग करून तिला स्वातंत्र्यप्राप्ति करून देण्याच्या महदाकांक्षेने माझेही मन भारलें जातें. पण बुद्धिवादी लोक सांगतात की,

हें सारें भ्रमिष्ट स्वप्न आहे. एके काळीं तुझा भारत शौर्यवीर्यपराक्रमांनी संपन्न अशा मानधन नागरिकांनी भूषविला असेल. पण न जाणो तो उज्ज्वल इतिहास आज केवळ नामशेष झाला असेल.

दिव्य स्वप्नें आणि वस्तुस्थिति

स्वदेशाचा इतिहास मी अभ्यासिला आणि माझ्या पूर्वजांच्या पराक्रमांचा, वैभवाचा आणि राष्ट्राच्या अस्मितेकरिता त्यांनी केलेल्या आत्मयज्ञाचा मला साक्षात्कार झाला. पण तेवढ्याने वर्तमानकालीन देशबांधवांवर विश्वास ठेवण्याला माझें मन सिद्ध होईना. माझी भारत-माता एके काळी तत्त्वज्ञानात अग्रणी, सुधारणेत शिरोमणी, यज्ञप्रक्रियेची पुण्यभूमि आणि वीरांची जन्मभूमि होती. पण वर्तमानकाळी सभोवती कोणतीं दृश्यें दिसत आहेत ? आता जिकडे पहावें तिकडे बेड्या आणि फांस, परदास्याचा पंक आणि नरकयातना. त्यातच परशत्रूंनी केलेली प्रवंचनेची धूळफेक आणि त्या धुसर धूलीचीच आंधी. या धुळीतच माझी भारतमाता निराशेने वेडी होऊन 'गडबडा धरणीवरि लोळते,' असें दृश्य दिसून येतें. अशा अवस्थेत भारतीय सैनिक हा सैतानी शक्तींनी तिच्यावर नेमलेला संत्री या नात्याने पहारा करीत असलेला आढळून येतो. मी परदेशांचे इतिहास अभ्यासिले. या देशांनी दास्यतमातून स्वातंत्र्याचें तेज निर्माण केलें, दास्यात सडून मरणोन्मुख झालेल्या समाजांनाही त्यांनी नवजीवन प्राप्त करून दिलें. पण या इतिहासांनी रणा-वीण स्वातंत्र्य कोणा मिळालें, हा स्वातंत्र्यप्राप्तीचा मंत्र मला दिला तरी त्या पंथाने प्रगति करण्याचें सामर्थ्य माझ्या राष्ट्रात आहे, असा आत्मविश्वास मला वाटेना. विल्हेल्म टेल, गारिबाल्दी अथवा बिस्मार्क यांचीं चरित्रें वाचून, सहस्रावधि वर्षांच्या अमानुष छळाने हीन दीन झालेले माझे देशबांधव माझिनीप्रणीत मार्गाने आत्मयज्ञ करून स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याला समर्थ होतील, अशी माझ्या मनाची निश्चिति होईना.

रणरागिणीचा निनाद

वस्तुतः पाहता माझ्या शंकाच निरर्थक आणि निर्मूल होत्या. माझा समाज जर खरोखरीच पूर्णपणे विघटित झाला असता आणि सडून गेला असता तर माझें मन असें स्वातंत्र्यतृष्णेने व्याकुल होऊन सैरावैरा धावत सुटलेंच नसतें. तरीसुद्धा दुर्धर भविष्यकाळाचें चित्र डोळ्यापुढे येऊन या हताश परिस्थितीचें अवलोकन करीत मी स्थाणू-

प्रमाणे अचल राहिलो होतो. माझें हृदय विदीर्ण झालें होतें. उद्विग्न आणि उन्मनस्क होऊन मी स्वतःलाच प्रश्न विचारीत होतो. 'या मरणोन्मुख मातेच्या क्षीण तनूत अद्यापि काही जीवनाचीं लक्षणें दिसत आहेत काय? इतक्यात एका अद्‌भुत चेतोहर आणि अविस्मरणीय स्वरांनी झंकृत अशा रणरागिणीचा निनाद कानावर कोसळला आणि अनंत अंबरांतून प्रफुल्ल, क्षुदिराम हाच घोष ऐकू येऊ लागला. माझें राष्ट्र अजून जिवंत आहे तर! माझ्या पूर्वजांचें पुण्य अजून अक्षीण आहे तर! ऋषींच्या या पुण्यभूमीचें अद्यापि स्मशान झालेलें नाही. माझी मातृभूमि अजूनही वीरप्रसू आहे. कारण इथेच क्षुदिराम जन्मला आणि इथेच प्रफुल्ल चाकी आत्मार्पण करून अमर झाला.

माझे क्षुदिराम, प्रफुल्ल

हे उभयता माझेच राष्ट्रबांधव आहेत. त्यांनी माझ्या राष्ट्रात स्वातंत्र्यप्रेम निर्माण केलें आहे, इतकेंच नव्हे, (हें स्वातंत्र्यप्रेम अन्य देशांच्या इतिहासवाचनानेही निर्माण झालें असतें.) त्यांनी माझ्या देशबांधवांत अग्निदिव्य करण्याची सहनशक्ति असल्याचेंही सिद्ध केलें आहे आणि या नरमेधात आपली आहुति देऊन माझ्या राष्ट्राला दिव्यत्व आणि अमरत्व प्राप्त करून दिलें आहे. माझ्या मातेच्या कुक्षीतच त्यांचा जन्म झाला. आपल्या राष्ट्राला निर्वीर्य करून सोडणाऱ्या गौर साम्राज्यवादाच्या, छळाच्या छायेतच ते वाढले. आमचीच भाषा ते बोलत होते, आमच्याच संस्कृतीने त्यांचें संगोपन केलें होतें. आमच्याच गीतेपासून आणि उपनिषदांपासून त्यांना प्रेरणा प्राप्त झाली होती. त्यांनी आम्हांला जो जीवनसंदेश दिला आहे, तो नापोलेओंच्या (नेपोलियनच्या) सुप्रसिद्ध विजयांहून मुळीच अल्पमोलाचा नाहीं. हृदयाला उचंबळविणारें हें संगीत, हेंच कर्मयोगातील खरें कर्म होय.

बौद्धिक नपुंसकतेचा उच्छेद

क्षुदिराम, बारींद्र, प्रफुल्ल, उल्हास, हेमप्रभृति हुतात्म्यांनो, स्वातंत्र्याच्या उद्दिष्टापर्यंत पोचविणारा पथ तुम्ही आपल्या रक्ताने अंकित आणि चिन्हित करून ठेविला आहे आणि त्याच क्षणी आपल्या राष्ट्राच्या दास्याचें आदिकारण, जी बौद्धिक नपुंसकता, तिचाही तुम्ही उच्छेद केला आहे. तुम्हीच आमचें तत्त्वज्ञान आहात, आमच्या तत्त्वज्ञानाचें फलही तुम्हीच आहात. तुम्हीच आमचें ध्येय आहात, आणि त्या ध्येयाची सिद्धिही तुम्हीच आहात. न्यायासनापुढे जी वाणी तुम्ही उच्चारलीत, तो

एखाद्या मेघगर्जनेप्रमाणे राष्ट्राच्या कर्णकुहरात घुमली. महाप्रस्थानाच्या मार्गावरील हे पथिक, हे हुतात्मे, आपल्या प्रेयसीच्या आलिंगनातून स्वतःला मुक्त करून घेऊन, बुद्धाप्रमाणे नवजात पुत्रांचा त्याग करून, मातेच्या यज्ञवेदीत आपल्या देहांची आहुति देऊन एका हातात गीता आणि अन्य हातात शस्त्र घेऊन मातृभूमीच्या मोचनास्तव सिद्ध झाले. भारतमातेला स्वतंत्र करण्याकरिता आपल्या रक्ताने त्यांनी तिला लागलेले कलंक धुऊन काढले. राज्यक्रांतीप्रीत्यर्थ राष्ट्राची सिद्धता करण्याकरिता त्यांनी गुप्त मंडळ्या स्थापल्या आणि फिरंग्यांना नरकाचा मार्ग मोकळा करून दिला.

कर्तव्य करा

हेमचंद्रा, तू आपलें कर्तव्य कर. शस्त्रसंग्रह कर. खड्ग न मिळाल्यास सुऱ्यांनी शत्रूंना कापा. बंदुका मिळाल्या नाहीत तर अग्निगोल फेका. हे शूर हुतात्म्यांनो, पहा, तो नीच किंग्स्फोर्ड कलकत्त्याहून पळत सुटला आहे. क्षुदिराम, धाव त्याच्या मागे. प्रफुल्ल, तूही त्याचा पाठलाग कर. त्या पाप्याला निसटू देऊ नका. हा पहा क्षुदिराम, नवीन उमललेल्या गुलाब फुलाप्रमाणे, अभिमन्यूच्या धैर्याने कारागृहात उभा आहे. त्याला शत्रु विचारीत आहेत. 'केलेल्या कृत्याचा तुला पश्चात्ताप नाही का वाटत ?' 'मुळीच नाही. मला इथून सोडलेत तर माझें उरलेलें कार्य मी पूर्ण करीन.' फांशीची शिक्षा सांगितल्यानंतर त्याला कोणी विचारिलें 'तुला भय वाटत असेल ?' त्याने स्मित करीत उत्तर दिलें. 'मी गीता वाचली नाही, असें समजता काय ?'

अराजकवादी (अनार्किस्ट) नव्हेत

यांना अराजकवादी म्हणणाऱ्या अधिकारी वर्गाला आमचें आव्हान आहे की, या दिव्य वीरांच्या शब्दांतून आणि कृतीतून, त्यांना अराजकवादी म्हणण्यास काडीचाही आधार असल्यास तो दाखवून द्या. होय, त्यांनाही शुद्ध अराजकवादी म्हणता येईल, पण केव्हा ? साम्राज्यवादाच्या छळाचीं पिशाच्चें पृथ्वीतलावर थमान करीत असताना गुप्त मंडळ्या स्थापणें हें जर अराजकवादाचें लक्षण असेल, जेव्हा निबिड तमात सत्याला आश्रय शोधावा लागत असेल, जेव्हा विदेशी देशशत्रु आणि स्वदेशी देशद्रोही यांच्या तावडीत सारीं वर्तमानपत्रें आणि सारीं व्यासपीठें सापडलीं असतील, तेव्हाच हे हुतात्मे अराजकवादी ठरतील ! शस्त्रनिर्बंधाने निःशस्त्र बनविलेल्या देशात अत्याचारी राज्यकर्त्यांना शासन

करण्याकरिता अग्निगोल साठविणें हें जर अराजकवादाचें लक्षण असेल तरच हे हुतात्मे अराजकवादी ठरतील. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणें, राष्ट्रीयत्वाचें रक्षाकवच स्वदेशाच्या शरीरावर चढविणें, तसेंच जित आणि दलित राष्ट्रात न्यायाचें राज्य स्थापणें हें जर भयंकर अराजकवादाचें लक्षण असेल तर बारींद्र आणि त्याचे सहकारी भयंकर अराजकवादी ठरतील. संघटनेचा अर्थ विघटना होत असेल, नवसृष्टीचा अर्थ विध्वंस होत असेल, जोडणें याचा अर्थ जर तोडणें होत असेल तर मात्र हेम, उल्हास, क्षुदिराम हे सारे अराजकवादी ठरतील आणि त्यांच्यासह ख्रिस्त, महंमद, माझिनी हेही अराजकवादी ठरतील!

खरे अराजकवादी

पण जगातील एक पंचमांश लोकसंख्येला जिंकून दास करून पशूंच्या अवस्थेला नेणें, केवळ श्वेतवर्णाच्या लोकांना स्वातंत्र्य आणि इतरांना दास्य असा सैतानी प्रचार करणें, पन्नास लक्ष जनांची, निषेधाचा चकार शब्द बोलू न देता ग्रंथिक सन्निपात आणि दुष्काळ यांच्या मार्गाने हत्त्या करून ती साऱ्या जगापासून लपवून ठेविणें, हें जर अराजकवादाचें प्रमाण असेल, तर हे राज्यकर्त्यांनो, आपणच अराजकवादी आहात. प्रजाजनांना दीर्घकाळ निःशस्त्र केल्यानंतर त्यांच्या पवित्र कुटुंबसंस्थेची विटंबना करण्याकरिता गुंडांना मोकाट सोडणें आणि त्या खच्ची केलेल्या प्रजाजनांना आपल्या कुटुंबाचें संरक्षण करता आलें नाही, या निमित्ताने त्यांचा उपहास करण्याच्या आनंदाचा उपभोग घेणें हें जर अराजकवादाचें लक्षण असेल, तर खरे अराजकवादी आपणच आहात. क्षुदिरामप्रभृति नव्हेत.

अत्याचारी राज्यकर्त्यांचा अंत

हे अत्याचारी राज्यकर्त्यांनो, आज तुम्ही मदांध झाला आहात. पण तुमच्या कपटाने तुम्ही किती दिवस जगाची वंचना करू शकाल? तुमच्या मायेचे पाश क्षुदिरामच्या स्मिताने आणि प्रफुल्ल चाकीच्या अद्भुत कृतीने तटातटा तुटून गेले आहेत. त्यांनी निरपराध्यांची हत्त्या केली, असा तुम्ही घसा फुटेपर्यंत आक्रोश केलात तरी तेवढ्याने तुमचें मरण टळावयाचें नाही. आता सर्वचजण क्रांतीचा मंत्र म्हणू लागले आहेत आणि क्रांतीचा नागराज आपली फणा डोलवू लागला आहे. इतःपर जो जो यशःप्राप्तीचा मार्ग असेल, तो तो मार्ग पवित्र मानला जाईल. या स्वातंत्र्ययुद्धात जें रक्त सांडलें जाईल, त्याचें दायित्व तुमच्या

वरच राहील. ज्या स्थळी क्षुदिराम आणि प्रफुल्ल यांच्यासारख्या हुतात्म्यांचें दहन झालें असेल, तेथील भस्मांतून भारतमाता असा पलिता पेटवील की त्यांच्या शत्रूच्या साऱ्या मायेचा निरास होऊन ती नष्ट होईल. या शत्रूच्या मायेच्या रक्षेतून अधिक बलाढ्य, अधिक तेजस्वी, अधिक स्वतंत्र, अधिक जीवनशक्तिसंपन्न असा अभिनव भारत निर्माण होईल.

वंदे मातरम्

(हीच या पत्रकावरची स्वाक्षरी)

अग्निगोलांचा खरा अर्थ

१९०८ च्या मे मध्ये अफगाणिस्थानाची भारतावर अर्धसरकारी स्वारी चालू झाली होती आणि तिचे पूर्ण सरकारी स्वारीत रूपांतर व्हावें, अशी क्रांतिकारकांची इच्छा होती. २६–५–१९०८ या दिवशी खाडिलकरांनी अग्निगोलांचा खरा अर्थ सांगताना लिहिलें होतें : 'ह्या प्रसंगी दोन प्रकारच्या वार्ता इंग्लंडला एकदम जाऊन धडकल्या. एक बंगाली लोकांत अग्निगोलांचा अवतार झाला आणि दुसरी दहावीस सहस्र अफगाण सैनिक लंडीकोटाल दुर्गावर चालून आल्यामुळे अमिराशी लढाई उपस्थित होण्याचा संभव दिसू लागला. सीमेवरील युद्धाच्या वार्तेने इंग्लंडच्या लोकमतात विशेष गडबड उडाली नाही. इतकेंच नव्हे तर अग्निगोलाच्या वार्तेपुढे अमिराच्या स्वारीची वार्ताही फिकी पडली. हिंदुस्थानातील अग्निगोल हा कित्येक दिवस इंग्लंडात बोलण्याचा आणि लिहिण्याचा एकच विषय होऊन बसला होता. इथे प्रश्न असा उद्भवतो की, या घटना योगायोगाने एका वेळी घडून आल्या की अफगाण स्वारीची शक्यता दिसून आल्यामुळे गोऱ्या अधिकाऱ्यांवर अग्निगोलांचा प्रयोग करण्याचा संकल्प अरविंदांनी केला ? क्रांतिकारकांचें एक धोरण निश्चित ठरलेलें होतें, तें हें की, इंग्लंडवर जेव्हा जेव्हा संकट येईल, तेव्हा तेव्हा आपण उठावणी करण्याची संधि साधावी. अनुशीलन गटाचें म्हणणें असें होतें की इंग्लंड आणि जर्मनी यांचें युद्ध अनिवार्य असल्याने त्यांचें युद्ध जेव्हा जुंपेल, तेव्हा आपण उठावणी करावी. पण तें युद्ध लगेच जुंपण्याची शक्यता दिसत नसल्यामुळे अरविंदांच्या अधिक उतावळ्या अनुयायांनी अफगाणयुद्धाची संधि साधण्याचा प्रयत्न केला. या दिवसांत अरविंद हे टिळकांपासून कसे दूर चालले होते, याचें अमलेश त्रिपाठींनी 'दि एक्स्ट्रिमिस्ट चॅलेंज' या ग्रंथात वर्णन केलें आहे. अशा सर्व संदर्भांचा एकत्र विचार केल्यावाचून अग्निगोलयुगातील राजकारणाचा अर्थ लागणार नाही.

नेपाळनंतर अफगाणिस्थानचें कारस्थान

अमीर हबिबुल्लांना सर्वाधिकारी म्हणून मान्यता देण्याच्या कल्पनेचा उच्चार बिपिनचंद्रांनी १९०७मध्ये केला, तत्पूर्वी खाडिलकरांचें नेपाळचें कारस्थान फसून ते तेथून परत आले होते. दामोदरपंत चाफेकरांनी बाळकृष्णपंतांना नेपाळकडे धाडलें होतें. त्यानंतर सातारच्या छत्रपतींचा शरीरसंबंध नेपाळातील राज्यकर्त्यांच्या कुळाशी व्हावा, अशी खटपट टिळकांनी केली होती. पुढे नेपाळातील विद्यार्थी युद्धशास्त्रशिक्षणाकरिता जपानमध्ये धाडण्याची आणि नेपाळात शस्त्रांचा आधुनिक कारखाना चालू करण्याची खटपट टिळकांनी खाडिलकरांच्या द्वारा केली. या साऱ्या खटपटींना तादृश दृश्य फल प्राप्त न झाल्याने 'युगांतर'च्या काही नेत्यांनी अफगाणिस्थानाकडे आपली दृष्टि वळविली असावी. अनुमानच करावयाचें झाल्यास अरविंदांनी १९०६ मध्ये सयाजीरावांच्या सेवेचें त्यागपत्र दिल्यानंतरची ही घटना असावी, असें म्हणता येईल. पण ही गोष्ट सयाजीमहाराज आणि टिळक या उभयतांनाही रुचण्याजोगी नव्हती. बंगाल्यात राष्ट्रीय आंदोलनांना विरोध करून दंगे करणाऱ्या मुसलमानांना शांत करण्याचा उपाय म्हणूनही कदाचित् बंगाली नेत्यांनी अमीर हबीबुल्लाशी कारस्थानें आरंभिलीं असावीत. प्रस्तुत ग्रंथ प्रकाशित होऊन तो बंगाली इतिहासकारांनी वाचल्यानंतरच त्यांची विचारसरणी कळू शकेल. तोपर्यंत मला स्वतःच्या कल्पनाशक्तीवरच भरंवसा ठेविला पाहिजे. रमेशचंद्र मुजुमदारांच्या 'स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा इतिहास' या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात अशी माहिती आढळते की, तुर्कस्थानापासून ब्रह्मदेशापर्यंत कोकेनचा चोरटा व्यवसाय करणाऱ्या 'मुसलमानांच्या टोळीत कोणी काबुली मुसलमान होता. तो भारतीय क्रांतिकारकांना शस्त्रें पुरविण्याचा व्यवसाय जोडधंदा म्हणून करीत असे. त्यावरून असें वाटतें की हबीबुल्लांची भारतावर स्वारी होणार असल्याचीं आश्वासनें बहुधा यांनीच दिलीं असावींत.

अफगाणकारस्थान खाडिलकरांना सुविदित

युगांतर समितीने हाती घेतलेला अधिकारीवधाचा कार्यक्रम अफगाणिस्थानाच्या स्वारीला साहाय्यभूत होण्यासाठी हाती घेतला होता, ही गोष्ट खाडिलकरांना विदित असल्याचा पुरावा केळकरकृत टिळक चरित्रात चिरोल प्रकरणाच्या ९७ पानावर आढळतो. शिवाजी समितीचे कृष्णाजी दामोदर लिमये यांनी रक्षकांपुढील निवेदनात सांगि-

तलें, '१९०८ च्या मेमध्ये मी नाशिकहून मुंबईस गेलो. तेथे माझी आणि दामू जोशी याची गाठ पडली. मी त्यास विचारलें, 'कर्नल फेरिस यांस अद्यापि कां मारलें नाही?' तो म्हणाला की प्रयत्न केला, पण फसला. अफगाणिस्थानचे अमिराविषयी खाडिलकरांना गुप्त वार्ता कळली होती, तीही त्याने मला सांगितली. अफगणिस्थानचा अमीर हिंदुस्थानावर स्वारी करण्याच्या विचारात आहे, अशा वेळी तुम्हीही अधिकाऱ्यांचे वध करून हिंदुस्थानात अस्वस्थता आहे, हें त्याच्या प्रत्ययास आणून दिलें पाहिजे, असें खाडिलकरांच्या बोलण्यात आलें.' तेव्हा या भानगडी खाडिलकरांना माहीत होत्या आणि त्यांच्या अनुरोधाने ते 'केसरी'तील लेख लिहीत होते. उलटपक्षी टिळक हे पूर्वीचा संकल्प बदलून 'युगांतर' समितीने नवा पवित्रा कां घेतला याचीच चौकशी करीत होते, असें शिवरामपंत करंदीकरांनी टिळकचरित्रात लिहिलें आहे. ही गोष्ट खरी असल्यास अरविंद आणि विपिनचंद्र या उभयतांनीही टिळकांपासून ही गोष्ट लपवून ठेविली होती, असें दिसतें. टिळकांच्याहून अधिक क्रांतिकारक मानलेल्या खाडिलकर-परांजपे यांच्या गटात अरविंदांनी अफगाण कारस्थानाची चर्चा केली असावी. मवाळांच्या ब्रीदावर (क्रीड) टिळक स्वाक्षरी करावयाला उद्युक्त झाले होते, तेव्हापासून हा लपंडाव चालू झाला असावा.

भारताच्या फाळणीची भाईंची योजना

याच दिवसांत लाहोरच्या भाई परमानंदांनी भारताच्या फाळणीची एक योजना लिहून काढली होती. ही योजना समग्र समजून न घेतलेल्या लोकांनी त्यांच्यावर निराधार आरोप केले असल्याने ती येथे उतरून घेणें भाग आहे.

The territory beyond Sindhu should be united with Afganisthan and the Northwest Frontier Province into a great Mussalman kingdom. The Hindus of that region should come away, while at the same time, Mussalmans of the rest of India should go and settle in this territory.

सिंधु नदीपलीकडील प्रांत अफगणिस्थानाला जोडून तो प्रांत, सीमाप्रांत आणि अफगाणिस्थान यांचें एक मोठें मुसलमानी राज्य अस्तित्वात आणावें. या भागातील हिंदूंनी भारतात निघून यावें आणि भारतातील मुसलमानांनी त्या प्रांतात वस्तीला जावें. या अटींवर क्रांतिकारकांनी अफगाण सरकारचें साहाय्य मागितलें होतें असें दिसतें. 'आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका' या सावरकरांच्या हिंदुत्वाच्या

व्याख्येतील भारताच्या सीमांत याच अटींचा प्रतिध्वनि ऐकू येतो, असें वाटतें. नाही तर 'पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य स्थित: पृथिव्या इव मानदंड:' अशा हिमालयाचा अर्धा दंड मोडून तो मुसलमानांना देण्याची कल्पना त्यांच्या कविमनाला रुचली नसती.

अकाली कृतीचें कारण

अरविंदांच्या अकाली कृतीचें कारण १९०८ च्या दिवसांत काही बंगाली पंजाबी पुढाऱ्यांनी अफगाणिस्थानाचे अमीर हबीबुल्ला यांच्याशी चालविलेलीं कारस्थानें हें होय. अर्थात् असल्या कारस्थानाचे पुरावे फारसे उपलब्ध होणें शक्य नसतें. पण १९०८ मध्ये अफगाणिस्थानच्या सरकारशी युद्ध उत्पन्न होण्याचा संभव होता. यासंबंधी 'मोर्लेमिंटोकालीन भारत' या ग्रंथाच्या कर्त्यांनी लिहिलें आहे :

By the latter half of 1908 the Government of India was being drawn into disagreement with the Amir of Afganisthan, over the Anglo-Russian convention in that country, and the growing belief of the Afgans that His Majesty's Government was about to put pressure, which was taken to mean armed pressure, on the Amir to force him to accept terms about which he had never been consulted. The growing power of Russia in Central Asia terrorized the Amir and he look·d upon the clauses of the treaty, authorizing communications between his frontier officers and those of Russia, together with increased facilities for Russian trade as an insidious attempt by Great Britain to undermine his authority and effect the partition of his country between Russia and Britain. Minto wrote to the King : The Viceroy cannot disguise from himself that we may possibly be forced before long into a war with Afganistan, a most serious undertaking at any time; but especially at present when we are fully occupied with the internal difficulties of India which are likely to be increased by the sympathy of the Mahommedan population for the Amir.

२०-८-१९०८ या दिवशी लॉर्ड मिंटो यांनी सम्राट् एडवर्ड यांना लिहिलेल्या पत्रावरून असें दिसतें की, त्या वर्षी अफगाणिस्थानाशी युद्ध उत्पन्न होण्याचा मोठा धोका होता आणि हिंदुस्थानातील अंतर्गत परिस्थिति फार अवघड असल्याने तें युद्ध टाळण्याची हिंदुस्थान सरकारची इच्छा होती. तत्पूर्वी लॉर्ड हार्डिज यांच्या प्रयत्नाने इंग्लंड आणि रशिया यांचा एक संधि झाला होता आणि त्या संधीच्या अटींप्रमाणे इराण-

प्रमाणेच अफगाणिस्थानाचीही त्या दोन राष्ट्रांत वर्चस्वक्षेत्रांच्या रूपाने विभागणी झाली असावी, अशी अफगाणांची समजूत झाली होती. या अटींच्या बजावणीला विरोध करण्याच्या निमित्ताने अफगाणिस्थान हिंदुस्थानावर स्वारी करील, अशी हिंदुस्थान सरकारला भीति वाटत होती. पण शेवटी लॉर्ड मिंटो यांनी अमीर हबीबुल्ला यांना वश करून घेतलें आणि क्रांतिकारकांना हवें असलेलें युद्ध टाळलें.

हबीबुल्लाशी कारस्थानांचा पुरावा

१९०७ मध्ये लाजपतरायांना अटक केली, तेव्हा त्यांनी अमीर हबीबुल्ला यांच्याशी पत्रव्यवहार चालविला होता, असा त्यांच्यावर सरकारने आरोप केला होता, पण या आरोपाविषयी कोणताही पुरावा कधीही पुढे आला नाही. पण अशा प्रकारचीं काही कारस्थानें तेव्हा चाललीं असावीत, याचा पुरावा बिपिनचंद्र पाल यांच्या मद्रासेतील भाषणातून उपलब्ध होतो. त्यांच्या भाषणाचें मराठी पुस्तकच आता माझ्या हाती आहे. त्यात ते म्हणतात : "जर यदाकदाचित् हिंदु आणि मुसलमान यांना समान अधिकार देणारें आमचें अंतिम साध्य जें स्वराज्य, तें आम्हांला एकदम प्राप्त करून घेता आलें नाही, तर त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे राष्ट्राचें सर्व सामर्थ्य एकवटून फ्रान्सप्रमाणे हिंदुस्थानात सर्वाधिकारी नेमण्याचा प्रसंग आला तर तें पद पतकरण्यास सिद्ध असलेला मनुष्य तुम्हांस हिंदुस्थानात किंवा त्याचे जवळपास कोणी आढळतो काय? असा प्रसंग आलाच तर तें काम पतकरणारा माझ्या दृष्टीला एकच मनुष्य दिसत आहे, आणि तो अमीर हबीबुल्ला हा होय. तो जातीने मुसलमानच आहे, ही गोष्ट माझ्या मुसलमान मित्रांनी ध्यानात ठेवण्याजोगी आहे. अमीर हबीबुल्ला हे फार दूरदर्शी आणि डोळ्यांत तेल घालून पाहणारे आहेत. त्यांची दृष्टि आमच्यापैकी कित्येक पुढाऱ्यांच्या दृष्टीपेक्षा फार दूरवर पोचत असली पाहिजे आणि पुढच्या वर्षी हिंदुस्थानाला वैयक्तिक दृष्टीने भेट देण्याचा त्यांचा विचार आहे. हिंदुस्थानातील हिंदुमुसलमानांनी एकमेकांशी शांततेने आणि सद्भावाने पूर्वीप्रमाणे नांदावें, असा अभिप्राय त्यांनी प्रकटपणे व्यक्त केला आहे." हा जो धूम बिपिनबाबूंच्या भाषणातून व्यक्त झाला आहे, त्याच्या मुळाशी हबीबुल्लांशी चाललेल्या काही कारस्थानांचा अग्नि असला पाहिजे, हें उघड आहे. हीं कारस्थानें टिळकांपासून लपवून ठेविलीं असल्याने त्यांना अरविंदबाबूंच्या कार्यक्रमातील परिवर्तनाचें रहस्य कळून आलें नाही. पण त्याचे परिणाम मात्र भोगावे लागले. १९२१-

मध्ये अफगाणिस्थानचे तेव्हाचे अमीर अमानुल्ला यांच्याशी अलीबंधूंचीं जीं कारस्थानें चालू होतीं, त्यांचा रहस्यस्फोट करण्यात बिपिनबाबूंनीही भाग घेतला होता, ही गोष्ट 'यंग इंडिया' साप्ताहिकातील गांधींच्या (१९२१) मे जूनमधील लेखांवरून कोणालाही कळून येण्याजोगी आहे. १९०८ मध्ये अमीर हबीबुल्ला यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या बंगाली क्रांतिकारकांची फसवणूक झाल्याच्या कटु अनुभवाने सावध होऊन १९२१ मध्ये बिपिनबाबूंनी त्याच चुकीची पुनरावृत्ति न करण्याची देशाच्या नेत्यांना सावधगिरीची सूचना दिली होती.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या इतिहासकाराचा अभिप्राय

परदेशी अफगाणांशी आणि स्वदेशातील धर्मवेड्या मुसलमानांशी कारस्थानें करण्यात अरविंद, बिपिनचंद्र अथवा लालाजी यांनी जी भयानक चूक केली त्या चुकीचें वास्तविक स्वरूप फ्रेंच राज्यक्रांतीचे एक इतिहासकार मिशेलेत यांच्या एका अवतरणाने सुव्यक्त होतें.

A perfidious, an odious hand ...... the hand of death ...... has been offered to them and they have not withdrawn their own. They believed, the foes of religious liberty might become the friends of political freedom. Vain scholastic distinctions which obscured their view.

एक कपटी, जुगुप्सित, मूर्तिमंत मृत्यूचाच हात त्यांच्याशी हातमिळवणी करण्याकरिता पुढे आला आणि त्यांनी आपला हात मागे घेतला नाही. त्यांना वाटलें की धार्मिक स्वातंत्र्याचे शत्रु हें राजकीय स्वातंत्र्ययुद्धात आपले सहकारी बनू शकतील. असल्या पुस्तकी, पंडिती प्रभेदांवर विश्वासून त्यांनी आपल्या दृष्टीला गांधारीची दृष्टि बनविली. त्यांना हें कळेना की स्वातंत्र्य हें अविभक्त असतें.

अफगाण सेनापति, तोफेच्या तोंडी

हबीबुल्लाच्या राजसभेत एक शांततावादी पक्ष होता आणि एक युयुत्सु युद्धप्रिय पक्ष होता. या युद्धप्रिय पक्षाचे प्रमुख हबीबुल्लांचे बंधु नसरुल्लाखान आणि अफगाण सेनापति हे होते. १९०७ मध्ये हबीबुल्लांनी भारताला भेट दिली, तेव्हा नसरुल्लाखानांना त्यांनी राज्य संभाळण्याला ठेविलें होतें आणि सेनापति हे त्यांचे सहप्रवासी बनले होते. या सेनापतींचा अंत कसा झाला, याची कथा लेडी मिंटो यांनी आपल्या ग्रंथात वर्णिली आहे. भारतभेटीच्या प्रसंगी अमीर हबीबुल्ला यांना

भयप्रदर्शन करण्याकरिता इंग्रजांनी त्यांना तीस सहस्र सैन्याचें संचलन दाखविलें, तें संचलन पाहून अमीर सेनापतीवर परकाष्ठेचे संतापले.

You told me mine was the finest army in the world. You assured me that the Afgan soldiers greatly excelled the soldiers of the Indian Empire or the soldiers of the Russian Empire. You almost persuaded me that my forces outweighed the Indian and the Russian forces combined. What saw you just now? It is but a single division of the army of India out of nine such! What? Have you nothing to say? On his return to Kabul the penalty paid by the Commander-in-Chief was to be blown from a gun.

अफगाण सेनापतींनी आपल्या अधिपतींना असें आश्वासन दिलें होतें की आपलें सैन्य जगातील सर्व सैन्यापेक्षा गुणाने श्रेष्ठ आहे, इतकेंच नव्हें तर भारतीय आणि रूसी सैन्यांच्या संयुक्त सामर्थ्यापेक्षा आपल्या सैन्याचें सामर्थ्य अधिक आहे. या अतिशयोक्ति अलंकाराचें पर्यवसान सरतेशेवटी त्या सेनापतींना तोफेच्या तोंडी बांधून उडवून देण्यात झालें. अमिरांचा असा पराकाष्ठेचा प्रक्षोभ होण्याचें कारण, त्या वेळी भारतावर स्वारी करण्याचा त्यांचा विचार जवळजवळ निश्चित झाला होता, हेंच असलें पाहिजे.

✦ ✦ ✦

प्रकरण सोळावें

वंगभंगाचें आंदोलन

दयानंद, टिळक आणि विवेकानंद यांच्या प्रभावाने हिंदुस्थानात हिंदुराष्ट्रवादाचा उदय होऊ लागलेला पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्याचा प्रतिकार करण्याकरिता मध्ययुगीन इस्लामी धर्मांधतेचें पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प केला. वंगभंगापूर्वी डाक्का येथे केलेल्या भाषणात स्वत: लॉर्ड कर्झन यांनी स्पष्ट सांगितलें होतें :

One of the reasons for partition is to invest the Mahomedans in Eastern Bengal with a unity which they have not enjoyed since the days of the old Musalman viceroys or kings.

मुसलमानी सुलतानांच्या आणि नबाबांच्या दिवसांपासून त्यांना जें (स्वराज्यात) एकत्र राहण्याचें सौख्य लाभलें नव्हतें, तें त्यांना प्राप्त करून देणें, हाही वंगभंगाचा एक हेतु आहे. या व्यतिरिक्त दुसरा एक हेतु, सर हर्बर्ट रिस्ले यांनी सरकारी पत्रव्यवहारात व्यक्त केला होता.

In this partition scheme as in the matter of amalgamation of Berar to the Central Provinces, one of our main objects is to split up and thereby to weaken a solid body of opponents to our rule.

म्हणजे वंगभंग करणें आणि वऱ्हाड प्रांत मध्यप्रांताला जोडणें या दोनही कृतींचा उद्देश एकच आहे. तो म्हणजे इंग्रजी राज्याच्या शत्रूंची अभेद्य फळी दुभंग आणि दुर्बळ करणें हा होय. याचा अर्थ असा की, इंग्रजी राज्याचा कट्टा शत्रु जो टिळकांचा महाराष्ट्र, तो महाराष्ट्र दुभंगलेला आणि दुर्बळ ठेवण्याकरिता वऱ्हाड मध्यप्रांताला जोडला, तसेंच बंगाल्यातील हिंदुराष्ट्रवाद निर्बल आणि नि:सत्त्व करण्याकरिता बंगालची फाळणी करून पूर्व बंगाल्यात इस्लामी धर्मांधतेचें पुनरुज्जीवन घडवून आणलें. तेव्हा १९०५ मध्ये महाराष्ट्र आणि बंगाल हे प्रांत फाळणीच्या अन्यायापुरते समदु:खी बनले होते. मात्र आधीपासून विभक्त असलेला विदर्भ महाराष्ट्रात समाविष्ट न करण्याच्या दु:खाच्या मानाने चार शतकें एकजीव असलेला प्रांत दुभंग करण्याच्या वेदना अत्यंत तीव्र होत्या, हें उघड आहे. पण या वेदना विसरण्याकरिता

बंगाली हिंदूंच्या पुढाऱ्यांनी ज्या वंगराष्ट्रवादरूपी अहिफेनसेवनाचा अवलंब केला, तो उपाय मूळ आघातापेक्षाही अधिक घातक ठरला! कारण वंगभंगाचें गाऱ्हाणें दूर करण्याच्या निमित्ताने १९११ मध्ये लॉर्ड हार्डिंज यांनी अविभक्त बंगाल्यात मुसलमान समाज बहुसंख्य बनेल, अशीच त्या प्रांताची नवरचना केली आणि तिला तत्कालीन राष्ट्रीय सभेतील सुरेंद्रनाथ, गोखलेप्रभृति भौगोलिक राष्ट्रवाद्यांनी मान्यता दिली.

आजचा मार्क्सवादी आणि हिंदुद्रोही बंगाल

टिळकयुगातील हिंदुराष्ट्रवादाचा प्रभाव गांधीवाद आणि मार्क्सवाद या देशद्रोही तत्त्वज्ञानांनी नष्ट केल्यानंतर बंगाली हिंदुसमाज आसाम, बिहार, ओरिसा इत्यादि प्रांतांतील हिंदूंना दूर लोटून पूर्व बंगाल्यातील भ्रष्ट वंगभाषा बोलणाऱ्या आणि बंगाली हिंदूंसकट इतर सर्व हिंदूंवर निष्पक्षपातीपणाने अनन्वित अत्याचार करणाऱ्या मुसलमान समाजाला आलिंगन देण्याला उतावीळ झाला आहे. पश्चिम बंगाल्यातील हिंदु समाज हा नांवापुरता जरी अजून हिंदु राहिला असला तर तो मुख्यतः महाराष्ट्र, कर्नाटकातील काही ब्राह्मण वीर आणि पंडित यांनी सरासरी आठनऊशे वर्षांपूर्वी बंगाल्यातील बौद्ध पाल साम्राज्याचा उच्छेद करून तेथे बल्लाळसेनाचें ब्राह्मणी राज्य स्थापलें, त्यामुळे राहिला आहे. सेन घराण्याचा संस्थापक बल्लाळ हा धारवाडहून काशीला गेला असताना त्याला वंग देशात हिंदु-राज्य स्थापण्याची प्रेरणा झाली आणि त्याने सहस्रावधि स्वजातीय वीर आणि पंडित यांच्या साहाय्याने त्या प्रांतात आपलें राज्य स्थापलें. या महाराष्ट्रीय ब्राह्मणांनीच आपल्या प्रांतातील बोपदेव पंडितांचें मुग्धबोध हें संस्कृत व्याकरण बंगाल्यात प्रचलित केलें. त्यांच्या प्रभावानेच बंगाली स्त्रियांची वेषभूषा आणि चालीरीती महाराष्ट्रीय वळणावर गेल्या. पण हा सारा पूर्वेतिहास विसरलेल्या अर्थवादी बंगाल्यांनीं रघूजी भोसले जेव्हा यवनांच्या तावडीतून त्यांची मुक्तता करावयाला गेले, तेव्हा त्यांना साहाय्य केलें नाही. त्यामुळे बौद्धांचे भारतातील वारस जे यवन त्यांच्या हातून बंगाल सोडविण्याचें श्रेय रघूजीला लाभलें नाही. त्यानंतर वंगभंगाच्या रूपाने पुनश्च एकवार यवनराज्याचें आणि इस्लामीकरणाचें संकट जेव्हा बंगाल्यातील हिंदु समाजावर ओढवलें, तेव्हा त्या संकटाचा प्रतिकार करण्याकरिता टिळकांच्या महाराष्ट्रानेच सर्वतोपरीने साहाय्य केलें.

या वेळी आपल्या असहाय प्रजेवर अत्याचार न करण्याचें राज्यकर्त्यांचें कर्तव्य पाळण्याचा प्रयत्न करणारे लॉर्ड कर्झन हे त्यागपत्र देऊन गेले नसते तर टिळकांना तेव्हा संपूर्ण यशही आलें असतें. पण कर्झन यांच्या स्थानावर तेव्हा तुर्कांच्या सैन्यात त्यांचे सेवक म्हणून लढलेल्या आणि त्या देशांतील सामुदायिक संहाराचें राजकारण अंगी मुरलेल्या लॉर्ड मिंटोंची नेमणूक झाली आणि त्यांनी भारतात मुसलमानी राज्याचें पुनरुज्जीवन घडवून आणण्याकरिता सामुदायिक संहाराच्या अस्त्राचा प्रयोग बंगाल्यांतील हिंदूंवर केल्याने तेथील राजकारणाला वेगळेंच वळण लागलें. राजप्रतिनिधि लॉर्ड मिंटो हे एके काळी तुर्कांचे सेवक असल्याने त्यांनी तेथील राजनीतीचें अनुकरण करून बंगाल्यात हिंदुनिर्दलनाचा आणि हिंदुनारीहरणाचा कार्यक्रम हाती घेतला, ही गोष्ट त्यांच्या काळावर दशग्रंथ लिहिणाऱ्या विद्वानांपैकी एकानेही सांगितली नाही. एवढ्यावरूनही प्रस्तुत इतिहासाची आवश्यकता आणि अपूर्वता वाचकांना कळून येईल.

वंगभंगानंतरची योजना

वंगभंगानंतरच्या इतिहासाचें अवलोकन केल्यामुळे अलीकडील पिढीतील लोकांना असें वाटू लागलें आहे की त्या काळी वंगभंगाला विरोध करण्यात हिंदु पुढाऱ्यांनी चूक केली. लॉर्ड कर्झन यांचा मृत्युलेख लिहिताना लाजपतरायांनी आपल्या 'पीपल' या इंग्रजी साप्ताहिकात वंगभंगाला विरोध केल्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त केला होता. पण राजकारणात सामान्यतः घडून आलेल्या आपदांचाच विचार प्राधान्याने करतात आणि टळलेल्या आपदांचा करीत नाहीत, म्हणून ही चूक होते. १९०६ मध्ये अखिल राष्ट्राने प्रतिरोध करण्याचा प्रयत्न केला असतानाही अपरिहार्यपणे वंगभंगाची गदा देशावर आदळल्यानंतर भारतीय प्रजा आपल्या भीषण भवितव्यतेच्या कल्पनेने अत्यंत भीतिग्रस्त होऊन गेली. कारण ज्या राज्यकर्त्यांनी अकबराच्या काळापासून एका सुभ्यात समाविष्ट असल्यामुळे ज्यांचें आर्थिक आणि राजकीय जीवन एकजीव झालें होतें,अशा बंगाल, बिहार, ओरिसा प्रांताचे, दुभंग होऊ घातलेल्या वंगसमाजाच्या निकराच्या विरोधाला न जुमानता, दोन प्रांत चुटकीसरशी अस्तित्वात आणले, ते राज्यकर्ते भारताच्या राष्ट्रीयत्वावर आघात करण्याकरिता अखंड भारताचेही दोन खंड करावयाला चुकणार नाहीत, अशी सर्वांनाच सयुक्तिक आणि साधार भीति वाटू लागली. ही भीति १९०७ मध्ये नवीनच निघालेल्या मॉडर्न रिव्ह्यू मासिकात स्वतः

संपादक रामानंद चतर्जींनीच लंडन येथील रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज् या मासिकाचे विख्यात संपादक विल्यम स्टेड यांना उद्देशून लिहिलेल्या अनावृत पत्रात (डिसेंबर) व्यक्त केलेली आढळते.

It is whispered that your people have yet another intention. They will divide India herself into two viceroyalties. The exploitation of Burma proceeds apace. Possibly the exploitation and the ultimate annexation of Siam must be arranged for. The business at the centre is too much for a single head. Assam, carrying East Bengal and Burma, will be made into one Government, while the rest stands as at present. Two Indias and two Viceroys to be the answer to our assertion of the unity of India.

वंगभंग करताना तुमच्या देशबांधवांनी आपल्या दृष्टीपुढे दुसरें एक उद्दिष्ट ठेविलें आहे, अशी कुजबूज ऐकू येते. ब्रह्मदेशाची भयानक लूट इंग्रजांनी आरंभिलीच आहे आणि हेंच लुटालुटीचें वरदान आज नाही उद्या सयाम देशाला देण्याचा तुमचा संकल्प सुटला आहेच. या हेतूची पूर्वसिद्धता म्हणून आसाम, पूर्वबंगाल आणि ब्रह्मदेश हे सर्व प्रांत भारतापासून तोडून एका स्वतंत्र राजप्रतिनिधीच्या स्वाधीन करणें सोयीचें होईल. म्हणजे अखंड हिंदुस्थानाच्या राष्ट्रैक्याचा पुरस्कार करणाऱ्यांना हिंदुस्थान द्विखंड करून उचित उत्तर दिलें जाईल. वंगभंगाच्या आंदोलनातील हिंदुस्थानाच्या नेत्यांना ब्रह्मदेशात निर्वासित करून तो देश भारताचा भाग नसल्याचें प्रदर्शन तेव्हा इंग्रज करीत होतेच आणि पुढे पहिल्या वर्तुळपरिषदेच्या प्रसंगीं ब्रह्मदेश भारतापासून विभक्त करून रामानंदांनी १९०७ मध्ये व्यक्त केलेली भीति निराधार नसल्याचें इंग्रजांनी सिद्ध केलेंच. पण वंगभंगाविरुद्ध झालेल्या निकराच्या आंदोलनामुळे ब्रह्मदेशासहच तेव्हा आसाम आणि पूर्वबंगाल तेथील राजप्रतिनिधींच्या ताब्यात जाऊ शकला नाही.

नव्या वंगभंगाचे परिणाम

त्यानंतर गांधीनेहरूंच्या मुस्लिमपूजक राजनीतीचें अपरिहार्य पर्यवसान भारतभंगात घडून आलें असून या भारतभंगाचाच एक अटळ परिणाम म्हणून बंगालची दुसरी फाळणी घडून आली आहे. या फाळणीचे दुष्परिणाम पश्चिम बंगाल्यातील हिंदूंना आणि पूर्व बंगाल्यातील मुसलमानांना तीव्रतेने जाणवत असल्यामुळे काहीही करून बंगालचें पुनर्मीलन घडवून आणण्याचा त्यांना ध्यास लागला आहे. हें उद्दिष्ट

साधण्याकरिता बंगाल्यातील बुद्धिजीवी समाज आज चीनचा हस्तक बनला आहे. जुन्या क्रांतिकारकांपैकी अजूनही साम्यवादाला विरोध करणारे देशभक्त आशुतोष लाहिरी यांनी १९५९ मध्येच तेव्हाचे गृहमंत्री पंडित गोविंदवल्लभ पंत यांना लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे:

The war, when it comes within the next two or three years, is most likely to be waged on the soil of India itself, with the people of Bengal and Assam actively on the side of China. India is on the brink of a new revolution which can only be compared to the events of 1757 when top ranking leaders of Bengal sought the aid of foreigners in order to get rid of the oppressive rule of Nawab Serajuddaula – which ultimately enslaved the whole of India. Today, by a strange paradox of history, the intelligentsia of Bengal is set fairly on the road towards actively siding with another foreign power with a view to get rid of the partition and to secure the communist solution of people's sufferings. This is a plain warning of what is coming.

चीनशी जेव्हा युद्ध जुंपेल, तेव्हा तें भारतीय भूमीवरच लढलें जाईल आणि त्या वेळी आसामबंगालचे लोक चीनला साहाय्य करतील. १७५७ मध्ये बंगाली लोकांनी इंग्रजांशी सहकार्य करून मुसलमान नबाबांचा काटा काढला. १८५७ च्या क्रांतियुद्धातही बंगाली लोकांनी विदेशी इंग्रजांचाच पक्ष उचलला आणि आता सध्या तर ते उघडपणे चीनचा पुरस्कार करीत आहेत. अशी देशद्रोहाची परंपरा असलेले बंगाल्यातील बुद्धिजीवी बंकिम, विवेकानंद, अरविंद आणि टिळक यांच्या प्रभावाने काही काळ देशभक्त बनले, आणि आपल्या देशभक्तीप्रीत्यर्थ त्यांनी अपरिसीम त्याग केला, हें एक टिळकयुगातील महान् आश्चर्यच आहे.

डाक्याच्या नबाबांचे दंगे

हिंदुमुसलमानांनी एकमताने वंगभंगाला विरोध केल्याचें अनपेक्षित दृश्य दिसून आल्याने भेदनीतिप्रवीण इंग्रजांनी ढाका येथील तत्कालीन नबाब सलीमुल्लाखान यांना सोळा लक्ष रुपये देऊन हिंदूंचीं घरेंदारें लुटणें आणि हिंदुस्त्रियांना पळवून भ्रष्ट करणें हा मुसलमान गुंडांचा आवडता कार्यक्रम हाती घेण्याची चिथावणी दिली. हिंदुसमाजात निष्पक्षपातीपणाच्या निमित्ताने सत्यापलाप करण्याची अत्यंत आत्मघातकी

सवय असल्याने वंगभंगाच्या आंदोलनाच्या दिवसांत बंगाल्यातील मुसलमान गुंडांनी केलेल्या दंग्यांची विश्वसनीय माहिती मिळविणें अवघड गेलें. अनेक ग्रंथ शोधता शोधता शेवटी सर शंकरन् नायर यांच्या आत्मचरित्रात ती माहिती मिळाली. इथे या शोचनीय गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की हा महत्त्वाचा ग्रंथ त्यांच्या वारसांनी त्रीसपंचवीस वर्षे तसाच अप्रकाशित राहू दिला होता. असो. ते म्हणतात :

Soon after the formation of the Muslim League in December 1906 the Nawab of Dacca went to Comilla. His visit was syncronised with lawless occurrences in the town. A riot broke out when he was passing through the town. The police refused to interfere with the rioters and the Magistrate refused to take notice of the incident. The Magistrate, the Commissioner of the Division, the Sessions Judge, the District Superintendent of police and other local European officers were entertaining the Nawab in the Club House while a portion of the town was being looted by Mahomedan rowdies. All this stopped when a Mahomedan was shot on the public road.

सर शंकरन् नायर हे मद्रासेतील वरिष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश आणि नंतर राजप्रतिनिधींच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य असून पंजाबात इंग्रजसरकारने केलेल्या अत्याचारांच्या निषेधासाठी त्यांनी त्या पदाचें त्यागपत्र दिलें होतें. ही गोष्ट आजच्या पिढीला अविदित असेल. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मुस्लिम लीग स्थापन झाल्यानंतर लौकरच ढाक्याचे नबाब सलीमुल्लाखान त्या संस्थेचा कार्यक्रम कृतीत उतरविण्यासाठी कोमिल्ला येथे गेले असता त्यांच्या मिरवणुकीत एकत्र झालेल्या मुसलमानांनी हिंदूंच्या दुकानांची आणि घरांची लुटालूट आरंभिली. याला निमित्त त्यांनी असें सांगितलें की नवाबांची मिरवणूक ज्या अमंगल प्रभाती निघाली, त्या प्रभातकाळी नुकती दुकानें उघडून त्यांची झाडलोट चालू झाली होती. या झाडलोट करणाऱ्यांपैकी एकजण आपल्या हातातील संमार्जनीसहच मिरवणूक पहावयाला दुकानाच्या दाराशी आला असता त्याने संमार्जनी दाखवून मिरवणुकीला अपशकुन केल्याच्या निमित्ताने मुसलमानांनी दंगा आरंभिला. पूर्वबंगाल्यात इंग्रज-मुसलमानांचें संयुक्त राज्य स्थापण्याकरिताच वंगभंग केला असल्याने दंगा करणाऱ्या मुसलमानांचा प्रतिकार आणि प्रतिरोध करण्याचें नगररक्षकांनी नाकारलें. जिल्हाधिकाऱ्यांना तर सर बाँफील्ड फुल्लर (पूर्वबंगालचे दुय्यम राज्यपाल) यांच्या लाडक्या राणीच्या लीलांकडे लक्ष

देऊन तिचा विनयभंग करणें शक्यच नव्हतें. यामुळे एकीकडे मुसलमान गुंड कोमिल्ला नगराची लूट करीत होते, तर दुसरीकडे सर्व वरिष्ठ गोरे अधिकारी नबाबांच्या स्वागतसमारंभात दंग झाले होते. सरतेशेवटी काही हिंदु तरुणांनी निर्वाणीचा क्षण ओळखून या दंग्यांचा सूत्रधार असलेल्या नबाबांच्या प्रमुख हस्तकावर गोळ्या घालून त्याला राजमार्गावरच लोळविलें. ती वार्ता कानी येताच त्या पापी नबाबांनी तेथून तातडीने पळ काढला आणि त्यांच्या स्वागत समारंभात दंग झाल्याने कोमिल्ला नगरीच्या लुटालुटीकडे दुर्लक्ष करणारे कर्तव्यभ्रष्ट गोरे अधिकारी गोळीबार करणाऱ्या हिंदुतरुणांना अटक करण्याकरिता तत्परतेने धावून आले. या प्रकरणी तीन तरुणांवर नरहत्येचा आरोप ठेवून जिल्हान्यायाधीशांनी निवारण नांवाच्या एका तरुणाला फाशी आणि दुसऱ्या दोन तरुणांना जन्मठेप काळ पाणी अशा शिक्षा ठोठाविल्या, पण कलकत्त्याच्या वरिष्ठ न्यायालयाने त्या सर्वांना निर्दोषी ठरवून मुक्त केलें. वरिष्ठ न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आपला निर्णय सांगताना जिल्हान्यायाधीशांच्या पक्षपाती वर्तनावर कडक टीका केली होती.

The method of the learned judge in dealing with the testimony of the witnesses by dividing them into two classes, Hindus and Mahomedans, and accepting the evidence of one class and rejecting that of the other, is open to severe criticism.

म्हणजे साक्षीदारांचे हिंदु आणि मुसलमान असे दोन विभाग करून त्यांपैकी एका पक्षाचा पुरावा ग्राह्य मानावयाचा आणि दुसऱ्याचा त्याज्य मानावयाचा ही पद्धत अत्यंत टीकास्पद आहे. पण आजकालचे इतिहासकारही या टीकास्पद पद्धतीचा आश्रय करतात, याचा सर्वांना अनुभव आहेच. या प्रकरणाची अधिक माहिती सर शंकरन् यांच्या आत्मवृत्तातूनच वाचकांनी पहावी. (पान ३०५)

रक्तपत्रक आणि जमालपूरचा दंगा

कोमिल्ला येथून पलायन करून गेल्यानंतर ढाक्याच्या नबाबांनी एका मासाच्या अवधीत जमालपूर (रूपनगर) येथे फार मोठ्या प्रमाणावर दंगा घडवून आणला. त्या दिवशी तेथील एका तीर्थात स्नानाची पर्वणी होती. त्या निमित्ताने सभोवतालच्या प्रदेशातील यात्रेकरू जमालपूर येथे जमले होते. या ठिकाणी कालीचें देऊळ फोडून मुसलमानांनी हिंदूंचीं दुकानें लुटलीं आणि मोठ्या प्रमाणावर हिंदुनारींचें हरण

आणि भ्रष्टीकरण केलें. या प्रकरणी बार्निव्हिल नांवाच्या एका इंग्रज अधिकाऱ्याने आणि एका मुसलमान अधिकाऱ्यानेही लिहिलें होतें :

On the date of the riot, the accused had read over a notice to the crowd of the Musalmans and had told them that the Government and the Nawab Bahadur of Dacca had passed orders to the effect that no body would be punished for plundering and oppressing the Hindus.

म्हणजे इंग्रज आणि ढाक्याचे नबाब यांनी अशी आज्ञा केली आहे की हिंदूंना लुटलें आणि छळलें तर त्या निमित्ताने कोणालाही शिक्षा होणार नाही. त्या वेळी याच नबाबांच्या नांवाने निघालेल्या रक्तपत्रकात हिंदुविधवांना पळवून त्यांच्याशी निक्का लावण्याचा मुसलमानांना उपदेश केला होता. याच नीच नबाबांसंबंधी सुरेंद्रनाथ बानर्जींनी आपल्या आत्मचरित्रात लिहिलें आहे :

As a gentleman, the Nawab was without an equal.

आपल्याच नात्यागोत्यातील बायका पळविण्याचा उपदेश करणाऱ्या नीचांचीही सभ्य गृहस्थ म्हणून स्तुति करण्याला हिंदु सुधारकच धजू शकतात. असले पुढारी ज्या प्रांताला लाभतात, तो प्रांत यवनमय झाला तर त्यात नवल काय ?

क्रांतिकारकांचा प्रतिकार

जमालपूरच्या दंग्यानंतर अरविंदांनी तेथील लोकांना धीर देण्याकरिता इंद्रनाथ नंदी यांना अग्नि अस्त्रें आणि पाथेयाप्रीत्यर्थ २०० रुपये देऊन जमालपूरला पाठविलें, त्यांच्यासह आत्मोन्नति समितीचे नेते बिपिन गांगुली आणि अन्य पांचसहा स्वयंसेवकही होते. जमालपूर येथे मुसलमानांनी त्यांच्यावरही हात टाकला, तेव्हा त्यांना आत्मसंरक्षणाकरिता अठरा गोळ्या झाडाव्या लागल्या. या प्रकरणी इंद्रनाथ आणि काही स्वयंसेवक यांना अटक झाली असता तेथील बंदिशाळेतील पर्यवेक्षक वैद्यकीय अधिकारी हे क्रांतिकारकांच्या दलांतील सभासद असल्याने साक्षीदारांनी आरोपींना ओळखलें नाही, या निमित्ताने त्यांची सुटका झाली. त्यानंतर लौकरच त्रिपुरा जिल्ह्यातील चांदपूर नगरीतही असाच दंगा झाला असता तेथे गोळी चालविल्यानंतर बिपिन गांगुलींना शिक्षा झाली. इथे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की इंग्रजसरकारने हिंदूंना संरक्षण देण्याचें नाकारल्यामुळे क्रांतिकारकांना प्रतिसरकारची भूमिका घेऊन स्वतःचें संरक्षण करणें भाग पडलें. या त्यांच्या कृत्यांमुळे

क्रांतिकारक समित्या पूर्वबंगाल्यात अत्यंत लोकप्रिय झाल्या. पूर्वबंगाल्यात तेव्हा क्रांतिकारकांनी मुसलमानांवर गोळ्या झाडल्या असल्या तरी सरकार असेंच मानीत होतें की मुसलमानांपासून आत्मसंरक्षण करून घेण्याकरिता नसून इंग्रजांविरुद्ध बंड करण्याकरिताच हिंदु तरुण शस्त्रसज्ज झाले आहेत. सर शंकरन् नायर यांनी आपल्या आत्मकथेत कलकत्त्याच्या वरिष्ठ न्यायालयाच्या निर्णयपत्रातील पुढील अवतरणाच्या आधाराने ही गोष्ट सिद्ध केली आहे.

Mahomedans were the supporters if not the tools of the Government. Mahomedan oppression was the Government oppression, Self defence against the aggressiveness of the Mahomedans involved opposition to the Government. In a word the objective was the Government, and not the Mahomedans, the likelihood of whose joining hands eventually with their Hindu compatriots was occasionally the subject of comment and prophecy.

तेव्हा मुसलमान हे सरकारचे हस्तक नसल्यास निदान पक्षपाती बनले होते. यामुळे मुसलमानांनी हिंदूंवर केलेले अत्याचार हे सरकारी अत्याचार होते. म्हणजेच क्रांतिकारकांनी मुसलमानी अत्याचारांपासून आत्मसंरक्षण करून घेणें हें सरकारविरुद्ध बंड होतें. एका शब्दात सांगावयाचें म्हणजे हिंदूंनी मुसलमानांवर गोळ्या झाडल्या तरी त्यांचें लक्ष्य इंग्रज सरकारच होतें. मुसलमान आज ना उद्या आपल्या पक्षाला मिळतील, अशी चर्चा आणि अपेक्षा हिंदुसमाज करीत होता.

'क्लैब्यं मा स्म गमो वंग', बंगालला क्लीब न बनण्याचा उपदेश

बंगाल्यातील जमालपूर येथील हिंदुनारींवरील अत्याचारांची वार्ता आणि विशेषतः त्या प्रसंगी हिंदूंनी मुसलमानांना कसलाही प्रतिकार न केल्याची वार्ता पुण्याला पोचल्यानंतर टिळकांनी ३०-४-१९०७ च्या 'केसरी'त दोन स्फुटें लिहून आततायांना तत्काळ शासन करण्याचा बंगाली हिंदूंना उपदेश केला. टिळकांचा हा संदेश त्यांच्या कानी घालण्याकरिता अरविंदांनी ९ मे च्या वंदेमातरम्च्या अंकात 'प्रतिकार करा, नाही तर नष्ट व्हा' हा निर्वाणीचा आदेश देणारा लेख प्रसिद्ध केला.

The Kesari has rightly observed that now is the time for Bengal to falsify the reproach of cowardice and assert its claim to lead India by conducting itself manfully during its own trouble. But Bengal does not seem to take seriously this

warning to look into its laurels. On the contrary, it has allowed itself to be considerably lowered in the estimation of others by offering no resistance to the most outrageous insults to their religion and women. It is inhuman to still busy ourselves with our selfish interests and pursuits and turn a deaf ear when the clamour of pillage and violence and ruin and the shrieks of outraged women reach our ears. The country in which the cry of outraged chastity rises day after day unavenged to heaven is doomed to ruin. The Government which permits it and stands looking on smiling and with folded hands is already doomed by the justice of heaven. It shall pass away and be as if it had never been. But we who look on while our sisters and mothers are outraged, against us too the doom will go forth unless we act before it is too late.

बंगालमध्ये स्वतःच्या प्रयत्नाने प्राप्त करून घेतलेलें या देशाचें नेतृत्व यापुढे टिकवावयाचें असेल आणि आपल्याला लागलेला भेकडपणाचा कलंक नष्ट करावयाचा असेल तर बंगाली तरुणांनी आपल्या पौरुषाचा आविष्कार करून आपल्या समाजावरील संकटाला तोंड दिलें पाहिजे, असा 'केसरी'ने उचित उपदेश केला आहे. पण स्वतःचा कलंक धुवून काढून आपलें यश धवल करण्याच्या या सूचनेकडे बंगालचें दुर्लक्षच झालेलें दिसतें. इतकेंच नव्हे तर स्वधर्म आणि स्वकुलातील नारी यांच्यावरील घोर अत्याचारांचा प्रतिकारही न करण्यामुळे बंगाली तरुणांनी आपल्या नांवाला काळिमाच लावून घेतला आहे. आपल्या सभोवती स्वजनांच्या संपत्तीची लुटालूट आणि जाळपोळ चालू असताना आणि अत्याचारपीडित स्त्रियांच्या किंकाळ्या कानांवर आदळत असताना आपल्या स्वार्थाच्या नित्य तुच्छ व्यवसायात निमग्न राहणें हें अमानुषपणाचें लक्षण आहे. ज्या देशात नित्य अत्याचारपीडित पतिव्रतांचा क्रंदनध्वनि ईश्वराकडे न्याय मागण्यासाठी आकाशात प्रतिध्वनित होत असतो, आणि त्याचा कधीही प्रतिशोध घेतला जात नाही, तो देश अल्प काळात विनष्ट होणार, हें विधिलिखित अटळ आहे. जें सरकार आपले कर कटीवर ठेवून असल्या अत्याचारांचें तटस्थपणे अवलोकन करीत राहतें, तें ईश्वरी न्यायाचें अपरिहार्य पर्यवसान दाखवून देण्याकरिता आपलें स्मारकच नव्हे तर स्मरणसुद्धा मागे न ठेवता नष्ट होतें. पण आपणही जर आपल्या आयाबहिणींचा अत्याचारांपासून बचाव केला नाही तर आपल्या समाजाच्या सर्वनाशाची घंटा याच न्यायदेवतेच्या आदेशाने घणघणू लागेल. ती वेळ येण्यापूर्वीच सावधान.

मुसलमानांच्या अत्याचारांना मारवाड्यांचें उत्तेजन !

या वेळी पूर्वबंगाल्यातील मुसलमानांच्या अत्याचारांना मारवाडी व्यापाऱ्यांनीही उत्तेजन दिलें असावें, असें अनुमान रशियन लेखकांनी प्रसिद्ध केलेल्या टिळकचरित्रपर निबंधसंग्रहावरून काढावें लागतें.

Encouraged by the authorities, the Muslim landlords and Mullahs diseminated the poisonous seeds of communal enmity among the masses. At the end of February, a Moslem meeting of 20,000 was held in the province. It was attended by a considerable number of Marwaris who were deeply interested in trade in imported goods. The meeting passed a resolution supporting the partition of Bengal and condemning the boycott.

इंग्रजांच्या उत्तेजनाने मुसलमान भूस्वामी आणि मुल्ला यांनी जातिद्वेषाचीं विषारीं बीजें पसरविणारीं पत्रकें सर्वत्र प्रसृत केलीं. १९०७ मध्ये फेब्रुवारीच्या अंती वीस सहस्त्र मुसलमानांची एक प्रचंड सभा भरून तीत फाळणीच्या समर्थनाचे आणि बहिष्काराचा निषेध करण्याचे ठराव संमत झाले. या सभेला इंग्रजी वस्तूंच्या आयातीचा धंदा करून पुष्ट झालेले पुष्कळसे मारवाडीही आले होते. हे मारवाडी केवळ फाळणीला पाठिंबा देऊन आणि बहिष्काराचा निषेध करून हरि हरि म्हणत बसले असतील, असें मानता येत नाही. या सभेनंतर पूर्वबंगाल्यातील मुसलमानांनी हिंदूंवर अघोर अत्याचार चालू केले तेव्हा या मारवाड्यांनीही त्यांना 'सार्थ' चिथावणी दिली असलीच पाहिजे. यामुळेच पुढे कलकत्त्यात १९०९ मध्ये (?) मारवाड्यांच्या वस्तीत गाय कापून मुसलमानांनी मारवाडी स्त्रियांवर अनन्वित अत्याचार आरंभिले असता बंगाली हिंदूंनी त्यांना यत्किंचित्सुद्धा साहाय्य केलें नाही, असें डॉ. हेडगेवारांच्या चरित्रात कै. नाना पालकरांनी लिहिलें आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण सतरावें

१९०८ चा अभियोग

टिळक आणि सर जॉर्ज क्लार्क

टिळकांचे आणि भारताचे एक कट्टे शत्रु लॉर्ड सिडेनहॅम यांची मुंबईचे राज्यपाल म्हणून नेमणूक झाली, तेव्हा ते सर जॉर्ज क्लार्क होते आणि अजून टिळकशत्रु बनले नव्हते. राज्यपाल या नात्याने मुंबईला आल्यानंतर आपल्या प्रांतातील पत्रकारांचा परिचय करून घेण्याकरिता त्यांना त्यांनी उद्यानोपहाराचें निमंत्रण दिलें. या आमंत्रणाचा आदर करून टिळक आणि इतर सरासरी सत्तर पत्रकार त्या समारंभाला उपस्थित झाले. हा समारंभ आटोपल्यानंतर टिळकांनी राज्यपालांचे उचित शब्दांत आभार मानले. या प्रसंगाचा वृत्तान्त भारतसचिवांना कळविताना सर जॉर्ज यांनी लिहिलें आहे :

When the party was over, to my astonishment, Tilak got up and thanked me very nicely in the name of the assembly. I cannot help thinking that long ago he might have been taken in hand; but a high cast brahmin, I am told, never forgives imprisonment.

म्हणजे या टिळकांवर इंग्रजी वशीकरणाचा प्रयोग पूर्वीच करावयाला हवा होता. पण उच्चकुलीन ब्राह्मण बंदिवासाचें शल्य कधीच विसरत नाही, असें सांगतात. पुढे पुण्यातील मद्यपानविरोधी आंदोलनात स्वयंसेवकांना निरोधन करण्याला बंदी झाली असताना टिळकांनी ही बंदी उठविण्याविषयी चर्चा करण्याकरिता राज्यपालांची भेट मागितली. ही भेट कधी घडून आली नाहीच, पण टिळकांनी आपली भेट मागितली, हीच अभिमानास्पद गोष्ट वाटून राज्यपालांनी भारतसचिवांना लिहिलेल्या पत्रात तसा उल्लेख केला. त्यानंतर ९-६-१९०८-च्या पत्रात सर जॉर्ज यानी लिहिलें आहे.

I had a little tussle with my Council over the '*Kesari*'. Both members are particularly anxious to catch Tilak, and clearly if he could be retired from public life for a time, it would be a great advantage, not to this Presidency alone.

Our legal remembrancer and Acting judge advocate think we could succeed. I felt somewhat doubtful. All opinion being against me, I compromised by agreeing to abide by the judgement of Inverarity who is perhaps the greatest Barrister in India.

याचा सारांश असा की सर जॉर्ज क्लार्क यांच्या कार्यकारिणीने टिळकांना अटक करण्याचा आग्रह धरला. सरकारी तज्ज्ञांचें आणि सरकारी विधिविशारदांचें मत अटकेला अनुकूलच होतें. पण स्वतः राज्यपालांनाच शंका वाटत होती, शेवटी त्यांनी बॅ. इन्व्हरॅरिटी यांचें मत घेतलें. तेंही अटकेला अनुकूल पडलें आणि मग टिळकांना अटक झाली. या प्रकरणी पंचांची जी निवड झाली; त्या निवडीत एकही हिंदु नाही हें पाहून लॉर्ड मोर्ले यांनी राज्यपालांना लिहिलें होतें :

The jury seems to have not one Hindu on it, which is a curious result of pure chance. I became familiar with chances, caprices of that kind, when I was Irish Secretary.

म्हणजे एकही हिंदु पंचांत येऊ शकला नाही हा काही केवळ योगायोग नव्हे. असले योगायोग आयर्लंडच्या कारभारात मला सुपरिचित झाले आहेत. असो टिळकांना सांगितलेल्या शिक्षेचा सुपरिणाम सांगताना लॉर्ड सिडेनहॅमनी (सर जॉर्ज क्लार्क) आपल्या आठवणीत लिहिलें आहे :

While moderates gave me no public support, some of them in private told me that they welcomed the action taken.

अर्थात् गोखलेपक्षातील भेकडांनी मला उघड पाठिंबा दिला नसला तरी त्यांच्यातील अनेकांनी मी टिळकांना शिक्षा करविल्याबद्दल माझी स्तुति केली.

देशाचें दुर्दैव

टिळकांना राजद्रोही लेख लिहावयाला येत नसल्यामुळे ते गोखल्यांच्यासारखेच मवाळ होते, असें टिळकशत्रूंचें मत असलें तरी वस्तुस्थिति मात्र अशी आहे की, १९०८ मधील राजद्रोहाच्या अभियोगाला निमित्तमात्र झालेल्या लेखांपैकी 'देशाचें दुर्दैव' हा लेख स्वतः टिळकांनी लिहिला होता आणि त्या लेखातील विचारसरणी अहिंसकांच्या विचारसरणीच्या सपशेल उलट असल्याने टिळकांचे लेख राजद्रोही आहेत, असा स्पष्ट अभिप्राय गांधींनी त्यांच्या 'इंडियन ओपीनियन' या पत्रात व्यक्त केला होता. तो अभिप्राय पुढे मी उद्धृत करीन. " हिंदुस्थान देश

आज पुष्कळ वर्षें परकी राज्याच्या सत्तेखाली असल्यामुळे हिंदी लोकांच्या अंगचें तेज, आवेश अथवा त्वेष पुष्कळ कमी झालेला आहे खरा; पण काही झालें तरी या त्वेषाचें अथवा संतापाचें मान शून्य अंशावर येऊन तो सपशेल गोठून जाणें शक्य नाही. वयोवृद्ध अथवा प्रवीण पुढाऱ्यांस अनुभवाने किंवा विचाराने हा संताप स्वत:पुरता काही विवक्षित मर्यादेच्या आत स्थिर ठेवता येईल; पण देशातील यच्चयावत् लोकांस आपला आवेश, संताप किंवा चीड अशा रीतीने मर्यादेच्या आंत नेहमीच ठेवता येणें अशक्य आहे. **किंबहुना अशा रीतीने हा संताप ज्या देशात सदैव विवक्षित मर्यादेच्या आतच राहू शकतो, त्या देशातील लोकांच्या कपाळी ब्रह्मदेवाने चिरंतन दास्य लिहिलेलें आहे**, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही." टिळकांच्या लिहिण्याचा सारांश असा की, आम्ही काय वाटेल तो छळ करू, वाटेल त्यास विनाचौकशीने काळचा पाण्यावर पाठवू, वाटेल तो प्रांत विभागू, वाटेल ती सभा बंद करू, किंवा वाटेल त्यावर राजद्रोहाचे खटले भरून त्यास तुरुंगांत पाठवू, तुम्ही मात्र या गोष्टी मुकाट्याने सहन करून आपला संताप, त्वेष किंवा आवेश विवक्षित मर्यादेच्या बाहेर जाऊ देऊ नये, असें राज्यकर्त्यांनी आपल्या प्रजेस सांगणें म्हणजे सामान्य मनुष्यस्वभावाची आपणांस ओळख नाही, असें जगास प्रदर्शित करणेंच होय.

मनुष्य बनण्याचा उपदेश

वस्तुस्थिति अशी होती की, त्या दिवसांत भारतातील मानव म्हणजे केवळ द्विपाद पशु अशी इंग्रज राज्यकर्त्यांची आणि त्यांचे अनुयायी गोखल्यांच्यासारखे नेमस्त पुढारी यांची समजूत होती. बहुजनसमाजाच्या शक्तीला गोखल्यांनी Brute force म्हणून संबोधिल्यावरून टिळकांचा आणि त्यांचा १८९५ मध्येच वाद झाला होता. या द्विपाद पशूंना त्याच अवस्थेत डांबून ठेवण्याचा इंग्रजांचा आणि त्यांच्या अनुयायांचा प्रयत्न चालू असताना त्यांना विरोध करून टिळक आणि राष्ट्रीय पक्षातील इतर नेते बहुजनसमाजाला मानवाप्रमाणे वर्तन करण्याचें शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत होते. बंगालचे सुप्रसिद्ध राष्ट्रीय नाटककार द्विजेंद्रलाल राय यांनी त्यांच्या 'मेवाडपतन' या श्रेष्ठ नाटकात 'पुनश्च आपण मनुष्य व्हा' (आबार तोरा मानुष हो) हाच संदेश दिला आहे. रंगभूमीवर या मंत्राचा मुक्तकंठाने प्रचार करता यावा, यासाठी त्यांनी या मंत्राला आत्मसंशोधनाचें स्वरूप दिलें आहे.

गियेछे देश दुःख नाई–आबार तोरा मानुष हो
परेर परे केन ए रोष, निजेरइ यदि शत्रु होस,
तोदेर ए जे निजेरइ दोष–आबार तोरा मानुष हो.

तुम्ही परत मानव झालात, तर देश गेल्याचेंही दुःख नाही. तुम्ही स्वतःच स्वतःचे शत्रु झालात, तर लोकांवर कां राग करता ? हा सारा तुमचाच दोष आहे, तेव्हा तुम्ही परत मनुष्य बना. ही जी राष्ट्रीय पक्षाची भूमिका होती, तिला अनुसरूनच टिळक हे भारतीयांना मानवस्वभावाला अनुसरून रागद्वेष व्यक्त करण्याचें शिक्षण देत होते. मनुष्यस्वभावाला उचित अशा भावना व्यक्त करण्याला उत्तेजन देण्याच्या अपराधासाठीच सरकारने टिळकांना सहा वर्षांची शिक्षा देवविली.

अभियुक्तांच्या बचावाचा प्रश्न

१८९७ मध्ये टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेविला, त्या वेळी त्यांच्या बचावासाठी निधि गोळा करण्यात बंगाल प्रांतानेच पुढाकार घेतला होता. पण पुढे १९०६ मध्ये भालाकार भोपटकरांवर जेव्हा तोच प्रसंग ओढवला, तेव्हा त्यांचा बचाव करणाऱ्या विधिविशारदांनी जवळजवळ असेंच म्हटलें होतें की "हें काय बोलून चालून एका भंगटासारखें लिहिलें आहे, तें केवळ संपादक महाशयांचें कल्पनाचित्र म्हणून न्यायमूर्तींनी तें मनावर न घेता 'आरोपीला' सौम्यपणानेच वागविलें पाहिजे." याचा अर्थ इतकाच की आमच्या अशिलाने मूर्खपणाने काही तरी लिहिलें आहे, तेव्हा त्याला शिक्षा होणारच, पण ती थोडी द्या म्हणजे झालें." (या प्रसंगी मी लिहिलेलें मूळ पान हरवलें, म्हणून केळकरांच्या गतगोष्टीतून वरील अवतरण घेतलें आहे.) अशा प्रकारचा अनुभव आल्यानंतर क्रांतिकारकांच्या केंद्र समितीने असें ठरविलें की, इतःपर राजद्रोहाचा आरोप ठेवलेल्या अभियुक्तांच्या बचावाकरिता निधि जमवून तो विधिविशारदांना समर्पण करण्यात काहीच अर्थ नाही. आरोपींनी वाटल्यास स्वतःच आत्मसमर्थन करावें, नाहीतर परकी सरकारच्या न्यायालयांचा आपली चौकशी करण्याचा अधिकारच अमान्य करून आपल्या वाट्याला यदृच्छेने येईल, ती शिक्षा भोगावी. या संकेताला अनुसरून 'युगांतर'चे भूपेंद्रनाथ दत्त हे प्रथम स्वतःचा बचाव न करता दिलेली शिक्षा भोगावयाला बंदिशाळेत गेले. त्यांच्या मागून 'संध्या' पत्राचे ब्रह्मबांधव उपाध्याय, तसेंच युगांतरचे आणखी दोन संपादक यांनीही बचाव करण्याचें नाकारलें. याच संकेताला अनुसरून टिळकांनी स्वतःचें समर्थन स्वतःच करण्याचा शिवरामपंत परांजप्यांना उपदेश केला होता. त्यांच्या

मागून टिळकांना अटक झाली, तेव्हा त्यांनीही आपला बचाव आपणच करावयाचें ठरविलें. इथे हीही गोष्ट सांगितली पाहिजे की माणिकतोळा येथील अग्निगोलांच्या कटात अरविंदबाबूंना अटक झाल्याची वार्ता कळताच टिळकांनी एका विश्वस्त व्यक्तीकडून त्यांना कलकत्त्याला चार सहस्र रुपये पोचविले, असें बंगाली रक्षकविभागाचें प्रतिवृत्त आहे.

ब्रॅन्सनपुत्राची थाप

वरील सारा इतिहास अवगत नसल्याने रा. धनंजय कीर यांनी आपल्या टिळकचरित्रात लिहिलें आहे:

It appears that Tilak's friends were persuading Branson to resign and to take up his defence. Branson's son Major L. H. Branson writes that Tilak and his friends offered his father F. 21000 as one day's fee if he would give up being the Advocate General and would defend the case.

टिळक आणि त्यांचे मित्र म्हणे ब्रॅन्सन यांना एक दिवस त्यांचें समर्थन करण्याकरिता २१००० पौंड देण्याला सिद्ध झाले होते या थापा ब्रॅन्सनपुत्रांनी आपल्या पुस्तकात लिहिल्या असल्या तरी धनंजय कीर यांच्यासारख्या विवेकी चरित्रकारांनी त्या आपल्या चरित्रात उतरून घेण्याचें काहीच कारण नव्हतें. १९०८ मध्ये टिळकांवरील आरोपांचें समर्थन करताना ब्रॅन्सन महाशयांनी इतकी अश्लाघ्य भाषा वापरली की मुंबईच्या जनतेने त्यांच्यावर सपशेल बहिष्कार घातला. त्यामुळे त्यांचा व्यवसाय बसून त्यांना निराशेने अतिपानाचें व्यसन जडून त्यांचा अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या चिरंजीवांनी, मुंबईकरांनी आपल्या पिताजीवर घातलेल्या बहिष्काराची भरपाई सरकारने करावी, अशी मागणी करून सरकारकडून आपल्या मातेला भरपूर द्रव्य मिळवून दिलें. पुढे टिळकांच्या सुटकेनंतर त्या निर्लज्ज बाईने टिळकांकडेही द्रव्यसाहाय्याची याचना करून त्यांना पत्र लिहिलें. तें त्यांच्या पत्रव्यवहारात छापलें आहे. (या बाईनासुद्धा कदाचित् टिळकांनी साहाय्य केलें असावें.) असें ज्यांचें शील, त्या कुटुंबातील व्यक्तींनी सकृद्दर्शनीच असंभवनीय दिसणाऱ्या काही थापा ग्रंथनिविष्ट करून ठेविल्या असल्या, तरी त्यांच्याकडे इतिहास या नात्याने लक्ष देण्याचें कारण नाही.

आंग्लभारती पत्रकर्त्यांवरील आरोपपत्रक

१९०८ च्या अभियोगाच्या प्रसंगी टिळकांनी स्वतःचा बचाव करण्याकरिता भाषण केलें असें म्हणण्याचा प्रघात असला तरी त्यांचें भाषण

हें वस्तुतः आंग्लभारती वर्तमानपत्रांच्या संपादकांनी १५३ अ या निर्बंधाचा भंग केल्याचा आरोप सिद्ध करणारें भाषण होतें. हें माझें मत नसून स्वतः महम्मदअली जीना यांचा हा अभिप्राय आहे. आठवणींच्या तिसऱ्या खंडात ते म्हणतात :

He was determined not so much to secure his release, but to establish that the Anglo-Indian was guilty of defaming India and the Indian people, which was as much a libel and the Government did not take any steps against them.

आपली सुटका व्हावी यासाठी नव्हे, तर आंग्लभारती पत्रकर्ते भारत आणि भारतीय जनता यांची निंदा करून जातिद्वेषाचें विष, वंशद्वेषाचें विष पसरवीत असूनही सरकार त्यांच्याविरुद्ध कोणतीही कृति करीत नाही, हें सिद्ध करण्याकरिताच टिळकांनी आत्मसमर्थनाचें भाषण पांच दिवस चालविण्याचे कष्ट केले. दावर यांच्या न्यायालयात टिळकांनी आत्मसमर्थनाच्या निमित्ताने आंग्लभारती पत्रकर्त्यांचीं पापें सिद्ध करण्याकरिता आपल्या कौशल्याची पराकाष्ठा केली, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे त्यांच्या फाटक्यातुटक्या टीकाकारांनी राजद्रोहाच्या आरोपापासून स्वतःचा बचाव करण्याइतके टिळक भेकड होते, असा जो आरोप आणि वभ्रा चालविला आहे, त्याचें परस्परच निराकरण होतें. आंग्लभारती पत्रकर्त्यांवरील आरोप सिद्ध करण्याइतकें भाषण लांबविण्याची संधि मिळण्याकरिता टिळकांना आपण आत्मसमर्थनासाठी भाषण करीत असल्याचा देखावा करणें भागच होतें. नाहीतर आंग्लभारती पत्रकर्त्यांवरील त्यांची टीका असंबद्ध ठरवून न्यायमूर्तींनी त्यांचें भाषण केव्हाच बंद पाडलें असतें. राजद्रोहासाठी दोनदा बंदिवास भोगूनसुद्धा एकाही वेळच्या राजद्रोही लेखाचें श्रेय टिळकांच्या दुर्दैवाने त्यांना लाभू दिलें नाही, असाही एक अपवाद टिळकशत्रूंनी त्यांच्या चरित्राला लावला आहे. पण टिळकांवरील राजद्रोहाच्या आरोपांना लेख हे केवळ निमित्तमात्र असून त्यांच्या इतर कर्तृत्वामुळेच त्यांचा कारावास अटळ झाला होता. तसा लेखक खाडिलकरांचा झाला नव्हता, इतकें सांगितलें म्हणजे पुरे.

टिळकांच्या बचावाच्या भाषणावरील रूसी दूतांचा अभिप्राय

टिळकांच्या बचावाच्या भाषणावरील रूसी व्यापारविषयक राजदूत बॅरन गायकिंग यांचा अभिप्राय रूसी लेखकांनी अलीकडे उजेडात आणला आहे. ते म्हणतात :

Most essential however was the sharp anti-imperialist and highly patriotic spirit of the address. Significant in this aspect is the impression it made on the Russian Consul-General in Bombay, Baron Geiking, who judging from his own statements, had no sympathy for the national liberation movement or Tilak. In one of his letters he wrote that Tilak made a speech in court utterly forgetting that he was defending himself, and instead, passionately deprecating the regime existing in India. He is an interesting type of an ardent revolutionary.

टिळकांचें भाषण साम्राज्यवादाच्या तीव्र विरोधाने आणि देशभक्तीच्या उच्च भावनेने ओतप्रोत भरलें होतें. स्वातंत्र्याचें आंदोलन आणि टिळक यांजविषयी मुंबईतील रूसी व्यापारविषयक राजदूत बॅरन गायकिंग यांना मुळीच सहानुभूति नव्हती. त्यांनी आपल्या सरकारी प्रतिवृत्तात लिहिलें होतें की आपला बचाव करण्याचें उद्दिष्ट सर्वस्वी विसरून टिळक इंग्रजी राज्याची तीव्र निंदा करीत होते, ते एक लक्ष देण्याजोगे ज्वलंत क्रांतिकारक दिसतात.

टिळकांचें न्यायालयातील भाषण

टिळकांच्या न्यायालयातील भाषणासंबंधी समकालीन पत्रकर्त्यांचे अभिप्राय वाचले, तरी त्यांच्या 'बचावाचें' सत्यस्वरूप वाचकांना कळून येईल. त्या वेळी 'बॉंबे गॅझेट'कारांनी लिहिलें आहे: "आपल्याला शिक्षा होईल, हें टिळकांना दिसत होतें. त्यांनी केलेलें भाषण पंचांकरिता, न्यायाधीशांकरिता अथवा न्यायालयातील प्रेक्षकांकरिता नसून देशातील जनतेकरिता, विशेषतः पुण्यातील आणि बंगाल्यातील अराजनिष्ठांकरिता होतें." 'ॲडव्होकेट ऑफ इंडिया' या पत्रानेही स्वतःचा अभियोग चालविण्यात टिळकांनी चूक केली, असा आक्षेप घेऊन पुढे म्हटलें होतें: "त्यांनी आपल्या भाषणात बचावाला उपयोगी पडण्याजोगें काहीच विवेचन केलें नाही किंवा आपले लेख टीकेच्या मर्यादेत आहेत असेंही दाखविलें नाही. मुझफरपूरच्या अत्याचारासंबंधी आंग्लभारती पत्रांनी लिहिलेले प्रक्षोभक लेख त्यांनी प्रकाशात आणले, ही गोष्ट योग्य केली. त्यांच्यावर टिळकांनी केलेली खरमरीत टीका अगदी उचित होती." 'जामे जमशेद'च्या संपादकांनीही हीच टीका केली आहे. "आपण निरपराधी आहोत असें सिद्ध करण्याचा यत्किंचित् प्रयत्न न करता अपराध करण्याला आपण उद्युक्त कसे झालो, हेंच दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. राजकीय दृष्टया त्यांचें भाषण जोरदार झालें, यात संशय नाही. पण बचावाच्या

दृष्टीने तें अगदी निरुपयोगी होतें, असें म्हटल्यावाचून राहवत नाही." 'अखबारे सौदागर' या पत्राने लिहिलें आहे, ' बाँब प्रकरणातला केसरीचा दुसरा लेख (खाडिलकरांचा लेख) फारच भयंकर होता. या लेखात वंगाल्यातील अत्याचारांचें मोठ्या कुशलतेने अभिनंदन केलें होतें. वाचकांच्या मनात बाँब उडविण्याची इच्छा उत्पन्न करणारा आणि सरकारला धमकी देणारा हा लेख होता. 'निःशस्त्र प्रजेस सशस्त्र सैनिकांशी झुंज घेण्याला अग्निगोल हें अपूर्व साधन आहे, असेंच त्यांनी आपल्या लेखात ध्वनित केलें होतें. ' (स्टेट्समन कलकत्ता)

टिळकांच्या शिक्षेवर गांधींचा अभिप्राय

टिळकांना शिक्षा झाल्यानंतर इतरांनी लिहिलेल्या लेखांपेक्षा गांधींनी इंडियन ओपीनिअन पत्रात लिहिलेला लेख व्यक्तिमाहात्म्यामुळे आणि गांधींच्या विशिष्ट विचारसरणीमुळे विशेष महत्त्वाचा आहे. तेव्हा तो समग्र उद्धृत करून मग त्याची चिकित्सा केली पाहिजे.

The sentence passed on Tilak, the great patriot, is terrible. The few days' imprisonment which the Transval Indians suffer is as nothing compared to transportation for six years. The sentence is not so much surprising as terrible. At the same time there is nothing to be unhappy about. It is not surprising that a government we seek to defy should inflict oppressive measures on us. Mr. Tilak is so great a man and scholar that it would be impertinent in this country to write of his work. He deserves to be adored for his work in the service of the motherland. His simplicity is extraordinary; but the light of his scholarship has reached even Europe. Yet we should not blindly follow the policies of those whom we regard as great. It would be casting a reflection on Mr. Tilak's greatness to argue that his writings had no bitterness in them or to offer some such defence. Pungent, bitter, and penetrating writing was his objective. He aimed at inciting Indians against British rule. To attempt to minimise this would be to detract from Mr. Tilak's greatness. The rulers are justified from their point of view, in taking action against such a man. We would do the same in their place. If we look at the matter thus, we realize that we need not feel bitter towards them. Mr. Tilak however deserves our congratulations. He has by his suffering attained undying fame and laid the foundations of India's freedom. If the people instead of being overaw-

ed at the sentence passed on Mr. Tilak, or being intimidated by it, rejoice at it and keep up their courage, the sentence will in the sequel prove to have been a blessing. What we need to consider is whether Indians should accept the views of Mr. Tilak and his party. We submit after great deliberation, that Mr. Tilak's views should be rejected. India's welfare does not consist in merely uprooting British rule. It will be harmful, even useless to use force or violence for uprooting that rule. Freedom gained through violence would not endure, and the sufferings to which the people of Europe submit, would also become our lot then. As for the masses, they would merely pass from one form of slavery to another. No one will gain this way, and almost everyone will lose. That is what the result would be. We believe that the easiest way to make the British rule beneficient is to adopt the way of Satyagraha. If the Britsh rule becomes tyrannical, it will come to an end, as soon as the British Government attempts to resist Satyagraha. If the same workers who went on strike in protest against the sentence on Mr. Tilak were to become satyagrahis, they would be able to get the government to agree to any reasonable demands. What is our duty in this context? Though Mr. Tilak and other great Indians like him differ from us, we should continue to hold them in the highest esteem. We must emulate them in their capacity to suffer. Since they are great patriots, we must consider no honour too great for them, and act in the same spirit of patriotism. Their object is the same as ours, to serve the motherland and to work for its prosperity. Compared to what they have been doing to secure that end, the course we have chosen is not in the least difficult. But we are convinced that the outcome of our exertions will be a thousand times better.

वैचारिक गोंधळाचा नमुना

गांधींचा हा लेख त्यांच्या नेहमीच्या वैचारिक गोंधळाचा नमुनाच आहे. भारतीय लोकांना ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध चिथावणी देणें हा टिळकांचा हेतु असल्याचें नाकारणें म्हणजे त्यांच्या मोठेपणाला न्यूनता आणण्यासारखें आहे. असल्या व्यक्तीला राज्यकर्त्यांनी तुरुंगात टाकलें, यात नवल नाही. त्यांच्या स्थानी आम्ही असतो, तर आम्हीही तेंच केलें असतें. तेव्हा टिळकांना शिक्षा झाली म्हणून मनात कडवट भावना उत्पन्न

होण्याचें काही कारण नाही. उलट टिळकांचें आपण अभिनंदनच करावयाला पाहिजे. त्यांच्या छळामुळे त्यांना चिरंतन कीर्ति लाभली आहे आणि भारताच्या स्वातंत्र्याचा पाया त्यांनी घातला आहे. टिळकांना झालेल्या शिक्षेमुळे लोकांनी भिऊन न जाता उलट आनंदच मानला पाहिजे आणि आपलें धैर्य (टिळकांना विरोध करण्याचें धैर्य ?) टिकविलें पाहिजे, मग ही शिक्षा म्हणजे आशीर्वादच ठरेल. मुख्य प्रश्न हा आहे की आपण टिळकपक्षाचीं मतें स्वीकारावयाचीं कीं नाही? आमचा अभिप्राय असा आहे की टिळकांचीं मतें आपण झिडकारलीं पाहिजेत. केवळ ब्रिटिश सत्तेचा उच्छेद करून भारताचें कल्याण होणार नाही. त्या सत्तेचा उच्छेद करण्याकरिता शक्तीचा अथवा हिंसेचा प्रयोग करणें घातुकच नव्हे तर निरुपयोगीही होणार आहे. हिंसा करून मिळविलेलें स्वातंत्र्य टिकावयाचें नाही आणि सध्या युरोपातील देशांना जसे हाल भोगावे लागतात, तसेच हाल आपल्यालाही भोगावे लागतील. स्वातंत्र्य लाभलें तरी सर्वसाधारण जनतेला एका दास्याच्या स्थानी दुसऱ्या दास्याचा अनुभव घ्यावा लागेल. अशा प्रकारे कोणाचाच लाभ होणार नाही आणि बहुतेक सर्वांची हानिच होईल. ब्रिटिशांची सत्ता आपल्याला हितकारक करून घेण्याचा सोपा उपाय म्हणजे सत्याग्रह. ब्रिटिश राज्यकर्ते जर सत्याग्रहाला विरोध करून लोकांचा छळ करतील, तर त्यांचा लगेच अंत होईल. टिळकांच्या शिक्षेविरुद्ध मुंबईच्या कामगारांनी संप करण्याच्या स्थानी जर सत्याग्रह केला असता तर सरकाराला त्यांच्या विवेकपूर्ण मागण्या मान्य कराव्या लागल्या असत्या. या सर्व विवेचनावरून एक गोष्ट कळून येते की त्या दिवसांत गांधींना स्वातंत्र्याचें भय वाटत होतें, टिळकांना झालेली शिक्षा न्याय्य वाटत होती, इतकेंच नव्हे तर त्या शिक्षेचा त्यांना आनंदच वाटत होता. त्यांना झालेली शिक्षा म्हणजे स्वपक्षाला मिळालेला आशीर्वादच अशी त्यांची भावना झाली होती. देशभक्तीचा आपला मार्ग अत्यंत सोप्यातला सोपा असून, टिळकपंथापेक्षा तो सहस्र पटीने फलदायक असल्याचा त्यांना आत्मविश्वास वाटत होता.

चिरंतन राज्याचें चंचल राज्यात परिवर्तन

टिळक ज्या क्रांतिकारक पक्षाचे प्रमुख नेते होते, त्या पक्षाचें कार्य किती प्रभावी आणि यशस्वी झालें, याची सामान्य जनांना काहीच कल्पना नाही. कारण क्रांतिकारकांना मिळालेलें यश लपवून ठेवून त्यांनी आपल्या धोरणाने देशाचा घात केला, असा प्रचार करीत राहणें, हा

इंग्रजी राज्य टिकविण्याचा एक उत्कृष्ट उपाय होता, आणि त्याचा अवलंब इंग्रजांनी शेवटच्या घडीपर्यंत अविरत केला. युद्धातून आपले झालेले पराजय लपवून ठेवून शत्रूचाच पराजय झाला असल्याचा असत्य प्रचार अखंडितपणे करून यशस्वी होण्याची इंग्लंडची परंपरा फार प्राचीन आहे. त्यामुळे आमच्या क्रांतिकारकांनी अटकेतून आपल्या यशाची जी घोषणा केली, ती घोषणा देशाच्या कानावरही आली नाही, मग तिच्या-वर त्यांच्या देशबांधवांनी विश्वास ठेवला नाही, हें वेगळे सांगावयाला नकोच. इंग्लंडात अटक झाल्यानंतर सावरकरांनी येसूवहिनींना लिहि-लेल्या काव्यमय पत्रात म्हटलें,

'नाही पुरीं उलटलीं जरि आठ वर्षें,
तों कार्यसिद्धि इतुकी मन कां न हर्षे ?
आसेतुपर्वत उचंबळला स्वदेश ।
वीराकृति धरित टाकुनि दीनवेष
भक्तांचिया रघुपदी झुलतात झुंडी ।
जाज्वल्य होयहि हुताशन अग्निकुंडी.

अवघ्या आठ वर्षांत भिक्षांदेही पक्षाचा त्याग करून, आसेतुहिमाचल देशाने याचकाचा दीनवेष टाकून, वीरवेष धारण केला आणि स्वातंत्र्य-रूपी रघुनाथाच्या पदावर भक्तांच्या झुंडी झुलू लागल्या, आत्मार्पणाच्या यज्ञकुंडातील हुताशनही जाज्वल्य झाला. याचा प्रभाव इंग्रजांवर किती पडला, याचें वर्णन करताना लॉर्ड मिंटो यांचे वैयक्तिक कार्यवाह डनलॉप स्मिथ यांचा चरित्रकार 'सर्व्हंट ऑफ इंडिया' या पुस्तकात लिहितो.

The British in India could never know how widespread the terrorism might become. And for the first time since Queen Victoria was proclaimed Empress, the question had to be faced, how long would British Sovereignty last ? Lord Curzon assumed that it would never die. Yet within four years of his departure from India, almost all confidence had disappeared and men lived in a turmoil of doubt and disillusion.

क्रांतिकारकांचें जाळें किती दूरवर पसरू शकेल, याची इंग्रजांना काहीच कल्पना येणें शक्य नव्हतें आणि त्यामुळे व्हिक्टोरिया राणीने सम्राज्ञीपद धारण केल्यापासून प्रथमच इंग्रजी राज्य भारतात आणखी किती दिवस टिकणार, या प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रसंग आला होता. भारतातील इंग्रजी राज्य अजरामर आहे, असें लॉर्ड कर्झन गृहीत धरून चालत असत. पण त्यांच्या त्यागपत्रानंतर चारच वर्षांत हा सारा विश्वास

मावळून इंग्रज राज्यकर्ते संशय आणि भ्रमनिरास यांच्या हताश अंधकारात चाचपडू लागले.

लॉर्ड मिंटोंचें पत्र

इंग्रज राज्यकर्त्यांच्या अंतःकरणात अशी असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याने त्यांनी भारतीयांचा अधिकाधिक छळ करण्याचें धोरण अवलंबिलें होतें. लॉर्ड मिंटो यांनी भारतसचिवांना लिहिलेल्या एका पत्रात म्हटलें आहे :

As to Tilak and recent prosecutions and sentences, I can only say that the beneficial effect of them is most evident. Personally I don't think a year's imprisonment for stone throwing the least too severe, but I speak feelingly as I was more than once under fire at Calcutta, a missile having one night only just missed my head, cutting through the window of our motor car, on my way down to Barrackpore. You very nearly had an empty Viceregal Gadi to deal with. The feeling of personal danger throughout India is a quite justifiable one and the haunting apprehension of what may happen to women and children is, I am certain, not understood at home.

टिळक प्रकरण, इतर अभियोग आणि शिक्षा यांच्याविषयी मला इतकेंच सांगावयाचें आहे की त्यांचा परिणाम फार चांगला झाला आहे. दगडफेकीसाठी एक वर्षाची शिक्षा मला मुळीच कडक वाटत नाही. हें सारें मी स्वानुभवाने बोलत आहे. कलकत्त्यात माझ्या गाडीवरही एकाहून अधिक वेळा गोळीबार झाला आणि मोटारीच्या काचा फुटून माझ्या मस्तकाजवळून गोळी गेली. थोडक्यात चुकलें, नाहीतर राजप्रतिनिधींच्या गादीसाठी तुम्हांला दुसरा वारस शोधावा लागला असता. या वैयक्तिक धोक्याची इंग्लंडातील लोकांना काही कल्पना नाही. मिंटोवरील या गोळीबाराचा क्रांतिकारकांच्या इतिहासात उल्लेख येत नाही. हें काहीतरी वैयक्तिक सूड घेऊ इच्छिणाऱ्यांचें प्रकरण असेल. लॉर्ड मिंटो यांनी आपला दूधवाला बदलला म्हणून पहिल्या दूधवाल्याने त्यांच्या दुधात विष घातल्याची मनोरजक कथा त्यांच्या पत्नीने आपल्या आठवणीत लिहिली आहे. पण लॉर्ड मिंटो यांच्यावर राष्ट्रीय सूड घेतला काय किंवा वैयक्तिक सूड घेतला काय, दोनही घटनांचा परिणाम एकच झाला असता. लॉर्ड मिंटो यांच्या वरील पत्राचा विलंबित परिणाम म्हणजे भारताच्या राजधानीचें स्थलांतर होय. राजप्रतिनिधींना आणि

त्यांच्या परिवारातील प्रमुख व्यक्तींना त्यांच्या जीविताची धास्ती वाट लागल्यामुळेच लॉर्ड मिंटो यांनी स्वकर्तृत्वाने वश करून घेतलेल्या मुसलमानांची जुनी राजधानी दिल्ली हीच भारताची राजधानी करण्याची क्लृप्ति निघाली. पण तिथेही रासबिहारी बसूंच्या अनुयायांनी लॉर्ड हार्डिज यांच्यावर अग्निगोल टाकून त्यांच्या राज्याच्या अशाश्वतीची जाणीव करून दिली.

✦ ✦ ✦

परिशिष्ट

टिळकांचे निंदक डॉ. माथूर

गोखले चरित्राच्या निमित्ताने टिळकनिंदा !

गांधींचे गुरु गोखले यांच्यावरील लेख लिहिल्यानंतर या विषयाकडे पुन्हा वळावें लागेल, अशी अपेक्षा नव्हती. पण त्यानंतर असें आढळून आलें की, पुण्यातील हनुमान टेकडीच्या पायथ्याशी पेरलेलें टिळकद्वेषाचें बीज राजस्थानातील वाळवंटातही रुजलें असून जयपूर येथील एक आचार्य डॉ. माथूर यांच्या गोखलेचरित्राच्या रूपाने त्या विषबीजाच्या वृक्षाचीं फळें देशभर पसरलीं आहेत. डॉ. माथूर यांनी आपल्या चरित्रात अकारण टिळकनिंदा घुसडल्याबद्दल मुंबईच्या एका इंग्रजी दैनिकाने त्यांना दोष दिलेला पाहून माझे त्यांच्या बहुमोल ग्रंथाकडे (ग्रंथमूल्य ३६ रु.) लक्ष गेलें. हा ग्रंथ चाळताना असें आढळून आलें की या ग्रंथांतील टिळकनिंदा केवळ अकारण आणि अस्थानी नसून अप्रामाणिकपणाचीही आहे. त्यामुळे टिळकांच्या वंशजांचें आणि सरसकट मराठी वाचकांचेंही त्या निंदेकडे लक्ष वेधणें आवश्यक वाटतें.

गोखल्यांची आणि टिळक-आगरकरांची क्षमायाचना

(‘Down to the Apology Incident’) म्हणजे ‘क्षमायाचनेच्या प्रसंगापर्यंत’ या प्रकरणात डॉ. माथूर यांनी १८९७च्या प्लेगाच्या दिवसांत गोऱ्या सैनिकांनी पुण्यात केलेल्या अत्याचारांची वार्ता मँचेस्टर गार्डियनामध्ये प्रसिद्ध केल्याबद्दल गोखल्यांनी केलेली क्षमायाचना आणि कोल्हापूर प्रकरणात टिळक-आगरकरांनी केलेली क्षमायाचना यांची तुलना, मूळ प्रकरणात नव्हे तर त्या प्रकरणाला जोडलेल्या २२ व्या संदर्भात केलेली आहे. या तुलनेत त्यांनी केलेल्या गोखल्यांच्या गुणवर्णनासंबंधी येथे चर्चा करण्याचें कारण नाही, पण ही तुलना करताना त्यांनी टिळक-आगरकरांवर खोटे कागद करण्याचा प्रत्यक्ष अथवा पर्यायाने जो आरोप केला आहे, तो जितका निंद्य तितकाच भ्याडपणाचा आहे. ते म्हणतात :

‘In the Barve case, however, Tilak and Agarkar were both tried and prosecuted by a court of law for actions and omissions that amounted to forgery and a wrong in the eyes of the law. Nevertheless, the two went to the prison as virtual heroes and returned as veritable tribunes.’

वरील वाक्यात उल्लेखिलेले बर्वे हे १८८२ च्या दिवसांत कोल्हापूरचे कारभारी होते आणि त्या वेळचे तेथील अज्ञान महाराज शिवाजीराव यांना डोकें बिघडल्याच्या निमित्ताने बंदिशाळेत ठेवून त्यांचे मुंबई सरकारच्या अधिकारीवर्गाने जे हाल चालविले होते, त्यात या कारभाऱ्यांचें अंग असल्याचा आरोप तेव्हा एकट्या टिळक-आगरकरांनीच नव्हे तर इतरही अनेक पत्रकारांनी केला होता.

छत्रपति शिवाजी महाराजांचे हाल आणि वध

या वेळचे छत्रपति शिवाजीमहाराज हे राजाराम महाराजांचे दत्तकपुत्र होते. या दत्तकाच्याविरुद्ध राजवाड्यातच काही कारस्थानें चालू होतीं आणि त्या कारस्थानांचा परिणाम होऊन अज्ञान महाराजांचे पालक इंग्रज सरकाराने त्यांना वेड लागल्याच्या निमित्ताने बंदिशाळेत ठेवून उपचारांच्या नावाखाली त्यांचा अमानुष छळ चालविला होता. या छळाचा निषेध करण्याकरिता २४-११-१८८१ या दिवशी पुण्यात लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेतील भाषणांचें तात्पर्य असें होतें की, कोल्हापूरकर महाराज वेडे नसून त्यांना वेडे बनविण्यात त्यांच्या एका दत्तक आईचें आणि तेथील कारभाऱ्यांचें अंग असून महाराजांची आणि त्यांच्या पत्नीची निर्दयपणे ताटातूट केली आहे आणि महाराजांना छड्यांचा आणि चाबकांचा रतीब चालू केला असून त्यांना जपण्यासाठी ठेवलेले गोरे डॉक्टर आणि गोरे रखवालदार यांच्या हातून लौकरच त्यांचा वध होण्याची भीति आहे. या प्रकरणी महाराजांच्या जनक घराण्यातील मातुश्री राधाबाई यांनी मुंबईच्या इंग्रज राज्यपालांची भेट घेतली असता त्यांनी उत्तर दिलें की, डॉक्टरांचे उपचार पूर्ण होईपर्यंत तुमच्या मुलाला तुमच्या हातीं देता येत नाही. हें डॉक्टरांचे उपचार २५-१२-१८८३ या नाताळच्या काळरात्री पूर्ण होऊन महाराजांचा गोरा रक्षक ग्रीन याने त्यांना भयंकर मारहाण करून त्यांचा प्राण घेतला. त्या वेळी महाराजांना नगरच्या किल्ल्यात ठेविलें असल्यामुळे या प्रकरणाची चौकशी तेथील पहिल्या वर्गाचे मॅजिस्ट्रेट जॉप यांनी केली आणि आपला अभिप्राय व्यक्त केला की, ग्रीनच्या मारहाणीने महाराजांना मृत्यु आला असला तरी हिंदी लोकांच्या सवयीप्रमाणे महाराजांचीहो प्लीहा भयानक सुजली असल्याने त्यांच्या मृत्यूचा सारा दोष त्या सुजलेल्या प्लीहेकडे जातो. वर असेंही सांगितलें होतें की, हा माझा अभिप्राय महाराजांच्या नातेवाइकांना न रुचल्यास त्यांनी स्वतः होऊन ग्रीनवर खटला भरावा. हा सारा प्रकार उघडकीस आल्यानंतर 'केसरी'कारांनी २२-१-१८८४ च्या

अंकात लिहिलें होतें: "आम्हांस तर या प्रकरणाची इतकी किळस आली आहे की एखादा अन्याय जगात शिवेवाचून राहिला तरी चालेल, पण त्या हतभाग्य राजाच्या संबंधानें ग्रोनचें नांव पुन्हा पुन्हा आमच्या कानी येण्याचें टळेल तर फार नामी होईल. नवीन दत्तक मोठा पाहून घेतला म्हणजे त्याला घोड्याचे चाबूक खाण्याची किंवा वाढलेल्या प्लीहेंवर दाब बसल्याने डोळे पांढरे होऊन प्राणोत्क्रमण होत असताना तीर्थोदका-ऐवजी ग्रीनच्या हातचीं व्हिस्की पिण्याची पाळी येणार नाही. तें कसेंही असो. परंतु २५ डिसेंबरची ती काळरात्र, नगरच्या किल्ल्यातील करवीर-कर महाराजांचा तुरुंगवास, जवळ मायाममतेचें कोणी नाही, अशा अवस्थेत निराशेने बेफाम झालेल्या अर्धवेड्या महाराजांचा संताप आणि त्यांचा ग्रीनसारख्या आडदांड धटिंगण सोजिराशी मारामारीचा प्रसंग, हा सर्व देखावा डोळ्यांपुढे आणला असता मन अजूनही कावरेंबावरें आणि उदास होऊन जातें. महाराजांना निष्ठुरतेने वागविण्यात सद्-बुद्धीनेच जो दुराग्रह मुंबई सरकारने दाखविला तो लक्षात घेतला असता 'The way to hell is paved with good intentions' म्हणजे नरकाला जाण्याचा रस्ता सद्हेतूंच्या फरसांनीच बांधून काढलेला असतो, ही इंग्रजी म्हण खरी आहे, असें वाटू लागतें."

महाराजांचा वध टाळण्यासाठी महाराष्ट्राचा प्रयत्न

महाराजांचा असा अमानुष वध होऊ नये म्हणून १८८१ च्या उत्तरार्धात कोल्हापूर, सातारा, पुणें, मुंबई येथील जागरूक जनतेने आणि पत्रकारांनी आपल्याकडून शक्य तितके प्रयत्न केले. या वेळी महाराज अज्ञान असल्याने कोल्हापूरचा कारभार इंग्रज सरकारच्या वतीने चालत असे आणि कोल्हापूरचे कारभारी रावबहादूर बर्वे यांच्या हातून हा सारा कारभार होत असल्याने जनतेच्या आणि पत्रकारांच्या टीकेचें लक्ष्य बर्वे बनले होते. या वेळी कोल्हापुरात महाराजांना नाहीसे करण्याचे कसे पद्धतशीर प्रयत्न होत आहेत, ते लोकांना प्रत्यक्ष दिसत होते. पण न्यायालयात सिद्ध करण्याजोगा पुरावा उपलब्ध होण्याजोगा नव्हता. महाराजांना ग्रीनने मारल्यानंतर त्यांचें शव हाच प्रत्यक्ष पुरावा लोकांना उपलब्ध झाला. पण असला अमानुष पुरावा पाहण्याचें आपल्या कपाळी येऊ नये, यासाठी तर महाराष्ट्रातील जनतेची सारी तडफड चालली होती. त्या दिवसांत प्रत्यक्ष इंग्रज सरकारावर निर्भयपणे टीका करण्याला लोक भीत होते, म्हणून बर्व्यांचें नाव घेऊन लोकांनी टीकेचा भडिमार चालविला होता. अशा प्रसंगी कोल्हापुरातील काही अविवेकी लोकांनी बर्व्यांच्या हस्ताक्षराची नक्कल करून तीन बनावट पत्रें केलीं

आणि ज्ञानप्रकाशचे तेव्हाचे संपादक वामनराव रानडे यांना दाखविलीं. रानड्यांनी तीं पत्रें टिळक-आगरकर प्रभृति मंडळींना दाखविलीं. टिळकांनी ती न्यायविभागातील अनेक मित्रांना दाखवून त्यांचा अभिप्राय समजून घेतला. त्या सर्वांचा अभिप्राय हीं पत्रें विश्वसनीय आहेत, असाच होता. असा अभिप्राय व्यक्त करणाऱ्यांत स्वतः रावबहादूर रानडे हेही असल्याने वामनराव रानड्यांनी धाडस करून तीं पत्रें 'ज्ञानप्रकाशा'त प्रथम प्रसिद्ध केलीं आणि त्यांच्या मागून टिळक-आगरकरांनी तीं 'केसरी–मराठ्यातही' छापलीं. त्याच वेळी मुंबईचें 'नेटिव्ह ओपिनियन' ठाण्याचें 'अरुणोदय,' पुण्याचें 'पुणें वैभव,' साताऱ्याचें 'महाराष्ट्रमित्र' या साऱ्या पत्रांनीहीं बर्व्यांवर कडक टीका केली होती. पुढे बर्व्यांनी या पत्रांच्या संपादकांवर खटले भरले, तेव्हा या सर्वांनी क्षमा मागून आणि आपल्याला माहिती देणाऱ्यांचीं नावें प्रकट करून आपली सुटका करून घेतली. असो. हीं पत्रें लोकांपुढे आणण्याचा पहिला मान ज्ञानप्रकाशचे रानडे, कोल्हापूरचे एक वकील भिडे आणि बखले या मंडळींचा होता. त्यामुळे त्यांच्यावरील मानहानीचा अभियोग प्रथम चालून त्या मंडळींना कडक शिक्षा झाल्या आणि त्यांनी बचावासाठी पुढे आणलेलीं पत्रें बनावट असल्याचें सिद्ध झालें.

पुरे करा हा जयपुरी नखरा!

पत्रें खोटीं ठरल्यानंतर सभ्य गृहस्थांच्या रीतीला अनुसरून टिळक-आगरकरांनी त्यांच्यावर विश्वास टाकल्याबद्दल पुढील शब्दांत आपला खेद व्यक्त केला. 'ज्या वेळी वर्तमानपत्रात आम्ही विधानें केलीं, त्या वेळी तीं साधार आहेत, असेंच आम्हांस वाटत होतें, पण तीं पत्रें भिडे यांच्या खटल्यात खोटीं ठरल्यामुळे आमचीं विधानेंही निराधार ठरतात. अशा माहितीवर आम्ही इतका विश्वास टाकला, याचें आम्हांस अत्यंत वाईट वाटतें. हें पत्र आम्ही लिहून दिल्यानंतर तुम्ही (बर्व्यांनी) काय करावें, ही गोष्ट सर्वस्वी तुमच्या इच्छेवर अवलंबून राहील. तुम्ही काही केलें अथवा न केलें तरी आम्ही जो खेद व्यक्त करीत आहोत, तो आमच्या पत्रात तसाच निरंतर राहील.' या पत्रावरून असें स्पष्ट दिसून येतें की, प्लेगप्रकरणातील आपलीं विधानें सिद्ध करता येत नाहीत, हें निश्चित झाल्यानंतर गोखल्यांनी जसा खेद व्यक्त केला होता, तसाच निर्भेळ खेद आपलीं विधानें निराधार ठरल्यानंतर टिळक-आगरकरांनीही व्यक्त केला होता. असा खेद व्यक्त केल्यानंतर गोखल्यांना कसलीही शिक्षा भोगावी लागली नाही आणि टिळक-आगरकरांना ती भोगावी लागली. डॉ. माथूर आपल्या पुस्तकात लिहितात :

'If Gokhale upheld truth, and if his courage of convictions was based on morality and ethical approach the tendering of unconditional apology was amply chastening.'

म्हणजे गोखल्यांना सत्याचा अभिमान असला आणि त्यांचा स्वमताचा आग्रह नीतीवर आधारलेला असला तर विनाअट क्षमायाचनेने ते पुरेसे शुद्ध झाले, असे मानता येईल. हाच न्याय टिळक आणि आगरकर यांनाही लावावा लागतो. टिळक आणि आगरकर हे तर खेद व्यक्त करून आणि देहदंड भोगून दुहेरी प्रायश्चित्ताने शुद्ध झाले होते. अशा शुद्ध व्यक्तीवर their actions and omissions amounted to forgery असा निराधार आरोप करणें किती नीचपणाचें कृत्य आहे, याची जाणीव या जयपुरी नखरा करणाऱ्या नामधारी विद्वानांना करून देणें हें टिळकांच्या वंशजांचें कर्तव्य आहे.

खोटे कागदपत्र करण्याचा निराधार आरोप

बर्वे प्रकरणात खोटे कागदपत्र करण्याचा आरोप डॉ. माथूर यांनी टिळक--आगरकरांवर केला असला तरी या प्रकांडपंडितांना हा साधा व्यवहार माहीत नाही की, खोटे कागद करण्यासंबंधीचा खटला स्वतः सरकार भरते. सरकारला असला काही संशय आला असता तर रावबहादूर बर्व्यांच्या स्थानी स्वतः मुंबई सरकारच फिर्यादी म्हणून उभें राहिलें असतें. सरकारला टिळकांच्या संबंधात असला काही संशय आला असता तर मुंबईच्या राज्यपालांनी पुढे टिळक विधिमंडळात निवडून आल्यानंतर त्यांच्या निवडणुकीला संमतिही दिली नसती. ताईमहाराज प्रकरणात टिळकांवर खोटे कागदपत्र करण्याचा आरोप ठेवता येतो की काय याविषयी पुण्याचे रक्षकप्रमुख ब्रुइन यांना चौकशी करावयाला सांगितलें असता त्यांनी स्पष्टपणे आपला अभिप्राय दिला. 'The charge of forgery would not stand.' (स्वातंत्र्यप्राप्तीच्या इतिहासाचीं साधनें खं. २ पान १९५) टिळकांच्या साऱ्या छिद्रांचें अन्वेषण करण्याकरिता नेमलेल्या रक्षक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही आपलें मत देताना म्हटलें आहे,

'Amongst natives he is considered to be moral and strictly honest in all pecuniary dealings.'

तेव्हा टिळकांच्यावर खोटे कागद करण्याचा आरोप टिकणार नाही, तसेंच समाजात त्यांच्या नीतिमत्तेविषयी आणि आर्थिक व्यवहारातील प्रामाणिकपणाविषयी कोणालाच कसलीही शंका नव्हती, या गोष्टी रक्षकविभागाच्या प्रतिवृत्तांवरूनही सिद्ध होतात. असल्या

नीतिमत्तेच्या पुतळ्यावर निराधार आरोप करणें आणि पुन्हा हे आरोप पर्वते यांच्या टिळक-चरित्रातून उतरून घेतले आहेत असें सांगून वर भागवत-प्रधानांच्या ग्रंथाचाही हवाला देणें ही हलकटपणाची परिसीमा आहे. या दोनही ग्रंथांतून टिळक-आगरकरांना बनावट कागदपत्र करण्याच्या आरोपावरून शिक्षा झाली होती असा दूरान्वयाने संशय येण्याजोगा सुद्धा काहीही मजकूर नाही. आपल्या नांवांना अशा प्रकारे काळिमा लावण्याबद्दल त्या ग्रंथकारांनीही डॉ. माथूर यांचें कर्णोत्पाटन करणें आवश्यक आहे. विवेचनाच्या ओघात राहून गेलेल्या एका गोष्टीचा इथे उल्लेख केला पाहिजे. या प्रकरणातील बनावट पत्रांवर रावबहादूर रानड्यांनीही विश्वास ठेवला होता, हें वर आलेंच आहे. त्यांनी तशी साक्ष न्यायालयात द्यावयाला हवी होती, असा आगरकरांचा ग्रह आणि आग्रह होता, असे त्यांनी आपल्या बंदिवासाच्या वर्णनात व्यक्त केलेल्या विचारांवरून दिसून येतें. पण एका न्यायाधीशाने आपण होऊन दुसऱ्या न्यायाधीशापुढे साक्षीदार या नात्याने उभे राहून उलट तपासणीला तोंड देणें हें एकंदरीने न्यायाधीशांच्या प्रतिष्ठेला किती लांच्छनास्पद आहे, याची त्यांना जाणीव नव्हती. तेव्हा या प्रसंगी रानड्यांनी साक्ष देण्याचें नाकारलें असल्यास त्यांना मुळीच दोष देता येत नाही.

गोखल्यांचा टिळकांना निर्वाणीचा संदेश

१९१५ मधील समेट प्रकरणातही गोखल्यांनी टिळकांच्यावर कसा संपूर्ण विजय मिळविला होता, याचें वर्णन करून डॉ. माथूर यांनी चक्क खोटा इतिहास जगापुढे मांडला आहे.

डॉ. माथुर यांच्या पुस्तकातील ३३२ पानावरील उतारा वाचून मला तर हसूच लोटलें. गोखल्यांच्या भारतसेवकसमाजातील डॉ. देवांच्यासारखा सभासद म्हणे टिळकांच्याकडे जाऊन त्यांना निर्वाणीचा संदेश सांगतो की तुम्ही गोखल्यांच्यावरील टीका बंद केली नाहीत तर गोखले सुब्बारावांशी झालेलीं टिळकांचीं संभाषणें, त्यांनी भूपेंद्रनाथ बसूंना लिहिलेलें गुप्त पत्र, तसेच मांडलेला जाण्यापूर्वी टिळकांनी केलेल्या भाषणांचे उतारे इत्यादि बाड प्रसिद्ध करतील. या धमकीला भिऊन टिळकांनी म्हणे २६ जानेवारीच्या अंकात प्रसिद्ध व्हावयाचा एक परिच्छेद काढून ठेविला आणि गोखल्यांच्यावर आपण इतःपर टीका करणार नाही असें अभिवचन दिलें. हा सारा हास्यास्पद मजकूर डॉ. माथूर यांनी गोखल्यांनी मिसेस बेझंट यांना लिहिलेल्या पत्रांच्या आधाराने लिहिला आहे. पण या होतकरू इतिहासकारांना आपल्या चरित्रनायकांनी केलेल्या विधानांची सत्यासत्यता तपासून पाहण्याची

कल्पनासुद्धा सुचली नाही यावरून यांना खरोखरीचे इतिहासकार बनण्यालाअजून किती तपें घालवावीं लागतील याची कोणाही अभ्यासकाला कल्पना येईल. २५ जानेवारीला टिळक आपल्याला शरण आले असल्याचें तातडीचें पत्र मिसेस बेझंट यांना लिहिणाऱ्या गोखल्यांवर ९ फेब्रुवारीच्या केसरीच्या अंकात वज्राघात करून टिळकांनी 'चोराच्या उलट्या बोंबा' हा अतिशय कडक लेख प्रसिद्ध केला. इतकेंच नव्हें तर १६ फेब्रुवारीच्या 'केसरी'चा अंकही त्यांनी गोखल्यांच्या, समेटप्रकरणात गुप्त पत्रें लिहून पाठीत खंजीर खुपसण्याच्या अश्लाघ्य वर्तनाचे वाभाडे काढण्यालाच वाहिला होता. हा अंक प्रसिद्ध झाल्यानंतर समाजात तोंड दाखविणें अशक्य झालेल्या गोखल्यांनी १९ फेब्रुवारीला आपल्या हाताने आपला काही महत्त्वाचा पत्रव्यवहार जाळून आणि आपल्या मित्रमंडळींची भेट घेऊन आपली जीवनलीला संपविली. त्या दिवसांत अनेक प्रमुख व्यक्तींनी 'the compromise controversy killed Mr. Gokhale.' (समेटाच्या वादामुळे गोखल्यांचें मरण ओढवलें) असे उद्‌गार काढले होते. एकतर या प्रकरणी हरिभाऊ देवांनी टिळक मला शरण आले, अशा बढाया मारल्या असाव्यात आणि गोखल्यांनी त्या बढायांवर विश्वास ठेवला असावा, नाही तर 'परोक्षप्रिया वै देवाः' या श्रुतिवचनाप्रमाणे देवांनी ज्यातून अनेक अर्थ निघतील असलीं काही विधानें करून गोखल्यांची वंचना केली असावी. कारण २५ जानेवारीला टिळक हरिभाऊ देवांना शरण जाण्याइतके भेकड बनले होते आणि ९ फेब्रुवारीला ते नेहमीप्रमाणे सिंह बनले, या कल्पनेवर डॉ. माथूर यांच्यासारख्या होतकरू इतिहासकारावाचून अन्य कोणीच विश्वास ठेवणार नाही. असो. गोखल्यांना गोत्यात आणणाऱ्या या हरिभाऊ देवांनी टिळक-पक्ष कसा नष्ट करावा यासंबंधी गांधींच्यापाशी गुप्तपणे चर्चा केल्याचें स्वामी सत्यदेवांनी आपल्या आत्मचरित्रात सांगितलें आहे. या चर्चेचा निष्कर्ष म्हणूनच की काय कोण जाणे, गांधींनी टिळकांना १९१५ मध्ये हरिभाऊ देव, नटेशराव द्रविड आणि श्रीनिवास शास्त्री हे गोखल्यांचे वारस सांगतील, त्याप्रमाणे नम्रतेने वर्तन ठेवून गोखलेविरोधाचें प्रायश्चित्त घ्यावयाला सांगितल्याचें टिळकांच्या नवीनच प्रसिद्ध झालेल्या पत्रव्यवहारावरून उघडकीस आलें आहे. टिळकांना असला अनाठायी उपदेश करण्याऐवजी स्वतः गांधींनीच या गुरुबंधूंच्या आज्ञा पाळण्याचें व्रत घेतलें असतें तर भारतीय राजकारणाचा त्यांनी जो विचका करून ठेविला, तो तरी टळला असता.
